श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

सभा क्र. ०१/२००९ **दिनांक ०३.०१.२००९**

स्थळ - शिर्डी कार्यालय **वेळ- दुपारी २.३० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शिर्डी येथे शनिवार दिनांक ०३ जानेवारी, २००९ रोजी दुपारी २.३० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-१८९१७-२००८, दि.२८.१२.२००८ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार सदरहू सभा शनिवार दिनांक ०३ जानेवारी,२००९ रोजी दुपारी २.३० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा.अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१.	मा. श्री. जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष	०२.	मा.श्री.राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील
०३.	मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे	०४.	मा.श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव
०५.	मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर	०६.	मा.कॅप्टन सुरेख वासुदेवा
०७.	मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर	०८.	मा.श्री.कृष्णचंद्र श्यामसुंदर पांण्डेय
०९.	मा.डॉ.पी.एल.तिवारी	१०.	मा.सौ.सुमित्रा कैलास कोते

मा.श्री.किशोर रा. मोरे
कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष, श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.श्री.शंकरराव गेणूजी कोल्हे, मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग, मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे, यांनी दूरध्वनीवरुन तसेच मा.श्री समि खतीब, मा.श्रीमती रिम्पल लोहिया, मा.श्री.रमाकान्त गणेश कर्णिक, यांनी फॅक्स पत्राद्वारे कळविले आहे. त्याची नोंद घेण्यात येऊन, समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

सभेच्या सुरुवातीस खालीलप्रमाणे दु:खवट्याचा निर्णय संमत करण्यात आला.

"दिनांक २६,नोव्हेंबर,२००८ रोजी मुंबई येथे अतिरेक्यांनी अमानुषपणे हल्ला करुन कित्येक निरापराध नागरिकांची हत्या केली. त्याचा तिव्र शब्दात निषेध व्यक्त करुन या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्यांना सभेने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण केली."

तसेच राज्याच्या मुख्यमंत्रीपदी मा.श्री अशोकरावजी चव्हाण व उपमुख्यमंत्रीपदी मा.श्री छगनरावजी भुजबळ यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदनाचा ठराव करण्यात आला व सर्व सदस्यांना सन २००९ या नुतन वर्षाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करण्यात आली.

विषय नं.०१ दिनांक १८.१०.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे

निर्णय क्र.०१ दिनांक १८.१०.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेत असतांना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या.

(०१) निर्णय क्र.७५९ (०३) मध्ये शेवटचा परिच्छेद-

हॉस्पिटलमध्ये सध्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली असून डॉक्टरांना मिळणाऱ्या इन्सेंटीव्हमध्ये सुध्दा चांगल्या प्रमाणात वाढ झालेली आहे. सध्या डॉक्टरांना मिळणाऱ्या मासिक वेतन /मानधन अधिक इन्सेंटीव्ह अशा एकूण देय रकमेचे अवलोकन केले असता सध्या देण्यात येणाऱ्या इन्सेंटीव्हमध्ये बदल करणे आवश्यक असल्याबाबत आजचे सभेत चर्चा झाली. मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांनी सध्या देण्यात येत असलेल्या इन्सेंटीव्हमध्ये डॉक्टरांचा व हॉस्पिटलचा शेअर पुढीलप्रमाणे विभागणी करणेबाबतचा प्रस्ताव मांडला तो मान्य करण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. सदर आदेशाची कार्यवाही दिनांक ०१.११.२००८ पासून करण्यात यावी.

अ.नं.	इन्सेंटीव्ह रकमेच्या	डॉक्टरांचा शेअर	हॉस्पिटलचा शेअर
०१.	सुरुवातीच्या रुपये १ लाख इन्सेंटीव्ह रकमेपर्यन्त	७० टक्के	३० टक्के
०२.	रुपये ०१ लाखाचे यपुढे रुपये २ लाखापर्यन्त	८० टक्के	२० टक्के
०३.	रुपये २ लाखाचे पुढे	९० टक्के	१० टक्के

याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.

श्री साईबाबा रुग्णालयातील डॉक्टरांना पूर्वी देण्यात येत असलेल्या डॉक्टरांचे व हॉस्पिटलचे शेअरमध्ये तूर्त कोणताही बदल करण्यात येऊ नये असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

(०२) निर्णय क्र.७५९ (०३) मध्ये शेवटचा परिच्छेद-

तरी आकृतीबंधास शासनाचे मान्यतेस अधीन राहून श्रीसाईनाथ हॉस्पीटलकडील संबंधीत कर्मचाऱ्यांस वेतनश्रेणीच्या एकूण वेतनाच्या जवळपास खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे एकत्रित वेतन देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

अ.नं	पदनांत	संख्या	दिलेले एकत्रीत वेतन / मानधन	देय वेतनश्रेणी	वेतनश्रेणीनुसार एकूण वेतन	प्रस्तावित एकत्रित वेतन
१	वैद्यकीय अधिकारी (आर.एम.ओ.)सि.ए म.ओ.)	१२+०१=१३	१७,०००/-	८,०००-१३,५००	१६९२०/- + (एनपीए)	१६०००/- +ऐवजी एकत्रित रु.१८०००/- (एनपीए)
२.	लॅब टेक्निशियन	०६	८,०००/-	५०००-८०००	१०५७५/-	१००००/-
३.	ई.सी.जी.टेक्निशियन	०३	८,०००/-	५०००-८०००	१०५७५/-	१००००/-
४	फार्मासिस्ट	०८	७,०००/-	४५००-७०००	९५१८/-	९०००/-
५	ज्यु.एक्स-रे टेक्निशियन	०२	६,५००/-	४०००-६०००	८४६०/-	८०००/-
६.	लॅब असिस्टंट	०४	४,०००/-	२५५०-३२००	५३९३/-	५०००/-
७.	थिएटर असिस्टंट	०५	४,०००/-	२५५०-३२००	५३९३/-	५०००/-

याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.

तरी आकृतीबंधास शासनाचे मान्यतेस अधीन राहून श्रीसाईनाथ हॉस्पीटलकडील संबंधीत कर्मचाऱ्यांस खालीलप्रमाणे वेतनश्रेणी देण्यास मान्यता प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

अ.नं.	पदनांत	संख्या	दिलेले एकत्रीत वेतन / मानधन	देय वेतनश्रेणी
१	वैद्यकीय अधिकारी (आर.एम.ओ.)सि.एम.ओ.)	१२+०१=१३	१७,०००/-	८,०००-१३,५००
२.	लॅब टेक्निशियन	०६	८,०००/-	५०००-८०००
३.	ई.सी.जी.टेक्निशियन	०३	८,०००/-	५०००-८०००
४	फार्मासिस्ट	०८	७,०००/-	४५००-७०००
५	ज्यु.एक्स-रे टेक्निशियन	०२	६,५००/-	४०००-६०००
६.	लॅब असिस्टंट	०४	४,०००/-	२५५०-३२००
७.	थिएटर असिस्टंट	०५	४,०००/-	२५५०-३२००

(कार्यवाही-अधिक्षक आस्थापना)

विषय नं.०२ दिनांक १५.११.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे

निर्णय क्र.०२ दिनांक १.११.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेत असतांना खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली.

निर्णय क्र.८४८ मध्ये शेवटचा परिच्छेद-

सदर लॉन्ड्री विभाग हा संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयाकडील पश्चिमेकडील जागेत केल्यास दोन्ही रुग्णालयाचे दृष्टीने योग्य राहिल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय तूर्त तहकुब ठेवण्यात यावा असे ठरले.

याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे-

सदर लॉन्ड्री विभाग हा संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयाकडील पश्चिमेकडील जागेत केल्यास दोन्ही रुग्णालयाचे दृष्टीने योग्य राहिल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

विषय नं.०३ दिनांक १८.१०.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या आस्थापना उपसमिती सभेचे इतिवृत्त.

निर्णय क्र.०३ दिनांक १८.१०.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या आस्थापना उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या,त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

०१. (अ) संस्थान सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचाऱ्याचे एका नातेवाईकास संस्थान सेवेत घेणे बाबत श्री साईदास निवृत्ती शिंदे यांचा अर्ज

(ब) संस्थान सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचाऱ्याचे एका नातेवाईकास संस्थान सेवेत घेणे बाबत श्रीमती उषा सुरेश शिंगाडे यांचा अर्ज

(क) संस्थान सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचाऱ्याचे एक नातेवाईकास संस्थान सेवेत घेणेबाबत श्री विजय चंपालाल उपाध्ये व श्री साईप्रसाद साहेबराव वाघ यांचे अर्जाबाबत

(ड) संस्थान सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचाऱ्याचे एका नातेवाईकास संस्थान सेवेत घेणेबाबत श्रीमती शशिकला नानासाहेब डांगे यांचे अर्जाबाबत.

(ड) संस्थान सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचाऱ्याचे एका नातेवाईकास संस्थान सेवेत घेणेबाबत श्री सचिन अशोक गिते यांचे अर्जाबाबत

(इ) संस्थान सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचाऱ्याचे एका नातेवाईकास संस्थान सेवेत घेणेबाबत कु. प्रियंका सुभाष वर्मा यांचे अर्जाबाबत.

(ई) संस्थान सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचाऱ्याचे एका नातेवाईकास संस्थान सेवेत घेणेबाबत श्री.गणेश शिवकुमार बोलशेट्टी यांचे अर्जाबाबत.

उपरोक्त विषयाबाबत व्यवस्थापन समितीचे दिनांक २४.०५.२००८ चे सभेत निर्णय क्र.५५८ पारित झालेला असल्याने सदरहू विषय मागे घेण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

०२ <u>गट "क" व "ड" वर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने असलेली कुंठीतता घालविणेसाठी अश्वासित प्रगती योजना लागु करणेबाबत.</u>

गट ' क ' व ' ड ' या संवर्गातील काही ठिकाणी पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नाहीत.तर काही ठिकाणी अशा संधी उपलब्ध असल्यातरी पदोन्नती मिळण्यास प्रदिर्घ कालावधी लागतो.त्यामुळे एकाच पदावर १२ वर्षे सलगसेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या पदोन्नतीच्या साखळीतील कालबध्द वरची वेतनश्रेणी देण्याबाबतची योजना शासन निर्णय क्र.सामान्य प्रशासन-एसआई-१०९५-प्र.क्र.१/९५ बारा/दि.०८ जून १९९५ अन्वये जाहीर करण्यात आलेली होती व योजनेची अंमलबाजावणी ०१ आक्टोंबर १९९४ पासून करण्यात आली होती.संस्थान कर्मचाऱ्यांचे हित विचारात घेवून ही योजना संस्थाननेही अंमलबजावणीत आणली असून,या योजनेअंतर्गत आतापासून एकूण ४२५ इतक्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे.

त्यानंतर, शासन निर्णय क्र.वेतन-१९९९-प्र.क्र.२/९९/सेवा-३ मंत्रालय मुंबई -३२ दि.२०/०७/ २००१ अन्वये दि.०८ जून १९९५ चे शासन निर्णयानुसार अंमलात आलेली कालबध्द पदोन्नती योजना बंद करुन,त्याऐवजी ' सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना,दि.०१ ऑगष्ट २००१ पासून लागू करण्यात आलेली आहे.त्याची नियमावली खालील प्रमाणे :-

०१) ही योजना रु.८०००-१३५०० व त्याहून कमी वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना लागू होईल.

०२) या योजनेचा लाभ संबधीत पदावरील १२ वर्षांच्या नियमित सेवेनंतरच अनुज्ञेय होईल.

०३) सेवेत दोन किंवा त्याहून अधिक वेळा पदोन्नती मिळालेल्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय होणार नाही.

०४) या योजनेअंतर्गत पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी देय होईल.येथे पदोन्नतीचे पद उपलब्ध नाही तेथे तसेच एकाकी (Insolated) पदावरील कर्मचाऱ्यांना या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट एक मधील वेतनश्रेणी देय होईल.

०५) या योजनेअंतर्गत पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी देय ठरविली असल्याने वरिष्ठ वेतनश्रेणी मिळण्यासाठी पदोन्नतीच्या पदाकरीता विहीत केलेली अर्हता,पात्रता,जेष्ठता,अर्हता परिक्षा, विभागीय परिक्षा या सर्व बाबींची पूर्तता करणे तसेच पदोन्नतीची कार्यपध्दती अनुसरणे आवश्यक राहील.जेथे या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टातील वेतनश्रेणी मंजूर करण्यात येईल तेथे गोपनीय अहवालाच्या आधारे पात्रता तपासण्यात यावी.

०६) या योजनेचा लाभ संपूर्ण सेवेत फक्त एकवेळ अनुज्ञेय राहील.ज्या कर्मचाऱ्यांना दि.०८ जून १९९५ च्या शासन निर्णयान्वये यापुर्वीच वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मिळाला असेल त्यांना या योजनेअंतर्गत पुन्हा वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ अनुज्ञेय होणार नाही.

०७) या योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी दिल्यावर वेतननिश्चिती नियमीत पदोन्नतीप्रमाणेच होईल. मात्र त्याच वेतनश्रेणीत नियमीत /कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यावर पुन्हा वेतननिश्चितीचा लाभ देय होणार नाही.

०८) नियमित पदोन्नती नाकारलेल्या तसेच नियमित पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ देय होणार नाही.या योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी दिल्यानंतर नियमित पदोन्नती नाकारलेल्या वा नियमीत पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना देण्यात आलेला लाभ काढून घेण्यात येईल.मात्र दिलेल्या लाभांची वसूली करण्यात येणार नाही.

०९) ज्या पात्र कर्मचाऱ्यांना यापूर्वी दि.०८ जून १९९५ च्या शासन निर्णयाचे परिशिष्ट २ (ड) मधील तरतूदीनुसार २ पदोन्नती मिळालेल्या कर्मचाऱ्यांना यथास्थिती पदोन्नतीच्या पदाची किंवा शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टातील वेतनश्रेणी अनुज्ञेय करुन देण्यात आली असेल त्यांना दिलेला लाभ दि.२० जून २००१ च्या शासन निर्णयानुसार सेवाअंतर्गत आश्वासीत योजनेअंतर्गत तसाच पुढे चालू राहील.

१०) सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने नुसार संस्थान सेवेत रु.८०००-१३५०० व त्याहून कमी असलेल्या वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांला संबंधीत पदावरील १२ वर्षांच्या नियमीत

सेवेनंतर सदर योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील.तथापि सेवेत दोन किंवा त्याहून अधिकवेळा पदोन्नती मिळालेल्या कर्मचाऱ्यांना मात्र या योजनेचा लाभ अनुज्ञेय होणार नाही.

उपरोक्तशिवाय या योजने संदर्भात अन्य मार्गदर्शक तत्वे **०८ जून व ०१ नोव्हेंबर १९९५** आणि **२० मार्च १९९७** च्या शासन निर्णयानुसार लागु आहेत.

सदर योजनेअंतर्गत संस्थान कर्मचाऱ्यांना कालबध्द/वरची वेतनश्रेणी मंजूर करतांना,आतापर्यंत वर अ.नं.०५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विभागीय परिक्षा न घेता,केवळ पात्र तारखेचे लगतचे पाच वर्षांचे गोपनीय अहवाल विचारात घेऊन एकूण ८३ कर्मचाऱ्यांना या योजनेनुसार वरची वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे.

परिशिष्टात नामनिर्देशीत केलेल्या संस्थान कर्मचाऱ्यांनी त्यांच्या नांवापुढे दर्शविलेल्या पदावर सलग १२ वर्षे सेवा पूर्ण केलेली आहे.या योजनेअंतर्गत सदर कर्मचाऱ्यांचा वरची कालबध वेतनश्रेणी देण्यासाठी विचार करावा लागेल.संबंधीत कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल विचारात घेऊन,त्यांना वरची वेतनश्रेणी द्यावयाची तारीख निश्चित केलेली असून,ती त्यांच्या नांवापुढे नमूद केलेली आहे.

या योजनेच्या मार्गदर्शक तत्वांचा विचार करता सोबतचे परिशिष्टातील नामनिर्देशित कर्मचारी वरिष्ठ वेतनश्रेणी देण्यास पात्र होतात किंवा कसे ? याची छाननी प्रामुख्याने खालील निकषावर करण्यात आलेली आहे.

ज्या कर्मचाऱ्यांचे लगतच्या **५** वर्षांचे म्हणजे सर्वसाधारणपणे **सन.२००१-२००२ ते २००५-२००६** या कालावधीचे गोपनीय अहवाल विचारात घेण्यात आलेले आहेत.गोपनीय अहवाल लिहीतांना कर्मचाऱ्यांचे बाबतचे मुल्यमापन खालील प्रमाणे करण्याची पध्दती आहे.

(०१) अ + = अत्युत्कृष्ट. (०२) अ = उत्कृष्ट. (०३) ब + = निश्चित चांगला
(०४) ब = चांगला . (०५) ब- = साधारण (०६) क = साधारणपेक्षा कमी

शासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांचे पदोन्नतीसाठी गोपनीय अभिलेखाच्या प्रतवारीचे निकष ठरविण्यासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वांचा विचार करण्यात येतो.

०१. ज्या पदांच्या वेतनश्रेणीचा किमान टप्पा रु.५०९९/- पर्यंत आहे.त्यासाठी किमान निकष म्हणून ५ वर्षांच्या गोपनीय अभिलेखाची सरासरी प्रतवारी **' ब +** ' अशी राहील.

०२. ज्या पदांच्या वेतनश्रेणीचा किमान टप्पा रु.५१००/- किंवा त्यापेक्षा अधिक आहे त्यासाठी किमान निकष म्हणून गोपनीय अभिलेखाची सरासरी **' अ '** अशी राहील.

याआधी संस्थान कर्मचाऱ्यांना कालबध्द वरची वेतनश्रेणी मंजूर करतांना मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.१२-१३जुलै २००३ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.२९४ " पुढील काळात कर्मचाऱ्यांना कालबध्द वरची वेतनश्रेणी देतांना शासकीय अधिसुचनेनुसार गोपनीय अहवालाची सरासरी विचारात घेण्यात यावी." असा झालेला आहे.सदर निर्णयानुसार दि.०१ व ०३ जुलै २००४ रोजीच्या सभेमध्ये निर्णय क्र.३५७ नुसार एकूण ३० कर्मचाऱ्यांना सदर योजनेचा लाभ झालेला आहे.

आता,सदर योजनेनुसार खालील अ.नं.०१ ते १४१ कर्मचाऱ्यांना १२ वर्षे पुर्ण झालेले आहे.

SR. NO.	NAME AND DESIGNATION OF EMPLOYEE
PAYSCALE RS.8000-275-13500 REV.PAYSCALE RS. 10000-325-15200	
1.	**DR.RAM SHAKAR MAHAJAN** MEDICAL OFFICER, HOSPITAL DEPTT.
2.	**DR. BHASKAR SHRIRAM CHANDGUDE** MEDICAL OFFICER, DENTAL, SHRI SAINATH HOSPITAL
3.	**DR. ASHALATA BHAUSAHEB SABLE** MEDICAL OFFICER,SHRI SAINATH HOSPITAL
PAYSCALE RS.5500-175-9000 REV.PAYSCALE RS. 6500-200-10500	
4.	**MRS.SHUBHANGI M. KOLHATKAR** SISTER I/C,HOSPITAL DEPTT.
5.	**MRS.SULACHANA SUNIL TAMBATKAR** SISTER I/C,HOSPITAL DEPTT.
6.	**MRS.NALINI VITTHAL JAGTAP** SISTER I/C,HOSPITAL DEPTT.
7.	**MRS.MANINI NANDKUMAR KULKARNI** SISTER I/C,HOSPITAL DEPTT.
8.	**SHRI SONAWANE PRABHAKAR VEDU** INSTRUCTOR FITTER, SHRI SAIBABA INDUSTRIAL TRAINING INST.
9.	**SHRI TAMBE SUNIL SAKHARAM** INSTRUCTOR WELDER, SHRI SAIBABA INDUSTRIAL TRAINING INST.
10.	**SHRI.ANILKUMAR PANDHRINATH MAID** MECHNICAL DRAFTSMAN INSTR,I.T.T.DEPTT.
11.	**SHRI.DEELIPKUMAR BALU CHALKE**

	ALIED TRADE INSTRUCTOR,I.T.T.DEPTT.
12.	**SHRI PAWAR DASHRATH SAMBHU,** INSTRUCTOR SOCIAL STUDY CUM LIAB. SHRI SAIBABA INDUSTRIAL TRAINING INST.
PAYSCALE RS.5000-150-8000 REV.PAYSCALE RS. 5500-175-9000	
13.	**MRS. SALGARKAR NIRMALA DIGAMBAR** NURSE, SHRI SAINATH HOSPITAL, SHIRDI
14.	**MISS ROKADE ASHA TULSHIRAM** NURSE, SHRI SAINATH HOSPITAL, SHIRDI
15.	**MRS. BARASE NISHA MADHUKAR** NURSE, SHRI SAINATH HOSPITAL, SHIRDI
PAYSCALE RS. 4500-125-7000 REV.PAYSCALE RS. 5000-150-8000	
16.	**MRS. WAGH CHANDA MOHAN** COMPOUNDER, SHRI SAINATH HOSPITAL
PAYSCALE RS. 3050-75-3950-80-4590 REV.PAYSCALE RS. 4000-100-6000	
17.	**SHRI KOND ARUN BARKU** DRIVER, VEHICLE DEPARTMENT.
18.	**SHRI.RAJENDRA YAESHWANTRAO KOTE** CLERK TYPIST, ADMINISTATIVE BRANCH
19.	**SHRI.AVINASH MALHARRAO ADLING** CLERK TYPIST,ACCOUNTS BRANCH
20.	**GAUTAM BALA SABALE** DATA ENTRY OPERATOR,INFORMATION TECHNOLOGY DEPT.
21.	**SHRI.BALU MARUTHI BHOSALE** DRIVER,VEHICLE DEPT
22.	**SHRI.PANDHARINATH YESHWANT KOTE** DRIVER CUM PEON,VEHICLE DEPT
23.	**SHRI.PUNJA KHANDU HATKAR** ATTENDANT,BHAKTANIWASSSTHAN DEPT.
24.	**SHRI.KRISHNADAS ASRAJI CHAUKATE** CLERK TYPIST,CANTEEN DEPTT.
25.	**SHRI.NIVRUTTI SHANKAR SHINDE** CLERK TYPIST,CANTEEN DEPTT.
PAYSCALE RS. 2550-55-2660-60-3200 REV.PAYSCALE RS. 2610-60-2910-65-3300-70-4000	
26.	**SMT. SHELKE MANDA JAGANNATH** WATCHMAN,SECURITY DEPARTMENT.
27.	**SMT. BANKAR LATA KISAN,** ATTENDANT,PRASADALAY DEPARTMENT.
28.	**SHRI KOTE SANJAY GOPINATH,** ATTENDANT,COUNTERS DEPARTMENT.
29.	**SHRI BHOSALE BHIKA SHRIRANG.** SWEEPER,TEMPLE DEPARTMENT.
30.	**SHRI TURAKNE BABASAHEB LAXMAN.** PEON, GARDEN DEPARTMENT.
31.	**SHRI.BALASAHEB NARAYAN GONDKAR** PEON, ADMINISTATIVE BRANCH
32.	**SHRI.PRAKASH KESHAV SHINDE** ATTENDANT,ACCOUNTS BRANCH
33.	**SHRI.SHANKAR LAKHU BANKAR** ATTENDANT, ENQUIRY OFFICE DEPT.
34.	**SHRI.SHRIRANG DEORAM GAVHALE** ATTENDANT, ENQUIRY OFFICE DEPT.
35.	**SHRI.LAHU NAMDEO HATANGALE** PEON, ENQUIRY OFFICE DEPT.
36.	**SHRI.GAUTAM RANGNATH PAWAR** ATTENDANT, ENQUIRY OFFICE DEPT.
37.	**SHRI.YESHWANTA DASHRATH CHAUDHARY** ATTENDANT, ENQUIRY OFFICE DEPT.
38.	**SHRI.RAVIDNRA BHAUSAHEB CHAUDHARI** ATTENDANT, ENQUIRY OFFICE DEPT.
39.	**SHRI.GULAMRASUL GULAMHABIB PATHAN** PEON, PUBLICATION DEPT
40.	**SHRI.SHARAD BHAGWAT PATHARE** ATTENDANT, TEMPLE DEPT.
41.	**SHRI.ARJUN RAOJI KOLAGE** ATTENDANT, TEMPLE DEPT.

42.	**SHRI.BAPPA GANPAT GAIKWAD** ATTENDANT,TEMPLE DEPT.
43.	**SHRI.HARIBHAU SHIVRAM PHUNDE** ATTENDANT,TEMPLE DEPT.
44.	**SHRI.DAMU DAGDU SONAWANE** SWEEPER,SANITATION DEPT.
45.	**SHRI.NANA DEVKA KHARAT** SWEEPER,SANITATION DEPT.
46.	**SHRI.VIKRAM NAMDEO JADHAV** ATTENDANT,CONSTRUCTION DEPT.
47.	**SHRI.ANNASAHEB GOVRDHAN KUDALE** ATTENDANT,CONSTRUCTION DEPT.
48.	**SHRI.DWARKU BAPU BARWANT** ATTENDANT,CONSTRUCTION DEPT.
49.	**SHRI.LAXMAN RADHAJI PAWAR** ATTENDANT,CONSTRUCTION DEPT.
50.	**SHRI HABIB JAFAR SAYYED** ATTENDANT,CONSTRUCTION DEPT.
51.	**SHRI.DNYANDEO DATTATRAYA DESAI** ATTENDANT,CONSTRUCTION DEPT.
52.	**SHRI.ASHOK SHANKAR BHALERAO** ATTENDANT,CONSTRUCTION DEPT.
53.	**SHRI.LAXMAN MARUTI DHUMASE** ATTENDANT,CONSTRUCTION DEPT.
54.	**SHRI.ASHOK HARIBHAU SHELKE** ATTENDANT,CONSTRUCTION DEPT.
55.	**SHRI.SOPAN GOPAJI GAYAKE** ATTENDANT,CONSTRUCTION DEPT.
56.	**SHRI.SADASHIV SOPAN GORDE** ATTENDANT,CONSTRUCTION DEPT.
57.	**SHRI.SHARAD DAULAT TAKWALE** WATCHMAN,SECURITY DEPT.
58.	**SHRI.BALASAHEB LAXMAN SANDAN** WATCHMAN,SECURITY DEPT.
59.	**SHRI.HUSEN FATTU SAYYED** WATCHMAN,SECURITY DEPT.
60.	**SHRI.BHANUDAS PUNJA KOTE** WATCHMAN,SECURITY DEPT.
61.	**SHRI.BHAUDAHEB ABAJI GHEGADMAL** WATCHMAN,SECURITY DEPT.
62.	**SHRI.ARUN BHAGWAT WABLE** WATCHMAN,SECURITY DEPT.
63.	**SHRI.SUBHASH TUKARAM KADAM** WATCHMAN,SECURITY DEPT.
64.	**SHRI.ARUN JANKU GAYAKE** WATCHMAN,SECURITY DEPT.
65.	**SHRI.RAOSAHEB RAMBHAU GUND** WATCHMAN,SECURITY DEPT.
66.	**SHRI.INDRABHAN GANGADHAR KAHANDAL** WATCHMAN,SECURITY DEPT.
67.	**SHRI.SHIVAJI VITTHAL SOMWANSHI** WATCHMAN,SECURITY DEPT.
68.	**SHRI.YADAV MADHAVRAO KOTE** WATCHMAN,SECURITY DEPT.
69.	**SHRI BHASKAR JANARDHAN NAZIRE** WATCHMAN,SECURITY DEPT.
70.	**SHRI.ANNASAHEB KARBHARI DABHADE** WATCHMAN,SECURITY DEPT.
71.	**SHRI.VIJAY HIRALAL GHARU** WATCHMAN,SECURITY DEPT.
72.	**SHRI.CHNGDEO NARAYAN BANKAR** WATCHMAN,SECURITY DEPT.
73.	**SHRI.PRAKASH BHAUSAHEB KOTE** WATCHMAN,SECURITY DEPT.
74.	**SHRI.JAGANNATH RANGNATH TURAKANE** WATCHMAN,SECURITY DEPT.
75.	**SHRI.BHAUSAHEB KUSHABA SHEJWAL** WATCHMAN,SECURITY DEPT.
76.	**SHRI.MADHAV GOVIND SHINDE** WATCHMAN,SECURITY DEPT.
77.	**SHRI.SANJAY MOHAN BHADAKWAN** ATTENDANT,ELECTRIC DEPT.

78.	**SHRI.BHUSAHEB SHIVRAM JEJURKAR** ATTENDANT,ELECTRIC DEPT.
79.	**SMT.VASANTI YESHWANT PATHAK** ATTENDANT,PRASADALAYA DEPT.
80.	**SMT.SHASHIKALA ANNASAHEB MINDAR** ATTENDANT,PRASADALAYA DEPT.
81.	**SMT.CHANDRABHAGABAI LAXMAN ADANGALE** ATTENDANT,PRASADALAYA DEPT.
82.	**SHRI.RAMCHANDRA PARSHRAM GONDKAR** ATTENDANT,PRASADALAYA DEPT.
83.	**SHRI.SHAKIL DADUBHAI SAYYED** ATTENDANT,PRASADALAYA DEPT.
84.	**SHRI.SATISHCHANDRA PANDITRAO BADVE** ATTENDANT,PRASADALAYA DEPT.
85.	**SHRI.TUKARAM NAGU GUNJAL** ATTENDANT,PRASADALAYA DEPT.
86.	**SHRI.DEELIP EKNATH HARNE** ATTENDANT,PRASADALAYA DEPT.
87.	**SHRI.DEELIP SADA SONAWANE** ATTENDANT,PRASADALAYA DEPT.
88.	**SHRI.PRAKASH DNYANDEO SHINDE** ATTENDANT,PRASADALAYA DEPT.
89.	**SHRI.BHIMRAO BABURAO LOKHANDE** ATTENDANT,PRASADALAYA DEPT.
90.	**SHRI.SAMPAT RAMBHA KOLAGE** ATTENDANT,PRASADALAYA DEPT.
91.	**SHRI.SAYRAMBHIMASHANKAR PAGARE** ATTENDANT,PRASADALAYA DEPT.
92.	**SHRI.SAHEBRAO SOPAN VADAK** ATTENDANT,PRASADALAYA DEPT.
93.	**SHRI.RAJENDRA KASHINATH GITE** ATTENDANT,PRASADALAYA DEPT.
94.	**SHRI.BALU WAMAN WAGH** ATTENDANT,PRASADALAYA DEPT.
95.	**SHRI.VILAS JECAB LONDHE** ATTENDANT,PRASADALAYA DEPT.
96.	**SHRI.PRAMOD LAXMAN KHARAT** ATTENDANT,PRASADALAYA DEPT.
97.	**SHRI.DINKAR MURLIDHAR GHARE** ATTENDANT,PRASADALAYA DEPT.
98.	**SHRI.RAGHUNATH SYAJI BANSODE** ATTENDANT,PRASADALAYA DEPT.
99.	**SHRI.ANNASAHEB NIVRUTTI DANGE** ATTENDANT,PRASADALAYA DEPT.
100.	**SHRI.GORAKHNATH DEORAM DANGE** ATTENDANT,PRASADALAYA DEPT.
101.	**SHRI.BALU NIVRUTTI KANASE** ATTENDANT,PRASADALAYA DEPT.
102.	**SHRI.ASHOK BAJIRAO KOTE** ATTENDANT,PRASADALAYA DEPT.
103.	**SHRI.SUDAM NIVRUTTI KALEKAR** ATTENDANT,PRASADALAYA DEPT.
104.	**SHRI.BABAN SITARAM DANGE** ATTENDANT,PRASADALAYA DEPT.
105.	**SHRI.BHANUDAS CHIMANRAO CHAVAN** ATTENDANT,PRASADALAYA DEPT.
106.	**SHRI.KARBHARI ASARAM JADHAV** ATTENDANT,VEHICLE DEPT
107.	**SHRI.KAILASH NIMBA GAVLI** ATTENDANT,VEHICLE DEPT
108.	**SHRI.BHAUSAHEB NANASAHEB WANI** ATTENDANT,VEHICLE DEPT
109.	**SHRI.CHADRAKANT YOHAN JAGTAP** ATTENDANT,VEHICLE DEPT
110.	**SHRI.INDARRAO EKNATH DESHMUKH** ATTENDANT,VEHICLE DEPT
111.	**SHRI.HIRAMAN SAKHARAM ARNE** ATTENDANT,VEHICLE DEPT
112.	**SHRI.SUBHASH KERU BHAMBARE** ATTENDANT,VEHICLE DEPT
113.	**SHRI.SURESH MADHAV THORAT** CLERK TYPIST,VEHICLE DEPT

114.	**SHRI.MADHUKAR NILKANTH KULKARNI** ATTENDANT,BHAKTANIWASSSTHAN DEPT.
115.	**SHRI.DATTU APPASAHEB DANGE** ATTENDANT,BHAKTANIWASSSTHAN DEPT.
116.	**SHRI.EKNATH GANGADHAR WAKCHAURE** ATTENDANT,BHAKTANIWASSSTHAN DEPT.
117.	**SHRI.BHARAT GAJANAN SOMWANSHI** ATTENDANT,BHAKTANIWASSSTHAN DEPT.
118.	**SHRI.PARAJI KARBHARI GAVHANE** ATTENDANT,BHAKTANIWASSSTHAN DEPT.
119.	**SHRI.ASHOK KERU WAGHMARE** ATTENDANT,BHAKTANIWASSSTHAN DEPT.
120.	**SHRI.POPAT LAXMAN DANGE** ATTENDANT,BHAKTANIWASSSTHAN DEPT.
121.	**SHRI.RAVINDRA WAMAN SOLASE** ATTENDANT,BHAKTANIWASSSTHAN DEPT.
122.	**SHRI.SURABHAN KASHINATH BHOKARE** ATTENDANT,BHAKTANIWASSSTHAN DEPT.
123.	**SHRI.SOPAN MARUTI LAD** ATTENDANT,BHAKTANIWASSSTHAN DEPT.
124.	**SHRI.NAVNATH SITARAM DANGE** ATTENDANT,CANTEEN DEPTT.
125.	**SHRI.KAILASH SHANKAR GAIKWAD** ATTENDANT,CANTEEN DEPTT.
126.	**SHRI.ASHOK HANUMATA DOKHE** ATTENDANT,CANTEEN DEPTT.
127.	**SHRI.RAMKRISHNA NANA SARODE** ATTENDANT,CANTEEN DEPTT.
128.	**SHRI.KISAN PARAJI KATKAR** ATTENDANT,CANTEEN DEPTT.
129.	**SHRI.VIJAYKUMAR SITARAM DHIVAR** ATTENDANT,CANTEEN DEPTT.
130.	**SHRI.KISAN RAOJI GAIKWAD** ATTENDANT,CANTEEN DEPTT.
131.	**SHRI.SUBHASH VISHWANATH SAINDER** ATTENDANT,CANTEEN DEPTT.
132.	**SHRI.RAMDAS ONKAR WAKE** ATTENDANT,CANTEEN DEPTT.
133.	**SHRI.SITARAM KISAN KAHANDAL** ATTENDANT,CANTEEN DEPTT.
134.	**SHRI.AKBARKHA HAMJEKHA PATHAN** ATTENDANT,CANTEEN DEPTT.
135.	**SMT.SUNANDA DEORAM TALEKAR** AYA,HOSPITAL DEPTT.
136.	**SHRI.SURESH FAKIRA PAGARE** ATTENDANT,HOSPITAL DEPTT.
137.	**SMT.SUMAN SAHEBRAO WAGH** AYA,HOSPITAL DEPTT.
138.	**SHRI.GANESH SAHEBRAO BHOKARE** ATTENDANT,ENGLISH MEDIUM SCHOOL
139.	**SHRI.BALASAHEB BABURAO KALEKAR** ATTENDANT,ENGLISH MEDIUM SCHOOL
140.	**SHRI.PANDURANG DHONDIRAM DANI** PEON,BOMBAY OFFICE
141.	**SHRI JAGTAP DIGAMBAR NIVRUTTI,** ATTENDANT,SAIBABA BHAKTANIWASSTHAN DEPT.

अ.नं.०१ ते १४१ पेकी अ.नं. ०८, ०९, १०, ११, १२, १५, १७, १८, १९, २०,२१, २२, २८,३१, ३२, ३४,३९, ४४,४६,४७,४८,५०,५२,५४,५५,६०,६२,६३,७६,७७,७८,११३,११४,११५, १२७, १३८ व १४०,असे **एकूण ३७** कर्मचारी हे वरची वेतनश्रेणी देण्यास पात्र ठरतात व उर्वरीत १०४ कर्मचारी सदर योजनेचा लाभ देण्यास अपात्र ठरत आहेत.तसेच सर्वश्री तुकाराम गोपीनाथ माणिक कार्यालय अधिक्षक मुंबई व श्री आप्पासाहेब खंडु कोते,रसोडा सुपरवायझर यांना एकाच पदावर १२ वर्षे पुर्ण झालेले आहेत तथापि सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनेमधील अटी-शर्ती क्र.०३ नुसार(सेवेत दोन किंवा त्याहून अधिक वेळा पदोन्नती मिळालेल्या असल्याने) ते वरची वेतनश्रेणी देण्यास अपात्र ठरतात.

तरी उपरोक्त मा.व्यवस्थापन मंडळाचा निर्णय व सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनेनुसार पात्र ठरणाऱ्या उपरोक्त कर्मचाऱ्यांना वरची वेतनश्रेणी देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, एकूण पात्र उपरोक्त ३७ पात्र कर्मचाऱ्यांना नियमानुसार वरची वेतनश्रेणी देण्यात यावी. तसेच उर्वरित १०४ अपात्र कर्मचाऱ्यांचे मागील पाच वर्षाचे गोपनीय अहवाल

मा.कार्यकारी अधिकारी व प्रशासकीय अधिकारी यांनी पडताळणी करुन योग्य वाटल्यास संबंधितांचे कामात सुधारणा होणेबाबत अंडरटेकींग व शासनाचे मार्गदर्शन घेऊन त्यांना आश्वासीत प्रगती योजनेनुसार वेतनश्रेणी देणेबाबत उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

०३ असोसिएट कन्सलटंट पद व त्या पदाचे मानधन/वेतन मिळणेबाबत डॉ.किरण आर गोरे यांचे अर्जाबाबत.

सदरहू विषयाबाबत व्यवस्थापन समितीचे दिनांक १८.१०.२००८ चे सभेत चर्चा होऊन निर्णय क्र.७५९ (१८) पारित झालेला असल्याने सदरहू विषय मागे घेण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

०४ श्री मिलींद लालचंद सोनवणे, ज्यु.कॅथलॅब टेक्नीशियन यांचे मानधन वाढी बाबत.

श्री मिलींद लालचंद सोनवणे,ज्यु.कॅथलॅब टेक्नीशियन यांना शासन निर्णयानुसार वेतनश्रेणी देण्यात आलेली असल्याने सदरहू विषय मागे घेण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

०५ डॉ.हेतल शहा Opthalmologist यांचे वेतनाबाबत

डॉ.हेतल नविनचंद्र शाह यांची जा.क्र.एसएसएस-वशी-०१-११४५,२००७,दि.२३.१.२००७ अन्वये Ophthalmologist या पदावर रु.३०,०००/-फिक्स पे या स्वरुपात नेमणूक करण्यात आलेली आहे. ते सदर पदावर मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांचे आदेशावरुन दिनांक२५.१२.२००६ पासून प्रत्यक्ष कामावर हजर झालेले होते. परंतू त्यांना नेमणूक आदेश रितसर नेमणूकीची कार्यवाही होऊन,दि.२३.१.२००७ रोजी पारित झालेला आहे.

त्यांची हजर तारीख बॅक डेटेड (Back Dated) असल्याने तसेच नेमणूक आदेशातच त्या तारखेचा उल्लेख नसल्यामुळे ऑडिटच्या दृष्टीने ती क्यूरी आहे. यास्तव बॅक डेटेड वेतन काढणेस अडथळा निर्माण होत आहे.

उपरोक्त कारणास्तव (अ) डॉ.हेतल शहा यांचे हजर झालेल्या तारखेपासून म्हणजेच दि.२५.१२.२००६ पासून फेर सुधारित नेमणूकपत्र आस्थापना विभागामार्फत काढल्यास सोईस्कर होईल, त्यास मान्यता असावी, किंवा

(ब) त्यांच्या हजर रिपोर्ट दि.२५.१२.२००६ ऐवजी नेमणूक आदेश पारित झालेपासून म्हणजेच दि.२३.१.२००७ पासून सुधारित देणेस व तेंव्हापासून त्यांचे वेतन काढणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, बॅकडेटेड (दि.२५.१२.२००६ पासून) नेमणूक आदेश देता येणार नाही, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

०६ डॉ.योगिनी शहा, रेडिओलॉजिस्ट यांना फिक्स इन्सेन्टीव्ह देणेबाबत.

सदरहू विषयाबाबत व्यवस्थापन समितीचे दिनांक ८.१२.२००७ चे सभेत निर्णय क्र.८५० अन्वये निर्णय झालेला असल्याने विषय मागे घेण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

०७ श्री.पी.व्ही.निर्मळ,वरिष्ठ लिपीक,सभाकामकाज विभाग यांना वेतनवाढी देणेबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन विनंती अर्ज करितो की, संदर्भीय आदेशान्वये श्री अशोक नामदेव झुरंगे, अधिक्षक, मिटींग विभाग यांची बदली श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये होऊन त्यांचे अधिक्षक, मिटींग विभाग या पदाचे काम माझेकडे सोपविण्यात येऊन त्याबाबत मला रुपये ३००/- प्रति महिना जादा मेहनताना देणेबाबत आदेश पारित करण्यात आलेला आहे.

व्यवस्थापन मंडळाचे दिनांक ३१.०७ व ०१.०८.२००४ चे सभेतील निर्णय क्र.४१५ अन्वये संस्थानचे आस्थापनेवर रिक्त असलेल्या अधिक्षक पदांवर नेमणूका देणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन मुलाखती घेण्यात आल्या. या मुलाखतीमध्ये संस्थान सेवेतील सात कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात येऊन त्यांना अधिक्षक या पदावर रुपये ५५००-९००० या पदावर नियुक्ती देण्यात आलेली आहे. या पदांमध्ये अधिक्षक, मिटींग विभाग या पदाचा समावेश होता. त्याप्रमाणे या पदावर श्री अशोक नामदेव झुरंगे यांची दिनांक ०२.०८.२००४ पासून नियुक्ती करण्यात आली होती.

श्री.झुरंगे यांची अधिक्षक, मिटींग विभाग या पदावर नेमणूक होण्यापूर्वी म्हणजे दिनांक ०१.०६.१९९५ पासून मिटींग विभागाकडे काम करत आहे. तेव्हापासून मिटींगविभागाकडे स्वतंत्र विभागप्रमुखाची नेमणूक करण्यात आलेली नव्हती. पुढे दिनांक ०१.०१.२००१ पासून मिटींग विभागप्रमुख या पदाचे काम माझेकडे सोपविण्यात येऊन मला रुपये ३००/- प्र.म.जादा मेहनताना देण्यात येत होता. परंतू श्री झुरंगे यांची दिनांक ०२.०८.२००४ पासून अधिक्षक, मिटींग विभाग या पदावर नियुक्ती झालेने त्यांचे बदली होईपर्यंतचे म्हणजे दिनांक २१.०३.२००६ या कालावधीपर्यंत मला देण्यात येत असलेला मेहनताना बंद करण्यात आला होता. श्री झुरंगे मिटींग विभागाकडे अधिक्षक पदावर हजर झाले परंतू या कालावधीत मिटींग विभागाचे मी पूर्वीपासून करत असलेल्या कामात कोणताही फरक पडला नाही. या

कालावधीत अजेंडा काढण्यापासून प्रोसिडींग ड्राफ्ट करणे, कार्यवाही विविध विभागांना पाठविणे,पूर्तता अहवाल व्यवस्थापन मंडळास सादर करणे, शासन पत्रव्यवहार ही सर्वच कामे मला करावी लागलेली आहे व सध्या करत आहे.

श्री झुरंगे यांची बदली दिनांक २१ मार्च,२००६ पासून अद्यापपर्यत मिटींग विभागाकडे रुपये ५५००-९००० या वेतनश्रेणीतील अधिक्षक या पदावरील व्यक्तीची नियुक्ती करण्यात आलेली नाही. त्यामूळे मला वरिष्ठ लिपिक या पदाचे काम पाहून अधिक्षक, मिटींग विभाग या पदाचे काम पहावे लागत आहे. मिटींग विभागाकडील कामाचा व्याप हा मोठ्या प्रमाणावर वाढलेला असल्याने ड्युटी व्यतिरिक्त जादा वेळ थांबून कामे करावे लागतात. संस्थानचे इतर विभागातील अधिक्षक या पदावर काम करत असलेले कर्मचारी संगणकावर टाईप करण्याचे काम करत नाही परंतू ही सर्व कामे मला करावे लागत आहे.

या सर्व बाबींचा विचार करुन मला सध्या देण्यात येत असलेले रुपये ३००/- जादा मेहनतान्या ऐवजी मिटींग विभागप्रमुख या पदाची रुपये ५५००-९००० ही वेतनश्रेणी लागू करावी अथवा वरिष्ठ लिपिक या पदाचे रुपये ४०००-१००-६००० या वेतनश्रेणीत पाच जादा वेतनवाढी मिळाव्यात अशी विनंती केली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

आजचे सभेत मा.कार्यकारी अधिकारी यांनी असे सांगितले की,सध्या अधिक्षक, मिटींग विभाग हे पद रिक्त असून या पदाची वेतनश्रेणी रुपये ५५००-९००० असून श्री निर्मळ हे वरिष्ठ लिपिक असून त्यांची वेतनश्रेणी रुपये ४०००-६००० अशी आहे व ते गेली अनेक वर्षापासून मिटींग विभाग प्रमुखाचे काम उत्कृष्टपणे करत असून त्यांना रुपये ३००/- प्रतिमहा इतके विशेष वेतन देण्यात येत आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.निर्मळ यांना ते मिटींग विभागप्रमुख या पदाचे काम सोपविण्यात आले आहे. वरीष्ठ पदाच्या अतिरिक्त पदभारासाठी द्यावयाचे विशेष वेतनासाठी शासनाकडील जी.आर. प्रमाणे कार्यवाही करावी. तसेच, त्यापेक्षा जादा वेतन द्यावयाचे झाल्यास स्वतंत्र प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना)

०८ <u>अधिक्षक हे पदनाम व त्या पदाची वेतनश्रेणी मिळणेबाबत श्री.रामराव शेळके व इतर पांच यांचे अर्जाबाबत.</u>

सर्वश्री ०१) रामराव रंभाजी शेळके, कॅन्टीन विभाग प्रमुख ०२)प्रकाश रामचंद्र रत्नपारखी,पर्यवेक्षक ०३) प्रमोद वसंत कुलकर्णी, प्रकाशने विभाग प्रमुख यांनी दि.११/०७/२००५ रोजी मा.अध्यक्ष साो., मा.उपाध्यक्ष साो., मा.सर्व विश्वस्त व मा.कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर केलेल्या अर्जाने खालील प्रमाणे विनंती केलेली आहे.

"मा.गत व्यवस्थापन मंडळाने ऑगष्ट २००४ मध्ये रु.४०००-६००० या वेतनश्रेणीतील काही वरिष्ठ लिपीक कर्मचाऱ्यांना रु.५५००-९००० या वेतनश्रेणीमध्ये " अधिक्षक" पदावर नेमणूक दिलेली आहे.तसेच श्री गमे कामगार अधिकारी,श्री गर्कल विधी अधिकारी यांनाही याच वेतनश्रेणीत पदोन्नती दिलेली आहे.तथापि सदरचे पदोन्नतीसाठी त्यांचा विचार झालेला नाहीत.तरी त्यांना अधिक्षक हे पद व या पदाची रु.५५००-९००० ही वेतनश्रेणी मंजूर व्हावी अशी विनंती आहे."

संस्थान आस्थापनेवरील अधिक्षक हूद्याची ०७ पदे भरण्यासाठी संस्थानचे जाहीरात देऊन,उमेदवारांच्या मुलाखती घेवून,निवड पध्दतीने दि.०२/०८/२००४ रोजी सदरची ०७ पदे भरलेली आहेत.यामध्ये संस्थान सेवेतील रु.५०००-८००० या वेतनश्रेणीतील ०३ आणि रु.४०००-६००० या वेतनश्रेणीतील ०४ कर्मचाऱ्यांची या पदावर मुलाखतीद्वारे नियुक्ती करण्यात आलेली आहे.

मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.१९-२० जून १९९९ च्या सभेतील निर्णय क्र.२४० (क) नुसार पदनामाचे प्रमाणीकरण (Standardization) करणेबाबत खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

संस्थानचे सर्व विभागांमध्ये जे विविध स्तरावरील कर्मचारी लिपीक वा सर्वसामान्य प्रशासकीय स्वरुपांची कर्तव्ये असलेली पदे धारण करतात.त्या पदनामामध्ये सुत्रता आणणे आवश्यक आहे.त्याकरीता पदनामांचे प्रमाणीकरण (Standardization) करणे आवश्यक आहे.त्यादृष्टीने लिपीक वा सर्वसामान्य प्रशासकीय कर्तव्ये पार पाडणाऱ्या कर्मचाऱ्यांकरीता चढत्या क्रमाने खालील प्रमाणे पदनामे स्विकृत करुन आमलात आणणेत यावीत.

स्तर (०१) लिपीक टंकलेखक	रु.९५०-१५००	(सुधारीत ३०५०-४५९०)
स्तर (०२) वरिष्ठ लिपीक	रु.१२००-२०४०	(सुधारीत ४०००-६०००)
स्तर (०३) मुख्य लिपीक	रु.१४००-२६००	(सुधारीत ५०००-८०००)
स्तर (०४) अधिक्षक	रु.१६४०-२९००	(सुधारीत ५५००-९०००)

वरिल पदनामे आमलात आल्यानंतर कनिष्ठ पर्यवेक्षक,खातेप्रमुख आदी इतर,सध्या प्रचलीत असलेली, पदनांमे निषिध्द समजून वापरण्यात येवू नयेत. "असा निर्णय झालेला आहे.संस्थानची सर्वांगीन कामे सुयोग्य पध्दतीने चालण्याच्या दृष्टीने संस्थानमध्ये एकूण २६ विभाग कार्यरत असून प्रत्येक विभागासाठी विभागप्रमुख नेमण्यात आलेले आहेत.यापैकी आस्थापना, सभा कामकाज, मंदिर, चौकशी व निवासस्थान, भक्तनिवासस्थान श्री साईनाथ रुग्णालयाचे कार्यालय, भांडार खरेदी, प्रसादालय व रेकॉर्ड या विभांगाकडे

अधिक्षक या पदावर रु.५५००-९००० या वेतनश्रेणीचे अधिकारी कार्यरत आहेत व कॅन्टीन, प्रकाशने, स्वच्छता,धर्मशाळा, मुंबई कार्यालय या विभागांकडे रु.५०००-८००० या वेतनश्रेणीतील अधिकारी पर्यवेक्षक / विभागप्रमुख म्हणून काम पहात आहेत.त्यांची सेवाविषयक माहिती पुढील प्रमाणे आहे.

अ.नं.	कर्मचाऱ्यांचे नांव	शैक्षणिक पात्रता	रु.५०००-८००० या वेतनश्रेणीतील दि.३०/०६/२००६ रोजीचे मूळ वेतन
०१.	श्री रामराम रंभाजी शेळके कॅन्टीन विभाग प्रमुख	बी.ए.	रु.६३५०/-
०२.	श्री प्रकाश रामचंद्र रत्नपारखी सुपरवायझर,कॅन्टीन विभाग	बी.ए.	रु.६६५०/-
०३	श्री प्रमोद वसंत कुलकर्णी प्रकाशने विभाग प्रमुख	बी.ए.	रु.६२००/-
०४.	श्री मधुकर शंकर टाक धर्मशाळा विभाग प्रमुख	एस.एस.सी.	रु.६०५०/- (सध्या सेवानिलंबित)
०५	श्री दत्तात्रय काळूराम झुरंगे स्वच्छता विभाग प्रमुख	एफ.वाय.बी.कॉम सॅनेटरी कोर्स	रु.६५००/- (दि.२२/०५/२००७ पासून राजीनामा)
०६.	श्री तुकाराम गोपीनाथ माणिक कार्यालय अधिक्षक,मुंबई कार्यालय	एस.एस.सी.	रु.६८००/-

श्रींच्या दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ झालेली असून त्याअनुषंगाने संस्थानच्या सर्व विभागांचे कामाचा आवाका मोठया प्रमाणात वाढलेला आहे.सर्वश्री प्रकाश रत्नपारखी,रामराव शेळके,प्रमोद कुलकर्णी,मधुकर टाक,तुकाराम माणिक व दत्तात्रय झुरंगे हे सध्या पर्यवेक्षक / विभाग प्रमुख म्हणून रु.५०००-८००० या वेतनश्रेणीत काम पहात आहे.दैनंदिन कामासाठी सदरहू कर्मचाऱ्यांना डयुटी वेळे व्यतीरिक्त जादा वेळ थांबून कामे पहावी लागतात.विभाग प्रमुख / अधिक्षक या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या कामाच्या सोईनुसार विभागांतर्गत कोणत्याही विभागाकडे (स्वच्छता विभाग सोडून) परस्परांमध्ये बदल्या करण्यात येतात.त्यामुळे सर्व विभागांकडे काम पाहणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पदनामांत व वेतनश्रेणीत एकवाक्यता असणे आवश्यक आहे.

सदरचे सर्व संबंधीतांचे सध्याचे मूळवेतन रुपये ५५०० पेक्षा अधिक असल्याने त्यांना रु.५५००-९००० ही वरिष्ठ वेतनश्रेणी दिल्यास एक जादा वेतनवाढीपेक्षा जादा आर्थिक भार संस्थानवर पडणार नाही व दि.१९-२० जून १९९९ रोजीच्या सभेतील निर्णयानुसार पदनामांचे प्रमाणीकरणानुसार अधिक्षक हे पदनांम होईल.

सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०८/२००५ रोजीचे सभेत विचारार्थ ठेवण्यात आला असता त्यावर चर्चा होवून निर्णय क्र.४३२, " संस्थान आस्थापनेचा आकृतीबंध लवकरच तयार करण्यात येत आहे.या आकृतीबंधानुसार पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देणेबाबत सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवण्यात यावा." असा पारित झालेला आहे.

सध्या श्री साईबाबा हॉस्पीटल / श्री साईनाथ रुग्णालयातील विविध पदावर महाराष्ट्र शासनाची संस्थान कर्मचारी आकृतीबंधास मान्यता मिळण्याच्या अधीन राहून कर्मचाऱ्यांना नेमणूका देण्यात आलेल्या आहेत.

तरी संस्थानच्या कामकाजामध्ये झालेली वाढ व सद्य परिस्थीती विचारात घेवून वरिल अ.नं.०१,०२,०३,०४,०६ यांचे पदनामांत पर्यवेक्षक ऐवजी अधिक्षक तसेच अ.नं.०५ श्री.झुरंगे यांचे स्वच्छता विभाग प्रमुख हे पदनाम कायम ठेवून त्यांनीाही वरीलप्रमाणे अधिक्षक पदाची रु.५५००-९००० हि वेतनश्रेणी मंजूर करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तपैकी श्री रामराव रंभाजी शेळके,कॅन्टीन विभाग प्रमुख यांचे काम समाधानकारक असल्याने त्यांना अधिक्षक या पदावर रु.५५००-९००० या वेतनश्रेणीत पदोन्नती देण्यात यावी, उर्वरीत कर्मचाऱ्यांबाबत स्थानिक विश्वस्त व मा.कार्यकारी अधिकारी यांचे संयुक्त समितीने मुलाखती घेऊन निर्णय घ्यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

०९ <u>श्री एस.पी. लंके यांना श्रीसाईबाबा हॉस्पिटलकडे फायनान्स मॅनेजर या पदावर नियुक्ती देणे बाबत.</u>

श्री.साहेबराव पांडूरंग लंके, यांची संस्थानचे लेखाशाखा विभागाकडे वरिष्ठ लेखापाल या पदावर रु. ५५००-१७५-९००० या वेतनश्रेणीत नेमणूक करण्यात आलेली असून ते दि. ०३/०४/२००३ रोजी सदर पदावर कामावर हजर झाले आहेत.

श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था मार्फत श्री साईबाबा हॉस्पीटल सन २००५ नव्याने सुरु करण्यात आले. त्यावेळी सदर हॉस्पीटलकरीता मा. सचिव विधी व न्याय विभाग यांचेकडे पाठविण्यात आलेल्या वैद्यकिय अधिकारी/ कर्मचारी आकृतीबंधाचे मंजूरीस अधिन राहून आवश्यक पदांसाठी वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले होते.त्यात फायनान्स मॅनेजर या

पदासाठी शैक्षणिक पात्रता B.com/ M.com/ C.A/ C.W.A. With M.B.A. Finance Exp. Two years in similar situation अशी दर्शविली होती. त्यानुसार फायनान्स मॅनेजर या पदासाठी आलेल्या अर्जातून एकूण १३ पात्रता धारक उमेदवारांना दि.२४/०४/२००६ रोजी मुलाखतीसाठी बोलाविण्यात आले होते. तथापी मुलाखतीसाठी ११ उमेदवार हजर होते.

श्री. लंके यांनी दि.२५/०४/२००६ रोजी फायनान्स मॅनेजर पदासाठी नियुक्ती मिळणेबाबत अर्ज केला होता. त्यानुसार श्री. लके यांचे अर्जातील विनंतीचा विचार करुन त्यांना जा.नं.एसएसएस/ वशी-०१/ १३१९/२००६ दि.२२/०५/२००६ अन्वये श्री साईबाबा हॉस्पीटलकडे तात्पुरते फायनान्स मॅनेजर या पदाचे काम पहाणेबाबत आदेशीत करण्यात आलेले असून त्यानुसार ते आतापर्यंत काम पहात आहेत

श्री. लंके यांची शैक्षणिक पात्रता पुढील प्रमाणे आहे.

➢ **शैक्षणिक पात्रता** :-एमकॉम/ सीए इंटर (ॲपियर) /जी.डी.सी.ॲण्ड ए./एमबीए (प्रथम सत्र) /संगंणक ज्ञान

➢ **अनुभव :-**

१) ०१ वर्षे युनीस्टर एन्टरप्रायजेस पुणे येथे सिनिअर अकौन्टट

२) ०२ वर्षे सास ट्रेडींग कं.पुणे येथे मॅनेजर अकाऊन्ट ॲण्ड ॲडमिनिस्ट्रेशन

३) ०४ वर्षे दि.पुणा ब्लाईंड मेन्स् असोसिएशन, पुणे येथे मॅनेजर अकाऊन्टस् झेनिथ कॉम्प्युटर येथे कमर्शियल मॅनेजर म्हणून

दि. ०१/०४/२००३ पासून वरिष्ठ लेखापाल या पदावर आतापर्यंत कार्यरथ तसेच दि. २२/०५/२००६ पासून आजपर्यंत फायनान्स मॅनेजर या पदाचे काम पहात आहेत.

आता श्री. लंके यांनी दि.०६/०८/२००७ रोजी अर्ज करुन त्यात - दि. २४/०४/२००६ रोजी श्री साईबाबा हॉस्पीटलसाठी फायनान्स मॅनेजर या पदासाठी मुलाखती झाल्या आहेत मुलाखतीचे दिवशी रु. ५५०० मुळ वेतन श्रेणीपेक्षा जास्त वेतन असेल तर माझ्या शैक्षणिक पात्रतेचा व हॉस्पीटलच्या प्रत्यक्ष कामाचा अनुभव पाहून सदर पदासाठी माझा विचार करावा अशी विनंती केली होती. त्यानुसार जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३१९/२००६ दि. २२/०५/२००६ आदेशान्वये फायनान्स मॅनेजर या पदाचे काम पहाणेबाबत आदेश झाला आहे. त्यानुसार दि. २६/०५/२००६ मी कामावर हजर झालो आहे. तेव्हापासून मी सदर पदाचे काम पहात आहे. या कालावधीत हॉस्पीटल साठी आयात करण्यात आलेल्या एम.आर.आय व न्युरो सर्जरी व अर्थोपेडीक सर्जरी टेबल वर मी सिमाशुल्क प्राधिकरणाकडे कागदपत्रांची पुर्तता करुन त्यात रु. ८६,४५,६५०/- ची सवलत संस्थानला मिळाली आहे. व यापुढें कागदपत्रांची पुर्तता केल्या नंतर अशा प्रकारे सवलत मिळण्यास सुरवात झाली आहे.

श्री. साईबाबा हॉस्पीटल साठी कर्मचारी आकृतीबंधास मान्यता मिळाली आहे. त्यामध्ये फायनान्स मॅनेजर या पदासाठी रु. ६५००-२००-१०५०० अशी वेतनश्रेणी आहे. व मला सध्या वरिष्ठ लेखापाल म्हणून रु. ५५००-१७५-९००० व सध्याचे मुळ वेतन रु. ६०२५/- असे मिळत आहे. तरी मला फायनान्स मॅनेजर या पदावर नियुक्ती मिळावी व मागील सेवेचा विचार करुन वेतनश्रेणी निश्चित करावी अशी विनंती केली असून,त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,श्री.लंके यांची फायनान्स मॅनेजर या पदावर रु.६५००-२००-१०५०० या वेतनश्रेणीत नेमणूक करण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

१० <u>कनिष्ठ महाविद्यालयाकडे नव्याने निर्माण होणारी पदे भरणे बाबत.</u>

कनिष्ठ महाविद्यालयाकडे नव्याने निर्माण होणारी पदे भरणेबाबत व्यवस्थापन समितीचे दिनांक ०७.०७.२००८ चे सभेत निर्णय क्र. ६३२(०८) अन्वये निर्णय पारित होऊन त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात येऊन पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेऊन नेमणूक आदेश देण्यात आल्याने सदरहू विषय मागे घेण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना)

११ <u>संस्थानमध्ये अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेबाबत श्री भगवान रमेश खंडागळे यांचा अर्जाबाबत</u>

श्री.भगवान रमेश खंडागळे यांचा दिनांक व सही नसलेला अर्ज प्रशासन शाखा आवक नंबर ७६९१ दिनांक ०९/०३/२००७ रोजी इकडेस प्राप्त झालेला असून, त्यामध्ये असे नमुद केले आहे की, माझी आई श्रीमती छबुबाई रमेश खंडागळे, रा.शिरडी ही श्री साईबाबा संस्थानचे प्रसादालय विभागात स्त्री कामगार म्हणून दि. ०५/०३/१९८९ रोजी नोकरीत रुजू झाली होती. तिचा मृत्यू दि.३१/०५/१९९२ रोजी शिर्डीत झाला. मृत्यूपुर्वी ती अतिशय आजारी होती, म्हणून काही दिवस ती नोकरीवर जाऊ शकली नव्हती, व त्यानंतर माझे वडील रमेश भाऊराव खंडागळे, रा.शिरडी हे सन २००६ रोजी मयत झालेनंतर माझा संपूर्ण आधारच तुटला. माझ्याकडे कोणत्याही प्रकारचे उदरनिर्वाहाचे साधन उरले नाही.सध्या मी बेरोजगार आहे.

मी मा.कार्यकारी अधिकारी साहेब, श्री साईबाबा संस्थान शिरडी यांचेकडे आईच्या जागेवर नोकरी मिळणेसाठी वांरवार अर्ज केले.मा.विश्वस्तांनाही अनेक वेळा भेटलो. पंरतू सर्वजण त्याची दखल घेत

नाहीत. मला पुन्हा -पुन्हा अर्ज करावयास सांगतात, हेलपाटे मारायला लावतात, येणाऱ्या मिटींगमध्ये तुझा विषय घेऊ म्हणतात. पंरतू आजतागायत यावर कुठलाही निर्णय झालेला नाही. मी अतिशय गरीब असून माझी सारखी अवहेलना सदर अधिकाऱ्यांनी चालविलेली आहे.

मी या अर्जाव्दारे आपणांस कळवु इच्छितो की, दि.०९/०४/२००७ पर्यंत जर माझ्या अर्जाचा विचार केला गेला नाही, तर मी दि.१०/०४/२००७ रोजी सकाळी ११.०० वाजता मा.तहसीलदार, राहाता यांचे कार्यालयासमोर प्राणांतिक उपोषणास बसणार आहे.त्यानंतर उद्‌भवणाऱ्या परिस्थितीची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, असे सूचित केले असून सदर अर्जाच्या प्रती मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई, मा.उपमुख्यमंत्री, मा.समाज कल्याणमंत्री, मा.आ.श्री राधाकृष्ण विखे पाटील, मा.अध्यक्ष साहेब, मा.कार्यकारी अधिकारी साहेब, मा.पोलिस निरीक्षक , शिरडी पोलीस स्टेशन, मा.कैलास (बापू) कोते, मा.जिल्हाधिकारी , अ.नगर, मा.तहसीलदार , राहाता, मा.श्री आण्णा हजारे, जेष्ठ समाजसेवक, राळेगण, मा.श्री प्रमोद आहेर, शिरडी प्रेस अध्यक्ष, यांना पाठविण्यात आलेल्या आहेत.

<u>कै.छबुबाई रमेश खंडागळे यांची माहिती खालील प्रमाणे :-</u>

०१) दिनांक ०६/०३/१९८९ पासून प्रसादालय विभागात वर्ग-४ पदावर संस्थान सेवेत कामावर हजर

०२) दिनांक ३१/०५/१९९२ रोजी श्री साईनाथ रुग्णालयात निधन.

०३) भविष्य निधी व ग्रॅच्युईटीसाठी पती श्री रमेश भाऊसाहेब खंडागळे व मोठा मुलगा चि.रघुनाथ रमेश खंडागळे यांची वारसदार म्हणून यांची नांवे असून,दूसरा मुलगा श्री भगवान रमेश खंडागळे (सदर अर्जदार) यांचा नावाचा उल्लेख नाही.

०४) श्री भगवान रमेश खंडागळे यांनी यापूर्वी दि.१५/१०/२००१ च्या अर्जान्वये "मी अज्ञान असल्यामुळे मोल-मजुरी करुन पोट भरत आहे. वडील माझ्याकडे लक्ष देत नाहीत.सध्या मला काम नसल्याने माझी उपासमार होत आहे. कृपया मी संस्थानमध्ये कुठल्याही प्रकारचे काम करण्यास तयार आहे.तरी मला संस्थानमध्ये काम द्यावे ", अशी विनंती केली आहे. शालेय दाखल्यानूसार त्याची जन्मतारीख ०२/०६/१९८१ असून अर्ज देते वेळेस त्याचे वय २० वर्षे ४ महिने इतके होते.

०५) तथापी,श्री भगवान रमेश खंडागळे, लिहून घेणार यांनी त्यांचे दि.२९/१०/२००३ चे प्रतिज्ञापत्रात "लिहून देणार, श्री रमेश भाऊ खंडागळे (अर्जदाराचे वडील) वय वर्षे-५५, धंदा-मजुरी, राहणार-शिरडी, प्रतिज्ञापत्रावर लिहून देतो की, कै.छबुबाई रमेश खंडागळे हया दि.३१/०५/१९९२ रोजी गांव शिरडी, तालुका-राहाता येथे मयत झाल्या असून त्या श्री साईबाबा संस्थान,शिरडी येथे प्रसादालय विभागात सेवेत होत्या.त्यांच्या जागेवर अनुकंपा तत्वावर श्री भगवान रमेश खंडागळे (मुलगा) याला नोकरी मिळणेकामी माझी पुर्णपणे संमती असून कोणत्याही प्रकारची हरकत नाही ", असे संमतीपत्र दिलेले आहे.

०६) तसेच श्री रमेश भाऊ खंडागळे,वय-वर्षे-५०, यांनी दिनांक २१/११/२००३ चे शपथपत्रामध्ये श्री.रघुनाथ रमेश खंडागळे (मोठा मुलगा) हा ११ वर्षापासून घरातून निघून गेला आहे. परिस्थिती गरीबीची व अज्ञान असल्याने तपास करता आला नाही व मला कायद्याचे ज्ञान नसल्याने मी तपास करु शकलो नाही, याकरीता सदरचे ॲफीडेव्हीट शपथ पूर्वक लिहून दिले, असे नमूद केले आहे.

<u>उपरोक्त कागदपत्रावरुन खालील प्रमाणे माहिती पुढे येते</u> :-

कै.छबुबाई रमेश खंडागळे यांचे दि.३१/०५/१९९२ रोजी निधन झाले, त्यावेळी पती श्री रमेश खंडागळे यांच्या दि.२९/१०/२००३ चे प्रतिज्ञा पत्रानुसार त्यांचे वय वर्षे-४४, दिसून येते.त्यावेळी त्यांनी शासन निर्णयानूसार विनंती अर्ज केला असता तर त्यांना अनुकंपा तत्वावर कामावर घेता आले असते. कारण त्यांचा मोठा मुलगा श्री.रघुनाथ रमेश खंडागळे हा ११ वर्षापूर्वी घरातून निघून गेलेला होता, व लहान मुलगा नामे श्री भगवान रमेश खंडागळे, हा आईचे निधन झाले तेव्हा ११ वर्षाचा म्हणजे अज्ञान होता.

अनुकंपा कारणास्तव शासकीय सेवेत नोकरी देणे संबंधीची सुधारीत नियमावली खालील प्रमाणे आहे.

शासन निर्णय क्र.सामान्य प्रशासन विभाग,क्र.अकंपा.१०९३/२३३५/प्र.क.९०/९३/०८ दि.२६ ऑक्टो. १९९४ यातील नियम क्र.५अ अनुकंपा कारणास्तव नेमणुकीसाठीचा अर्ज शासकीय कर्मचारी दिवंगत / अकाली निवृत्त झालेल्या दिवसांपासून ५ वर्षाचे मुदतीत करणे आवश्यक असेल.

तथापी पती श्री रमेश भाऊसाहेब खंडागळे यांनी कै.छबुबाई रमेश खंडागळे यांचे निधन झालेल्या दिवसांपासून कमीत-कमी ५ वर्षाच्या मुदतीत म्हणजेच दि. ३१/०५/९७ अखेर विनंती अर्ज करावयास पाहिजे होता. परंतू तसे कांहीही केलेले नाही. तसेच आईचे निधन झाल्यानंतर श्री भगवान रमेश खंडागळे (अर्जदार-मुलगा) यांच्या वयाला सन -१९९९ मध्ये १८ वर्षे पुर्ण झालेले आहे.त्यावेळीही नोकरी मिळणेसाठी संबंधीतांनी संस्थानकडे विनंती अर्ज केलेला नाही किंवा उपरोक्त कालावधीमध्ये संस्थानचे संबंधीत कार्यालयाकडे संपर्क केलेला नाही.

उपरोक्त शासकीय निर्णयानुसार अनुकंपा कारणास्तव नोकरी मिळणेकामीचा अर्ज मुदतीत म्हणजे ५ वर्षाच्या आंत न येता, दि.१५/१०/२००१ रोजी म्हणजे ०९ वर्षानंतर अर्ज आलेला असल्याने त्यांना नेमणूक पत्र देणे अडचणीचे झालेले आहे.

तसेच महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सामान्य प्रशासन विभाग, क्र. अकंपा.१०९५/प्र.क.३४/अ/०८ दिनांक २३ ऑगष्ट १९९६ यात, पान क्र.४ वर अनुकंपा तत्वावर नियुक्तीचे वैशिष्टे अ.नं.३ अर्ज करण्याची मुदत , मृत्यूच्या / अकाली सेवा निवृत्तीच्या दिनांकापासून ५ वर्षे, असा आहे. तसेच शासन निर्णय अकंपा.१०९५/प्र.क.३४/अ/०८, दिनांक ११ सप्टेंबर १९९६ मध्ये "" सेवेत असतांना दिवंगत झालेल्या किंवा दुर्धर व्याधीमुळे अकाली सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटूंबातील अज्ञान वारसदाराच्या बाबतीत एकाचे सज्ञान म्हणजे १८ वर्षाचा झाल्यावर १ वर्षाच्या आंत या योजनेखाली नोकरीसाठी अर्ज करावा, हे आदेश १ मार्च १९९६ पासून अंमलात येतील, असा आहे.

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.अंकपा००४/ प्र.क्र. ५१/ २००४/ आठ दिनांक २२ ऑगष्ट २००५ यांत,

०३) अनुकंपा नियुक्तीसाठी पात्र कुटूंबियांकडुन संबंधीत नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे अर्ज करण्याची ५ वर्षाची मुदत कमी करुन कर्मचारी दिवंगत झाल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या मुदतीत अर्ज करणे आवश्यक राहील,अशी आहे.

या निर्णयात कर्मचाऱ्याचे निधनानंतर अनुकंपा नेमणुकीसाठी अर्ज करण्याची मुदत ५ वर्षे ऐवजी एक वर्षे करण्यात आलेली आहे. श्री रमेश भाऊसाहेब खंडागळे (दिवंगत कै.छबुबाई खंडागळे यांचे पती) किंवा श्री भगवान रमेश खंडागळे (दिवंगत कै.छबुबाई खंडागळे यांचा मुलगा) यांनी त्यांची संपुर्ण माहिती म्हणजे जन्मतारखेसह शासन निर्णय २६ ऑक्टोबर १९९४ यातील नियम अ.नं.५ नुसार मुदतीत म्हणजे ५ वर्षाच्या आंत (दि.३१/०५/१९९७ पुर्वी) अर्ज दिलेला नसल्याने त्यांना नियमबाहय सेवेत घेणे अडचणीचे आहे.याबाबत त्यांना यापुर्वीच अनेक वेळा कार्यालयात समक्ष सांगण्यात आलेले आहे.

श्री भगवान रमेश खंडागळे यांना "शासन निर्णय क्र.सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा. १०९३/ २३३५/प्र.क.९०/९३/०८ दि.२६ ऑक्टो. १९९४ यातील निर्णय क्र.५अ अनुकंपा कारणास्तव नेमणुकीसाठीचा अर्ज शासकीय कर्मचारी दिवंगत / अकाली निवृत्त झालेल्या दिवसांपासून ५ वर्षोचे मुदतीत न करता ०९ वर्षानंतर अर्ज केला असून दि. ११ सप्टेंबर १९९६ चे शासन निर्णयानूसार सज्ञान झाल्यावर (दि.०२/०६/२००० पूर्वी) १ वर्षाचे आंत अर्ज न करता, दि.१५/१०/२००१ रोजी सवलतीच्या मुदतीनंतरही १ वर्षे ४ महिन्याने उशिराने अर्ज केला आहे. त्यामूळे त्यांची अनुकंपा तत्वावर नेमणुक करता येत नाही." तरी तुम्ही उपरोक्त पत्रात नमूद केले प्रमाणे मा.तहसिलदार, राहाता यांचे कार्यालयासमोर प्राणांतिक उपोषणास बसू नये. या उपरोक्त आपण उपोषणास बसल्यास उद्भवणाऱ्या कोणत्याही परिस्थितीस आपण स्वत: जबाबदार राहाल, त्यास कोणत्याही प्रकारे संस्थान जबाबदार राहणार नाही, याची आपण नोंद घ्यावी,असे जा.नं.एसएसएस/वशी-०१/५०८७/ २००७ दिनांक २९/०३/२००७ चे पत्राने कळविण्यात आले असून, त्यांच्या प्रती मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर, मा.अध्यक्ष साहेब, मा.पोलीस निरीक्षक, शिरडी,पोलीस स्टेशन, मा.तहसीलदार, राहाता यांनाही रजिष्टर पोष्टाने पाठविण्यात आलेल्या आहेत.

या प्रकरणी श्री भगवान रमेश खंडागळे यांना शुक्रवार दि.०६/०४/२००७ रोजी दुपारी ०१-४० वाजता या कार्यालयात समक्ष बोलावून शासन निर्णयानूसार आपला अर्ज मुदतीत न आल्याने आपल्याला नेमणुक देता येत नाही, व आपण उपोषण करु नये,अशा प्रकारे त्यांना सर्व परिस्थिती समजावून सांगून, उपोषणापासून परावृत व्हावे, असे सांगण्यात आले.

यानंतर शुक्रवार दि.०७/०४/२००७ रोजी श्री भगवान रमेश खंडागळे यांनी नोकरी मिळणेबाबत विनंती अर्ज केला असून,त्यात उपोषणाबाबत कांहीही उल्लेख केलेला नाही.

तथापी, श्री भगवान रमेश खंडागळे हे मंगळवार दिनांक १०/०४/२००७ रोजी राहाता, तहसील कार्यालयासमोर उपोषणास बसलेबाबत राहाता,तहसील कार्यालयाकडून इकडेस दूरध्वनीवरुन माहिती मिळाली आहे.तसेच तहसील कार्यालय,राहाता यांनी त्यांचे क्र./कावि/दंव्य/२८८/०७ राहाता दिनांक ११/०४/२००७ रोजीचे फॅक्सव्दारे श्री भगवान रमेश खंडागळे हे संस्थानमध्ये अनुकंपातत्वावर नोकरी मिळावी या मागणी करीता दि.१०/०४/२००७ पासून या कार्यालयासमोर उपोषणास बसले आहेत. या संदर्भात आपल्याशी दूरध्वनीवरुन चर्चा करण्यात आलेली आहे.संबंधीत उपोषण कर्त्यांशी आज समक्ष चर्चा करण्यात आलेली आहे. त्यांचे म्हणणे आपलेशी समक्ष चर्चा झालेनतंर लगेचच आम्ही उपोषणापासून परावृत्त होणेचे मान्य केले आहे. तेव्हा कृपया आपण आजच संबंधीत उपोषण कर्त्यांशी समक्ष भेट घेऊन त्यांना उपोषणापासून परावृत्त करावे व जेणे करुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, याची दक्षता असावी, असे कळविले आहे.

उपरोक्त तहसील कार्यालयातील फॅक्सला अनुसरुन त्याबाबत मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचेशी मुंबई येथे दूरध्वनीवरुन संपर्क साधला असता,त्यांचा अर्ज मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवणेत

येईल,असे त्यांना समक्ष सांगण्यात यावे,अशा सूचना मिळाल्याने बुधवार दि.११/०४/२००७ रोजी तहसील कार्यालय राहाता येथे सांयकाळी ६-२० ते ०७-०० या वेळेत उपोषणकर्ता व त्यांचे साथीदाराबरोबर चर्चा करण्यात आली असून, त्याची माहिती खालील प्रमाणे.

उपरोक्त चर्चेत खालील मान्यवर उपस्थित होते.

०१) मा.श्री शेजुळ, नायब तहसीलदार,राहाता.
०२) श्री आर.एस.साबळे,प्रशासकीय अधिकारी,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.
०३) श्री बी.डी.साबळे ,अधिक्षक,(आस्थापना विभाग)
०४) श्री भगवान रमेश खंडागळे,उपोषण कर्ता,
०५) श्री गोरख गवारे,पत्रकार बाभळेश्वर,उपोषण कर्ता यांचे साथीदार,
०६) श्री कानिफनाथ तांबे,उपोषण कर्ता यांचे साथीदार,
०७) श्री अमित कदम,उपोषण कर्ता यांचे मित्र,

श्री भगवान रमेश खंडागळे यांना शासकीय निर्णयानुसार अर्ज उशिराने आल्याने नेमणुक पत्र देता येत नाही. तथापी आपण उपोषण करु नये, ते मागे घ्यावे व याकामी चर्चा करणेसाठी शिरडी कार्यालयातून पदाधिकारी आले आहेत.आपण समक्ष चर्चा करावी,असे मा.नायब तहसीलदार,राहाता यांनी प्रथम सांगितले.

श्री आर.एस.साबळे,प्रशासकीय अधिकारी यांनी उपोषण कर्ता व त्यांचे साथीदार यांना उपरोक्त प्रकरणाची सविस्तर माहिती सांगितली."श्री भगवान रमेश खंडागळे यांनी त्यांचे आईचे निधनानंतर शासन निर्णयानुसार ५ वर्षाच्या आंत अनुकंपातत्वावर नोकरी मिळणेबाबत विनंती अर्ज करावयास पाहिजे होता किंवा त्यांचे कुटूंबातील वारसाने नोकरीबाबत ज्याचे-त्याचे वयोमानानुसार किंवा ज्यास नोकरीस घ्यावयाचे ती व्यक्ती अज्ञान असेल तर तसे अर्जात नमुद करुन मुदतीत अर्ज करावयास पाहिजे होता.तो त्यांनी केलेला नाही व अर्जदार हे सन १९९८ मध्ये सज्ञान झाले त्यावेळीही त्यांनी अर्ज केलेला नसून दि.१५/१०/२००१ रोजी उशिराने म्हणजे आईचे निधनानंतर ९ वर्षाने व सवलतीनंतर ४ वर्षे उशिराने अर्ज केलेला असल्याने शासन निर्णयानूसार अनुकंपातत्वावर नेमणुक देता येत नाही.तेव्हा तुम्ही संस्थान प्रशासनाची बाजु लक्षात घेऊन उपोषण मागे घ्यावे,अशी विनंती केली.याबाबत अर्जदाराचे अर्जास अनुसरुन उपोषणपुर्वीच संस्थानने त्यांना सविस्तर पत्र दिलेले असून ते पत्र अर्जदारास मिळालेले आहे",असे सांगितले .

यावर उपोषणकर्त्याचे साथीदार श्री गोरख गवारे ,पत्रकार म्हणाले की, उपोषणकर्त्याचे मागे राजकीय पाठबळ नसल्याने त्याला या शासन निर्णयाच्या ५ वर्षाच्या मुदतीच्या अटीमुळे व उशिराने अर्ज दिल्यामुळे अनुकंपातत्वावर नोकरी मिळू शकत नाही, हे उघड आहे.तथापी ५ वर्षे मुदतीच्या आंत अर्ज देणे आवश्यक आहे,या नियमास अनुसरुन त्यावेळी अर्जदार अज्ञान असेल,तसेच त्याचे कांही अडचणीमुळे अर्ज करु शकला नाही, तर याबाबत कांही होऊ शकते काय,असे आमचे वकीलाशी विचारुन मग पुढे निर्णय घेऊ, असे त्यांनी सांगितले. त्यांनी तहसील कार्यालयातूच वकीलाशी संपर्क साधला असता, ५ वर्षे मुदतीचा शासन जी.आर.व इतर कागद पत्रे माझ्याकडे घेऊन या. सर्व कागदपत्र पाहून मी मार्गदर्शन करीन, असे त्यांनी उपोषणकर्त्याच्या साथीदारांना सांगितल्याचे समजते.

त्यावेळी त्यांना या संदर्भात वकीलाकडून मार्गदर्शन न मिळाल्याने उपोषण मागे घेत नसल्याचे त्यांनी सांगितले.यावर शेवटी सांगोपांग चर्चा होऊन मा.श्री शेजुळ, नायब तहसीलदार, राहाता यांनी अनुकंपाचे नियमानुसार नियमबाहय नेमणुक देता येत नाही. तथापी आपण उद्या (दिनांक १२/०४/२००७ रोजी) मा.कार्यकारी अधिकारी, श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचेकडे नोकरी मिळणेबाबत फ्रेश अर्ज द्यावा,असे सांगितले. तसेच श्री आर.एस.साबळे, प्रशासकीय अधिकारी यांनी "आम्हाला श्री भगवान रमेश खंडागळे यांचेबाबत आपुलकी आहे. तुम्ही दिलेल्या अर्जाबाबत मा.का.अ.साहेब यांचेकडे समक्ष येऊन चर्चा करावी. आम्ही आपला अर्ज मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करुन मा.व्यवस्थापन समिती जो निर्णय घेईल, त्याप्रमाणे कार्यवाही करु, असे सांगून श्री भगवान रमेश खंडागळे यांनी उपोषण मागे घ्यावे", अशी सर्व मान्यवरांसमोर विनंती केली.

यानंतर राहाता, तहसील कार्यालयासमोर उपोषणार्थीच्या जागेवर श्री अशोक सदाफळ, पत्रकार यांनी उपोषणकर्त्याकडून उपोषणाबाबत माहिती घेतली. तसेच अर्जदाराने त्यांचेकडील संस्थानला दिलेल्या अर्जाच्या झेरॉक्स प्रती व संस्थानकडून आलेल्या पत्राच्या झेरॉक्स प्रती सदर वार्ताहर यांना दिल्या.यावेळी वार्ताहर यांनी श्री आर.एस. साबळे, प्र.अ.यांना विचारल्यावरुन जी सत्य परिस्थिती आहे, ती वार्ताहर यांना सांगितली व संबंधीत दि.१२/०४/२००७ रोजी संस्थानकडे (मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचेकडे) चर्चेसाठी येणार आहेत, असेही सांगितले.

तसेच दि.१२/०४/२००७ रोजी " दैनिक सार्वमत" या वृत्तपत्रात "अनुकंपाखाली नोकरीस घेण्यासाठी तरुणाचे उपोषण सुरु "असे प्रसिध्द झाले असून त्यांत, "शिरडी संस्थानमध्ये अनुकंपातत्वावर नोकरीस घ्यावे.या मागणीसाठी श्री भगवान खंडागळे या तरुणाने पांच वर्षापासून भटकंती करुनही नोकरीस

न घेतल्यामुळे राहाता, तहसील कार्यालयासमोर दोन दिवसांपासून आमरण उपोषणास बसला आहे. सन १९८९ साली मयत झालेल्या आईच्या जागेवर आपल्याला अनुकंपातत्वावर संस्थान सेवेत घ्यावे, या मागणीसाठी शिर्डी येथील तरुण श्री भगवान खंडागळे हा ५ वर्षापासून शिर्डी संस्थानचे विश्वस्त व अधिकाऱ्याचे उंबरे झिजवत असून आई-वडिलांचे छत्र हरविलेला हा एकुलता एक तरुण उदरनिर्वाहासाठी मोलमजुरी करुन न्याय मिळण्याची वाट पहात आहे. अखेर कुणाकडूनही न्याय मिळण्याची चिन्हे न दिसल्याने त्यांने दोन दिवसांपासून राहाता, तहसीलसमोर आमरण उपोषणास बसला आहे. संस्थानने वारंवार अर्ज व भेटावयास सांगितले.मात्र अद्याप कार्यवाही झाली नाही.

मात्र या तरुणाला सहानुभूति दाखविण्याऐवजी संस्थान अधिकाऱ्यांनी त्याला शासनाच्या नियमाची आडकाठी असल्याचे कारण दिले आहे. तसेच आपली अनुकंपातत्वावर अर्ज करण्याची मुदत संपल्यानंतर आपण अर्ज केल्याचे त्याला दिलेल्या संस्थानच्या पत्रात म्हटले आहे.मुदतीनंतर आपला अर्ज न आल्याने आपणास नोकरी देऊ शकत नाही. आपण उपोषणास बसू नये. यातून काही स्थिती उद्‌भवल्यास संस्थान जबाबदार राहणार नाही, असे संस्थानने लेखी कळविले आहे.

हजारो तरुणांना संस्थानने सेवेत घेतले. अनेक जणांच्या नियमबाह्य नेमणुका करण्यात आल्या. पात्र नसतांना रुग्णालयात कायमस्वरुपी नोकऱ्या दिल्या. मात्र एका निराधार तरुणाच्या बाबतच संस्थान अधिकारी नियमांकडे बोट दाखवित आहे. या तरुणाचा संस्थानचे मा.अध्यक्ष/मा.उपाध्यक्ष व विश्वस्तांनी सहानुभूतीने विचार करुन त्याला सेवेत घ्यावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे ", असे वृत्तपत्रात नमूद आहे.

सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे विचारार्थ ठेवण्यात येईल.तुम्ही मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांना कार्यालयात भेटा, असे उपोषण कर्त्यांना मा.श्री शेजुळ, नायब तहसीलदार, राहाता यांनी सांगितले. परंतू श्री भगवान रमेश खंडागळे हे शिरडी कार्यालयात आले नाही. तथापी श्री भगवान रमेश खंडागळे यांनी दि. १२/०४/२००७ रोजी दुपारी उपोषण सोडल्याचे मा.श्री शेजुळ,नायब तहसीलदार, राहाता, यांनी दूरध्वनीवरुन सांगितले आहे.

तरी श्री भगवान रमेश खंडागळे यांना अनुकंपातत्वावर नेमणुक देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.भगवान रमेश खंडागळे यांना कंत्राटदारामार्फत कंत्राटी कर्मचारी म्हणून संस्थान सेवेत घेण्यात यावे व त्यांचा अनुकंपा प्रस्ताव शासनाकडे अभिप्रायासाठी सादर करण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना)

१२ <u>वैद्यकीय अनुकंपा कारणास्तव पत्नीस संस्थान सेवेत घेणे बाबत श्री.राजू मारुती भोसले, वाहनचालक यांचा अर्ज</u>

श्री.राजु मारुती भोसले, वाहन विभाग, वाहन चालक यांनी दि.१२/०४/२००७ रोजी मा.आ.श्री ससाणे साहेब, अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान शिरडी यांना पाठविलेल्या पत्रात नमुद केले आहे की, मी आपले संस्थानच्या वाहन विभागात वाहन चालक या पदावर दि. १८/०४/२००० पासून संस्थानमध्ये कायम कर्मचारी म्हणून काम करीत आहे.

दिनांक १६/०४/२००६ रोजी संध्याकाळी ०८.०० वाजता मी शिरडी गांवातून घरी येत असतांना घरापासून साधारण २५० मीटरचे अंतरावर मोटर साईकल चालू असतांना हॅन्डल लॉक होऊन माझा तोल गेला व मी रस्त्याच्या कडेला चारीमध्ये पडलो. त्यात माझ्या डोक्याला दगडाचा जबर मार लागल्याने मला तात्काळ संस्थानचे रुग्णालयात उपचारासाठी आणले व तेथील डॉक्टरांचे सल्ल्यानुसार संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये सी.टी.स्कॅन करण्यात आले असता.त्यात माझ्या लहान मेंदुला जबर मार लागल्याने व रक्तस्त्राव जास्त होत असल्याने श्री साईनाथ रुग्णालयातील इंटर्न डॉक्टरांनी मला तातडीने नाशिक येथील डॉ.गडकरी हॉस्पिटल यांचेकडे दाखल करण्यास सांगितले.तेथे डॉक्टर गडकरी यांचे सल्ल्यानुसार मला दि. १६/०४/२००६ ते दि.२१/०४/२००६ अखेर उपचार केला.पंरतू माझ्या प्रकृतीत कोणताही फरक न पडल्याने व तब्येत जास्तच खालावत गेल्याने श्री साईनाथ रुग्णालयाच्या अधिक्षिका सौ.पेंडसे मॅडम यांचे सल्ल्याने मला जांहागिर हॉस्पिटल,पुणे येथे दि.२१/०४/२००६ रोजी हलविण्यात आले. जांहागिर हॉस्पिटलमधील डॉ.रमेश सांगळे, न्युरो सर्जन यांनी माझ्या तात्काळ तपासण्या करुन माझ्या मेंदूवर शस्त्रक्रिया कराव्या लागतील, असे सांगितले व दिनांक २२/०४/२००६ रोजी माझ्या लहान मेंदूवर शस्त्रक्रिया करण्यात आली व दि.२२/०४/२००६ ते २१/०६/२००६ पर्यंत जाहांगिर हॉस्पिटल, पुणे येथे औषधोपचारासाठी ठेवले. या कालावधीतील खर्च रुपये- ४,७५,०००/- मात्र इतका श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी यांनी अदा केलेला आहे.त्याबद्दल मी आपला अत्यंत ऋणी आहे. सदर औषधोपचारानंतर म्हणजे दि.२१/०६/२००६ रोजी मला डिसचार्ज देण्यात येऊन पुढील ओषधोपचार संस्थानचे रुग्णालयात घेण्याबाबत डॉ.रमेश सांगळे,न्युरो सर्जन ,पुणे यांनी सांगितले.त्यानुसार शिरडी येथे येऊन आज अखेर औषधोपचार श्री साईबाबा हॉस्पिटलचे, न्युरो सर्जन, डॉ.टिंगरे यांचेकडे चालू आहे.पंरतू हवी तशी सुधारणा झालेली नाही.त्यामुळे संस्थानचे श्रीसाईबाबा हॉस्पिटलचे न्युरो सर्जन, डॉ.के.एन.टिंगरे

व जाहांगिर हॉस्पिटल, पुणे येथील डॉ.रमेश सांगळे,न्युरो सर्जन यांनी तपासणी केली असता, मला पुर्वस्थितीत येण्यास आणखी बराच कालावधील लागेल, असे सांगितले.

सध्या मी आपले संस्थानचे रुग्णालयात उपचार घेत आहे.दि.०१/१२/२००६ पासून माझी कोणतीही रजा शिल्लक नसल्याने माझा पगार विना वेतन होत आहे. त्यामुळे माझ्या कुटूंबावर उपासमारीची वेळ आली आहे. माझी दोन लहान -लहान मुल (मुलाचे अंदाजे वय - ०८ वर्ष व मुलीचे वय - ०५ वर्ष) आहे.तसेच मला उत्पन्नाचे दुसरे कोणतेही साधन नसल्याने माझ्या कुटूंबाच्या उदार निर्वाहसाठी माझे ऐवजी माझे पत्नीस संस्थान सेवेत घ्यावे,अशी विनंती केली आहे.

सदर अर्जावर "मिटींग पुढे ठेवा ", असे मा.अध्यक्ष साहेब यांनी सुचित केले आहे.

वैद्यकीय अनुकंपातत्वावर शासकीय सेवेत नोकरी देणे संबंधीची सुधारीत नियमावली खालील प्रमाणे आहे.

शासन निर्णय, क्रमांक, अकंपा-१००४/प्रक्र,५१/२००४/आठ,मंत्रालय,मुंबई-३२ दिनांक २२ ऑगष्ट-२००५ नूसार शासन निर्णय २ मधील (१) गट "क" व "ड " मधील कर्मचारी कर्करोग, पक्षाघात किंवा अपघात यामुळे सेवेसाठी कायमचा असमर्थ ठरुन रुग्णता निवृत्त झाल्यास त्याच्या कुटूंबियांना गट " क" व "ड " मधील पदांवर नियुक्ती देण्याची सवलत रद्द करण्यात येत आहे. यापुढे केवळ सेवेत असतांना दिवंगत झालेल्या गट "क" व "ड" च्या कर्मचाऱ्यांच्या पात्र कुटूंबियांनाच अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय राहील", असा निर्णय पारीत झालेला असलेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री राजु भोसले, वाहन चालक, वाहन विभाग यांचे पत्नीस कंत्राटदारामार्फत कंत्राटी कर्मचारी म्हणून संस्थान सेवेत घेण्यात यावे व अनुकंपा प्रस्ताव शासनाकडे अभिप्रायार्थ सादर करण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना)

१३. <u>श्री.किरण आण्णा धिवर यांना संस्थान सेवेत कायम करणे व वेतनश्रेणी देणेबाबत.</u>

सदरहू विषयाबाबत पुढे विषय नं. ०७मध्ये निर्णय झालेला आहे.

१४ <u>श्रीसाईबाबा संस्थानमध्ये कायम स्वरुपी नोकरी मिळणेबाबत आग्रक्रम देण्यात यावा याबाबत श्री संतोष अशोक कहांडळ व इतर भू-संपादित शेतकरी यांचे अर्जाबाबत</u>

श्री.संतोष अशोक कहांडळ व इतर भू-संपादीत शेतकरी यांनी दिनांक १७/०५/२००७ रोजी मा.अध्यक्ष साहेब व मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांना पाठविलेल्या पत्रात नमुद केले आहे की, आम्ही राहणार-रुई, तालुका-राहाता येथील रहिवाशी असून आमच्या कुटूंबाची थोडी-थोडकी असलेली जमीन रेल्वे मार्गासाठी भू-संपादीत झालेली आहे. आम्ही शेतकरी एकत्रित कुटूंबातील आहे. ज्या छोटया शेतीवर आमचा उदरनिर्वाह चालत होता ती शेतीच रेल्वे मार्गावर गेलेली आहे. त्यामुळे आमच्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करणे अवघड झाले आहे. त्यातच शासनाने सदर जमिनीचा भाव जिरायत म्हणून दिलेला आहे. तसेच कुटूंबाची सर्वस्वी जबाबदारी आमच्यावर आहे.तसेच जमिनीच्या मध्य भागातून रेल्वेमार्ग जात असल्यामुळे कसण्यास गैरसोयीची झाली आहे.

शिरडी रेल्वमार्गाचे काम झाल्यानंतर साईभक्तांची मोठया प्रमाणावर सोय होणार आहे. त्यात आपणा सर्वांचे हित आहे. तेंव्हा आपणांस विनंती करण्यात येते की, आम्हा कुटूंबाचा उदरनिर्वाह चालविण्यासाठी आमच्या शिक्षणाप्रमाणे कायम स्वरुपीच नोकरी देऊन आपल्या संस्थेची सेवा करण्याची संधी द्यावी, असे नमुद केले आहे.(अर्जदाराने एकाच मजकुराची मा.अध्यक्ष साहेब व मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे नांवे असे डबल अर्ज केलेले आहेत.)

संबंधीत शेतकऱ्यांचे रेल्वेमार्गात भू-संपादीत झालेले क्षेत्र खालील प्रमाणे :-

अ.नं.	अर्जदाराचे नांव (जमीन स्वत:, वडील, आई, आजोबा, सासु, सासरा यांचे नांवे आहे.)	गांव	शिक्षण	वय वर्षे	एकुण क्षेत्र हेक्टर आर	रेल्वे मार्गात भू-संपादीत क्षेत्र हेक्टर आर
०१	श्री संतोष अशोक कहांडळ,	रुई	बी.ए.	२८ वर्ष	४८ आर	०८ आर
०२	श्री नितीन गोरखनाथ कहांडळ,	रुई	इ.११ वी	१९ वर्ष	५६ आर	१० आर
०३	श्री विजय बाळासाहेब कहांडळ,	रुई	इ.९ वी	२० वर्ष	४८ आर	२० आर
०४	श्री बाबासाहेब निवृत्ती कहांडळ,	रुई	इ.१० वी	२६ वर्ष	६६ आर	०७ आर
०५	श्री संदिप गोपीनाथ कहांडळ	रुई	इ.८ वी	२२ वर्ष	२८.०५ आर	०४ आर
०६	श्री हरिचंद्र आंबू कहांडळ	रुई	इ.९ वी	४४ वर्ष	२८.०५ आर	०५ आर
०७	श्री गोरक्षनाथ बाबासाहेब भंडागे	रुई	इ.१० वी	२६ वर्ष	६३ आर	१२ आर
०८	श्री गोविंद बाबासाहेब भंडागे	रुई	फार्मशी	२४ वर्ष	६३ आर	१२ आर
०९	श्री संजय बाळासाहेब भंडागे	रुई	इ.१० वी	२७ वर्ष	३७ आर	१४ आर
१०	श्री नानासाहेब रंगनाथ भंडागे	रुई	इ.१० वी	२७ वर्ष	५४ आर	१३ आर
११	श्री सुनिल आण्णासाहेब भंडागे	रुई	इ.९ वी	२१ वर्ष	५४ आर	१३ आर
१२	श्री संतोष शिवनाथ पठारे	रुई	इ.१० वी	२६ वर्ष	८७ आर	०३ आर

१३	श्री सुनिल भास्कर वाबळे	रुई	इ.९ वी	२३ वर्ष	२८२ आर	०९ आर
१४	श्री कैलास फकिरराव बत्तासे	रुई	इ.७ वी	२८ वर्ष	७८ आर	०९ आर
१५	श्री शहाजी हरी गांगवे -भाचा (श्रीमती दगडाबाई भिका जाधव-जमीन मालक)	रुई	इ.१० वी	२७ वर्ष	१२० आर	३२ आर
१६	श्री शरद वसंत कामठे	रुई	इ.१० वी	२७ वर्ष	३५ आर	१९ आर
१७	श्री दिघे दिनकर ज्ञानेश्वर (नातु) (श्रीमती भिमाबाई बाबुराव कहांडळ)	रुई	इ.१० वी	२९ वर्ष	१९१ आर	३० आर
१८	श्री योगेश नवनाथ कहांडळ	रुई	इ.१२ वी	२७ वर्ष	१६४ आर	२३ आर
१९	श्री नारायण अशोक कामठे	रुई	इ.१० वी	२३ वर्ष	७१ आर	१९ आर
२०	श्री अजय एकनाथ मते	निघोज	इ.१२ वी	३२ वर्ष	२४६ आर	६८ आर
२१	श्री नारायण भाऊसाहेब वाबळे	रुई	इ.९ वी	१९ वर्ष	७७ आर	१३ आर
२२	श्री विजय बापुसाहेब चिकणे	रुई	इ.६ वी	२६ वर्ष	६९ आर	४१ आर
२३	श्री योगेश उमाकांत वाबळे	रुई	इ.९ वी	२० वर्ष	१४८ आर	०९ आर
२४	श्री रामनाथ एकनाथ पठारे	रुई	इ.१० वी	२२ वर्ष	७४ आर	०३ आर
२५	श्री उमेश कचरु कहांडळ	रुई	इ.१२ वी.	१९ वर्ष	७२ आर	१४ आर
२६	श्री दिनकर भाऊसाहेब चिकणे	रुई	इ.९ वी	२८ वर्ष	१२२ आर	१४ आर
२७	श्री योगेश रमेश कामठे	रुई	इ.१० वी	१९ वर्ष	४६ आर	२२ आर
२८	श्री आण्णासाहेब विश्वनाथ कहांडळ	रुई	ट्रक्टर मॅकनिक	३१ वर्ष	७० आर	१२ आर
२९	श्री बाबासाहेब अशोक कामठे	रुई	इ.११ वी	२४ वर्ष	७० आर	२२ आर
३०	श्री सचिन गोरखनाथ कहांडळ	रुई	इ.९ वी	१७ वर्ष	४० आर	१० आर
३१	श्री संदीप चंद्रभान गमे	रुई	इ.१० वी	२२ वर्ष	१९८ आर	४५ आर
३२	श्री संतोष भाऊसाहेब लुटे	रुई	एस.वाय.बी.ए	२६ वर्ष	११७ आर	३० आर
३३	श्री सुरेश अंबादास भंडारे (जावई) (उत्तम रेवजी गमे-जमीन मालक)	रुई	इ.१० वी	३५ वर्ष	१९८ आर	२२ आर
३४	श्री भाऊसाहेब सोपान कंहाडळ	रुई	इ.६ वी	३६ वर्ष	६९ आर	३३ आर
३५	श्री मधुकर परसराम वाबळे	रुई	इ.७ वी	४१ वर्ष	६१ आर	२७ आर
३६	श्री संजय विश्वनाथ कंहाडळ	रुई	एम.ए.बी.एड.	३६ वर्ष	३६ आर	१० आर
३७	श्री शामराव अशोकराव वाबळे	रुई	इ.९ वी	२५ वर्ष	६२ आर	०६ आर
३८	श्री अनिल भास्कर वाबळे	रुई	इ.१० वी	२६ वर्ष	२८२ आर	०९ आर
३९	सौ.रेखा अभिमन्यू चिकने	रुई	इ.७ वी	३७ वर्ष	२०५ आर	४१ आर
४०	श्री अरुण अभिमन्य शिंदे (जावई) श्रीमती सुमनबाई माधव चिकणे (जमीन मालक)	रुई	इ.१२ वी	३७ वर्ष	१२२ आर	१४ आर
४१	श्री रमेश अशोकराव बारगळ	रुई	इ.१० वी	२४ वर्ष	१०१ आर	३४ आर
४२	श्री बाबासाहेब भानुदास वाबळे	रुई	इ.१० वी	३३ वर्ष	६१ आर	१० आर
४३	श्री आबासाहेब भानुदास वाबळे	रुई	बी.ए.	३८ वर्ष	४० आर	०५ आर
४४	श्री शंकर सहादू पठारे	रुई	इ.१० वी	४२ वर्ष	३७ आर	१२ आर
४५	श्री सचिन नवनाथ चिकणे	रुई	इ.८ वी	१५ वर्ष	६१ आर	०८ आर
४६	श्री आप्पासाहेब बाळासाहेब कंहाडळ	रुई	एस.वाय.बी.कॉम	२० वर्ष	४९ आर	२८ आर
४७	श्री शरद गोरक चिकणे	रुई	इ.११ वी	२१ वर्ष	८० आर	०९ आर
४८	श्री सोमनाथ गोरक्षनाथ चौधरी	रुई	बी.कॉम ॲपिअर	२२ वर्ष	११५ आर	१४ आर
४९	श्री भाऊसाहेब खंडेराव चौधरी	रुई	इ.१० वी	३९ वर्ष	११३ आर	१४ आर
५०	श्री अमोल आप्पासाहेब मोरे	रुई	इ.१२ वी	१९ वर्ष	७४ आर	०६ आर
५१	श्री राहुल वसंत चौधरी	रुई	इ.११ वी	१८ वर्ष	१६५ आर	३१ आर
५२	श्री कचरु नाथा वाबळे	रुई	इ.१२ वी नापास	३५ वर्ष	११३ आर	०५ आर
५३	श्री यशवंत अशोक वाबळे	रुई	इ.९ वी	२१ वर्ष	५४ आर	१२ आर
५४	श्री भिका श्रीरंग कंहाडळ	रुई	इ.११ वी	३८ वर्ष	७५ आर	२८ आर
५५	श्री बाळासाहेब बाबुराव भंडागे	रुई	इ.९ वी	२७ वर्ष	५८ आर	०७ आर
५६	श्री किरण भिकचंद भंडागे	रुई	इ.१० वी	२३ वर्ष	६० आर	११ आर
५७	श्री राजेंद्र बाळकृष्ण जाधव	रुई	बी.ए.	३३ वर्ष	२८० आर	१५ आर
५८	श्री सुधाकर परसराम वाबळे	रुई	इ.१० वी	४० वर्ष	८१ आर	२७ आर
५९	श्री भागवत आबासाहेब चिकणे	रुई	इ.९ वी	१७ वर्ष	२७७ आर	१३ आर
६०	श्री सुभाष मुरलीधर वाबळे	रुई	आय.टी.आय. फिटर	२८ वर्ष	६२ आर	०६ आर
६१	श्री आनंद लखीचंद भंडारी	रुई	इ.१० वी	२७ वर्ष	५४ आर	२४ आर
६२	श्री भाऊसाहेब खंडेराव मते	रुई	इ.१० वी	२६ वर्ष	२६४ आर	६६ आर

६३	श्री नितिन सुभाष भनसाळी	रुई	आय.टी.आय.इले	३८ वर्ष	१९६ आर	७० आर

तरी वरील शेतकऱ्यांनी त्यांची रुई शिवारातील जमीन रेल्वे मार्गात भू-संपादीत झालेली असल्याने संस्थानमध्ये कायम नोकरी मिळणेबाबत अर्ज सादर केले आहे. त्या अर्जामध्ये त्यांच्या कुटूंबातील इतर व्यक्ती शासकीय अथवा इतर संस्थेमध्ये नोकरी करीत असलेबाबतची माहिती दिलेली नाही. तसेच रेल्वे मार्गात ज्यांची जमीन भू-संपादीत झालेली आहे. त्यांच्या एकत्रित कुटूंबामध्ये एकाच क्षेत्रामध्ये नोकरी मिळणेबाबत दोन अर्ज आलेले दिसून येतात.तसेच कांही अर्जामध्ये स्वत: जमीन मालक नसल्याने त्यांचे जावई यांना नोकरी मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. जमीन मालकांना रेल्वे मध्ये गेलेल्या जमीनीचा भू-संपादन मार्फत सरकारने मोबदला दिलेला आहे.

तरी श्री संतोष अशोक कहांडळ, व इतर भू-संपादीत शेतकरी यांनी दिनांक १७/०५/२००७ रोजी मा.अध्यक्ष साहेब व मा.कार्यकारी अधिकारी यांना पाठविलेल्या पत्रात श्री साईबाबा संस्थानमध्ये कायम स्वरुपी नोकरी मिळणेबाबत आग्रक्रम देण्यात यावा अशी विनंती केलेली असुन, या आशयाचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

याबाबत मा.व्यवस्थापन समितीच्या दि.२४.०५.२००८ चे सभेतील निर्णय क्र.५५६ अन्वये रेल्वेमार्गात ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी संपादीत झालेल्या आहेत याची शहानिशा करुनच अशा बाधीत झालेला लोकांना संस्थानमध्ये कंत्राटदारांमार्फत कंत्राटी पद्धतीने नेमणूक देणेबाबत निर्णय झालेला असून त्याबाबत अलाहिदा कार्यवाही करणेत येत असल्याने सदर विषय मागे घेणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना)

१५ <u>विभागप्रमुखाचे वेतन मिळणे बाबत श्री प्रल्हाद गंगाधर शेळके पाणीपुरवठा विभागप्रमुख यांचा अर्ज.</u>

श्री प्रल्हाद गंगाधर शेळके,पाणी पुरवठा विभाग प्रमुख, त्यांनी त्यांचे दि.१९/०७/२००६ रोजीचे विनंती अर्जानुसार ते संस्थानचे सेवेत दाखल झाले पासून,आज पर्यतंचे बाबतची माहिती दिली आहे.तसेच त्यात शेवट मला विद्युत पर्यवेक्षकाची वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे.हा माझ्यावर एक प्रकारचा अन्यायच झालेला आहे.माझी सर्व्हीस ही दिर्घकाळ झालेली आहे. जबाबदारीही मोठी आहे.सर्व्हीसचे तीन ते साडेतीन वर्षे राहीलेले आहे.तरी या सर्व बाबींचा विचार करुन मे.साहेबांनी माझ्या अर्जाचा सहानुभूतिक विचार करुन मला रुपये- ६५००-२००-१०५०० ही बांधकाम ज्यु.इंजिनिअरची वेतनश्रेणी द्यावी, म्हणजे मला मी केलेल्या आता पर्यंतच्या दिर्घकाळ सेवेचा व प्रमाणिकपणाचा मोबदला मिळेल,अशी विनंती केली आहे.

सदर अर्जावर प्रशासकीय अधिकारी यांनी "श्री शेळके हे या विभागाची जबाबदारी अत्यंत जबाबदारीने व चोख बजावत आहे, जबाबदारीबद्दल त्यापदाची जादा जबाबदारी म्हणून त्यांना अलॉऊन्स देणे आवश्यक आहे, ते दिलेले नाही.संस्थानला आता अधिनियम -२००४ लागू झालेला आहे.त्यानुसार संस्थानचा स्टॅपिंग पॅटर्न तयार करुन त्यांस शासनाची मान्यता घ्यावी लागणार आहे.त्यावेळी या अर्जाचा विचार प्राधान्याने व्हावा, अशी शिफारस आहे.तो पर्यंत सदरच्या पदाचा अलॉऊन्स दरमहा त्यांना मिळावा, तसेच जबाबदारी टाकलेल्या दिवसांपासून तो कार्यरत करण्यात यावा", असे अभिप्राय दिले आहे.

<u>श्री प्रल्हाद गं.शेळके यांची माहिती खालील प्रमाणे</u> :-

०१) शैक्षणिक अर्हता :- अ) एस.एस.सी.पास -१९६८, ब) वायरमन परिक्षा पास-१९७७,
क) विद्युत पर्यवेक्षक परिक्षा पास-१९८४.

श्री शेळके यांची नेमणुक-सन १९७४ मध्ये मदतनीस म्हणून करण्यात आली होती.तेथून पुढे सन.१९७८ साली वायरमन या पदावर पदोन्नती देवून त्या पदाची वेतनश्रेणी देण्यात आली त्यानंतर १९९८ पासून पर्यवेक्षक पदाची वेतनश्रेणी देण्यात आली.पाणी पुरवठा विभाग स्वतंत्र झाल्याने त्यांना विभाग प्रमुखाची रु.- ५०००-१५०-८००० ही वेतनश्रेणी देण्यात आली व सन १९९९ रोजी १२ वर्षानंतरची वरिष्ठ वेतनश्रेणी रु.- ५५००-१७५-९००० ही देण्यात आली.

संस्थान मधील कांही विभाग प्रमुख यांना रुपये- ५०००-१५०-८००० ही वेतनश्रेणी असून कांहीना अधिक्षक पदाची रुपये-५५००-१७५-९००० ही वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे.श्री शेळके यांना ही वेतनश्रेणी देण्यात आलेली असल्याने म्हणजे इतर विभाग प्रमुख यांचे प्रमाणेच देण्यात आलेली आहे. ते वरिष्ठ पदाची कामे सांभाळत असतील किंवा आपल्या पदाची कामे सांभाळून अतिरिक्त पदाचे कामे करीत असतील तर अशाच कर्मचाऱ्यांना अलॉऊन्स देणेबाबत शासन जी.आर.आहे.श्री प्रल्हाद शेळके यांचेकडे मात्र कोणतेही अतिरिक्त कामे नसून ते विभाग प्रमुखांच्या अधिकारात जी कामे येतात, तीच कामे करतात.तसेच त्यांचेकडे दुसऱ्या कोणत्याही अतिरिक्त पदाचा कार्यभार दिलेला नसल्याने त्यांना शासन निर्णयानुसार अलॉऊन्स देता येत नाही.

या पदाबाबत शासनाकडे काय वेतनश्रेणी आहे त्यांची शैक्षणिक पात्रता काय असावी लागते याबाबतची माहिती महाराष्ट्र जीवन प्राधीकरण विभाग कोपरगांव (पाणी पुरवठा विभाग) यांचेकडे घेतली असता त्यांनी सांगितले,या पदासाठी कनिष्ठ अभियंता हे पदनांम असून त्याची शैक्षणिक पात्रता बी.ई./

डिप्लोमा (सिव्हील) अशी असून सदर पदे एम.पी.एस.सी.द्वारे भरली जातात व त्यांचे आवश्यक अनुभवा नंतर व पद रिक्त असल्यास शाखा अभियंता या पदावर पदोन्नती दिली जाते.शासनाकडे कनिष्ठ अभियंता पदास रुपये- ६५००-२००-१०५०० ही वेतनश्रेणी देण्यात येते.

श्री शेळके यांचेकडे शासनाच्या नियमानुसार शैक्षणिक पात्रता नाही. तथापि नोव्हेंबर १९९८ पासून ते पाणी पुरवठा विभाग प्रमुख म्हणून काम करीत असून कर्मचारी वसाहत, हॉस्पीटल, भक्तनिवासस्थान (५०० रुम) इ. ठिकाणी विनातक्रार पाणी पुरविण्याची जबाबदारी ते योग्य रितीने पार पाडीत आहेत.

तरी, श्री प्रल्हाद गंगाधर शेळके यांना कनिष्ठ अभियंता पदाचे वेतन / अलाऊन्स देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री शेळके यांची प्रदिर्घ सेवा व अनुभव विचारात घेऊन त्यांना कनिष्ठ अभियंता या पदाची रुपये ६५००-२००-१०५०० ही वेतनश्रेणी विशेष बाब म्हणून देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

१६ <u>विभागप्रमुखाचे वेतन मिळणेबाबत श्री शशीकांन्त अं.कुलकर्णी, ध्वनीक्षेपन सी.सी.टी.व्ही इलेक्ट्रीक सुपरवायझर यांचे अर्जाबाबत</u>

श्री.शशीकांत अंबादास कुलकर्णी, ध्वनीक्षेपण-सी.सी.टी.व्ही.इलेक्ट्रीक सुपरवायझर, त्यांनी त्यांचे दि.२२ मार्च २००७ रोजीचे विनंती अर्जाते "मी संस्थानचे सेवेत सन १७७२ पासून सुमारे ३५ वर्ष नोकरीत आहे. सन १९९९ ते आजपावेतो मी ध्वनीक्षेपण, कारंजा व सन २००५ पासून सी.सी.टी.व्ही.विभागाचे प्रमुख म्हणुन काम पाहत आहे. वशी-०१ ला माझे पदनाम इलेक्ट्रीकल सुपरवायझर असे आहे,ते बदलून प्रमुख करावे.तसेच प्रमुखाचे वेतन मिळणेबाबत अनेक वेळेस अर्ज, विनंती मी केलेली आहे.

श्री प्रल्हाद गं.शेळके, पाणी पुरवठा विभाग प्रमुख हे माझ्यापेक्षा दोन वर्षांनंतर संस्थानमध्ये रुजू झ ाले असतांना त्यांना सन १९९८ मध्ये पाणी पुरवठा विभाग प्रमुख करणार असे कळले, तेव्हा दि. १२ जून १९९८ रोजी अर्ज देऊन मी जेष्ठ असल्याकारणाने व दोघांचे पदनाम इले.सुपरवायझर असल्याने व मला कामाचा अनुभव असल्याने मी पाणी पुरवठा विभाग सांभाळू शकतो. त्यामुळे असा अर्ज केलेला आहे.पंरतू माझ्या अर्जाचा विचार न करता जा.नं.एसएसएस/वशी-०१/१०७५५/९८ दि.०२/११/१९९८ अन्वये पाणी पुरवठा विभाग हा श्री प्रल्हाद शेळके यांच्याकडे देण्यात येऊन त्यांचे पदनाम प्रथम प्रभारी पाणी पुरवठा विभाग प्रमुख होते नंतर ते बदलून पगार बील यादीला पाणी पुरवठा विभाग प्रमुख असे करण्यात आलेले आहे.

त्यानंतर जा.नं.एसएसएस/वशी-०१/२४७७/९९ दि.९ सप्टेंबर १९९९ च्या आदेशान्वये ध्वनीक्षेपण विभाग व कारंजा मेन्टेनन्स माझ्याकडे देण्यात आले.व सन २००५ पासून सी.सी.टी.व्ही. विभाग हा माझ याकडे देऊन ध्वनीक्षेपण + कांरजा व सी.सी.टी.व्ही.चे काम या विभागाकडे मी एकत्र पाहत आहे. त्या वेळोवेळी अनेक सुधारणा मी केल्या आहेत. या विभागातील काम अत्यंत क्लीष्ट व बौध्दीक स्वरुपाचे आहे.तसेच अनेक लहान लहान व अत्यंत किंमती मशिनरी या विभागाकडे असुन सुमारे एक कोटी रुपये पर्यंतचा डेडस्टॉक आहे. तथापी सन १९९९ नंतर मी अर्ज देऊन माझी बदली पाणी पुरवठा विभाग प्रमुख व श्री प्रल्हाद शेळके यांची बदली ध्वनीक्षेपन विभाग प्रमुख म्हणून करावी,असा अर्ज केलेला आहे.पंरतू त्याचाही विचार झालेला नाही.त्यावेळेस माझी बदली केली असती,तर आज मी श्री प्रल्हाद शेळके यांच्या जागेवर पाणी पुरवठा विभाग प्रमुख असतो.

दिनांक १४/११/२००२ रोजी व त्यानंतरही अर्ज देऊन माझे विद्युत पर्यवेक्षकाचे पदनाम बदलून प्रमुख पदनाम करणे, तसेच सेवाजेष्ठता यादीप्रमाणे प्रल्हाद शेळके यांचे अगोदर विद्युत पर्यवेक्षक या पदावर मी जेष्ठ असल्याकारणाने श्री प्रल्हाद शेळके यांना कुठल्याही प्रकारची पगारवाढ, जादा इन्क्रीमेंट किंवा कामाचा मोबदला दिल्यास मलाही त्यांच्या इतका पगार मिळणेस मी पात्र राहील,असे कळविलेले आहे.

त्यानंतरही मी दि.०३ ऑगष्ट-२००६ व दि.११ डिसेंबर २००६ रोजी पदोन्नती व वेतनश्रेणी मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. अशा प्रकारे अनेक वेळेस अर्ज करुन सुध्दा माझ्या अर्जाचा कधीही विचार अथवा खुलासा झालेला नाही. आता मी ऐकले आहे की, श्री प्रल्हाद शेळके यांना त्यांच्या मागणीप्रमाणे उच्च वेतनश्रेणी देणेबाबतचा त्यांचा अर्ज विचाराधीन आहे. याबाबत मे. साहेंबाना या अर्जाव्दारे विनंती करतो की, मी जेष्ठ असल्याने तसेच अत्यंत जबाबदारीच्या विभागाचे कामकाज मी (इले.सुपरवायझर) प्रमुख म्हणून पाहत असल्याकारणाने श्री प्रल्हाद शेळके यांना जी वेतनश्रेणी देण्यात येईल, त्या वेतनश्रेणीस मी पात्र राहील.तरी कृपया माझे पदनाम बदलावे.तसेच श्री प्रल्हाद शेळके यांना देण्यात येणाऱ्या वेतनश्रेणीप्रमाणे मलाही वेतनश्रेणी देण्यात यावी,अशी विनंती केली आहे.

<u>श्री शशीकांत अंबादास कुलकर्णी , यांची माहिती खालील प्रमाणे :-</u>

०१) शैक्षणिक अर्हता :- अ) एस.एस.सी.पास ,
ब) वायरमन परिक्षा पास.
क) विद्युत पर्यवेक्षक क्षमता प्रमाणपत्र १९८२

०२) नेमणुक तारीख :- ०१) दि.०१/०३/१९७२ ------- मदतनिस.
०२) दि.०१/०८/१९७७ ------- तारतंत्री,

०३) दि.२६/०३/१९८६ ------- इलेक्ट्रीक सुपरवायझर.

०३) वेतनश्रेणी :- रु. ५५००-१७५-९००० (कालबध्द वेतनश्रेणी दि.२६/०६/९८ पासुन)

०४) सध्याचे बेसीक :- रुपये- ७२५०

उपरोक्त अर्जात सन १९९९ नंतर मी अर्ज देऊन माझी बदली पाणीपुरवठा विभाग प्रमुख व श्री प्रल्हाद शेळके यांनी बदली ध्वनिक्षेपन विभाग प्रमुख म्हणून करावी, असा अर्ज केलेला आहे. परंतु त्याचा विचार केला नाही. त्या वेळेस माझी बदली केली असती तर मी पाणीपुरवठा विभाग प्रमुख असतो.

तसेच अर्जात मी प्रल्हाद शेळके यांचे पेक्षा सिनीअर असल्याने त्यांचे एवढीच पगारवाढ व जादा इंक्रीमेंट द्यावे, अशी विनंती या अर्जात केली आहे.

तसेच मी जेष्ठ असल्याने अत्यंत जबाबदारीचे काम (इले.सुपरवायझर) पहात असल्या कारणाने श्री प्रल्हाद शेळके यांना जी वेतनश्रेणी देण्यात येईल त्या वेतनश्रेणीस मी पात्र राहील. तरी कृपया माझे पदनाम बदलावे व श्री प्रल्हाद शेळके यांना देण्यात येणा-या वेतनश्रेणीप्रमाणे मला वेतनश्रेणी द्यावी असे नमुद केले आहे.

पाणीपुरवठा विभाग व ध्वनीक्षेपन विभाग यांची कामे व जबाबदा-यांमध्ये बदल आहेत. श्री शशीकांत कुलकर्णी व श्री प्रल्हाद शेळके यांची शैक्षणिक पात्रता एकच आहे. श्री शशीकांत कुलकर्णी हे सिनीअर आहे. त्यांना पर्यवेक्षक ऐवजी विभाग प्रमुख हे पदनाम देता येईल. तसेच प्रशासनाच्या सोईच्या दृष्टीने बदलीबाबत विचार करता येईल, असे मत आहे.

तरी, श्री शशीकांत अंबादास कुलकर्णी, हे ध्वनीक्षेपण + कांरजा व सी.सी.टी.व्ही. या विभागाचे अत्यंत जबाबदारीचे काम पहात असून, तसेच त्यांची शैक्षणिक पात्रता विचारात घेता, त्यांना पर्यवेक्षक ऐवजी विभाग प्रमुख हे पदनाम देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

१७ <u>पदोन्नती मिळणेबाबत श्री राजेंद्र सो.जगताप व श्री बाबुराव दत्तात्रय खाडगीर यांचे विद्युत पर्यवेक्षक यांचे अर्जाबाबत</u>

(अ) श्री.राजेंद्र सो.जगताप,विद्युत पर्यवेक्षक ,विद्युत विभाग यांनी त्यांचे दि.१६/०६/२००६ व दि.२५/०६/२००६ रोजीचे अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, मी विद्युत विभागामध्ये सन १९८६ ते १९८९ मध्ये रोजंदारीमध्ये व नंतर १९८९ मध्ये तारतंत्री व सन २००० पासुन विद्युत पर्यवेक्षक असे २० वर्षापासून कामे पहात आहे.

सन १९८६ मध्ये फक्त ३७ के.व्ही.ए.चे १ जनरेटर होते.आता संस्थानचे विद्युत विभागामध्ये ५०० के.व्ही.ए.चे ४ जनरेटर , २५० के.व्ही.ए.चे ३ जनरेटर , १०० के.व्ही.ए.चे २ जनरेटर, ४५ के.व्ही.ए.चा १ जनरेटर असे **एकुण १० जनरेटर सेट** असून, **११ के.व्ही.ए.चे ४ सबस्टेशन आहे**. संस्थानचा विस्तार मंदीर परिसर, प्रसादालय परिसर, साई उद्यान, मंगल कार्यालय, केशव मंदीर, शांती निकेतन, साईनाथ छाया, श्री साईबाबा हॉस्पीटल, श्री साईनाथ हॉस्पीटल, धर्मशाळा (२०० रुम) परिसर, नविन भांडार विभाग, कर्मचारी निवासस्थाने, शैक्षणिक संकुल, नविन भक्तनिवासस्थान (५०० रुम) परिसर, साठवण तलाव, इत्यादी तसेच नियोजीत प्रसादालय इमारत, नियोजीत धर्मशाळा ही दोन मोठी कामे चालू आहेत. तसेच विद्युत विभागाकडे वर्कशॉप (कार्यशाळा) व अे.सी.वॉटर कुलर यंत्रणा इत्यादी कामे विद्युत विभागांतर्गत चालू असते.

त्यासाठी विद्युत विभागाकडे विभाग प्रमुख या हुद्याचे १ पद असून, विद्युत पर्यवेक्षक या हुद्याची ५ पदे असून, याशिवाय वायरमन, अे.सी.मेकॅनिक, हेल्पर, इत्यादी सुमारे १०८ कर्मचारी कामे करीत आहेत. या सर्व कामावर विभाग प्रमुख यांचे नियंत्रण असते. विभाग प्रमुख यांना सहाय्यक पद उप विभाग प्रमुख किंवा विद्युत अधिक्षक पद विद्युत विभागाकडे नाही. विद्युत विभाग प्रमुख यांचे रजा, सुटीचे दिवशी तात्पुरते विभाग प्रमुख म्हणून मी माझी कामे सांभाळून विभाग प्रमुखाचे काम कोणताही जादा मेहनताना न घेता सांभाळले आहे व प्रसंगानुरुप सांभाळीत आहे. विद्युत विभागाकडील कामाचा मला पुर्ण अनुभव असून,कर्मचा-यांकडून कामे करुन घेण्याची माझी क्षमता आहे.

तरी विद्युत विभागाचा विस्तार व कामाचे स्वरुप आणि व्याप्ती विचारात घेवून या विभागाचे कामासाठी उप विभाग प्रमुख किंवा विद्युत अधिक्षक या हुद्याचे एक पद निर्माण करुन त्या पदावर माझी नियुक्ती करुन मला पदोन्नती द्यावी,असे नमुद केले आहे.

तसेच श्री कैलास (बापू) कोते पाटील,माजी विश्वस्त यांनी श्री राजेंद्र सोपानराव जगताप यांचे दिनांक १६/०६/२००६ रोजीच्या अर्जात ""श्री वाकूचौरे साहेब,कार्यकारी अधिकारी ,विद्युत विभागाचा विस्तार मोठया प्रमाणात वाढल्याने त्या विभागात विद्युत अधिक्षक किंवा उप विभाग प्रमुख पदाची निर्मिती मा.व्यवस्थापन मंडळात करुन श्री राजेंद्र जगताप यांना हया पदावर नेमणुक होणेबाबत निर्णय व्हावा",असे नमूद केले आहे.

तसेच मा.आ.राधाकृष्ण विखे पाटील, विश्वस्त, यांनी मा.आ.श्री जयंतराव ससाणे साहेब,अध्यक्ष यांना संदर्भ क्र.२०६३/८५/०२/२००६ दिनांक ०८ जुलै २००६ चे पत्रात नमुद केले आहे की, श्री राजेंद्र

सोपानराव जगताप हे आपल्या संस्थानच्या विद्युत विभागामध्ये २० वर्षापासून सेवेत असून,सध्या विद्युत पर्यवेक्षक म्हणून कार्यरत आहेत. संस्थानचे रुग्णालय, शैक्षणिक संकूल,कर्मचारी निवासस्थाने, भक्तनिवास तसेच संस्थानचा विस्तीर्ण परिसर आदी ठिकाणचे विद्युत विभागाचे कामकाजावर तसेच विभागातील कर्मचाऱ्यांवर विद्युत विभागाचे विभाग प्रमुख यांना नियत्रंण ठेवावे लागत आहे. श्री जगताप हे विभाग प्रमुख यांचे रजा कालावधीत सदर पदाचा कार्यभार कोणताही मेहनताना न घेता समाधानकारक कामे पार पाडत आहेत. त्यांना विद्युत विभागाकडील कामाचा प्रदिर्घ अनुभव असल्यामुळे त्यांनी उपविभाग प्रमुख किंवा विद्युत अधिक्षक हे पद निर्माण करुन त्या पदावर नियुक्ती मिळावी म्हणुन विनंती केलेली आहे.

तरी आपल्या संस्थानच्या विद्युत विभागाची व्याप्ती व कार्यभाराचा विचार करता विभाग प्रमुख यांनी सहाय्यक पद म्हणून उपविभाग प्रमुख किंवा विद्युत अधिक्षक पद निर्माण करुन त्या पदावर श्री राजेंद्र सो.जगताप यांची नियुक्ती करणेबाबत उचित कार्यवाही करावी,असे सुचित केले आहे.

श्री राजेंद्र सोपानराव जगताप यांची माहिती खालील प्रमाणे :-

०१) शैक्षणिक अर्हता:-अ) एस.एस.सी.पास,

ब) आय.टी.आय. इलेक्ट्रीशियन,

क) विद्युत पर्यवेक्षक क्षमता प्रमाणपत्र -१९९३

०२) जा.नं.एसएसएस/वशी-०१/४५७९/८९ दि.०१/०५/१९८९ अन्वये तारतंत्री पदावर तात्पुरती नेमणुक .

०३) जा.नं.एसएसएस/वशी-०१/२०४७/९९ दि.१८/०८/१९९९ अन्वये विद्युत पर्यवेक्षक पदावर पदोन्नती.

श्री राजेंद्र सोपानराव जगताप यांची दि.०१/०५/१९८९ रोजी तारतंत्री पदावर नेमणुक करण्यात आलेली होती. तसेच दि.१८/०८/१९९९ रोजी विद्युत पर्यवेक्षक या पदावर पदोन्नती देवून त्या पदाची रु.-५०००-१५०-८००० ही वेतनश्रेणी देण्यात आली आहे. तसेच त्यांची विद्युत पर्यवेक्षक या पदावर ७ वर्षे ४ महिने सेवा झालेली आहे.या वेतनश्रेणीत आजचे मुळवेतन रुपये- ६०५०/- आहे.

विद्युत विभागाचा विस्तार,कार्यक्षेत्र,कामाचे स्वरुप,हे खुपच मोठया प्रमाणात आहे. त्या ठिकाणी टेक्निकल व नॉन टेक्निकल अशी दोन्ही प्रकारची कामे आहेत.यात कार्यालयीन कामासाठी अधिक्षक या पदाची आवश्यकता आहे. या पदाचा आकृतीबंधात समावेश करावा लागेल,

श्री जगताप यांची वरिष्ठ पदावर झालेली सेवा व ते विद्युत विभाग प्रमुख रजेवर गेल्यावर त्यांचे ऐवजी टेक्निकल व नॉन टेक्निकल अशी कामे समाधानकारकरित्या करीत आहेत. त्यांची जेष्ठता, पात्रता व कार्यालयीन कामाचा अनुभव व १०० बिंदु नामावली (रोष्टर पध्दतीनुसार) तसेच मा.श्री विखेपाटील यांचे शिफारसीस अनुसरुन त्यांना उपविभाग प्रमुख या पदावर पदोन्नती व या पदाची रुपये ५५००-१७५-९००० ही वेतन श्रेणी देणेबाबत विनंती केली आहे.

ब) तसेच श्री बाबुराव दत्तात्रय खाडगीर,विद्युत पर्यवेक्षक यांनी संदर्भ क्र.०१ अन्वये अर्ज करुन त्यात,"माझी विद्युत विभागात दि.११/०५/१९८९ रोजी तारतंत्री म्हणून नेमणूक झालेली असून तदनंतर मला दि.०१/०८/९९ रोजी विद्युत पर्यवेक्षक म्हणून पदोन्नती मिळाली आहे.त्यानंतर मी २००४ साली महाराष्ट्र शासनाच्या राज्य तंत्रशिक्षण मंडळाची विद्युत अभियांत्रिकीमधील परीक्षा पास होऊन पदविका मिळविलेली आहे.सध्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीच्या विद्युत विभागात कायम कर्मच्याऱ्यांत डिप्लोमा इन इलेक्ट्रिक इंजिनियरींग ही शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या दोनच व्यक्ती असून त्यामध्ये एक स्वत: विद्युत विभाग प्रमुख हे आहेत.व दुसरा मी आहे.बाकी दुसऱ्या कोणत्याही विद्युत पर्यवेक्षकाकडे ही शैक्षणिक अर्हता नाही.विद्युत विभागाकडे उप विद्युत विभाग प्रमुख / विद्युत विभाग अधिक्षक / सहाय्यक विद्युत अभियंता पदावर पदोन्नती बाबत मा.व्यवस्थापन मंडळापुढे प्रस्ताव सादर करण्यात येत असल्याचे समजल्यावरुन मी हा अर्ज करीत आहे.तरी इतर विद्युत पर्यवेक्षकांपेक्षा माझी शैक्षणिक अर्हता जास्त असल्याने त्यानुसार सेवा जेष्ठता (सोबत जोडलेल्या विविध न्यायालयांनी दिलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार सेवा जेष्ठता बाबतीत निकालानुसार) विचारात घेण्यात येऊन मला उपविद्युत विभाग प्रमुख / विद्युत विभाग अधिक्षक / सहाय्यक विद्युत अभियंता या पदावर पदोन्नती मिळावी. "असे नमूद केलेले आहे.

त्याबाबत मा.उपाध्यक्ष सो.यांनी " श्री खाडगीर यांचा विद्युत विभागातील कामाचा प्रदिर्घ अनुभव व शैक्षणिक अर्हतेचा प्राध्यान्याने विचार व्हावा.त्यांच्या शैक्षणिक पात्रतेइतका दुसरा कोणीही उमेदवार नाही.तेंव्हा त्यांना उप विद्युत विभाग प्रमुख,विद्युत विभाग अधिक्षक,सहाय्यक विद्युत अभियंता, यापैकी कोणत्याही एका पदावर खासबाब म्हणून पदोन्नती द्यावी यासाठी शिफारस केलेली आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचा सुधारित कर्मचारी आकृतीबंध शासनास मान्यतेसाठी पाठविण्यात आलेला आहे. सदरहू आकृतीबंधास मान्यता मिळालेनंतर अधिक्षक/ उपविभागप्रमुख या पदाची शैक्षणिक पात्रता व अर्हता निश्चित करुन विद्युत पर्यवेक्षक या पदावर काम करत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या मुलाखती घेऊन सदहू पद भरण्यात यावे अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

१८ लिपिक-टंकलेखक या पदावर पदोन्नती मिळणेबाबत श्री साईनाथ दिलीप जगताप यांचे अर्जाबाबत

श्री साईनाथ दिलीप जगताप यांनी दि. २४/०७/२००६ रोजी मा. कार्यकारी अधिकारी सो. यांचे नावे अर्ज सादर करुन त्यात मी दि. ०६/०८/२००४ रोजी संस्थान सेवेत (०२ वर्ष परिविक्षाधिन कालावधी) कायम कर्मचारी म्हणून कामावर रुजू झालो असून दि.०६/०८/२००६ रोजी माझा परिविक्षाधिन कालावधी पूर्ण होत आहे. मी कार्यालय काऊंटरवर लिपीकाचे तात्पुरते काम करत आहे. टंकलेखक या पदावर पदोन्नती मिळणे बाबत विनंती केलेली आहे. माझे शिक्षण बी कॉम पर्यंत पुर्ण झालेले असून एम.कॉम च्या दुस-या वर्गात शिक्षण चालू आहे. त्याचप्रमाणे एम.एस.सी.आय.टी. कोर्स पुर्ण केलेला असून मराठी , इंग्रजी टायपिंगचे शिक्षण घेत आहे.

तरी मी आपणास विनंती पुर्वक अर्ज करतो की, माझ्या शिक्षणाचा विचार करुन मला लिपीक टंकलेखक या पदावर पदोन्नतीचा विचार करावा, अशी विनंती केलेली आहे.

श्री साईनाथ दिलीप जगताप, यांची जा.नं.एसएसएस वशी-०१/ २१८९/२००४. दि. ०५/०८/२००४ अन्वये त्यांचे वडील नामे श्री दिलीप रघुनाथ जगताप यांचे जागी वैद्यकीय अनुकंपा कारणास्तव , श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) विभागाकडे वर्ग-०४ चे कर्मचारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. त्याचा तपशिल खालिल प्रमाणेआहे.

०१)	संपूर्ण नांव	:-	श्री साईनाथ दिलीप जगताप
	नेमणूकीचे पदनाम व विभाग	:-	वर्ग-४ चे कर्मचारी, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान
	नेमणूकीच्या वेळीचे शैक्षणिक अर्हता	:-	टि.वाय. बी .कॉम (ॲपीअर)
	नेमणूकीचा प्रकार	:-	वडीलांचे जागेवर वैद्यकीय अनुकंपा तत्वावर
	नेमणूक तारीख	:-	०६/०८/२००४
	संस्थान सेवेत कायम केल्याची तारीख	:-	०६/०८/२००६.
	संस्थान सेवेत झालेला कालावधी	:-	०२ वर्ष ०७ महिने,
	सध्याची शैक्षणिक अर्हता	:-	बी. कॉम. पास, एम.एस.सी.आय.टी. (एम.कॉम.सेकंड ॲपीअर)
	सध्याची वेतनश्रेणी	:-	रुपये -२५५०-५५-२६६०.
	सध्याचा एकुण पगार	**:-**	रुपये -५,२००/-(अक्षरी रुपये- पांच हजार,दोनशे)

सध्या संस्थानमध्ये विविध विभागात लिपीक - टंकलेखक या पदाच्या जागा रिक्त आहेत.तसेच पात्रताधारक व अनुभवी लिपीक -टंकलेखक यांची आवश्यकता आहे.श्री साईनाथ जगताप यांचेकडे लिपीक -टंकलेखक पदाची शैक्षणिक अर्हता असून लिपीक कामाचा अनुभव आहे.

तरी त्यांना लिपीक-टंकलेखक पदावर पदोन्नती देवून या पदाची रुपये- ३०५०-७५-४९०० ही वेतनश्रेणी देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचा सुधारित कर्मचारी आकृतीबंध शासनास मान्यतेसाठी पाठविण्यात आलेला आहे. सदरहू आकृतीबंधास शासनाची मान्यता मिळालेनंतर श्री जगताप यांना लिपिक-टंकलेखक या पदावर पदोन्नती देणेबाबत निर्णय घेण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

१९ <u>डाटा एन्ट्री ऑपरेटर/तांत्रिक सहाय्यक पदावर नियुक्ती होणेबाबत श्री साईप्रसाद सुरेश जोरी यांचे अर्जाबाबत.</u>

श्री साईप्रसाद सुरेश जोरी,यांची जा.नं.एसएसएस/वशी-०१/२१९०/२००४ दि.०५/०८/२००४ अन्वये त्यांचे वडील नामे श्री सुरेश श्रीरंग जोरी यांचे जागी वैद्यकीय अनुकंपा कारणास्तव आय.टी.विभागाकडे वर्ग-०४ चे कर्मचारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.त्यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

नांव	**:- श्री साईप्रसाद सुरेश जोरी**
नेमणूकीचे पदनांम व विभाग	:- वर्ग-४ चे कर्मचारी,आय.टी.विभाग
नेमणूकीचे वेळीचे शैक्षणिक अर्हता	:- इयत्ता १२ वी सायन्स (बी.सी.एस.ॲपीएर)
नेमणूकीचा प्रकार	:-वडीलांचे जागेवर वैद्यकीय अनुकंपा तत्वावर
नेमणूक तारीख	:- ०६/०८/२००४
संस्थान सेवेत कायम केल्याची तारीख	:- ०६/०८/२००६
संस्थान सेवेचा झालेला कालावधी	:- ०२ वर्षे ०२ महिने
सध्याची शैक्षणिक अर्हता	:- बी.सी.एस.पास

श्री जोरी यांनी दि.०३/०८/२००६ रोजी मा.अध्यक्ष सो.यांचेकडे अर्ज सादर केला असून,त्याच अर्जाची प्रत मा.विश्वस्त श्री राधाकृष्ण विखे पा.सो.यांचेकडे पाठविलेला असून त्यात," माझे वडील कै.सुरेश श्रीरंग जोरी संरक्षण अधिकारी यांनी संस्थान सेवेतून वैद्यकीय कारणास्तव सेवानिवृत्त होवून त्यांचे जागी अनुकंपा तत्वावर संस्थान सेवेत वर्ग-४ चे कर्मचारी म्हणून सामावून घेतले आहे.मी संगणकाची बी.सी.एस.(पदवी) नोव्हेंबर २००४ मध्ये पास झालो असून ऑगष्ट २००५ पासून एम.सी.एम.या प्रशिक्षणास पुणे येथे प्रवेश घेतलेला आहे.तरी माझ्या अर्जाचा सहानुभूतीपुर्वक विचार करुन मला डाटा एन्ट्री ऑपरेटर / तांत्रीक सहाय्यक म्हणून नेमणूक देवून त्यासंबंधीत वेतनश्रेणी मिळावी." अशी विनंती केलेली आहे.

सदर अर्जावर,मा.अध्यक्ष महोदय यांनी,"विनंती मान्य करावी." तसेच मा.विश्वस्त श्री विखे साो.यांनी,"अनुकंपाखाली कर्मचारी आहे का ? काय मदत करता येईल याबाबत कार्यवाही करावी." असे अभिप्राय दिलेले आहे.

"श्री साईप्रसाद जोरी वर्ग-४ कर्मचारी या पदावर माहिती तंत्रज्ञान विभागात कम करत आहेत.माहिती तंत्रज्ञान विभागामध्ये संस्थानला प्राप्त होणारे ई-मेल व भक्तांना पाठविण्यात येणारे ई-मेलबाबतची कामे श्री साईप्रसाद जोरी यांचेकडून करुन घेण्यात येत आहे.त्याचप्रमाणे संगणक फॉरमॅट करणे त्यावर ऑपरेटींग सिस्टीम लोड करणे,कार्यालयीन संगणकामधील ऑपरेटींग सिस्टीमला येणाऱ्या तांत्रीक अडचणींची दुरुस्ती करणे इ.कामे त्यांच्यावर सोपविण्यात आलेली आहेत.

माहिती तंत्रज्ञान विभागाच्या प्रस्तावीत आकृतीबंधाप्रमाणे डाटा एन्ट्री ऑपरेटर या पदाच्या एकूण ११ जागा असून पैकी ०१ जागा भरलेली आहे.व १० जागा सध्य स्थितीमध्ये रिक्त आहेत. तांत्रिक सहाय्यक सॉप्टवेअर मेंटेनंन्स या पदाच्या एकूण चार जागा आहेत.यापैकी दोन जागा भरण्यात आलेल्या असून,दोन जागा अद्यापही रिक्त आहेत.या जागा लवकरात लवकर भरणे संस्थानच्या वाढलेल्या संगणक नेटवर्कच्या दृष्टीने जरुरीचे आहे.या पदासाठी यांचे शिक्षण बी.सी.एस.असून त्यांचा अनुभवही एक वर्षे झाल्याने त्यांना तांत्रीक सहाय्यक सॉप्टवेअर मेन्टेनंन्स या पदावर नेमणूक देण्यास हरकत वाटत नाही."असे अभिप्राय प्रभारी आय.टी.विभाग प्रमुख यांनी दिलेले आहेत.

उपरोक्त श्री साईप्रसाद जोरी यांनी त्यांचे अर्जात केलेली विनंती त्यावरील मा.अध्यक्ष महोदय तसेच मा.विश्वस्त श्री विखे साो.तसेच सदर अर्जावर आय.टी.विभाग प्रमुख यांनी दिलेले अभिप्राय व संस्थान सेवक आकृतीबंधातील आय.टी.विभागाकडील रिक्त असलेल्या डाटा.एन्ट्री ऑपरेटर (वेतनश्रेणी रु.३०५०-४५९०) व तांत्रीक सहाय्यक (सॉप्टवेअर मेंन्टेनंन्स)(वेतनश्रेणी रु.४०००-६०००) या पदांसाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता श्री साईप्रसाद जोरी यांचेकडे आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.जोरी यांना तांत्रिक सहाय्यक यापदावर ४०००-६००० या वेतनश्रेणीत नेमणूक देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

२०. <u>श्री रावसाहेब चंद्रभान कासार, कंत्राटी कामगार प्रसादालय विभाग यांना माहे जुलै २००२ ते जुन २००४ या कालावधीत संस्थान करीता कॉन्ट्रॅक्टर कार्यालयात केलेल्या कामाचा कालावधी ग्राह्य धरुन नियमित आदेश नेमणूक आदेश देणेबाबत.</u>

श्री.रावसाहेब चंद्रभान कासार,कंत्राटी कामगार, प्रसादालय विभाग यांनी दि.१९-०७-२००६ रोजीचा विनंती अर्ज सादर केलेला असून त्यात त्यांनी " मी मार्च १९९५ पासून एम.एस.कारंजे,लेबर कॉन्ट्रॅक्टर व मे.एम.एम.गंधे,लेबर कॉन्ट्रॅक्टर,कॅम्प-शिर्डी यांचेमार्फत श्री साईबाबा संस्थानमध्ये नवीन भक्तनिवासस्थान, प्रसादालय विभाग व प्रशासन शाखेमध्ये कंत्राटी कामगार म्हणून काम करीत होतो व आता बी.व्ही.जी.इंडिया लि.,लेबर कॉन्ट्रॅक्टर,कॅम्प-शिर्डी यांचेमार्फत प्रसादालय विभागात कामावर आहे.दि.२३-०९-१९९९ ते दि.३०-०६-२००२ अखेर या कालावधीत प्रशासन शाखेमार्फत कॉन्ट्रॅक्टरचे कार्यालयात कामावर होतो.सदरच्या काळात मी संस्थानला वेळोवेळी द्यावी लागणारी माहिती काढणे, कंत्राटी कामगारांची हजेरी ठेवणे,कंत्राटी कामगारांची शिफ्ट लावणे व पगारपत्रके तयार करणे व इतर अनुषंगिक कामे करत होतो.

दि.०१-०७-२००२ पासून ते दि.३०-०६-२००४ पर्यंत वरीलप्रमाणेच वेळोवेळी संस्थानला आवश्यक असणारी सर्व माहिती तयार करुन देणे कामी कॉन्ट्रॅक्टरचे ऑफीसमध्ये काम करीत होतो. तथापी,माझी हजेरी प्रशासन शाखेत न ठेवता कॉन्ट्रॅक्टरचे कार्यालयात ठेवण्यात येत होती.तरी देखील मी संस्थानचेच काम करीत होतो.वरील सर्व कालावधी ते आजपर्यंत कालावधीत मी अत्यंत प्रामाणीकपणे व कुठलीही तक्रार न येवू देता काम केलेले आहे.तरी मे.साहेबांना विंनती की,माझे अर्जाचा सहानुभूतीपुर्वक विचार करुन मानवतेच्या दृष्टीकोनातुन संस्थानमार्फत संबंधीत कामांकरीता कॉन्ट्रॅक्टरचे कार्यालयात केलेला उपरोक्त सेवा कालावधी हा सेवाखंडीत कालावधी न धरता सलग सेवाकालावधी धरुन मला इतर कंत्राटी कामगारांप्रमाणेच संस्थानमध्ये नियमित सेवा नेमणूक द्यावी ही विनंती असे म्हटलेले आहे.

सदरचे अर्जा सोबत त्यांनी तत्कालीन विश्वस्त मा.श्री.कैलास गोविंदराव कोते साो.यांचेकडील दि.१८-०७-२००६ रोजीचे पत्र सादर केलेले असून त्यात श्री.रावसाहेब चंद्रभान कासार हे संस्थान मध्ये कंत्राटी कामगार म्हणून कामावर आहेत.ते जुलै २००२ ते जुन २००४ अखेर संस्थान प्रशासनास वेळोवेळी लागणारी कंत्राटी कामगारांची माहिती कॉन्ट्रॅक्टर कार्यालयामार्फत देण्याचे काम करत होते.श्री.कासार हे माझे माहिती परिचयाचे असून त्यांनी संस्थानसाठीच काम केलेले असल्यामुळे त्यांचा वरील कालावधी नियमित सेवेच्या निकषासाठी सेवाखंडीत कालावधी म्हणून न धरता सदरचा कालावधी सलग सेवा म्हणून ग्राहय धरण्यात यावा.श्री.कासार यांना नियमित सेवेत समाविष्ठ करुन घेणेबाबत विनंतीपुर्वक शिफारस करीत आहे.छ असे म्हटलेले आहे.

त्यानंतर श्री.कासार यांचे नांवाचा कायम करणा-या यादीत समावेश करणे संदर्भात मा.उपाध्यक्ष, श्री.शंकरराव गेणुजी कोल्हे साो.यांचेकडील दि.१६-१२-२००६ रोजीचे शिफारस पत्र प्राप्त झालेले असून त्यात श्री.रावसाहेब चंद्रभान कासार हे आपले संस्थानमध्ये ठेकेदारांमार्फत नवीन भक्त निवास,प्रसादालय विभाग येथे १९९५ पासून आजतागायत कार्यरत असून त्यांचे हजेरी ठेकेदाराने २००२ ते २००४ मध्ये प्रशासन शाखेत न ठेवता कॉन्ट्रॅक्टदारांकडे ठेवण्यात आल्याने त्यांचा सेवाकाल खंडीत करुन त्यांना कायम करावयाच्या कामगारांच्या यादीतून वंचीत ठेवण्यात आले असे त्यांचे लेखी अर्जानुसार समजते.श्री.कासार यांचे विंनती अर्जाचा सहानुभूतीने विचार करुन त्यांचेवर अन्याय होणार नाही याबाबत शिफारस आहे." असे म्हटलेले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१-०४-२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२२५ अन्वये सन १९९१ ते २००० पर्यंत कामावर असलेल्या व सध्या ते काम करत असलेल्या १०३७ अकुशल व १७८ कुशल अशा एकूण १२१५ कंत्राटी कर्मचा-यांपैकी नियमित कामावर असणारे व आजमितीस सलग कामावर हजर असणा-या, कोर्ट केसेस वा अन्य चौकशी चालु असलेले वगळून इतर कंत्राटी कर्मचा-यांना नियमित नेमणूका देणेसाठी ॲडव्होकेट श्री.अशोकराव पाटील,कामगार कायदे सल्लागार यांचे सल्ल्याने कायदेशीर पुर्तता करुन प्रस्ताव शासनाचे मान्यतेस सादर करणेत यावा असे ठरले आहे.त्यास अनुसरुन मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग मंत्रालय,मुंबई यांचेकडे कंत्राटी कामगारांना नियमित -

नेमणूका देणे बाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी जा.नं.एसएसएस/वशी-७ए/५३७४/२००६ दि.२५-०४-२००६ अन्वये सादर करणेत आलेला आहे.

त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६-०७-२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५२२ अन्वये कंत्राटी कर्मचारी यांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणे बाबत प्रस्तावास शासनाकडुन अद्याप मान्यता मिळालेली नसल्याने,नियमावलीस अधिन राहून संस्थानने कंत्राटी कामगारांना संबंधीत वर्षात सलग दोन महिने दिलेला ब्रेक किंवा एक-एक महिना असे दोन महिने दिलेला ब्रेकच्या कालावधीस जोडून आणखी एक महिना अपरिहार्य कारणांमुळे गैरहजर राहीलेला कालावधी धरुन असा एकूण सलग तीन महिने सेवाखंडीत कालावधी शिथील करुन,सदरचा कालावधी कामगार नियमित कामावर आहेत व त्यापैकी आजमितीस सलग हजर असणा-या अशा सर्व कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका दरमहा रुपये २०००/- (अक्षरी रुपये दोन हजार) मात्र एकत्रित मानधनावर देणेत याव्यात.त्याकामी ॲडव्होकेट श्री.अशोकराव पाटील, अहमदनगर यांचा सल्ला घेवून,मा.जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष, मा.श्री.शंकरराव गेणुजी कोल्हे, उपाध्यक्ष व मा.श्री.राधाकृष्ण एकनाथराव विखे पाटील, सदस्य या त्रिसदस्य समितीने अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले.

उपरोक्त निर्णयांस अनुसरुन सन १९९१ ते डिसेंबर २००० पर्यंत जे कंत्राटी कामगार नियमित कामावर आहेत व त्यापैकी आजमितीस सलग हजर असणा-या (संबंधीत वर्षात तीन महिने पेक्षा जास्त दिवस सेवाखंडीत अथवा गैरहजर नसलेल्या) अशा ९९७ कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका दरमहा रुपये २०००/- (अक्षरी रुपये दोन हजार) मात्र एकत्रित मानधनावर देणे बाबत मा.त्रिसदस्य समिती (उपसमिती) चे दि.३०-११-२००६ रोजीचे सभेत निर्णय झाला व त्याप्रमाणे संबंधीत पात्र कंत्राटी कर्मचा-यांना दि.०२-१२-२००६ रोजी नियमित नेमणूक आदेश देणेत आले.

श्री.रावसाहेब चंद्रभान कासार हे माहे जुलै २००२ पासून ते जुन २००४ पर्यंत या कलावधीत संस्थानला आवश्यक असणारी व वेळोवेळी लागणारी माहिती तयार करुन देणे कामी मे.एम.एम.गंधे,लेबर कॉन्ट्रॅक्टर यांचे कार्यालयात काम करत होते.त्यामुळे त्यांचा सदर दोन वर्षाचा सेवा कालावधी हा संस्थानमध्ये केलेल्या सेवा कालावधी मध्ये समाविष्ठ न करता त्यांचा सदरचा कालावधी सेवाखंडीत कालावधी धरणेत आलेला आहे.त्यामुळे श्री.कासार यांचा सदरचा धरणेत आलेला सेवाखंडीत कालावधी हा तीन महिनेपेक्षा जास्त असल्यामुळे त्यांना इतर पात्र कर्मचा-यांप्रमाणे संस्थान सेवेत सामावून घेणे कामी नियमित नेमणूक आदेश देणेत आलेला नाही.त्यामुळे त्यांनी सदरचा कॉन्ट्रॅक्टर कार्यालयात केलेल्या सेवेचा कालावधी हा सलग सेवा कालावधी धरुन इतर कंत्राटी कामगारांप्रमाणेच संस्थानमध्ये नियमित सेवा नेमणूक द्यावी अशी उपरोक्त अर्जान्वये विनंती केलेली आहे.

श्री.रावसाहेब चंद्रभान कासार हे माहे मार्च १९९५ पासुन ते माहे जुन २००२ तसेच पुढे माहे जुलै २००४ ते आजअखेर पर्यंत या कालावधीत लेबर कॉन्ट्रॅक्टर्स यांचे मार्फत संस्थानचे अनुक्रमे श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, प्रसादालय,प्रशासन शाखा, कॉन्ट्रॅक्टर कार्यालय व सध्या प्रसादालय विभागात कंत्राटी कामगार म्हणुन कार्यरत आहे.श्री. कासार यांचा माहे जुलै २००२ पासुन ते माहे जुन २००४ अखेर हा कालावधी सेवा खंडीत कालावधी दाखविणेत आलेला आहे.तथापी,संस्थानमार्फत श्री.कासार हे जा.नं. एसएसएस/वशी-७ए/१४१४/१९९९ दि.२४-०६-१९९९ व जा.नं. एसएसएस/ वशी-७ए/ ५८६७/२००१ दि.०७-०६-२००१ तसेच जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१००४१/२००१ दि.२०-०९-२००१ रोजीचे आदेशाप्रमाणे मे.एम.एम.गंधे,लेबर कॉन्ट्रॅक्टर यांचे कार्यालयात कंत्राटदारामार्फत पुरविणेत येणा-या कंत्राटी कामगारांचे संदर्भात संस्थानला वेळोवेळी द्यावी लागणारी माहिती काढणे,कंत्राटी कामगारांची हजेरी ठेवणे, कंत्राटी कामगारांच्या शिफ्ट लावणे,पगार पत्रके तयार करणे, प्रसादालय विभागातील कंत्राटी कामगारांच्या डयुटया लावणे व इतर अनुषंगिक कामे दि.२३-०६-१९९९ ते ३०-०६-२००२ अखेर या कालावधीत करीत

होते.सदर कालावधीत त्यांची हजेरी प्रशासन शाखेत ठेवणेत येत होती.व त्यांचे वेतन देखील संस्थान मार्फत अदा करणेत येत होते.

तथापी,तत्कालीन मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.३०-०६-२००२ रोजीचे सभेमध्ये चर्चा होवुन, सध्या संस्थान मार्फत मे.एम.एम.गंधे कंत्राटदार यांचे कार्यालयास संस्थानतर्फे देण्यात आलेले दोन कंत्राटी कर्मचारी त्वरीत कमी करण्यात यावे असे निर्णय क्र.२९३ (डी) (३) अन्वये ठरले होते.त्याप्रमाणे माहे जुलै २००२ पासून मे.एम.एम.गंधे कंत्राटदार यांचे कार्यालयास संस्थानतर्फे देण्यात आलेले दोन कंत्राटी कामगार मंजुरी कमी करणेत आली.त्यामध्ये श्री.कासार हे देखील होते.म्हणजेच माहे जुलै २००२ ते माहे जुन २००४ या कालावधीत श्री.कासार यांचे पेमेंट संस्थान तर्फे अदा न करता ते कॉन्ट्रॅक्टर मार्फत अदा करण्यात येत होते.सदर कालावधीत श्री.कासार हे कंत्राटदार यांचे कार्यालयात संस्थान कामाकरीता कामावर हजर असलेबाबत त्यांच्या कॉन्ट्रॅक्टर कडील हजेरी रजिस्टरला स्वाक्ष-या देखील आहेत. म्हणजेच सदर कालावधीत त्यांचे कामामध्ये कोणताही बदल न होता ते संस्थानला वेळावेळी द्यावी लागणारी माहिती काढणे,कंत्राटी कामगारांची हजेरी ठेवणे,कंत्राटी कामगारांच्या शिफ्ट लावणे,पगारपत्रके तयार करणे,प्रसादालय विभागातील कंत्राटी कामगारांच्या डयुटया लावणे व इतर अनुषंगिक कामे करत होते.यावरुन श्री.कासार यांचे पेमेंट व हजेरीचे स्वरुप फक्त बदलले होते.परंतु श्री.कासार संस्थान प्रशासनास वेळोवेळी उपरोक्तप्रमाणे द्यावयाची माहिती व त्या अनुषंगिक कामे करत होते.

सबब, श्री.कासार संस्थानसाठीच सदरची कामे कंत्राटदार यांचे कार्यालयात बसून करत होते.त्यामुळे माहे जुलै २००२ पासुन जुन २००४ पर्यंतचा दोन वर्षे कंत्राटदाराचे कार्यालयात संस्थानकरीता केलेल्या कामाचा कालावधी हा सेवाखंडीत कालावधी न धरता, सलग सेवा कालावधी धरुन,त्यांना इतर कंत्राटी कामगाराप्रमाणेच नियमित नेमणूकीस पात्र धरुन, संस्थान सेवेमध्ये सामावुन घेणेस व नियमित नेमणूक आदेश देणेस मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७-०२-२००७ रोजीचे सभेमध्ये सादर करणेत आला होता.याबाबत उपसमितीने अंतिम निर्णय घ्यावा,असे ठरले होते.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.कासार यांनी कंत्राटदाराचे कार्यालयाकडे संस्थान कंत्राटी कर्मचाऱ्यांचे रेकॉर्ड, हजेऱ्या, डयुटया लावणे इ. कामे पूर्ण वेळ केलेली आहेत. त्यामध्ये कोणताही गॅप नाही. त्यामुळे विशेष बाब म्हणून श्री.कासार यांना इतर कंत्राटी कर्मचाऱ्यांप्रमाणे कंत्राटी म्हणून नेमणूक द्यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

२१ <u>श्री अरुण घोडके, सहाय्यक शिक्षक यांचे ज्युनिअर कॉलेजकडे नेमणूक अर्जाबाबत</u>

श्री. घोडके यांनी दि. ३१/०३/२००७ रोजी व त्यापूर्वी अनेक अर्ज करुन त्यात " मी श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडे वर्ष १९९५-९६ पासून कायम सेवेत आहे. विद्यालयाच्या कनिष्ठ महाविद्यालय विभागाकडे सन २००० पासून २००६ पर्यंत इंग्रजी विषयाचे अध्यापन केलेले असून एच.एस.सी (इ.१२वी) इंग्रजी विषयाचा बोर्ड परिक्षेचा निकाल प्रत्येक वर्षी दर्जेदार लागलेला आहे. कनिष्ठ महाविद्यालयाकडे २५० रु. मानधनावर सेवा करत होतो मात्र २००६ पासून या विभागाकडे काम करण्याची संधी मला नाकारण्यात येऊन मी अध्यापन करीत असलेल्या इंग्रजी विषयाची जाहीरात काढून मी काम करत असलेल्या जागी तासिका तत्वावर शिक्षण सेवकांची व या वर्षी अर्धवेळ शिक्षण सेवकांची नेमणूक करण्यात आलेली आहे. ही संधी नाकारतांना माध्यमिक विभागाकडे कार्यभार देता येत नसल्याची माहिती शालेय प्रशासनाकडून मिळाली.

महोदय ज्या नियमान्वये कनिष्ठ महाविद्यालयाकडे सेवा करण्याची संधी नाकारण्यात आली तो शाळा संहितेतील नियम मलाही मान्य आहे. मात्र तो नियम बाजूला सारुन श्री. विकास शिवगजे यांना कनिष्ठ महाविद्यालयाकडे पूर्णवेळ शिक्षक पदावर बढती देऊन रु.७२५०/- याप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयाची वेतनश्रेणी दिलेली आहे. व रोख स्वरुपात फरकही देण्यात आला आहे. श्री. शिवगजे अध्यापन करीत असलेल्या भौतिक शास्त्र या विषयाची जाहीरात न देता त्यांना माध्यमिक विभागाकडून उच्च माध्यमिक विभागाकडे बढती देऊन न्याय देण्यात आलेला आहे.

महोदय माझ्याप्रमाणेच माध्यमिक विभागाकडे काम करीत असलेल्या व माध्यमिक विभागाकडेच नियुक्तीपत्र असलेल्या सौ. वैशाली एन. देशमुख या उच्च माध्यमिक विभागाकडे रु. २५०/- मानधनावर गणित विषयाचे अध्यापन करीत होत्या व अद्याप करत आहेत. मात्र माझ्याकडील कार्यभार लेखी आदेशान्वये काढला गेला असतांना सौ. देशमुख मॅडम यांचा उच्च माध्यमिक विभागाकडील कार्यभार तसाच ठेवणेत आला. व सौ. देशमुख मॅडम अध्यापन करीत असलेल्या गणित विषयाची जाहीरात न देता यावर्षी त्यांना उच्च माध्यमिक विभागाकडे पर्यावरण हा विषय देऊन पूर्ण वेळ कार्यभार दिला असल्याचे प्राचार्या सौ. चव्हाणके मॅडम यांनी शिक्षक सभेत सांगितले. माध्यमिक विभागाकडील त्यांचा कार्यभार यावर्षी पूर्णपणे कमी करण्यात आला. शाळा संहीतेच्या नियमात बसत नसतांना सौ. देशमुख मॅडम यांनाही न्याय देण्यात आला आहे. त्या विषयी मला आनंदच आहे. मात्र उच्च माध्यमिक विभागाकडे सेवा करण्याची संधी मलाच का नाकारण्यात आली हे कळत नाही.

महोदय शाळा संहितेतील नियम बाजूला ठेवून ज्याप्रमाणे श्री. विकास शिवगजे व सौ. वैषाली देशमुख यांना न्याय देण्यात आला त्याप्रमाणेच मलाही उच्च माध्यमिक विभागाकडे संधी देऊन न्याय मिळावा अशी विनंती केली आहे.

सदर पत्राच्या प्रती मा. अध्यक्ष साो तसेच उपाध्यक्ष साो मा.विश्वस्त विखे पाटील साो, मा.डॉ. गोंदकर साो, मा. सौ. सुमित्राताई कोते व तसेच सर्व सन्माननीय विश्वस्त यांना पाठविलेल्या असून पैकी मा.खांबेकर साो यांनी मिटींगपुढे ठेवावे, मा. उपाध्यक्ष साो यांनी श्री. घोडके हे माझे परिचयाचे असून एन.टी. समाजाचे आहेत. त्यांची कनिष्ठ महाविद्यालयाकडे नियुक्ती करणेबाबत,मा.सौ.सुमित्राताई कोते यांनी श्री. घोडके हे माझ्या परिचयाचे असून ते मागासवर्गीय असल्याने त्यांचे पत्रातीली बाबींची चौकशी होऊन जुलै २००५ पासून त्यांना न्याय देणेबाबत, मा.श्री.सुरेशराव वाबळे साो यांनी घोडके यांची शैक्षणिक अर्हता व कनिष्ठ महाविद्यालयाकडे केलेल्या आध्यापनाच्या कामाचा अनुभव आदी बाबी विचारात घेता त्यांना कनिष्ठ महाविद्यालयाकडे अध्यापनाची संधी देणेबाबत मा.श्री विखे पाटील साो यांनी काय वस्तुस्थिती आहे यांची सविस्तर माहिती द्यावी, अन्याय होत असेल तर योग्य नाही पूर्ववत सामावून घ्यावे अशा प्रकारच्या शिफारशी करण्यात आलेल्या आहेत.

शासन निर्णय पत्र क्र. एच.एस.सी. /१५९८/३०९१३/१२ एस.एस. शिक्षण संचालक पुणे दि. १८/०८/१९९९ अन्वये "माध्यमिक विभागाकडील शिक्षकांची नेमणूक कनिष्ठ महाविद्यालयाकडे करता येणार नाही "असा आहे.

तथापी असे असतांनाही श्री. विकास शिवगजे यांना माध्यमिक विभागाकडून कनिष्ठ महाविद्यालयाकडे पूर्वीच देण्यात आलेले आहे. आता पुन्हा माध्यमिक विभागाकडील शिक्षिका सौ. वैशाली देशमुख यांनाही माध्यमिक विभागाकडून कनिष्ठ महाविद्यालयाकडे प्रशासनाची कुठल्याही प्रकारची मान्यता न घेता अध्यापनाचे काम परस्पर देण्यात आलेले आहे.

तसेच सन २००५-२००६ या कालावधी मध्ये इंग्रजी विषयांसाठी श्री साईबाबा कन्याविद्यामंदिराकडे तासिका बेसीसवर शिक्षण सेवक भरणेकामी जाहीरात देऊन` इंग्रजी विषयांसाठी दोन शिक्षण सेवकांच्या नेमणूका प्रथम तासिका बेसीसवर करण्यात आलेल्या असून सदर दोन्ही व इतर शिक्षण सेवकांना त्यांचे कार्यभारानुसार अर्धवेळ कार्यभार होत असल्याने दरमहा रु. २५००/- इतके मानधन देण्यात आलेले आहे.

तसेच श्री. घोडके सध्या माध्यमिक विभागात इंग्रजी विषयाचे पूर्णवेळ शिक्षक म्हणून रु. ५५००-१७५-९००० या वेतनश्रेणीत काम करत आहेत.भविष्यात उच्च माध्यमिक विभागाकडे इंग्रजी विषयाचे अध्यापनासाठी नव्याने पद निर्माण झाल्यास श्री. घोडके यांचा अर्ज मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे सादर करता येईल. असे अभिप्राय प्राचार्या, श्री.साईबाबा कन्याविद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय,शिरडी यांनी दिले आहेत.

तरी श्री.अरुण बाबूराव घोडके यांचे अर्जातील विनंती व श्री शिवगजे यांना पुर्णवेळ कनिष्ठ महाविद्यालयाकडे दिलेली नेमणूक,श्री. घोडके यांचेबाबत मा.अध्यक्षसाो,उपाध्यक्षसाो तसेच इतर सर्व सन्माननीय विश्वस्त यांचे अभिप्राय,माध्यमिक विभागाकडून कनिष्ठ महाविद्यालयाकडे नेमणूकीबाबत शासन निर्णय कनिष्ठ महाविद्यालयाकडे नेमणूका करण्यात आलेले अर्धवेळ शिक्षण सेवक तसेच प्राचार्या श्री साईबाबा कन्याविद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांचे अभिप्राय विचारात घेऊन श्री घोडके यांची कनिष्ठ महाविद्यालयाकडे बदली करणेत यावी. त्यांना इंग्रजी विषयाचा अर्धवेळ व पर्यावरण विषयाचा अर्धवेळ असा पूर्णवेळ भार देणेत यावा व त्यांचे रिक्त पदी सध्या कन्या विद्या मंदिरकडे काम करीत असलेल्या सौ.उज्वला नंदकुमार शेळके यांची शिक्षण सेवक या पदावर नियुक्ती करण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

२२ <u>श्री सुजय बाबर, क्रिडा शिक्षक यांचे ज्युनिअर कॉलेजकडे नेमणूक अर्जाबाबत</u>

उपरोक्त विषयास अनुसरुन श्री.सुजय आनंदराव बाबर, सहाय्यक शिक्षक,क्रिडा (माध्यमिक) यांनी त्यांचे दिनांक २५/०४/२००७ रोजीच्या अर्जात, "माझी शैक्षणिक पात्रता बी.ए., एम.पी.एड.(क्रिडा) असून मी शैक्षणिक वर्ष- २००० पासून श्री साईबाबा संस्थानच्या कन्या विद्यामंदीरकडील माध्यमिक विभागाकडे शारीरीक शिक्षण या विषयाचे अध्यापन करत असून, शाळेच्या प्राचार्या सौ.चव्हाणके मॅडम यांच्या तोंडी आदेशानूसार कनिष्ठ महाविद्यालयाकडील खेळाडूंचे संघ तयार करुन बहीस्त स्पर्धामध्ये सहभागी करीत आहे. मी श्री साईबाबा कन्या विद्यामंदीराचे उच्च माध्यमिक विभागाकडे शारीरीक शिक्षण विषयाचे अध्यापन कार्य करण्यास इच्छूक असून, त्यासाठी संस्थान प्रशासनाकडे यापूर्वीही अर्ज केलेला आहे.माझ्या अर्जाचा सहानुभूति पुर्वक विचार करुन मला कनिष्ठ महाविद्यालयाकडे शारीरीक शिक्षक म्हणून कार्यभार मिळावा ", अशी विनंती केलेली आहे.

उपरोक्त पत्रास अनुसरुन प्राचार्या,कन्या विद्यामंदीर यांनी दि.१९/०७/२००७ चे पत्रामध्ये श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडे सन २००७- ०८ मध्ये इ.११ वी व १२ वीच्या एकुण १० वर्ग तुकडया सुरु असून या करीता एक अर्धवेळ क्रीडा शिक्षकाचे पद निर्माण होत आहे.

श्री सुजय आ.बाबर, (बी.ए.एम.पी.एड.) हे जून-२००० पासून श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर, शिरडी या शाळेतील माध्यमिक विभागात पूर्णवेळ क्रीडा शिक्षक म्हणून कार्यरत आहे. श्री सुजय बाबर यांच्यासह या विषयासाठी सध्या आणखी २ क्रीडा शिक्षक ०१) श्रीमती मिरजकर जे.एस.(बी.ए.बी. पी.एड.), ०२) श्रीमती कुंदा सरोदे (बी.ए.एम.पी.एड.) क्रीडा विषयासाठी कार्यरत आहेत.

तरी श्री बाबर यांचेकडे कनिष्ठ महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षकासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक पात्रता आहे. श्री बाबर यांना मा.व्यवस्थापन मंडळाचे मान्यतेने कनिष्ठ महाविद्यालयाकडील क्रीडा विषयाचा कार्यभार देण्याबाबत निर्णय घेता येईल, अशी शिफारस केली आहे.

श्री सुजय आनंदराव बाबर यांची माहिती खालील प्रमाणे :-

०१) शैक्षणिक अर्हता :- बी.ए., बी.पी.एड., एम.पी.एड. ,

०२) नेमणूक :- दि. २१/०६/२०००. शिक्षणसेवक (क्रीडा) (कामावर हजर दि.२१/०६/२०००)

०३) वेतनश्रेणी :- (वेतनश्रेणी रुपये- ५५००-१७५-९०००)

०४) सध्याचे मुळ वेतन :- रुपये -६,३७५/-

प्राचार्य, कन्या विद्यामंदीर यांनी दि. १९/०७/२००७ रोजीचे टिपणीत कनिष्ठ महाविद्यालयात नव्याने निर्माण झालेल्या पदाबाबत जाहीरात देऊन पदे भरावयाची आहेत. त्यात शिक्षण सेवक (शारीरीक शिक्षण) १ पद अर्धवेळ दर्शविले असून,त्यासाठी शैक्षणिक पात्रता एम.ए.,बी.पी.एड., एम.पी.एड., (व्दितीय श्रेणी) अशी असून शासकीय नियमानुसार मासिक मानधन रुपये-२,५००/- देय आहे.तथापी ही बदली नसून पदोन्नती होते.कारण कनिष्ठ महाविद्यालयाकडे या पदाची वेतनश्रेणी रुपये- ७,२२५-२२५-११,०५० ही आहे.

तसेच प्राचार्या, कन्या विद्यामंदीर यांनी श्री राजेंद्र कोहोकडे, (इंग्लिश मिडीयम स्कुल) व श्री सुजय बाबर (कन्या विद्यामंदीर) या दोघांची कनिष्ठ महाविद्यालयाकडे बदली करणेबाबत शिफारस केली आहे.

कनिष्ठ महाविद्यालयाकडील रिक्त पदे भरणेकामी दि.०३.०८.२००८ रोजी मुलाखती झालेल्या असून त्यावेळी श्री.बाबर यांची निवड झालेली नसल्याने त्यांची नेमणूक कनिष्ठ महाविद्यालयाकडे करता येणार नाही, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

२३ <u>श्री राजेंद्र कोहकडे, क्रिडा शिक्षक यांचे ज्युनिअर कॉलेजकडे नेमणूक अर्जाबाबत</u>

उपरोक्त विषयास अनुसरुन श्री.राजेंद्र बाबुराव कोहोकडे, सहा.शिक्षक-क्रीडा यांनी त्यांचे दि.२६/०४/२००७ रोजीच्या अर्जात, "मी आपल्या श्रीसाईबाबा संस्थान संचलित शैक्षणिक संकुलातील श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये सन ३१ ऑगष्ट २००० पासून सहा.शिक्षक (क्रीडा) या पदावर कार्यरत आहे. संस्थानचे क्रीडा क्षेत्रात काम करीत असतांना आतापर्यत ५० ते ६० खेळाडु विभागीय व राज्य पातळीवर माझ्या मार्गदर्शनाखाली खेळवले आहे व १५ ते २० खेळाडु आखिल भारतीय (राष्ट्रीय) पातळीवर श्री साईबाबा संस्थानचे प्रतिनिधीत्व व नेतृत्व केलेले आहे. तसेच राष्ट्रीय पातळीवर सुवर्ण पदकही प्राप्त केलेले आहे.

आजपर्यत श्री साईबाबा संस्थानचे क्रीडा क्षेत्रात मी केलेल्या कामाचा अहवाल व आढावा आपण वेळोवेळी घेतलेला असून मला प्रत्येक वेळी प्रोत्साहीत केलेले आहे.सध्या श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडे शारीरिक शिक्षण या विषयाचा कार्यभार उपलब्ध झालेला आहे, असे समजते. सदर कार्यभार स्विकारणेकरीता लागणारी शैक्षणिक पात्रता माझ्याकडे असून हा कार्यभार मला दिल्यास (इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी) विद्यार्थी व विद्यार्थींना आंतरराष्ट्रीय पातळीवर क्रीडा क्षेत्रात नैपुण्य मिळवून देण्याचा मी प्रयत्न करीन. या अगोदर प्रवरा नगर येथील वरिष्ठ महाविद्यालयात ७ वर्षे केलेल्या सेवेचा मला अनुभव आहे.

तरी आजवर केलेल्या कामाचा अनुभव व माझी शैक्षणिक पात्रता लक्षात घेता माझी श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयात बदली करण्यात यावी ", असे नमुद केले आहे.

याबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०१/१९२८/२००७ दि.२३/०७/२००७ चे पत्रान्वये शालेय सद्यपरिस्थिती, आपले विद्यालयाच्या आकृतिबंधात शाळा संहितानुसार सहा.शिक्षक क्रीडा यापुर्वीची किती पदे आहेत. त्यापैकी किती भरली आहे व किती रिक्त आहे.भरलेले सहा.शिक्षक-क्रीडा कोणत्या वर्गातील विद्यार्थांना शिकवितात. श्री राजेंद्र कोहोकडे यांची इंग्लिश मिडीयमकडून कनिष्ठ महाविद्यालयाकडे बदली करणे योग्य आहे काय. बदली केल्यास त्याची वेतनश्रेणी काय होईल. त्यांची शैक्षणिक पात्रता आहे काय. या पदासाठी अगोदर तुमच्या मार्फत कोणी अर्ज केले आहे काय? याबाबींस अनुसरुन वस्तुनिष्ठ गोपनीय अहवाल मागविण्यात आला होता.

त्यास अनुसरुन, जा.क्र.एसएसएस/वशी-इंग्लिश मेडिअम/१०८/२००७ दि.२७/०७/२००७ रोजीचे पत्र इकडेस प्राप्त झाले असून,त्यात श्री राजेंद्र बाबुराव कोहोकडे ,क्रीडा शिक्षक हे सन २००० पासून श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकडे सहा.शिक्षक पदावर कार्यरत आहेत. त्यांची शैक्षणिक पात्रता बी.पी.ई., एम.पी.एड. (एन.आय.एस.) अशी असून ते शारीरीक शिक्षण विषयात उच्च विद्या विभुषित आहेत.तसेच सन १९९३ ते २००० पर्यंत प्रवरानगर येथील वरिष्ठ महाविद्यालयात त्यांना ७ वर्ष

अध्यापनाचा अनुभव आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आतापर्यत श्री साईबाबा संस्थान शैक्षणिक संकुलाचे अनेक खेळाडूंनी राज्य व राष्ट्रीय पातळीवर नेत्रदिपक व उल्लेखिय कामगिरी केलेली आहे व देशपातळीवर क्रीडा क्षेत्रात श्री साईबाबा संस्थानचा नावलौकीक वाढविला आहे. तसेच आखिल भारतीय पातळीवर खेळाडुंनी सुवर्णपदक , कास्यपदक पटकाविले आहे. तसेच विविध क्रीडा स्पर्धेत १३४ पुरस्कार प्राप्त केलेले आहेत. सध्या श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकडे श्री राजेंद्र कोहोकडे व श्री शेळके के.आर. हे दोन क्रीडा-शिक्षक कार्यरत असून श्री राजेंद्र कोहोकडे यांचे नियुक्ती अगोदर श्री तांबोळी अे.अे. यांचेकडे क्रीडा विषयाचा कार्यभार देण्यात आलेला होता.

सध्या श्री तांबोळी यांचेकडे इयत्ता ५वी, ६ वी गणित व इयत्ता ९ वी व इयत्ता १० वी बीजगणित या विषयाचा कार्यभार देणेत आलेला आहे. श्री शेळके यांची माहे डिसेंबर-२००६ मध्ये वर्ग-४ कर्मचारी म्हणून नेमणुक झालेली असून ते सध्या क्रीडा मदतनिस म्हणून काम पहात आहेत. श्री राजेंद्र कोहोकडे यांची कनिष्ठ महाविद्यालयाकडे बदली झाल्यास त्यांचा कार्यभार श्री शेळके के.आर. यांचेकडे देता येईल.त्यामुळे क्रीडा विषयाचा कार्यभार पाहण्यास अडचण येणार नाही,असे नमुद केले आहे.

तसेच या प्रकरणी प्राचार्या,कन्या विद्यामंदीर यांचे दि.२४/०७/२००७ रोजीचे पत्र इकडेस प्राप्त झाले असून, त्यात श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडे सन २००७-०८ मध्ये इयत्ता ११ वी व १२ वीच्या एकुण १० वर्ग तुकडया सुरु असुन याकरीता एक अर्धवेळ क्रीडा शिक्षकाचे पद निर्माण होत आहे.

श्री साईबाबा कन्या विद्यामंदीर या शाळेतील माध्यमिक विभागात पुर्णवेळ ३ क्रीडा शिक्षक आहेत.यापैकी (१) श्री सुजय आनंदराव बाबर (बी.ए.एम.पी.एड.) ,(२) श्रीमती जे.एस.मिरजकर (बी.ए.बी.पी.एड.) हे दोघे रुपये- ५५००-१७५-९००० या वेतनश्रेणीत असून (३) श्रीमती कुंती सरोदे (बी.ए.एम.पी.एड.) या रु.- २,०००/- मानधनावर क्रीडा विषयासाठी कार्यरत आहेत. सदरचे शिक्षक इ.५ वी ते १० वी या वर्गातील विद्यार्थ्यांना अध्यापन करतात.

श्री राजेंद्र कोहोकडे सहा.शिक्षक (क्रीडा) श्री साईबाब इंग्लिश मेडिअम स्कुल यांची कनिष्ठ महाविद्यालयाकडे बदली करणेबाबत मा.व्यवस्थापन मंडळाचे मान्यतेने योग्य तो निर्णय घेता येईल. श्री कोहोकडे हे शारीरीक शिक्षण विषयातील पदव्युत्तर पदवीधारक असून त्यांची शैक्षणिक पात्रता बी.एस्सी. बी.पी.ई., एम.पी.एड., (एन.आय.एस.) व्हॉलीबॉल, अशी आहे.

कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांची वेतनश्रेणी रुपये- ७,२२५-२२५-११०५० अशी आहे. श्री कोहोकडे सध्या रुपये- ५५००-१७५-९००० या वेतनश्रेणीत वेतन घेत आहेत.

सध्या कनिष्ठ महाविद्यालयाकडे मा.व्यवस्थापन मंडळाने शिक्षण सेवक नेमणुकीचे धोरण ठरविले आहे.त्यानुसार " या पदावर नव्याने शिक्षण सेवकाची नेमणुक करावी लागेल " किंवा मा.व्यवस्थापन मंडळाने " माध्यमिक विभागाकडील शिक्षकाची कनिष्ठ महाविद्यालयाकडे " बदली करण्याचा निर्णय घेतल्यास "" बदली झाल्यानंतर कनिष्ठ महाविद्यालयाकडील शिक्षक पदाच्या वेतनश्रेणीची किमान ३ वर्ष मागणी करणार नाही", अशा आशयाचे प्रतिज्ञापत्र लिहून घेता येईल व माध्यमिक विभागाकडील शिक्षकाची कनिष्ठ महाविद्यालयाकडे बदली करता येईल. या परिस्थितीत असा मार्ग काढता येईल. अशा पध्दतीने श्री कोहोकडे यांची कनिष्ठ महाविद्यालयाकडे फक्त बदली करता येईल, असे नमुद केले आहे.

श्री राजेंद्र बाबुराव कोहोकडे यांची माहिती खालील प्रमाणे :-

०१) शैक्षणिक अर्हता :- बी.एस्सी., (फिजीकल), बी.पी.ई.,एम.पी.एड. ,(एन.आय.एस.) व्हॉलीबॉल,

०२) नेमणूक :- दिनांक ३१/०८/२०००. शिक्षणसेवक (क्रीडा) (कामावर हजर दि.३१/०८/२०००)

०३) वेतनश्रेणी :- (वेतनश्रेणी रुपये- ५५००-१७५-९०००)

०४) सध्याचे मुळ वेतन :- रुपये -६,३७५/-

याबाबत खालील बाबींवर विचार करणे गरजेचे आहे.

अ) प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कुल यांनी श्री कोहोकडे यांची बदली कनिष्ठ महाविद्यालयाकडे करता येईल व त्यांचा कार्यभार श्री शेळके (वर्ग -४ कर्मचारी) नव्याने दरमहा रुपये- २,०००/- वर नेमणूक झालेल्या कर्मचाऱ्याकडे देता येईल, असे म्हटले आहे.अशा प्रकारे वर्ग-४ चे पदावरील कर्मचाऱ्यांकडे पदभार देता येणार नाही. कारण त्यांना रुपये- ५५००-१७५-९००० ही वेतनश्रेणी द्यावी लागेल.सध्या श्री कोहोकडे यांची वेतनश्रेणी रुपये- ५५००-१७५-९००० अशी असून कनिष्ठ महाविद्यालयाकडे रुपये- ७२२५-२२५-११०५० अशी वेतनश्रेणी आहे.ते त्या वेतनश्रेणीची मागणी करतील, म्हणजे ही बदली नसून पदोन्नती होते.

ब) प्राचार्या, कन्या विद्यामंदीर यांनी श्री कोहोकडे यांची बदली कनिष्ठ महाविद्यालयाकडे करता येईल. पंरतू त्या पदाची ३ वर्षे वेतनश्रेणी मागता येणार नाही,असे नमूद केले आहे. तथापी नविन शिक्षण सेवक भरतीचे जाहीरातीमध्ये हे पद अर्धवेळ असून त्यामध्ये मासिक मानधन सर्व मिळून रु.-२,५००/- इतके दर्शविले आहे.

तसेच प्राचार्या, कन्या विद्यामंदीर यांनी श्री कोहोकडे, (इंग्लिश मिडीयम स्कुल) व श्री सुजय बाबर (कन्या विद्यामंदीर) या दोघांची कनिष्ठ महाविद्यालयाकडे बदली करणेबाबत शिफारस केली केली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.०३.०८.२००८ रोजी झालेल्या कनिष्ठ महाविद्यालयाकडील रिक्त पदांच्या मुलाखतीमध्ये श्री.सुजय बाबर यांची निवड झालेली नाही. श्री.कोहकडे व श्री. कैलास शेळके यांची निवड करण्यात आलेली आहे. श्री.कोहकडे यांनी सदरचे नेमणूक स्वीकारणेस असमर्थता कळविल्याने श्री.कैलास शेळके यांना नियुक्ती द्यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

२४. <u>वरिष्ठ लिपीक '' हे पदनाम मिळणेबाबत श्री.अण्णासाहेब कारभारी तुरकणे व इतर २० लिपिक-टंकलेखक यांचे अर्जाबाबत</u>

श्री.आण्णासाहेब कारभारी तुरकणे, व इतर २० लिपीक टंकलेखक, कर्मचारी यांनी दि. ०८/०९/२००६ रोजी अर्ज करुन, त्यात - आम्ही खालील सही करणारे कर्मचारी (लिपीक टंकलेखक) विनंती करतो की, आम्ही लिपीक टंकलेखक या पदावर दिनांक ०१/०६/१९८९ पासून काम करीत आहोत. सेवा अंतर्गत आश्वासित प्रगती योजनेनुसार आम्हांला १२ वर्षानतंर वरिष्ठ वेतनश्रेणी रुपये- ४०००-१००-६००० जा.नं.एसएसएस/वशी-०१/२०८५/२००३ दिनांक २८/०८/२००३ अन्वये दिनांक ०८/०१/२००२ पासून मिळालेली असून सदर वेतनश्रेणीवर आम्ही लिपीक टंकेलखक या पदावर काम करीत आहोत.

शासन निर्णयानुसार आश्वासित प्रगती योजने अंतर्गत देण्यात आलेल्या नियम व अट क्र.०३ मध्ये "या योजने अंतर्गत पदोन्नतीची वेतनश्रेणी मिळाली तरी कर्मचाऱ्यांचे नांव कनिष्ठ संवर्गाचे (मुळ) सेवा जेष्ठता सुचीतच राहील व सेवा प्रवेश नियमावलीतील तरतुदीनुसार नजिकच्या वरिष्ठ वेतनश्रेणीतील रिक्त पदावर उपलब्ध पदोन्नतीसाठी त्यांचा विचार करण्यात येईल, असे आहे.

आता संस्थानमध्ये "वरिष्ठ लिपीक" हुद्याची अनेक पदे उपलब्ध आहेत, असे समजते.तरी वरिल आश्वासित सेवा योजने अंतर्गत उपरोक्त नियमानुसार आम्हाला रिक्त असलेले वरिष्ठ लिपीक या हुद्याचे पदनाम मिळावे,अशी विनंती केली आहे.

सध्या श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी मार्फत कर्मचारी आकृतिबंध मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मंजूर होऊन सदरचे आकृतिबंधाची प्रत मान्यतेसाठी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेली आहे. त्यात "वरिष्ठ लिपीक" या हुद्याची एकुण ८५ पदे असून सध्या ४६ पदे भरलेली असून ३९ पदे रिक्त आहेत.

तरी उपरोक्त आश्वासित सेवा योजने अंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मिळालेले लिपीक टंकलेखक यांना त्यांचे सेवा जेष्ठतेनुसार तसेच शासन निर्णयातील नियमावलीनुसार रिक्त असलेल्या ३९ वरिष्ठ लिपीक या पदावर खालील कर्मचाऱ्यांना " लिपीक टंकलेखक " ऐवजी "वरिष्ठ लिपीक " असे पदनाम देऊन पदोन्नती देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

अ.नं.	कर्मचाऱ्याचे नांव	विभाग
०१	श्री.किशोर केशव क्षीरसागर	मुंबई कार्यालय
०२	श्री अण्णासाहेब कारभारी तुरकणे	मिटींग विभाग
०३	श्री रमेश भानुदास जोशी	खरेदी विभाग
०४	श्री भगवान नामदेव झुंरगे	औद्योगिक प्रशिक्षण संस्था
०५	श्री संपत ज्ञानेश्वर शेळके	चौकशी कार्यालय
०६	श्री मोहन लक्ष्मण कोते	मंदीर विभाग
०७	श्री सुनिल रामदास परदेशी	लेखाशाखा
०८	श्री बाबुराव गणपत कोते	कॅन्टीन
०९	श्री दत्तात्रय चांगदेव शिंदे	श्री साईनाथ रुग्णालय
१०	श्री बाबासाहेब सोपान कोते	प्र.अ.स्विय सहाय्यक
११	श्री भाऊसाहेब पोपट पठारे	प्रसादालय विभाग
१२	श्री मुकूंद बाबुराव वाक्चौरे	लेखाशाखा
१३	श्री अशोक चंद्रभान कोते	पाणी पुरवठा
१४	श्री अशोक संभू पवार	प्रकाशने विभाग
१५	श्री राजाराम पांडुरंग थेटे	प्रशासन शाखा
१६	श्री चंद्रकांत देवराम डांगे	प्रकाशने विभाग
१७	श्री रमेश पाराजी गोंदकर	लेखाशाखा
१८	श्री गोरख तुकाराम परदेशी	प्रसादालय विभाग
१९	श्री नवनाथ भैरु चौधरी	भांडार विभाग
२०	श्री विलास पंढरीनाथ गोंदकर	बगीचा विभाग
२१	श्री विलास आप्पा मते	प्रसादालय विभाग

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचा नवीन सुधारित कर्मचारी आकृतीबंध शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे. सदरहू आकृतीबंधाचे मान्यतेनंतर वरिष्ठ लिपिक या

पदाची शैक्षणिक पात्रता, अर्हता तपासून व या पदासाठी आवश्यक मराठी व इंग्रजी संगणक ज्ञानाची व लेखी परिक्षा घेऊन पदोन्नती देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

२५ <u>विशेष वेतनाचा लाभ मिळणे श्रीरमेश नारायण चौधरी, वरिष्ठ लिपिक यांचे अर्जाबाबत</u>

श्री रमेश नारायण चौधरी, वरीष्ठ लिपीक, माहिती व तंत्रज्ञान विभाग, व श्री श्रीकांत भोसले, लिपीक-टंकलेखक यांनी दिनांक १९/८/२००४ रोजी अर्ज सादर करुन त्यात " ते संस्थानचे वेबसाईटवर श्री साईबाबा संस्थान विषयक व इतर कार्यक्रमांची माहिती उपलब्ध करुन देत असल्याने त्यांना विशेष वेतनाचा लाभ मिळावा अशी विनंती केली होती.

याकामी आस्थापना विभागाने दि.११/०६/२००५ रोजी सविस्तर टिपणी ठेवली असता त्यावर झ ालेल्या निर्देशानुसार इकडील जा.नं.वशी-१-१४२४/२००५ दि.२५/०६/२००५ अन्वये सर्वश्री चौधरी व भोसले या दोघांनांही विशेष वेतन दयावयाचे किंवा कसे ? विचार करावयाचा झाल्यास त्यांना नेमून दिलेली मुळ कामे कोणती ? व विशेष वेतन दयावयाच्या कारणासाठीचे काम कोणते आहे व सदरहू कर्मचा-यांना कार्यभार भत्ता / विशेष वेतन कधी पासुन व दरमहा किती दयावे ? या कारणांची माहिती इकडेस कळविणेबाबत आय.टी.विभाग प्रमुख यांना कळविण्यात आले होते.

आय.टी.विभाग प्रमुख यांनी उपरोक्त कामी दिनांक २४/११/२००५ रोजी अहवाल सादर केलेला आहे. त्यातील आवश्यक ठराविक माहिती खालील प्रमाणे.

श्री श्रीकांत भोसले हे लेखाशाखेत कामकाज करीत आहेत.

श्री रमेश चौधरी हे आय.टी. विभागात वेबसाईट अपलोडींगची सर्व कामे करीत आहेत.

त्यात :- (अ) प्रशासकिय कामकाज :- (१) वेबसाईट होस्टींग बाबत

(२) आय.सी.डी.एन.लाईन व रिलायन्स मोबाईल बाबत (३) माहिती संकलन करणे

(ब) वेबसाईटवर साईलिला, संस्थान उत्सव कार्यक्रम माहिती व फोटो, ई मेल, संस्थान प्रकाशने, भक्तांनी सुचविलेले बदल वेबसाईट मध्ये करणे इ. विषयक कामे करणे.

उपरोक्त कामे तांत्रीक स्वरुपाची असून संस्थानची मराठी वेबसाईटची माहिती संकलीत करुन अपलोड केली आहे. तसचे वेबसाईटवर वेळोवेळी बदल केल्यामुळे साईभक्तांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. या तांत्रीक स्वरुपाच्या कामा बद्दल श्री रमेश चौधरी यांना संस्थानचे प्रचलित विशेष वेतन जानेवारी २००४ (प्रशिक्षण पुर्ण केले पासून) देणेस हरकत नाही असे अभिप्राय अतिरीक्त लेखाधिकारी तथा माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख यांनी दिले असून त्यावर संबधित प्रशासकिय अधिकारी यांची सही नाही.

उपरोक्त कर्मचा-यांबाबत सर्वसाधारण माहिती खालील प्रमाणे :-

संस्थानची अद्ययावत वेबसाईट दि. ३/१०/२००३ रोजी औपचारीकपणे प्रदर्शीत झाली आहे. या वेबसाईट संबधित कामे शिरडी येथून होणेसाठी चार कर्मचा-यांना माहे डिसेंबर २००२ , जानेवारी २००३ या कालावधीत प्राथमिक स्वरुपाचे प्रशिक्षणासाठी कोपरगांव येथे पाठविण्यात आले होते त्यापैकी प्रत्येकी दोघांना पुढील अद्ययावत प्रशिक्षणासाठी पुणे येथे पाठविण्याचे नियोजन करुन त्या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी सुमारे रु.४०,०००/- मात्र चे खर्चास मा.व्य.मं.ची सभा दि. २१-२३/११/२००३ रोजी निर्णय क्रंमाक ५३३ अ (२) अन्वये ठराव पारीत झालेला असून या कामी श्री श्रीकांत भोसले व श्री रमेश चौधरी यांना संस्थान खर्चाने प्रशिक्षणासाठी पाठविण्यात आले होते.

या कामी मा.व्य.मं.निर्णय क्रं.५३३ दि.२१-२३/११/२००३ हा ठराव खालील प्रमाणे पारीत झालेला आहे. " या अद्ययावत संगणक प्रशिक्षणाचा पुर्ण खर्च संस्थान मार्फत देण्यात येत आहे. संबधित संगणकिय प्रशिक्षण पुर्ण केल्या नंतर, प्रशिक्षणाचे कालावधीत सदर अधिका-यांनी/कर्मचा-यांनी घेतलेल्या प्रशिक्षणाच्या अनुशंगाने करावयाचे कामकाज अत्यंत जबाबदारीने व स्वंतत्रपणे करावे लागणार आहे. यामध्ये कुठल्याही प्रकारची सबब किंवा टाळाटाळ करता येणार नाही. प्रशिक्षण पुर्ण केल्या नंतर प्रत्यक्ष (अधिक जबाबदारीचे असले तरीही) कामकाज करताना त्यांना कोणत्याही प्रकारचा जादा मोबदला उच्च वेतनश्रेणी/वेतनवाढ किंवा आर्थिक बाबीविषयीचा लाभ देण्यात येणार नाही. व तशी मागणीही करता येणार नाही.

मात्र संस्थानचे प्रचलित कार्यपध्दतीनुसार अतिरीक्त जबाबदारीसाठी मानधन देण्यात येईल.याची नोंद घ्यावी. संबधीत अधिकारी/कर्मचारी यांनी प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर, लागलीच त्याबाबतचा सविस्तर अहवाल, प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबाबतच्या मूळ प्रमाणपत्रासह कार्यालयाकडे सादर करावा. सदर प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण न केल्यास अथवा प्रशिक्षण संस्थेकडून तसा प्रतिकुल अहवाल मिळाल्यास, किंवा प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर , तत्संबधीत जबाबदारीचे काम करण्यास टाळाटाळ केल्यास, नकार दिल्यास संस्थानने केलेला प्रशिक्षण खर्च संबधीत अधिकारी/कर्मचारी यांचे कडून वसुल केला जाईल यांची नोंद घ्यावी ". असा ठराव पारीत झालेला आहे. त्यास अनुसरुन जा.नं. एसएसएस-वशी-आयटी-६०३/०४ दिनांक ११/०२/२००४ ने खालील आदेश आलेले आहेत.

" या अद्ययावत संगणक प्रशिक्षणाचा पुर्ण खर्च संस्थान मार्फत देण्यात येत आहे. संबधित संगणकिय प्रशिक्षण पुर्ण केल्या नंतर, प्रशिक्षणाचे कालावधीत सदर अधिका-यांनी/कर्मचा-यांनी घेतलेल्या प्रशिक्षणाच्या

अनुशंगाने करावयाचे कामकाज अत्यंत जबाबदारीने व स्वंतत्रपणे करावे लागणार आहे. या मध्ये कुठल्याही प्रकारची सबब किंवा टाळाटाळ करता येणार नाही. प्रशिक्षण पुर्ण केल्या नंतर प्रत्यक्ष (अधिक जबाबदारीचे असले तरीही) कामकाज करताना त्यांना कोणत्याही प्रकारचा जादा मोबदला उच्च वेतनश्रेणी/वेतनवाढ किंवा आर्थिक बाबीविषयीचा लाभ देण्यात येणार नाही. व तशी मागणीही करता येणार नाही. मात्र संस्थानचे प्रचलित कार्यपध्दतीनुसार अतिरीक्त जबाबदारीसाठी मानधन देण्यात येईल ",त्यानुसार संबंधीत कर्मचा-यांना त्याच्या प्रती देण्यात आलेल्या आहेत.

तथापी मा.विश्वस्त,श्री वाबळे साहेब यांनी दिनांक १०/०८/२००७ रोजी शिफारस पत्र देऊन, त्यात श्री रमेश चौधरी हे संस्थानचे माहिती व तंत्रज्ञान विभागात लिपीक पदावर कार्यरत आहे.श्री चौधरी हे संस्थानचे संकेतस्थाळाचे (वेबसाईट) संपूर्ण काम चोख व विना तक्रार करत आहेत.संकेतस्थळाचे काम हे तांत्रिक स्वरुपाचे असून आजतागायत त्यांनी १९२३ पासून सर्व साईलिला मासिके व भाषेतील श्रीसाईसतच्चरीत संकेत स्थळावर डाऊनलोड करणेबाबतची कार्यवाही केलेली आहे.त्या अनुषंगाने श्री चौधरी यांनी तांत्रिक कामाचा प्रतिमहा रुपये- ३००/- जादा मेहनताना मिळणेबाबत विनंती केलेली असून,श्री चौधरी हे करत असलेले कामे विचारात घेता,त्यांना प्रतिमहा रुपये- ३००/- जादा मेहनताना देणेबाबतची शिफारस केलेली आहे.

तथापी मा.विश्वस्त, श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे साहेब यांनी केलेली शिफारस विचारात घेऊन श्री रमेश चौधरी यांना उपरोक्त करत असलेल्या कामाबाबत रुपये ३००/- मेहनताना देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

२६. प्रसिध्दी अधिकारी या पदावर पदोन्नती मिळणेबाबत.

श्री राजेंद्र यशवंतराव कोते, लिपीक टंकलेखक,जनसंपर्क कार्यालय यांनी दि.२१/०७/२००७ रोजी अर्ज सादर करुन त्यात, मी एका हाताने अपंग असून बी.ए. (पदवी) वृत्तविद्या व जनसंज्ञापन (पदविका) व सी.सी.ए.शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या आहेत.मी १९९३ पासून औद्योगिक प्रशिक्षण संस्था व प्रशासन शाखेत लिपीक टंकलेखक पदाची जबाबदारी विनातक्रार व यशस्वीरित्या पार पाडलेली आहे.मी दि.०३/०५/२००३ पासून जनसंपर्क कार्यालयाकडे बदली नेमणूकीने हजर झालेलो आहे.तेव्हापासून मी लिपीक टंकलेखक पदाच्या कामांबरोबरच संस्थान आयोजीत तीन उत्सव, संस्थानच्या विविध विभागामार्फत आयोजित कार्यक्रम आदींच्या बातम्या तयार करुन व संगणकावर एका हाताने टंकलिखीत करुन महाराष्ट्र राज्यासह इतर राज्यातील प्रमुख वर्तमानपत्रामध्ये सत्वर प्रसिध्दीस देण्याचे काम मा.जनसंपर्क अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली करत आहे.तसेच या व्यतीरिक्त संस्थानच्या विविध विभागांच्या जाहीराती प्रसिध्द करणे.अतिमहत्वाच्या व्यक्तीच्या शिर्डी भेटीची तयारी करणे व भेटीनंतर सदर मान्यवरांचे भेटीबाबतचे छायाचित्रे वर्तमानपत्रात लागलीच प्रसिध्दीस देणे,संस्थानच्या विविध उपक्रमांची माहिती संकलित करुन व संस्थान आयोजीत उत्सवांचे इतिवृत्त तयार करुन छायाचित्रांसह संस्थानच्या साईलिला या अधिकृत द्वैमासिकात प्रसिध्द करणेसाठी साईलिलांचे संपादकांकडे पाठविणे आदी कामे मी करत आहे.याच बरोबर संस्थान विषयी वर्तमानपत्रात आलेल्या बातम्यांचा खुलासा तयार करुन तो मा.जनसंपर्क अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली व मा.कार्यकारी अधिकारी सो.यांच्या मान्यतेने सत्वर करण्याचे कामही मी करीत आहे.तसेच संस्थानच्या वतीने आयोजीत करण्यात येत असलेल्या सर्वधर्मीय सामुदायीक विवाह सोहळयाचे प्रसिध्दीचे कामही मी विनातक्रार करत आहे.

तरी माझी शैक्षणिक अर्हता,अपंगत्व व मी उपरोक्त प्रमाणे करीत असलेली प्रसिध्दीची कामे आदी बाबी विचारात घेवून मला लिपीक टंकलेखक या पदावरुन प्रसिध्दी अधिकारी या पदावर पदोन्नती मिळणेस आणि लिपीक टंकलेखक या पदांच्या रु.३०५०-७५-३९५०-८०-४५९० या वेतनश्रेणी ऐवजी शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मुंबई यांनी माहिती सहाय्यक या पदासाठी निर्धारीत केलेली रु.५५००-१७५-९००० ही वेतनश्रेणी मिळावी" अशी विनंती केलेली आहे.

उपरोक्त बाबत श्री राजेंद्र यशवंतराव कोते यांची वैयक्तीक माहिती खालील प्रमाणे

०१)कर्मचाऱ्यांचे नांव	:- श्री राजेंद्र यशवंतराव कोते
०२)शैक्षणिक अर्हता	:- बी.ए.,सी.सी.ए.,वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन (पदविका)
०३)सेवेत दाखल तारीख	:- १०/०९/१९९३
०४)दाखल होतानांचे पदनांम	:- लिपीक टंकलेखक
०५)संस्थानमधील सेवेचा कालावधी	:- १४ वर्षे ११ महिने
०६)सध्याची वेतनश्रेणी	:- ३०५०-७५-३९५०-८०-४५९०

यावर सविस्तर चर्चा होऊन, नवीन आकृतीबंधात प्रसिध्दी अधिकारी हे पद समाविष्ट असून आकृतीबंधास अद्याप शासनाची मान्यता मिळालेली नाही. त्याऐवजी सहाय्यक प्रसिध्दी अधिकारी हे पद निर्माण करुन त्यास शासनाची मान्यता घेण्यात यावी. सदर पदावर श्री राजेंद्र यशवंत कोते यांचेकडे आवश्यक पात्रता असल्याने त्यांना ४०००-६००० या वेतनश्रेणीत पदोन्नती देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

२७. <u>कनिष्ठ महाविद्यालयाची वेतनश्रेणी मिळणेबाबत सौ.वैशाली नंदकुमार देशमुख, सहा. शिक्षिका, कन्या विद्यामंदीर यांचे अर्जाबाबत.</u>

सौ.वैशाली नंदकिशोर देशमुख सहा.शिक्षिका यांना उच्च माध्यमिककडे पूर्णवेळ नेमणूक देणेबाबत प्राचार्या श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय यांनी दि.०४/०८/२००७ रोजी टिपणी सादर करुन त्यात जून २००० मध्ये श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर या शाळेला जोडूनच इ.११ वी विज्ञान शाखेसह श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाची सूरुवात झाली . गणित विषयासाठी उच्च माध्यमिक विभागात पूर्णवेळ पदाचा कार्यभार होणार नसल्याने या वर्गाचे अध्यापन कार्य गृहित धरुन व रु.२५०/- विशेष वेतन देऊन माध्यमिक विभागात रु.५५००-१७५-९००० या वेतनश्रेणीत सौ.वैशाली देशमुख यांना पूर्णवेळ नेमणूक देण्यात आली.

सन २००५-०६ मध्ये श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयात इ.११ वी कला आणि वाणिज्य शाखांचे वर्ग सुरु करण्यात आले . सन २००६-०७ मध्ये पर्यावरण हा विषय इ.११ वी साठी नव्याने सुरु झाला. ज्याचेकडे माध्यमिकचा कार्यभार आहे त्यांना पर्यावरण या विषयाचा कार्यभार देण्यात यावा असे मा.शिक्षण उपसंचालक, पुणे यांचे निर्देश आहेत . त्यानुसार तसेच मा.उपाध्यक्ष महोदय यांचे पत्रात सूचित केल्या प्रमाणे मा.कार्यकारी अधिकारी यांचेशी चर्चा करुन त्यांचे तोंडी आदेशाने सौ. देशमुख (एम.एस्सी.बी.एड.) यांनी इ.११ वी चा पर्यावरण या विषयाचा कार्यभार देण्यात आला . सदरचा इ.११ वी चा पर्यावरण विषयाचा कार्यभार सौ.देशमुख यांना दिल्याने पूर्णवेळ पदासाठी आवश्यक असलेला कार्यभार सर २००६-०७ मध्ये उपलब्ध झाला.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांचे परिपत्रक क्र.रा.मं./पापुई /४२७३/दि.१५ जून २००७ नुसार सन २००७-०८ पासून इ.११ वी व १२ वी च्या गणित विषयामध्ये २० टक्के गुणांचे प्रात्यक्षिक समाविष्ट करण्यात आले. यामुळे गणित विषयाची ११ वी १२ वी च्या वर्गातीन ४० विद्यार्थ्याच्या गटासाठी २ तासिका प्रात्यक्षिकासाठी मंजूर करण्यात आल्या. त्यामुळे गणितासाठी पुढील प्रमाणे कार्यभार उपलब्ध होत आहे.

अ.नं.	इ.११ वी (१२४ विद्यार्थी)			इ.१२ वी (५५ विद्यार्थी)			११ वी व १२ वी एकूण तासिका	एकूण घडयाळी तास
०१	सैध्दांतिक (तासिका)	प्रात्यक्षिक (४० च्या ३ गटा साठी तासिका)	११ वी एकूण तासिका	सैध्दांतिक (तासिका)	प्रात्यक्षिक (४० च्या १ गटा साठी तासिका)	१२ वी एकूण तासिका		
	०८	**०६**	**१४**	**८**	**२**	**१०**	**२४**	**१६.००**

वरील तक्त्यानुसार गणित विषयासाठी पूर्णवेळ कार्यभार निर्माण होत आहे.

इ.११ वी व १२ वी च्या वर्गासाठी सौ.वैशाली देशमुख (M.sc Maths,B.Ed) हया सन २०००-०१ पासून गणित या विषयाचे अध्यापन करीत आहे. त्याचे काम समाधानकारक असून त्यांना गणित विषयाचा पूर्णवेळ कार्यभार देता येईल . असे नमूद केलेले आहे.

मुख्याध्यापिका,श्रीसाईबाबा कनिष्ठ महाविद्यालय,शिर्डी यांचे अभिप्राय व स्कूल कोड नुसार सौ.वैशाली नंदकिशोर देशमुख सहा.शिक्षिका (माध्यमिक) यांना पुर्णवेळ उच्च महाविद्यालयाकडे नेमणूक देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सौ.वैशाली देशमुख यांची नेमणूक माध्यमिक विभागाकडे असली तरी त्या कनिष्ठ महाविद्यालयाकडे पूर्ण वेळ काम करीत आहेत. त्यांना कनिष्ठ महाविद्यालयाकडे पूर्णवेळ पदभार उपलब्ध असून त्यांचेकडे आवश्यक शैक्षणिक पात्रताही आहे. सबब कनिष्ठ महाविद्यालयाकडे नेमणूक देऊन त्यांना दिनांक १५.६.२००७ पासून वेतनश्रेणी देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

२८. अनुकंपा तत्वावर सेवेत घेणेबाबतचे कु.वैशाली विलास कोते यांचे अर्जाबाबत.

उपरोक्त विषयाबाबत व्यवस्थापन समितीचे दिनांक २४.०५.२००८ चे सभेत निर्णय क्र.५५८ पारित झालेला असल्याने सदरहू विषय मागे घेण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

२९. <u>कनिष्ठ महाविद्यालयात उपप्राचार्य पदी नेमणूक होणेबाबत..</u>

श्री विकास महादेव शिवगजे, सहा शिक्षक यांनी दि.२१/०६/२००७ रोजी अर्ज सादर करुन त्यात, कनिष्ठ महाविद्यालयात मी जेष्ठतम (Senior Most) असल्याने, सेवाजेष्ठतेनुसार माझी कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्य पदी नेमणूक होणेबाबत विनंती केलेली आहे.त्यास अनुसरुन इकडील जा.नं.एसएसएस/वशी-०१/१८७३/ २००७ दि.१८/०७/२००७ रोजी प्राचार्या,कन्या विद्या मंदिर यांना पत्र

देवून त्यात,उपप्राचार्य पदाबाबत सविस्तर माहिती त्वरीत सादर करुन,सदरचे पद स्कुल कोड प्रमाणे मान्य आहे काय,असल्यास शैक्षणिक पात्रता,वेतनश्रेणी,अनुभव,तसेच सदर पद पदोन्नती / थेट भरतीने भरावयाचे याबाबत माहिती मागविण्यात आलेली आहे.

त्यानुसार प्राचार्या कन्या विद्या मंदिर यांनी दि.३०/०७/२००७ रोजी टिपणी सादर करुन त्यात,"सन.२००७-२००८ मध्ये कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता ११ वी आणि १२ वीच्या १० वर्ग तुकडया झालेल्या आहेत.कनिष्ठ महाविद्यालयात ८ वर्ग तुकडयांसाठी उपप्राचार्य एक पद निर्माण होते.श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयात १० वर्ग तुकडया असल्याने उपप्राचार्य पदाची वेतनश्रेणी आणि कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांची वेतनश्रेणी रु.७२२५-२२५-११०५० एकच (समान) आहे.

सदरचे पद भरण्याविषयी मा.शिक्षण उपसंचालक,पुणे यांचे कार्यालयाशी चर्चा केली असता,त्या संदर्भात पुढील माहिती प्राप्त झाली.

०१. कनिष्ठ महाविद्यालयात ०८ वर्ग तुकडयांसाठी उपप्रार्यांचे एक पद निर्माण होते.

०२. सदरचे पद कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांमधून सेवाजेष्ठतेनुसार भरले जाते.

०३. सदरच्या पदासाठी कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांची सेवाजेष्ठता व कार्यक्षमता विचारात घेतली जाते.

०४. कनिष्ठ महाविद्यालयातील उपप्राचार्य पद सेवाजेष्ठतेने भरले जात असल्याने या पदासाठी अध्यापन अनुभवाची अट नाही.

कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या रु.७२२५-२२५-११०५० या वेतनश्रेणीतील सेवाजेष्ठता सूचीनुसार श्री विकास महादेव शिवगजे (M.Sc.(Physics,First Class) M.Ed.) हे कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या सेवा जेष्ठता यादीतील क्रमांक ०१ वर (जेष्ठतम Senior Most) आहेत.श्री शिवगजे यांना एकूण १४ वर्ष अध्यापनाचा अनुभव आहे.

श्री शिवगजे दि.०१ सप्टेंबर १९९३ पासून संस्थान सेवेत सहाय्यक शिक्षक म्हणून कार्यरत असून श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय,शिर्डी या संस्थान संचलीत कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी च्या वर्गास भौतीक शास्त्र,विषयाचे अध्यापन करीत आहे.त्यांचे काम समाधानकारक असून त्यांच्या अध्यापन कार्या व्यतिरिक्त संस्थानच्या इतर उपक्रमात त्यांचा सक्रिय सहभाग नेहमीच असतो तसेच वरिष्ठांनी सोपविलेली सर्व कामे त्यांचेकडून व्यवस्थीत व प्रामाणिकपणे पार पाडली जातात.

श्री विकास महादेव शिवगजे हे कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या सेवा जेष्ठता यादीतील क्रमांक ०१ वर (जेष्ठतम Senior Most) असल्याने व त्यांचेकडे उच्च शैक्षणिक पात्रता असल्याने त्यांची सेवाजेष्ठतेनुसार कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्य पदी नेमणूक करुन त्यांचेकडे कनिष्ठ महाविद्यालयाची जबाबदारी सोपविता येईल.या नेमणूकीने त्यांच्या सध्याच्या वेतनश्रेणीत कुठलाही बदल होत नसून संस्थानवरही कुठलाही अतिरिक्त आर्थिक भार पडणार नाही." असे नमूद केलेले आहे.

तसेच सध्या कन्या विद्या मंदिराकडे आकृतीबंधात उपप्राचार्य पद समाविष्ठ नाही.उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता, कन्या विद्यामंदिराकडे वाढीव तुकडयांची मंजुरी व उपप्राचार्य पदाचा मा.शिक्षण उपसंचालक पुणे यांचेकडून मान्यता आदेश प्राप्त झालेनंतर त्यांचे आदेशानुसार श्री विकास महादेव शिवगजे यांना उपप्राचार्य पदावर नियुक्ती देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपप्राचार्य पदाची उपलब्धता, त्यांचे निकष व शैक्षणिक पात्रता इत्यादी बाबत मा.शिक्षण उपसंचालक, पुणे यांचेकडून पडताळणी करुन घेऊन, या पदासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात यावे अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

३०. श्री अनिल बाळकृष्ण भणगे, कृषी सहाय्यक यांचे अर्जाबाबत.

श्री अनिल बाळकृष्ण भणगे,कृषी सहाय्यक, बगीचा विभाग यांनी त्यांचे दिनांक ०९.०८.२००७ रोजी अर्ज सादर करुन विभागप्रमुखाचे पद व वेतनश्रेणी मिळणेबाबत विनंती केली आहे. सदरचे अर्जात त्यांनी मी संस्थान सेवेत सन १९९९ पासून बगीचा विभागात कामावर आहे. माझे शिक्षण बी.एसस्सी ॲग्री झालेले आहे. मी सन १९९९ पासून आजतागायत बगीचा विभागाकडे काम पहात आहे. आजपर्यन्त मी साठवण तलाव येथे येथे नारळ झाडांची लागवड, नवीन भक्तनिवास परिसरात गुलाब बाग तयार करणे, नर्सरी तयार करणे, गांडूळ खत प्रकल्प, धर्मशाळा परिसरात गार्डन तयार करणे तसेच लेंडीबाग व मंदिर परिसरात सुशोभिकरण करणेसाठी गार्डन तयार करणे व नवीन प्रकल्प राबविणे यासारखी महत्वाची महत्वाची कामे मी आजवर वरिष्ठाच्या मार्गदर्शनाखाली करीत आहे.

बगीचा विभागासाठी विभागप्रमुख हे पद सध्या रिकामे असल्याने मी स्वत: विभागातील सर्व कामे करित आहे. बगीचा विभागाचा वाढता विस्तार पहाता व कामाची जबाबदारी पहाता मला बगीचा विभागप्रमुख हे पद व या पदाची वेतनश्रेणी मिळावी अशी विनंती केलेली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचा नवीन सुधारित कर्मचारी आकृतीबंध शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे. सदरहू आकृतीबंधाचे मान्यतेनंतर श्री भणगे यांना पदोन्नती देणेबाबतचा विचार करण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

३१ <u>पदोन्नती मिळणेबाबत श्री दिलीप चांगदेव कोते, मदतनीस यांचे अर्जाबाबत</u>

श्री.दिलीप चांगदेव कोते यांची जा.नं.एसएसएस/वशी-०१/१०५४८/१९८४ दि.०६/०८/१९८४ अन्वये प्रसादालय विभागात कामगार या पदावर करण्यात आलेली असून ते दि.०७/०८/१९८४ रोजी कामावर हजर झालेले आहेत.

उपरोक्त कालावधीमध्ये सेवेत असतांना त्यांच्या चौकशी निवासस्थान/प्रशासन शाखा अशा ठिकाणी वर्ग-०४ चे पदावर बदल्या झालेल्या आहेत. त्यांना गट क व ड (वर्ग-३ व ४) मधील कर्मचा-यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने असलेली कुठीतता घालविण्या संबंधीच्या योजने अंतर्गत कालबध्द वरची वेतनश्रेणी मंजूर करण्यात आलेली आहे. संगणक विभागाअंतर्गत सी.सी.टी.व्ही. चे कामकाज करीत असतांना संगणक विभाग बंद करण्यात येऊन आय.टी.विभाग नव्याने निर्माण करण्यात आला त्यावेळी सी.सी.टी.व्ही बाबतचे सर्व कामकाज ध्वनीक्षेपन विभागाचे अखत्यादित वर्ग करण्यात आले. तेंव्हापासून ते ध्वनीक्षेपन विभागाकडे सी.सी.टी.व्ही. आपरेटींगचे काम करीत आहेत.

श्री. कोते यांनी दि.०५/१२/२००६ रोजी अर्ज करुन त्यात - "मी सन १९८४ पासून मदतनीस या पदावर कार्यरत आहे. सन १९९८ पासून तत्कालीन प्रशासकिय अधिकारी श्री.गलांडे साो यांचे तोंडी आदेशान्वये चौकशी कार्यालयाकडून संगणक विभागात समाविष्ठ होऊन संगणक विभागाअंतर्गत सी.सी.टी.व्ही. चे संपूर्ण कामकाज मी करीत आहे. सदर सी.सी.टी.व्ही. हा विभाग सप्टेंबर २००४ पासून ध्वनीक्षेपन विभागाशी सलग्न झालेला आहे.

सी.सी.टी.व्ही. आपरेटर म्हणून काम करतांना सी.सी.टी.व्ही. संबंधीत त्यांचे अंतर्गत येणारे कामकाज उदा.टी.व्ही.देखभाल, ऑन लाईन कॅमेरा दुरुस्ती व देखभाल सी.सी.टी.व्ही करीता अवश्यक असणा-या केबल टाकणे व त्यांची देखभाल करणे संस्थानमार्फत साजरे करण्यात येणारे विविध उत्सव व इतर कर्यक्रमांचे संपूर्ण व्ही.डी.ओ शुटींग करणे. सी.सी.टी.व्ही वर प्रसारण करणे व्ही.डी.ओ. शुटींगच्या कॅसेट करणे त्याचे रुपांतर सी.डीमध्ये करणे. डीजीटल फोटो कॅमे-याने फोटोग्राप्स काढणे संस्थानकडे उपलब्ध असणारे L.C.D. प्रोजेक्टर व स्क्रिनची आवश्यकता लागल्यास त्याप्रमाणे ऑपरेटींग करणे तसचे मंदिर संरक्षणाच्या दृष्टीने मंदिर परिसरात ठिकठिकाणी लावलेल्या सी.सी.टी.व्ही. कॅमे-यांचे D.V.R. वर झालेले रेकॉर्डींग वेळोवेळी चेक करुन भक्तांना दाखविणे इ. कामकाज मी पहात आहे. समाधी मंदिर दर्शन रांगेत व मंदिर परिसरात भक्तनिवासस्थान इमारतीत नवीन साईनिवास अतिथीगृहात साईबाबा हॉस्पीटल इ. ठिकाणी बसविलेले अंदाजे २०० टी.व्ही. ची संपूर्ण देखभाल मी माझ्या सहाय्यकाच्या मदतीने करीत आहे.

नवीन तत्रज्ञानानुसार फायबर ऑप्टीक केबलद्वारे भक्तनिवासस्थान व धर्मशाळा या इमारतींमध्ये साईभक्तांचे सोयीसाठी श्रीं चे आरतीचे व दर्शनाचे थेट प्रक्षेपन केले जात असून त्याचीही देखभाल व दुरुस्ती करावी लागत आहे. सदर सी.सी.टी.व्ही. कामकाज पहाण्याकरीता ०१ कायमस्वरुपी मदतनीस व ०३ रोजंदारी कर्मचारी वर्ग असून उपरोक्त सर्व कामाकरीता आवश्यक असणारी तात्रिक शिक्षणाची पात्रता माझेकडे असून मी महाराष्ट्र शासनाची तारतंत्री (वायरमन) परिक्षा उतीर्ण झालेलो आहे. सदर प्रशिक्षणाचे प्रमाण पत्र मी यापूर्वी आस्थापनेकडे यापूर्वीच सादर केलेले आहे. सदरचे काम मी सप १९९८ पासून करीत असून सदर कामकाजाबाबतचा कोणताही जादा मेहनताना मला मिळालेला नाही.

तरी वरीलप्रमाणे बाबींचा योग्य प्रकारे विचार होऊन मला सी.सी.टी.व्ही. ऑपरेटर या पदावर पदोन्नती व त्या पदाची वेतनश्रेणी मिळावी " अशी विनंती केली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिरडी साठी तयार करण्यात आलेला कर्मचारी आकृती बंध मा.व्यवस्थापन समितीचे सभेंपुढे मान्य होऊन सदरचा कर्मचारी आकृतीबंध मा. प्रदान सचिव विधी व न्यायविभाग महाराष्ट्र राज्य शासन यांचेकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेला आहे.

सदर मान्यतेसाठी पाठविण्यात आलेल्या आकृतीबंधा मध्ये ध्वनीक्षेपन विभागाकडे सी.सी.टी.व्ही. ऑपरेटर या हुद्याचे दोन पदांचा समावेश करण्यात आलेला आहे.

त्यानुसार श्री. कोते यांची विनंती शैक्षणिक पात्रता त्यांनी सदर विभागाकडे बदली झाल्यापासून ते करत असलेल्या सी.सी.टी.व्ही ऑपरेटींग कामाचा अनुभव तसेच शासन मान्यतेसाठी पाठविण्यात आलेल्या आकृतीबंधामध्ये ध्वनीक्षेपन विभागाकडे रिक्त असलेल्या सी.सी.टी.व्ही. ऑपरेटर या हुद्याचे दोन पदापैकी एका रिक्त पदावर आकृतीबंधास शासन मान्यतेच्या व या पदासाठी लागणा-या शैक्षणिक पात्रताचे अधिन राहून श्री.दिलीप कोते यांची सी.सी.टी.व्ही. ऑपरेटर या पदावर पदोन्नतीने नेमणूक व सदर पदाची रु.३०५०-४५९० ही वेतनश्रेणी देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सुधारीत आकृतीबंध शासनाकडून मान्य होणे असल्याने श्री दिलीप चांगदेव कोते यांना ते करत असलेल्या सी.सी.टी.व्ही ऑपरेटर चे कामासाठी एक विषेश बाब म्हणून रुपये ३००/- प्रति महा मेहनताना देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

३२ <u>श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे आस्थापनेवरील कंत्राटी कामगारांना एकत्रित मासिक वेतनात वाढ मंजूर करणेबाबत.</u>

उपरोक्त संदर्भ क्र.०१ मधील मा.व्यवस्थापन मंडळाच्या दि.०१/०४/२००६ च्या सभेतील विषय क्र.४६ निर्णय क्र.२२५ अन्वये सन १९९१ ते डिसेंबर २००० या कालावधीत जे कंत्राटी कर्मचारी संस्थानची कंत्राटी सेवा सोडून गेले व ज्या कंत्राटी कर्मचा-यांच्या कोर्ट केसेस व अन्य चौकशी चालू आहे,अशा सर्व कंत्राटी कर्मचा-यांना वगळून उर्वरीत सन १९९१ ते २००० पर्यंत जे कंत्राटी कर्मचारी नियमीत कामावर आहेत व त्यापैकी आजमितीस कामावर सलग हजर असणा-या अशा सर्व कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमीत नेमणूका देणेबाबत निर्णय घेण्यात आला.त्यानुसार संस्थानचे अकुशल १०३७ व कुशल १७८ अशा एकूण १२१५ कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेस मान्यता देणेबाबत शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला होता. तसेच जा.एसएसएस/वशी-०१/५४२४/२००८ दि.११/०४/२००८ अन्वये संस्थानच्या सर्व विभागासाठी एकूण ३०२८ पदांचा आकृतीबंध तयार करुन तो मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२०/०५/२००७ मध्ये मान्यता घेऊन जा.नं.वर्शी-०१/९८०७/२००७ दि.२९/०७/२००७ अन्वये शासनाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

आता संदर्भ क्र.०३ अन्वये याबाबत शासनाने खालीलप्रमाणे मान्यता दिलेली आहे.

संस्थानच्या मागणीच्या अनुषंगाने प्राप्त प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी प्रधान सचिव व वरिष्ठ विधी सल्लागार यांच्या दालनात दि.०४/०४/२००८ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री.जयंत ससाणे, सदस्य श्री.राधाकृष्ण विखे पाटील व कार्यकारी अधिकारी श्री.किशोर मोरे उपस्थित होते. सदर बैठकीत कंत्राटी कर्मचा-यांच्या नियमित वेतनश्रेणीवरील नियुक्तीच्या अनुषंगाने चर्चा होऊन संस्थानचा आकृतीबंध मंजूर होईपर्यंत संस्थानच्या कर्मचा-यांना अधिनियमातील तरतूदीनुसार रु.२०००/- पेक्षा अधिक वेतन देता येईल का ? या अनुषंगाने चर्चा होऊन एकत्रित सुधारीत वेतनाच्या प्रस्तावावर विचार करण्याबाबत निर्णय झाला.

त्यानुसार कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी संस्थानने सादर केलेला आकृतीबंध मान्य होईपर्यंत सन १९९१ ते २००० पर्यंत कंत्राटी पध्दतीने काम करणा-या अकुशल दर्जाच्या वर्ग-४ च्या कर्मचा-यांना दरमहा रु.४५००/- व कुशल कर्मचा-यांना दरमहा रु.५५००/- इतके एकत्रित वेतन देण्याबाबतचा प्रस्ताव श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ च्या कलम १३ (४) मधील तरतूदीस अनुसरुन शासनास पाठविला होता. या प्रस्तावाचा विचार करुन शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :- कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या प्रस्तावात नमूद केल्यानुसार, संस्थानमध्ये सन १९९१ ते २००० या कालावधीत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या कार्यरत असलेल्या १०३२ कर्मचा-यांपैकी कुशल कर्मचा-यांना दिनांक ०१ ऑगस्ट २००८ पासून दरमहा रुपये ५५०० (रुपये पाच हजार पाचशे फक्त) व अकुशल कर्मचा-यांना रुपये ४५००/- (रुपये चार हजार पाचशे फक्त) इतके एकत्रित मासिक वेतन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या आस्थापनेवरील पदांच्या आकृतीबंधाच्या मान्यतेस अधीन राहून व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम १३ (४) व त्याखालील परंतूकास अनुसरुन तसेच पुढील अटीस अधीन राहून संस्थानच्या व्यवस्थापन निधीतून अदा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त प्रमाणे एकत्रित मासिक वेतन मंजूर करण्यात येत असले तरी, संबंधीत कर्मचा-यांचा संस्थानच्या नोकरीतील दर्जा (Status) हा कंत्राटी कामगार म्हणून राहील. त्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे कायमस्वरुपी नोकरी मागण्याचा हक्क प्राप्त होणार नाही, असे नमूद केले आहे.

याबाबत मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०१/०४/२००६ मधील निर्णय क्र.२२५ नुसार संस्थानमधील वर्ग ४ चे ८८८ अकुशल कर्मचारी व १६४ कुशल अशा १०५२ कर्मचा-यांना अधिनियम कलम नं.१३ (४) मधील तरतुदी नुसार रु.२०००/- (एकत्रित वेतनावर) नेमणूक पत्र दिलेले आहे. तथापी सध्या अकुशल ८७६ व कुशल १५६ असे १०३२ कर्मचारी विविध विभागात काम करीत आहेत. सध्या मासिक रु.२०००/- नियतवेतनावर घेतलेल्या कर्मचा-यांना संस्थानच्या कायम कर्मचा-याप्रमाणे खालील सेवा सवलती व फायदे दिले जातात.

१) त्यांना इतर कर्मचा-याप्रमाणे वार्षिक - ३३ अर्जीत रजा, १५ किरकोळ रजा, १२ आजारी रजा, ११

सार्वजनिक सुट्या देण्यात येतात.

२) त्यांना व त्यांचेवर अवलंबीत कुटुंबीयांना संस्थान रुग्णालयातील सेवा विनामूल्य दिल्या जातात.

३) इतर कायम कर्मचा-याप्रमाणे शैक्षणिक फीचा व वैद्यकीय बिलांचा परतावा देणेत येतो.

४) कर्मचारी सेवेत असतांना दिवंगत झाल्यास त्यांचेवरील एका अवलंबीतास शासन निर्णयानुसार अनुकंपा योजनेनुसार संस्थान सेवेत नोकरीस घेतले जाते.

५) नियमाप्रमाणे सानुग्रह अनुदान दिले जाते.

६) नियमाप्रमाणे ग्रॅच्युइटी किंवा ग्रुप विम्याचा फायदाही दिला जातो इ.

अ) उपरोक्त शासन निर्णयात सदरहू कर्मचा-यांचा संस्थानच्या नोकरीतील दर्जा (Status) हा कंत्राटी कामगार म्हणून राहील त्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे कायमस्वरुपी नोकरी मागण्याचा हक्क प्राप्त होणार नाही, असे नमूद केले आहे. त्यामुळे सध्या देत असलेले उपरोक्त सवलती फायदे कंत्राटी पदनामामुळे देणे.

ब) १. शासन निर्णयानुसार अकुशल कर्मचा-यांना प्रतिमाह रु.४५००/- देणेबाबत जा.नं.एसएसएस/ वशी-०१/२४९९/२००८ दि.०३/०९/२००८ अन्वये व १५६ कुशल कर्मचा-यांपैकी सध्या १११ कर्मचा-यांना प्रतीमाह रु.५५००/- देणेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०१/२८९३/२००८ दि.०१/०८/२००८ अन्वये आदेशीत करण्यात आलेले आहे. "त्यात कुशल वेतन हे शासनाकडील त्या पदाची शैक्षणिक पात्रता, त्यानुसार आवश्यक पात्रता सर्टिफिकेट्स सादर करणेच्या अटीवर देणेत येत आहे. संबंधित पदासंबंधीचे शैक्षणिक व इतर पात्रतेबाबत काही तृटी व कमतरता आढळल्यास कुशल वेतन दिले जाणार नाही, तसेच दिलेले वेतन वसुल करणेत येईल. शासनाचे मान्यतेसाठी सादर केलेल्या आकृतीबंधानुसार सदर पद मान्य झाल्यास व रिक्त असल्यास नियमानुसार कुशलचे वेतन देणेत येईल, अन्यथा नाही याची नोंद घ्यावी. सदर अटी मान्य असल्यास संबंधीत कर्मचा-यानी मा.तहसीलदार साहेब यांचे समोरील प्रतिज्ञापत्र विभाग प्रमुखा मार्फत इकडेस सादर करावे असे आदेशात नमूद केलेले आहे.

२. उरलेले कुशल परंतु सध्या प्रतिमाह रु.५५००/- न दिलेल्या (४५) कर्मचा-यांची त्या पदाची शैक्षणिक पात्रता, शासनमान्य संस्थेचे शैक्षणिक प्रमाणपत्र व शासनाकडे मान्यतेसाठी पाठविलेल्या आकृतीबंधातील पद व रिक्त संख्या इ. तपासून कुशल वेतन देण्यास मान्यता देणे.

ब "०१) शासन निर्णयानुसार अकुशल कर्मचाऱ्यांना प्रति महा रु.४५०० व कुशल कर्मचाऱ्यांना प्रतिमाह रु.५५००/- दिले आहे त्यास कार्योत्तर मान्यता देणे.

०२) उरलेल्या कुशल कर्मचाऱ्यांची शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र व रिक्त जागा याबाबत पडताळणी करुन पात्र कर्मचाऱ्यांना कुशल वेतन देणे..

उपरोक्त अ मधील फायदे व ब मधील वेतनवाढीस कार्योत्तर मान्यता देणे तसेच, कुशल कर्मचाऱ्यांची पात्रता व रिक्त जागा यांची तपासणी करुन कुशलचे वेतन देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

३३ <u>अधिक्षक/प्रमुख यांना रुपये ६५००-२००-१५५०० वेतनश्रेणी मिळणेबाबत.</u>

अधिक्षक हुद्यातील ८ कर्मचारी वेतनश्रेणी रुपये- ५,५००-१७५-९,००० तसेच विभाग प्रमुख / पर्यवेक्षक (तांत्रिक) पदावरील २ कर्मचारी वेतनश्रेणी रुपये -५,५००-१७५-९,०००, तीन विभाग प्रमुख वेतनश्रेणी रुपये- ५,०००-१५०-८,००० तसेच वरिष्ठ लिपीक (प्रभारी अधिक्षक, मिटींग विभाग) १ कर्मचारी वेतनश्रेणी रुपये- ४,०००-१००-६,००० यांनी दि.१४/०३/२००८ चे पत्रान्वये संस्थानमधील अधिक्षक, विभागप्रमुख त्यांचेकडे असलेल्या विभागाचे संपूर्ण व्यवस्थापन नियोजन प्रत्यक्ष कार्यवाहीची जबाबदारी असते. श्रींचा रामनवमी, गुरुपोर्णिमा, विजयादशमी (दसरा) सारखे वर्षातून साजरे होणारे उत्सव, सलग सुट्टया असतांना तसेच मे महिना, दिवाळी, नाताळ मध्ये होणाऱ्या गर्दीचे वेळी डयुटीचे वेळेव्यतिरिक्त जास्तीत जास्त वेळ काम करावे लागते. तसेच या काळात रजा, सुट्टयाही बंद असतात. बहुतांशी विभाग प्रमुखांस आठवडा सुट्टया देखिल रविवार खेरीज इतर दिवशी घ्याव्या लागतात. दुसरा शनिवार व चौथा शनिवारच्या सुट्टयाही नसतात. अधिक्षक पदाची वेतनश्रेणी रुपये-५,५००-१७५-९,००० व विभागप्रमुख या पदाची सध्याची वेतनश्रेणी रुपये- ५,०००-१५०-८,००० अशी आहे.

संस्थानचे **श्री साईबाबा रुग्णालयाकडील** व्यवस्थापकीय कामाचे स्वरुप असणाऱ्या हुद्याच्या कर्मचाऱ्यांची वेतनश्रेणी रुपये- ६,५००-२००-१०,५०० अशी आहे.संस्थानचे जनसंपर्क अधिकारी पदाची पूर्वीची वेतनश्रेणी इतर विभाग प्रमुखांप्रमाणे रुपये- ५,०००-१५०-८,००० व रुपये- ५,५००-१७५,९,००० अशी होती. आता जनसंपर्क अधिकारी पदावर असणाऱ्यास रुपये- ६,५००-२००-१०,५०० ही वेतनश्रेणी दिलेली आहे. त्यांच्या पेक्षा आम्ही सेवाजेष्ठ आहोत.

वरील सर्व वस्तुस्थिती विचारात घेता कृपया अधिक्षक, विभाग प्रमुख ही पदनामे बदलून त्या ऐवजी व्यवस्थापक (मॅनेजर) हे पदनाम करण्यात यावे व आम्हांस रुपये- ५,००० ते ८,००० व रुपये- ५,५०० ते

९,००० या वेतनश्रेणी ऐवजी रुपये- ६,५००-२००-१०,५०० अशी वेतनश्रेणी मिळावी, अशी विनंती केली आहे.

<u>अर्जदारांची संस्थान सेवेतील माहिती खालील प्रमाणे</u> :-

अ) वेतनश्रेणी (रु.५५००-१७५-९०००)

अ.नं.	कर्मचाऱ्यांचे नांव व शैक्षणिक पात्रता	सेवेत दाखल तारीख व पदनाम	सध्याचे पदनाम व वेतनश्रेणी	सध्याचे मुळ वेतन
०१	श्री प्रकाश आर. खोत, एस.एस.सी.	०२/०८/१९६९. लिपीक	अधिक्षक,(मंदीर) रु.५,५००-१७५-९,०००	रुपये-८,४७५/-
०२	श्री सुकदेव भटू पाटील, एस.एस.सी.,पी.डी.आर्ट	०१/०२/१९७२ वार्डबॉय	अधिक्षक, (मुख्य रोखपाल) रु.५,५००-१७५-९,०००	रुपये-७,७७५/-
०३	श्री प्रभाकर तु.बोरावके, बी.ए., इंग्लिश टायपिंग-३०,	२२/०३/१९७८ लिपीक	अधिक्षक,(खरेदी) रु.५,५००-१७५-९,०००	रुपये-७,२५०/-
०४	श्री भाऊसाहेब दा.साबळे, बी.ए.	२०/०३/१९७८. लिपीक	अधिक्षक,(आस्थापना) रु.५,५००-१७५-९,०००	रुपये-७,०७५/-
०५	श्री दिलीप त्रिंबक उगले, एम.कॉम.	२७/०४/१९९२ स्टोअर ऑफीसर	अधिक्षक,(प्रसादालय) रु.५,५००-१७५-९,०००	रुपये-६,९००/-
०६	श्री नारायण के.कुलकर्णी, बी.कॉम,अे.पी.एम., डि.जी.एम.,जी.डी.सी.ॲन्ड अे., म. टायपिंग-२०,इंग्लिश टा.-३०	३१/०५/१९७८ शिपाई	अधिक्षक,(अभिलेख) रु.५,५००-१७५-९,०००	रुपये-६,०२५/-
०७	श्री लक्षमण सदाशिव चव्हाण, एम.ए.,इंग्लिश टायपिंग-४०, मराठी टायपिंग-३०.	०७/०२/१९८४ लिपीक	अधिक्षक,(न.भ.निवास) रु.५,५००-१७५-९,०००	रुपये-६,०२५/-
०८	श्री उत्तम पं.गोंदकर, बी.ए.,इंग्लिश टायपिंग-३०.	२०/०३/१९७८ मदतनिस	अधिक्षक,(भांडार) रु.५,५००-१७५-९,०००	रुपये-६,०२५/-
०९	श्री सुभाष नारायण गर्कल, बी.ए.,एल.एल.बी.	१५/०७/१९८२. वरिष्ठ लिपीक	विधी अधिकारी रु.५,५००-१७५-९,०००	रुपये-७,२५०/-
१०	श्री सुर्यभान विठ्ठलराव गमे, बी.ए., एम.एस.डब्ल्यु., डी.टी.एल.,डी.एल.एल.डब्ल्यु.	२६/१०/१९९८ कामगार अधिकारी	कामगार अधिकारी, रु. ५,५००-१७५-९,०००	रुपये-६,७२५/-

ब) वेतनश्रेणी (तांत्रीक रु.५५००-१७५-९०००)

११	श्री प्रल्हाद गं.शेळके, एस.एस.सी.,वायरमन, इलेक्ट्रीक सुपरवायझर कोर्स.	०१/०७/१९७४ मदतनिस	प्रमुख,(पाणी पुरवठा) रु.५,५००-१७५-९,०००	रुपये-७,४२५/-
१२	श्री शशिकांत ए.कुलकर्णी इयत्ता ७ वी, वायरमन, इलेक्ट्रीक सुपरवायझर कोर्स.	०१/०६/१९७२ मदतनिस	ध्वनीक्षेपन पर्यवेक्षक रु.५,५००-१७५-९,०००	रुपये-७,४२५/-

क) वेतनश्रेणी (रु.५०००-१५०-८०००)

१३	श्री रामराव रं.शेळके, बी.ए.	०१/११/१९७५ मदतनिस	कॅन्टीन विभाग प्रमुख रु.५,०००-१५०-८,०००	रुपये-६,६५०/-
१४	श्री पी.व्ही.कुलकर्णी, बी.ए.	०१/०९/१९७७ लिपीक	प्रकाशने विभाग प्रमुख रु.५,०००-१५०-८,०००	रुपये-६,५००/-
१५	श्री प्रकाश आर. रत्नपारखी, बी.ए.	लिपीक २०/०३/१९७८	प्र.धर्मशाळा विभाग प्रमुख रु.५,०००-१५०-८,०००	रुपये-६,९५०/-

ड) वेतनश्रेणी (रु.४०००-१००-६०००)

१६	श्री पी.व्ही.निर्मळ, एम.कॉम, इंग्लिश टायपिंग-५०, मराठी टायपिंग-४०, हिंदी टायपिंग-३०.	लिपीक १८/०५/१९८९	वरिष्ठ लिपीक (प्र.अधिक्षक, मिटींग) रु. ४,०००-१००-६,०००	रुपये-४,८००/-

श्री साईबाबा हॉस्पीटलचे वरिष्ठ व्यवस्थापक (Senior Manager) भांडार व माल (Materials Store), खरेदी (Marketing) संगणक (E.D.P.) देखभाल (Maintenance), अर्थ (Finance), मनुष्यबळ (Human Resource), जनसंपर्क (Public Relations) इत्यादी पदाची वेतनश्रेणी रुपये- ६,५००-२००-१०,५०० ही आहे.संस्थानचे जनसंपर्क अधिकारी यांनाही रुपये- ६,५००-२००-१०,५०० ही वेतनश्रेणी दिलेली आहे.

संस्थानच्या विविध प्रमुख पदाची कामे व जबाबदाऱ्या हया हॉस्पीटलचे सदरहू पदापेक्षा अधिकच्या आहेत. याचा भक्तांच्या सेवेशी प्रत्यक्ष संबंध येतो व सदर कर्मचारी २४ तास बांधील आहेत.

शासनाकडे अधिक्षक पदाअंतर्गत येणारी कामे व जबाबदाऱ्या यापेक्षा संस्थानच्या अधिक्षक पदाची कामे व जबाबदाऱ्या हया खुपच अधिकच्या आहेत, व उपरोक्त कर्मचाऱ्यांच्या सेवाही जवळपास २५ वर्षाचे आसपास झालेल्या आहेत व काहींचे मुळवेतन हे रुपये- ६,५०० चे पुढे गेलेले आहे.या सर्व बाबींचा विचार करता-

अ) सध्याच्या रु.५,५००-१७५-९,००० वेतनश्रेणी असलेल्या १ ते १० अधिक्षक,विधी अधिकारी, कामगार अधिकारी हुद्यावरील कर्मचारी ,

ब) मधील **अ.नं. ११ ते १२** (सध्याची वेतनश्रेणी तांत्रीक **रु.५,५००-१७५-९,०००)** विभाग प्रमुख / पर्यवेक्षक,

क) मधील अ.नं. **१३ ते १५ रुपये-५,०००-१५०-८,०००** वेतनश्रेणीतील विभाग प्रमुख / पर्यवेक्षक,

ड) मधील **अ.नं.१६ वरिष्ठ लिपीक** (सध्याची वेतनश्रेणी **रु.४,०००-१००-६,०००)**,

तरी वरील प्रमाणे अर्जदार कर्मचारी अधिकारी यांची जेष्ठता / शैक्षणिक पात्रता / त्यांच्या पदांच्या जबाबदाऱ्या व त्यांच्या वरिष्ठ पदावरील दिर्घकाळ सेवा, यांचा विचार होऊन श्री साईबाबा हॉस्पीटलकडील मॅनेजर व संस्थान जनसंपर्क अधिकारी यांना दिलेली वेतनश्रेणी देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर अभ्यास करुन फेर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

२४. <u>वरिष्ठ लिपीक '' हे पदनाम मिळणेबाबत श्री.अण्णासाहेब कारभारी तुरकणे व इतर २० लिपिक-टंकलेखक यांचे अर्जाबाबत</u>

श्री.आण्णासाहेब कारभारी तुरकणे, व इतर २० लिपीक टंकलेखक, कर्मचारी यांनी दि. ०८/०९/२००६ रोजी अर्ज करुन, त्यात - आम्ही खालील सही करणारे कर्मचारी (लिपीक टंकलेखक) विनंती करतो की, आम्ही लिपीक टंकलेखक या पदावर दिनांक ०१/०६/१९८९ पासून काम करीत आहोत. सेवा अंतर्गत आश्वासित प्रगती योजनेनुसार आम्हांला १२ वर्षानतंर वरिष्ठ वेतनश्रेणी रुपये- ४०००-१००-६००० जा.नं.एसएसएस/वशी-०१/२०८५/२००३ दिनांक २८/०८/२००३ अन्वये दिनांक ०८/०१/२००२ पासून मिळालेली असून सदर वेतनश्रेणीवर आम्ही लिपीक टंकेलखक या पदावर काम करीत आहोत.

शासन निर्णयानुसार आश्वासित प्रगती योजने अंतर्गत देण्यात आलेल्या नियम व अट क्र.०३ मध्ये "या योजने अंतर्गत पदोन्नतीची वेतनश्रेणी मिळाली तरी कर्मचाऱ्यांचे नांव कनिष्ठ संवर्गाचे (मुळ) सेवा जेष्ठता सुचीतच राहील व सेवा प्रवेश नियमावलीतील तरतुदीनुसार नजिकच्या वरिष्ठ वेतनश्रेणीतील रिक्त पदावर उपलब्ध पदोन्नतीसाठी त्यांचा विचार करण्यात येईल, असे आहे.

आता संस्थानमध्ये "वरिष्ठ लिपीक" हुद्याची अनेक पदे उपलब्ध आहेत, असे समजते.तरी वरिल आश्वासित सेवा योजने अंतर्गत उपरोक्त नियमानुसार आम्हाला रिक्त असलेले वरिष्ठ लिपीक या हुद्याचे पदनाम मिळावे,अशी विनंती केली आहे.

सध्या श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी मार्फत कर्मचारी आकृतिबंध मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मंजूर होऊन सदरचे आकृतिबंधाची प्रत मान्यतेसाठी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेली आहे. त्यात "वरिष्ठ लिपीक" या हुद्याची एकुण ८५ पदे असून सध्या ४६ पदे भरलेली असून ३९ पदे रिक्त आहेत.

तरी उपरोक्त आश्वासित सेवा योजने अंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मिळालेले लिपीक टंकलेखक यांना त्यांचे सेवा जेष्ठतेनुसार तसेच शासन निर्णयातील नियमावलीनुसार रिक्त असलेल्या ३९ वरिष्ठ लिपीक या पदावर खालील कर्मचाऱ्यांना " लिपीक टंकलेखक " ऐवजी "वरिष्ठ लिपीक " असे पदनाम देऊन पदोन्नती देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

अ.नं.	कर्मचाऱ्याचे नांव	विभाग
०१	श्री.किशोर केशव क्षीरसागर	मुंबई कार्यालय
०२	श्री अण्णासाहेब कारभारी तुरकणे	मिटींग विभाग
०३	श्री रमेश भानुदास जोशी	खरेदी विभाग
०४	श्री भगवान नामदेव झुंरगे	औद्योगिक प्रशिक्षण संस्था
०५	श्री संपत ज्ञानेश्वर शेळके	चौकशी कार्यालय
०६	श्री मोहन लक्ष्मण कोते	मंदीर विभाग
०७	श्री सुनिल रामदास परदेशी	लेखाशाखा
०८	श्री बाबुराव गणपत कोते	कॅन्टीन
०९	श्री दत्तात्रय चांगदेव शिंदे	श्री साईनाथ रुग्णालय
१०	श्री बाबासाहेब सोपान कोते	प्र.अ.स्विय सहाय्यक
११	श्री भाऊसाहेब पोपट पठारे	प्रसादालय विभाग
१२	श्री मुकूंद बाबुराव वाक्चौरे	लेखाशाखा
१३	श्री अशोक चंद्रभान कोते	पाणी पुरवठा

१४	श्री अशोक संभू पवार	प्रकाशने विभाग
१५	श्री राजाराम पांडुरंग थेटे	प्रशासन शाखा
१६	श्री चंद्रकांत देवराम डांगे	प्रकाशने विभाग
१७	श्री रमेश पाराजी गोंदकर	लेखाशाखा
१८	श्री गोरख तुकाराम परदेशी	प्रसादालय विभाग
१९	श्री नवनाथ भैरु चौधरी	भांडार विभाग
२०	श्री विलास पंढरीनाथ गोंदकर	बगीचा विभाग
२१	श्री विलास आप्पा मते	प्रसादालय विभाग

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचा नवीन सुधारित कर्मचारी आकृतीबंध शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे. सदरहू आकृतीबंधाचे मान्यतेनंतर वरिष्ठ लिपिक या पदाची शैक्षणिक पात्रता, अर्हता तपासून व या पदासाठी आवश्यक मराठी व इंग्रजी संगणक ज्ञानाची व लेखी परिक्षा घेऊन पदोन्नती देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

३४ <u>अधिक्षक/उपअधिक्षक या पदावर पदोन्नती देणेबाबत.</u>

उपरोक्त विषयाकीत कामी वरिष्ठ लिपीक संवर्गातील कर्मचाऱ्यांनी दि.०४/०१/२००७ व दि.१५/०९/२००८ रोजी अर्ज करुन त्यात त्यांनी, "मागील व्यवस्थापन मंडळाने कार्यालय अधिक्षक व वरिष्ठ लेखापाल इत्यादी पदे भरण्यासाठी वर्तमानपत्रात जाहीरात देऊन सदरचे जाहीरातीनुसार पात्र उमेदवारांचे अर्ज मागविण्यात आले होते.सदरचे जाहीरातीप्रमाणे आमची शैक्षणिक पात्रता व अनुभव असल्याने आम्ही सदरचे पदावर काम करण्यास सक्षम असल्याने या पदावर नेमणूक होणेसाठी आम्हीही अर्ज सादर केले होते.

गत व्यवस्थापन मंडळाने दि.२३/०४/२००७ रोजी जाहीरात प्रसिध्द करुन त्यात अधिक्षक पदासाठी मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी अथवा पदव्युत्तर पदवी,प्रशासकीय पदावर किमान ५ वर्षाचा अनुभव व संगणक प्रणालीचे ज्ञान आवश्यक अशी अर्हता दर्शविण्यात आलेली आहे.

तथापि मागील मा.व्यवस्थापन मंडळाने जाहीरातीमधील अनुभवाची अट शिथील करुन संस्थान सेवेतीलच कर्मचाऱ्यांना (जेष्ठता विचारात न घेता शैक्षणिक पात्रता पाहून) पदोन्नत्याने नेमणूका दिलेल्या आहेत.थोडयाच दिवसात त्यातील काही संस्थान कर्मचाऱ्यांनी पदोन्नत्या घेवून सोईस्कर बदल्या करुन घेतल्या आहेत व त्यांच्या जागेवर आजही आमच्या पैकी काहीजन काम करत आहे.

आता, संस्थानने नुकताच स्टाफींग पॅटर्नला मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन मा.प्रधान सचिव न्याव विधी विभागाकडे मंजूरीसाठी पाठविलेला आहे.त्यात अधिक्षक व उपअधिक्षक पदे दर्शविलेली असून जवळजवळ ०९ अधिक्षक व ९-१० उपअधिक्षक पदे रिक्त असल्याचे आम्हांस ज्ञात झालेले आहे.तरी आमची शैक्षणिक पात्रता आम्ही करत असलेल्या जबाबदारीच्या कामाचा तसेच आमच्या झालेल्या एकंदरीत सेवेचा व सेवाजेष्ठतेचा विचार करुन आम्हांस अधिक्षक / उपअधिक्षक पद व वेतनश्रेणी देवून उपकृत करावे." अशी विनंती केलेली आहे.

सध्या सन २००६ मध्ये नव्याने तयार केलेला ३०२८ पदांचा आकृतीबंध मा.व्यवस्थापन समितीच्या दि.२०/०५/२००७ रोजीच्या सभेतील मान्यतेनुसार शासनाकडे मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे. त्यामध्ये प्रस्तावित केल्यानुसार उपरोक्त अर्जदारांचा विचार करावयाचा झाल्यास अधिक्षक पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक पात्रता धारण करत असलेल्या (फक्त जेष्ठताच विचारात न घेता) पात्र उमेदवारांमधून निवड प्रक्रियेने नेमणूक द्यावयाची झाल्यास निर्धारित केलेली शैक्षणिक अर्हता,पात्रता,सेवाजेष्ठता तसेच सन.२००४ चा महाराष्ट्र शासन अधिनियम आठ व मा.व्यवस्थापन समितीचे ठराव क्र.१७० नुसार आरक्षण तक्त्यानुसार छोटया संवर्गासाठी आरक्षणाबाबत सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र.बीसीसी-२००७/३३५/१६-ब दि.०५/१०/२००७ पदोन्नतीच्या छोटया संवर्गासाठी आरक्षीत पदांचा तपशील खालील प्रमाणे येईल.

अ) अधिक्षक पदांचा पदोन्नती तक्ता (आरक्षण-३३% + खुला-६७ % = १००%)

अ. नं.	पदनाम	मंजूर पदे संख्या	पदांची स्थिती	अनुसुचीत जाती (Scheduled cast)१३%	अनुसूचीत जमाती (Scheduled Tribes) ७%	नि.सु.ज. ३% D. T. (A) भ. ज. N. T. (BCD) ८% **एकुण - ११%**	विशेष मागास प्रवर्ग Special Backward Category २%	एकुण अनुशेष ५२% ४ ते ७	ओपन - ४८% ओ.बी.सी.- १९% **एकुण - ६७%**	**एकुण**
	०१	**०२**	**०३**	**०४**	**०५**	**०६**	**०७**	**०८**	**०९**	**१०**
०१	अधिक्षक	**एकूण पदे**	**१५**	**०२**	**०१**	**०२**	--	**०५**	**१०**	**१५**
		भरलेली पदे	**१०**	**०१**	--	--	--	**०१**	**४+५=९**	**१०**
		भरावयाची पदे	**०५**	**०१**	**०१**	**०२**	--	**०४**	**०१**	**०५**

ब) उपअधिक्षक पदांचा पदोन्नती तक्ता (आरक्षण-३३% + खुला-६७ % = १००%)

अ. नं.	पदनाम	मंजूर पदे संख्या	पदांची स्थिती	अनुसुचीत जाती (Scheduled cast)१३%	अनुसूचीत जमाती (Scheduled Tribes) ७%	नि.सु.ज. ३% D. T. (A) भ. ज. N. T. (BCD) ८% **एकुण - ११%**	विशेष मागास प्रवर्ग Special Backward Category २%	एकुण अनुशेष ५२% ४ ते ७	ओपन - ४८% ओ.बी.सी.- १९% **एकुण - ६७%**	**एकुण**
	०१	**०२**	**०३**	**०४**	**०५**	**०६**	**०७**	**०८**	**०९**	**१०**
०१	उप-अधिक्षक	**एकूण पदे**	**१५**	**०२**	**०१**	**०२**	--	**०५**	**१०**	**१५**
		भरलेली पदे	--	--	--	--	--	--	--	--
		भरावयाची पदे	**१५**	**०२**	**०१**	**०२**	--	**०५**	**१०**	**१५**

अधिक्षक हुद्याची पदे भरतांना यापुर्वी अधिक्षक या हुद्यासाठी मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी अथवा पदव्युत्तर पदवी, शासकिय/ निमशासकिय संस्थेतील प्रशासकिय कामाचा किमान १५ वर्षाचा अनुभव पैकी रु.५०००-१५०-८००० या वेतनश्रेणीतील पर्यवेक्षकीय/प्रशासकिय पदावर किमान ०५ वर्षे काम केल्याचा अनुभव व संगणक प्रणालीचे ज्ञान आवश्यक अशी शैक्षणिक अर्हता निर्धारित केलेली होती. तथापी संस्थान आस्थापनेवर काम करीत असलेल्या रु.४०००-१००-६००० या वेतनश्रेणीतील वरिष्ठ-लिपीक यांनाही मुलाखत पत्र देण्यात आलेले होते. मात्र उपअधिक्षक पदे नविन असल्याने या पदासाठी शैक्षणिक अर्हता निर्धारीत केलेली नाही ती निर्धारित करावी लागेल.

तरी अधिक्षक व उपअधिक्षक पदावर भरती / पदोन्नती करतांना कर्मचाऱ्यांकडे शैक्षणिक अर्हता,पात्रता,सेवाजेष्ठता,तसेच अनुभव इत्यादी तसेच तसेच सन.२००४ चा महाराष्ट्र शासन अधिनियम आठ व मा.व्यवस्थापन समितीचे ठराव क्र.१७० नुसार उपरोक्त पदावर पदोन्नती देतांना पात्रता विचारात घेवून (फक्त जेष्ठताच विचारात न घेता) त्या-त्या प्रवर्गातील पात्र उमेदवारांना,विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यात आलेल्या सेवक आकृतीबधास शासनाची मान्यता या सर्व बाबींच्या आधीन राहून अधिक्षक / उपअधिक्षक पदावर पदोन्नती अथवा थेट भरती करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचा नवीन सुधारित कर्मचारी आकृतीबंध शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे. सदरहू आकृतीबंधाचे मान्यतेनंतर अधिक्षक/उपअधिक्षक या पदाची शैक्षणिक पात्रता, अर्हता तपासून व या पदासाठी आवश्यक मराठी व इंग्रजी संगणकाची व लेखी परिक्षा घेऊन पदोन्नती देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

३५ <u>सिस्टर इनचार्ज या पदावर पदोन्नती देणेबाबत.</u>

श्री साईनाथ रुग्णालयाकडे ६ सिस्टर इन्चार्ज, ६२ परिचारीका, २ ऑक्झलरी नर्स सेवेत आहेत. श्री साईबाबा हॉस्पीटलकडे पुर्वी १३३ परिचारीकांना नेमणूक आदेश देण्यात आलेले असून, पैकी ९३ परिचारीका सेवेत असून नव्याने २९/०८/२००८ नेमणूक केलेल्या ६४ पैकी ५० हजर झालेल्या आहेत.

कार्यालयीन कामकाजाच्या आवश्यकतेनूसार श्री साईनाथ रुग्णालयाने त्यांचे सन २००६-२००७ चे आकृतिबंधामध्ये १४ सिस्टर इन्चार्जची आवश्यकता असल्याचे नमूद केले आहे. (ही संख्या १०५ नर्सेससाठीची आहे.) यापूर्वी सिस्टर इन्चार्जची ९ पदे भरलेली होती, पैकी दोन सेवानिवृत्त व एक असि.मेट्रन पदासाठी निवडअसे तीन पदे रिक्त झालेली आहे. सद्या ६ सिस्टर इन्चार्ज कार्यरत आहेत. रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे वैद्यकीय अधिक्षिका, श्री साईनाथ रुग्णालय यांनी ५ सिस्टर इन्चार्जची मागणी केली आहे.

तसेच श्री साईबाबा हॉस्पिटल आकृतिबंधात २०० नर्सेससाठी परिसेविकांची संख्या २१ दर्शविलेली आहे. वैद्यकीय संचालक यांनी सध्याचे आवश्यकतेनुसार श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये १५ व साईनाथ रुग्णालयात ५ अशा २० परिसेविकांची आवश्यकता असल्याचे सांगितले आहे. याबाबत संस्थान रुग्णालयातील पात्र परिचारीका यांना परिसेविका पदावर पदोन्नती देणेबाबत विचार करता येईल. ही सर्व पदे जेष्ठता यादीतील पात्र कर्मचा-यांतून उपलब्ध होतील.

परिचारीका पदावर पदोन्नतीसाठी शासन निर्णय क्र.जा.क्र.उपसंआसे/आस्था ३/सहा.अ./ ज्ये.सु./ ३५४३१/ २००८ दि.१८/०८/२००८ खालीलप्रमाणे आहे.

SISTER / WARD - MASTER REGIONAL CADRE :-

Appointment to the post at the Non-Teaching Government Hospitals shall be made by the Surgeon General, by promotion from amongst the Staff Nurses on the Regional Cadre who :-

१) unless already in the service of the Government of Maharashtra are not more than ४० years of age.

२) are qualified nurse-midwives, qualified nurses and registered with the Maharashtra Nursing Council or are eligible for such Registration and ordinarily should have not less than ३ years experience as such from the date of qualifying.
३) or hold B.Sc. Degree in Nursing recognised by the Indian Nursing Council and registered by the Maharashtra Nursing Council and or are eligible for such registration.
If suitable staff nurses are not available on the staff of Government Hospitals within the region concerned and the appointment shall be made to these posts from amongst suitable staff nurses from an other region.

उपरोक्त निर्णयात अ.क्र.०१ कर्मचा-यांचे वय वर्ष ४० च्या पुढे असू नये असे नमूद केले आहे. याबाबत संस्थानमधील सद्या सिस्टर पदावर काम करीत असलेल्या सेवाजेष्ठ पात्र १२ परिचारीकांचे वय वर्ष ४० च्या पुढे आहे. त्यांना वयाबाबत सवलत देऊन पदोन्नती देणेबाबत विचार करता येईल. अ.नं.२ ज्यांचा तीन वर्षाचा अनुभव आहे व नर्सिंग मेडीकल कौन्सीलकडे रजिस्ट्रेशन केले आहे अशा परिचारिका पात्र ठरतात. किंवा अ.नं.३ इंडियन नर्सिग कौन्सीलकडे रजिस्ट्रेशन केलेल्या व बी.एस्सी. नर्सिंग शैक्षणिक पात्रता असलेल्या परिचारीकाही पदोन्नतीसाठी पात्र आहेत, असे नमूद केले आहे.
श्री साईनाथ रुग्णालयाकडील सध्याचे ६२ परिचारीकेमधून १५ परिचारीकांना १२ वर्षाची वरिष्ठ वेतनश्रेणी रुपये- ५५००-१७५-९००० अशी देण्यात आलेली आहे. ज्यांचे काम समाधानकारक, वर्तणूक चांगली व इतर अभिप्राय चांगले आहे, अशांचे अधिक्षिका, श्री साईनाथ रुग्णालय, यांचेकडून गोपनीय अहवाल मागविण्यात आले असता, त्यांनी खालील कर्मचा-यांचे गोपनीय अहवाल दि.२६/११/२००७ रोजी इकडेस पाठविले आहे. अहवाल पुढीलप्रमाणे :-

अ. नं	**कर्मचा-यांचे नांव, जन्म तारीख व वय वर्ष**	**१२ वर्षा नंतर दिलेली वेतनश्रेणी व दिनांक**	**वैद्यकिय अधिक्षिका यांचे अभिप्राय**
०१	श्री देवकर रामदास शंकर २०/१२/१९४९ ५८ वर्ष ८ महिने	रु.५५००-९००० ---------- दि.०७/०५/२००२.	काम समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे योग्य रितीने कामे करीत आहे. त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत. त्यांची कामाबाबत नियमितता व कामाची सचोटी चांगली आहे.
०२	सो.कांबळे उषा इसाक (सौ.पाडळे उषा विजयानंद) १५/११/१९५३ ५४ वर्ष ९ महिने	रु.५५००-९००० ---------- दि.०७/०५/२००१	काम समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे योग्य रितीने कामे करीत आहे. त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत. त्यांची कामाबाबत नियमितता व कामाची सचोटी चांगली आहे.
०३	सौ.शिंदे गिता आप्पासाहेब ०१/०६/१९४९ ५९ वर्ष ०२ महिने	रु.५५००-९००० ---------- दि.०९/०५/२००१.	काम समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे योग्य रितीने कामे करीत आहे.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत. त्यांची कामाबाबत नियमितता व कामाची सचोटी चांगली आहे.
०४	सौ.पाटोळे रेखा किरण २७/०५/१९५१ ५७ वर्ष ०३ महिने	रु.५५००-९००० ---------- दि.०९/०५/२००१	काम समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे योग्य रितीने कामे करीत आहे.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत. त्यांची कामाबाबत नियमितता व कामाची सचोटी चांगली आहे.
०५	सौ.मुसमाडे कल्पना रघुनाथ ०१/०१/१९६५ ४३ वर्ष ०८ महिने	रु.५५००-९००० ---------- दि.१८/०५/२००१	त्या हुकूमाप्रमाणे काम करतात. त्यांचे काम व वर्तणूक समाधानकारक आहे. त्यांचे गैरवर्तनाबाबत त्यांची काही प्रकरणे चालू नाहीत.
०६	सौ.जाधव कांचन बाळासाहेब १५/११/१९६१ ४६ वर्ष ९ महिने	रु.५५००-९००० ---------- दि.०१/०५/२००२	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
०७	सौ.चोपडे शोभा किरण २५/०२/१९५६ ५२ वर्ष ०६ महिने	रु.५५००-९००० ---------- दि.२१/०५/२००२	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
०८	श्री दिंगबर अनंत सलगरकर २६/०५/१९६६ ४२ वर्ष ०३ महिने	रु.५५००-९००० ---------- दि.०१/०८/२००२	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
०९	सौ. प्रयाग जयश्री नागनाथ १३/०८/१९५० ५८ वर्ष	रु.५५००-९००० ---------- दि.११/१२/२००२.	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
१०	सौ.कराडे वैशाली मिलिंद १५/०५/१९६९ ३९ वर्ष ०३ महिने	रु.५५००-९००० ---------- दि.०७/०१/२००४	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.

११	सौ. निशा मधुकर बारसे ३०/०५/१९६९ ३९ वर्ष ०३ महिने	रु.५०००-८००० ----------	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
१२	सौ.देव पुजा सुनिल ११/११/१९६५ ३३ वर्ष ०३ महिने	रु.५५००-९००० ---------- दि.०९/०१/२००४	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
१३	सौ.संजया सतिश वाणी २०/०५/१९७० ३८ वर्ष ०३ महिने	रु.५५००-९००० ----------	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
१४	कु. आशा तुळशीराम रोकडे ०१/०६/१९६६ ४२ वर्ष ०२ महिने	रु.५०००-८००० ----------	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
१५	सौ.गायकवाड कल्पना जगन्नाथ (सौ. बोधक कल्पना प्रकाश) १३/११/१९६६ ४१ वर्ष ०९ महिने	रु.५५००-९००० ---------- दि.११/०१/२००४.	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
१६	सौ.उषाक्रांती दशरथ कांडेकर २४/०९/१९६६ ४१ वर्ष ११ महिने	रु.५५००-९००० ---------- दि.०१/०३/२००४.	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
१७	सौ.संगिता संजय थोरात (कसबे संगिता शामसुंदर) ०३/०१/१९७० ३८ वर्ष ०७ महिने	रु.५५००-९००० ---------- दि.१८/११/२००४.	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
	रुपये-५०००-१५०-८०००		
०१	सौ.विद्या विजय कदम (विद्या एकनाथ शिंदे) २०/०६/१९७१ ३७ वर्ष ०२ महिने	रु.५०००-८००० ---------- २२/०१/१९९२ ते ०३/११/१९९८ व पुढे रजेवर दि.०१/१२/२००३ ला पुन्हा हजर	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
०२	सौ.निर्मला दिंगंबर सलगरकर १९/१२/१९६७ ४० वर्ष ०८ महिने	रु.५०००-८००० ---------- दि.२२/०१/१९९३	त्या हुकूमाप्रमाणे काम करतात. त्यांचे काम व वर्तणूक समाधानकारक आहे. त्यांचे गैरवर्तनाबाबत त्यांची काही प्रकरणे चालू नाहीत.
०३	सौ.सविता ज्योतिलाल जाधव ०५/१०/१९६९ ३८ वर्ष १० महिने	रु.५०००-८००० ---------- दि.२२/०१/१९९४	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
०४	कु.नजमा नुरमहम्मद सय्यद ०७/०३/१९६८ ४० वर्ष ०५ महिने	रु.५०००-८००० ---------- दि.२३/०७/१९९४	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
०५	कु.सुचिता चंद्रकांत कुलकर्णी २९/१०/१९७१ ३६ वर्ष १० महिने	रु.५०००-८००० ---------- दि.१९/०५/१९९८	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
०६	कु.सिमा प्रकाश पाटील १४/०९/१९६० ४७ वर्ष ११ महिने	रु.५०००-८००० ---------- दि.०१/०६/१९९८	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
०७	कु.असुंता नानासाहेब वाघमारे ३०/०१/१९६५ ४३ वर्ष ०७ महिने	रु.५०००-८००० ---------- दि.३०/०७/१९९८	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
०८	सौ.किरण सुधीर धोटे (बोंबर्डे किरण टी.) २५/०७/१९७३ ३५ वर्ष ०१ महिने	रु.५०००-८००० ---------- दि.०५/०७/२०००	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
०९	सौ.सुरेखा राजु गायकवाड (पांडकर सुरेखा बाळकृष्ण) २०/१०/१९६८ ३९ वर्ष १० महिने	रु.५०००-८००० ---------- दि.२८/०७/२०००	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
१०	श्रीमती फिलोमिना रमेश सोनवणे	रु.५०००-८०००	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य

	(सोनवणे फिलोमिना पावलस) २०/१०/१९५९ ४८ वर्ष १० महिने	---------- दि.२९/०७/२०००	रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
११	श्री दत्तात्रय माधव गायकवाड ०१/०६/१९६५ ४३ वर्ष ०२ महिने	रु.५०००-८००० ---------- दि.३०/०७/२०००	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
१२	श्रीमती पुष्पलता प्रभाकर भैलुमे (काळे पुष्पलता प्रभाकर) २०/१०/१९५६ ५१ वर्ष १० महिने	रु.५०००-८००० ---------- दि.३१/०७/२०००	त्या हुकूमाप्रमाणे काम करतात. त्यांचे काम व वर्तणूक समाधानकारक आहे. त्यांचे गैरवर्तना बाबत त्यांची काही प्रकरणे चालू नाहीत.
१३	सौ.छाया गणेश शिंदे (अल्हाट छाया विठ्ठलराव) १४/११/१९६१ ४६ वर्ष ०९ महिने	रु.५०००-८००० ---------- दि.३१/०७/२०००	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
१४	श्रीमती लिली जॉन्स कचोरीयल २५/११/१९५७ ५० वर्ष ०९ महिने	रु.५०००-८००० ---------- दि.०१/०८/२०००	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
१५	श्रीमती कमल थॉमस कदम १९/०४/१९६५ ४३ वर्ष ०४ महिने	रु.५०००-८००० ---------- दि.०१/०८/२०००	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
१६	श्रीमती सुमित्रा गंगाधर बिराजदार ०१/०६/१९६६ ४२ वर्ष ०२ महिने	रु.५०००-८००० ---------- दि.०१/०८/२०००	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
१७	श्रीमती निर्मला संपत साळवे १०/११/१९६९ ३८ वर्ष ०९ महिने	रु.५०००-८००० ---------- दि.०१/०८/२०००	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
१८	सौ.अनिता बबन कडुस (अनिता पांडुरंग भालसिंग) ०१/०६/१९७१ ३७ वर्ष ०२ महिने	रु.५०००-८००० ---------- दि.०१/०८/२०००	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
१९	श्रीमती इंदिरा गोधाजी गोन्टे ०१/०१/१९७२ ३६ वर्ष ०८ महिने	रु.५०००-८००० ---------- दि.०१/०८/२०००	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
२०	श्रीमती सुनिता दादा साळवे ०३/०७/१९६९ ३९ वर्ष ०१ महिना	रु.५०००-८००० ---------- दि.०२/०८/२०००	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
२१	सौ.छाया संजय गोंधळी २२/०४/१९७३ ३६ वर्ष ०४ महिने	रु.५०००-८००० ---------- दि.०२/०८/२०००	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
२२	श्रीमती प्रतिभा नामदेव गायकवाड १०/०८/१९७४ ३४ वर्ष	रु.५०००-८००० ---------- दि.०५/०८/२०००	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
२३	सौ.सुनिता बाळासाहेब म्हस्के (सुनिता बाजीराव भालेराव) ०१/०६/१९७२ ३६ वर्ष ०२ महिने	रु.५०००-८००० ---------- दि.०७/०८/२०००	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
२४	सौ.प्रणाली प्रमोद सोमण (केतकर प्रभावती विनायक) २७/०१/१९६७ ४१ वर्ष ०८ महिने	रु.५०००-८००० ---------- दि.०८/०८/२०००	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
२५	श्रीमती शकुंतला शंकर मोहिते २६/१२/१९७२ ३५ वर्ष ०८ महिने	रु.५०००-८००० ---------- दि.०९/०८/२०००	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
२६	श्रीमती मनिषा भालचंद्र सराफ २९/०७/१९७२ ३६ वर्ष ०१ महिना	रु.५०००-८००० ---------- दि.१०/०८/२०००	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
२७	श्रीमती तेरेसा एकनाथ गायकवाड ०५/०६/१९७३ ३५ वर्ष ०२ महिने	रु.५०००-८००० ---------- दि.११/०८/२०००	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.

२८	सौ.प्रतिभा महेंद्र भराड (प्रतिभा भिमाशंकर आसणे) २०/१०/१९७४ ३३ वर्ष १० महिने	रु.५०००-८००० ---------- दि.३०/०९/२०००	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
२९	सौ.योगिता अजय गरुड (बेबी बाबुराव सापिके) ०१/०६/१९७५ ३३ वर्ष ०२ महिने	रु.५०००-८००० ---------- दि.३०/०९/२०००	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
३०	श्रीमती मिनाश्री सुभाष ओहळ (मिनाश्री आनंदराव गायकवाड) २५/१०/१९६८ ३९ वर्ष १० महिने	रु.५०००-८००० ---------- दि.०५/१०/२०००	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
३१	श्री शिवरुद्र महालिंगाप्पा मुरगे ०७/०६/१९७० ३८ वर्ष ०२ महिने	रु.५०००-८००० ---------- दि.०५/१०/२०००	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
३२	सौ.निर्मला शिवरुद्र मुरगे २२/०९/१९७४ ३३ वर्ष ११ महिने	रु.५०००-८००० ---------- दि.०५/१०/२०००	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
३३	सौ.मंदाकिनी सिताराम कडू ०१/०६/१९६४ ४४ वर्ष ०२ महिने	रु.५०००-८००० ---------- दि.०९/१०/२०००	त्या हुकूमाप्रमाणे काम करतात. त्यांचे काम व वर्तणूक समाधानकारक आहे. त्यांचे गैरवर्तना बाबत त्यांचे काही प्रकरणे चालू नाहीत.
३४	श्रीमती मदीना मुस्ताक खान ०४/०३/१९६१ ४७ वर्ष ०५ महिने	रु.५०००-८००० ---------- दि.१०/१०/२०००	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
३५	सौ.रुक्साना साजिद खान (मुजावर रुक्साना सुलेमान) ०१/०५/१९७० ३८ वर्ष ०३ महिने	रु.५०००-८००० ---------- दि. १०/१०/२०००	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
३६	कु.साधना ज्ञानेश्वर डमरे ०१/०६/१९७१ ३७ वर्ष ०२ महिने	रु.५०००-८००० ---------- दि. १२/१०/२०००	जा.नं.एसएसएस/वशी-०७ए/१४२९/२००७ दि.०७/०६/२००७ अन्वये दि.१०/०६/२००७ पर्यंत मेडीकल फिटनेस सर्टिफिकेट प्रशासन कार्यालयास सादर न केल्याने त्यांची दि.११/०६/२००७ पासून अद्यापपर्यत विनावेतन रजा धरण्यात आलेली आहे.
३७	श्री बळीराम बंडु दाभाडे १५/१०/१९६३ ४४ वर्ष १० महिने	रु.५०००-८००० ---------- दि. १३/१०/२०००	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
३८	श्री सुवर्णा अंबादास व्हनमाने (सुवर्णा तुळशिराम चौगुले) १७/०८/१९६६ ४२ वर्ष	रु.५०००-८००० ---------- दि. १३/१०/२०००	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
३९	श्रीमती उल्का संजय थिटे (उल्का जगन्नाथ शिंदे) ०१/०३/१९७० ३८ वर्ष ०५ महिने	रु.५०००-८००० ---------- दि. १३/१०/२०००	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
४०	कु.जयश्री अंबादास गायकवाड ०१/०६/१९७० ३८ वर्ष ०२ महिने	रु.५०००-८००० ---------- दि. १३/१०/२०००	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
४१	सौ.अनिता अनिल मुंतोडे ११/११/१९६७ ४० वर्ष ०९ महिने	रु.५०००-८००० ---------- दि. १४/१०/२०००	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
४२	सौ.लता अनिल रायरीकर (सौ.लता अर्जुन निकाळजे) ३१/०५/१९६९ ३९ वर्ष ०३ महिने	रु.५०००-८००० ---------- दि. १६/१०/२०००	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.
४३	सौ.लता मधुकर बारसे (लता नामदेवराव नागरे) ०९/०१/१९७२ ३६ वर्ष ०७ महिने	रु.५०००-८००० ---------- दि. १६/१०/२०००	काम व वर्तणूक समाधानकारक आहे. हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत गैरवर्तनाबाबत प्रकरणे चालू नाहीत.

०१) श्री साईनाथ रुग्णालयाकडील आकृतीबंधात दर्शविलेल्या १४ पैकी पुर्वी ९ परिचारिकांना सिस्टर इन्चार्ज पदावर पदोन्नती दिलेली होती पैकी १ पदावरील कर्मचारी असि.मेट्रन झाल्याने व दोन सेवानिवृत्त झाल्याने ती पदे रिक्त असून सध्या सहा सिस्टर इन्चार्ज सेवेत कार्यरत आहेत.

०२) श्री साईबाबा रुग्णालयाकडे १५ व श्री साईनाथ रुग्णालयाकडे ५ अशी तुर्त २० सिस्टर इन्चार्जची पदे भरावयाची झाल्यास उपरोक्त श्री साईनाथ रुग्णालयातील जेष्ठ व पात्र परिचारीकांमधून १०० बिंदू नामावलीनूसार २० परिचारीकांना पदोन्नती देणेबाबत विचार करता येईल.

सध्या सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांची सेवा जेष्ठता, पात्रता व आरक्षणानूसार ती पदे पदोन्नतीने खालील वर्गवारी प्रमाणे भरता येईल.

अ.नं	पदनाम	मंजूर पदे संख्या	पदांची स्थिती	अनुसुचीत जाती (Scheduled cast) १३%	अनुसूचीत जमाती (Scheduled Tribes) ७%	निसुज ३% भज ८% DT/NT ११ %	विशेष मागास प्रवर्ग Special Backward Category २%	इतर मागास प्रवर्ग व खुला Other Backward Category & Open (१९+४८) ६७ %	एकुण अनुशेष ३३% ४ ते ७	एकूण
	०१	०२	०३	०४	०५	०६	०७	०८	०९	१०
०१	परि सेविका	२६ ०६ २०	एकुण भरलेली भरावयाची	०३ ०१ ०२	०२ -- ०२	०३ -- ०३	०१ -- ०१	१७ ०५ १२	०९ -- ०८	२६ ०६ २०

श्री साईनाथ रुग्णालय ५ व श्री साईबाबा हॉस्पीटल १५ अशा २० जागांवर जेष्ठता, पात्रता व आरक्षणानूसार पदोन्नती द्यावयाची झाल्यास ती नांवे खालील प्रमाणे येतील.

०१) खुला व इतर मागास वर्ग (ओपन व ओबीसी) १२ जागा :- रुपये- ५५००-१७५-९०००.

०१) श्री देवकर रामदास शंकर हिंदु-मराठा (खुला)
०२) सौ.कांबळे उषा इसाक, हिंदु-ख्रि.(खुला)
०३) सौ.शिंदे गिता आप्पासाहेब हिंदु-माळी (इमाप्र)
०४) सौ.पाटोळे रेखा किरण, हिंदु-मराठा (खुला)
०५) सौ.मुसमाडे कल्पना रघुनाथ हिंदु-मराठा (खुला)
०६) सौ.जाधव कांचन बाळासाहेब, हिंदु-मराठा (खुला)
०७) सौ.शोभा किरण चोपडे, हिंदु-ख्रि. (खुला)
०८) श्री.दिगंबर अनंत सलगरकर, हिंदु-ब्राह्मण (खुला)
०९) सौ.जयश्री नागनाथ प्रयाग, हिंदु-ब्राह्मण (खुला)
१०) सौ.कराडे वैशाली मिलींद, हिंदु-माळी (इमाव)
११) सौ.निशा मधुकर बारशे, हिंदु-कोळी (इमाव)
१२) सौ.पूजा सुनिल देव, हिंदु-ब्राह्मण (खुला)

०२)अजा (एससी) २ जागा :- (रु.५५००-९०००) या वेतनश्रेणीत

१) सौ.कल्पना प्रकाश बोधक, हिंदु-महार
०२) सौ.थोरात संगिता संजय, हिंदु-महार

०३) अ.ज. (एसटी) २ जागा :- सध्या या वर्गवारीत रु.५५००-१७५-९००० व रु.५०००-१५०-८००० या वेतनश्रेणीत कर्मचारी नाही.अनुशेष पुढे भरता येईल.

०४) निसुज व भज (डीटी/एनटी) ३ जागा :- सध्या या वर्गवारीत / वेतनश्रेणीत कर्मचारी नाही. तथापी रुपये- ५०००-१५०-८००० या वेतनश्रेणीत ०१) श्रीमती व्हनमाने सुवर्णा तुकाराम, हिंदु-धनगर (भज) (यांचे पाच वर्षाचे गोपनिय अहवाल पहाता त्याची प्रतवारी B+म्हणजे निश्चितच चांगली आहे.) व ०२) श्रीमती गायकवाड जयश्री अंबादास, हिंदु-कैकाडी (भज) या कर्मचारी आहेत. (यांचे पाच वर्षाचे गोपनिय अहवाल पहाता त्याची प्रतवारी B+म्हणजे निश्चितच चांगली आहे.)

०५) विमाप्र (एसबीसी) १ जागा :- रुपये- ५५००-१७५-९००० व ५००० - ८००० या वेतनश्रेणीत कर्मचारी नाही.

तरी क्र.०१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे खुला व इमाव गटातील ज्यांची वेतनश्रेणी **रुपये- ५५००-१७५-९०००** अशी आहे.अशा उपरोक्त ११ व श्रीमती बारशे यांची वेतनश्रेणी ५०००-८००० या एक अशा १२ परिचारीका यांना परिसेविका या पदावर पदोन्नती देणेबाबत.

क्रमांक ०२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अ.जा.(एस.सी.) गटातील ज्यांची वेतनश्रेणी रुपये- ५५००-१७५-९००० अशी आहे. अशा उपरोक्त २ परिचारीका यांना परिसेविका या पदावर पदोन्नती देणेबाबत.

क्रमांक ०३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अ.ज.(एस.टी.) २ पदे - यात कर्मचारी नसल्याने या वर्गवारीतील अनुशेष पुढे घेवून उपलब्धेनुसार पदोन्नती देता येईल.

क्रमांक ०४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे नि.यु.ज. व भ.ज. (डी.टी./एस.टी.) - ३ जागा ५५००-९००० या वेतनश्रेणीत कर्मचारी नसल्याने ५०००-८००० मधील श्रीमती सुवर्णा व्हनमाने व श्रीमती जयश्री गायकवाड या दोन परिचारीका यांना पदोन्नती देणेबाबत. (एक पद अनुशेष पुढे ओढून नियमाप्रमाणे उपलब्धतेनुसार पदोन्नती देता येईल.)

क्रमांक ०५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे वि.मा.प्र.- १ जागा या गटात कर्मचारी नसल्याने अनुशेष पुढे ओढून नियमाप्रमाणे उपलब्धतेनुसार पदोन्नती देता येईल.

उपरोक्त प्रमाणे १६ पात्र कर्मचा-यांना परिसेविका पदावर पदोन्नती देवून २ अ.ज., नियुज/भ.ज.१ व १ विमाप्र अशा ४ पदाचा अनुशेष पुढे ओढता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त पात्र परिसेविकांच्या मा.स्थानिक विश्वस्त, मा.कार्यकारी अधिकारी, वैद्यकीय संचालक व वैद्यकीय अधिक्षिका यांनी मुलाखती घेऊन सिस्टर इनचार्ज पदावर पदोन्नती देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

३६ <u>मुकादम या पदावर पदोन्नती देणेबाबत.</u>

श्री सुकलाल लक्ष्मण हारळे व इतर सहया करणारे शिपाई / मदतनिस कर्मचारी यांनी त्यांचे दि. १६/०८/२००७ रोजीचे अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, आम्ही सर्व सहया करणारे कर्मचारी श्री साईबाबा संस्थानमध्ये दि.०१/०१/१९८२ पासून कायम सेवेत असून,आज पावेतो विविध विभागात शिपाई, मदतनिस या पदाची कामे केलेली आहे.तसेच आम्हांस दि.०१/०१/१९९५ रोजी मदतनिस या पदावर १२ वर्ष पुर्ण झाल्यानंतर वर्ग ३ व ४ मधील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने असलेली कुंठीतता घालविण्या संबंधीची योजना शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.१/९५/बारा उपरोक्त विषयाच्या संदर्भाधीन शासन निर्णयातील अटींची पूर्तता केल्यामुळे आम्हांस कार्यालयीन आदेश जा.नं.एसएसएस/वशी-०१/ १२५०५/९६ अन्वये दि.९/११/१९९६ अन्वये वर्ग-४ पदाच्या पदोन्नती साखळीतील वरच्या पदाची वेतनश्रेणी / वरीष्ठ वेतनश्रेणी दि.०१/०१/१९९५ पासून रु.-२६१०-६०-२९१०-६५-३३००-७०-४००० अशी देण्यात आली असून आज अखेर पर्यत शिपाई / मदतनिस या पदावर आम्ही काम करीत असून आमचे सध्याचे मुळ वेतन रु.३७९०-७०-४००० असे आहे. आमचे "" मुकादम " पदनामात बदल झाल्यास संस्थानचे आस्थापनेवर वाढीव खर्चाचा कुठल्याही प्रकारचा आर्थिक भार पडणार नाही.

शासन निर्णयानुसार आश्वासित प्रगती योजने अंतर्गत देण्यात आलेल्या नियम व अट क्र.०३ मध्ये " या योजने अंतर्गत पदोन्नतीची वेतनश्रेणी मिळाली, तरी कर्मचाऱ्यांचे नांव कनिष्ठ संवर्गाचे (मुळ) सेवा जेष्ठता सुचीतच राहील.व सेवा प्रवेश नियमावलीतील तरतुदीनुसार नजिकच्या वरिष्ठ वेतनश्रेणीतील रिक्त पदावर उपलब्ध पदोन्नतीसाठी त्यांचा विचार करण्यात येईल ", असे आहे.

आता संस्थानमध्ये "मुकादम " हुद्याची अनेक पदे उपलब्ध आहेत,असे समजते.तरी वरिल आश्वासित सेवा योजने अंतर्गत उपरोक्त नियमानुसार आम्हाला रिक्त असलेल्या "" मुकादम "या हुद्याचे पदनाम मिळावे, असे नमुद केले आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी कर्मचारी आकृतिबंध मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये मंजूर होऊन सदरचे आकृतिबंधाची प्रत मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेली आहे. त्यात "" मुकादम " या हुद्याची एकुण ५५ पदे असून सध्या ९ पदे भरलेली असून ४६ पदे रिक्त आहेत. त्यांची माहीती खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	विभागाचे नांव	प्रस्तावित पदे	भरलेली पदे	रिक्त पदे
०१	प्रसादालय विभाग	१२	०३	**०९**
०२	मंदिर (नैवेद्य कोठी)	०१	०१	**००**
०३	बांधकाम विभाग	०७	०२	**०५**
०४	स्वच्छता विभाग	१७	००	**१७**
०५	संरक्षण विभाग (सुरक्षा निरीक्षक)	१८	०३	**१५**
	एकूण :-	**५५**	**०९**	**४६**

या एकुण ५५ पदांची संस्थान ध्येयधोरण व आरक्षणानुसार खालील प्रमाणे कर्मचारी वर्गवारी येईल.

पदनाम	मंजूर पदे संख्या	पदांची स्थिती	अनुसुचीत जाती (Scheduled cast)१३%	अनुसूचीत जमाती (Scheduled	वि.मु.ज. ३% D. T. (A) भ. ज. N. T. (BCD) ८% ---------- **एकुण - ११%**	विशेष मागास प्रवर्ग Special Backward Category २%	एकुण अनुशेष ५२%- ४ ते	ओपन -४८% ओ.बी.सी.-१९% ---------- **एकुण - ६७%**	एकुण
०१	**०२**	**०३**	**०४**	**०५**	**०६**	**०७**	**०८**	**०९**	**१०**
मुकादम	५५	एकुण पदे	०७	०४	२+४=६	०१	१८	२६+११+३७	**५५**
	०९	भरलेली पदे	०१	००	०१	००	०२	०७	**०९**
	४६	रिक्त पदे	**०६**	**०४**	**०५**	**०१**	**१६**	**३०**	**४६**

तरी उपरोक्त अ.क्र.०१ ते ०४ या विभागासाठी आश्वासित सेवा योजने अंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मिळालेले शिपाई / मदतनिस तसेच आस्थापनेतील दि. ०१/०७/१९७० ते दि ०१/०९/१९८४ अखेर पर्यंतचे मदतनिस (एकूण १७३ कर्मचा-यांमधून) यांची सेवा जेष्ठता, शैक्षणिक पात्रता, अनुभव, गोपनिय अहवाल तसेच शासन अधिनियमानुसार रिक्त असलेल्या ४६ ""मुकादम " या पदावर "" शिपाई / मदतनिस " यातून ३१ कर्मचा-यांना पदोन्नती देता येईल. तसेच अ.क्र. ०५ मध्ये संरक्षण विभागातील (सुरक्षा निरीक्षक) रिक्त पदांच्या पदोन्नतीसाठी सेवा जेष्ठता यादीतील सेवाजेष्ठता, शैक्षणिक पात्रता व निरीक्षक पदासाठीची शारिरीक

पात्रता, अनुभव, गोपनिय अहवाल विचारात घेऊन १५ अशा एकुण ४६ कर्मचा-यांना पदोन्नती देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचा नवीन सुधारित कर्मचारी आकृतीबंध शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे. सदरहू आकृतीबंधाचे मान्यतेनंतर मुकादम पदावर पदोन्नती देणेबाबतचा विचार करण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

३७ संस्थान सेवेत कायम करुन वेतनश्रेणी देणेबाबत.

श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिरडी चे आस्थापनेवर कायम सेवेत असतांना निधन झालेल्या कर्मचा-यांच्या जागी त्यांच्या जवळच्या एका पात्र नातेवाईकास महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२८/०३/२००१ व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१००४-प्र.क्र.५१/२००४, आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२२/०८/२००५ सुधारीत शासन निर्णय २ (२) चे अधिन राहून अनुकंपा तत्वावर त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार वर्ग-०४ चे कर्मचारी म्हणून सेवेत घेण्यात आलेले आहे.

सदर उमेदवारांना नेमणूक देताना दोन वर्षाचा परिवीक्षाधीन कालावधी देऊन त्यांना प्रथम वर्षी दरमहा एकत्रित वेतन रु. २०००/- इतके देण्यात आलेले आहे. व एक वर्ष परिवीक्षाधीन कालावधी योग्य रितीने पूर्ण केल्यास त्यास दुस-या वर्षी रु. ५००/- वाढ देऊन एकूण रु. २५००/- इतके दरमहा एकत्रित वेतन देण्यात येत आहे. त्यांचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

अ.नं.	कर्मचा-यांचे नांव पदनाम	विभाग	नेमणूक तारीख	दोन वर्षे परिवीक्षाधीन कालावधी संम्पुष्ठात आल्याची तारीख	संस्थान सेवेत कायम करुन वेतनश्रेणी देय होत असल्याची तारीख
०१.	श्री. किरण आण्णा धिवर वर्ग-०४ कर्मचारी	प्रसादालय	०१/०६/२००५	३१/०५/२००७	०१/०६/२००७
०२.	श्रीमती अनिता म. दाभाडे वर्ग-०४ कर्मचारी	प्रसादालय	१८/०९/२००५	१७/०९/२००५	१८/०९/२००७
०३.	श्रीमती सुनिता रा. कर्पे वर्ग-०४ कर्मचारी	प्रसादालय	१८/०९/२००५	१७/०९/२००५	१८/०९/२००७
०४.	श्रीमती यशोदा भ ठाकरे वर्ग-०४ कर्मचारी	प्रसादालय	०१/०१/२००६	३१/१२/२००८	०१/०१/२००८
०५.	श्री. विकास रा. दिवटे वर्ग-०४ कर्मचारी	प्रसादालय	१४/०३/२००६	१३/०३/२००८	१४/०३/२००८
०६.	श्री. घनश्याम रा. शर्मा वर्ग-०४ कर्मचारी	प्रसादालय	१२/०४/२००६	११/०४/२००८	१२/०४/२००८
०७.	श्री. विवेक सु. शिदोडकर वर्ग-०४ कर्मचारी	प्रशासन शाखा	१२/०४/२००६	११/०४/२००८	१२/०४/२००८
०८.	श्रीमती विमल वि.धुळसैंदर वर्ग-०४ कर्मचारी	प्रसादालय	०२/०६/२००६	०१/०६/२००८	०२/०६/२००८

उपरोक्त अ.नं. ०१ ते ०८ वरील याचे परिवीक्षाधीन कालावधी मध्ये काम समाकारक असून त्याचे बाबत कोणतेही प्रकरण चालू नाही. त्यांना सेवेत कायम करुन वेतनश्रेणी देण्यास हरकत नाही, असे अभिप्राय संबंधीत अधिक्षक यांनी दिले आहेत.

तरी उपरोक्त ०१ ते ०८ यांचे बाबत संबंधीत अधिक्षक यांचे अभिप्राय विचारात घेऊन त्यांना त्यांचे नांवासमोर दर्शविलेल्या तारखेपासून (कॉलम ०६) रु.२५५०-५५-२६६०-६०-३२०० ही वेतनश्रेणी देऊन, संस्थान सेवेत कायम करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, अनुकंपा नेमणूकीबाबत शासनाकडील माहिती घेऊन फेर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

३८ हॉस्पिटलकडील वैद्यकीय अधिकारी यांचे नेमणूकीबाबत.

संस्थानचे हॉस्पीटल करीता आर.एम.ओ., क्लिनीकल असिस्टंट (रेडीओलॉजी) व ज्यु.रेडीओलॉजिस्ट या रिक्त पदांसाठी टाईम्स ऑफ इंडीया, इंडियन एक्सप्रेस, सकाळ या वर्तमान पत्रामध्ये जाहीरात प्रसिध्द करुन दि.**०१/०९/२००८** वार सोमवार रोजी समक्ष मुलाखती आयोजित करण्यात आल्या होत्या.

मा. विश्वस्त श्री अशोक खांबेकर सो, वैद्यकिय संचालक डॉ. सी.एस. बोबडे, वैद्यकिय उपसंचालक डॉ.एन.एस.म्हस्के, यांचे उपस्थितीमध्ये हजर असलेल्या पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येऊन त्यांच्या नेमणूका खालील प्रमाणे करण्यात आलेल्या आहेत.

तसेच डॉ.रश्मी तुपे, व डॉ.मंगला मुंडे यांनी संस्थानचे श्री साईबाबा व श्रीसाईनाथ हॉस्पीटलकडे नोकरी मिळणेबाबत अर्ज केले होते. त्यानुसार संबंधीतांच्या मुलाखती वैद्यकिय संचालक यांनी घेतल्या असून मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी सो यांचे अभिप्रायानुसार त्यांना करण्यात आलेल्या आहेत.

अ.नं.	वैद्यकीय अधिकारी नांव	शैक्षणिक पात्रता	नेमणूक आदेश नंबर व हॉस्पीटलचे नांव	दिलेले पदनांम व एकत्रीत मानधन /वेतन
०१.	डॉ. अविनाश रमेशराव पागधुने, अकोला	एम.बी.बी.एस.	जा.नं.एसएसएस/वशी-०१/१२९८९ /२००८ दि. ०४/०९/२००८ श्री साईबाबा हॉस्पीटल,	आर.एम.ओ. एकत्रित वेतन प्रतिमहा रु.१७,०००/-
०२.	डॉ. कापसे योगेश रामचंद्र प्रवरानगर ता.राहाता	एम.बी.बी.एस.	जा.नं.एसएसएस/वशी-०१/१२९८८ /२००८ दि. ०४/०९/२००८ श्री साईबाबा हॉस्पीटल,	आर.एम.ओ. एकत्रित वेतन प्रतिमहा रु.१७,०००/-
०३.	डॉ. राजू निंबा तलवारे, नाशिक	एम.बी.बी.एस.	जा.नं.एसएसएस/वशी-०१/१२९८७ /२००८ दि. ०४/०९/२००८ श्री साईबाबा हॉस्पीटल,	आर.एम.ओ. एकत्रित वेतन प्रतिमहा रु.१७,०००/-
०४.	डॉ. नितीन दिलीपराव आहेर अहमदनगर	एम.बी.बी.एस.	जा.नं.एसएसएस/वशी-०१/१२९८६ /२००८ दि. ०४/०९/२००८ श्री साईबाबा हॉस्पीटल,	आर.एम.ओ. एकत्रित वेतन प्रतिमहा रु.१७,०००/-
०५.	डॉ.रश्मि परांग तुपे, श्रीरामपूर	एम.डी. (मेडीसीन)	जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३४५१ /२००८ दि. १३/०९/२००८ श्री साईबाबा हॉस्पीटल,	फिजीशियन एकत्रित वेतन प्रतिमहा रु.३०,०००/-
०६.	डॉ. मंगला सोनेबापू मुंढे नाशिक	एम.बी.बी.एस डि.एम.आर ई	जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३४५२/२००८ दि. १३/०९/२००८ श्री साईबाबा हॉस्पीटल	क्लिनिकल असिस्टंट (रेडीओलॉजी) एकत्रित वेतन प्रतिमहा रु.२५,०००/-
०७	डॉ.अभिजित बी अडसूळ सातारा	ण्म.बी.बी.एस डि.आर्थो	जा.नं.एसएसएस/वशी-०१/१२४९६/२००८ दि. १३/०९/२००८ श्री साईनाथ हॉस्पीटल	आर.एम.ओ एकत्रित वेतन प्रतिमहा रु.१८,०००/-

उपरोक्त अ.नं. १ ते ०४ व ०७ वरील आर.एम.ओ यांच्या तसेच अ.नं.०५ वरील फिजीशियन व अ.नं. ०६ वरील क्लिनिकल असिस्टंट (रेडीओलॉजी) या पदावर करण्यात आलेल्या नेमणूकास मान्यता मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

३९ <u>शिक्षण सेवक (वाणिज्य) नेमणूकीबाबत.</u>

श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिरडी , श्री साईबाबा कन्याविद्यामंदिर, व श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल या विभागाकडे शिक्षण सेवक भरती कामी जाहीरात प्रसिध्द करुन अर्ज मागविण्यात आले होते. आलेल्या अर्जानुसार पात्र उमेदवारांच्या **दि.०३/०८/२००८** रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मुलाखती घेण्यात येऊन नेमणूकीसाठी निवड झालेल्या उमेदवारांना नेमणूक पत्र पाठविण्यात आलेली आहेत.

पैकी श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकरीता निवड करण्यात आलेल्या उमेद्वारांना नेमणूक पत्र पाठविण्यात आलेले असून बरेचसे उमेद्वार नेमणूकीच्या पदावर कामावर हजर झालेले आहेत.

श्री. एस.आर.येळवंडे, यांना तुमची नेमणूक संस्थानचे श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडे शिक्षणसेंवक पूर्णवेळ (वाणिज्य) या पदावर करण्यात आलेली असून तुम्ही नेमणूक पत्र घेण्यासाठी श्री साईबाबा संस्थानचे प्रशासन शाखेत हजर रहाणेबाबत त्यांना दूरध्वनी वर कळविण्यात आले होते. त्यानुसार श्री येळवंडे हे दि.०४/०९/२००८ रोजी प्रशाकिय अधिकारी श्री साबळे व श्री शिवगजे सर यांना भेटले व संस्थानकडे हजर होणेबाबत मी दि.०६/०९/२००८ पर्यंत कळवितो असे सांगितले होते. त्यानंतर दि.११/०९/२००८ रोजी पर्यंत त्यांनी कामावर हजर होणेबाबत काहीच न कळविल्यामुळे त्यांचेशी दूरध्वनीवर संपर्क साधला असता मी श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडे कामावर हजर होऊ शकत नाही असे कळविले आहे.

श्री.एस.आर.एळवंडे हे नेमणूकीच्या पदावर हजर न झाल्याने विद्यार्थ्यांचे शिक्षणाची खोटी होऊ नये म्हणून सदर पदासाठी मुलाखतीसाठी बोलाविण्यात आलेल्या यादीतील नेमणूकीकरीता प्रतिक्षा यादीवर निवड केलेल्या श्री. दिलीप विठ्ठल संगमनेरे, यांना शिक्षणसेवक (वाणिज्य) या पदावर श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडे जा.नं.एसएसएस/वशी-०१/ १३६७८/ २००८ दि.१७/०९/२००८ अन्वये नेमणूक पत्र देण्यात आलेले आहे. सदरच्या नेमणूकीस कार्योत्तर मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

४० <u>मयत झालेल्या संस्थान कर्मचाऱ्यांचे एका नातेवाईकास अनुकंपा तत्वावर संस्थान सेवेत घेणे बाबत.</u>

अ) श्री सोपान निवृत्ती हिवाळे हे संस्थानचे स्वच्छता विभागाकडे सफाई कामगार या पदावर सेवेत असतांना त्यांचे दि.१८/०३/२००८ रोजी निधन झालेले असून त्यांच्या झालेल्या सेवेबाबतची माहिती खालील प्रमाणे

०१) दिवंगत कर्मचाऱ्यांचे नांव :- कै.सोपान निवृत्ती हिवाळे

०२) मृत्युचे वेळी हुद्या व विभाग :- सफाई कामगार, स्वच्छता विभाग

०३) संस्थानमधील सेवेचा कालावधी :- दि.०६/०३/१९८९ ते दि.१७/०३/२००८

एकूण सेवा १९ वर्षे ११ दिवस

०४.मृत्यु दिनांक :- १८/०३/२००८

श्री सोपान निवृत्ती हिवाळे यांचे दि.१८/०३/२००८ रोजी निधन झाल्याने त्यांची वारसदार पत्नी नामे श्रीमती जिजाबाई सोपान हिवाळे यांनी संस्थानमध्ये पतीचे जागी अनुकंपा तत्वावर सेवेत घेणेबाबत अर्ज केला असून त्यांचे बाबत माहिती खालील प्रमाणे

०१. अर्जदाराचे नांव :- श्रीमती जिजाबाई सोपान हिवाळे
०२. मयत कर्मचाऱ्याशी नाते :- पत्नी
०३. वारसदार अर्जदाराची जन्मतारीख व वय :- दि.०२/०७/१९६९ (वय ३८वर्षे ०८ महिने)
०४. शैक्षणिक व शारीरीक पात्रता :- ०२ री

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२८/०३/२००१ व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१००४-प्र.क्र.५१/२००४,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२२/०८/२००५ सुधारीत शासन निर्णय २ (२) नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपाकारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे.त्यास अनुसरुन संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोणातून यापुर्वी अनुकंपाकारणास्तव संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे.त्यानुसार श्रीमती जिजाबाई सोपान हिवाळे (पत्नी) यांनी अर्ज सादर केलेला आहे.

दिवंगत श्री सोपान निवृत्ती हिवाळे यांची पत्नी नामे श्रीमती जिजाबाई सोपान हिवाळे हया शासन निर्णयातील तरतुदीनुसार पात्र ठरत असल्याने त्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून अनुकंपा तत्वावर वर्ग-४ चे पदावर नेमणूक देणेस

ब) तसेच श्री सिताराम जानकु धुरंधरे हे संस्थानचे खरेदी विभागात मदतनीस या पदावर सेवेत होते ते सेवेत असतांना दि.१६/०१/२००६ ते दि.०२/०५/२००७ अखेरपर्यंत ते एकूण ४७२ दिवस विनापरवाना गैरहजर होते.सदर कालावधीतील रजा विनावेतन करण्यात आलेल्याअसून ते गैरहजर असतांना त्यांचे दि.०२/०५/२००७ रोजी निधन झालेले असून त्यांच्या झालेल्या सेवेबाबतची माहिती खालील प्रमाणे

दिवंगत कर्मचाऱ्यांचे नांव :-कै.सिताराम जानकु धुरंधरे,मदतनीस खरेदी विभाग
मृत्युचे वेळी हुद्या व विभाग :- मदतनीस खरेदी विभाग
संस्थानमधील सेवेचा कालावधी :- दि.०६/०३/१९८९ ते दि.०२/०५/२००७
एकूण सेवा १७ वर्षे ०९ महिने
मृत्यु दिनांक :- ०२/०५/२००७

श्री सिताराम जानकु धुरंधरे यांचे दि.०२/०५/२००७ रोजी निधन झाल्याने त्यांचा वारसदार मोठा मुलगा नामे श्री बाळु सिताराम धुरंधरे यांनी संस्थानमध्ये वडीलांचे जागी अनुकंपा तत्वावर सेवेत घेणेबाबत अर्ज केला असून त्यांचे बाबत माहिती खालील प्रमाणे

०१. अर्जदाराचे नांव :- श्री बाळू सिताराम धुरंधरे
०२. मयत कर्मचाऱ्याशी नाते :- मुलगा
०३. वारसदार अर्जदाराची जन्मतारीख व वय :- दि.०१/०७/१९८० (वय वर्षे २७)
०४. शैक्षणिक व शारीरीक पात्रता :- ०४ थी ड्रायव्हींग लायसेन्स हेवी

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२८/०३/२००१ व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१००४-प्र.क्र.५१/२००४,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२२/०८/२००५ सुधारीत शासन निर्णय २ (२) नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपाकारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे.त्यास अनुसरुन संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोणातून यापुर्वी अनुकंपाकारणास्तव संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे.त्यानुसार श्री बाळू सिताराम धुरंधरे (मुलगा) यांनी अर्ज सादर केलेला आहे.

सदर बाबत श्री बाळू धुरंधरे यांचा लहान भाऊ नामे श्री रविंद्र सि.धुरंधरे यांनी दिवंगत धुरंधरे यांचे जागेवर त्यांचा मोठा भाऊ नामे श्री बाळू धुरंधरे यांना नोकरी देणेची संमती असलेचे दि.०२/०६/२००७रोजी करुन दिलेले पत्र यासोबत सादर केलेले आहे.

दिवंगत श्री धुरंधरे यांचा लहान मुलगा नामे श्री रविंद्र सि.धुरंधरे यांनी सादर केलेल्या पत्रास अनुसरुन दिवंगत श्री सिताराम धुरंधरे यांचा मोठा मुलगा नामे श्री बाळू सि.धुरंधरे यांना,शासन निर्णयातील तरतुदीनुसार ते पात्र ठरत असल्याने त्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून अनुकंपा तत्वावर वर्ग-४ चे पदावर नेमणूक देणेस

क) त्याचप्रमाणे दिवंगत श्री कैलास शंकर गायकवाड हे संस्थानचे कॅन्टीन विभागाकडे मदतनिस या पदावर सेवेत असतांना त्यांचे दि.०९/०७/२००८ रोजी निधन झालेले असून त्यांच्या झालेल्या सेवेबाबतची माहिती खालील प्रमाणे

०१) दिवंगत कर्मचाऱ्यांचे नांव :-कै.कैलास शंकर गायकवाड
०२) मृत्युचे वेळी हुद्या व विभाग :- मदतनिस,कॅन्टीन विभाग
०३) संस्थानमधील सेवेचा कालावधी :- दि.१०/०६/१९९३ ते दि.०८/०७/२००८

एकूण सेवा १४ वर्षे ११ महिने

०४.मृत्यु दिनांक :- ०९/०७/२००८

श्री कैलास शंकर गायकवाड यांचे दि.०९/०७/२००८ रोजी निधन झाल्याने त्यांचा वारसदार मोठा मुलगा नामे श्री दिपक कैलास गायकवाड यांनी संस्थानमध्ये वडीलांचे जागी अनुकंपा तत्वावर सेवेत घेणेबाबत अर्ज केला असून त्यांचे बाबत माहिती खालील प्रमाणे

०१. अर्जदाराचे नांव :- श्री दिपक कैलास गायकवाड

०२. मयत कर्मचाऱ्याशी नाते :- मुलगा

०३. वारसदार अर्जदाराची जन्मतारीख व वय :- दि.०६/०९/१९८९ (वय १८ वर्षे ११महिने)

०४. शैक्षणिक व शारीरीक पात्रता :- ११ वी पास एम.एस.सी.आय.टी.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२८/०३/२००१ व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१००४-प्र.क्र.५१/२००४,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२२/०८/२००५ सुधारीत शासन निर्णय २ (२) नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपाकारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे.त्यास अनुसरुन संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोणातून यापुर्वी अनुकंपाकारणास्तव संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे.त्यानुसार श्री दिपक कैलास गायकवाड (मुलगा) यांनी अर्ज सादर केलेला आहे.

तसेच दिवंगत कैलास गायकवाड यांच्या पत्नी श्रीमती कुसुम कैलास गायकवाड व त्यांचा दुसरा मुलगा नामे श्री अनिल कैलास गायकवाड यांनी वडील दिवंगत कैलास गायकवाड यांचे जागी मोठा मुलगा / मोठा भाऊ श्री दिपक कैलास गायकवाड यांना सेवेत घेणेबाबत त्यांची काहीही हरकत नसलेबाबत मा.दंडाधिकारी,राहाता यांचेसमोरील प्रतिज्ञापत्र सोबत सादर केलेले आहे.

तरी दिवंगत कैलास गायकवाड यांच्या पत्नी नामे कुसुम कै.गायकवाड तसेच त्यांचा दुसरा मुलगा नामे अनिल कैलास गायकवाड यांचे उपरोक्त प्रतिज्ञापत्रास अनुसरुन श्री दिपक कैलास गायकवाड (दिवंगत कैलास गायकवाड यांचा मोठा मुलगा) हा शासन निर्णयातील तरतुदीनुसार पात्र ठरत असल्याने त्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून अनुकंपा तत्वावर वर्ग-४ चे पदावर नेमणूक देणेस .

ड) तसेच श्री सिताराम तुकाराम कापसे हे संस्थानचे प्रसादालय विभागाकडे मदतनीस या पदावर सेवेत असतांना त्यांचे दि.१९/०१/२००८ रोजी निधन झालेले असून त्यांच्या झालेल्या सेवेबाबतची माहिती खालील प्रमाणे

०१) दिवंगत कर्मचाऱ्यांचे नांव :- कै.सिताराम तुकाराम कापसे

०२) मृत्युचे वेळी हुद्या व विभाग :- मदतनीस,प्रसादालय विभाग

०३) संस्थानमधील सेवेचा कालावधी :- दि.०६/०३/१९८९ ते दि.१९/०१/२००८

एकूण सेवा १९ वर्षे ०८ महिने १२ दिवस

०४.मृत्यु दिनांक :- १९/०१/२००८

श्री सिताराम तुकाराम कापसे यांचे दि.१९/०१/२००८ रोजी निधन झाल्याने त्यांचे वारसदार मोठा मुलगा नामे श्री भारत तुकाराम कापसे यांनी संस्थानमध्ये वडीलांचे जागी अनुकंपा तत्वावर सेवेत घेणेबाबत अर्ज केला असून त्यांचे बाबत माहिती खालील प्रमाणे

०१. अर्जदाराचे नांव :- श्री भारत सिताराम कापसे

०२. मयत कर्मचाऱ्याशी नाते :- वडील

०३. वारसदार अर्जदाराची जन्मतारीख व वय :- दि.१९/०६/१९८४ (वय २४वर्षे ०२ महिने)

०४. शैक्षणिक व शारीरीक पात्रता :- अशिक्षीत

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२८/०३/२००१ व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१००४-प्र.क्र.५१/२००४,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२२/०८/२००५ सुधारीत शासन निर्णय २ (२) नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपाकारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे.त्यास अनुसरुन संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोणातून यापुर्वी अनुकंपाकारणास्तव संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे.त्यानुसार श्री भारत सिताराम कापसे (मोठा मुलगा) यांनी अर्ज सादर केलेला आहे. तसेच मोठया भावास अनुकंपा तत्वावर नोकरीवर घेणे कामी लहान भाऊ ०१) श्री पिराजी सिताराम कापसे वय २२ वर्षे व ०२) श्री लखन सिताराम कापसे वय १९ वर्षे यांनी मा.तहसिलदार राहाता यांचे कडील प्रतिज्ञापत्रही दिलेले आहे.

दिवंगत श्री सिताराम तुकाराम कापसे यांचा मुलगा नामे श्री भारत सिताराम कापसे हे शासन निर्णयातील तरतुदीनुसार पात्र ठरत असल्याने त्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून अनुकंपा तत्वावर वर्ग-४ चे पदावर नेमणूक देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, अनुकंपा नेमणुकांबाबत शासनाकडील माहिती घेऊन फेर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

४१ <u>औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत कोपा निदेशक पदावर तात्पूरत्या नेमणूकीबाबत.</u>

श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी निदेशक कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामिंग असिस्टंट (Copa) एक पद व क्राप्टसमन फूड प्रॉडक्शन (व्हेज) निदेशक एक अशा दोन पदासाठीची दि.१६/०१/२००८ रोजीचे वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यानुसार आलेल्या अर्जांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात येवून जाहीरातीमध्ये दिलेल्या शैक्षणिक अर्हतेच्या व आरक्षीत प्रवर्गाच्या पात्र उमेदवारांना मुलाखत पत्र देण्यात आलेले होते. त्याचा तपशील खालीलप्रमाणे

श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था (अ.ज.१+१)					
अ.क्र.	पदाचे नांव	जाहीरातीत नमूद केलेली पदे	जाहीरातीनुसार आलेले अर्ज + सेवायोजन कार्यालयाकडील यादी नुसार संख्या	देण्यात आलेले कॉल	मुलाखतीस हजर उमेदवारांची संख्या
०१.	कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामिंग असिस्टंट (Copa)	(०१) पूर्णवेळ	२१+३४ = ५५	१०	०
०२.	क्राप्टसमन फूड प्रॉडक्शन (व्हेज)	(०१) पूर्णवेळ	१+२१ = २१	०९	०२ (एक नेमणूक पत्र दिले आहे.)

वरील पदासाठी दि.०३/०८/२००८ रोजी उपस्थीत उमेदवारांच्या मा.व्यवस्थापन समितीचे सदस्य, तसेच उपरोक्त विषयातील तज्ञ (एक्सपर्ट) यांचेसमोर मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत.

अ.नं.१ कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामिंग असिस्टंट (Copa) या पदासाठी १० उमेदवारांना मुलाखत पत्र देण्यात आलेले होते परंतु मुलाखतीस एकही उमेदवार हजर झालेला नाही. त्यामुळे शैक्षणिक वर्षात मुलांचे नुकसान होऊ नये म्हणून खालील दोन पात्र उमेदवारांना नेमणूक पत्र अलाहिदा देण्यात येत आहे. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे

अ.नं.	उमेदवाराचे नाव व पदनाम	शेरा
०१.	श्री.रोकडे अक्षय राजु कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामिंग असिस्टंट (Copa) **पुर्णवेळ (नियत वेतन प्रति माह रु.७५००/-)**	एक शैक्षणिक वर्षासाठी नेमणूक
०२.	श्री.परदेशी स्वप्निल शिवाजी कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामिंग असिस्टंट (Copa) **अर्धवेळ (नियत वेतन प्रति माह रु.४०००/-)**	एक शैक्षणिक वर्षासाठी नेमणूक

उपरोक्त पदे ही अ.ज.(एस.टी.) प्रवर्गातील असल्याने व चालू शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून वरील नेमणुका ह्या एक शैक्षणिक कालावधीसाठी तात्पुरत्या करण्यात येत असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

४२ <u>श्री.देवकुमार शंकर साळवे, वेतनश्रेणी रुपये ५५००-१७५-९००० मिळणेचे अर्जाबाबत</u>

श्री देवकुमार शंकर साळवे,निदेशक टूल ॲन्ड डायमेकर सध्या पर्यवेक्षक श्री साईबाबा भक्तनिवासस्थान यांनी दि.०७/०४/२००८ रोजी अर्ज करुन त्यात,"माझे पद निदेशक टुल ॲन्ड डायमेकर असून निदेशक पदाची वेतन श्रेणी रु.५५००-१७५-९००० आहे, आणि माझ्याकडे प्रशासनाने पर्यवेक्षक हि कामे सोपविलेली आहे.तरी कृपया मला माझे पदाचे कामे द्यावे व या पदाची वेतनश्रेणी द्यावी.तसेच दि.१८/०९/१९९६ पासून ते आज पावेतो तीचा फरकही द्यावा." अशी विनंती केलेली आहे.

त्यावर अधिक्षक,श्री साईबाबा भक्तनिवासस्थान यांनी, " श्री साळवे देवकुमार शंकर यांचे मागणी प्रमाणे हे पद भक्तनिवासस्थान विभागाकडे उपलब्ध नाही.त्यामुळे ज्या विभागाकडे असे पद आहे.त्या विभागाकडे श्री साळवे यांची बदली होणेस हरकत नाही.वेतनश्रेणी बाबत संस्थान प्रशासनाद्वारे उचीत निर्णय घ्यावा."असे नमूद केलेले आहे.

श्री साळवे यांची नेमणूक झाल्यानंतर दि.१८/९/१९९६ रोजी हजर होऊन आय.टी.आय.कडे निदेशक टुल ॲण्ड डायमेकर पदाचे काम परीविक्षाधीन कालावधीत पहात असताना त्यांना शिकविण्याचे काम जमत नाही, शिकविता येत नाही म्हणून विद्यार्थ्यांनी त्यांचे विरुध्द आंदोलने करुन शैक्षणिक संस्था बंद केली होती. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून त्यांची दि. १३/१०/१९९८ रोजी विद्युत विभागाकडे बदली केली. पुढे विविध विभागात संबंधित प्रमुखांच्या शिफारशीमुळे तसेच प्रशासकीय कारणास्तव बदल्या करण्यात आल्या. परंतु त्यांचे पदनाम बदलण्यात आले नाही. श्री साळवे यांची नेमणूकीची वेतनश्रेणी रु. ५०००-८००० (पूर्वीची १४००-२६००) होती. पुढे शासनाने निदेशकांची ही वेतनश्रेणी रु. ५५००-९००० अशी केली आहे. सदरहू वेतनश्रेणीची श्री साळवे यांनी मागणी केली आहे.

श्री साळवे यांची प्रथम नेमणूकीनंतर उपरोक्त कारणास्तव लगेचच बदली करण्यात आली व त्यांचे जागेवर दुस-या निदेशकाची नेमणूक करण्यात आलेली असून श्री. साळवे आज पावेतो प्रत्यक्षात शिकविण्याचे काम करीत नसून त्यांचेकडून विविध विभागात पर्यवेक्षक पदाची कामे करुन घेणेत येत आहेत. त्यांचेवर गैरवर्तनाबाबत आजपावेतो ३२ प्रकरणे चालू होती. त्यावर त्यांना अनेकवेळा दंड, अनाधिकृत गैरहजेरी व ताकीद अशा शिक्षा करण्यात आलेल्या आहेत.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साळवे यांचेबाबत संस्थान कामगार कायदे सल्लागार श्री अशोक पाटील यांचा सल्ला घेऊन खातेचौकशी पुर्ण करुन अहवाल व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना/ कामगार अधिकारी)

४३ श्रीमती प्रतिभा सर्जेराव बढे,ग्रंथालय सहाय्यक यांचे मुदतवाढ व मानधन वाढीबाबत.

श्रीमती प्रतिभा सर्जेराव बढे,मु.पो.शिर्डी यांची संस्थानचे शैक्षणिक संकुलाकडे (औद्योगिक प्रशिक्षण संस्था) ग्रंथालय सहाय्यक म्हणून दरमहा **रु.३०००/-(तीन हजार)** मात्र एकत्रीत मानधनावर एक वर्षासाठी नेमणूक करण्यात आलेली आहे.त्यानुसार त्या **दि.०३/१०/२००७** रोजी कार्यालयीन वेळेपुर्वी कामावर हजर झालेल्या असून त्यांचा एक वर्षाचा कालावधी **दि.०२/१०/२००८** अखेर संपुष्टात येत आहे.

श्रीमती प्रतिभा बढे यांनी **दि.०६/०९/२००८** रोजी अर्ज करुन,माझी मुदत **दि.०२/१०/२००८** रोजी संपत असून मला मुदतवाढ व मासिक वेतनात वाढ करावी अशी विनंती केलेली आहे.

श्रीमती प्रतिभा सर्जेराव बढे यांचे काम व वर्तणूक समाधानकारक असून त्या हुकूमाप्रमाणे योग्य रितीने कामे करतात, त्यांचेबाबत काहीही प्रकरणे चालू अथवा प्रस्तावित नाहीत.त्यांना पुढील मुदतवाढ देणेस हरकत नाही असे अभिप्राय प्राचार्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांनी दिलेले असल्याने श्रीमती प्रतिभा सर्जेराव बढे यांना रुपये ४,०००/- एकत्रित वेतनावर एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

४४ श्री.सुभाष दिगंबर जाखडी व श्री.सिताराम आप्पासाहेब देवकर, तारतंत्री यांना विद्युत पर्यवेक्षक पदावर पदोन्नती देणेबाबत.

विद्युत पर्यवेक्षक पदावर पदोन्नती मिळणेसाठी खालील दोन अर्ज आलेले आहे.

अ) उपरोक्त विषयाकीत कामी संदर्भीय अर्जाने श्री सुभाष दिगंबर जाखडी यांनी दि.२९/०६/२००६ रोजी अर्ज सादर करुन त्यात,"मी आपले संस्थानमध्ये दि.२०/०३/१९७८ पासून सुमारे २८ वर्षांपासून तारतंत्री या पदावर काम करीत आहे.मला तारतंत्री तसेच इलेक्ट्रीक पर्यवेक्षकाचे सर्व कामांची माहिती असून मी सध्या ते काम करीत आहे.मी सन.२००३ मध्ये पी.डब्लु.डी.इलेक्ट्रीक पर्यवेक्षकाची परिक्षा पास झालेलो आहे.सन.१९९८ मध्ये संस्थानमध्ये एकूण १० इलेक्ट्रीक पर्यवेक्षकांच्या जागा मंजूर झालेल्या आहेत.त्यापैकी सन.१९९८ मध्ये सात व सन.२००० मध्ये एक अशा एकूण ०८ जागा भरलेल्या आहेत.अद्याप दोन जागा भरणे बाकी आहे.मी सोबत इलेक्ट्रीक पर्यवेक्षक परीक्षा पास झाल्याबाबतचे सर्टिफीकेट सोबत सादर केलेले आहे.तरी मा.अध्यक्ष साो.यांनी माझ्या अर्जाचा सहानुभुतीपुर्वक विचार करुन मला इलेक्ट्रीक पर्यवेक्षक या पदावर पदोन्नती देवून सदर पदाची वेतनश्रेणी लागू करावी." अशी विनंती केलेली आहे.

सदर अर्जावर मा.अध्यक्ष साो.यांनी," मिटींगपुढे ठेवा."असे अभिप्राय दिलेले आहे.

ब) तसेच श्री सिताराम आप्पा देवकर वायरमन,विद्युत विभाग यांनी दि.२१/०८/२००६ रोजी अर्ज सादर करुन त्यात,"श्री साईबाबा संस्थानच्या दि.१०-११/०७/१९९९ रोजीच्या मा.व्यवस्थापन मंडळाच्या सभेत मा.विश्वस्त मंडळाने विद्युत विभागामध्ये विद्युत पर्यवेक्षकाच्या पदाच्या नऊ जागा मंजूर केलेल्या आहेत.या मंजूर पदापैकी आठ पदे भरलेली आहे.अद्याप एक पद रिक्त राहीलेले आहे.मी विद्युत विभागात तारतंत्री या पदावर गेल्या पाच वर्षापासून काम करत असून मी दि.०१/०२/२००० रोजी विद्युत पर्यवेक्षक परीक्षा पास झालेलो आहे.तेव्हा पासून विद्युत विभागाकडे पर्यवेक्षकाचे रजा सुट्टया सोडविणे व शिप्ट नियंत्रण कामकाज करीत आहे.तसचे मी आजपर्यंत बऱ्याच वेळा विद्युत पर्यवेक्षक पदासाठी अर्ज केलेला आहे परंतु माझ्या अर्जाचा अद्यापर्यंत विचार केलेला नाही तरी हे पद भरतांना माझ्या अर्जाचा सहानुभुतीपुर्वक विचार करुन विद्युत पर्यवेक्षक ही पदोन्नती मिळावी." अशी विनंती केलेली आहे. सदर अर्जावर मा.विश्वस्त डॉ.गोंदकर साो.यांनी,"श्री देवकर हे संस्थानमध्ये वायरमन या पदावर काम करीत आहे.त्यांचा अनुभव लक्षात घेता त्यांना प्रत्यक्षात पर्यवेक्षक (विद्युत विभाग) म्हणून काम दिले जाते.संस्थानमध्ये पर्यवेक्षक पद रिक्त असलेबाबत त्यांना सांगीतले आहे जर आपणाकडे पदे रिक्त असतील अनुभवाचा विचार करता पदोन्नतीसाठी सिनेरिटी प्रमाणे व्यवस्थापन मंडळाचे बैठकीत सदर विषय ठेवून यांना न्याय देण्यात यावा तरी येत्या बैठकीत टिपणीसह विषय ठेवण्यात यावा."असे अभिप्राय दिलेले आहे.

श्री सुभाष दि.जाखडी व श्री सिताराम आ.देवकर वायरमन यांची संस्थान सेवेतील व वैयक्तीक माहिती खालील प्रमाणे :-

०१.	**नांव**	**:- श्री सुभाष दिगंबर जाखडी**
	जन्मतारीख	:- ०९/०८/१९५४
	सेवेत दाखल होतांनाची शैक्षणिक अर्हता	:- पी.डब्लु.डी.तारतंत्री परिक्षा पास
	सेवत दाखल झाल्याची तारीख व पदनांम	:- २०/०३/१९७८ तारतंत्री
	संस्थान सेवेतील झालेली एकूण सेवा	:- २८ वर्षे
	सध्याची शैक्षणिक अर्हता	:-विद्युत पर्यवेक्षक परिक्षा पास (०७/०२/२००३)
०२.	**नांव**	**:-श्री सिताराम आप्पा देवकर**
	जन्मतारीख	**:-**०३/०६/१९६७.
	सेवेत दाखल होतानाची शैक्षणिक अर्हता	:- ०८ वी पास इलेक्ट्रीक परीक्षा पास
	सेवत दाखल झाल्याची तारीख व पदनांम	:- १५/०७/९३ मदतनीस
	संस्थान सेवेतील झालेली एकूण सेवा	:- १३ वर्षे ०४ महिने

सध्याची शैक्षणिक अर्हता :-विद्युत पर्यवेक्षक परिक्षा पास (नोव्हे-१९९९)

श्री साईबाबा संस्थान आस्थापनेवरील कायम कर्मचाऱ्यांच्या नविन आकृतीबंधात विद्युत विभागात-०५, पाणी पुरवठा-०२, ध्वनीक्षेपन-०२, अशा पर्यवेक्षकांच्या ०९ जागा दर्शविलेल्या आहे. त्यापैकी ०८ जागा भरलेल्या असून एक पद रिक्त आहे.तथापि नविन प्रसादालय व संस्थानकडे भक्तांच्या निवासस्थानासाठी अनेक इमारती तयार करण्यात येत आहे.याठिकाणी विद्युत,पाणी पुरवठा विभागाचे कामाचाही व्याप वाढणार आहे.सदरच्या विभागांच्या कामाचा वाढता व्याप लक्षात घेता नविन आकृतीबंधात विद्युत विभागात एक व पाणी पुरवठा विभागात एक असे दोन पदे वाढवून त्यास,पुर्वीचे नऊ व वाढीव ०२ अशी एकूण ११ पदे होतील व पैकी आठ पदे भरलेली असल्याने आवश्यकतेनुसार तीन पदे,जेष्ठता पात्रता,अनुभव तसेच अनुशेष विचारात घेवून भरती / पदोन्नतीने भरता येईल.

तरी उपरोक्त आकृतीबंधात दोन पदे वाढवून रिक्त होणाऱ्या तीन पदावर कायम कर्मचाऱ्यातील सेवाजेष्ठता,पात्रता,अनुभव असणाऱ्या कर्मचाऱ्यांस अधिनियमातील तरतूदीस अनुसरुन पदोन्नती देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचा नवीन सुधारित कर्मचारी आकृतीबंध शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे. सदरहू आकृतीबंधाचे मान्यतेनंतर विद्यूत पर्यवेक्षक पदावर पदोन्नती देणेबाबतचा विचार करण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

४५ श्री.सुभाष मल्हारी बंदावणे, श्री.भाऊसाहेब तात्याबा तुरकणे व श्री.किसन केशव गाडेकर यांना उपप्रमुख पदावर पदोन्नती देणेबाबत.

श्री सुभाष मल्हारी बंदावणे , विद्युत पर्यवेक्षक-विद्युत विभाग) यांनी त्यांचे दि.१६/०८/२००७ रोजीचे अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, संस्थानमध्ये विद्युत विभाग, पाणी पुरवठा विभाग व ध्वनीक्षेपन विभाग या विभागामध्ये एकुण ८ विद्युत पर्यवेक्षक आहे. या सर्व पर्यवेक्षकांमध्ये मी सिनियर आहे. परंतू दि. ११/०८/२००७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत काही माझ्यापेक्षा ज्युनिअर विद्युत पर्यवेक्षक यांना उपअधिक्षक पदावर पदोन्नती करण्याचा ठराव करण्यात आलेला आहे. सदरची पदोन्नती करतांना आस्थापना विभाग, प्रशासन शाखा यांनी सेवा जेष्ठतेचा विचार केलेला नाही. मी सर्व विद्युत पर्यवेक्षकांमध्ये सिनिअर आहे. त्यामुळे माझ्यावर अन्याय झालेला आहे, असे मला वाटते. तरी याबाबत आपण त्या दोन्ही कर्मचाऱ्यासोबत माझाही पदोन्नतीबाबत विचार करुन माझी उप-अधिक्षक पदी पदोन्नती करावी ही विनंती. किंवा मला याबाबत न्याय मिळणेसाठी न्यायालयात जाण्याची परवानगी दयावी ही विनंती, असे नमुद केले आहे.

तसेच सर्वश्री वसंत दामोधर गाडेकर,(पर्यवेक्षक,ध्वनीक्षेपन विभाग),किसन केशव गाडेकर, पर्यवेक्षक- पाणी पुरवठा विभाग, नामदेव रामचंद्र जाधव, (पर्यवेक्षक -विद्युत विभाग) यांनी त्यांचे दि.१९-२०/०८/२००७ रोजीचे अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, श्री साईबाबा संस्थानमध्ये आमचे व्यतिरिक्त इतर ७ कर्मचारी विद्युत पर्यवेक्षक या पदावर कार्यरत असून आमचेपैकी काही विद्युत पर्यवेक्षकांची दिनांक ११/०८/२००७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत उप विभाग प्रमुख /उपअधिक्षक या पदावर पदोन्नती झाल्याचे समजले. त्या विद्युत पर्यवेक्षकांना पदोन्नती देते वेळी आमचे शैक्षणिक पात्रतेचा व विद्युत क्षेत्रामधील कामाचे अनुभवाचा विचार न करता त्यांना पदोन्नती देऊन आमचेवर अन्याय झाला आहे.

तसेच श्री नामदेव रामचंद्र जाधव यांनी त्यांचे अर्जात श्रीराम सहकारी साखर कारखाना लि.फलटण तालुका सहकारी दूध संघ लि.फलटण या संस्थेमध्ये सन ८४-८९ अखेर ६ वर्ष इलेक्ट्रीशियन या पदावर काम केलेले आहे. तद्नंतर आज पर्यत सुरुवातीस १० वर्ष तारतंत्री व नंतर ८ वर्ष विद्युत पर्यवेक्षक असे एकुण १८ वर्ष संस्थानचे सेवेत आहे, असे नमुद केले आहे.

तरी मे. साहेबांनी आमचे शैक्षणिक पात्रतेचा व कामाचे अनुभवाचा विचार करुन त्या विद्युत पर्यवेक्षकांसमवेत आम्हांला उप विभाग प्रमुख / उप अधिक्षक या पदावर पदोन्नती देऊन आमचेवर झालेला अन्याय दूर करावा, अशी विनंती केलेली आहे.

<u>उपरोक्त कर्मचाऱ्यांची माहिती खालील प्रमाणे</u> :-

०१) श्री सुभाष मल्हारी बंदावणे,

०१) शैक्षणिक अर्हता :- इयत्ता १० वी , आय.टी.आय. इलेक्ट्रीशियन,

०२) नेमणूक :- दिनांक ०२/०५/१९८९, तारतंत्री,

०३) विद्युत पर्यवेक्षक :- दिनांक ०१/०८/१९९९, **(मुळ वेतन रुपये-५०००-१५०-८०००)**

०४) सध्याचे मुळ वेतन :- रुपये - ६,३५०/-

०२) श्री वसंत दामोधर गाडेकर,

०१) शैक्षणिक अर्हता :- इयत्ता १२ वी ,आय.टी.आय. इलेक्ट्रीशियन,

०२) नेमणूक :- दिनांक ०३/०५/१९८९, तारतंत्री,

०३) विद्युत पर्यवेक्षक :- दिनांक ०१/०८/१९९९ **(मुळ वेतन रुपये- ५०००-१५०-८०००)**

०४) सध्याचे मुळ वेतन :- रुपये - ६,३५०/-

०३) श्री किसन केशव गाडेकर,

०१) शैक्षणिक अर्हता :- इयत्ता १२ वी ,आय.टी.आय. इलेक्ट्रीशियन,

०२) नेमणूक :- दिनांक ०३/०५/१९८९, तारतंत्री,
०३) विद्युत पर्यवेक्षक :- दिनांक ०१/०८/१९९९ (**मुळ वेतन रुपये- ५०००-१५०-८०००)**
०४) सध्याचे मुळ वेतन :- रुपये - ६,३५०/-
०४) श्री नामदेव रामचंद्र जाधव ,
०१) शैक्षणिक अर्हता :- इयत्ता १२ वी ,आय.टी.आय. इलेक्ट्रीशियन, पी.डब्ल्यु.डी.तारतंत्री, नॅशनल कौन्सील फॉर व्होकेशनल ट्रेनिग (एनसीटीव्हीटी)
०२) नेमणूक :- दिनांक ०९/०५/१९८९, तारतंत्री,
०३) विद्युत पर्यवेक्षक :- दिनांक ०१/०८/१९९९ (**मुळ वेतन रुपये- ५०००-१५०-८०००)**
०४) सध्याचे मुळ वेतन :- रुपये - ६,३५०/-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी कर्मचारी आकृतिबंध मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये मंजूर होऊन सदरचे आकृतिबंधाची प्रत मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेली आहे. त्यात पाणी पुरवठा विभागात उपविभाग प्रमुख एक पद व विद्युत विभागात उप विभाग प्रमुख एक पद असे दोन्ही विभागात दोन उपविभाग प्रमुखांचे पदे दशविले असून ते रिक्त आहेत.तथापी आकृतिबंधास शासनाची मान्यता येणे आहे.

दि.११/०८/२००७ चे मा.आस्थापना उपसमितीचे सभेत कांही कर्मचाऱ्यांना पदोन्नती देणेबाबत विषय झ ालेचे समजते.तथापी कार्यवाहीसाठी या विभागाकडे काहीही आदेश नाही. या पदास १००% पदोन्नतीचे प्रमाण धरल्यास शासन निर्णय व संस्थान ध्येयधोरणानुसार दोन पदांपैकी प्रथम अ. जा. साठी एक पद व दुसरे पद खुला/ इ. मा. व. साठी येते.

अर्जदार विद्युत पर्यवेक्षक यांना आस्थापनेमधील त्यांची सेवा जेष्ठता, त्या पदासाठीची शासनाकडील शैक्षणिक पात्रता, शासन निर्णय व संस्थान ध्येयधोरणानूसार रिक्त असलेल्या २ उप विभाग प्रमुख या पदावर आकृतिबंधास शासनाची मान्यता येणेचे अधिन राहून पदोन्नती देणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती .श्री राजेंद्र जगताप ,खाडगीर यांचेही पदोन्नतीसाठी अर्ज आहेत. शैक्षणिक पात्रता, सेवाजेष्ठता, आरक्षण इत्यादींचा विचार करावा लागेल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचा नवीन सुधारित कर्मचारी आकृतीबंध शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे. सदरहू आकृतीबंधाचे मान्यतेनंतर उपप्रमुख/ उपअधिक्षक या पदावर पदोन्नती देणेबाबतचा विचार करण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

४६ <u>श्री.बाबासाहेब शिंदे, मदतनीस यांना तारतंत्री पदावर पदोन्नती देणेबाबत.</u>

श्री बाबासाहेब माणिकराव शिंदे, मदतनिस, विद्युत विभाग यांनी त्यांचे दि.१३/०४/२००७ रोजीचे अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, मी दि.०३/०३/२००३ पासून विद्युत विभागाकडे मदतनिस या पदावर कायम कर्मचारी म्हणून काम करत आहे. मी काही दिवस विद्युत विभागामध्ये इलेक्ट्रिकल मेंटेनन्सची कामे केली व आजपर्यंत विद्युत विभाग कार्यालयात शिपाई म्हणून काम करत आहे. मी आय.टी.आय.इलेक्ट्रीशियन हा २ वर्षाचा कोर्स पुर्ण केलेला आहे. तसेच आर.सी.पी. एन्टरप्रायझेस, नाशिक, साईट श्री साईबाबा संस्थान शिरडी मंदीर परिसर नुतनीकरण यांचेकडे दि.०२/०६/१९९८ ते २७/०९/१९९९ या कालावधीमध्ये इलेक्ट्रिक वायरींगचे काम केलेले असून तसे सर्टीफिकेट मी यापुर्वीच्या अर्जा सोबत जोडलेले आहे.मला सर्व प्रकारचे इलेक्ट्रिकल कामांचा व इलेक्ट्रिकल मेंटेनन्सचा अनुभव आहे. तसेच मी महाराष्ट्र शासनाकडील तारतंत्रीचा परवानाधारक आहे.

तरी माझ्या शैक्षणिक पात्रतेचा व विद्युत विभागात केलेल्या कामाचा विचार करुन मला तारतंत्री या पदाची पदोन्नती द्यावी, असे नमुद केले आहे.

तसेच विद्युत विभाग प्रमुख, यांनी श्री बाबासाहेब शिंदे, यांचे दि.१३/०४/२००७ रोजीच्या अर्जात श्री शिंदे हे कामात प्रामाणिक असून त्यांचे विनंती अर्जाचा योग्य तो विचार होणेस विनंती ", असे नमूद केले आहे.

तसेच "मा.श्री शंकरराव गेणूजी कोल्हे साहेब,उपाध्यक्ष,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी, यांनी त्यांचे जा.नं.संजी/कोप/२००६.०७ /१०९१६ दिनांक २१/१२/२००६ चे पत्रात नमुद केले आहे की, श्री बाबासाहेब माणिकराव शिंदे हे आपल्या संस्थानच्या विद्युत विभागात मदतनिस म्हणून काम करीत आहेत. त्यांनी तारतंत्री या पदावर नेमणूक करावी, यासाठी विनंती केली आहे.

तरी श्री शिंदे हे एस.एस.सी.उत्तीर्ण आहेत, आय.टी.आय.(वीजतंत्री) व संगणक एम.एस.ऑफीस हे कोर्स झालेली आहेत, त्यांचा तारतंत्री परवाना क्र.१७१२८७ असा आहे. अनुभवी आहेत.तरी आपण याकामी स्वत: चौकशी करुन, त्यांना तारतंत्री पदावर अवश्यक नेमणूक करावी ", म्हणुन विनंती केलेली आहे.

<u>श्री बाबासाहेब माणिकराव शिंदे यांची माहिती खालील प्रमाणे</u> :-

०१) शैक्षणिक अर्हता :-अ) एस.एस.सी.पास,
ब) एम.एम.ऑफीस (कॉम्प्युटर कोर्स),
क) इलेक्ट्रीशियन (वीजतंत्री) आय.टी.आय.कोर्स,

वायरमन (तारतंत्री) महाराष्ट्र शासनाची परिक्षा दि.२१/०१/२०००.

श्री बाबासाहेब माणिकराव शिंदे यांची वर्ग-०४ चे कर्मचारी म्हणून जा.नं.एसएसएस/वशी-०१/५४५/२००३ दि.०३/०३/२००३ अन्वये अनुकंपातत्वावर दरमहा मासिक वेतन रुपये- २,०००/- इतक्या रक्कमेवर नेमणुक करण्यात आलेली होती. तसेच जा.नं.एसएसएस/वशी-०१/१०५४/२००५ दि.०७/०५/२००५ ने वर्ग -०४ पदाची रु.- २५५०-५५-२६६०-६०- ३२०० ही वेतनश्रेणी देण्यात येऊन संस्थान सेवेत दि.०३/०३/२००५ कायम करण्यात आले आहे. त्यांची वर्ग-०४ या पदावर २ वर्षे १० महिने सेवा झालेली आहे.या वेतनश्रेणीत आजचे मुळवेतन रुपये- २६६० इतके आहे.डिसेंबर -२००६ मध्ये अनेकांना सेवेत घेण्यात आलेले आहे. त्यात अनेक वीजतंत्री / तारतंत्री आहेत. त्यांना पदनामासह नेमणुक आदेश दिल्यास उपरोक्त पदाची भरलेली संख्या समजून येईल.

श्री बाबासाहेब माणिकराव शिंदे, यांची जेष्ठता, पात्रता व कार्यालयीन कामाचा अनुभव व १०० बिंदु नामावली (रोष्टर पध्दतीनुसार) तसेच मा.श्री शंकरराव कोल्हे साहेब,उपाध्यक्ष यांचे शिफारसीस अनुसरुन त्यांना तारतंत्री या पदावर पदोन्नती व या पदाची रुपये ३०५०-७५-३९५०-८०-४५९० ही वेतनश्रेणी देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, अर्जदार श्री.शिंदे यांचे प्रमाणेच इतरही संस्थान कर्मचाऱ्यांकडे सदर पात्रता असून त्यांचाही विचार होणे आवश्यक असल्याने त्याबाबत माहिती घेऊन सविस्तर प्रस्ताव पुन्हा सादर करावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

४७ <u>श्री.सुभाष रंगनाथ भागवत,लॅब टेक्निशियन यांना वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी देणेबाबत.</u>

श्री सुभाष रंगनाथ भागवत, प्रयोग शाळा तंत्रज्ञ, श्री साईनाथ रुग्णालय यांनी त्यांचे ३०/०७/२००४ रोजीच्या अर्जान्वये रुपये- ५५००-९००० या वेतनश्रेणी ऐवजी रुपये- ६५००-१०५०० ही वेतनश्रेणी व प्रयोग शाळा तंत्रज्ञ या पदाऐवजी " जीव रसायन शास्त्रज्ञ" हे पदनाम मिळावे अशी विनंती केलेली आहे. यासाठी त्यांनी खालील शासन निर्णयाचा संदर्भ दिलेला आहे.

०१) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एस.आर.व्ही. १०९५/प्र.क्र.१/९५१२ दि.०८ जून, १९९५.
०२) शासन निर्णय क्रं.एस.आर.व्ही. १०९६/प्र.क्र. ३३/९५/१२ दिनांक २०/०३/१९९७.
०३) शासन निर्णय क्र.१००१ /प्र.क्र.३६/सेवा-६ दिनांक २९/०६/२००१ सार्वजनिक आरोग्य मंत्रालय मुंबई.
०४) सहसंचालक ,आरोग्य निर्णय क्रमांक २५४२०-२९/कक्ष ५३ ब दि. ३०/०६/२००१
०५) शासन निर्णय क्र.वेतन ११९९/प्र.क्र.२/९९ /सेवा-३,दिनांक २० जुलै २००१.
०६) शासन निर्णय क्र.वेतन २०००/प्र.क्र.सेवा-३,दिनांक ०३ ऑगष्ट २००१ .

श्री सुभाष रं.भागवत हे संस्थानच्या श्री साईनाथ रुग्णालयात दिनांक १०/१२/१९९० रोजी प्रयोग शाळा तंत्रज्ञ म्हणून सेवेत रुजू झालेले आहेत. या सेवेचे १२ वर्षे पूर्ण झाल्यानतंर दिनांक १०/१२/२००२ पासून त्यांना वरिष्ठ वेतनश्रेणी ५५००-१७५-९००० अशी देण्यात आलेली आहे.उपरोक्त शासन निर्णय क्र.१००१ /प्र.क्र.३६/सेवा-६ दिनांक २९/०६/२००१ अन्वये श्री भागवत यांनी मागणी केलेली सुधारीत वेतनश्रेणी खालील प्रमाणे .

धारण केलेल्या पदाची वित्तीय वेतनश्रेणी	१२ वर्षानतंर लागू करण्यात आलेली वेतनश्रेणी	क्र.२ मधील वेतन श्रेणी रद्द करुन द्यावयाची नविन वेतनश्रेणी	सुधारीत वेतनश्रेणी मंजूर करावयाचे दिनांक
१४००-२३०० (४५००-७०००)	१६४०-२९०० (५५०० -९०००)	२०००-३५०० (६५००-१०५००)	१०/१२/२००२

उपरोक्त शासन निर्णयानुसार त्यांची शैक्षणिक पात्रता मुख्य विषय रसायनशास्त्र घेऊन बी.एस्सी. व डी.एम.एल.टी.पदविका पास असल्याने त्यांना उपरोक्त पदाची नवीन वेतनश्रेणी रुपये-६५००-२००-१०५०० ही दिनांक १०/१२/२००२ पासून फरकासह देण्यास ते पात्र आहेत.तथापि जीवशास्त्रज्ञ -२ हे पदनाम आपले रुग्णालयात नसल्याने त्यांना ते देता येणार नाही.

उपरोक्त प्रकरणी जिल्हा शल्य चिकित्सक ,जिल्हा रुग्णालय ,अहमदनगर यांनी त्यांचे जावक क्रमांक आस्था-०३/जिरुअ/प्रशातं/सुवेश्रेणी/९१२८/२००५ दिनांक १३/०५/२००५ अन्वये "शासन निर्णय क्रमांक वेतन २०००/प्र.क्र.१०/सेवा-३/मंत्रालय मुंबई,दिनांक ३ ऑगष्ट २००१ चे सोबतचे परिशिष्ट दोन (पाचव्या केंद्रिय आयोगाच्या स्वीकृत शिफारशीनुसार पदास विहित केलेल्या सुधारीत वेतनश्रेणीकरीता कालबध्द पदोन्नती योजने अंतर्गत अनुज्ञेय वरीष्ठ वेतनश्रेणी रुपये-५५००-१७५-९००० ऐवजी रुपये-६५००-२००-१०५०० उपरोक्त पदास वेतनश्रेणी लागू आहे, व या कार्यालयाने लागू केली आहे."अशा आशयाचे पत्र दिले आहे.

याबाबत वैद्यकिय अधिक्षिका यांनी "या पदावर आपण कर्मचारी नियुक्त करत नसून त्यांना देण्यात येणारी वेतनश्रेणी कालबध्द पदोन्नतीनुसार देय दिसते " असे तर " जीव रसायन शास्त्रज्ञ " हे पद शासकीय रुग्णालयात उपलब्ध आहे, आपल्याकडे कालबध्द पदोन्नतीसाठी वेतनश्रेणी देय होऊ शकते,असे अभिप्राय वरीष्ठ प्रशासक रुग्णालये यांनी दिनांक १४/०९/२००५ रोजीच्या पत्रावर दिले आहे.

उपरोक्त विषयांकित बाबतचे शासन निर्णय व जिल्हा रुग्णालयाचे पत्रातील अभिप्राय तसेच वैद्यकिय अधिक्षिका रुग्णालये व वरीष्ठ प्रशासक रुग्णालये यांचे अभिप्रायास अनुसरुन श्री.भागवत एस.आर.यांना "जीव रसायन शास्त्रज्ञ-२" हे पद न देता सदर पदाची पात्रता त्यांचेकडे असल्याने या

पदाची वरीष्ठ वेतनश्रेणी रुपये- ६५००-२००-१०५०० श्री. भागवत यांना देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. याबाबत शासनाकडील नियम, अटी इ.ची खातरजमा करुन वेतनश्रेणी देणेबाबत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

४८ <u>प्रशासकीय अधिकारी पदावर पदोन्नतीने नेमणूक होणेबाबत..</u>

अ) रिट पिटीशन क्र.४५७२/२००७ श्री.प्रभाकर भिकोबा बोरावके, अधिक्षक, खरेदी विभाग विरुध्द १) दि.स्टेट ऑफ महाराष्ट्र, २) एक्झीक्युटीव्ह ऑफिसर, श्री साईबाबा संस्थान शिरडी, ३) दि.चेअरमन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी या कोर्ट केसमध्ये पिटीशनर श्री.बोरावके यांनी सेवा जेष्ठतेनुसार प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नतीने नेमणूक मिळावी. याकरीता त्यांनी खालीलप्रमाणे मागणी केलेली आहे. **i]**Issue writ of mandamus and/or direction in the nature of mandamus, directing the respondent no.1 and 2 to consider the case of the petitioner for promotion / appointment on the post of administrative officer considering his seniority, long standing service, educational qualification and experiene with the respondent and within specific period. **ii]** Issue writ of mandamus and/or direction, directing the respondent no.1 and 2 to follows the principles of seniority while making appointment/selection on the post of administrative officer. **iii]** Pending hearing and final disposal of this writ petition, the respondents may kindly be prevented by order of injunction not to promote/appoint any other person on the post of Administrative Officer by way of and order of interim relief. **iv]** Pending hearing and final disposal of this writ petition, the respondents may please be directed to temporarily promote the petitioner as Administrative Officer of Respondent No.2 Sansthan by way of and order of interim relief.

उपरोक्त रिट पिटीशन संदर्भात मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद (मा.श्री.स्वतंत्रकुमार चीफ जस्टीस व मा.श्री.आर.एम.बोर्डे, जस्टीस) यांनी दि.२६-०८-२००८ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेले असून, सदर रिट पिटीशन डिस्पोज्ड ऑफ करुन निकाली काढलेले आहेत.

1. In view of the averments made in paragraph 6 of the counter affidavit, Writ Petition is disposed of. Respondents would consider case of the petitioner in accordance with rules and bye laws.
2. We make it clear that this direction would, no way, be treated as precedence for the purposes that writ petition under Article 226 of the Constitution of India would be maintainable. No order as to costs.

रिट पिटीशन क्र.४५७२/२००७ मध्ये मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांनी पिटीशनर श्री.प्रभाकर भिकोबा बोरावके यांचे बाबत संस्थानने दि.०७-०३-२००८ रोजी दाखल केलेले काऊन्टर ॲफिडेव्हिट मधील पॅरा क्र-06 say that, it is necessary to point out that, case of the petitioner would be considered as and when the post become vacant and also there are various administrative requirements which are required to be considered. I say that, the said Shri Jagtap has been continued upto 2nd July, 2008 therefore; the present petition is too premature. यास अनुसरुन वरिलप्रमाणे आदेश दिलेले आहेत.

त्यानंतर श्री.प्र.भि.बोरावके यांनी दि.०३-०९-२००८ रोजीचे अर्जान्वये च्मी साईबाबा संस्थानमध्ये प्रशासकीय अधिकारी या रिक्तपदी नेमणूक होणेकरीता सन-२००४ साला पासून मागणी करीत आहे. नाईलाजाने मला हायकोर्टातुन न्यायाची मागणी करावी लागली. औरंगाबाद खंडपीठाचे रिट पिटीशन क्र.४५७२/२००७ नुसार झालेल्या आदेशाची सत्य प्रत माहिती करीता देत आहे. तरी माझी श्री.सुभाष किसन जगताप यांचे रिक्तपदी प्रशासकीय अधिकारी या पदावर नियुक्ती करुन न्याय मिळावा अशी विनंती केलेली आहे.

ब) रिट पिटीशन क्र.१५१७/२००८ श्री.भाऊसाहेब दाजीबा साबळे, अधिक्षक, आस्थापना विभाग विरुध्द १) दि स्टेट ऑफ महाराष्ट, २) दि.एक्झीक्युटीव्ह ऑफिसर, श्री साईबाबा संस्थान शिरडी, ३) दि.चेअरमन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त कमिटी, शिरडी व ४) दि.डिव्हीजनल कमिशनर, नाशिक डिव्हीजन, नाशिक या कोर्ट केसमध्ये पिटीशनर श्री.साबळे यांनी आरक्षण नियमानुसार प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नतीने नेमणूक मिळावी या करीता खालीप्रमाणे मागणी केलेली आहे. A] To call for the record and proceeding. B] By issuance of a writ of Mandamus and any other appropriate writ, orders or directions in the like nature, the respondent no.2 and 3 be directed to issue and appointment order in favour of the petitioner as and "Administrative Officer" with effect from 30.06.2007. C] To direct the respondent nos.2 and 3 authorities to made payment of the salary difference to the petitioner treating him to be promoted with effect from 30.06.2007. D] Pending the hearing and final disposal of the present writ petition, the

respondent nos.2 and 3 be restrained by an order of injection there by restraining them from issuing any appointment order in favour of any other person other than the petitioner on the post of Administrative Officer E] Pending the hearing and final disposal of the present writ petition, the post follen vacant on account of retirement of Shri Subhash K. Jagtap, administrative Officer as on 30.06.2007, may not be permitted to be filled in by the respondent nos.2 and 3 by issuance of an appropriate writ, orders or directions in the like nature. F] Pending hearing and final disposal of the present writ petition respondent no.2 and 3 may restrain by taking any adverse action in the nature of transfer, suspension in view of filing of this present petition for his grievances. G] To pass any other just and equitable relief in the interest of justice. H] Cost of the petition be awarded.
सदर रिट पिटीशनमध्ये मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद (मा.जस्टीस श्री.जे.एन.पटेल व मा.जस्टीस श्री.एस.बी.देशमुख) यांनी दि.०२-०६-२००८ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत.

In our view, the petition can be disposed of with a direction to the respondent no.2, to whom the representations have been made by the employees of the Sansthan, to forward the representations made by the petitioner and other employees to the competent authority in order to enable such authority to take a decision in the matter,. We expect the whole exercise to be completed within a period of three months from the date of communication of this order. The petitioner to communicate this order to the respondent no.2. With these directions the petition stands disposed of.

मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांचे उपरोक्त आदेशास अनुसरुन, श्री.साबळे यांचे सेवानिवृत्तीने रिक्त होणाऱ्या प्रशासकीय अधिकारी या पदावर आरक्षण नियमानुसार पदोन्नतीने नेमणूक करणेबाबत दि.१२-०६-२००७ रोजीचे निवेदन व संस्थान कर्मचाऱ्यांचे शासन नियमाप्रमाणे अनुसुचीत जाती, जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागासवर्ग, व इतर मागासवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबत दि.११-०८-२००७ रोजीचे निवेदन व इतर अनुशंगीक कागदपत्रे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी व निर्णयासाठी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे Competent Authority म्हणुन पाठविण्यात आले होते. त्यानंतर विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचेकडील दि.२६-०८-२००८ रोजीचे पत्रान्वये महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, निरधी सुचित जमाती (विमुक्त जाती),भटक्या जमाती आणि इतर मागासवर्गीय यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम,२००१ च्या कलम २ (झ) च्या तरतुदी विश्वस्तव्यवस्थेच्या पदांना लागु होतील असे संस्थान कार्यालयास कळविले आहे. तसेच विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि.०१-०९-२००८ रोजीचे पत्रान्वये च श्री.भाऊसाहेब दा.साबळे यांच्या अर्जाच्या अनुषंगाने नियुक्ती प्राधिकारी म्हणून विश्वस्त व्यवस्थेच्या व्यवस्थापन समितीने योग्य तो निर्णय घेणे अपेक्षित आहे. असे संस्थान कार्यालयास कळविले आहे.

तत्पुर्वी विभागीय आयुक्त (मागासवर्ग कक्ष), नाशिक विभाग, नाशिक यांनी त्यांचेकडील दि.३०-०६-२००८ व दि.२१-०७-२००८ रोजीचे पत्रान्वये श्री.साबळे यांच्याबाबत मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने प्रकरणात त्वरीत व मुदतीत कार्यवाही करावी. जेणेकरुन मा.उच्च न्यायालयाचा अवमान होणार नाही याची दक्षता घ्यावी.छ असे संस्थान कार्यालयास कळविले आहे.

क) दरम्यानचे काळात संस्थान आस्थापनेवरील प्रशासकीय अधिकारी यांचे एकुण ०५ पदांपैकी श्री.एस.के.जगताप हे वयास ६० वर्ष पुर्ण झाल्याने दि.३०-०६-२००७ रोजी सेवा निवृत्त झाले होते. त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार त्यांना कंत्राटी पध्दतीने एक वर्ष मुदतीसाठी नेमणूक देणेत आलेली होती. तथापि, त्यांचे दि.०८-०४-२००८ रोजीचे अर्जास अनुसरुन त्यांना दि.३०-०४-२००८ अखेर पासून पदमुक्त करण्यात आलेले आहे. त्यामुळे सध्या प्रशासकीय अधिकारी हे एक पद रिक्त झालेले आहे. म्हणून प्रशासकीय अधिकारी या रिक्त पदावर नेमणूकीबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीची सभा दि.२४-०५-२००८ रोजीचे सभेमध्ये सादर करणेत आला असता, त्यावर चर्चा होऊन, चविधी व न्याय विभागाकडून आरक्षण धोरणाबाबत लेखी अभिप्राय घेण्यात यावा. तसेच संस्थानचा दिवसेंदिवस वाढता व्याप व नविन संगणकीय माहिती तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी विचारात घेता, रिक्त होणाऱ्या प्रशासकीय अधिकारी या पदांवर शासनाकडून महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचेमार्फत निवड करण्यात आलेल्या **तहसिलदार** पदावरील कर्मचाऱ्यांना प्रतिनियुक्तीवर घेण्यात यावे.छ असा निर्णय, निर्णय क्र.५०० अन्वये संमत झालेला आहे.

त्यास अनुसरुन संस्थानचे सेवक आकृतीबंधास विधी व न्याय विभागाची मान्यता मिळालेली नसल्यामुळे, रिक्त झालेल्या प्रशासकीय अधिकारी पदावर मागासवर्ग आरक्षणाबाबत सन-२००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.८ यातील तरतुदीनुसार मागासवर्गातील उमेदवारांची सेवा

जेष्ठतेनुसार पदोन्नतीने नेमणूक करणे संस्थानवर बंधनकारक राहील किंवा कसे? तसेच संस्थान आस्थापनेवरील प्रशासकीय अधिकारी हे पद कार्यकारी अधिकारी यांचेनंतर क्रमांक २ चे महत्वाचे व जबाबदारीचे पद असल्याने यापदास आरक्षण धोरण लागू राहिल किंवा कसे? याबाबत मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून जा.नं.एसएसएस/वशी-०१/ ९३११/२००८ दि.२५-०६-२००८ रोजीचे पत्रान्वये लेखी अभिप्राय मागविणेत आलेला आहे. तथापि, त्यांचेकडून प्रशासकीय अधिकारी पदाचे आरक्षण धोरणांसंदर्भात अद्याप लेखी अभिप्राय प्राप्त झालेला नाही. त्याबाबत पाठपुरावा करणेत येत आहे.

ड) संस्थान आस्थापनेवर सध्या प्रशासकीय अधिकारी हे एकच पद रिक्त झालेले असल्यामुळे रिट पिटीशन क्र.४५७२/२००७ व रिट पिटीशन क्र.१५१७/२००८ मधील मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांचे अनुक्रमे दि.२६-०८-२००८ व दि.०२-०६-२००८ रोजीचे आदेशास अनुसरुन श्री.प्रभाकर भिकोबा बोरावके व श्री.भाऊसाहेब दाजीबा साबळे यांची प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नतीने नेमणूक करावयाची किंवा कसे? याबाबत संस्थान हायकोर्ट ॲडव्होकेट श्री.आर.एन.धोर्डे, औरंगाबाद यांचा दि.०४-०९-२००८ रोजी लेखी कायदेशीर अभिप्राय घेणेत आलेला असून, त्यात त्यांनी I have referred to your letter dated 4th September 2008 and inview of the above mentioned subject this is to inform you that, inview of the Decision of Hon'ble High Court in Writ Petition N0.1517/2008 [Shri Bhausaheb Dajiba Sable] and Writ Petition N0.4572/2007 [Shri Prabhakar Bhikoba Boravake], you are requested to take decision in accordance with law. असे कळविले आहे. त्यांनी दिलेल्या सदर कायदेशीर अभिप्रायावरुन श्री.साबळे व श्री.बोरावके यांचे प्रशासकीय अधिकारी पदावरील आरक्षण व सेवा जेष्ठतेनुसार पदोन्नतीने नेमणूक मिळणे संदर्भातील रिट पिटीशनमध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांबाबत संस्थानने निश्चीत काय कार्यवाही करावयाची याबाबत स्पष्ट अर्थबोध होत नाही.

मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांनी श्री.साबळे यांचे रिट पिटीशन क्र.१५१७/२००८ मध्ये दि.०२-०६-२००८ रोजी दिलेल्या आदेशामध्ये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई, मा.विभागीय आयुक्त (मागासवर्ग कक्ष), नाशिक विभाग, नाशिक, व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी यापैकी कोण **Competent Authority** आहे ? तसेच या प्रकरणाबाबत निश्चीत कोणी निर्णय घ्यावयाचा? हे स्पष्ट होत नाही. त्यामुळे संस्थान हायकोर्ट ॲडव्होकेट श्री.आर.एन.धोर्डे यांनी Competent Authority बाबत clarification मिळणेकामी दि.०२-०६-२००८ रोजीचा आदेश Review and/or Modification करुन मिळावा म्हणून संस्थानचे वतीने मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे दाखल करावयाचे सिव्हील ॲप्लीकेशन व डिले कंडोनेशन ॲप्लीकेशनचा मसूदा दि.०४-०९-२००८ रोजी तयार करुन दिला आहे. त्याप्रमाणे श्री.आर.एन.धोर्डे, हायकोर्ट ॲडव्होकेट, ओरंगाबाद यांनी तयार करुन दिलेल्या मसूदयाप्रमाणे संस्थानचे वतीने रिट पिटीशन क्र.१५१७/२००८ मधील दि.०२-०६-२००८ रोजीचा आदेश मॉडीफाय करुन मिळणेकामी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे दि.१०-०९-२००८ रोजी सिव्हील ॲप्लीकेशन व डिले कंडोनेशन ॲप्लीकेशन दाखल केलेले आहेत. त्याबाबत मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांनी दि.३०-०९-२००८ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत.

CIVIL APPLICATION (For Review) ST No.१७८१३ OF २००८ IN W.P.NO.१५१७ OF २००८

Order Dated ३०-०९-२००८

1. Heard learned counsel for the respective parties.

2. We have perused the earlier order passed on 2.6.2008, in view of the submission made by learned Counsel for the parties, the said order to the effect that the representation of the petitioner to be decided by the competent authority needs clarification.

3. By this order, we clarify that the competent authority is Respondent No.4 in Writ petition, i.e., Divisional Commissioner, Nashik Division, Nashik. We further clarify that the Respondent No.4- Divisional Commissioner, Nashik Division, Nashik to decide the representation of the petitioner, if already not decided, within three months from today.

4. With this clarification, civil application stands disposed of.

उपरोक्तप्रमाणे मा.विभागीय आयुक्त नाशिक विभाग, नाशिक यांनी दि.३०-०९-२००८ रोजी पासून तीन महिन्याचे आंत पिटीशनर श्री.बि.डी.साबळे यांचे आरक्षण नियमानुसार प्रशासकीय अधिकारी पदावर पदोन्नतीने नेमणूक होणेसंदर्भात निवेदनांबाबत निर्णय घ्यावा. असे आदेश मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांनी दि.३०-०९-२००८ रोजी दिलेले आहेत.

इ) विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील दि.१५-०९-२००८ रोजीचे पत्र प्राप्त झाले असून, त्यात त्यांनी च्शासन सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील मार्गदर्शन पत्र क्र.बीसीसी-/२००/प्र.क्र.२२/२०००/१६-ब, दि.१९-०५-२००३ नुसार छोटया संवर्गासाठी (१ ते १० पदे) **सरळ सेवेसाठी आरक्षण** निश्चीत करुन दिले आहे. त्यानुसार प्रशासकीय अधिकारी ०५ पदांपैकी ०३ पदे खुले व ०२ पदे प्रथम अनुसुचीत जाती-०१ व

अनुसुचीत जमाती-०१ या संवर्गासाठी आरक्षीत असल्याचे दिसून येते. तसेच पत्र क्र.बीसीसी-०७/३३५/१६-ब दि.०५-१०-२००७ नुसार **पदोन्नतीच्या आरक्षणाबाबत** (१ ते ३२ पदे) मार्गदर्शन केले आहे. त्यानुसार प्रशासकीय अधिकारी ०५ पदापैकी ०२ पदे प्रथम अनुसुचीत जाती-०१ व अनुसुचीत जमाती-०१, या संवर्गासाठी आरक्षीत असल्याचे दिसून येते. तरी त्यानुसार प्रशासकीय अधिकारी रिक्त पद भरणेबाबत निर्णय घ्यावा. व श्री.साबळे यांच्या प्रकरणात मा.उच्च न्यायालयाच्या निर्दशाप्रमाणे मुदतीत कार्यवाही करण्यात यावी. जेणेकरुन मा.उच्च न्यायालयाचा अवमान होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे कळविले आहे.

तरी श्री.भाऊसाहेब दाजीबा साबळे यांनी सेवाजेष्ठता व आरक्षण नियमानुसार प्रशासकीय अधिकारी पदावर पदोन्नतीने नेमणूक मिळणेसंदर्भातील सादर केलेल्या निवेदनांबाबत, तसेच श्री.प्रभाकर भिकोबा बोरावके यांनी सेवाजेष्ठता नियमानुसार प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नतीने नेमणूक मिळणेसंदर्भात सादर केलेल्या अर्जाबाबत निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.हायकोर्ट, खंडपीठ, औरंगाबाद यांचे रिट अर्ज क्र.१५१७/ २००८ मधील दि.३०.०९.२००४ चे आदेश, रिट अर्ज क्र.४५७२/ २००७ मधील दि.२६.०८.२००८ चे आदेश, विधी व न्याय विभाग यांचेकडील दि.०१.०९.२००८ चे पत्रान्वये मार्गदर्शन मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग मागसवर्ग कक्ष यांचे दि.१५.०९.२००८ चे पत्रानुसार सरळसेवा व पदोन्नतीच्या पदामधील आरक्षणाबाबतचे मार्गदर्शन पत्रानुसार श्री.बी.डी.साबळे यांना प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नती देणेत यावी, असे ठरले, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

विषय नं.०४ दिनांक २४.१०.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त

निर्णय क्र.०४ दिनांक २४.१०.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या,त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

(०१) <u>ब्लड बँक विभागासाठी रेफ्रिजरेटर खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.</u>

श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयातील रुग्णांना लागणाऱ्या ब्लडसाठी सन १९९९ साली नविन ब्लड बँक कार्यान्वीत करण्यात आलेली होती. त्यावेळेस सदर ब्लड बँकेसाठी विविध प्रकारचे फ्रिज मे. रेमी सेल्स कार्पोरेशन, मुंबई या कंपनीचे खरेदी करण्यात आले होते. सदर फ्रिजपैकी एक फ्रिज Model BR७० हा सतत बंद पडत असतो, यामुळे ब्लड बॅग्ज ठेवण्यास जागा कमी पडते. सदर फ्रिज दोन्ही रुग्णालयाच्या ब्लड बॅग्ज मुळे सतत कार्यान्वीत ठेवावा लागतो, त्यामुळे तो वारंवार बंद पडतो. म्हणून ब्लड बँक विभागाने त्यांचे डि. पी. क्रमांक ६०८६ दि.१७/०७/२००८ अन्वये एक नविन फ्रिजची मागणी केलेली होती. सदर फ्रिजसाठी अंदाजे रु.१,५०,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे.

दि. २१/०७/२००८ रोजी औषधे खरेदीकामी सभा आयोजित करण्यात आली होती. सदरहू सभेस खालील विश्वस्त उपस्थित होते.

१. मा.डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर.
२. मा.श्री पांडुरंग गमाजी अभंग.
३. मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे.
४. मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर.

सदरहू सभेत सदरचा फ्रिजर तातडीने आवश्यक असल्याचे मा. कार्यकारी अधिकारी यांनी सांगीतले यावर चर्चा होऊन याकामी कोटेशन मागवून कोटेशनसह विषय मा. व्यवस्थापन समिती सभा / उपसमिती सभेपुढे चर्चा / वाटाघाटी करुन निर्णय घेण्यात यावा, असे ठरले आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीकामी ४ अधिकृत विक्रेते यांना इकडील पत्र क्र. ११२४२ दि. ०१/०८/२००८ अन्वये दि. ०२/०८/२००८ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यानुसार तीन कोटेशन धारकांचे कोटेशन प्राप्त झालेले आहेत, ते खालीलप्रमाणे -

१. M/s. Terumo Penpol Ltd., Mumbai
२. M/s. Remi Sales & Engineering Ltd., Mumbai
३. M/s. N.P. Agencies, Mumbai

वरीलपैकी प्राप्त कोटेशनपैकी अ.नं. १ यांचे कोटेशन हे प्रशासन शाखेकडून टपालामार्फत उघडून मिळाले आहे, ते देखील विचारात घ्यावे असे मत आहे.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त बंद कोटेशन आजचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

अ.नं.	कोटेशनसादरकर्त्याचे नाव	कोटेशनमधील दर
01	M/s. Terumo Penpol Ltd., Mumbai	4,95,000.00
02	M/s. Remi Sales & Engineering Ltd., Mumbai	1,85,625.00
03	M/s. N.P. Agencies, Mumbai	4,78,125.00

यावर सविस्तर चर्चा होऊन, M/s. Remi Sales & Engineering Ltd., Mumbai यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

(०२) <u>गावरान तूप खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.</u>

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१०.०१.२००८ मधील निर्णय क्र.४४ क (३) नुसार प्रसादालयामध्ये प्रसादलाडू तयार करणेकामी आवश्यक असणारे ५८०० क्विंटल गावरान तूप (ॲगमार्क/लुज) दि.०१.०४.२००८ ते दि.३०.०९.२००८ व दि.०१.१०.२००८ ते दि.३१.०३.२००९ अशा दोन टप्प्यात खरेदी करणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार माहे आक्टोंबर २००८ ते मार्च २००९ या कालावधीकरीता आवश्यक असणारे २९०० क्विंटल गावरान तूप खरेदीकामी दि.२७-२९.०८.२००८ चे दरम्यान वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दि.२९.०८.२००८ ते ०६.०९.२००८ अशी निविदा विक्री मुदत ठेवणेत आलेली होती. तसेच निविदा स्विकारणे मुदत दि.०८.०९.२००८ अशी ठेवणेत आलेली असून निविदासोबत बयाणा रक्कम व नमुन्यांची मागणी केलेली आहे. मुदतीअंती प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील खालीलप्रमाणे-

अ.नं.	**निविदाधारकाचे नाव व गांव**
०१.	रेखा डेअरी इंडस्ट्रीज, इंदौर
०२.	दिव्या एंटरप्राईजेस, इंदौर
०३.	जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिकरोड
०४.	बाफणा बाजार, नाशिक

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन, निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

अ.नं.	निविदाधारकाचे नाव व गांव	ब्रॅण्ड	निविदेतील दर प्रति किलो रुपये	वाटाघाटीअंती देऊ केलेले दर प्र.कि.रु.
०१.	रेखा डेअरी इंडस्ट्रीज, इंदौर	मोदक	१४८.५०	१३२.००
०२.	दिव्या एंटरप्राईजेस, इंदौर	धनश्री	१३९.५०	१३४.००
०३.	जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिकरोड	आबाद	१६८.४८	१४४.५६
०४.	बाफणा बाजार, नाशिक	मधुरतन	१७३.६८	१३९.००
		महारतन	१६४.३२	१४२.००
		गोपी	१५४.९६	१४१.००
		कान्हा	१५२.८८	१३१.५०

यावर सविस्तर चर्चा होऊन, बाफणा बाजार, नाशिक यांचे कान्हा या ब्रॅण्डचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा. मात्र मे.बाफना बाजार,नाशिक यांचा गावरान तूप पुरवठा वेळेत मागणीनुसार व योग्य न झाल्यास द्वितीय न्यूनतम दर असलेले मे.रेखा डेअरी,इंदौर यांचेकडून प्रती किलो रुपये १३२/- या दराने खरेदी करण्यात यावे,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी)

(०३) <u>कार्यालयीन जनरल व संगणक स्टेशनरी छपाईकामी प्राप्त झालेले कोटेशन उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.</u>

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१६.०८.२००८ मधील निर्णयानुसार संस्थानचे विविध विभागांसाठी आवश्यक असणारी कार्यालयीन जनरल व संगणक स्टेशनरी छपाईकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागणी करणेस व त्याकामी येणारे रक्कम रु.५८,०२,४७०/- चे खर्चास तत्वतः मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार दि.२९/९/२००८ ते ०१/१०/२००८ चे दरम्यान वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दि.०३ ते १३.१०.२००८ अखेर निविदा विक्री ठेवणेत आलेली आहे. तसेच निविदा विक्री स्विकारणे मुदत दि.१५.१०.२००८ अशी ठेवणेत आलेली असून दोन लिफाफा पद्धतीने निविदा मागविणेत आलेल्या आहेत. पैकी क्र.१ चे लिफाफ्यात मुळ निविदा व क्र.२ चे लिफाफ्यात बयाणा रकमेचा डी.डी अथवा रोखीची पावती तसेच इतर कागदपत्राची मागणी केलेली आहे.

मुदतीअंती प्राप्त झालेल्या खालील निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन निविदाधारकांना आजचे सभेपुढे चर्चा तथा वाटाघाटीसाठी आमंत्रित करणेत आले होते.

अ.नं.	**निविदासादरकर्त्याचे नांव**	**अ.नं.**	**निविदासादरकर्त्याचे नांव**
०१	अविराज पॅकवेल,कोपरगांव	०७	नॅशल पेपर इंडस्ट्रीज,कोपरगांव
०२	मयूर ऑफसेट, श्रीरामपूर	०८	रोहन प्रिंटर्स अॅण्ड स्टेशनर्स,औरंगाबाद
०३	साई राकेश पेपर टेक,नाशिक	०९	कॅप्रिकॉन प्रिंटस,पूणे
०४	प्रिंटवेल प्रिंटर्स,मालेगांव	१०	प्रिमिअर डाटा फॉर्म्स प्रा.लि.लि,मुंबई

०५	सखी इंडस्ट्रीज लि,पूणे	११	मार्क इंडस्ट्रीज,मुंबई
०६	समर्थ ऑफसेट,साकुरी		

उपरोक्त निविदासादरकर्त्यांना सर्वांना सभेपुढे एकत्रित बोलाविण्यात येऊन त्यांनी देऊ केलेल्या दरात आणखी सूट देणार किंवा कसे या बाबत लेखी स्वरुपात देणेबाबत सांगण्यात आले.

यावर सविस्तर चर्चा होऊन,निविदासादरकर्त्यांनी देऊ केलेल्या सुधारीत दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन त्यातील निम्नतम दर स्विकारणेत यावे अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

(०४) संस्थानचे विविध ठिकाणी खरेदी करण्यात आलेल्या जमीनीच्या भोवताली काटेरी तारेचे कम्पाऊंड करणेकामी आलेल्या निविदा उघडून निर्णय घेणेबाबत.

श्री साईबाबा संस्थानने शेती महामंडळाकडील मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील जमिनी रुग्णालये व इतर लोकोपयोगी कामासाठी भूसंपादनाने संपादीत केलेल्या आहे. संपादीत केलेल्या महामंडळाचे क्षेत्रावर लगतचे शेतकऱ्यांनी अतिक्रमण केलेले होते. शेती महामंडळाकडून संपादीत केलेल्या एकूण वीस गटापैकी सोळा गटाचे अतिक्रमीत क्षेत्र मा. प्रांत अधिकारी, श्रीरामपूर यांनी दि.१०.०१.२००६ रोजी पोलीस संरक्षणात काढले आहे. अतिक्रमीत क्षेत्राच्या हद्दीवर अँगल रोवण्यात आले आहे. मात्र काही ठिकाणी लगतचे शेतकऱ्यांनी अँगल काढलेले आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि. २४.०२.२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१८८ अन्वये सुरक्षीतेच्या दृष्टीने संस्थान मालकीच्या संपुर्ण मोकळ्या जमिनींना सिमेंट पोलचे तारकुंपाउंड करणेकामी प्रस्ताव तयार करुन मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेसाठी सादर करावा असे ठरले आहे.

श्री साईबाबा संस्थानने निमगांव कोऱ्हाळे येथील शेतीमहामंडळाकडून भूसंपादीत केलेल्या जमिनी तसेच शिर्डी व कनकुरी येथील शेतकऱ्यांकडील खरेदी केलेल्या जमिनीचा सविस्तर गट नंबरवर तपशिल खालीलप्रमाणे-

अ) शेती महामंडळाकडील घेतलेल्या जमिनीचा (गट नं.) व तारकंम्पाऊंडचा एम.एस.ग्रील गेटसह खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :-

अ.नं.	गट नंबर	क्षेत्र हे. आर	तार कंपाऊंडची लांबी (मिटर मध्ये)	तार कंपाऊंडचा खर्च प्रती ३२० मी. प्रमाणे	गेट उभारणीचा खर्च	एकुण खर्च
०१	१९८	३.३८	५३८	१७२१६०.००	३२३०७.००	२०४४६७.००
०२	१९९	१.९६	१६८	५३७६०.००	३२३०७.००	८६०६७.०००
०३	२००	१.८८	२९२	९३४४०.००	३२३०७.००	१२५७४७.००
०४	२०१	०.९८	३१२	९९८४०.००	३२३०७.००	१३२१४७.००
०५	२३८ पैकी	०.२७	४२१	१३४७२०.००	३२३०७.००	१६७०२७.००
०६	२३४ पैकी	०.८४	३६८	११७७६०.००	३२३०७.००	१५००६७.००
०७	२२९	०.९८	५७५	१८४०००.००	३२३०७.००	२१६३०७.००
०८	२२१ पै.	३.२६	७५६	२४१९२०.००	३२३०७.००	२७४२२७.००
०९	२४५ पै	३.३०	५८०	१८५६००.००	३२३०७.००	२१७९०७.००
१०	२४९	१.७९	१०१४	३२४४८०.००	३२३०७.००	३५६७८७.००
११	२५० पै	१.८५	९६७	३०९४४०.००	३२३०७.००	३४१७४७.००
१२	२१८ पैकी	१.००	५१०	१६३२००.००	३२३०७.००	१९५५०७.००
१३	८७	१.४५	५७७	१८४६४०.००	३२३०७.००	२१६९४७.००
१४	८८	१.४६				
१५	१८३	५.४०	९७३	३११३६०.००	३२३०७.००	३४३६६७.००
१६	१८६	१.२४	५१५	१६४८०.००	३२३०७.००	१९७१०७.००
१७	१९५	३.५९	३२४	१०३६८०.००	३२३०७.००	१३५९८७.००
					खर्च (अ)....	३३,६१,७१२.००

ब) शेती महामंडळ व्यतिरिक्त श्री. कालेकर, श्री डांगे, श्री शेळके यांच्या घेतलेल्या जमिनीचा तपशिल-

अ.नं.	गट नंबर	क्षेत्र हे. आर	तार कंपाऊंडची लांबी (मिटर मध्ये)	तार कंपाऊंडचा खर्च प्रती ३२० मी. प्रमाणे	गेट उभारणीचा खर्च	एकुण खर्च
१८	२३५	२.४१	८११	२५९५२०.००	३२३०७.००	२९१८२७.००
१९	१२१/ब/१ १२१/अ/२ कनकुरी	०.७६ ०.७४	५०८	१६२५६०.००	३२३०७.००	१९४८६७.००
२०	१२४/२ ब/२/१ शिर्डी	०.६०	३१३	१००१६०.००	३२३०७.००	१३२४६७.००
२१	१२४/२ब/२/२	०.६०	३१४	१००४८०.००	३२३०७.००	१३२७८७.००

	शिर्डी					
					खर्च (ब)....	७५१९४८.००

(एकूण अ + ब = ४११३६६०.०० रुपये)

संस्थानचे मालकीचे क्षेत्रावर लगतचे शेतकऱ्यांचे अतिक्रमण होऊ नये म्हणून संरक्षणाचे दृष्टीने संपादीत केलेल्या जमिनीचे हद्दीवर काटेरी तारेचे कुंपण करणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक प्लॉटमध्ये प्रवेश करणेकरीता आर.सी.सी. कॉलमसह एम.एस. ग्रील गेटची उभारणी करावी लागणार आहे. याकरीता सोबतचे अंदाजपत्रकानुसार १०८३१.०० मिटर लांबीचे कोटेरी तारीचे कुंपण व २० गेटची उभारणी करणेकरीता जिल्हा दरसुची २००७-२००८ दरानुसार रक्कम रुपये २५,९५,१०६.०० मात्र खर्च अपेक्षीत आहे. पंरतू सध्या स्टील खडी वाळू सिमेंट या बांधकाम साहित्याचे दरात मोठ्याप्रमाणात वाढ झालेली असल्याने सध्याच्या बाजारभावानुसार ४१,१३,६६०.०० खर्च अपेक्षीत आहे. म्हणजेच सदर काम जिल्हा दरसुची २००७-२००८ चे अंदाजपत्रका पेक्षा सध्याचे बाजार भावानुसार ५८.५१६% अधिक वाढ झालेली असल्याचे दिसून येते. करिता सदरचे कामाकरिता ॲटम रेट निविदा वर्तमान पत्रात जाहिरात देऊन मागविण्यात आल्या आहेत.

निविदा विक्रीची विहीत मूदत दिनांक ०८/०९/२००८ ते दि. १५/०९/२००८ अखेर ठेवण्यात आली व विहीत मूदतीत सिलबंद निविदा सादर करण्याची मूदत दिनांक २२.०९.२५००८ रोजी ४.३० पर्यंत ठेवण्यात आली होती. विहित मदूतीत खालील ठेकेदार यांनी कोरे निविदा फार्म विकत घेतले आहे.

०१) मे. आर.एल. भुतडा, कोपरगांव
०२) मे. आर.के. कन्स्ट्रक्शन, नाशिक
०३) इजि. योगेश सुरेश पाटील, कोपरगांव
०४) मे. किसन केशवराव थारोत

पैकी खालील ठेकेदार यांनी विहित मूदतीत सिलबंद निविदा सादर केल्या आहे.

०१) मे. आर.एल. भुतडा, कोपरगांव
०२) मे. आर.के. कन्स्ट्रक्शन, नाशिक
०३) मे. किसन केशवराव थारोत

विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या उपरोक्त तीन सिलबंद निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत.

अ.नं	निविदासादरकर्त्याचे नांव	निविदेतील दर रुपये	चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेल दर रुपये
०१	मे. आर.एल. भुतडा, कोपरगांव	५४,०९,७२२.००	५३,८२,६७३.००
०२	मे. आर.के. कन्स्ट्रक्शन, नाशिक	५७,७०,०७२.००	अनुपस्थित
०३	मे. किसन केशवराव थारोत	५७,३०,२०४.००	अनुपस्थित

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.आर.एल.भुतडा,कोपरगांव यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा व अतिक्रमित क्षेत्रबाबत संबंधीतांशी चर्चा करावी अशा वादातीत क्षेताव्यतिरिक्त इतर जमिनींचे तारेचे कंपाऊंड पूर्ण करणेकामी सत्वर कार्यवाही करावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

(०४) <u>मौजे निमगाव-कोऱ्हाळे गट नं.८७-८८ मध्ये नियोजित वाहनतळ खडीकरण करणेकामी आलेल्या निविदांवर निर्णय घेणे.</u>

श्रीसाईबाबा संस्थानचे गट नं. ८०,८५ मधील क्षेत्रात संस्थानमार्फत भव्य अशा श्री साईप्रसादालयाचे बांधकाम पूर्ण करण्यात आलेले आहे. दि. २७/११/२००७ रोजी सदरहू प्रसादालयाचे उद्घाटन मा. महामहिम राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील, भारत सरकार यांचे हस्ते करण्यात आले. श्री साई प्रसादालयात प्रसादासाठी एकाच वेळेस सुमारे ५००० साईभक्त प्रसाद भोजन घेऊ शकतील अशी व्यवस्था करणेत आलेली आहे. प्रसाद भोजन घेणेसाठी येणारा भक्त हा बहुतेक वाहनांतून अथवा संस्थान वाहनातून येणारा आहे. गट नं.८०, ८५ मध्ये वाहन व्यवस्थेसाठी पुरेशी जागा उपलब्ध नाही. सदरहू प्रसादालय आता सुरु करण्यात येणार आहे. तत्पुर्वी तेथे वाहनतळाची व्यवस्था होणे गरजेचे आहे. श्री साईप्रसादालय येथे येणारे वाहनांसाठी संस्थान मालकीचे नजीकचे गट नं. ८७, ८८ मध्ये जागा उपलब्ध आहे. सदरहू प्लॉट हा ३.० हे क्षेत्राचा आहे. सदरचे प्लॉटचे उत्तरेस मिलिटरीकरीता व दक्षिणेस म.रा.वि.वि.कं. करीता जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर प्लॉटचे मध्यावरती शिल्लक असलेल्या अंदाजे १ हे ६० आर जागेत वाहनतळाची निर्मिती करता येईल. सदर वाहनतळासाठी खडीकरण करुन मजबुतीकरण करणे गरजेचे आहे. सदर कामासाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि. २४/०५/२००८ चे सभेत संस्थानचे गट नं. ८०,८५ मधील नविन श्रीसाईप्रसादालयाकरीता गट नं. ८७,८८ चे उपलब्ध असलेल्या अंदाजे हे १-६० आर क्षेत्रापैकी दक्षिणेकडील हे. १.२० आर क्षेत्रामध्ये डब्ल्यु.बी.एम. पार्किंग करणेकामी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात. उर्वरीत ४० आर क्षेत्रामध्ये

मल्टीलेव्हल पार्किंग तयार करणेकामी प्लॅन / एस्टीमेट तयार करुन त्यास व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात यावी. तसेच प्रसादालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी उत्तर बाजूस पार्किंगची व्यवस्था करण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

दक्षिण बाजुकडील हे १.२० आर क्षेत्रामध्ये डब्ल्यु बी. एम. पार्कींग करणे करीता रुपये ४०,०९,१३९.०० मात्रचे खर्चास व याकामी आर्किटेक्ट निकम पाटील, श्रीरामपूर यांचेकडून सविस्तर प्लॅन व एस्टीमेट नुसार निविदा तयार करुन घेण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सदर कामासाठी आर्किटेक्ट मे.निकम पाटील असो., श्रीरामपूर यांनी रुपये ३६,३७,६६९.०० मात्र रक्कमेचे अंदाजपत्रक व कोरे निविदा फॉर्म तयार केले आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात व संस्थानचे अधिकृत संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात येवून कोऱ्या निविदा फॉर्मची विक्री दि. ०६/१०/२००८ ते दि. १३/१०/२००८ अखेर तसेच सिलबंद निविदा सादर करणेची मूदत दि. १६/१०/२००८ अखेर दुपारी ४.३० पर्यंत ठेवेणत आली होती.

याकामी विहीत मूदतीत खालील ठेकेदारांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतलेले होते.

०१) मे.एन.बी. औताडे, मु.पो. पोहेगांव ता. कोपरगांव
०२) मे. गजानन कन्स्ट्रक्शन, नाशिक
०३) पॅसो इंजिनिअर्स अॅण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, कोपरगांव
०४) श्री. नारायण हरिभाऊ आठशेरे, अंगणगाव ता. येवला
०५) डायमंड कन्स्ट्रक्शन, लोणी खुर्द ता. राहाता
०६) श्री. शेख मगबुल बादशहा, हडको कॉलनी नालेगांव अ.नगर
०७) मे. बेस्ट कन्स्ट्रक्शन, कंपनी, स्टेशन रोड, अ.नगर
०८) वैष्णवी कन्स्ट्रक्शन मु. सारुळ पो. विल्होळी, नाशिक

उपरोक्तपैकी खालील निविदाधारकाच्या विहीत मूदतीत सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहे.

अ.नं.	ठेकेदारांचे नांव
०१	श्री. नारायण हरिभाऊ आठशेरे, अंगणगाव ता. येवला
०२	पॅसो इंजिनिअर्स अॅण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, कोपरगांव
०३	वैष्णवी कन्स्ट्रक्शन मु. सारुळ पो. विल्होळी, नाशिक
०४	मे.एन.बी. औताडे, मु.पो. पोहेगांव ता. कोपरगांव
०५	मे. बेस्ट कन्स्ट्रक्शन, कंपनी, स्टेशन रोड, अ.नगर
०६	श्री. शेख मगबुल बादशहा, हडको कॉलनी नालेगांव अ.नगर
०७	मे. गजानन कन्स्ट्रक्शन, नाशिक

विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या उपरोक्त सिलबंद निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत.

अ.नं.	ठेकेदारांचे नांव	निविदेतील दर	चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेल दर
०१	श्री. नारायण हरिभाऊ आठशेरे, अंगणगाव ता. येवला	७.७७% कमी	७.७७% कमी
०२	पॅसो इंजिनिअर्स अॅण्ड कॉन्ट्रॅक्टर, कोपरगांव	११.३०% अधिक	१% कमी
०३	वैष्णवी कन्स्ट्रक्शन मु. सारुळ पो. विल्हेळी, नाशिक	निविदा दरात	निविदा दरात
०४	मे.एन.बी. औताडे, मु.पो. पोहेगांव ता. कोपरगांव	११% अधिक	१% अधिक
०५	मे. बेस्ट कन्स्ट्रक्शन, कंपनी, स्टेशन रोड, अ.नगर	६.०५% कमी	६.०५% कमी
०६	श्री. शेख मगबुल बादशहा, हडको कॉलनी नालेगांव अ.नगर	१२.३३% कमी	१२.३३% कमी
०७	मे. गजानन कन्स्ट्रक्शन, नाशिक	८% अधिक़	५% अधिक

यावर सविस्तर चर्चा होऊन श्री. शेख मगबुल बादशहा, हडको कॉलनी नालेगांव अ.नगर यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन,त्यांचेकडून काम करुन घेण्यात यावे,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

(०६) श्रीसाईनाथ रुग्णालयातील गायनिक विभागासाठी लागणारे इन्स्ट्रूमेंट खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडणेबाबत.

श्री साईबाबा रुग्णालयातील गायनिक विभागात लॅप्रोस्कोपीक सर्जन डॉ. कुलदीप वाघ हे गायनिकचे शस्त्रक्रिया करत असतात. सदरची इन्स्ट्रुमेंट आपल्याकडे नाहीत, ती नविनच खरेदी करावयाची आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे लॅप्रोस्कोपीक इन्स्ट्रुमेंट खरेदीकामीचा रु.५,५६,०११/- च्या खर्चाचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०७/०७/२००८ चे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. सदरचे खरेदीकामी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहीरात देऊन निविदा मागविणे बाबत निर्णय झालेला आहे.

त्यानुसार उपरोक्त खरेदीकामी संस्थानच्या जनसंपर्क कार्यालयामार्फत महाराष्ट्र टाइम्स - मुंबई, इंडीयन एक्सप्रेस - पुणे या वतर्मान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.०७/०८/२००८ ते दि.२१/०८/२००८ अखेर संस्थानच्या शिर्डी व मुंबई कार्यालयात निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या व निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि.२३/०८/२००८ अखेर ठेवण्यात आली होती. मुंबई कार्यालयात ७ निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या तर शिर्डी कार्यालयात ३ निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या. तसेच वर्तमान पत्रातील जाहिरातीबाबत अवगत करणेसाठी ९ अधिकृत विक्रेत्यांना इकडील पत्र क्रमांक ११६५५ दि.०९/०८/२००८ अन्वये कळविण्यात आले होते.

त्यास अनुसरुन शिर्डी व मुंबई येथील कार्यालयात एकूण ०६ निविदा प्राप्त झालेल्या आहेत त्या खालीलप्रमाणे -

अ.न	निविदाधारकाचे नांव
०१	Om Surgicals, Mumbai
०२	Kalelkar Surgical Pvt.Ltd., Mumbai
०३	Summit Healthcare (P) Ltd., Mumbai
०४	Chimco Bio-medical Engineering Co., Mumbai
०५	Surgdent Medicare Pvt.Ltd., Pune
०६	Eagle Medical Systems Pvt.Ltd., New Delhi

उपरोक्त प्रमाणे गायनिक विभागात लागणाऱ्या लॅप्रोस्कोपीक इन्स्ट्रुमेंट करीता प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या. सदर इन्स्ट्रुमेंटची आवश्यकता आहे किंवा नाही याची वैद्यकिय संचालक यांनी पडताळणी करुन आवश्यक असल्यास खरेदीबाबतचा प्रस्ताव विहीत पध्दतीनुसार तो व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

(०७) श्री.मनोज चव्हाण,यांचेवर श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये डॉ.सतिश रेड्डी यांनी केलेल्या ऑपरेशनमधील गुंतागुंतीपाई सदर रुग्णाने नुकसान भरपाईचा मा.कन्झुमर कोर्टामार्फत केलेल्या दाव्याबाबत.

वरील विषयाबाबत ठळक मुद्दे पुढीलप्रमाणे-

(०१) श्री.मनोज चव्हाण या रुग्णास पित्ताशयाचा जीर्णदाह (दोन वर्षाहून अधिक काळ) व त्यात खडे होण्याच्या आजारासाठी (Chronic Cholecystisis with Cholelithiasis) दि.२२.११.२००६ रोजी श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये उपचारार्थ डॉ.सतिष रेड्डी, तत्कालीन जनरल सर्जन, यांनी दाखल करुन घेतले. त्यांचेवर डॉ.रेड्डी यांनी दि.२३.११.२००६ रोजी दूर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया केली. परंतु डॉ.रेड्डी यांनी ऑपरेशन अंतर्गत काही गुंतागुंत झाल्यामुळे दि.२५.११.२००६ रोजी पारंपारिक पध्दतीने त्यांचे पोटार दुसरी शस्त्रक्रिया केली. तद्नंतर रुग्णाची प्रकृती सुधारल्यानंतर दि.०९.१२.२००६ रोजी त्यांना डॉ.रेड्डी यांच्या निर्णयानुसार श्री साईबाबा हॉस्पिटलमधून डिसचार्ज देण्यात आला.

परंतु श्री.चव्हाण यांची प्रकृती पुन्हा बिघडल्यामुळे डॉ.रेड्डी यांनी सदर रुग्णाला के.ई.एम.हॉस्पिटल, मुंबई येथील डॉ.विनय थापर यांचेकडून उपचार घेणेसाठी रेफर केले.

या रुग्णाच्या संदर्भीत आरोपातील मुद्दा क्र.०७ (अर्जदाराची विनंती की,) त्याला पुढीलप्रमाणे नुकसान भरपाई मिळावी.

०१- वैद्यकिय खर्च- रु. २,७८,५००/-

०२- शारिरीक, मानसिक कायमचे अपंगत्व आल्याने
व पुढील सेवेला मुकावे लागल्यामुळे नुकसान भरपाई- रु.३२,४०,०००/-

०३- अर्जाचा खर्च- रु. १५,०००/-

एकूण- रु.३५,३३,५००/-

(०२) श्री.चव्हाण यांच्यावतीने श्री.आप्पासाहेब देसाई, ॲडव्होकेट, हाय कोर्ट, मुंबई यांनी दि.१०.०७.२००७ रोजी उपरोक्त विषयाच्या संदर्भात एकूण रक्कम रु.३५,३३,५००/- नुकसान भरपाई मिळावी, अशा अर्थाची नोटीस (प्रशासन शाखा आवक नं.२४७९१ अन्वये रजि.ए.डी.द्वारे) पाठविली होती व खालील तीन व्यक्तींना प्रतिवादी केलेले होते.

(१) डीन, श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी

(२) डॉ.सतिष रेड्डी (जनरल सर्जन)

(३) श्री.किरण गोरे, क्लिनिकल असि. (जनरल सर्जन)

श्री साईबाबा संस्थानमध्ये डीन हे पद नाही.

(०३) त्यास संदर्भीय क्र.०३ अन्वये श्री.आर.एस.जपे पाटील, ॲडव्होकेट, कोपरगाव यांचेतर्फे दि.०३.१०.२००७ रोजीच्या पत्रान्वये उत्तर पाठविण्यात आले होते. परंतु तक्रार अर्जातील पृष्ठ क्र.०६ वर तक्रारदार श्री.मनोज चव्हाण यांनी पुढील प्रमाणे विधान केले आहे.

तक्रारदार यांनी सामनेवाले नं.०१ व ०३ यांना ॲड.आप्पासाहेब एस.देसाई, मुंबई यांचेमार्फत दि.१०.०७.२००७ रोजी व दि.२६.०७.२००७ रोजी नुकसान भरपाई रक्कम मिळणेबाबत नोटीसा पाठविल्या होत्या त्या सामनेवाले यांना मिळूनही त्यांनी कोणत्याही प्रकारची दखल घेतली नाही म्हणून सदरचा अर्ज मे. कोर्टापुढे दाखल करणे भाग पडले आहे.

(०४) सदर तक्रार अर्जाच्या संदर्भात Registrar- Comsumer Disputes Redressal Commission, Maharashtra State, Mumbai, Bench at Aurangabad यांनी पुढील व्यक्तींना- (१) डीन, (२) डॉ.सतिष रेड्डी, (३) श्री.किरण गोरे- यांना प्रतिवादी करुन दि.०५.०९.२००८ रोजी सकाळी ११.०० वा. ते दुपारी २.०० वा. या काळात उपस्थित रहाण्याविषयी नोटीस बजावली आहे. अन्यथा ex-party (एकतर्फी) निर्णय घेतला जाण्याबद्दल सूचित केले आहे.

श्री साईबाबा संस्थानमध्ये डीन हे पद नाही.

डॉ.सतिष रेड्डी यांना दूरध्वनीद्वारे व डॉ.किरण गोरे यांना लेखी स्वरुपात सदर नोटीससंबंधी दि.०२-०३.०९.२००८ रोजी माहिती देण्यात आली.

(०५) एकूण नुकसान भरपाईची रक्कम रु.३५,३३,५००/- एवढी नमूद केलेली असून उपरोक्त कोर्टाचा निर्णय होईल त्याप्रमाणे ही नुकसान भरपाई देणे पुढील व्यक्ती (अ) डीन, (ब) डॉ.सतिष रेड्डी, (क) श्री.किरण गोरे यांना एकत्रितपणे देणे बंधनकारक असेल.

श्री.मनोज चव्हाण या रुग्णावरील दोन ऑपरेशन्स श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये झाली असल्याने कायद्यानुसार श्री साईबाबा हॉस्पिटल अथवा श्री साईबाबा संस्थानला मदत मिळू शकत नाही. या कारणामुळे उपरोक्त कोर्टात श्री साईबाबा संस्थानला या रुग्णाने केलेल्या व तक्रार तथा नुकसान भरपाई अर्जाबाबत योग्य त्या प्रमाणात जबाबदारी घ्यावी लागण्याची शक्यता आहे. परंतु याबाबत कायदे तज्ञांकडूनच सल्ला घेण्यात यावा, असे मत आहे.

याबाबत दि.०५.०९.२००८ रोजी पुढील मुदतवाढ घेणेची तोंडी जबाबदारी विधी अधिकारी यांनी स्विकारलेली आहे.

तरी श्री.मनोज चव्हाण या रुग्णाच्या नुकसान भरपाईबाबतची केस संस्थानतर्फे विधी विभागामार्फत चालविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/विधी अधिकारी)

(०८) <u>Walk in Fridge खरेदीबाबत.</u>

श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाने डि.पी.क्र.७०५७ दि.१५/०६/२००७ अन्वये एका मोठया Vertical फ्रिजची मागणी केलेले होती. औषध भाडांरात देखील मोठया प्रमाणावर लॅब केमिकल्स येत असतात. ते ठेवण्यासाठी सध्या Domestic फ्रिजचा वापर करण्यात येत आहे. परंतु त्यामध्ये किट / औषधे ठेवण्यास जागा कमी पडते. त्यामुळे औषध भांडारासाठी १ नग तसेच ब्लड बँक विभागासाठी Vertical फ्रिज १ नग असे एकुण ३ नग खरेदीचा रु.६,२७,४१६/- चा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२२/०९/२००७ सभेपुढे ठेवण्यात आला होता. मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रमांक७२१ नुसार वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या परंतू सदर Vertical फ्रिजची कंपन्यांनी उत्पादन बंद केल्याने याकामी फक्त एकच निविदा प्राप्त झाली होती. सदर खरेदीचा प्रस्ताव दि.२४/०६/२००८ चे मंजूर टिप्पणीन्वये रद्द करण्यात येऊन प्राप्त निविदाधारकांची अनामत रक्कम परत करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर Vertical फ्रिज ऐवजी आता Walk -in-Fridge खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे. याकामी Blue Star कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. गारवा एंटरप्रायजेस, नाशिक यांचेकडून अंदाजे खर्चाकामी दर मागविण्यात आले होते. त्यांचे दरपत्रकानुसार सदर Walk -in-Fridge १३०० लिटरचे चे दर प्रती नग रु.२,००,०००/- इतके आहेत.

तेव्हा वरीलप्रमाणे Walk -in-Fridge १३०० लिटरचे तीन नग खरेदीकामी प्रती नग अंदाजे रु. २,००,०००/- याप्रमाणे अंदाजे रु.६,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी वरीलप्रमाणे Walk -in-Fridge १३०० लिटरचे तीन नग विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.६,००,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

(०९) <u>Kidney Stone या आजारावर मोफत शिबिराचे आयोजन करणेबाबत.</u>

नगर जिल्हयातील पाण्यामध्ये क्षारांचे प्रमाण जास्त असल्यामुळे येथे Kidney Stone चे रुग्ण जास्त प्रमाणात आढळून येतात. सध्या लेजर किरणांच्या सहाय्याने (Non invasive) विना शल्यक्रिया पेशंटवर उपचार करता येतात. त्यासाठी अहमदाबाद येथील लेजर किरण तज्ञ डॉ.केतन शुक्ला व त्यांची टिम हे आवश्यक त्या उपकरणासह शिर्डी येथे येऊन मोफत सेवा देण्याबाबत वरील फॅक्सने कळविलेले आहे. त्यासाठी डॉ.केतन शुक्ला व त्यांचे ७-८ सहकारी यांचेकरीता ०५ दिवसाची राहण्याची, जेवनाची व दर्शनाची व्यवस्था संस्थानला मोफत करावी लागेल.

अशा प्रकारे Kidney Stone या आजारावर शिबीराचे आयोजन श्री साईनाथ रुग्णालयात केल्यास यासाठी आपणास रुग्णांची पुर्व तपासणीसाठी प्रती रुग्ण अंदाजे रु. १०००/- याप्रमाणे खर्च अपेक्षित आहे. शिबीरात साधारणत: ५० रुग्णांची दैनंदिन ओपीडी रुग्णांतुन निवड करता येईल. याप्रमाणे प्रती पेशंट रु.१०००/- याप्रमाणे संस्थानला अंदाजे रु.५०,०००/- खर्च अपेक्षित आहे. Kidney Stone वर लेजर पध्दतीने उपचार करणेसाठी बाहेरील खाजगी रुग्णालयात साधारणत: ३० ते ४० हजार रुपये प्रत्येक रुग्ण खर्च येतो. अंदाजे ५० रुग्णांची निवड झाल्यावर डॉ.केतन शुक्ला, अहमदाबाद यांना कळवून शिबीराची तारीख निश्चित करता येईल.

तरी वरीलप्रमाणे शिबीर आयोजित करणेस व अप्रत्यक्ष येणाऱ्या अंदाजे रु.५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षीका)

(१०) कार्डियाक ऑपरेशन थिएटरमध्ये लाईट सोर्स चा बल्ब खरेदीबाबत.

श्रीसाईबाबा हॉस्पिटलचे कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागाकरीता मा.व्यवस्थापन समितीच्या दि.११.०२.२००६ चे सभेतील निर्णय क्र.२२ अन्वये मे.बी.एल.लाईफ सायन्सेस प्रा.लि., मुंबई यांचेकडून एक झेनॉन लाईट सोर्स (Luxtec LX ३००) सर्व करांसहीत एकुण रु.२,८६,०००/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आला आहे. सदर लाईटसोर्स रोजी श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये कार्यान्वीत करण्यात आला असून कंपनीने सदर लाईट सोर्स करीता दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दि.०४.०४.२००६ रोजी संपला आहे. सदर लाईट सोर्सची दुरुस्ती व देखभाल बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागामार्फत येथेच केली जात आहे. परंतु दुरुस्ती करीता आवश्यक असणारे स्पेअर पार्ट पुरवठाधारक कंपनीकडूनच खरेदी करावे लागतात.

सदर लाईट सोर्समध्ये एक ३०० वॅट क्षमतेचा झेनॉन बल्ब वापरण्यात आला आहे. सदर लाईट सोर्स कार्यान्वीत झाल्यापासून आजपावेतो सुमारे १,११३ केसेसकरीता वापरण्यात आला असून प्रती केस अंदाजे २ तास याप्रमाणे २,२२६ तास वापरला गेला आहे व सध्या सदर बल्बचे प्रकाशाची तीव्रता कमी होत आहे. त्यामुळे सदर बल्ब केव्हाही बंद पडू शकतो. सदर लाईट सोर्स कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागामध्ये विविध शस्त्रक्रिया करताना नियमीत वापरला जातो. त्यामुळे जर शस्त्रक्रिया सुरु असताना लाईट सोर्समधील झेनॉन बल्ब बंद पडल्यास सर्जनला शस्त्रक्रिया करण्यास अडचण निर्माण होऊ शकते. त्यामुळे तो तातडीने बदलणे आवश्यक आहे. सदर बाबतीत कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागाने त्यांचे पत्र क्र.६५६९ दि.०९.०९.२००८ अन्वये मागणीपत्रही पाठविले आहे. त्यामुळे सदर बल्बकरीता कंपनीकडे विचारणा केली असता त्यांनी त्यांचे पत्र क्र. BLL/ MUM/ २४३/ ०८-०९ दि.१८.०९.२००८ अन्वये खालीलप्रमाणे कोटेशन पाठविले आहे.

Sr. no.	Description	Qty	Rate per	Total amount
01	Luxtec Bulb for 300 watt Light Source Model- LX 300	01	65,000.00	65,000.00
			Discount-	15,000.00
			Sub Total-	50,000.00
			+ VAT 12.50 %	6,250.00
			Net (R.off) total in Rs.	56,250.00

वरीलप्रमाणे मे.बी.एल.लाईफ सायन्सेस प्रा.लि., मुंबई यांचेकडून लाईट सोर्सचा झेनॉन बल्ब खरेदी करणेसाठी सर्व करांसहीत एकूण रु.५६,२५०/- इतका खर्च अपेक्षीत आहे. सदर रकमेची कंपनीने आगाऊ मागणी केली आहे. सदर लाईट सोर्स मे.बी.एल.लाईफ सायन्सेस प्रा.लि., मुंबई यांनी पुरवठा केला असून त्याचे स्पेअर पार्ट फक्त त्यांचेकडेच मिळतात.

तरी कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागातील लाईट सोर्समधील झेनॉन बल्ब मे.बी.एल.लाईफ सायन्सेस प्रा.लि., मुंबई यांचेकडून खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या सर्व करांसहीत एकूण रु.५६,२५०/- चे खर्चास व सदरची रक्कम कंपनीस आगाऊ पाठविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

(११) श्रीसाईबाबा रुग्णालयाचे प्रयोगशाळा विभागाकरिता हार्मोन्स कीट खरेदीबाबत.

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २००८-२००९ या वर्षाकरीता लागणारे औषधे, लॅब केमिकल्स किट्स खरेदीकामी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात येऊन दि.२६/०७/२००८ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे.

सदर खरेदीमध्ये साईबाबा रुग्णालयात नव्याने खरेदी केलेल्या Vidas मशिनसाठी लागणारे किट्स खरेदीकामी मे.बायोमेरिक्स इंडीया प्रा.लि.मुंबई यांना इकडील पत्र क्रमांक १०९२४ दि.२६/०७/२००८ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

सदरचे मशिन हे आपणास माहे मार्च मध्ये प्राप्त होऊन कार्यन्वीत करण्यात आले होते तर प्रयोगशाळा विभागाने वार्षिक मागणी माहे फेब्रुवारी मध्ये सादर केली होती. परंतु सदरचे मशिनवर होणाऱ्या तपासण्या किती होतील याचा अंदाज नसल्यामुळे त्यांनी किट्सची कमी प्रमाणातच मागणी केली होती. आता गेल्या चार महिन्यांचा तपासण्यांचा आढावा घेऊन एक वर्षामध्ये अंदाजे किती किट लागतील यानुसार त्यांनी वार्षिक मागणीमध्ये अतिरीक्त मागणी सुचविलेली आहे त्याची यादी सोबत सादर केलेली आहे.

तरी खालील यादी प्रमाणे लागणाऱ्या किट्स पुरवठा आदेशातील मंजूर दराने खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.९,६२,४४०.६३ चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

S.N.	Name of Kits	Packing	Annual Qty.	Rate Per	Extra Requirement	Total Amt. in Rs.
1	82 MICROGLOBULIN 30 TEST	30T	1	8838.18	2	17676.3650
2	AFP 60 Test	60T	1	11033.1	2	22066.1250
3	CA 125 TM 30 Test	30T	1	8631.51	2	17263.0200
4	CA 15-3 30 Test	30T	1	7608.98	2	15217.9550
5	CA 19-9 TM 30 Test	30T	1	7608.98	2	15217.9550
6	CEA 60 Test	60t	1	11329.1	2	22658.1650
7	CEA(S) 60 Test	60T	1	11329.1	2	22658.1650
8	CMV Ig G Avidity 30 Test	30T	1	1590.21	2	3180.4100
9	CMV Ig M 30 Test	30T	1	4769.71	2	9539.4250
10	CMV lg G 60 Test	60T	1	7099.07	2	14198.1300
11	FERRITIN 60 TEST	60T	1	8404.08	4	33616.3200
12	FSH 60 Test	60T	1	7382.45	3	22147.3500
13	H I V DUO Ultra 60 Test	60T	1	7041.31	4	28165.2200
14	HCG 60 Test	60T	1	7268.74	4	29074.9400
15	LH 60 Test	60T	1	7382.45	4	29529.8000
16	PROGESTERONE 60 TEST	60T	1	8404.08	4	33616.3200
17	PROLACTIN 60 TEST	60T	1	7268.74	4	29074.9400
18	Rub IgG II 60 Test	60T	1	6927.59	2	13855.1800
19	Rub IgM 30 Test	30T	1	4769.71	2	9539.4250
20	T3 60 Test	60T	12	3744.00	24	89856.0000
21	T4 60 Test	60T	12	3744.00	24	89856.0000
22	TESTOSTERONE 30 TEST.	30T	1	5678.53	2	11357.0600
23	TOTAL LG E 60 TEST	60T	1	8517.8	6	51106.7700
24	TOXO Ig M 60 Test	60T	1	7608.98	2	15217.9550
25	TOXO IgG Avidity 30 Test	30T	1	3974.61	2	7949.2200
26	TOXO IgG II 60 Test	60T	1	6927.59	2	13855.1800
27	TPSA 60 Test	60T	1	10561.96	18	190115.2350
28	TSH 60 Test	60T	12	3744.00	28	104832.0000
				Total Amt. in Rs.		962440.6300

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

(१२) <u>श्री.मधुकर भिवाजी डोखे,वॉर्डबॉय,रुग्णालय यांचे मुलीचे उपचारासाठी आर्थिक मदत देणेबाबत.</u>

श्री. डोखे यांची मुलगी कु. योगीता मधुकर डोखे, वय वर्ष ६ हिला Central Idio Pathic Precocious Puberty चा त्रास आहे. श्री. डोखे यांनी सन २००५ मध्ये प्रथम साईनाथ रुग्णालयातील बालरोग विभागातील डॉ. नमीता जाजु यांना दाखविले होते. त्यांनी श्री. डोखे यांना पुढील तज्ञ सल्ला व उपचारासाठी जे. जे. रुग्णालय, मुंबई येथे पाठवले होते.

जे. जे. रुग्णालयातील डॉक्टरांनी सर्व तपासण्या व उपचार केल्यानंतर त्यांना Inj. Decapeptyl ३.७५mg हि इंजेक्शन एक वर्षाकरीता प्रत्येक महिन्याच्या अंतराने घ्यावे लागतील, असे सांगितले. त्यानुसार दि. १८/१२/२००८ चे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयान्वये त्यांना रु. ६०,०००/- इतक्या रक्कमेचे १२ इंजेक्शन खरेदी करुन देण्यात आले होते.

त्यांनतर के. ई. एम. हॉस्पिटल, मुंबई येथील डॉक्टरांनी त्यांना त्याच इंजेक्शनचा कोर्स पुढे दर २१ दिवसांचे अंतराने कायम करण्यास सांगितले होते. त्यास अनुसरुन श्री. मधुकर डोखे यांनी त्यांचे दि. १८/०७/२००६ च्या अर्जान्वये प्रत्येक २१ दिवसात १ इंजेक्शन याप्रमाणे एकुण १८ इंजेक्शन खरेदी करुन मिळण्याची विनंती केली होती. त्यानुसार त्यांना दि. १६/०९/२००७ चे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ७०१ अन्वये रु. ९१,६१२/- इतक्या रक्कमेचे १८ इंजेक्शन खरेदी करुन मिळणेस मान्यता मिळालेली होती. त्यापैकी त्यांना १२ इंजेक्शन खरेदी करुन देण्यात आले होते.

त्यानंतर पुन्हा के. ई. एम. हॉस्पिटल, मुंबई येथील डॉ. गणेश यांनी त्यांना त्याच इंजेक्शनचा कोर्स पुढे दर २१ दिवसांचे अंतराने कायम करण्यास सांगितले होते. तेंव्हा श्री. मधुकर डोखे यांनी त्यांचे दि. ०४/०६/२००७ च्या अर्जान्वये प्रत्येक २१ दिवसात १ इंजेक्शन याप्रमाणे पुन्हा एकुण १८ इंजेक्शन खरेदी करुन मिळण्याची विनंती केली होती. त्यानुसार दि. २८/०७/२००७ चे मा. व्यवस्थापन समिती सभेतील रु. ९१,६९२/- इतक्या रक्कमेचे १८ इंजेक्शन खरेदी करुन देण्यात आलेले आहेत.

आता पुन्हा के. ई. एम. हॉस्पिटलमधील डॉ. नलिनी शहा यांनी दि. २६/०७/२००८ चे पत्रान्वये Inj. Decapeptyl ३.७५mg २१ दिवसानंतर एक याप्रमाणे इंजेक्शन घेण्याचा सल्ला दिलेला आहे. त्यानुसार श्री. डोखे यांनी दि. २६/०७/२००८ चे विनंती अर्जान्वये १८ इंजेक्शन खरेदी करुन मिळणेबाबत विनंती केली आहे, तसेच उपरोक्त अर्जावर मा. विश्वस्त डॉ. ए. भा. गोंदकर यांनी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे मान्यतेसाठी ठेवावा अशा सुचना केल्या आहेत. त्यानुसार १८ इंजेक्शनसाठी अंदाजे प्रती व्हायल रु. ५४४०/- या दराने एकुण १८ इंजेक्शनसाठी रु. ९७,९२०/- इतका खर्च येईल.

तरी उपरोक्तप्रमाणे १८ इंजेक्शन खरेदी करुन देण्यास व याकामी येणाऱ्या रु. ९७,९२०/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,श्री.डोखे यांचें मुलीस दीर्घकालीन इंजेक्शन्स द्यावयाची असल्याने याकामी येणारा खर्च हा मोठ्या प्रमाणात आहे. याकामी वैद्यकिय संचालक यांचे अभिप्राय घेऊन शासनामध्ये काय कार्यपध्दती आहे याची माहिती घेऊन फेरसादर करावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

(१३) <u>श्रीसाईनाथ रुग्णालयाकरिता एक्स-रे फिल्म १४x१४ खरेदीबाबत.</u>

श्रीसाईनाथ रुग्णालयाचे क्ष-किरण विभागात दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या उपरोक्त क्ष-किरण फिल्म्सकरीता सन २००८-२००९ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने मे. निर्मल एजन्सी, अहमदनगर यांना इकडील पत्र क्र. १०९८० दि. २६/०७/२००८ अन्वये खालीलप्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

Sr.No.	Name of Item	Make	Qty.	Rate Per	Total in Rs.
1	X-Ray Films Size 14" X 14 "	Kodak	5	3835.20	19176.00
				<u>Total in Rs.</u>	**<u>19176.00</u>**

श्री साईनाथ रुग्णालयाचे क्ष-किरण विभागाने वार्षिक मागणी दि. २८/०२/२००८ रोजी सादर केली होती. त्यामध्ये त्यांनी उपरोक्त फिल्म्सची ४५ पॅकेटची मागणी केली होती. परंतु सन २००७-०८ या वर्षातील एकुण ३० पॅकेटचा पुरवठा आदेश बाकी होता व मागील वर्षाचा खप सरासरी दरमहा ३ पॅकेट व शिल्लक ऑर्डर विचारात घेऊन वार्षिक मागणीमध्ये फक्त ५ पॅकेटची मागणी करण्यात आली होती. आपल्या वार्षिक ऑर्डर हया जुलै - २००८ मध्ये देण्यात आल्या होत्या. परंतु माहे मार्च - २००८ ते जुलै - २००८ या काळात शिल्लक मागील वर्षाच्या ३० पॅकेटचा पुरवठा होऊन खप देखील झालेली आहे. दरमहा सरासरी खप वाढून तो दरमहा ४ ते ५ पॅकेट असा झाला आहे. त्यामुळे आपणास तुर्तास सहा महिने पुरु शकेल इतका साठा खरेदी करावा लागणार आहे.त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

Sr.No.	Name of Item	Make	Qty.	Rate Per	Total in Rs.
1	X-Ray Films Size 14" X 14 "	Kodak	25	3835.20	95880.00
				<u>Total in Rs.</u>	**<u>95880.00</u>**

वरीलप्रमाणे मे. निर्मल एजन्सी, अहमदनगर यांचे वार्षिक मंजुर दरानुसार सदरचे खरेदीकामी रु. ९५,८८०/- इतका खर्च येणार आहे. मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१५/०४/२००८ निर्णय क्रमांक ३५४ Clause No.८ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मा. व्यवस्थापन समितीचे मंजूर दराने खरेदी करण्यात यावी, असे ठरले आहे.

त्यानुसार मे. निर्मल एजन्सी, अहमदनगर यांचेकडून वरीलप्रमाणे X-Ray Films वार्षिक मंजुर दराने खरेदी केलेल्या असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

(१४) <u>कनकुरी साठवण तलाव येथील क्लेरीफायर हौद, फिल्टर पर्यन्तची नाली व जिना तसेच फिल्टर प्लँटच्या स्लॅबरील पूर्व,दक्षिण व उत्तर बाजूला कास्टींगचे रेलिंग बसविणे बाबत.</u>

कनकुरी साठवण तलाव येथे पाणी शुध्दीकरणांसाठी क्लेरीफायरचा वापर करण्यात येत आहे. पुर्वी सदरच्या क्लेरीफायर करीता स्क्वेअर पाईपचे (एम.एस.) रेलींग वापरण्यात आलेले होते. परंतू नेहमीच्या वापरांमुळे तसेच पाणी शुध्दीकरणांसाठी वापरण्यात येणा-या केमिकलच्या उष्णतेमुळे सदरचे रेलींग सडलेले, गंजलेले असल्यामुळे पुर्वी वापरण्यात आलेले रेलींग काढुन त्याठिकाणी सिमेंटचे नक्षीदार पोल लावण्यात आलेले होते. सदरचे पोल लावून ८ ते १० वर्षाचा कालावधी झालेला आहे. केमिकलच्या उष्णतेमुळे सदरचे पोल सुध्दा खराब होवून तुटत आहेत.

सध्या अहमदनगर येथे नक्षीदार कास्टींगचे रेलींगचे दर पाहिले आहेत. सदरचे नक्षीदार कास्टींगचे रेलींग खरेदी करून ते पाणी पुरवठा विभागांतर्गत बसवून घेण्याची व्यवस्था करता येईल. दि. २०-१०-२००८ रोजी मा.प्र.अधिकारी श्री वाघ साहेब यांचा तळयावर राऊंड झाल्यानंतर चर्चेत सदरचा विषय निदर्शनात आणून दिलेला आहे.

तरी वरील प्रमाणे काम करणेकरीता लागणारे मटेरियल व त्याकरीता येणा-या अंदाजे खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे.

अ.नं.	तपशिल	मागणी	अंदाजे दर	एकुण किंमत
०१.	२ फुट उंचीच्या कास्टींग रेलींग (प्रती रेलींग वजन अंदाजे ३.३०० किला व भाव प्रती किलो अंदाजे रु. ७०/-मात्र)	४२० नग.	रु. २३१/- प्रती रेलींग.	रु. ९७,०२०.००
			एकुण -	**रु. ९७,०२०.००**

तरी वरील प्रमाणे मटेरियल कोटेशन मागवून खरेदी करणेसाठी अंदाजे **रु. ९७,०२०/-** मात्र खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त मटेरियल खरेदी करणेसाठी होलसेल विक्रेत्यांकडून कोटेशन मागवून मटेरियल खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रु. ९७,०२०/- मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

(१५) <u>जलशुध्दीकरण केंद्रातील फिल्टर पूढील शुध्द पाण्याच्या कुंड्यांना स्टेनलेस स्टिल पाईपच्या फ्रेम मध्ये ॲक्रेलिक कव्हर तयार करणेबाबत.</u>

संस्थानला पाणीपुरवठा करणा-या कनकुरी साठवण तलावावरील जलशुध्दीकरण केंद्रास तयार करुन जवळपास १५ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. पाणी शुध्दीकरणांकरीता आपणाकडून ॲलम, ब्लीचिंग पावडर व क्लोरीन गॅस चा वापर करण्यात येतो. त्यामध्ये असणा-या केमिकल घटकांचा व गॅसचा परिणाम तेथील उपकरणांवर होत आहे.

फिल्टर प्लँटमधून शुध्द झालेले पाणी त्यापुढील काचेच्या कुंडयामध्ये जमा होते. सदरच्या कुंडयामध्ये फ्लोटींग व्हॉल बसविण्यात आलेला आहे. कायमच्या वापराने तसेच केमिकलमुळे होणा-या परिणामामुळे ते पुर्णपणे सडलेले, गंजलेले असल्यामुळे कार्य करत नाही. तसेच कुंडीवरील काचेच्या फ्रेम खराब झालेल्या आहेत. सदरच्या काचेच्या कुंडयावरील फ्रेम, फ्लोटींग व्हॉल, ब्रॅकेट, पाईप पट्टी हे सर्व मटेरियल स्टेनलेस स्टीलचे वापरल्यास ते दीर्घकाळ टिकेल.

सदरचे काम करणेसाठी खालील प्रमाणे मटेरियल वापरुन योग्य त्या एजन्सीजकडून कोटेशन मागवून व त्यांचेकडूनच सदरचे काम करून घ्यावे लागेल.

SR. NO	PARTICULARS	QUANTITY	RATE RS.	COST RS.
01.	STAINLESS STEEL PIPE FOR FRAME AND DOOR SIZE 25 x 25 x 2 MM	160 FT	100/-	16000.00
02.	STAINLESS STEEL FLAT PATTI FOR ACRELIC SUPPORT SIZE 20 x 3 MM	72 FT	80/-	5760.00
03.	STAINLESS STEEL SQ. PIPE FOR ACRELIC SUPPORT BOTTOM SIZE 20 x 20 x 1.6 MM	72 FT.	90/-	6480.00
04.	ACRYLIC SHEET, IMPORTED CLEAR TRANSPERANT SIZE 6' x 2.5' x 6 MM THK	60 SQ. FT.	200/-	12000.00
05.	STAINLESS STEEL PIPE SIZE 50 x 50 x 2 MM	10 FT.	250/-	2500.00
06.	STAINLESS STEEL PIVOT BRACKET WITH PIN	02 SET	800/-	1600.00
07.	STAINLESS STEEL HANGER FOR FLOAT AND VALVE CLOSING PLATE.	02 SET	1000/-	2000.00
08.	HARDWARE - HINGES, SCREW, HANDLE ETC.	LUMSUM		2800.00
09.	LABOUR CHARGES	JOB		23000.00
10.	TRANSPORTATION			2500.00
		TOTAL -		**74640.00**

TAXES VAT 12.5 % -	**9330.00**
TOTAL COST -	**83970.00**

तरी योग्य त्या एजन्सीजकडून सदरचे काम करून घेणेसाठी तसेच त्यासाठी येणारे **रु. ८३,९७०/-** मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग)

(१६) <u>दिपावली सुटीचे कालावधीत साईभक्तांच्या सायीसाठी शामियाना मंडप व्यवस्था करणे बाबत.</u>

शाळा / कॉलेज यांना दि. २५.१०.२००८ ते दि. ०२.११.२००८ अखेर दिपावली सणाच्या शैक्षणिक सुट्या आहेत. याकालावधीत साईभक्तांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता आहे. करीता साईभक्तांचे सोयीसाठी तात्पुरती भोजन, निवास व्यवस्थेकरीता खालील ठिकाणी मंडप, कनात व बिछायतीसह उभारणी करणे बाबत अनुक्रमे धर्मशाळा विभाग प्रमुख व अधिक्षक, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान व अधिक्षक, चौकशी व निवासस्थाने विभाग यांनी कळविले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ. नं.	तपशिल / ठिकाण	साईज	एकुण चौ. फुट
०१.	नविन भक्तनिवासस्थान (५००रुम) दक्षिण बाजू पार्किंग (निवासव्यवस्थे करीता)	४५'x३९०'	१७,५५०.००
०२	नविन भक्तनिवासस्थान (५०० रुम) पश्चिम बाजू पार्किंग (भोजन व्यवस्थे करीता)	३०'x९०'	२,७००.००
०३	साईनगर मैदानावर	१००'x२००	२०,०००.००
०४	चौकशी कार्यालयासमोर	१५'x६०'	९००.००
०५	प्रसादालय परिसर पार्किंग	१००'x१५०	१५०००.००
	एकुण चौ. फुट		५६,१५०.००

संबधीत विभागाने मागणी केल्याप्रमाणे मंडप उभारणी करीता कालावधी कमी कालावधी असल्याने याकामी खालील स्थानिक मंडप ठेकेदार यांचेकडून कोटेशन मागविणेत आलेले आहेत.

अ. नं.	कोटेशन्सधारकाचे नांव
०१.	रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर
०२	सावता मंडप डेकोरेटर्स, राहाता
०३	लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर
०४	कल्याणी टेन्ट हाऊस, नांदुर
०५	बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर
०६	साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूर ता. श्रीरामपूर
०७	झुराळे टेन्ट मंडप डेकोरेटर्स, निमगांव खैरी

उपरोक्त प्रमाणे मंडप ठेकेदार यांचे प्राप्त झालेले कोटेशन / दरपत्रक दि. २३.१०.२००८ रोजी प्रशासकिय अधिकारी, शाखा अभियंता यांचे समक्ष उघडण्यात आले असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ. नं.	मंडप ठेकेदाराचे नांव	शामियाना मंडप उभारणे एकुण ४०,२५०.०० चौ. फुट कोटेशन मधिल दर रु. प्रति दिवस प्रति चौ. फुट	चर्चा तथा वाटाघाटी नंतरचे दर रु. प्रति दिवस प्रति चौ. फुट	शेरा
०१	रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर	०.३०	०.१९	
०२	सावता मंडप डेकोरेटर्स, राहाता	०.२७	०.१७	
०३	लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर	०.४०	--	
०४	कल्याणी टेन्ट हाऊस, नांदुर	०.३०	०.१५	निमन्तम
०५	बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर	०.४०	०.२०	
०६	साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूर ता. श्रीरामपूर	०.२०	०.१५	निमन्तम
०७	झुराळे टेन्ट मंडप डेकोरेटर्स, निमगांव खैरी	०.२५	०.१६	

उपरोक्त पैकी अ. नं. ०४ व अ.नं. ०६ यांचे दर न्यूनतम असल्याने, दोन्ही मंडप ठेकेदारांना मडप उभारण्याचे काम विभागुन देणेत यावे.

वरिल प्रमाणे नविन भक्तनिवासस्थान, साईनगर मैदानावर तसेच प्रसादालय परिसरात एकुण ५६,१५०.०० चौ. फुट शामियाना मंडप कनात व बिछायतीसह एकुण ०९ दिवस उभारणेकामी एकुण रु. ७५,८०२.५० मात्र इतका खर्च येईल.

तरी वरिल प्रमाणे न्युनतम दराचे ठेकेदार मे. कल्याणी टेन्ट हाऊस, नांदुर व साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूर ता. श्रीरामपूर यांचेकडून रु. ०.१५ प्रति चौ. फुट प्रति दिवस दराने करुन घेणेस व याकामी येणारे रु. ७५,८०२.५० मात्र इतके खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर

केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. तसेच, गर्दीचे प्रमाण जास्त दिवस राहील्यास त्यानुसार वाढीव कालावधीकरीता मंडप ठेवणेस अथवा मंडपाची साईज वाढविणेकामी येणारे योग्य त्या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

(१७) <u>दिपावली सुट्ट्यांमध्ये भक्तांचे निवासासाठी भाडोत्री गाद्या घेणेबाबत.</u>

दिपावलीनिमित्त शाळांना सुटया लागल्या असल्याने सुटयांचे कालावधीत शिर्डी येथे भक्तांची गर्दी होण्याची शक्यता आहे. संस्थानकडे भक्तांच्या निवासासाठी मर्यादीत निवासव्यवस्था असल्याने **दि.२५/१०/२००८ ते दि.०२/११/२००८** या कालावधीमध्ये परिसरामध्ये कापडी मंडप उभारणी करुन भक्तांची निवासव्यवस्था करण्यात येत आहे. कापडी मंडपामध्ये भक्तांना पुरविण्यासाठी भाडोत्री गाद्या घेणे असल्यामुळे पुरवठाधारकांकडून दरपत्रके मागविण्यात येवून त्यांच्याशी दराबाबत समक्ष चर्चा / वाटाघाटी करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार पुरवठाधारकांनी खालीलप्रमाणे दर दिलेले आहेत.

अ.नं.	नांव.	निविदेतील दर.	वाटाघाटीनंतरचे दर.
१.	श्री बालाजी मंडप डेकोरेटर्स,मनमाड.	०४-७५	४-००
२.	सावता मंडप डेकोरेटर्स,राहाता.	०४-९५	०४-२५
३.	सप्तश्रृंगी मंडप डेकोरेटर्स,राहाता.	०४-९०	०४-७५
४.	रोशनी मंडप अॅण्ड लाईट डेकोरेटर्स ,संक्रापुर.	०५-००	०३-७५
५.	लोढा मंगल केंद्र,कोपरगांव.	०४-९०	गैरहजर.

वाटाघाटीअंती पुरवठाधारकांनी दिलेल्या दरानुसार रोशनी मंडप अॅण्ड लाईट डेकोरेटर्स,संक्रापुर यांचे प्रतिगादीस प्रति दिवसासाठी रु.३-७५ हे दर सर्वात कमी असुन १५०० गाद्या ९ दिवस भाडयाने घेण्यासाठी रु.५०,६२५/- इतका खर्च येईल. तरी आवश्यकतेनुसार मंजुर दराने भाडोत्री गाद्या घेणेस व येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेस विनंती. तसेच प्रसंगी गर्दी टिकुन राहिल्यास १५०० पेक्षा जादा भाडोत्री गाद्या घेण्याचे आवश्यक वाटल्यास तशी कार्यवाही करणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चासही मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक, भक्तनिवासस्थान)

(१८) <u>श्री साईबाबा रुग्णालयाचे न्युरो ओ.टी., आय.सी.यु साठी हॉस्पिटल फर्निचर खरेदी बाबत</u>

श्रीसाईबाबा रुग्णालयाचे न्युरो ओ.टी. साठी लागणाऱ्या विविध मशिनरी/उपकरणे/फर्निचर खरेदी कामी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या. दि.०६/०९/२००८ चे मा. व्यवस्थापन समिती सभेत ठरल्यानुसार मा. विश्वस्त डॉ.ए.भा.गोंदकर, श्री. पांडूरंग अभंग, श्री.सुरेश वाबळे, श्री. अशोक खांबेकर यांच्या समितीने तांत्रिक बाबींचा अभ्यास करुन खरेदी कामी निर्णय घ्यावा असे ठरले होते. परंतु काही कारणास्तव मा. विश्वस्त श्री. पांडूरंग अभंग, श्री.सुरेश वाबळे, श्री. अशोक खांबेकर उपस्थित राहू शकले नव्हते. त्यामुळे मा. विश्वस्त डॉ.ए.भा.गोंदकर यांनी फर्निचर खरेदीकामी प्राप्त ७ निविदांचा तांत्रिक अभ्यास करुन फर्निचर खरेदीकामी मे. भारत सर्जीकल, पुणे यांचे फर्निचर करीता दर पत्रक बोलावून त्याचा देखील विचार करावा असे सुचविले होते. त्यानुसार मे. भारत सर्जिकल, पुणे (क्वाली सर्ज, पुणे) यांनी त्यांचे फर्निचरचे माहिती पत्रक / दरपत्रक दि.११/१०/२००८ रोजी पाठवले असून सदर फर्निचरचे दर मे.जनक हेल्थ केअर, मुंबई यांचे तुलनेत खुपच कमी आहे.

मे. भारत सर्जिकल, पुणे यांनी कोठे कोठे फर्निचर दिले आहे तेथे जाऊन त्याचा नमूना पाहून तो चांगला असल्यास सदर कोटेशनचा समावेश करता येईल व तद्नंतर त्यांचेकडून रीतसर अनामत रक्कम स्विकारता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

(१९) <u>श्री विरभद्र बिरोबा बन येथील श्री विरभद्र यात्रेतील कुस्त्यांकरीता आर्थिक मदत देणे बाबत.</u>

श्री हरी हेमा बनकर, अध्यक्ष, श्री विरभद्र यात्रा कमिटी, शिर्डी (बिरेगांव बन) यांनी त्यांचे दिनांक १३/१०/२००८ रोजीचे अर्जात विरभद्र (बिरोबा) या दैवताची यात्रा हि मंगळवार, दि.११/११/२००८ ते गुरुवार, दि.१३/११/२००८ अखेर बिरोबा बन, शिरडी येथे मोठया थाटात भरणार असून यात दि.१३/११/२००८ रोजी कुस्ती हंगामाही आयोजित केलेला आहे, या कुस्त्यात भाग घेणा-या व विजयी पहिलवानांना वाटण्यासाठी म्हणून मागील वर्षी रु.५०,०००/- मात्रची रक्कम मदत मिळाली होती, परंतू पहिलवानांचे वाढते संख्येमुळे मागील वर्षी रक्कम अपूरी पडली म्हणून मागील वर्षीचा अनुभव लक्षात घेता रु.७५,०००/- ची आर्थिक मदत मिळावी अशी नम्र विनंती करण्यात आलेली आहे.

कुस्त्यांसाठी म्हणून संस्थानमार्फत फक्त श्री रामनवमी उत्सवातच रु.७५,०००/- इतकी रक्कम देत असते. त्यावेळी संस्थानचे प्रतिनिधी म्हणून लेखाशाखेतील कर्मचारी मदतीसाठी असतात. श्री रामनवमी उत्सवातील प्रथेप्रमाणे संस्थानचा प्रतिनिधी नियुक्त करुन रक्कम वाटता येईल. मागील वर्षी दि.१८/११/२००७ रोजीचे शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील आयत्यावेळचा विषय क्र. ०२, निर्णय क्र.७८२ अन्वये संस्थानमार्फत कुस्त्यांसाठी म्हणून रु.५०,०००/- मात्रची रक्कम लेखाशाखेमार्फत वाटण्यात आलेली होती.

अर्जदारांनी साध्या कागदावर विनंती अर्ज केलेला आहे. तथापि सदरची बिरोबा यात्रा ही शिर्डी गांवची यात्रा असलेने त्याठिकाणी होणा-या कुस्तीचे कार्यक्रमास आर्थिक मदत देणेबाबत विचार करणेस हरकत नाही. असे नम्र मत आहे.

तथापि मंगळवार, दि.११/११/२००८ ते गुरुवार, दि.१३/११/२००८ अखेर होणा-या विरभद्र यात्रेतील गुरुवार, दि.१३/११/२००८ रोजी होणा-या कुस्त्यांच्या हंगामासाठी मागील वर्षाप्रमाणे रु.५०,०००/- (अक्षरी रु.पंन्नास हजार मात्र) इतकी रक्कम द्यावी किंवा त्यांचे मागणीनुसार रु. ७५,०००/- इतकी रक्कम श्री रामनवमी उत्सवाप्रमाणे संस्थान प्रतिनिधी नेमून द्यावी किंवा कसे याबाबतच्या धोरणात्मक निर्णयासाठी प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, विरभद्र हे शिर्डीचे ग्रामदैवत असल्याने यात्रेच्या आयोजनात संस्थानचा सहभाग आवश्यक आहे. सबब विरभद्र यात्रेतील गुरुवार, दि.१३/११/२००८ रोजी होणा-या कुस्त्यांच्या हंगामासाठी रु. ७५,०००/- इतकी रक्कम श्री रामनवमी उत्सवाप्रमाणे संस्थान प्रतिनिधी नेमून द्यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०५)

(२०) श्रीसाईप्रसादालयाकरीता संरक्षण भिंत तसेच चैनलिंक फेनिंग बांधकामासाठी प्राप्त झालेल्या निविदा उघडून निर्णय घेणे बाबत.

दि.१०/०१/२००८ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे बैठकितल निर्णय क्रं.१३२ अन्वये श्री साई प्रसादालयायेथील गट नं. ८०,८५ मधील जागेभोवती राहिलेल्या भागात कंपाउंड भिंतीचे बांधकाम करणेस अंदाजे रुपये ८.२० लक्ष मात्र इतक्या खर्चास तसेच याकामी शक्ती परमार असोसिएट, मंबई यांची आर्किटेक्ट म्हणून सेवा घेणेस मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार विषयांकीत बांधकामासाठी आर्किटेक्ट शक्ती परमार यांना इकडील विभागामार्फत वेळोवेळी दुरध्वनीव्दारे तसेच इकडील जा.क्र. ५५०१/२००८ दि. १३/०४/२००८ रोजीचे पत्रान्वये निविदा तयार करणेसाठी कळविण्यात आले होते. पंरतू सदर आर्किटेक्ट यांनी प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे मा. कार्यकारी अधिकारी यांचे दि.०१/०७/२००८ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता घेऊन संस्थानचे पॅनलवरील आर्किटेक्ट मे. निकम पा. असो. श्रीरामपूर यांना इकडील जा.क्रं.१०२५७/२००८ दि.१५/०७/२००८ अन्वये विषयांकीत बांधकामासाठी प्लॅन, एस्टीमेट व निविदा तयार करणेबाबत कळविणेत आले आहे.

त्यानुसार आर्किटेक्ट निकम पा. असो. श्रीरामपूर यांनी सन २००८-२००९ चे दरसुची नुसार रु.५,४९,६०४.००/- मात्र इतक्या रकमेची निविदा तयार केली असुन दि.१७/१०/२००८ रोजी वर्तमानपत्रात निविदा सुचना तसेच संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती.निविदा विक्रीचा कालावधी दि.१७/१०/२००८ ते दि.२३/१०/२००८ इतका ठेवण्यात आला होता तसेच सिलबंद निविदा सादर करण्याची मुदत दि.२४/१०/२००८ रोजी ठेवण्यात आली आहे. विहीत मुदतीत खालील निविदाधारकांनी निवीदा विकत घेतल्या आहेत.

अ.नं	निविदासादरकर्त्याचे नांव
०१	इंजि.योगेश सुरेश पाटिल,कोपरगाव.
०२	श्री.पगार मिलींद दादासाहेब,नांदगाव.
०३	श्री.गोविंद श्रीरंग गायके, मु.पो.सुरेगाव, ता.येवला.
०४	श्री.निलेश जिभाऊ सोनवणे,नाशिक रोड
०५	संतोष एन.गुंजेगावकर,मु.पो.निघोज,ता.राहाता.
०६	एम.एस.एस.आय.डि.कार्पोरेशन लिमिटेड,नाशिक.
०७	मे.सचिंद्रा कन्सल्टींग सिव्हील इंजि.,नाशिक.

त्यानुसार विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या खालीलप्रमाणे सिलबंद निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत.

अ.नं	निविदासादरकर्त्याचे नांव	निविदेतील दर	चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेल दर
०१	इंजि.योगेश सुरेश पाटिल,कोपरगाव.	५.५ % अधिक	अनुपस्थित
०२	श्री.पगार मिलींद दादासाहेब,नांदगाव.	१६ % अधिक	१४% अधिक
०३	श्री.गोविंद श्रीरंग गायके, मु.पो.सुरेगाव, ता.येवला.	१२.९८% अधिक	१२.९८% अधिक
०४	श्री.निलेश जिभाऊ सोनवणे,नाशिक रोड	१.८% अधिक	१ % अधिक
०५	संतोष एन.गुंजेगावकर,मु.पो.निघोज,ता.राहाता.	७ % अधिक	निविदा दरात
०६	एम.एस.एस.आय.डि.कार्पोरेशन लिमिटेड,नाशिक.	८% अधिक	८% अधिक

यावर सविस्तर चर्चा होऊन,संतोष एन गुंजेगावकर यांची निम्नतम दराची निविदा स्विकारणेत येऊन,त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

(२१) श्रीसाई प्रसादालयाकरीता गॅस सिलेंडर्स मॅनिफोल्ड शेड उभारणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.

दि.१०/०१/२००८ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे बैठकितल निर्णय क्रं.१३२ अन्वये श्री साई प्रसादालयाकरीता गॅस सिलेंडर्स मॅनिफोल्डस व्यवस्थेसाठी स्लॅब अथवा पत्राशेड बांधकाम करण्यासाठी प्राथमिक ढोबळ अंदाजनुसार ७.५० लक्ष मात्र इतक्या खर्चास तसेच याकामी शक्ती परमार असोसिएट, मंबई यांची आर्किटेक्ट म्हणून सेवा घेणेस मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार विषयांकित बांधकामासाठी आर्किटेक्ट शक्ती परमार यांना इकडील विभागामार्फत वेळोवेळी दुरध्वनीव्दारे तसेच इकडील जा.क्र. ५५०१/२००८ दि. १३/०४/२००८ रोजीचे पत्रान्वये निविदा तयार करणेसाठी कळविण्यात आले होते. पंरतू सदर आर्किटेक्ट यांनी प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे मा. कार्यकारी अधिकारी यांचे दि.०१/०७/२००८ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता घेऊन संस्थानचे पॅनलवरील आर्किटेक्ट मे. निकम पा. असो. श्रीरामपूर यांना इकडील जा.क्रं.१०२५७/२००८ दि.१५/०७/२००८ अन्वये विषयांकित बांधकामासाठी ऑर्डर देण्यात आली आहे.

त्यानुसार आर्किटेक्ट निकम पा. असो. श्रीरामपूर यांनी सन २००८-२००९ चे दरसुची नुसार रु ७,९३,६८४/-मात्र इतक्या रकमेची निविदा तयार केल्या असुन दि.१७/१०/२००८ रोजी वर्तमानपत्रात निविदा सुचना तसेच संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती.निविदा विक्रीचा कालावधी दि.१७/१०/२००८ ते दि.२३/१०/२००८ इतका ठेवण्यात आला होता तसेच सिलबंद निविदा सादर करण्याची मुदत दि.२४/१०/२००८ ठेवण्यात आली आहे.विहीत मुदतीत खालील निविदाधारकांनी निवीदा विकत घेतल्या आहेत.

अ.नं.	निविदाधारकाचे नाव
०१	मे.रविंद्र रबर प्रॉडक्ट अॅण्ड फॅब्रिकेशन,श्रीरामपुर
०२	इंजि.योगेश सुरेश पाटिल,कोपरगाव.
०३	श्री.गोविंद श्रीरंग गायके,मु.पो.सुरेगाव,ता.येवला
०४	मिलींद एस.पाचोरकर,काकासाहेब नगर,ता.निफाड.
०५	संतोष एन.गुंजेगावकर,मु.पो.निघोज,ता.राहाता.
०६	एम.एस.एस.आय.डि.कार्पोरेशन लिमीटेड,नाशिक.
०७	मे.सचिंद्रा कन्सल्टींग सिव्हील इंजि.,नाशिक.

विहिती मुदतीत प्राप्त झालेल्या खालीलप्रमाणे सिलबंद निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

अ.नं	**निविदासादरकर्त्याचे नांव**	**निविदेतील दर**	**चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेल दर**
०१	मे.रविंद्र रबर प्रॉडक्ट अॅण्ड फॅब्रिकेशन,श्रीरामपुर	७.५ % कमी	८.५ % कमी
०२	श्री.गोविंद श्रीरंग गायके,मु.पो.सुरेगाव,ता.येवला.	१५% अधिक	१५ %अधिक
०३	मिलींद एस.पाचोरकर,काकासाहेब नगर,ता.निफाड.	निविदा दरात	अनुपस्थित
०४	संतोष एन.गुंजेगावकर,मु.पो.निघोज,ता.राहाता.	३.५०%अधिक	निविदा दरात
०५	एम.एस.एस.आय.डि.कार्पोरेशन लिमीटेड,नाशिक.	६% अधिक	५% अधिक

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.रविंद्र रबर प्रॉडक्ट अॅण्ड फॅब्रिकेशन, श्रीरामपुर यांची निम्नतम दराची निविदा स्विकारणेत येऊन,त्यांना कार्यादेश देण्यात यावा,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

(२२) <u>श्री साईबाबा हॉस्पिटलचे माजी वैद्यकीय संचालक, डॉ.ढवळे यांचे कार्य काळातील माहे फेब्रुवारी २००८ अखेर कोणतेही कागदपत्रे नसतांना बिल न भरता डिसचार्ज केलेल्या रुग्णांचे बिलाबाबत.</u>

उपरोक्त विषयाबाबत सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

(२३) <u>श्रीसाईनाथ रुग्णालयात रुग्ण व त्यांचे नातेवाईकांना बसण्यासाठी थ्री सिटर खुर्च्या खरेदी करणेबाबत.</u>

श्रीसाईनाथ रुग्णालयाने डी.पी.क्र.५६४३ दि.०२.१०.२००८ अन्वये ३० नग थ्री सिटर खुर्च्याची मागणी केलेली आहे.सदरच्या खुर्च्या ह्या ओ.पी.डी.साठीच्या पेशंटला तसेच अॅडमिट पेशंटच्या नातेवाईकांना बसण्यासाठी आवश्यक आहेत कारण सध्या असलेल्या पैकी काही खुर्च्या ह्या वापरुन खराब झालेल्या आहेत.

श्रीसाईबाबा रुग्णालयाकरीता नुकत्याच गोदरेज कंपनीच्या Bliss Model च्या Without Arm च्या थ्री सिटर चेअर ६० नग मे.सेवा फिनव्हेस्ट (इं) प्रा.लि.नाशिक यांचेकडून प्रती नग रु.५५००/- या दराने मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१६/०३/२००८ निर्णय क्रमांक २१४(६) अन्वये खरेदी करण्यात आलेल्या असून त्या रुग्ण व त्यांचे नातेवाईकांना वापरावयास दिलेल्या आहेत. सदर खुर्च्या ह्या चांगल्या

दर्जाच्या असून त्याच मंजूर दराने श्री साईनाथ रुग्णालयाकरीता ३० नग खरेदी करता येतील याबाबत मे.सेवा फिनव्हेस्ट (इं) प्रा.लि.नाशिक यांना दुरध्वनीवरुन विचारणा केली असता ते त्याच मंजूर दराने पुरवठा करण्यास तयार आहेत असे त्यांचे दिनांक २७/०९/२००८ चे पत्रान्वये कळविले आहे.

तरी वरील प्रमाणे मंजुर दर रु.५५००/- या प्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयासाठी अजून ३० नग मे.सेवा फिनव्हेस्ट (इं) प्रा.लि.,नाशिक यांचेकडून खरेदीस व याकामी येणाऱ्या रु. १,६५,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मागील नियम अटीनुसार त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

(२४) श्रीसाई राहूल जाधव, कोपरगांव यांना वैद्यकीय आर्थिक अनुदान देणे बाबत

श्री.राहूल जाधव, कोपरगाव यांनी त्यांचे अर्जान्वये त्यांचा मुलगा चि.साई राहूल जाधव वय वर्ष ५ याचे हृदय शस्त्रक्रियेसाठी आर्थिक अनुदान मिळणेसाठी अर्ज दिलेला आहे. सदरची शस्त्रक्रिया पुणे येथील दिनदयाळ मेमोरियल हॉस्पिटल येथे दिनांक १२.११.२००८ रोजी होणार आहे. या अगोदर दिनांक २७.०३.२००४ रोजी चि.साई याचेवर पुणे येथे हृदय शस्त्रक्रिया झालेली असून त्यासाठी त्यास संस्थानमार्फत रुपये १८ हजार आर्थिक मदत देण्यात आलेली आहे. सदर शस्त्रक्रियेसाठी रुपये १.७५ लाख खर्च अपेक्षित आहे.

संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार शस्त्रक्रिया/उपचारासाठी फक्त एकदाच वैद्यकीय आर्थिक अनुदान देण्यात येते. श्री.राहूल जाधव यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने मानवतावादी दृष्टीकोनातून वेगळा आजार असल्यास संस्थान नियमानुसार त्यांना पुन्हा आर्थिक अनुदान देण्यात यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षीका)

(२५) डॉ.अजय तम्मेवार यांनी ऑनररी व्हिजीटींग व्हिटरो-रॅटिनल सर्जन यांच्या नियुक्तीबाबत.

डॉ.अजय तम्मेवार यांनी श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ऑनररी व्हिजीटींग व्हिटरो-रॅटिनल या पदावर नेमणूक होणेबाबत दि.०९.०७.२००८ रोजी विनंती अर्ज सादर केलेला आहे. अर्जासोबत त्यांनी बायोडाटा सादर केलेला आहे. त्यांची माहिती खालीलप्रमाणे-

शिक्षण- एम.बी.बी.एस. नोव्हे-१९८८, एम.एस. (ऑप्थल्मॉलॉजी) मे-१९९२,
व्हिटरो-रॅटिनल सर्जरीमध्ये युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्नियाची फिलोशिप (२००५-२००७)

प्रमाणपत्र- १. एम.बी.बी.एस.चे रजिस्ट्रेशनचे प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत
२. एम.एस. (ऑप्थल) रजिस्ट्रशन झेरॉक्स प्रत
३. एम.एस. पास झाल्याचे प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत

अनुभव- १. एम.जी.एम. मेडीकल कॉलेज, औरंगाबाद येथे जाने-२००४ (४ वर्षापासून) असो.प्रोफेसर या पदावर कार्यरत आहेत.
२. एम.जी.एम. मेडीकल कॉलेज, औरंगाबाद येथे मे- १९९३ ते डिसेंबर- २००३ ऑप्थल्मॉलॉजी विभागात दहा वर्ष लेक्चर या पदाच्या कामाचा अनुभव.
३. एम.जी.एम. मेडीकल सेंटर ॲण्ड रिसर्च इन्स्टीटयुट, औरंगाबाद येथे १९९७ पासून कन्सल्टंट व्हिटरो-रॅटिनल सर्जन या पदाचे काम करत आहे.

वैद्यकिय संचालक यांनी ऑनररी व्हीजीटींग व्हिटरो-रॅटिनल सर्जनची आवश्यकता असल्याने डॉ.अजय तम्मेवार यांना नियुक्ती आदेश द्यावेत अशी शिफारस केलेली आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.अजय तम्मेवार यांना ऑनररी व्हीजीटींग व्हिटरो-रॅटिनल सर्जन या पदावर नियुक्ती आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

विषय नं.०५ दिनांक १२.१२.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त

निर्णय नं.०५ दिनांक १२.१२.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या,त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

(०१) स.नं.१४८ मधील व्दारावती भक्तनिवास इमारतीचे फर्निचर (लगेज रॅक) खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.

संस्थानचे शिर्डी येथील स.नं. १४८ मधिल द्वारावती भक्तनिवास इमारतीचे तळमजला (पार्कींग) अधिक चार मजले प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात असून चौथा मजला बांधकाम, रस्ता, पाणीपुरवठा, ड्रेनेज व इलेक्ट्रीकल काम प्रगतीपथावर आहे.

द्वारावती भक्तनिवास इमारतीमध्ये कडप्पा ग्रीन मार्बल मधील लगेज रॅक तयार करणेकामी येणारे रु. ११,१०,०००/- मात्रचे खर्चास व सदरचे काम अशा प्रकारचे काम करणारे ठेकेदार यांचेकडून कोटेशन मागवून करुन घेणेस मा. व्यवस्थापन समितीचे दि. १५.११.२००८ रोजीचे मान्यता देणेत आलेली आहे. त्यानूसार

वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिद्ध करुन विहीत पद्धतीने सिलबंद निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. त्यानूसार खालील ठेकेदार यांनी विहीत मुदतीत निवीदा घेतलेल्या होत्या. त्याचा तपशिल खालील प्रमाणे :-

०१) श्री साई नॅचरल स्टोन, साकुरी (शिर्डी)
०२) मे. श्री साई ग्रेनाईट मार्बल वर्क्स, साकुरी
०३) मे. अतुल व्हि. चव्हण, अहमदनगर

उपरोक्त निवीदाधारकांपैकी खालील ०२ निवीदाधारकांनी विहीत मूदतीत सिलबंद निवीदा सादर केल्या होत्या. व्दारावती इमारत चालू करण्याचे दृष्टीने सदरील काम तातडीने पूर्ण करण्याचे आवश्यक असल्याने सदरच्या निवीदा मा. व्यवस्थापन समितीचे स्थानिक विश्वस्तांसमक्ष दि. १०.१२.२००८ रोजी उघडणेत येऊन, चर्चा/वाटाघाटी केल्या असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

अ. नं.	**निवीदासादर कर्त्याचे नांव**	**निवीदेतील दर ३०७ नगांसाठी**	**चर्चा/ वाटाघाटीनंतरचे दर ३०७ नगांसाठी**
०१	श्री साई नॅचरल स्टोन, साकुरी (शिर्डी)	१०,३१,५२०.००	९,८२,४००.००
०२	मे. श्री साई ग्रेनाईट मार्बल वर्क्स, साकुरी	१०,४३,८००.००	अनुपस्थीत

वरिल प्रमाणे व्दारावती इमारतीतील खोल्यामधून लगेज रॅक तयार करणेसाठी मे. श्री साई नॅचरल स्टोन, साकुरी (शिर्डी) यांनी चर्चा तथा वाटाघाटी अंती दिलेले दर निम्नतम स्वरुपाचे असल्याने सदरचे काम त्यांचेकडून करुन घेणेबाबत मा. व्यवस्थापन समितीचे उपस्थित सदस्यांनी शिफारस केली आहे. तसेच सदरहू लगेज रॅक संबधीत पुरवठादाराने त्यांचे कार्यशाळेमध्ये तयार करुन, व्दारावती इमारतीचे कार्यस्थळावर बसवून द्याव्यात तसेच सदरहू काम संबंधीतीकडून तातडीने पूर्ण करुन घेण्यात यावे, असे निर्देश दिले आहेत.

वरिल प्रमाणे मे.श्री साई नॅचरल स्टोन, साकुरी (शिर्डी) यांचेकडून व्दारावती इमारतीतील खोल्यामधून लगेज रॅक निम्नतम दराने तयार करुन घेणेस व त्याकामी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

(०२) नाताळ सुट्टीतील गर्दीचे कालावधीत साईभक्तांचे सोयीकरीता मंडप टाकणेकामी आलेले कोटेशन्स उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.

नाताळ (ख्रिसमस) वर्षाअखेर व नूतनवर्षारंभ या कालावधीत साईभक्तांचा मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता आहे. येणारे साई भक्तांची निवासांची व्यवस्था होणेकरीता दि. २४/१२/२००८ ते दि. ०२/०१/२००९ पर्यंत १० दिवसांकरीता भक्तनिवासस्थान (५०० रुम) परिसर तसेच प्रसादालय परिसर, साईनगर परिसर, इत्यादी ठिकाणी साईभक्तांचे अतिरिक्त निवास व्यवस्थेसाठी तात्पुरते शामियाना मंडप व्यवस्था बिछायत व कनातीसह खालीलप्रमाणे करणेकरीता अंदाजे रु. ३,००,०००.०० मात्रचे खर्चास व सदरचे कामासाठी विहीत पध्दतीत मंडप ठेकेदार यांचेकडून कोटेशन मागविणेस मा. व्यवस्थापन समितीचे दि. १५.११.२००८ रोजीचे सभेत मान्यता देणेत आलेली आहे.

अ) साईबाबा भक्तनिवासस्थान परीसरातील मंडप :- ६०,२५०.०० चौ.फुट
ब) मंदीर परिसर व प्रसादालय परिसरातील मंडप :- ४८,९७४.०० चौ.फुट
क) साईनगर परिसरातील मंडप :- ४०,०००.०० चौ. फुट
ड) शिर्डी महोत्सव करीता स्वागत कमाणी उभारणे :- ०३ नग (दि. २९.१२.०८ ते दि. ०१.०१.०९ पर्यंत एकुण ०४ दिवस)

उपरोक्त तपशिलाप्रमाणे मंडप उभारणेकामी अशा प्रकारचे मंडपाचे काम करणारे खालील मंडप ठेकेदार यांचेकडून दि. २९.११.२००८ ते दि. ४.१२.२००८ पर्यंत कोटेशन विक्री तारीख देऊन दि. ०५.१२.२००८ रोजी सिलबंद कोटेशन सादर करणे बाबत कळविणेत आले आहे.

०१. कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर
०२. झुराळे टेन्ट मंडप डेकोरेटर्स, निमगांव खैरी
०३. सावता मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, राहाता
०४. रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर
०५. शर्मा मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, वैजापूर
०६. बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर
०७. बालाजी मंडप डेकोरेटर्स, मु. पो. मनमाड
०८. शुभम टेन्ट हाऊस, निमगांव खैरी
०९. गणेश मंडप डेकोरेटर्स, कोपरगांव
१०. जाधव मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, कोपरगांव
११. साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूरगांव ता. श्रीरामपूर
१२. कल्यानी टेन्ट हाऊस, मु. पो. नांदुर, ता. राहाता
१३. लोकप्रिय डेकोरेटर्स, मु. पो. संक्रापूर

वरिल प्रमाणे अशा प्रकारचे काम करणारे ठेकेदार यांचेकडून कोटेशन मागविण्यात आले असून खालील ठेकेदार यांनी विहीत मुदतीत सिलबंद कोटेशन सादर केले आहेत.

०१. कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर
०२. झुराळे टेन्ट मंडप डेकोरेटर्स, निमगांव खैरी
०३. सावता मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, राहाता
०४. रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर
०५. बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर
०६. बालाजी मंडप डेकोरेटर्स, मु. पो. मनमाड
०७. शुभम टेन्ट हाऊस, निमगांव खैरी
०८. साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूरगांव ता. श्रीरामपूर
०९. कल्यानी टेन्ट हाऊस, मु. पो. नांदुर, ता. राहाता

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना आजचे सभेत समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

अ.नं.	निविदासादरकर्त्याचे नांव	निविदेतील दर	चर्चा/वाटाघाटीअंति देऊ केलेले दर

		(दि.२४.१२.२००८ ते २.०१.२००९ अखेर शामियाना/कापडी मंडप एकूण १,४९,२२४ चौ.फुट) दर रुपये प्रति चौ.फु.	(दि.२९.१२.२००८ ते १.०१.२००९ अखेर शिर्डी महोत्सवाकरिता स्वागत कमानी उभारणे ४ दिवसांसाठी एकूण ०३ नग (२+१) दर रु.प्रति नग प्रति दिवस	(दि.२४.१२.२००८ ते २.०१.२००९ अखेर शामियाना/कापडी मंडप एकूण १,४९,२२४ चौ.फुट) दर रुपये प्रति चौ.फु.	(दि.२९.१२.२००८ ते १.०१.२००९ अखेर शिर्डी महोत्सवाकरिता स्वागत कमानी उभारणे ४ दिवसांसाठी एकूण ०३ नग (२+१) दर रु.प्रति नग प्रति दिवस
०१	कैलास मंडप अॅण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर	०.६०	१३००/- प्रति दोन नगासाठी १२५०/- एक नगासाठी	०.५५	१२५०/- प्रति दोन नगासाठी १२००/- एक नगासाठी
०२	झुराळे टेन्ट मंडप डेकोरेटर्स, निमगांव खैरी	०.८५	४०००/- प्रति दोन नगासाठी १५००/- एक नगासाठी	०.५५	४०००/- प्रति दोन नगासाठी १५००/- एक नगासाठी
०३	सावता मंडप अॅण्ड लाईट डेकोरेटर्स, राहाता	०.७५	१५००/- प्रति दोन नगासाठी १०००/- एक नगासाठी	०.४५	१०००/- प्रति दोन नगासाठी ९००/- एक नगासाठी
०४	रोशनी मंडप अॅण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर	०.९०	३०००/- प्रति दोन नगासाठी २०००/- एक नगासाठी	०.६०	३०००/- प्रति दोन नगासाठी २०००/- एक नगासाठी
०५	बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर	०.९५	४५००/- प्रति २ नगासाठी व (३००० प्रति १ नगासाठी)	०.५९	११००/- प्रति दोन नगासाठी ९००/- एक नगासाठी
०६	बालाजी मंडप डेकोरेटर्स, मु. पो. मनमाड	अपूर्ण	अपूर्ण	०.७०	---
०७	शुभम टेन्ट हाऊस, निमगांव खैरी	०.८०	१५००/- प्रति २ नगासाठी २००० प्रति १ नग	०.६०	१५००/- प्रति २ नगासाठी व १२००/- एक नगासाठी
०८	साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूरगांव ता. श्रीरामपूर	०.८७	५०००/- प्रति दोन नगासाठी २०००/- एक नगासाठी	०.६०	३०००/- प्रति दोन नगासाठी १५००/- एक नगासाठी
०९	कल्यानी टेन्ट हाऊस, मु. पो. नांदुर, ता. राहाता	०.७५	३५००/- प्रति २ नगासाठी (३००० प्रति १ नगासाठी)	०.५५	१०००/- प्रति नगासाठी

यावर सविस्तर चर्चा होऊन,सांवता मंडप अॅण्ड लाईट डेकोरेटर्स,राहाता,यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच दर्शन रांग मंडप जुना पिंपळवाडी डिव्हायडरपर्यंत टाकण्यात यावा व गर्दीचे प्रमाण वाढल्यास वाढीव मंडप व आवश्यकता पडल्यास जादा कालावधीसाठीही मंजूर दराने मंडप टाकणेस व याकामी येणारे योग्य त्या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

(०३)मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं.१६९ मधील श्री साईप्रसाद गृह निर्माण संस्थेचे अंतर्गत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणेकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.

संस्थानचे मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं. १६९ मधील ६० आर क्षेत्र असलेल्या प्लॉटमध्ये संस्थानचे वर्ग - ४ कर्मचारी निवासस्थान इमारतींचे बांधकाम करण्यात आलेले असून इमारतीचा वापर रहिवासाकरीता सुरु करण्यात आलेला आहे. संस्थानचे प्लॉटमध्ये जाणे येणे करीता साईप्रसाद भाडेकरु मालकी गृहनिर्माण संस्था मर्या. निमगांव व श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी यांचे अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेसाठी वर्तमानपत्रात निविदा सूचना प्रसिध्द करणेत येवून सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या. विहीत मूदतीत तीन ठेकेदारानी कोऱ्या निविदा फॉर्म विकत घेतले होते. पैकी पॅसो इंजिनीअर्स, अॅण्ड कॉन्ट्रक्टर, कोपरगांव यांची एकच निविदा विहीत मूदतीत प्राप्त झाली होती त्यावर मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०६/०९/२००८ नि.क्र. ७२२ अन्वये याकामी फेर निविदा मागविण्याचे ठरले होते.

सदर कामासाठी आर्किटेक्ट निकम पा. असो. श्रीरामपूर यांनी जिल्हा दरसुची २००८-२००९ नुसार रुपये ७,२९,३४२.०० मात्र रक्कमेचे सुधारीत अंदाजपत्रक व कोरे निविदा फॉर्म तयार केले आहेत.

त्यानुसार वर्तमानपत्रात निविदा सूचना प्रसिध्द करणेत येवून कोऱ्या निविदा फॉर्मची विक्री दि. १७/११/२००८ ते दिनांक २५/११/२००८ अखेर तसेच सिलबंद निविदा सादर करणेची मुदत दि. २७/११/२००८ अखेर दुपारी ४.३० पर्यंत ठेवणेत आली होती.

याकामी विहीत मदूतीत खालील तिन ठेकेदार यांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतले होते.

०१) पॅसो इंजिनिअर्स, ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर, कोपरगांव

०२) मे.बी.डी. शिंदे ॲण्ड कंपनी, इंजिनीअर्स, राहाता

०३) संतोष एन गुंजेगावकर निघोज, ता. राहाता

उपरोक्त तिनही निविदाधारकांनी विहीत मुदतीत सिलबंद निवीदा सादर केल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

अ.नं.	**ठेकेदारांचे नांव**
०१	पॅसो इंजिनिअर्स, ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर, कोपरगांव
०२	संतोष एन गुंजेगांवकर मु.पो. निघोज, ता. राहाता
०३	मे.बी.डी. शिंदे ॲण्ड कंपनी इंजिनिअर्स, ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स,राहाता

उपरोक्तप्रमाणे विहीत मूदतीत प्राप्त झालेल्या सिलबंद निविदा आजचे सभेपुढे उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

अ.नं.	**ठेकेदारांचे नांव**	**निविदेतील दर**	**चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर**
०१	पॅसो इंजिनिअर्स, ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर, कोपरगांव	२३ % अधिक	अनुपस्थित
०२	संतोष एन गुंजेगांवकर मु.पो. निघोज, ता. राहाता	१८ % अधिक	१५ % अधिक
०३	मे.बी.डी. शिंदे ॲण्ड कंपनी इंजिनिअर्स, ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स,राहाता	०.०९ %कमी	अनुपस्थित

यावर सविस्तर चर्चा होऊन,मे.बी.डी.शिन्दे ॲण्ड कंपनी,इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स,राहाता यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

(०४) <u>शिर्डी येथील नवीन जिल्हा परिषद शाळेत ॲकॉस्टिल ट्रिटमेंट करणेकामी प्राप्त झालेल्या निविदावर चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.</u>

शिर्डी येथील सर्व्हे नंबर ०६ आरक्षण क्रमांक ०८ मधील नवीन जिल्हा परिषद शाळेत ॲकॉस्टिकल ट्रिटमेंट देणेकामी व सदर कामास येणाऱ्या योग्य त्या खर्चास व श्री. मिलिंद रोंगे यांचेकडून सेवा म्हणून काम करुन घेणेस मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १० जानेवारी, २००८ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १३६ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार श्री. मिलिंद रोंगे यांना इकडील जा.क्र. एसएसएसटी/बांध/३४८८/२००८, दिनांक ०६ मार्च, २००८ अन्वये पत्र देऊन त्यांचेकडून सदर कामाचे नकाशे, डिझाईन, स्पेसिफिकेशन्स, इस्टिमेट ईत्यादी मागविणेत आले. याबाबत वेळोवेळी श्री. मिलिंद रोंगे यांचेकडे पाठपुरावा करण्यात आला परंतु त्यांचे प्रकृती अस्वास्थामुळे त्यांचेकडून प्रतिसाद मिळाला नाही. श्री. रोंगे यांचेशी दिनांक २५ ऑक्टोबर, २००८ रोजी संपर्क साधला असता त्यांनी आता त्यांचे सहकारी श्री. विजय पुरंदरे (व्ही.एन.पुरंदरे ॲण्ड असोसिएटस्, पुणे) यांचेमार्फत जिल्हा परिषद शाळेसाठी करावयाची ॲकॉस्टिकल ट्रिटमेंट व त्यासंबंधी कामकाज करुन घ्यावे, असे सुचविले आहे.

त्यानुसार श्री. पुरंदरे यांचेकडून दि. २७.१०.२००८ रोजी ई-मेल व्दारे सदर कामाचे स्वरुप, अटी व शर्ती, तांत्रिक माहिती व अंदाजपत्रक प्राप्त झालेले आहे. त्यानुसार तिनही मजल्यांचे कॉरीडोर्समध्ये ॲकॉस्टीकल ट्रीटमेंटसाठी अंदाजे रुपये ११,८५,०००.०० मात्र इतका खर्च येईल . सदर इमारतीचे आर्किटेक्ट चंद्रकांत कदम, नाशिक यांनी दि. ११/०८/२००८ चे पत्राव्दारे प्रथम तळमजल्यावरील ॲकॉस्टीकल ट्रीटमेंट करावी व त्याचे निष्कर्ष अभ्यासून वरील मजल्यांवरची ट्रीटमेंट करावी असे सूचविले आहे. त्यानुसार सध्या फक्त तळमजल्यावर ॲकॉस्टीकल ट्रीटमेंट करावयाची झाल्यास त्यासाठी अंदाजे रुपये ३,९५,०००.०० मात्र इतका खर्च येईल. उपरोक्त कामी श्री. पुरंदरे यांचे सल्ल्याने सदर कामाच्या निविदा तयार करुन घेता येतील. तळमजल्याचे काम पूर्ण झाल्यानंतर आवाज घुमणे, प्रतिध्वनी योग्य त्या पातळीपर्यन्त कमी न झाल्यास सदर काम ज्या ठेकेदारास बहाल करण्यात येईल, त्यांचेकडूनच मंजूर निविदा दरात पहिल्या व दुसऱ्या मजल्यांचे ॲकॉस्टिकल ट्रीटमेंटचे काम करुन घेता येईल.

जि.प. शाळेच्या तळमजल्यासाठी ॲकॉस्टीकल ट्रिटमेंटसाठी श्री व्ही.एन. पुरंदरे यांनी दिलेल्या रुपये ३,९५,०००.०० मात्र रक्कमेचा अंदाजपत्रकानुसार ॲटम रेट निविदा तयार करुन वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन कोऱ्या निविदा फॉर्मची विक्री दि. १०.११.२००८ ते दि. १८.११.२००८ अखेर तसेच सिलबंद निविदा सादर करणेची मूदत दि. २१.११.२००८ अखेर सांयकाळी ६.३० पर्यंत ठेवणेत आली होती.

याकामी विहीत मदूतीत खालील ठेकेदारांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतलेले होते.

०१) गॅनन इन्फ्रा प्रोजेक्टस प्रा.लि., गोरेगांव (पूर्व) मुंबई
०२) बी.डी. मिस्त्री, कोथरुड, पुणे
०३) ब्ल्यु प्रोजेक्ट सर्व्हिसेस, मालाड (पूर्व) मुंबई
०४) विश्वकर्मा इंजिनिअरींग सर्व्हीसेस, शिवतीर्थ नगर, पुणे ३८
०५) क्रियेशन्स, पांडूरंग कॉलनी, पुजा अर्पाटमेंट, पुणे -३८

उपरोक्तपैकी गॅनन इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि., गोरेगांव, मुंबई यांची एकच निविदा विहीत मूदतीत प्राप्त झाली होती. त्यामुळे सदरहू कामासाठी विलंब होऊ नये याकरीता उर्वरीत चार ठेकेदारांना सिलबंद निविदा सादर करणेविषयी दूरध्वनीवर विनंती करण्यात आली. त्यानुसार ब्ल्यु प्रोजेक्ट मालाड, मुंबई व बी.डी. मिस्त्री, कोथरुड, पुणे यांच्या निविदा विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आहेत. अशाप्रकारे प्राप्त झालेल्या एकूण तिन निविदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ.नं.	**ठेकेदाराचे नांव**
०१	गॅनन इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि., गोरेगांव, मुंबई
०२	बी.डी. मिस्त्री, पुणे
०३	ब्ल्यु प्रोजेक्ट सर्व्हिसेस, मालाड, मुंबई

उपरोक्तप्रमाणे विहीत मूदतीत प्राप्त झालेल्या सिलबंद निविदा आजचे सभेपुढे उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

अ.नं.	ठेकेदारांचे नांव	निविदेतील दर	चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर
०१	गॅनन इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि., गोरेगांव, मुंबई	६,६०,७००.००	६,२७,६६५.००
०२	बी.डी. मिस्त्री, पुणे	४,८२,३४०.००	अनुपस्थित
०३	ब्ल्यु प्रोजेक्ट सर्व्हिसेस, मालाड, मुंबई	५,६४,५००.००	अनुपस्थित

यावर सविस्तर चर्चा होऊन,मे.बी.डी. मिस्त्री, पुणे यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

(०५) <u>नवीन प्रसादालय येथील थर्मिक फ्ल्यूईड हिटींग यंत्रणेसाठी रुमचे बांधकाम करणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.</u>

संस्थानचे नविन श्री साई प्रसादालय येथील किचनसाठी थर्मिक फ्युईड हिटर व इतर तत्सम यंत्रणा बसविणेसाठी रुमचे बांधकाम करणेसाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. विषयांकीत कामासाठी कोऱ्या निविदा विक्रीचा कालावधी दि. २४/११/२००८ ते २७/११/२००८ इतका ठेवण्यात आला होता. तसेच सिलबंद निविदा सादर करण्याची मूदत दि. २९/११/२००८ ठेवण्यात आली होती. विहित मूदतीत खालील तिन ठेकेदारांनी कोऱ्या निविदा विकत घेतल्या होत्या.

०१) इंजि. योगेश सुरेश पाटील, कोपरगांव
०२) इंजि. बोरा श्रमीक प्रफुल्ल, कोपरगांव
०३) मे. अतुल व्ही. चव्हाण, अहमदनगर

उपरोक्तपैकी फक्त इंजि. बोरा श्रमिक प्रफुल्ल यांची एकच सिलबंद निविदा मूदतीत प्राप्त झाली होती.

तथापी सदरहू काम तातडीचे असल्यामुळे संस्थानचे इतर बांधकाम करणारे ठेकेदार यांना समक्ष तसेच दुरध्वनीवर सूचना देऊन निविदा विकत घेऊन सादर करणेबाबत सूचना देण्यात आली होती. तसेच उपरोक्तपैकी उर्वरीत दोन ठेकेदारांनाही सिलबंद निविदा सादर करणेविषयी विनंती करण्यात आली होती. त्यानुसार श्री मिलींद पाचोरकर, निफाड यांनी कोरी निविदा विकत घेतली होती.

त्यानुसार उपरोक्तपैकी खालील तिन निविदाधारकांनी सिलबंद निविदा सादर केल्या आहेत.

अ.नं.	**ठेकेदाराचे नांव**
०१	इंजि. बोरा श्रमीक प्रफुल्ल, कोपरगांव
०२	इंजि. योगेश सुरेश पाटील, कोपरगांव
०३	श्री. मिलींद एस. पाचोरकर, निफाड

तरी विषयांकीत बांधकामासाठी प्राप्त झालेल्या सिलबंद निविदांचा लिफाफा क्र. ०१ आणि लिफाफा क्र. ०२ आजचे सभेपुढे उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

अ.नं.	**ठेकेदारांचे नांव**	**निविदेतील दर**	**चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर**
०१	इंजि. बोरा श्रमीक प्रफुल्ल, कोपरगांव	निविदा दरात	अनुपस्थित
०२	इंजि. योगेश सुरेश पाटील, कोपरगांव	२० टक्के अधिक	अनुपिस्थत
०३	श्री. मिलींद एस. पाचोरकर, निफाड	१५ टक्के अधिक	अनुपस्थित

यावर सविस्तर चर्चा होऊन,इजि.बोरा श्रमीक प्रफुल्ल,कोपरगाव यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

(०६) <u>पावसाळी मंडपाचे कामासाठी झालेल्या खर्चाबाबत.</u>

साईभक्तांचे सोयीसाठी दर्शन लाईन व सुरक्षा रक्षकांसाठी महाव्दाराजवळ पावसाळी मंडप उभारणेचे काम मे. कैलास मंडप अॅण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर यांचेकडून रु. ०.३४ प्रति दिवस प्रति चौ. फुट दराने दि. ०१.०८.२००८ ते दि. ३१.०८.२००८ अखेर ३१ दिवसाकरीता एकुण ८८७५.०० चौ. फुट मंडप उभारणेचे कामासाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि. १७.०८.२००८ रोजीचे सभेत पावसाळी मंडपाचे खर्चास येणारे रु. ९५,०००/- मात्रचे खर्चास तसेच जादा मंडप उभारणेस तसेच आवश्यकतेनूसार मंडपाचा कालावधी वाढविणेस व याकामी येणारे योग्य त्या सर्व समावेशक खर्चास मान्यता देणेत आलेली आहे. त्यानूसार सदरचे काम त्यांचेकडून करुन घेण्यात आले असून, त्याव्यतिरीक्त वाढविलेले कालावधी करीता खालील प्रमाणे खर्च आलेला आहे.

अ. नं.	कालावधी	एकुण चौ. फुट	दर	अदा कलेली रक्कम
०१	दि. ०१.०९.२००८ ते दि. ०५.१०.२००८ अखेर एकुण ३५ दिवस.	८,७५४.४५	०.३४	१,०४,१७७.९५
०२	दि. ०१.०९.२००८ ते दि. ०५.०९.२००८ अखेर ०५ दिवस	३६०.००	०.३४	६१२.००
०३	दि. ११.१०.२००८ ते दि. ०५.११.२००८ अखेर एकुण २६ दिवस.	१३,९२६.७६	०.३४	१,२३,११२.५५
	एकुण रुपये...			२,२७,९०२.५०

तरी वरिल प्रमाणे पावसाळी मंडप व्यवस्था मे. कैलास मंडप अॅण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर यांचेकडून रु. ०.३४ प्रति दिवस प्रति चौ. फुट दराने करुन घेणेत आलेला असून याकामी आलेले जादा रु. २,२७,९०२.५० मात्रचे खर्चास आजचे सभेत कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

(०७) <u>साईप्रसाद नं.०२ पार्किंग परिसरात मंडप उभारणीकामी आलेल्या खर्चाबाबत.</u>

यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त विषयाबाबत सविस्तर प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेसाठी व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

(०८) <u>स्वयंसेवी भोजन व्यवस्था व निवास व्यवस्थेकरीता मंडप उभारणी करणे बाबत.</u>

माहे नोव्हेंबर २००८, डिसेंबर २००८ व जानेवारी २००९ मध्ये भक्तांची गर्दी मोठ्या प्रमाणावर होत असते. गर्दीचे कालावधीत भक्तांना वाढीव सेवा / सुविधा म्हणून स्वयंसेवी भोजन व्यवस्था करणे गरजेचे आहे. त्याकामी पार्किंग परिसरात मंडपाची आवश्यकता आहे. सदर मंडपामध्ये सकाळी १०.०० ते रात्री १०.०० पर्यंत स्वयंसेवी भोजन व रात्री भक्तांना झोपण्यासाठी वापर करता येईल. तरी नोव्हेंबर २००८, डिसेंबर २००८ व जानेवारी २००९ अखेर १२०'x८०' या मापाचा मंडप टाकूण मिळणेबाबत अधिक्षक, प्रसादालय विभाग यांनी कळविले आहे.

दिपावली सुट्टी निमित्त सुट्टींचे कालावधीत होणारे भक्तांचे गर्दीकरीता भक्तांचे सोयींसाठी प्रसादालय पार्किंग परिसर व इतर ठिकाणी शामियाना मंडप उभारणेकरीता मंडप ठेकेदार साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूरगांव यांना इकडील जा.नं. १६०९५ दि. ३०/१०/२००८ चे कार्यादेशान्वये रुपये ०.१५ प्र. दिन प्र.चौ.फुट या मंजूर दराने मंडपाचे काम देणेत आले होते. त्याच मंजूर दरात प्रसादालय पार्किंग परिसरात दि. १९/११/२००८ ते दि. २२/१२/२००८ अखेर ३४ दिवस १५०x६० साईजचा शामियाना मंडप उभारणेकरीता रुपये ४५,९००.०० मात्र खर्च येईल.

याकामी येणारे अंदाजे रुपये ४५,९००.०० मात्रचे खर्चास व सदरचे काम मंडप ठेकेदार श्री साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूरगांव यांचेकडून करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमिती शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

(०९) <u>संस्थानचे नवीन श्री साईप्रसादालय येथील व्हीआयपी आणि गुडस लिफ्टचे प्रवेशव्दाराभोवती ग्रेनाईट व मार्बोनाईट टाईल्स बसविणे बाबत.</u>

नविन श्री साईप्रसादालय येथे किचनकरीता सर्व्हिस लिफ्ट, आणी व्ही.आय.पी. तसेच अपंग भक्तांसाठी पॅसेंजर लिफ्ट अशा एकूण दोन लिफ्ट बसविण्याचे काम विद्युत विभागामार्फत पूर्ण करण्यात आले आहे. यासाठी आवश्यक सिव्हील वर्क उदा. बांधकाम, प्लास्टर, लिन्टल बिम इ. काम इकडील विभागामार्फत करण्यात आले आहे. सदरहू कामाचा समावेश प्रसादालय इमारतीचे बांधकाम करणारे ठेकेदार यांचे निविदेत केलेला नाही.

सदरहू लिफ्ट बसविण्याचे काम विद्युत विभागामार्फत करण्यात येत असतांना ग्रॅनाईट टाईल्सची फुट - तुट होऊ नये म्हणून सदर काम करण्यात आलेले नव्हते. आता लिफ्ट बसविण्याचे काम विद्युत विभागामार्फत पूर्ण झाले असून सदरहू लिफ्टच्या दर्शनी भागात (तळमजला व पहिला मजला) मार्बोनाईट टाईल्स व प्रवेशव्दाराचे चौकटीस ग्रेनाईट बसविणे आवश्यक आहे. ग्रॅनाईट टाईल्स बसविणेकामी ८० चौ.फुट आणी मार्बोनाईट टाईल्स

बसविणेकामी १७५ चौ.फुट इतके काम करणे आवश्यक आहे. याकामी ढोबळ अंदाजानुसार रुपये ४०,०००.०० मात्र खर्च अपेक्षीत आहे. सदरचे काम तातडीचे असल्यामुळे स्थानिक पुरवठाधारक तसेच मजूर ठेकेदार यांचेकडून कोटेशन्स मागवून पूर्ण करता येईल.

तरी वरिलप्रमाणे नविन श्री साईप्रसादालय इमारतीचे लिफ्टसाठी मार्बोनाईट टाईल्स व ग्रॅनाईट बसविणेकामी रुपये ४०,०००/- (अक्षरी रुपये चाळीस हजार) मात्र इतक्या खर्चास तसेच सदर काम करण्यासाठी मार्बोनाईट टाईल्स बसविणेकामी यापुर्वी मा. कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालयासाठी खरेदी केलेल्या मे. दिपगिरी सिरॅमिक्स प्रा.लि., नाशिक यांचे मार्फत मंजूर असलेल्या दराने खरेदी करणेस व मजुरी दराने ठेकेदार यांचेमार्फत काम करणेस तसेच ग्रॅनाईट टाईल्स बसविणेकामी खरेदी करणेसाठी स्थानिक पुरवठाधारक यांचेकडून मटेरीअलसह कोटेशन मागवून काम करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

(१०) <u>श्रीसाईबाबा हॉस्पिटल येथील कॅथलॅब विभागात तसेच 2D Echo Room साठी कारपेट बसविणे बाबत.</u>

श्री साईबाबा संस्थान रुग्णालये, शिर्डी यांनी कळविले आहे की, श्री साईबाबा हॉस्पिटल येथील कॅथलॅबमधिल कारपेट खराब झालेले असून ते बदलून मिळावे. याबाबत समक्ष पहाणी व चर्चा केली असता कॅथलॅब ओ.टी. पॅसेज, सी.व्ही.टी.एस., २ डी एको रुम या ठिकाणी असलेले कारपेट खराब झ ाालेले असून ते बदलून त्याठिकाणी नवीन कारपेट बसविणे आवश्यक आहे. याठिकाणी रुग्णांना जंतुसंसर्ग होऊ नये याकरीता antimicrobial properties असलेले कारपेट बसविणे आवश्यक आहे. सदर काम अशा स्वरुपाची कामे करणाऱ्या विशेषीकृत ठेकेदारांकडून करुन घ्यावे लागेल. त्याकरीता इकडील विभागामार्फत समक्ष मोजमापे घेतली असून याकामी ढोबळ अंदाजानुसार रुपये १,१०,०००.०० मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे कारपेट बसविणेकामी रुपये १,१०,०००.०० मात्र इतक्या खर्चास तसेच याकामी विशेषीकृत पुरवठाधारक यांचेकडून कोटेशन मागविणेस व काम करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधील फक्त कॅथलॅबकरिता इपॉक्सी फ्लोअरिंग करण्यात येऊन उर्वरीत भागात पी.व्ही.सी.कारपेट बसविणेकामी कोटेशन मागवून काम करुन घेण्यात यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

(११)<u>आर्थोस्कोप दुरुस्तीबाबत.</u>

श्रीसाईबाबा हॉस्पिटलचे ऑर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर विभागाकरीता व्यवस्थापन समितीच्या दि.३१/०३/२००७ च्या सभेतील निर्णयान्वये मे. बायोमेडीकॉन सिस्टीम (इं) प्रा. लि. मुंबई यांचेकडुन एक ऑर्थोस्कोप सेट एकुण रु. २०,००,०००/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आला आहे. सदरचा ऑर्थोस्कोप सेटकरीता कंपनीने दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. ०३/०५/२००८ रोजी संपला आहे. ऑर्थोस्कोप सेटची दुरुस्ती व देखभाल बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागामार्फत येथेच केली जाते आहे. परंतु दुरुस्तीकरीता काही स्पेअर पार्ट बदलणे आवश्यक असल्यास ते कंपनी कडुन बदलुन घेण्यात येतात.

सदरचा ऑर्थोस्कोप सेट ऑर्थो ऑपरेशन थिएटर विभागात नियमीत वापरला जाते. सध्या सदर सेटमधील PE ५१४ A (Arthoscope ४mm, १५०mm length, ३० degree) या प्रकारचा स्कोप नादुरुस्त असल्यामुळे तो दुरुस्त करुन मिळणेबाबत डॉ. जपे (ऑर्थोपेडीक सर्जन) यांनी कळविले आहे. स्कोपची तपासणी करुन स्कोपचे लेन्स व इतर स्पेअर पार्टस बदलणे आवश्यक असल्यामुळे तो पुढील दुरुस्तीकरीता मे. बायोमेडीकॉन सिस्टीम (इं) प्रा. लि. मुंबई यांचेकडे पाठविण्यात आला आहे. सदर स्कोपची तपासणी करुन कंपनीने त्यांचे पत्र क्र. BIO/ESD/०८-०९/०२ दि. २२/११/२००८ अन्वये सर्व करांसहीत एकुण रु. ६५,०००/- (अक्षरी रु. पासष्ठ हजार मात्र) इतक्या रकमेचे दुरुस्तीचे कोटेशन पाठविले आहे व सदर रकमेची आगाउ मागणी केली आहे. पुरवठा धारक कंपनी व त्याचे अधीकृत डीलर यांचेकडेच सदर स्कोपचे स्पेअर पार्ट मिळतात. त्यामुळे स्कोपची दुरुस्ती देखील पुरवठाधारक कंपनीचे अधीकृत डीलर मे. बायोमेडीकॉन सिस्टीम (इं) प्रा. लि. मुंबई यांचेकडेच केली जाऊ शकते.

तरी मे. बायोमेडीकॉन सिस्टीम (इं) प्रा. लि. मुंबई यांचेकडुन ऑर्थोस्कोप PE ५१४ A दुरुस्त करुन घेणेस व त्याकरीता येणाऱ्या एकुण रु. ६५,०००/- चे खर्चास व सदरची रक्कम कंपनीस आगाऊ पाठविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

(१२) <u>माहिती तंत्रज्ञान विभागाकरीता नवीन ए.सी. खरेदी करणे बाबत.</u>

माहिती तंत्रज्ञान विभागात संस्थानचे वेबसाईट संदर्भातील कामकाज, पगारबिल कामकाज, संगणक प्रणाली तयार करणेचे कामकाज, दूरध्वनी सेवा, सर्व्हर्स व्यवस्थापन आदि. महत्वाची कामे करण्यात येत आहे. सदर कामे करणेसाठी माहिती तंत्रज्ञान विभागात एकाच रुममध्ये १५ संगणके वापरात आहे. विभागातील संगणकांसाठी तापमानात संतुलन ठेवणेसाठी सन १९९८ मध्ये तीन फ्लोअर टाईप स्प्लीट ए.सी. बसविण्यात

आलेले आहे. सदर ए.सी. फार जूने झालेले असून, त्यात बिघाड झाल्यामुळे ते ए. सी. सतत दुरुस्त करावे लागतात. शिवाय दुरुस्तीस लागणाऱ्या वेळेमध्ये ए. सी. अभावी विविध येथील संगणके वाढलेल्या तापमानामुळे गरम होतात. याबाबत विद्युत विभागाचे एसी तंत्रज्ञांशी चर्चा केली असता, त्यांनी सध्या वापरात असलेले ए. सी. जुने झालेले आहे. तसेच फ्लोअर टाईप असल्यामुळे जमिनीवरील जागाही त्याकरीता अडकून राहते. त्यामुळे सदर ए.सी. ऐवजी नवीन वॉल टाईप स्प्लीट ए.सी. बसविणे आवश्यक आहे असे सांगितले.

दिनांक १० नोव्हेंबर, २००८ रोजी मा. कार्यकारी अधिकारी साो. यांचे कक्षात माहिती तंत्रज्ञान संदर्भात कामकाजाबाबत झालेल्या मिटींगमध्ये माहिती तंत्रज्ञान विभागातील ए.सी. बाबत चर्चा करण्यात आली असून, सदर ए.सी. जुने झाल्याने त्याऐवजी नवीन २ टनी Split ए.सी. बसविण्यात यावेत, असे श्री न्याती, माहिती तंत्रज्ञान, सल्लागार, पुणे यांनी सुचविले होते.

त्यास अनुसरुन, माहिती तंत्रज्ञान विभागात २ टनी Split ए.सी. ०३ नग खरेदी करणेसाठी साधारणपणे प्रत्येकी अंदाजे रुपये ३५,०००/-(कर अतिरिक्त) प्रमाणे तीन ए.सी. खरेदी करणेसाठी अंदाजे रुपये १,०५,०००/- (कर अतिरिक्त) पर्यंतचा खर्च अपेक्षित आहे. सदर नवीन ए.सी. खरेदी करणेची कार्यवाही खरेदी विभागामार्फत करता येईल, असे नम्र मत आहे.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे, माहितीं तंत्रज्ञान विभागासाठी ए.सी. (२ टनी Split)- ०३ नग निविदा मागवुन खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,०५,०००/- (कर अतिरिक्त) पर्यंतचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात यावी,अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-आय.टी.विभागप्रमुख)

(१३) <u>नवीन बसेस करीता खोळी खरेदी तयार करणेकामी कापड खरेदी बाबत.</u>

वाहन विभागाकडील वापरात असलेल्या १८ बसेस पैकी ०९ बसेसच्या शिटचे कुशनला कापडी खोळी शिवण्यात आलेल्या आहेत. उर्वरित ०९ बसेसचे कुशन खराब होऊ नये म्हणून कापडी खोळी शिऊन घेणे अत्यंत आवश्यक आहे. याकरिता खालीलप्रमाणे कापड खरेदी करावे लागेल.

अ.नं.	बस क्रमांक	वापर	आसन क्षमता	अंदाजे आवश्यक कापड
१	एमएच- १७/ टी- ३१०१	स्कुल बसेस	५२ सिटर	६० मिटर
२	एमएच- १७/ टी- ३१०२		५२ सिटर	६० मिटर
३	एमएच- १७/ टी- ३१०३		५२ सिटर	६० मिटर
४	एमएच- १७/ टी- ३१०४		५२ सिटर	६० मिटर
५	एमएच- १७/ सी- ८८५१		५५ सिटर	६५ मिटर
६	एमएच- १७/ के- ९३७१		५६ सिटर	६५ मिटर
७	एमएच- १७/ के- ९३७०	न. भक्तनिवास बस	५६ सिटर	६५ मिटर
८	नवीन प्रसादालय बस	न. प्रसादालय ते मंदिर परीसर	५४ सिटर	६५ मिटर
९	नवीन प्रसादालय बस		५४ सिटर	६५ मिटर
	अंदाजे आवश्यक एकूण कापड मिटर			

वरील नवीन बसेस करीता अंदाजे ५६५ मिटर कापड लागेल. याकामी कापड, मजुरी इतर कामा करीता अंदाजे रु.८५,०००/- मात्र खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

(१४) <u>शिर्डी महोत्सव -२००८ कलाकार निश्चितीबाबत.</u>

सन २००७ सालात दि.०८/१२/२००७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.८२६ अन्वये शिर्डी महोत्सव-२००७ साठी एकूण खर्च रु. ७,००,०००/- इतका मंजूर करण्यात आलेला होता. मागिल वर्षी सदरच्या कार्यक्रमास साधारणपणे रु. **०३,२५,५४१.००** (अक्षरी रु. तीन लाख पंचवीस हजार पाचशे एक्केचाळीस मात्र) खर्च आलेला आहे." शिर्डी महोत्सव- २००७ " हा दि.२८/१२/२००७ ते दि.३१/१२/२००७ अखेर चार दिवस साजरा करण्यात आलेला आहे. सदर कार्यक्रमाचा उद्देश हा चालू वर्षाचा शेवट व नविन वर्षाची सुरुवात चांगल्यारितीने व्हावा असा आहे. तसेच दि.३१/१२/२००८ रोजी समाधी मंदिर रात्रभर दर्शनासाठी खुले रहाणार आहे. याहीवर्षी मागिल वर्षाप्रमाणे शिर्डी महोत्सव साजरा करणेबाबत व त्या अनुषंगाने मान्यवर गायकांचे व कलाकारांचे दि.२९/१२/२००८ ते दि.३१/१२/२००८ रोजी गायन व नृत्य कार्यक्रमास परवानगी मिळावी म्हणून अनेक पत्रे आलेली असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

अ.नं.	कलाकाराचे नांव व पत्ता	कार्यक्रमाचे स्वरुप	मानधन	शेरा
०१.	श्री पारस जैन, शिर्डी फो.नं.२५५८८२	भजन संध्या	३१/१२/२००८ रात्रौ ७.०० ते ९.३० एक रु. व श्रीफळ	सन ०६, ०७ मध्ये कार्यक्रम झाला आहे.
०२.	श्री.आर.के. सक्सेना, ९०३, टाईप-४, लक्ष्मी बाल नगर, आय.एन.ए मार्केट समोर, न्यु दिल्ली-११००२३	साई भजन	रु.३६,०००/- गाडी भाडेसह.	पुण्यतिथी-०७ रु. १५,०००/- मानधन.

०३.	सच्चिदानंद अप्पा, वेस्टर्न रेल्वे कॉलनी, ७७/४, माटुंगा रोड, मुंबई	एक शाम साईके नाम	३१/१२/२००८ रात्रौ १०.०० ते १२.३०, मानधन संस्थानचे परंपरेनुसार	सन ०५,०६,०७ मध्ये कार्यक्रम सादर केले आहेत. रु.३१,०००/-+ व्हॅट मा.अध्यक्ष यांची शिफारस.
०४.	श्री संजय दाहीमा, हैद्राबाद	हिंदी भजन	मानधन रु.३१,०००/-+ प्रवास भाडे.	मा.खांबेकर यांची शिफारस
०५.	श्रीमती रागिनी चक्रवर्ती, सी/२११, सी.जी.एस.कॉलनी,वडाला (प.) मुंबई-४०० ०३१,	भजन	मानधन रु.१५,०००/-	
०६.	रुहन कपूर, पार्श्वगायक, ३०१, शंतनू, सेंट मार्टीन्स रोड, टर्नररोड समोर, बांद्रा(वेस्ट) मुंबई-४०० ०५०	साई भजन संध्या		कै.महेंद्र कपुर यांचे सुपुत्र.
०७.	अजय कुमार, डी.नं.२३-३३-३, जी-२, श्री अंजली टॉवर्स, अमली स्कुल रोड, मुत्यलामपाडु, विजयवाडा-११	कुचिपुडी नृत्य कार्यक्रम	मानधन नको	
०८.	गायक राहुल देशपांडे, द्वारा-महेश नारायण यंदे, सर्वे नं.११९/३, फ्लॅट नं.बी-१३,प्रज्ञानगड अपार्टमेंट, सिंहगड रोड, पर्वती, पुणे-३०,	गायन कार्यक्रम		मा.अध्यक्षसाो. यांचेशी फोनवरुन झालेले चर्चेनुसार.

यावर सविस्तर चर्चा होऊन,दिनांक २६ नोव्हेंबर,२००८ रोजी मुंबई येथे झालेल्या भिषण अतिरेकी हल्ल्यात अनेक निरापराध नागरीकांची हत्या झालेली आहे. याकरिता यावर्षीचा शिर्डी महोत्सव दिनांक ३१.१२.२००८ रोजी फक्त एक दिवस अतिशय साध्या पद्धतीने साजरा करण्यात यावा. या कार्यक्रमात जे कलाकार एक रुपया व श्रीफळ स्वीकारुन कार्यक्रम सादर करतील अशाच कलाकारांचे कार्यक्रम शिर्डी महोत्सवात ठेवण्यात यावेत,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०५)

(१५) <u>कनकुरी साठवण तलाव येथे लाईटची व्यवस्था करणेबाबत.</u>

कनकुरी रोड ते साठवण तलाव साठवण तलाव भराव्यावरील लाईट ब-याच दिवसांपासून बंद स्थितीत आहे. वांरंवार विद्युत विभागाकडे रोडवरील लाईटचे मेन्टेनंस करून मिळणेबाबत कळविले आहे. परंतू विद्युत विभागाकडे मटेरियल नसल्याने सदरचे काम झालेले नाही. तसेच सध्या तेथील लाईट हे नारळाच्या झाडामध्ये येतात त्यामुळे त्याखाली व परिसरात अंधारच असतो. साठवण तलावावर रात्रीचे वेळी मोटारी चालू बंद करणेसाठी तसेच संरक्षण विभागाचे कर्मचारी यांना संरक्षणाच्या दृष्टीने राऊंड घ्यावे लागत असल्यानें भराव्यावर फिरावे लागते. भराव्यावर असलेल्या अंधारामुळे तेथे रात्रीचे वेळी कर्मचा-यांना सर्प दंश होवू शकतात. तसेच रात्रीचे वेळी तेथे चोरीचे प्रकार होण्याची शक्यता आहे. त्यासाठी साधारण: १५ फुट उंचीचे पोल तयार करून त्यावर कमी वीजखर्च होणारे CFL चे स्ट्रीट लाईट बसवून व्यवस्था करता येईल.

याकरीता पाणी पुरवठा विभागाकडे अलंग (गुजरात) देणगी स्वरुपात मिळालेले पाईप रोडलाईट करीता वापरता येतील. उर्वरीत मटेरियल खरेदी करावे लागेल. सदर स्ट्रीट लाईटची व्यवस्था ९००० फुट अंतरावर करावी लागणार आहे. याकरीता ९४ फुटावर एक पोल याप्रमाणे ९००० फुट अंतरावर एकुण ९५ पोल टाकावे लागतील. सदरचे काम करणेकरीता लागणा-या उर्वरीत मटेरियलचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ.नं.	मटेरियल तपशिल	नग.	दर	एकुण किंमत
01.	C.F.L. स्ट्रीट लाईट फिटिंग टयुबसह. OUTDOOR FITTINGS, M.S. DEEP DRAW STREET LIGHT Big Body up to 36W. For CFL Tube 1 x 36 W C.F.L.,कंपनी - प्रेस लाईट (PRESS LITE)	95 नग.	750.00	71,250.00
02.	2.5 Sq.mm 4 core फेक्झीबल कॉपर केबल. पॉलीकॅब कंपनी.	3000 मिटर	60.00	1,80,000.00
03.	1.0 Sq.mm पि.व्ही.सी. वायर, पॉलीकॅब कंपनी.	08 बंडल	700.00	5,600.00
04.	पि.व्ही.सी. बॉबीन 1"	4000 नग	0.60	2,400.00
05.	पोर्सलिन कनेक्टर	95 नग.	10.00	950.00
06.	जी.आय. तार, 14 नंबर	60 किलो.	80.00	4,800.00
07.	जी.आय. तार, 18 नंबर	15 किलो.	80.00	1,200.00
08.	जी.आय.पाईप-1.1/2", बी क्लास, झेनीथ/प्रकाश सुर्या कंपनी.	400 फुट	85.00	34,000.00
09.	सिमेंट	45 गोणी	250.00	11,250.00
10.	खडी.	03 ब्रास	3000.00	9,000.00
11.	वाळु	03 ब्रास	2000.00	6,000.00
12.	ELCB 32 Amp - 4 Pole बॉक्ससह.	04 नग.	1800.00	7,200.00
13.	लेबर चार्ज स्ट्रीट लाईट पोल फिटिंग.(पोलचे खड्डे व टयुब फिटिंगसह)	95 नग.	250.00	23,750.00

14	2.5 Sq.mm 4 core केबल बॉबीन गुंतवून पसरविणे.	3000 मिटर	18.00	54,000.00
			एकूण रुपये	**4,11,400.00**

तरी वरील प्रमाणे रोडलाईटचे काम करणेकरीता लागणारे मटेरियल कोटेशन मागवून खरेदी करणेसाठी व त्यासाठी येणारे अंदाजे रु.४,११,४००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-पाणी पुरवठा प्रमुख)

(१६) <u>नविन प्रसादालय येथील कामांकरिता प्लबिंग मटेरियल खरेदी बाबत.</u>

विद्युत विभागांमार्फत नविन प्रसादालय येथील रसोडयामध्ये वायुविझन यंत्रणा (H.A.V.C System) बसविण्याचे काम देण्यात आलेले आहे. नविन प्रसादालयाचे टेरेसवर सदरच्या सिस्टिमकरीता आठ ठिकाणी टाक्या बसविण्यात आलेल्या आहेत. या आठही टाक्यांना विद्युत विभागांकडून डी.पी.नं. ४८३७, दि. ०४-१२-२००८ अन्वये १" पाईपलाईनचे कनेक्शन करून देणेबाबत मागणी केलेली आहे.

तसेच प्रसादालय विभाग दि. ०३-१२-२००८ चे टिपणीनुसार त्यांनी नविन प्रसादालय लवकरात लवकर सुरु करणे संदर्भात मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी केलेल्या सुचनेप्रमाणे खालील ठिकाणी तातडीने नळ कनेक्शन करुन मिळावे अशी मागणी केलेली आहे.

१) भाताचे कुलरला पाणी घेणेसाठी. २) स्टीम बॉयलर व थर्मिक फ्लुड हिटरकरीता. ३) माऊंटेड एल.पी.जी. गॅस प्लँट व्हेपरायझर यंत्रणा व गॅस यार्डातील अर्थिंग पिटकरीता. ४) दुस-या मजल्यावरील चपाती विभागात आटा मळणेसाठी. ५) नास्ता पॅकेट किचन भांडी धुणेसाठी इ.

सदरचे काम कारणेसाठी तेथे जावून प्रत्यक्ष पाहणी केली असता खालील प्रमाणे मटेरियलची आवश्यकता आहे.

अ.नं.	मटेरियल तपशिल	साईज	कंपनी	नग.	दर	एकुण किंमत
०१.	जी.आय पाईप - बी क्लास.	१.१/२"	झेनीथ/प्रकाश सुर्या	५०० फुट	८४.००	४२,०००.००
०२.	जी.आय.पाईप - बी क्लास.	१"	झेनीथ/प्रकाश सुर्या	१०० फुट	५५.००	५,५००.००
०३.	जी.आय. टी	१.१/२" x १"	I.S.I. मार्क	१० नग.	५६.००	५६०.००
०४.	जी.आय. टी	१.१/२"	I.S.I. मार्क	१० नग.	५६.००	५६०.००
०५.	जी.आय. रेडयुसर	१.१/२" x १"	I.S.I. मार्क	२० नग.	३०.००	६००.००
०६.	जी.आय. रेडयुसर	२.१/२"x .१/२"	I.S.I. मार्क	१० नग.	८६.००	८६०.००
०७.	जी.आय सॉकेट	१.१/२"	I.S.I. मार्क	२० नग.	२७.००	५४०.००
०८.	जी.आय. एलबो.	१.१/२"	I.S.I. मार्क	१० नग.	७५.००	७५०.००
०९.	जी.आय. एलबो.	१"	I.S.I. मार्क	२० नग.	१४.००	२८०.००
१०.	जी.आय. युनियन	१"	I.S.I. मार्क	१० नग.	४०.००	४००.००
११.	पट्टी व्हॉल	१/२"	लिडर कंपनी.	२० नग.	२७०.००	५,४००.००
१२.	पट्टी व्हॉल	१"	लिडर कंपनी.	१० नग.	५५०.००	५,५००.००
१३.	पट्टी व्हॉल	१.१/२"	लिडर कंपनी.	१० नग.	१४५०.००	१४,५००.००
					अंदाजे एकुण रुपये -	**७७,४५०.००**

तरी वरील प्रम ाणे मटेरियल कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रु.७७,४५०/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख/पाणीपुरवठा विभागप्रमुख)

(१७) <u>द्वारावती भक्तनिवासस्थान इमारत संगणकीय जाळयांची योजना कार्यान्वीत करणेकामी ९ इंच व्यासाची आर.सी.सी.पाईप लाईन कामाबाबत.</u>

शिर्डी येथील स.नं. १४८ मधिल संस्थानचे द्वारावती भक्तनिवास इमारतीचे तळमजला अधिक चार मजले प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात असून चौथा मजला बांधकाम, रस्ता, पाणीपुरवठा, ड्रेनेज व इलेक्ट्रीकल काम प्रगतीपथावर आहे.

माहिती व तंत्रज्ञान विभागाने दि.२६ नोव्हेंबर,२००८रोजीचे पत्रान्वये व्दारावती इमारतीत बनविण्यात आलेल्या संगणक सर्व्हर रुम व प्रस्तावीत बुकींग काऊंटरसाठी टेलिफोन व इतर केबल्स टाकणेसाठी साईनगर परिसर व व्दारावती इमारती समोरील बागेतून केबल टाकणे करीता ९ इंच व्यासाचे आर. सी. सी. पाईप टाकून मिळणेबाबत कळविले आहे.

त्यानूसार माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख, वरिष्ठ मुख्य अभियंता व शाखा अभियंता यांनी दि.२६.११.२००८ रोजी व्दारावती साईटवर प्रत्यक्ष पाहणी करून साईनगर परिसर व व्दारावती इमारती समोरील रस्त्याचे बाहेरील बाजूने बागेचे कडेने टाकण्याचे ठरविण्यात आले आहे. श्री साईबाबा रुग्णालय-व्दारावती इमारतीचे गेट- साईनाथ रुग्णालयापर्यंत बगीचा मधून टेलीफोन व इतर केबल्स टाकणेसाठी ९ इंच व्यासाची अंदाजे ७०० मीटर लांब आर. सी. सी. पाईपलाईन टाकावी लागणार आहे.त्यासाठी रु.२,४५,५००.०० मात्र खर्च अपेक्षित असून सदरचे काम विभागामार्फत करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

(१८) <u>निलगीरी झाडांचे विक्रीसाठी आलेल्या कोटेशन्सवर निर्णय घेणे.</u>

श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांनी मौजे निमगांव को-हाळे परिसरातील क्षेत्र खरेदी करण्यात आलेले आहेत. या क्षेत्रात ठिक-ठिकाणी निलगीरी या झाडांचे प्लॉट आहे. शेतीमहामडंळाच्या (गट नं २३९ पै) क्षेत्रामध्ये असलेल्या निलगीरीचे अंदाजे ९५० इतके झाडे आहेत. सदर झाडांची विक्री करणेकामी उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये निलगीरी झाडे तोडणे बाबत कोटेशन मागविण्यात आलेले आहेत.एकुण १० कोटेशन प्राप्त झालेले आहेत. दिनांक ०८/११/२००८ रोजी प्राप्त झालेले कोटेशनचा मा. कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आली आहेत. कोटेशनचा तपशिल खालीलप्रमाणे-

अ.न	कोटेशन धारकाचे नाव	दर प्रति टन
०१	सना फायर वुड , संगमनेर	रु .१३५०
०२	आन्सार लाकुड सप्लायर्स , बाभळेश्वर	रु.१३००
०३	मुनिर सॉ मील , बाभळेश्वर	रु.१२००
०४	श्री नवनाथ निवृत्ती कु-हे,म-हाळ ता सिन्नर	रु.१२२१
०५	श्री मच्छिंद्र मधुकर पोटभरे , देवगड	रु.११११
०६	श्री कृष्णा दिलीप कानडे ,लैकी ता येवला	रु.११००
०७	श्री उंडे साहेबराव रमेशराव ,शिंगणापुर	रु.१२५१
०८	अनुप ट्रेडर्स , ओमनगर ता देवळा	रु.१०६१
०९	श्री दत्ता सॉ मील (राजेद्र द. वाबळे),राहाता	रु.८५०
१०	पटेल सॉ मील, शिर्डी	रु.१२११

उपरोक्त कोटेशनसादरकर्त्यांना आजचे सभेपुढे चर्चा/वाटाघाटीसाठी समक्ष बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

अ.न	कोटेशन धारकाचे नाव	कोटेशनमधील दर प्रति टन रुपये	वाटाघाटीअंती देऊ केलेले दर प्रति टन रुपये
०१	सना फायर वुड , संगमनेर	१३५०.००	१४००.००
०२	आन्सार लाकुड सप्लायर्स , बाभळेश्वर	१३००.००	१३५०.००
०३	मुनिर सॉ मील , बाभळेश्वर	१२००.००	१३५०.००
०४	श्री नवनाथ निवृत्ती कु-हे,म-हाळ ता सिन्नर	१२२१.००	१३००.००
०५	श्री मच्छिंद्र मधुकर पोटभरे , देवगड	१११११.००	१२००.००
०६	श्री कृष्णा दिलीप कानडे ,लैकी ता येवला	११००.००	अनुपस्थित
०७	श्री उंडे साहेबराव रमेशराव ,शिंगणापुर	१२५१.००	१४५०.००
०८	अनुप ट्रेडर्स , ओमनगर ता देवळा	१०६१.००	११००.००
०९	श्री दत्ता सॉ मील (राजेद्र द. वाबळे),राहाता	८५०.००	१२००.००
१०	पटेल सॉ मील, शिर्डी	१२११.००	१२५०.००

यावर सविस्तर चर्चा होऊन,अ.नं.०७चे कोटेशन सादरकर्ते श्री उंडे सावळेराव रमेशराव ,शिंगणापुर यांचे उच्चतम दर स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बगीचा विभाग प्रमुख)

(१९) एल.सी.डी.प्रोजेक्टर खरेदी करणेबाबत.

श्रीसाईबाबा संस्थान संचलित, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये ज्यु.के.जी. ते इ.१० वी पर्यंतचे वर्गासाठी संगणक विषय आपण सक्तीचा केलेला आहे. आजचे संगणकीय युगात आपल्या ग्रामीण भागातील विद्यार्थी संगणकी ज्ञानापासून वंचित राहू नयेत, याकरीता आपण सन २००५ मध्ये शाळेत अद्ययावत संगणक कक्ष सुरु केला असून तेथे २० संगणक सध्या कार्यरत आहेत. प्रत्येक वर्गात जवळपास ५० विद्यार्थी असल्याकारणाने संगणक शिक्षकांना प्रत्येक विद्यार्थ्याला प्रात्यक्षिक करुन दाखविणेस ३० मि. तासिकेत शक्य होत नाही व वेळापत्रकाप्रमाणे त्यांचा अभ्यासक्रम मागे राहतो.

या सर्व बाबींचा अभ्यास करुन संगणक शिक्षकांनी पुणे व नाशिक येथील नामांकित शिक्षण संस्थांना भेट देऊन LCD प्रोजेक्टवर तेथील संगणक शिक्षण प्रणाली संदर्भात माहीती घेतली व सदर संगणक शिक्षण प्रणाली आपल्या शाळेत सुरु केल्यास ज्यु.केजी ते इ.१० वी पर्यंत विद्यार्थ्यांना एकाच वेळी (तासिकाप्रमाणे) संगणक ज्ञान देणे सोईस्कर होईल, असे मत सांगितले. त्या माध्यमातून ज्यु.केजी व सि.केजी विद्यार्थ्यांना प्राणी, पक्षी, निसर्गसौदर्य आदी बाबत तर १ ली ते १० पर्यंतच्या विद्यार्थ्यांना विषयानुरुप माहीती देता येईल व भविष्यात शाळेतील विद्यार्थ्यांच्या संगणकीय ज्ञानात वृध्दी होईल. सध्या बाजारात शाळेतील अभ्यासक्रमाबाबत नवनविन सीडी उपलब्ध असुन त्याव्दारे आपण सर्व विषयांचे ज्ञान प्रात्यक्षिकाव्दारे LCD प्रोजेक्टर वर शाळेतील विद्यार्थ्यांना दाखवु शकतो. सदर LCD प्रोजेक्ट बाबत माहीती पुढीलप्रमाणे.

LCD Projector (Sony Company)
High Luminous
DLP
2 Audio /Video input
Computer port with LAN connection

LCD प्रोजेक्टर खरेदी कामी अंदाजे ८०,०००/- खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-प्राचार्या,इंग्लिश मिडीयम स्कुल)

(२०) श्रीसाईबाबा रुग्णालयातील न्यूरो आय.सी.सी.यु.मध्ये सेंट्रल एअर कंडिशनिंगचे कामासाठी आलेल्या तांत्रिक निविदा उघडणेबाबत.

श्रीसाईबाबा रुग्णालयातील न्यूरो आय. सी. सी. यु. मध्ये सेंट्रल एअर कर्डीशनींगचे कामासाठी फेर निविदा मागविण्यास तसेच याकामी डिझाईन इंजिनिअर श्री. डी. आर. रणदिवे, मुंबई यांची तज्ञ सल्लागार म्हणून नियुक्ती करणेकामीचा प्रस्ताव मा. उपसमिती सभा दि.१७/०८/२००८ रोजीचे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता.

त्यानुसार अंदाजे रु. २९,८२,०००/- इतक्या खर्चाचे कामासाठी फेर निविदा देणेकामी श्री. रणदिवे यांनी तांत्रिक व जनरल नियम व अटीचा निविदा फॉर्म तयार करुन दिलेला होता. त्यानुसार जनसंपर्क कार्यालयामार्फत महाराष्ट्र टाईम्स - मुंबई आवृत्ती या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.०३/११/२००८ ते दि.१५/११/२००८ अखेर निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या व निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि.१७/११/२००८ अखेर ठेवण्यात आली होती. त्यानुसार संस्थानच्या मुंबई कार्यालयात तर शिर्डी कार्यालयात प्रत्येकी ७ निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या. तसेच सदरचे जाहिरातीबाबत अवगत करणेसाठी एकुण १४ कंपन्यांना इकडील पत्र क्र. १६१६० दि. ०३/११/२००८ अन्वये कळविण्यात आले होते. शिर्डी कार्यालयात ३ व मुंबई कार्यालयात ४ निविदांची विक्री झालेली असून, त्यास अनसुरुन खालीलप्रमाणे ४ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

०१) मे. विघ्नेश्वर एअरकंडीशनींग प्रा. लि., मुंबई
०२) मे. एअरटेक इंजिनीअर्स, औरंगाबाद
०३) मे. ॲपल एअरकॉन, मुंबई
०४) मे.ब्ल्यु स्टार लि., मुंबई (मे. स्पीडफ्रोस्ट सर्व्हीसेस, मुंबई)

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या सिलबंद तांत्रिक निविदा आजचे समक्ष उघडण्यात आल्या या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो तज्ञांची शिफारस घेऊन व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

(२१) लॉकर खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन उघडणेबाबत.

श्रीसाईनाथ रुग्णालयातील अधिसेविका कार्यालयाने त्यांचे डि. पी. क्रमांक ७७५५ दि.२५/०७/२००८ अन्वये १५ नग २४ कॅबीनेट असलेल्या लॉकरची मागणी केलेली आहे.

सदरचे लॉकर हे वार्ड मधील ड्यूटीवर असणारे परिचारीका / परिचारक यांचे कपडे व त्यांचे महत्वाचे वस्तू ठेवणेकामी आवश्यक असतात.

दि. २०/०९/२००८ चे मा. वैद्यकिय समिती सभेत सदर लॉकर कोटेशन मागवून खरेदीकामी प्रती नग अंदाजे रु.९,०००/- या प्रमाणे १५ नग खरेदीकामीच्या अंदाजे रु.१,३५,०००/- चे प्रस्तावास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार इकडील पत्र क्र. १४८६५ दि. ०९/१०/२००८ अन्वये एकुण १३ पुरवठा धारकांकडून दि. २५/१०/२००८ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन ४ कोटेशन प्राप्त झालेले आहेत, ते खालीलप्रमाणे -

०१) मे. साई एंटरप्रायजेस, श्रीरामपुर (बंद कोटेशन)
०२) मे. गोदरेज ॲन्ड बायोसी मॅन्युफॅक्चरींग कंपनी, पुणे (बंद कोटेशन)
०३) मे. मॅग्नम ऑफीस एड्, मुंबइ (बंद कोटेशन)
०४) मे. के. बी. इलेक्ट्रॉनीक्स, मुंबई (बंद कोटेशन)

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या सिलबंद तांत्रिक निविदा आजचे समक्ष उघडण्यात आल्या या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन त्यातील गोदरेज कंपनीचे लॉकर्स,निम्नतम दराने खरेदीचे अधिकार मा.कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात यावे,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

(२२) श्रीसाईनाथ रुग्णालयात आर्थोस्कोपी सेवर खरेदीबाबत.

श्री साईनाथ रुग्णालयातील आर्थोपेडीक सर्जन डॉ.प्रशांत पठारे यांनी एक आर्थोस्कोपी सेवरची मागणी केलेली आहे. कारण सध्या श्री साईनाथ रुग्णालयात आर्थोपेडीकच्या शस्त्रक्रिया करणेसाठी सदरचे सेवर नाही. सदर प्रकारच्या वर्षातून जवळजवळ ४० ते ५० रुग्णांच्या शस्त्रक्रिया होत असतात व त्याचा फायदा रुग्णांना मिळू शकेल.

सध्या अशा प्रकारचे सेवर फक्त श्री साईबाबा रुग्णालयात असून श्री साईनाथ रुग्णालयात गरज लागलेस ते श्री साईबाबा रुग्णालयातून वापरावयास नेण्यात येतात.

वरीलप्रमाणे साईनाथ रुग्णालयासाठी एक नग आर्थोस्कोपी सेवरची विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु.४,५०,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता तो मान्य करण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

(२३) श्री.लक्ष्मण सदाशिव चव्हाण,अधिक्षक,भक्तनिवासस्थान यांचे कॅन्सर उपचाराचे वैद्यकीय बीलाबाबत.

श्री.लक्ष्मण सदाशिव चव्हाण (अधिक्षक- न.भ.नि) यांना मानेवर गाठी दिसून आल्याने त्यांनी श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल सर्जन डॉ.रामनाईक यांना प्रथम दाखविले होते. डॉ. राम नाईक यांनी त्यांना टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई येथे पुढील उपचार घेणेसाठी पाठविलेले आहे.

श्री.चव्हाण यांनी दि.२२.०९.२००८ रोजी टाटा मेमोरियल हॉस्पिटल,मुंबई येथे जाऊन विविध तपासण्या केल्या असता त्यांना कॅन्सर या आजाराचे निदान झाले असून त्यांना केमोथेरपी करण्यास सांगितले आहे. केमोथेरपी सुविधा आपल्याकडे उपलब्ध नाही. सदर केमोथेरपी टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई येथे करण्यासाठी त्यांना दि.१५.१०.२००८ रोजी बोलविले होते.

श्री.चव्हाण हे दि.२४.१०.२००८ रोजी टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई येथे केमोथेरपीचे उपचार घेण्यासाठी गेले होते. तेथे त्यांना एकुण ६ केमोथेरपी सायकलसाठी एकुण रु.४,००,०००/- इतक्या खर्चाचे इस्टीमेट दिलेले आहे. त्याच दिवशी (दि.२४.१०.२००८) त्यांनी केमोथेरपीची एक सायकल देखील घेतलेली आहे. सदर सायकलसाठी त्यांना एकुण रु.५२,६२०/- इतका खर्च आला आहे. त्यापैकी संस्थानने विविध तपासण्या करणेकामी दिलेले रु.२०,०००/- (डी.डी.क्रमांक ८२०१६८ दि.२०.१०.२००८) टाटा मेमोरियल हॉस्पिटलमध्ये त्यांनी जमा केलेले असून उर्वरित रक्कम रु.३२,६२०/- त्यांनी स्वत: तसेच मुंबई येथून उसनवारी घेऊन खर्च केलेले आहे. श्री.चव्हाण यांनी उपरोक्त खर्चापोटी रु.५२,६२०/- ची बीले संस्थानकडे जमा केलेली आहे. श्री.चव्हाण यांना रु.२०,०००/- आगाऊ दिलेली रक्कम जमा नांवे होऊन उर्वरित रक्कम रु.३२,६२०/- त्यांना रोख अदा करावी लागणार आहे.

संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ निर्णय क्र. १४ नुसार कॅन्सरच्या आजारावर रु.७५०००/- पर्यंतची आगाऊ रक्कम देण्याची तरतुद आहे. परंतू मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०७.०७.२००८ चे सभेत सध्या कार्यान्वीत असलेली सन १९९९ ची वैद्यकीय देखभाल नियमावलीस शासनाची मान्यता घेण्यात यावी असा निर्णय झालेला आहे. सदर नियमावलीस अद्याप शासनाची मान्यता प्राप्त झालेली नाही. त्यामुळे त्यांना नियमावलीनुसार आगाऊ तसेच जादा वैद्यकीय बीलांचे परताव्याचे प्रलंबीत आहे. त्यामुळे त्यांना आगाऊ रक्कम देता येत नाही.

तेंव्हा सदरचा विषय विशेष बाब म्हणून त्यांनी खर्च केलेली एकुण रक्कम रु.५२,६२०/- मधून आगाऊ रक्कम रु.२०,०००/- वजावट करुन राहिलेली रक्कम त्यांना देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,व्यवस्थापन समितीचे दिनांक ७.७.२००८ चे सभेतील निर्णय क्र.६१६ अन्वये संस्थान कर्मचाऱ्यांची रुपये ५०००/- पेक्षा अधिक खर्चाची बीले आदा करणेकामी असलेली सन १९९९ चे वैद्यकीय देखभाल नियमावलीस राज्य शासनाची मान्यता घेण्यात यावी असें ठरलेले आहे. त्यानुसार सदरहू नियमावलीस मान्यता घेणेबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविण्यात आला असून, त्यास अद्याप मान्यता मिळालेली नसल्याने याबाबत निर्णय घेणेकामी प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

(२४) Inj. Zostum १gm खरेदीबाबत.

श्रीसाईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या उपरोक्त इंजेक्शनकरीता सन २००८-२००९ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने मे. कारवा एजन्सी,संगमनेर यांना इकडील पत्र क्र. १०९६१ दि. २६/०७/२००८ अन्वये खालीलप्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

Sr.No.	Name of Item	Make	Qty.	Rate Per	Total in Rs.
1	Inj.Zostum 1gm	Zuventus	1000	63.44	63440.00
			Total in Rs.		**63440.00**

त्यानुसार मे.कारवा एजन्सी,संगमनेर यांनी पुरवठा आदेशाप्रमाणे इंजेक्शनचा पुरवठा पुर्ण केलेला आहे. सध्या सदरचे इंजेक्शनचा औषध भांडारात साठा शिल्लक नसल्यामुळे सदरचे इंजेक्शन दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे.

सदर इंजेक्शनचा दरमहा खप पाहता तो २५० ते ३०० इंजेक्शन इतका आहे. त्यामुळे तुर्तास चार महिने पुरु शकेल इतका साठा खरेदी करावा लागणार आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

Sr.No.	Name of Item	Make	Qty.	Rate Per	Total in Rs.
1	Inj.Zostum 1gm	Zuventus	1000	63.44	63440.00
			Total in Rs.		**63440.00**

वरीलप्रमाणे मे. कारवा एजन्सी, संगमनेर यांचे वार्षिक मंजुर दरानुसार सदरचे खरेदीकामी रु. ६३४४०/- इतका खर्च येणार आहे. मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१५/०४/२००८ निर्णय क्रमांक ३५४ Clause No.८ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मा. व्यवस्थापन समितीचे मंजूर दराने खरेदी करण्यात यावी, असे ठरले आहे.

तरी मे. कारवा एजन्सी, संगमनेर यांचेकडून वरीलप्रमाणे इंजेक्शन वार्षिक मंजुर दराने खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.६३४४०/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

(२५) Intra Aortic Ballon Catheter खरेदीबाबत.

श्री साईबाबा रुग्णालयातील C.V.T.S. विभागाने डी.पी.क्र.८४५९ दि.०३.११.२००८ अन्वये एक नग Intra Aortic Balloon Catheter ची मागणी केलेली आहे. सदरचे बलून कॅथेटर हे कार्डीयाक शस्त्रक्रियेमध्ये अत्यवस्थेमधील रुग्णांना Aortic Balloon Pump लावणेसाठी आवश्यक असते. सदर Balloon Catheter हे हृदयाला Pumping करणेसाठी जोडले जाते.

सदरचे Balloon Catheter सहा नग हे प्रथम मशिन सोबत खरेदी करण्यात आले होते. सदरचे सहा नग हे वापरल्यामुळे सध्या आपणाकडे ते शिल्लक नाहीत. तेंव्हा सदरचा एक नग Intra Aortic balloon Catheter खरेदीचा प्रस्ताव आहे.

सदरकामी मुंबई येथून तातडीने फॅक्स कोटेशन मागविण्यात आले असून त्याचा तुलनात्मक दरांचा तक्ता खालील प्रमाणे.

Sr. No.	Description	Qty	Emergent Medi Tech (I) Pvt. Ltd., Mumbai	Frontier medi-Tech (I) Pvt. Ltd., Mumbai	Medico Equipments(I) Pvt.Ltd.,Mumbai	Total Amt in Rs.
1	Datascope Intra Arotic balloon Catheter Size 8fr 40CC/34CC	01	Rs.34000.00	Rs.37000.00	Rs.41600.00	Rs.34000.00

तेंव्हा उपरोक्त तुलनात्मक दरांचा विचार करता M/s.Emergent Medi-Tech (I) Pvt.Ltd., Mumbai यांचे दर निम्नतम असून त्यांचेकडून Intra Aortic Balloon Catheter एक नग खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.३४,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

(२६) HIV Elisa खरेदीस कार्योत्तर मान्यता देणेबाबत.

श्रीसाईनाथ रुग्णालयातील रक्तपेढी विभागाकरीता सन २००७-०८ या वर्षामध्ये H.C.V. ELISA KIT J. Mitra & Co. चे ९६ TEST करीता मे. मिलन एंटरप्रायजेस, अहमदनगर यांना इकडील पत्र क्र. १६०६८ दि. ०९/१०/२००७ अन्वये ६० किटचा पुरवठा आदेश देण्यात आला होता. त्याप्रमाणे त्यांनी मालाचा पुरवठा देखील केलेला आहे. सन २००८-०९ या वर्षातील वार्षिक पुरवठा आदेश दि. २६/०७/२००७ रोजी देण्यात आलेले होते, परंतु सदरचे पुरवठा आदेशातील माल उपलब्ध होण्यास कालावधी लागणार असल्यामुळे मे. मिलन एंटरप्रायजेस, अहमदनगर यांचेकडून उपरोक्त किट तातडीने खरेदी करण्यात आले होते.

रक्तपेढी विभागाकरीता उपरोक्त किटची तातडीने आवश्यकता असल्यामुळे मे. मिलन एंटरप्रायजेस, अहमदनगर यांचेकडून १० किट वार्षिक मंजुर दराने खरेदी करण्यात आल्या आहेत. त्याकरीता रु. २७,३८१/- इतका खर्च आलेला आहे, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

Sr.No.	Name of Party	Bill No.	Date	Total Amt.
1	M/s. Milan Enterprises, Ahmednagar	895	29/07/2008	27381.00
			Total in Rs.	27381.00

सदरची खरेदी ही माहे - जुलैमध्ये वैद्यकीय संचालक यांना मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०३/०६/२००७ निर्णय क्र. ३४८ नुसार दरमहा असलेल्या रु.१,००,०००/- चे तरतूदीतून केलेली आहे.

तरी वरीलप्रमाणे मे. मिलन एंटरप्रायजेस, अहमदनगर यांचेकडून उपरोक्त किट खरेदीस व याकामी आलेल्या रु. २७,३८१/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

(२७) Viscomac PFS २ ml खरेदीबाबत.

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या उपरोक्त Viscomac करीता सन २००८-२००९ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने M/s.Centaur

Pharmaceuticals Pvt. Ltd., Mumbai यांना इकडील पत्र क्र. १०९२७ दि.२६/०७/२००८ अन्वये खालीलप्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

Sr.No.	Name of Item	Make	Qty.	Rate Per	Total in Rs.
1	Viscomac PFS -2ml	Centaur	200	72.0575	14411.50
				Total in Rs.	14411.50

त्यानुसार M/s. Centaur Pharmaceuticals Pvt. Ltd., Mumbai यांनी पुरवठा आदेशाप्रमाणे उपरोक्त साहित्याचा पुरवठा पुर्ण केलेला आहे. सध्या सदरचे साहित्य औषध भांडारात शिल्लक नसल्यामुळे व डोळयांचे शस्त्रक्रियेसाठी आवश्यक असल्याने दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे. श्री साईबाबा रुग्णालयाचे ऑप्थॅलमिक ऑपरेशन थिएटर विभागाने सन २००८-०९ या वार्षिक मागणीमध्ये २०० नगाचीच मागणी केली होती व त्याप्रमाणे वार्षिक औषधे खरेदीकामी २०० नगाची मागणी करण्यात आलेली होती.

सदर साहित्याचा दरमहा खप पाहता तो ४० ते ५० इतका आहे. त्यामुळे तुर्तास चार महिने पुरु शकेल इतका साठा खरेदी करावा लागणार आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

Sr.No.	Name of Item	Make	Qty.	Rate Per	Total in Rs.
1	Viscomac PFS -2ml	Centaur	200	72.0575	14411.50
				Total in Rs.	**14411.50**

वरीलप्रमाणे M/s.Centaur Pharmaceuticals Pvt. Ltd., Mumbai यांचे वार्षिक मंजुर दरानुसार सदरचे खरेदीकामी रु. १४४११.५० इतका खर्च येणार आहे. मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१५/०४/२००८ निर्णय क्रमांक ३५४ Clause No.८ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मा. व्यवस्थापन समितीचे मंजूर दराने खरेदी करण्यात यावी, असे ठरले आहे.

तरी M/s.Centaur Pharmaceuticals Pvt. Ltd., Mumbai यांचेकडून वरीलप्रमाणे Viscomac-PFS वार्षिक मंजुर दराने खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.१४४११.५० चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

(२८) <u>डबल प्रेशर ट्रान्सड्यसर खरेदीस कार्योत्तर मान्यता देणेबाबत.</u>

श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधील कार्डीयाक शस्त्रक्रिया विभागामध्ये लागणारे डबल प्रेशर ट्रान्सड्यूसर दोन नग मे.लाईफ केअर डिव्हाईसेस प्रा.लि., मुंबई यांचेकडून डॉ. भट्टाचार्य (कार्डीयाक सर्जन) येणार होते तेंव्हा मा. विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी साहेब यांचे तोंडी आदेशान्वये तातडीने खरेदी करण्यात आले होते. सदर कामी रु.१,२५,९२०/- इतका खर्च आले होते.

श्रीसाईबाबा हॉस्पिटल हे तेंव्हा नव्यानेच चालू करण्यात आले होते. त्यावेळी उपरोक्त मटेरीयलची कार्डीयाक सर्जरीसाठी आवश्यकता असल्याने तसेच डॉ. भट्टाचार्य (कार्डीयाक सर्जन) हे आपल्याकडे मानद सर्जन म्हणून येणार असल्याने सदर मटेरीयल मे. लाईफ केअर डिव्हाईसेस प्रा.लि., मुंबई यांचेकडून बील नं. ९४५ व ९४६ दि.१७/१०/२००७ अन्वये डबल प्रेशर ट्रान्सड्यूसर प्रती नग रु.६२,९६०/- याप्रमाणे २ नग खरेदीकामी रु.१,२५,९२०/- इतका खर्च आलेला होता. सदरचे ट्रान्सड्यूसर हे Reusable असल्यामुळे ते खरेदी केल्यापासून आजपर्यंत त्यांचा वापर चालू आहे म्हणजे सदरचे २ नग ट्रान्सड्यूसर द्वारे कार्डीयाकच्या कमीत कमी ४०० ते ५०० शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या आहेत.

सदरची खरेदी ही आक्टोबर २००७ मधील वैद्यकिय संचालक यांचे आधिकाराव्यतिरिक्त केलेली आहे.

तरी मे. लाईफ केअर डिव्हाईसेस प्रा.लि., मुंबई यांचेकडून २ नग डबल प्रेशर ट्रान्सड्यूसरच्या कार्योत्तर खरेदीस व याकामी आलेल्या रु. १,२५,९२०/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

(२९) <u>कार्डीयाक सुचर्स खरेदीस कार्योत्तर मान्यता देणेबाबत.</u>

श्री साईबाबा रुग्णालयाचे कार्डीयाक विभागात कार्डीयाक सर्जरीसाठी लागणाऱ्या उपरोक्त सुचर्स करीता सन २००८-२००९ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने मे. सर्जिलिंक, श्रीरामपुर यांना इकडील पत्र क्र. ११०१९ दि. २६/०७/२००८ अन्वये खालीलप्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

Sr. No.	Description	Make	Co.Code	Qty.	Rate Per	Total Amt.
1	Ethilon No.2/0	B. BRAUN	G0932010 1PACK 12 FOILS	20	605.00	12100.00
					Total -	12100.00

त्यानुसार मे. सर्जिलिंक, श्रीरामपुर यांनी पुरवठा आदेशाप्रमाणे उपरोक्त सुचर्सचा पुरवठा पुर्ण केलेला आहे. सध्या सदरचे सुचर्सचा औषध भांडारात साठा शिल्लक नसल्यामुळे सदरचे सुचर्स दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे.

सदर सुचर्सचा दरमहा खप पाहता तो ३-४ सुचर्स बॉक्स इतका आहे. त्यामुळे तुर्तास चार महिने पुरु शकेल इतका साठा खरेदी करावा लागणार आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

Sr. No.	Description	Make	Co.Code	Qty.	Rate Per	Total Amt.
1	Ethilon No.2/0	B. BRAUN	G0932010 1PACK 12 FOILS	15	605.00	9075.00
					Total -	9075.00

वरीलप्रमाणे मे. सर्जिलिंक, श्रीरामपुर यांचे वार्षिक मंजुर दरानुसार सदरचे खरेदीकामी रु. ९०७५/- इतका खर्च येणार आहे. मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१५/०४/२००८ निर्णय क्रमांक ३५४ Clause No.८ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मा. व्यवस्थापन समितीचे मंजूर दराने खरेदी करण्यात यावी, असे ठरले आहे.

तरी मे. सर्जिलिंक, श्रीरामपुर यांचेकडून वरीलप्रमाणे सुचर्स वार्षिक मंजुर दराने खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.९०७५/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

(३०) <u>श्रीसाईबाबा रुग्णालयातील डायलेसीस विभागासाठी बायकार्ब सोल्यूशन खरेदीबाबत.</u>

श्रीसाईबाबा रुग्णालयातील डायलेसीस विभागात बायकार्ब सोलुशनची आवश्यकता असते. सदरचे बायकार्ब सोलुशन खरेदीकामी सन २००८-०९ चा वार्षीक औषधे खरेदीमध्ये मागणी करणेत आलेली होती. परंतू उपरोक्त खरेदीकामी वार्षीक औषधे खरेदीमध्ये कोणाचेही दर प्राप्त झालेले नाहीत. सदरचे बायकार्ब सोलुशन एक वर्षाकरीता (सन २००८-०९) ७०० नग खरेदीकामी दि.१५.०४.२००८ चे मा.व्यवस्थापन समिती सभेमध्ये अंदाजे रु.७७,०००/- इतक्या खर्चास मान्यता मिळालेली आहे.

सदरचे बायकार्ब सोलुशन सन २००७-०८ मधील साठा संपल्यामुळे सध्या सदर सोलुशनची तातडीने आवश्यकता असल्याने याकामी मुंबई येथून ०३ कंपनी /अधिकृत विक्रेतेचे फॅक्स कोटेशन मागविण्यात आलेले असून त्यांचा तुलनात्मक दरांचा तक्ता खालील प्रमाणे.

Sr. No.	Description	Qty.	Atlantic Phrmaceuticasl, Mumbai	A.K.D. Suppliers, Mumbai	Allwyn Bio-Medicals, Mumbai	Total in Rs.
1	Concentrated Haemodialysis Solution B.P.Bicarbonate Packing in 10 Litre Can with 2 packets of Bicarbonate Powder.	700	171.60	202.80	187.20	120120.00
					Total in Rs.--	120120.000

उपरोक्त प्रमाणे प्राप्त तुलनात्मक दरातील मे.अटलांटिक फार्मा,मुंबई यांचे निम्नतम दर स्विकारण्यास व याकामी येणाऱ्या रु.१,२०,१२०/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

(३१) <u>डिफीब्रीलेटरचे (Interal paddles) खरेदी करणेबाबत.</u>

श्रीसाईबाबा हॉस्पिटलचे कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागाकरीता मा. व्य. समितीच्या दि. १८/०७/२००५ च्या सभेतील निर्णय क्र. ३३२ (०६) अन्वये एक Heart start XL डिफीब्रीलेटर एकुण रु. २,८३,०००/- इतक्या रकमेत खरेदी करणेत आले आहे. सदर डिफीब्रीलेटरकरीता दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. १४/११/२००६ रोजी संपलेला असुन पुढील कालावधीत डिफीब्रीलेटरचे दुरुस्ती व देखभालीकरीता कंपनीकडे दि. ०१/०४/२००८ ते ३१/०३/२००९ या कालावधीकरीता वार्षीक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेत आले आहे. सदर कालावधीत दुरुस्ती व देखभालीकरीता आवश्यक असणारे स्पेअर पार्ट (कन्झ्युमेबल स्पेअर पार्ट वगळता उदा. डिफीब्रीलेटर पॅडल, बॅटरी, ॲक्सेसरीज इ.) कंपनी स्वखर्चाने बदलणार आहे.

डिफीब्रीलेटर कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागात नियमीत वापरले जाते. परंतु सदर विभागाने त्यांचे पत्र क्र. ६५८२ दि. ०३/१२/२००८ अन्वये डिफीब्रीलेटरचे Internal Paddles काम करत नसलेबाबत कळविले होते. त्यानुसार सदर डिफीब्रीलेटर व Internal Paddles ची तपासणी केली असता पॅडल खराब झाले असल्याचे निदर्शनास आले. डिफीब्रीलेटर व Internal Paddles ची कार्डीयाक ऑपरेशन थिएटर

विभागात शस्त्रक्रीया करताना अत्यंत आवश्यकता असते. त्यामुळे मे. फिलीप्स मेडीकल सिस्टीम (इं) प्रा. ली. मुंबई यांचे विविध सर्व्हिस डीलर्सकडुन Internal Paddles करीता दर मागविण्यात आले असुन त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

Sr. No.	Name of Company	Description	Model No.	Qty	Quoted Total Amount (Incl. all taxes)
01	M/s. Cyronics instruments Pvt. Ltd. Pune	Adult switched Internal Paddles	M4741A	01(pair)	36,000.00
02	Biosonic Medical Equipments, Nasik	Adult switched Internal Paddles	M4741A	01(pair)	**26,000.00**
03	Care mediquip, Mumbai	Adult switched Internal Paddles	M4741A	01(pair)	33,750.00

वरील दरांचा तुलनात्मक विचार करता मे. बायोसॉनीक मेडीकल इक्विपमेंटस, नासिक यांनी Internal Paddles करीता दिलेले दर निम्नतम आहेत तसेच सदरची रक्कम कंपनीस Internal Paddles श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये प्राप्त झालेनंतर अदा करावयाची आहे. डिफीब्रीलेटर व Internal Paddles ची कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागात नेहमीच अत्यंत आवश्यकता असल्यामुळे Internal Paddles तातडीने खरेदी करणे आवश्यक होते. त्यामुळे मे. बायोसॉनीक मेडीकल इक्विपमेंटस, नासिक यांचेकडुन डिफीब्रीलेटरचे Internal Paddles मागविण्यात आले आहेत.

तरी मे. बायोसॉनीक मेडीकल इक्विपमेंटस, नासिक यांचेकडुन Heart start XL डिफीब्रीलेटरचे Internal Paddles खरेदी करणेस व त्याकरीता आलेल्या एकुण रु. २६,०००/- चे खर्चास आणि सदर Internal Paddles चे कंपनीने पाठविलेले वरील रकमेचे बील अदा करणेस कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

(३२) <u>श्रीसाईनाथ रक्तपेढी विभागासाठी मशिनरी/उपकरणे खरेदीबाबत.</u>

श्रीसाईनाथ रक्तपेढी हि २००० मध्ये कार्यान्वित करणेत आली होती. त्यावेळेस सदरचे रक्तपेढी करीता काही मशिनरी, विविध प्रकारचे फ्रिजेस इत्यादी खरेदी करण्यात आले होते. सदरची रक्तपेढी कार्यान्वित होऊन ८ वर्षाचा कालावधी झालेला आहे. तसेच रुग्णांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. त्यामुळे उपलब्ध मशिनरी / उपकरणे इत्यादीवर कामाचा बोजा खुपच वाढलेला आहे. त्यामुळे सदर मशिनरी / उपकरणांपैकी काही मशिनरी / उपकरणे बदलणे गरजेचे आहे.

तसेच अन्न व औषध प्रशासन - महाराष्ट्र शासन यांचे विभागाकडून रक्तपेढीकरीता असलेल्या परवाना नुतनीकरण करणेसाठी अन्न व औषध प्रशासन - महाराष्ट्र शासन यांनी दि. २७/०९/२००८ रोजी रुग्णालयास भेट दिली असता त्यांनी देखील काही अदयावत मशिनरी / उपकरणे / डोनरकोच इत्यादी खरेदी करण्याबाबत शिफारस केलेली आहे. रक्तपेढी विभागाच्या एकुण मागणीचा तपशील खालीलप्रमाणे

Sr. No.	Name of Item	Suggested Make by User	Suggested Model by User	Qty	App. Rate Per in Rs.	App. Total in Rs.	Remark	Reason for Demand
Machinery								
1	Cell Counter	A.G.D. Diagnostic Company (Erma)	PCE210	1	600000.00	600000.00		For quality control (As per FDA)
2	Fully Automatic ELISA System	Axim		1	1500000.00	1500000.00		To reduce mannual errors
3	Elisa Plate Reader	Stat Fax		1	150000.00	150000.00		One & half year old. Instrument of Ranbaxy company not working since 1 year, stand by instrument.
4	Blood Collection Monitor & Shaker (Haemo mixer)	Terumo Penpol /Remi		2	160000.00	320000.00		For proper mixing of Blood during collection, Blood collection increased
5	Component Separation Centrifuge	Remi / Eltek		1	350000.00	350000.00		Increased demand of components and as stand by.
6	Gel System	Matrix / Diamed		1	135000.00	135000.00		Reducing errors in cross-match
					Total	**3055000.00**		
Equipment								
7	Blood Bank Refrigerator (2^0c to 8^0c) (300L)	Remi	BR 70DX	3	150000.00	450000.00	Buy back	Previous one is very old
8	Deep Freezer (-20^0c)	Remi	RQFV - 170	1	300000.00	300000.00	Buy back	Very old & not giving accurate

								reading
9	VDRL Rotator (Rotatory Shaker)			1	7085.00	7085.00		
10	Laboratory Incubator			1	22500.00	22500.00		
11	Hot Air Oven			1	22500.00	22500.00		
12	Binocular Microscope			1	15000.00	15000.00		
13	CVT Stabilizer 5 KVA			4	15000.00	60000.00		
					Total	**877085.00**		
Furniture								
14	Donor Coach	Terumo Penpol / HL		3	100000.00	300000.00		For Donor comfort and to give immediate head low position in case of donor reaction.
					Total	**300000.00**		
Miscellaneous								
15	Ice Box			2	5000.00	10000.00		
					Total	**10000.00**		
					App. Total Amt. in Rs.	**42,42,085.00**		

उपरोक्तप्रमाणे मशिनरी / उपकरणे खरेदीकामी अंदाजे रु. ४२,४२,०८५/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरची खरेदी ही श्री साईनाथ रुग्णालयाकरीता मशिनरी / उपकरणे खरेदी या अंदाजपत्रकीय तरतुदीतून करता येईल.

मशिनरी खरेदीकामी रु. ४०,००,०००/- पैकी प्रयोगशाळा विभागाचे मशिनरी / उपकरणे खरेदीकामीची तरतुद वजा जाता रु. २०,५०,०००/- शिल्लक आहे व सदरचे खरेदीकामीची उर्वरीत रक्कम रु. १०,०५,०००/- शिल्लक राहील. उर्वरीत रु. १०,०५,०००/- साठी सुधारीत अंदाज पत्रकात तरतुद करता येईल, तर उपकरणे खरेदीकामी रु. २८,००,०००/- रक्कम शिल्लक असून, त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तप्रमाणे मशिनरी / उपकरणे खरेदीकामी विहीत पध्दतीने वर्तमानपत्रात जाहीरात देऊन निविदा मागवून खरेदी करण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

(३३) <u>श्रीसाईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरिता मशिनरी/उपकरणे खरेदीबाबत.</u>

श्री साईनाथ रुग्णालयाचे प्रयोगशाळा विभागातील Histopathology & Cytology विभागात दैनंदिन तपासणीकामी सध्या असलेल्या मशिनरी / उपकरणे व्यवस्थित काम देत नसल्याने तर काही नविन तपासण्या ज्या आपणाकडे सध्या होत नाही. त्या करणेकामी प्रयोगशाळा विभागाने नविन मशिनरी / उपकरणांची मागणी केलेली आहे. त्याची तपशीलवार माहिती खालील प्रमाणे -

Sr. No	Name of Item	Suggested Make by User	Suggested Model by User	Qty	App. Rate Per in Rs.	App. Total in Rs.	Remark	Reason for Demand
Machinery								
1	Electrolyte Analyser (Portable Blood Gas Analyser)	Osmetech	Osmetech OPTITM CCA Blood Gas Analyser	1	350000.00	350000.00		For measurement of blood gas and electrolyte of ICU & other critical patients.
2	Rotary Microtome with Accessories	1) Leica (Made in Germany) 2) Panchal 3) LEXUS 4) MICROM (Made in Japan)	Panchal	1	25000.00	25000.00	Buy back	Two old Microtome having Jumping problem
					Total	**375000.00**		
Equipment								
3	Binocular Microscope with MIPD (Micro Image Protection Devices with Software)	1) Olympus 2) Carl zeiss 3) NIKON		1	15000.00	15000.00		To improve quality of work
					Total	**15000.00**		
Miscellaneous								
4	Humidity Chember	Bio-Genex		1	3000.00	3000.00		Required for Immuno histo-

								chemistry
					Total	**3000.00**		
			App. Total Amt. in Rs.			**3,93,000.00**		

उपरोक्तप्रमाणे मशिनरी / उपकरणे खरेदीकामी अंदाजे रु. ३,९३,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरची खरेदी ही श्री साईनाथ रुग्णालयाकरीता मशिनरी / उपकरणे खरेदी या अंदाजपत्रकीय तरतुदीतून करता येईल.

मशिनरी खरेदीकामी रु. ४०,००,०००/- तर उपकरणे खरेदीकामी रु. २८,००,०००/- रक्कम शिल्लक त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

(३४)संस्थानच्या पाणीपुरवठा योजनेची वीज जोडणी संस्थानच्या नांवे करणेसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. कार्यालयाकडे भरलेल्या रकमेस कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत.

संस्थानच्या पाणीपुरवठयासाठी असणारा कनकुरी शिवारातील साठवण तलाव व सर्व यंत्रणा ही जीवन प्राधिकरणामार्फत सन १९९२ मध्ये बांधुन पुर्ण करण्यात आली. सदरील योजना ही जीवन प्राधिकरण यांचेमार्फत तयार करण्यात आल्याने सुरुवातीपासून तेथील योजनेचे वीज बीलही कार्यकारी अभियंता, जीवन प्राधिकरण यांचे नांवे येत होते.

तेथील यंत्रणेची वीज बीले परीसर कार्यकारी अभियंता जीवन प्राधिकरण यांचे नांवे येत असल्याने वीज बीले भरते वेळेस लेखा परिक्षक आक्षेप घेत होते. परंतू पाणीपुरवठयासाठी यंत्रणा संस्थानच्या नांवावर नसल्याने त्याठिकाणी वीजेचे कनेक्शन संस्थानच्या नांवावर घेता येत नव्हते. त्यामुळे विद्युत विभागास वीज बीले भरतांना अडचणी येत होत्या.

आता पाणीपुरवठयाची संपूर्ण यंत्रणा शासन निर्णय क्र.पापुयो - १९०३/१५१/प्र.क्र.१०७/पापु-१७ दिनांक०८.०७.२००४ अन्वये कायमस्वरुपी संस्थानकडे हस्तांतरीत करण्यात आल्याने सदरील योजनेची वीज बीले संस्थानच्या नावावर येणेसाठी व त्यात नव्याने वाढलेला ५० एच.पी.वाढीव लोड समाविष्ठ करणे या करीता आपणास नविन A-१ फॉर्म भरुन महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. कार्यालयाकडे रु. ५६,७२१.०० इतकी रक्कम भरावी लागली आहे.

तरी पाणीपुरवठा साठवण तलावावरील वीज जोडणीकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडे आदा केलेल्या रु. ५६,७२१.०० इतक्या रक्कमेस कार्योत्तर मान्यता मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

(३५) कोरडा शिधा सामुग्री मिळणे बाबत श्री अशोक रोहमारे, अध्यक्ष लायन्स मुक बधिर व अपंग विद्यालय ट्रस्ट, कोपरगांव यांचे अर्जाबाबात.

अध्यक्ष, अपंग विद्यालय ट्रस्ट, कोपरगांव यांनी मा. अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

अ.नं.	नांव व पत्ता	तपशील	मदतीचे स्वरुप
०१.	श्री अशोक रोहमारे, अध्यक्ष, लायन्स मुक-बधिर व अपंग विद्यालय ट्रस्ट, कोपरगांव जि.अहमदनगर,फो.नं.२२२२९३ (अर्ज दि.०१/१२/२००८)	दि.१५/१२ ते १६/१२/०८मध्ये होणा-या जिल्हास्तरीय क्रिडा व सांस्कृतिक स्पर्धेत भाग घेणा-या अंध, मुक-बधिर, अपंग क्रिडापटुंना जेवणासाठी म्हणून कोरडा शिधा स्वरुपात मदत.	शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज.

आजतागायत संस्थानमार्फत धार्मिक /सामाजिक कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे स्वरुप पाहुन रु.११,००० ते १,००,०००/- पर्यंत शिधा स्वरुपात मदत केलेली आहे.

उपरोक्त ट्रस्टने यापुर्वी अशाप्रकारची मागणी केलेली नाही. ते पहिल्यांदाच मागणी करीत असून सदरचे ट्रस्ट हे शासनमान्य आहे. तसेच अंध-अपंग, मुक-बधिर क्रिडापटुंची जिल्हास्तरीय स्पर्धा असून मानवतेच्या दृष्टीने क्रिडापटुंना तीनवेळचे जेवण देणेस हरकत नाही, तसेच सदरचा खर्च अन्नदान फंडातुन करता येईल, असे नम्र मत आहे. संबंधीतांना कोरडा शिधा देता येणार नाही.

शिधा देणेबाबत शासनाने सुचीत केलेनुसार नियमावली तयार करण्यात आलेली असून शासनाचे मान्यतेसाठी सादर करण्यात आलेली आहे, तथापि अद्यापपावेतो त्यास मान्यता आलेली नाही.

यापुर्वी आलेल्या शिधास्वरुपातील प्रकरणांना संस्थानमार्फत शिधा मदत देण्यात आलेली नाही. सन २००८-२००९ या सालात फक्त स्थानिक संस्थेला नियमानुसार व संस्थान नियमावलीतील अ.नं. ९ मधील तरतुदीनुसार व दि.२०/०५/२००७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत आ.वेळचा विषय क्र.१७ व निर्णय क्र.४१९ अन्वये येथुनपुढे जास्तीत जास्त रु.११,०००/- पर्यंतच शिधास्वरुपात मदत देण्यात यावी, असे ठरलेले आहे. दि.२४/०५/२००८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीत शिधा स्वरुपातील मदतीचे अर्जावर निर्णयाचे अधिकार मा.अध्यक्षसाो. यांना देण्यात आलेले आहेत.

त्यानुसार मा.अध्यक्षसाो. यांनी दि.४/१२/२००८ रोजीचे टिपणीवर रु.११,०००/- पर्यंतचा शिधा देणेबाबत मान्यता दिलेली आहे.

तरी श्री.अशोक रोहमारे, अध्यक्ष, लायन्स मुक-बधिर व अपंग विद्यालय ट्रस्ट, कोपरगांव जि. अहमदनगर, यांना दि.१५/१२ ते १६/१२/०८ मध्ये होणा-या जिल्हास्तरीय क्रिडा व सांस्कृतिक स्पर्धेत भाग घेणाऱ्या अंध, मुक-बधिर, अपंग क्रिडापटुंना जेवणासाठी म्हणून कोरडा शिधा देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो अमान्य करण्यात यावा,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०५)

(३६) <u>स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने मोफत जेवण मिळणेबाबत मुख्याध्यापक,श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय शिर्डी यांचे पत्राबाबत.</u>

मुख्याध्यापक, श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय, शिरडी, जि.अहमदनगर यांनी दि.०२/१२/२००८ रोजीचे पत्राने सदर विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम मंगळवार, दि.१६/१२/२००८ रोजी दुपारी ३.०० वा. होणार असून सदरच्या स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे निमित्ताने संस्थानमार्फत साईबाबांचा प्रसाद म्हणून एक वेळचे भोजन बुधवार, दि.१७/१२/२००८ रोजी २३४३ विद्यालय कर्मचारी व विद्यार्थी यांना प्रसादालयात मिळावे अशी विनंती केलेली आहे.सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षी पार पडलेल्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी मा.आ.श्री.जयंतरावजी ससाणेसाहेब यांनी अशा पध्दतीचे आश्वासन दिलेले आहे.

यापुर्वी दरवर्षी संस्थानमार्फत श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय, शिरडी, यांना वार्षिक पारितोषिक वितरण समारंभासाठी म्हणून खाऊ वाटप करीत असतो. सन २००४-०५ व सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षी पार पडलेल्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी सदरच्या शाळेस संस्थानमार्फत शालेय विद्यार्थी , अध्यापक, कर्मचारी व पाहुणे असे एकूण २,००० व २,१६८ जणांना मोफत भोजन देण्यात आले होते. सन २००६ मध्ये दि.२५/११/२००६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील आयत्या वेळचा विषय क्र.२२ व निर्णय क्र.९६३ अन्वये २२६६ विद्यार्थी व कर्मचारी यांना प्रसादालयातून भोजन देणेबाबत मान्यता मिळालेली आहे. सन २००७ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांचे तोंडी आदेशाने प्रसादालयातून भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. यावर्षी सदरच्या शाळेने स्नेहसंमेलनानिमित्त मोफत भोजन मिळणेबाबत मागणी केलेली आहे. दरवर्षाप्रमाणे याहीवर्षी वार्षिक स्नेहसंमेलनाचे निमित्त शालेय विद्यार्थी व कर्मचारी यांना स्नेहभोजन साईबाबांचा प्रसाद म्हणून देणेबाबत विचार करता येईल व सदरचा खर्च अन्नदान खाती टाकता येईल, असे नम्र मत आहे.

तरी श्रीसाईनाथ माध्यमिक विद्यालय, शिरडी, जि.अहमदनगर या विद्यालयास वार्षिक स्नेहसंमेलना निमित्त संस्थानमार्फत बुधवार, दि.१७/१२/२००८ रोजी २३४३ विद्यालय कर्मचारी व विद्यार्थी यांना प्रसादालयात साईबाबांचा प्रसाद म्हणून एक वेळचे भोजन देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, अशा प्रकारची प्रथा पडल्यास इतरही शाळांकडूनही मागणी येण्याची शक्यता नाकारता येत नाही याकरीता उपरोक्त प्रस्ताव अमान्य करण्यात यावा,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०५)

(३७) <u>दिनांक ३१ डिसेंबर २००८ रोजी दर्शनाकरीता समाधी मंदिर रात्रभर उघडे ठेवणेबाबत.</u>

गेल्या काही वर्षापासून डिसेंबर महिन्यामध्ये गर्दीचे प्रमाण वाढत आहे. दि.३१ डिसेंबर रोजी नवीन वर्षाच्यावेळी श्रींचे दर्शन मिळावे याकरीता गर्दीचा उच्चांक होतो. यामध्ये मुंबई, दिल्ली, हैद्राबाद येथील साईभक्तांची संख्या मोठी असते.

मागील वर्षी दि.०८.१२.२००७ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीच सभेमध्ये विषय नं.६८, निर्णय क्र.८५२ प्रमाणे दि.३१ डिसेंबर २००७ या दिवशी श्रींचे समाधी मंदिर रात्रभर साईभक्तांच्या दर्शनासाठी खुले ठेवणेबाबत निर्णय संमत झाला होता व त्यामुळे गर्दीचे प्रमाण आटोक्यात राहीले. याच धर्तीवर यावर्षीही होणारी संभाव्य गर्दी विचारात घेता बुधवार दि.३१ डिसेंबर २००८ रोजी समाधी मंदिर रात्रभर उघडे ठेवावे तसेच समाधी मंदीर रात्रभर उघडे ठेवल्यास दि.३१.१२.२००८ रोजीची शेजारती व दि.०१.०१.२००९ रोजी काकड आरती होणार नाही, असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०५)

(३८) <u>कार्डीयाक ऑपरेशन थिएटरमधील लाईट सोर्सकरीता फायबर ऑप्टीक केबल खरेदी करणे बाबत.</u>

श्रीसाईबाबा हॉस्पिटलचे कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागाकरीता मा.व्यवस्थापन समितीच्या दि.११/०२/२००६ चे सभेतील निर्णय क्र. २२ अन्वये मे. बी. एल. लाईफ सायन्सेस प्रा. ली. मुंबई यांचेकडुन एक झेनॉन लाईट सोर्स (Luxtec LX 300) सर्व करांसहीत एकुण रु. २,८६,०००/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आला आहे. सदर लाईटसोर्स श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये कार्यान्वीत करण्यात आला असुन कंपनीने सदर लाईटसोर्स करीता दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. ०४/०४/२००६ रोजी संपला आहे. सदर लाईटसोर्सची दुरुस्ती व देखभाल बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागामार्फत येथेच

केली जात आहे. परंतु दुरुस्ती करीता आवश्यक असणारे स्पेअर पार्ट पुरवठाधारक कंपनीकडुनच खरेदी करावे लागतात.

सदर लाईट सोर्समध्ये निर्माण होणारा प्रखर प्रकाश सर्जनच्या हेडबॅन्ड पर्यंत तेवढयाच प्रखरतेने वाहुन नेण्यासाठी एक फायबर ऑप्टीक केबल वापरलेली असते. बायपास सर्जरी करताना सर्जनला रुग्णाच्या हृदयाचे सर्व भाग स्पष्ट दिसणे गरजेचे असते. हे काम फायबर ऑप्टीक केबल द्वारे केले जाते. परंतु सदर लाईटसोर्स कार्यान्वीत झाल्यापासुन आजपावेतो अंदाजे २,५०० तासांपेक्षा अधीक काळ वापरला गेला असल्याने फायबर ऑप्टीक केबलची प्रकाश वाहुन नेण्याची क्षमता कमी झाली आहे व सर्जनला हेडबॅन्डमधुन मिळणारा प्रकाश कमी झाला आहे. त्यामुळे सदर फायबर ऑप्टीक केबल तातडीने बदलणे आवश्यक आहे. सदर बाबतीत कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागाने त्यांचे पत्र क्र. ६५६९ दि. ०९/०९/२००८ अन्वये मागणीपत्रही पाठविले आहे. त्यामुळे सदर फायबर ऑप्टीक केबलकरीता कंपनीकडे विचारणा केली असता त्यांनी त्यांचे पत्र क्र. BLL/MUM/289/08-09 दि. २२/१०/२००८ अन्वये खालीलप्रमाणे कोटेशन पाठविले आहे.

Sr. No.	Description	Qty	Rate Per	Total Amount
01	Fiber Optic Cable for LUXTECH Light Source Model- LX 300	01	53,000.00	53,000.00
			Special Discount 10%	-5300.00
			+ VAT 12.50%	5962.50
			Net (R. off) total in Rs.	**53662.00**

वरीलप्रमाणे मे. बी. एल. लाईफ सायन्सेस प्रा. ली. मुंबई यांचेकडुन लाईटसोसर्करीता फायबर ऑप्टीक केबल खरेदी करणेसाठी सर्व करांसहीत एकुण रु. ५३,६६२/- (अक्षरी रु. त्रेपन्न हजार सहाशे बासष्ठ मात्र) इतका खर्च अपेक्षीत आहे. सदर रकमेची कंपनीने आगाउ मागणी केली आहे. सदर लाईट सोर्स मे. बी. एल. लाईफ सायन्सेस प्रा. ली. मुंबई यांनी पुरवठा केला असुन त्याचे स्पेअर पार्ट फक्त त्यांचेकडेच मिळतात.

तरी कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागातील लाईट सोर्सकरीता फायबर ऑप्टीक केबल मे. बी. एल. लाईफ सायन्सेस प्रा. ली. मुंबई यांचेकडुन खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या सर्व करांसहीत एकुण रु. ५३,६६२/- चे खर्चास व सदरची रक्कम कंपनीस आगाऊ पाठविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

(३९) <u>श्रीसाईनाथ रुग्णालयात १६ इंटर्नस च्या नियुक्तीसाठी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक यांचेकडून मान्यता मिळविणेबाबत.</u>

श्रीसाईनाथ रुग्णालयामध्ये यापूर्वी MUHS च्या मान्यतेने प्रवरा मेडिकल कॉलेज, लोणी यांचेमार्फत १६ इंटनर्सची नियुक्ती होत असे,परंतू आता प्रवरा मेडिकल ट्रस्ट,लोणी डिम्ड युनिर्व्हसिटी झाल्यामुळे MUHS ची १६ इंटर्नस्चे नियुक्तीसाठी पूर्व मान्यता घेणे आवश्यक आहे.

MUHS शी याबाबत पत्रव्यवहार केला असता रुपये ५० हजार इतकी इन्स्पेक्शन फी देणे आवश्यक असलेबाबत विद्यपिठाने कळविले आहे.

तरी सदरहू रक्कम MUHS यांना आदा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, MUHS यांना इन्स्पेक्शन फी म्हणून रुपये ५० हजार देणेस व श्रीसाईबाबा व श्रीसाईनाथ रुग्णालयात १६ इंटर्नस् MUHS यांचेकडून घेणेस मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

विषय नं.०६ नोंद घेण्याचे विषय.

०१. (अ) जमा खर्च तक्ता ऑक्टोबर-नोव्हेंबर,२००८.

(ब) माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर ,२००८ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्चाच्या तक्त्याची नोंद घेणे.

(क) गुंतवणूक तक्त्याची नोंद घेणे.

(ड) माहे नोव्हेंबर,२००८ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.

(इ) माहे नोव्हेंबर, २००८ मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.

निर्णय क्र.०६ (A) माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर,२००८ मधील जमा अनुक्रमे रु १७,२०,९५,२२७.२० व रुपये १७,३७,९०,४०९.०८ आणि खर्च रुपये १०,७०,१६,२२५.११ व रुपये ११,४०,१९,८११.७५ चा तक्ता, मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर रक्कम रुपये २५ हजार पर्यंतच्या सर्वसाधारण खर्चाचा तपशील अनुक्रमे माहे, ऑक्टोबर-नोव्हेंबर,२००८ रुपये १,३८,३३७.०० व रुपये २,५१,६४३.०० चा तक्ता,

दिनांक ३१.१०.२००८ व दिनांक २७.१२.२००८ अखेर संस्थानची गुंतवणूक अनुक्रमे रुपये ३,०२,४८,६६,०२२.०० व रुपये ३,१४,५३,६३,६१७.०० चा तक्ता, माहे नोव्हेंबर,२००८ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या सोने चांदी, कापड व इतर वस्तूसह आलेल्या एकूण रुपये ६,६३,२४,१८६.०० देणगीचा तक्ता, माहे नोव्हेंबर,२००८ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तुचा विक्रीचा रुपये १,७३,७०३.०० चा अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

०२. श्री साईबाबा रुग्णालयात माहे ऑगस्ट, सप्टेबर, ऑक्टोबर, नोव्हेंबर-२००८ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेऊन मान्यता देणे.

निर्णय क्र. ०६ (B) श्री साईबाबा रुग्णालयात माहे ऑगस्ट, सप्टेबर, ऑक्टोबर, नोव्हेंबर-२००८ मध्ये वैद्यकीय बीलांमध्ये अनुक्रमे रुपये ११,९०,६३६.००, ११,७३,७३५.००, ९,६२,६४५.००, व रुपये ९,१५,०६५.०० देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली

०३. साईनाथ रुग्णालयात माहे नोव्हेंबर,२००८ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाची नोंद घेणे.

निर्णय क्र. ०६ (C) श्रीसाईबाबा रुग्णालयामध्ये माहे नाव्हेंबर,२००८ मध्ये रुपये ५४,५२,८४९.०० देण्यात आलेल्या अनुदान तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, मान्यता देण्यात आली.

०४. श्रीसाईनाथ रुग्णालय माहे नोव्हेंबर,२००८ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेऊन मान्यता देणे.

निर्णय क्र. ०६ (D) साईनाथ रुग्णालयात माहे नोव्हेंबर, २००८ मध्ये साईनाथ रुग्णालयातील रुग्णांना अंतररुग्ण रुपये ९२,९०६.०० बाह्य रुग्ण रुपये ५७,९०३.००.०० थॅलसेमिया व हिमोफेलिया रुपये ५८,९००.०० वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली

०५. माहे नोव्हेंबर,२००८ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेऊन मान्यता देणे.

निर्णय क्र. ०६ (E) माहे ऑक्टोंबर,२००८ मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या ३८,११० कर्मचाऱ्यांच्या/कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली

०६. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेऊन मान्यता देणे.

निर्णय क्र. ०६ (F) बांधकाम प्रगती अहवाल दर्शविणारा तक्ता "अ" व "ब" यांच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेणेत येऊन, तक्ता "अ" मधिल श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी पार्कींग शेड उभारणे व शैक्षणिक संकुल क्रिडांगण तयार करणे या कामासाठी ठेकेदार मिलिंद पाचोरकर, निफाड यांना अनुक्रमे दि.१४/०१/२००९ व दिनांक १५.०१.२००९ अखेर मुदतवाढ देणेस तसेच शैक्षणिक संकुल परिसरात पेव्हींग ब्लॉक बसविणे याकामासाठी ठेकेदार मे.योगेश पाटील, कोपरगांव यांना १० जानेवारी २००९ अखेर मुदतवाढ देण्यास मान्यता देणेत आली. तसेच तक्ता "ब" मधिल खाललीप्रमाणे अंतिम बिले अदा करणेस व मुदतवाढीस मान्यता देणेत आली.

०१. साईनगर व धर्मशाळा परिसरातील इमारतींचे आतिल भागास रंगकाम करणे (ठेकेदार- रंगराज पेंटींग कॉन्ट्रॅक्टर्स, अहमदनगर) अंतिम बिल रक्कम रु.२४,७०,८२०/-

०२. नविन श्री साई प्रसादालय व श्रींचे समाधी मंदिर परिसर येथे पितळी अक्षरांचे फलक लावणे (ठेकेदार- गोल्डन आर्टस्, पुणे) अंतिम बिल रक्कम रु.५,४६,२६०/- व दि.३०/०९/२००८ अखेर मुदतवाढ.

०३. सर्व्हे नं.१२४/१अ मधिल मध्यवर्ती भांडार इमारतीचे परिसरात पेव्हींग ब्लॉक बसविणे (ठेकेदार- इंजी योगेश पाटील, कोपरगांव) अंतिम बिल रक्कम रु.२,२१,८६४/-

०४. शांतिनिकेतन इमारत दुरुस्ती करणे (ठेकेदार- श्री असोसिएटस्, नाशिक) अंतिम बिल रक्कम रु.१२,८२,५९७/-

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

०६. पाणी तपासणी अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.

निर्णय क्र. ०६ (G) माहे नोव्हेंबर,२००८ मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे.एनव्हायरो लॅब, नाशिक यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

विषय नं.०७ साईभक्तांचे सोयीसाठी दर्शन रांग व महाव्दार याठिकाणी कायमस्वरुपी मंडप (शेडस्) उभारणेकामी प्राप्त झालेलेले कोटेशन्स उघडून निर्णय घेणे.

निर्णय नं.०७ श्रीक्षेत्र शिर्डी येथे श्री साईंच्या दर्शनासाठी देश-विदेशातून हजारो साईभक्त दररोज येत असतात. संस्थान व्यवस्थापनामार्फत श्री रामनवमी, गुरुपौर्णिमा, श्री पुण्यतिथी या तीन उत्सवाबरोबरच इतर छोटे-मोठे

उत्सव साजरे केले जातात. या उत्सवाचे वेळेस तसेच उन्हाळी, दिपावली, नाताळ सुट्टीत श्री क्षेत्र शिर्डी येथे साईभक्तांची खूप मोठया प्रमाणावर गर्दी होते. सध्या नेहमी असणाऱ्या गर्दीचे प्रमाण पाहतां खाली नमूद केलेल्या ठिकाणी कायमस्वरुपी मंडपाची व्यवस्था करणे बाबत वर्तमान पत्रात व संस्थानचे अधिकृत संकेत स्थळावर जाहीरात प्रसिद्ध करुन प्रस्ताव मागविण्यात आले होते, याकामी खालील ०४ ठेकेदरांनी प्रस्ताव सादर केले होते.

अ.नं.	ठेकेदाराचे नांव
०१	मेकॅन्को इंन्टरप्राईजेस्, पुणें
०२	एम. एस. सेल्टर, नाशिक
०३	मनोज डी. जाधव, सटाणा
०४	मकॉय आर्किटेक्चरल सिस्टम प्रा. लि., नवी मुंबई

उपरोक्त ०४ ठेकेदारांचे विहीत मुदतीत प्राप्त झालेले प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०६.०९.२००८ रोजीचे सभेत उघडणेत येऊन संबधीतांनी दिलेल्या विवीध पर्यायापैकी उपयुक्त पर्याय निवडून त्याची सविस्तर निवीदा तयार करुन वरिल संबधीत ०४ निवीदा सादरकर्त्याकडून खर्चाविषयक फेर निवीदा मागविणेत याव्यात असे ठरले होते.

मा. अध्यक्ष सो, यांचे समवेत झालेल्या चर्चेनुसार, तुर्त खालील ठिकाणी कायमस्वरुपी मंडप (शेडस्) उभारणेबाबत ठरले आहे.

अ.नं.	**ठिकाणाचा तपशील**	**अंदाजे मोजमापे**		
		लांबी (फुट)	**रुंदी (फुट)**	**एकूण चौरस फुट**
०१	जुना पिंपळवाडी रस्ता फुटपाथवर दर्शन रांगेकरीता (नगर- मनमाड रस्ता ते तलाठी कार्यालय)	६८५ फुट ३७० फुट	२५ फुट २५ फुट	१७१२५ ९२५०
०२	महाव्दार नं. १ व ५ करीता	२५ फुट २५ फुट	२५ फुट २५ फुट	६२५ ६२५
०३	महाव्दार नं. ३	३६ फुट	२० फुट	४२०
०४	महाव्दार नं. ४	५० फुट	२७ फुट	१३५०
०५	नगर-मनमाड रस्ता पुर्व बाजू फुटपाथवर (गेट नं. ०१ ते धबधब्यापर्यंत)	४१० फुट	१० फुट	४१००
			एकूण	**३३,४९५.००**

उपरोक्त पाच ठिकाणी कायमस्वरुपी मंडप (शेडस्) उभारणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयास अनुसरुन व मा. अध्यक्ष सो, यांनी केलेले सूचने नुसार (शेडस्) स्ट्रक्चरल डीझाईन व सविस्तर प्लॅन एस्टीमेट साई कन्सल्ट्रन्ट, अहमदनगर यांनी रु. १,७५,८२,४४४/- मात्र खर्चाचे एस्टीमेट सादर केले आहे.

याकामी उपरोक्त ०४ ठेकेदारांकडून तसेच अशा प्रकारचे काम करणारे खालील ठेकेदारांकडून दि. २९.११.२००८ ते दि. ०४.१२.२००८ पर्यंत कोटेशन घेऊन सदरचे सिलबंद कोटेशन दि. ०६.१२.२००८ रोजी सादर करणे बाबत इकडील जा. नं. १७५९७/२००८ दि. २७ नोव्हेंबर, २००८ राजीचे पत्रान्वये कळविणेत आले होते. त्यानुसार खालील ठेकेदार यांनी विहीत मूदतीत कोरे कोटेशन फॉर्म घेतलेले आहेत.

अ.नं.	ठेकेदाराचे नांव
०१	मेकॅन्को इंन्टरप्राईजेस्, पुणें
०२	एम. एस. सेल्टर, नाशिक
०३	मनोज डी. जाधव, सटाणा
०४	मकॉय आर्किटेक्चरल सिस्टम प्रा. लि., नवि मुंबई
०५	मे. ॲल्युमेक्स ग्रुप ऑफ कं., नवि दिल्ली
०६	सिटाडेल आर्किटेक्चरल सोल्युशेन प्रा. लि., भांडूप, मुंबई
०७	मे. रेखा एन्टरप्राईजेस्, नाशिक

वरिल ठेकेदार यांनी विहीत मुदतीत कोटेशन घेतलेले असून त्यापैकी खालील ०६ ठेकेदार यांनी विहीत मुदतीत सिलबंद कोटेशन सादर केले आहे.

अ.नं.	ठेकेदाराचे नांव
०१	एम. एस. सेल्टर, नाशिक
०२	मनोज डी. जाधव, सटाणा
०३	मकॉय आर्किटेक्चरल सिस्टम प्रा. लि., नवि मुंबई
०४	मे. ॲल्युमेक्स ग्रुप ऑफ कं., नवि दिल्ली
०५	सिटाडेल आर्किटेक्चरल सोल्युशेन प्रा. लि., भांडूप, मुंबई
०६	मे. रेखा एन्टरप्राईजेस्, नाशिक

वरील प्रमाणे मंदिर परिसरात कायम स्वरुपी (शेडस्) मंडप उभारणेकामी प्राप्त झालेले सिलबंद कोटेशन आजचे सभेत उघडण्यात येऊन कोटेशन्ससादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

अ.नं.	ठेकेदाराचे नांव	कोटेशन्समधील दर रुपये	चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये
०१	एम. एस. सेल्टर, नाशिक	२,८५,१०,१६७.००	अपात्र
०२	मनोज डी. जाधव, सटाणा	१,७५,८७,३०९.००	अपात्र
०३	मकॉय आर्किटेक्चरल सिस्टम प्रा. लि., नवी मुंबई	१,९७,९२,३१९.००	अपात्र
०४	मे. ॲल्युमेक्स ग्रुप ऑफ कं., नवि दिल्ली	१,७९,१७,८१०.००	१,६५,००,०००.००
०५	सिटाडेल आर्किटेक्चरल सोल्युशेन प्रा. लि., भांडूप, मुंबई	१,२८,३६,९०८.००	१,२१,००,०००.००
०६	मे. रेखा एन्टरप्राईजेस्, नाशिक	२,७१,४९,५०५.००	२,४५,००,०००.००

यावर सविस्तर चर्चा होऊन, सिटाडेल आर्किटेक्चरल सोल्युशेन प्रा. लि., भांडूप, मुंबई यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

विषय नं.०८ द्वारावती भक्तनिवास इमारत उशा खरेदीकामी आलेले कोटेशन उघडून निर्णय घेणेबाबत.

निर्णय नं.०८ मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८.१०.२००८ चे सभेतील निर्णयानुसार द्वारावती इमारतीसाठी खरेदी करण्यात आलेल्या सिंगल बेडस् व गाद्यांसाठी आवश्यक असणाऱ्या फायबर पिलोज (उशा) खरेदीकामी Sleepwell, Godrej, Kurlon, Relaxwell व Centuary या उत्पादक कंपन्यांकडून थेट दरपत्रके मागविणेसाठी इकडील पत्र क्र.१८७८१/ २००८, दि.२२.१२.२००८ अन्वये खाली नमुद केलेल्या तपशीलानुसार (TECHNICAL SPECIFICATIONS) व विहीत अटी/ शर्तीनसुार दि.२७.१२.२००८ अखेर दरपत्रके सादर करणेस कळविण्यात आलेले होते.

Sr. No.	Description	Required quantity
01	Supply of Fibre Pillows having overall size 610 mm x 410 mm (+/- 5mm) With as per detailed specifications given in annexure ६A॰	948 nos.

Annexure -A-

Sr. no.	Perameters	Specifications
01	Pillow size overall	610 mm x 410 mm (+/- 5mm)
02	Fibre type	Siliconised
03	Fibre weight	Approx. 700 gms.
04	Fabric/ cloth	Pastel cloth (Plain/ Printed)
05	Fabric/ cloth tapestry	Approx. 90-100 GSM
06	Stitching	Plain

त्यानुसार विहीत मुदतीत खालील कंपन्यांकडून दरपत्रके प्राप्त झालेली आहेत.

Sr. no.	Name of Contractors
01	Sleepwell, Sethi & Sethi, Pune
02	Godrej & Boyce Mfg. Co. Ltd., Pune
03	Kurlon Limited, Pisoli, Pune

वरील प्रमाणे तसेच मुदतीनंतर दिनांक ३०.१२.२००८ रोजी प्राप्त झालेले Centuary Fabric Plates Pvt. Ltd., Pune यांचे दरपत्रक मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने उशा खरेदीकामी प्राप्त झालेले सिलबंद कोटेशन आजचे सभेत उघडण्यात येऊन कोटेशन्ससादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

अ.नं.	कोटेशनधारकाचे नांव	कोटेशन्समधील दर रुपये	चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये
०१	Kurlon Limited, Pisoli, Pune	१९७.००	१८२.००
०२	Godrej & Boyce Mfg. Co. Ltd., Pune	१६१.००	१५१.८७.००
०३	Sleepwell, Sethi & Sethi, Pune	१७६.२५	१७४.२५
०४	Centuary Fabric Plates Pvt. Ltd., Pune	१६०.००	१४४.००

आजचे सभेत उपरोक्त कोटेशनसादरकर्त्यांनी सादर केलेले उशांचे नमुने मा.सदस्यांनी प्रत्यक्ष पाहून Centuary Fabric Plates Pvt. Ltd., Pune यांचे निम्नतम दर व नमुना पसंत केल्याने त्यांचेकडून उशा खरेदी करण्यात याव्यात असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

विषय नं.०९ श्रीसाईबाबा रुग्णालयातील न्युरो आय.सी.यु.मध्ये सेंट्रल एअर कंडीशनींगचे कामासाठी प्राप्त झालेल्या Commercial Bid उघडून निर्णय होणेबाबत.

निर्णय नं.०९ श्री साईबाबा रुग्णालयातील न्यूरो आय. सी. सी. यु. मध्ये सेंट्रल एअर कडींशनींगचे कामासाठी फेर निविदा मागविण्यास तसेच याकामी डिझाईन इंजिनिअर श्री. डी. आर. रणदिवे, मुंबई यांची तज्ञ सल्लागार म्हणून नियुक्ती करणेकामीचा प्रस्ताव मा. उपसमिती सभा दि.१७/०८/२००८ रोजीचे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता.

त्यानुसार अंदाजे रु. २९,८२,०००/- इतक्या खर्चाचे कामासाठी फेर निविदा देणेकामी श्री. रणदिवे यांनी तांत्रिक व जनरल नियम व अटीचा निविदा फॉर्म तयार करुन दिलेला होता. त्यानुसार जनसंपर्क कार्यालयामार्फत महाराष्ट्र टाईम्स-मुंबई आवृत्ती या वतर्मान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.०३/११/२००८ ते दि.१५/११/२००८ अखेर निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या व निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि.१७/११/२००८ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच सदरचे जाहिरातीबाबत अवगत करणेसाठी एकुण १४ कंपन्यांना इकडील पत्र क्र. १६१६० दि. ०३/११/२००८ अन्वये कळविण्यात आले होते. त्यास अनसुरुन खालीलप्रमाणे ४ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या होत्या.

अ.नं.	ठेकेदाराचे नांव
०१	मे. विघ्नेश्वर एअरकंडीशनींग प्रा. लि., मुंबई
०२	मे. एअरटेक इंजिनीअर्स, औरंगाबाद
०३	मे. ॲपल एअरकॉन, मुंबई
०४	मे.ब्ल्यु स्टार लि., मुंबई (मे. स्पीडफ्रोस्ट सर्व्हीसेस, मुंबई)

उपरोक्तप्रमाणे प्राप्त ४ सिलबंद तांत्रिक निविदा दि. १२/१२/२००८ रोजीचे मा. उपसमिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून सदर निविदा तज्ञ सल्लागार श्री. डी.आर. रणदिवे यांना दाखविण्यात आलेल्या असून त्यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

Technical Scrutiny Report for Air-conditioning work of
Neuro ICU and Lobby Passage Area
Tender Documents along with attached papers from following Air-conditioning Vendors:

1) M/s. Apple Aircon, Andheri, Mumbai.
2) M/s. Airtecch Engineers, Aurangabad.
3) M/s. Speedfrost Services, Mumbai.
4) M/s. Vighneshwar Airconditioning Pvt. Ltd., Mumbai.

Our comments are as under:

- M/S. Apple Aircon (Carrier Aircon Ltd.):

The documents submitted by this vendor are inline with our requirement. The documents show that this Vendor have wide experience in the field of Air-conditioning. They have executed the work for Pharmaceutical, IT, Polymer industry etc. You shall consider their offer as one of the Vendor.

- M/S. Airtecch Engineers (Voltas Ltd.):

The documents submitted by them are as per our requirement. The certificates indicate that this vendor has carried out most of the work as a subcontractor.
However, they have completed Mahatma Gandhi Missionङs Hospital, Aurangabad.
You may call them for further discussion.

- M/S. Speedfrost Services (Blue Star Ltd.):

The enclosed documents are as per our requirement. This Vendor have experience in the Hospital line, hence, their offer shall be consider.

- M/S. Vighneshwar Airconditioning Pvt. Ltd.:

This Vendor have not submitted the certificates, documents, hence, it is we are unable to consider their offer for further discussion.

Recommendations:

On the basis of documents and certificates enclosed by the participant vendors. The preference to the vendor will be as follows:

- 1st Preference: M/S. Apple Aircon, this participant have executed nos. of Air- conditioning job for clean room in the private corporate sector

- 2nd Preference: M/S. Spcedfrost Services, this participant have executed nos. of job for Government Sector.
- 3rd Preference: M/S. Airtecch Engineers this participant have carried out majority of the Air-conditioning job as a subcontractor.

You shall invite these qualified participants for further techno commercial discussions and negotiations.

तज्ञ सल्लागार श्री.डी.आर.रणदिवे यांचे शिफारशीनुसार वरीलप्रमाणे तीन निविदाधारकांचे Commercial निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

अ.नं.	निविदासादरकर्त्याचे नांव	निविदेतील दर रुपये	चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये
01	M/S. Apple Aircon (Carrier Aircon Ltd., Andheri, Mumbai	30,09,285.00	27,40,000.00
02	M/S. Airtecch Engineers (Voltas Ltd.), Aurangabad	22,67,000.00	22,50,000.00
03	M/S. Speedfrost Services (Blue Star Ltd.), Mumbai	29,71,879.00	27,04,409.90

आजचे सभेत M/S. Speedfrost Services (Blue Star Ltd.), Mumbai यांनी चर्चा/ वाटाघाटी नंतर, त्यांनी निम्नतम दर देऊ केले होते परंतु त्यांनी आम्ही इतर ठिकाणी काम घेतलेले असल्यामुळे आम्ही निविदेच्या स्पर्धेतुन माघार घेत असलेबाबत पत्र देऊन लगेचच सभेस कळविले आहे. उर्वरित दोन निविदासादकर्त्यांपैकी सादर केलेल्या निविदांबाबत तज्ञ सल्लागार श्री.डी.आर.रणदिवे, यांनी M/S. Airtecch Engineers (Voltas Ltd.), Aurangabad have not done any job directly. So not to be considered असा सल्ला दिलेला असल्यामुळे त्यांची निविदा विचारात घेण्यात आलेली नाही. त्यानंतर M/S. Apple Aircon (Carrier Aircon Ltd., Andheri, Mumbai यांची निविदा स्विकारार्ह असल्याचे तज्ञ सल्लागार यांनी समक्ष सांगितल्याने त्यांचे दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

विषय नं.१० श्री साई प्रसादालयाकरीता हाऊस किपींग/स्वच्छतेचे काम आऊट सोर्सिंग पध्दतीने करणेकामी प्राप्त झालेल्या निविदा (Commercial Bid) उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.

निर्णय नं.१० सध्याचे प्रसादालयतील भोजन हॉलची बैठक व्यवस्था १००० आसनाची असून दररोज सरासरी २५,००० साईभक्त प्रसाद भोजनाचा लाभ घेतात. प्रसाद भोजन घेणा-या भक्तांचे संख्येचे तुलनेत सदर हॉल अत्यंत अपुरा पडू लागल्याने मा.व्यवस्थापन समितीने नविन भव्य/ दिव्य असे श्री साई प्रसादालय बांधलेले आहे.

नविन श्री साई प्रसादालयाची इमारत भव्य/ दिव्य असून प्रसाद भोजन तयार करणेकामी अत्याधुनिक, स्वयंचलीत मशिनरी, इक्वीपमेंट, फर्निचर, अलाईड सिस्टीम बसविणेत आलेल्या आहेत. अशा भव्य/ दिव्य प्रसादालयाची स्वच्छता उच्च दर्जाची, मशिनरीद्वारे व्हावी याकरीता हाउसकिर्पींग / स्वच्छतेचे काम आउट सोर्सिंग पध्दतीने करुन घेणेसाठी मा.व्यवस्थापन समिती दि.१८/१०/२००८ चे सभेत वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन जाहिर निवीदा मागविणेस मान्यता मिळालेली आहे.

मा.व्यवस्थापन समिती दि.१८/१०/२००८ चे सभेतील निर्णयानुसार प्रसादालयाकडील दि.०१/११/२००८ चे मंजूर टिपणी अन्वये जाहिर निवीदा मागविणेकामी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेत आली होती. त्यानुसार दि.१०/११/२००८ ते १७/११/२००८ या कालावधीत खालील प्रमाणे एजन्सींनी निवीदा खरेदी केलेल्या आहेत.

१) सेंट्रल इनव्हेस्टीगेशन ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हीसेस लि. मुंबई.
२) आय.एस.एस. फॅसिलीटी सर्व्हीसेस, नासिक.
३) बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे.
४) बॉम्बे इंटेलीजन्स सिक्युरिटी (इंडिया) लि. नासिक.
५) संतोष केअरवेल सर्व्हे प्रा.लि. नासिक.
६) सुमित फॅसिलिटीज प्रा.लि. पुणे.
७) क्रिस्टल ट्रेड कम्युनिकेशन प्रा.लि., सायन, मुंबई
८) एम.पी. एन्टरप्राईजेस, मुंबई.
९) अे.एल.एल. सर्व्हीसेस प्रा.लि. गोरेगाव, मुंबई
१०) प्रुमाटेक सर्व्हीसेस प्रा.लि. मुंबई.

निवीदाधारकांना निवीदा फॉर्ममध्ये काही अडचणी असल्यास व प्रत्यक्ष कामाची माहीती मिळावी म्हणून दि.२०/११/२००८ रोजी प्री बीड मिटींग घेण्यात आलेली असून निवीदाधारकांचे शंकेचे निरसन

केलेले आहे. दि.२४/१०/२००८ या विहीत मुदतीपर्यंत उपरोक्त १ ते १० एजन्सींपैकी खालील एजन्सींनी दरपत्रक सादर केलेली आहेत.

१) आय.एस.एस. फॅसिलीटी सर्व्हीसेस, नासिक.
२) बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे.
३) बॉम्बे इंटेलीजन्स सिक्युरिटी (इंडिया) लि. नासिक.
४) संतोष केअरवेल सर्व्हे प्रा.लि. नासिक.
५) सुमित फॅसिलिटीज प्रा.लि. पुणे.
६) एम.पी. एन्टरप्राईजेस, मुंबई.
७) अे.एल.एल. सर्व्हीसेस प्रा.लि. गोरेगाव, मुंबई
८) प्रुमाटेक सर्व्हीसेस प्रा.लि. मुंबई.

श्रीसाई प्रसादालयातील हाउसकिपींग / स्वच्छतेची कामे आउट सोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी प्राप्त झालेली ८ निवीदासादरकर्त्यांची टेक्नीकल बीड (पाकीटे) उघडणेत आलेली आहेत.

उपरोक्तपैकी पात्र निवादासादरकर्त्यांना आजचे सभेत चर्चा/वाटाघाटीसाठी समक्ष बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

अ.नं.	निविदासादरकर्त्याचे नाव	निविदेतील दर प्रतिमाह रुपये	वाटाघाटीअंती देऊ केलेले दर प्रतिमाह रुपये
०१	बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे.	८,८१,०८४.००	८,००,०००.००
०२	सुमित फॅसिलिटीज प्रा.लि. पुणे.	४,९२,२९२.००	४,९२,२९२.००
०३	एम.पी. एन्टरप्राईजेस, मुंबई.	९,५४,६८९.००	९,५४,६८९.००
०४	अे.एल.एल. सर्व्हीसेस प्रा.लि. गोरेगाव, मुंबई	८,७६,८७०.००	८,६५,८७०.००
०५	प्रुमाटेक सर्व्हीसेस प्रा.लि. मुंबई.	५,९२,६०५.००	५,८२,६०५.००
०६	आय.एस.एस. फॅसिलीटी सर्व्हीसेस, नासिक.	९,९४,६११.००	८,४५,०००.००

यावर सविस्तर चर्चा होऊन, किमान निम्नतम दराचा विचार न करता हाऊस किपींग/स्वच्छतेकामी पुरवठादारांकडून वापरणेत येणारी मशिनरी,मनुष्यबळ याची संख्या,कामाचा दर्जा, काम करण्याची पद्धती या सर्व बाबींचा विचार होऊन, बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे यांचे दर स्वीकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरलें. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

विषय नं.११ नवीन स्टाफ क्वार्टरकडे स्ट्रीट लाईट बसविणेकामी प्राप्त झालेली निविदा उघडून निविदाधारकांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.

निर्णय नं.११ नवीन स्टाफ क्वार्टरकडे स्ट्रीट लाईट टाकणेकामी येणा-या रक्कम रु.७,४२,६४४/- इतक्या खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७-०७-२००७ चे सभेतील विषय क्र.५२ निर्णय क्र.५६३ अन्वये मान्य करण्यात आला आहे. या कामासाठी येणा-या खर्चास व याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर मागवावेत असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. दिनांक १७-११-२००८ ते दिनांक २९-११-२००८ असा टेंडर विक्री कालावधी ठेवण्यात आला होता. टेंडर सादर करण्याची मुदत दिनांक ०१-१२-२००८ अखेर अशी ठेवण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त झालेल्या टेंडरसचा तपशील खालीलप्रमाणे:-

अ.न.	ठेकेदाराचे नांव
०१	मे.विजय इलेक्ट्रीकल्स अॅण्ड कॉन्ट्रॅक्टर, शिर्डी
०२	मे.श्री साई एन्टरप्राईजेस, शिर्डी.
०३	मे.श्री साई श्रद्धा इलेक्ट्रीकल्स, नाशिक.
०४	मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक.
०५	मे.सुवर्णा एन्टरप्राईजेस, पुणे.
०६	मे.भागवत इलेक्ट्रीकल्स् स्टोअर्स, राहुरी.
०७	मे.गुरु इंजिनिअरींग अॅण्ड कॉन्ट्रॅक्टर, नाशिक
०८	मे.एम.डी.एस.कंपनी, नाशिक

उपरोक्तप्रमाणे नवीन स्टाफ क्वार्टरकडे स्ट्रीट लाईट टाकणेकामी प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन,निविदासादरकर्त्यांना चर्चा/वाटाघाटीसाठी समक्ष बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

अ.न.	ठेकेदाराचे नांव	निविदेतील दर रुपये	वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये
०१	मे.विजय इलेक्ट्रीकल्स अॅण्ड कॉन्ट्रॅक्टर, शिर्डी	६,५६,७६१.०	६,००,०००.००
०२	मे.श्री साई एन्टरप्राईजेस, शिर्डी.	६,७०,८३९.००	६,६०,०००.००

०३	मे.श्री साई श्रद्धा इलेक्ट्रीकल्स, नाशिक.	८,१३,९६०.००	७,३२.५६३.००
०४	मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक.	६,९५,०८१.००	६,३९,४७५.००
०५	मे.सुवर्णा एन्टरप्राईजेस, पुणे.	६,१५,०७०.००	६,१५,०७०.००
०६	मे.भागवत इलेक्ट्रीकल्स् स्टोअर्स, राहुरी.	६,८६,६८६.००	६,२१,०००.००
०७	मे.गुरु इंजिनिअरींग ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर, नाशिक	८,१०,३४२.००	७,६१,७२१.००
०८	मे.एम.डी.एस.कंपनी, नाशिक	५,५७,८५०.००	५,५२,८७१.००

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.एम.डी.एस.कंपनी, नाशिक यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें. (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

विषय नं.१२ व्दारावती या नवीन इमारतीचे चौथ्या मजल्यावरील ८० व्ही.आय.पी.रुममध्ये ए.सी. बसविणेकामी प्राप्त झालेली निविदा उघडून टेंडरधारकांशी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे

निर्णय नं.१२ व्दारावती या नविन इमारतीचे चौथ्या मजल्यावरील ८० व्ही.आय.पी.रुममध्ये ए.सी. बसविणेकामी व येणा-या रक्कम रुपये २७,५४,७००.०० इतक्या खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६-०९-२००८ चे सभेतील विषय क्र.४५ निर्णय क्र. ६७७ अन्वये मान्य करण्यात आला आहे. या कामासाठी येणा-या खर्चास व याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर मागवावेत असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. दिनांक १०-११-२००८ ते दिनांक २२-११-२००८ असा टेंडर विक्री कालावधी ठेवण्यात आला होता. टेंडर सादर करण्याची मुदत दिनांक २४-११-२००७ अखेर अशी ठेवण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त झालेल्या टेंडरसचा तपशील खालीलप्रमाणे :-

अ.क्र.	निविदाधारकाचे नांव
१	मे.सिद्धीविनायक एन्टप्राईजेस, पुणे.
२	मे.स्पीड फ्रॉस्ट सर्व्हिसेस, मुंबई.
३	मे.व्होल्टास लिमिटेड, पुणे.
४	मे.ओम एन्टरप्राईजेस, सातारा
५	मे.सिमरन इलेक्ट्रॉनिक्स, नाशिक
६	मे. सुवर्णा एन्टरप्राईजेस, पुणे.
७	मे. केल्व्हीन एअर कंडीशनिंग ॲण्ड व्हेन्टीलेशन सिस्टिम प्रा.लि., मुंबई
८	मे. फेडरस लॉईड कार्पोरेशन, लि.,पुणे

उपरोक्तप्रमाणे व्दारावती या नविन इमारतीचे चौथ्या मजल्यावरील ८० व्ही.आय.पी.रुममध्ये ए.सी. बसविणेकामी प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना चर्चा/वाटाघाटीसाठी समक्ष बोलाविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत.

अ. क्र.	निविदाधारकाचे नांव	निविदेतील दर रुपये	वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये	
१	मे.सिद्धीविनायक एन्टप्राईजेस, पुणे.	रु.२१,३२,३७०.००	रु.१९,५७,३७०.००	टेंडरनुसार व्होल्टास कंपनीचा ए.सी. पुरविणार आहेत.
२	मे.स्पीड फ्रॉस्ट सर्व्हिसेस, मुंबई.	रु.१९,८०,०००.००	रु.१८,९०,०००.००	टेंडरनुसार व्होल्टास कंपनीचा ए.सी. पुरविणार आहेत.
३	मे.व्होल्टास लिमिटेड, पुणे.	रु.१९,९८,०००.००	रु.१९,३८,०६०.००	टेंडरनुसार व्होल्टास कंपनीचा ए.सी. पुरविणार आहेत.
४	मे.ओम एन्टरप्राईजेस, सातारा	रु.१६,७६,०००.००	रु.१६,७६,०००.००	व्होल्टास ऐवजी हायर कंपनीचा ए.सी. पुरविणार आहेत.
५	मे.सिमरन इलेक्ट्रॉनिक्स, नाशिक	रु.१५,३६,०००.००	रु.१५,३६,०००.००	व्होल्टास ऐवजी सॅमसन कंपनीचा ए.सी. पुरविणार आहेत.
६	मे. सुवर्णा एन्टरप्राईजेस, पुणे.	रु.१९,६०,०००.००	रु.१९,६०,०००.००	व्होल्टास ऐवजी गोदरेज कंपनीचा ए.सी. पुरविणार आहेत.
७	मे. केल्व्हीन एअर कंडीशनिंग ॲण्ड व्हेन्टीलेशन सिस्टिम प्रा.लि., मुंबई	रु.२२,९४,५६०.००	रु.२२,९४,५६०.००	अनुपस्थित
८	मे. फेडरस लॉईड कार्पोरेशन, लि.,पुणे	रु.१२,७१,९७०.००	रु.१२,७१,९७०.००	टेंडरसोवत अर्नेस्ट मनी डिपॉझीट रक्कम भरलेली नसल्याने अपात्र

यावर सविस्तर चर्चा होऊन, लोएस्ट क्र. १ असलेले मे.सिमरन इलेक्ट्रॉनिक्स, नाशिक हे व्होल्टास कंपनीचा ए.सी. पुरविणार नसून त्याऐवजी सॅमसन कंपनीचा ए.सी. पुरविणार आहेत. तसेच लोएस्ट क्र. २ असलेले मे.ओम एन्टरप्राईजेस, सातारा हे व्होल्टास कंपनीचा ए.सी. पुरविणार नसून त्याऐवजी हायर कंपनीचा ए.सी. पुरविणार आहेत. संस्थानने फक्त व्होल्टास कंपनीच्या ए.सी. करीता टेंडर बोलाविलेले असल्याने मे.ओम एन्टरप्राईजेस, सातारा व मे.सिमरन इलेक्ट्रॉनिक्स, नाशिक यांचे दर ग्राह्य धरता येणार नाहीत. त्यामुळे त्यांना कार्यादेश न देता लोएस्ट क्र. ३ असलेले व व्होल्टास कंपनीचे ए.सी.पुरविण्यास तयार असलेले मे.स्पीड फ्रॉस्ट सर्व्हिसेस, मुंबई. यांनी निगॉशिएशनमध्ये नमूद केलेले दर रु.१८,९०,०००.०० ग्राह्य धरण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

विषय न.१३ कनकुरी साठवण तलाव येथे लाईटची व्यवस्था करणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून निर्णय घेणेबाबत

निर्णय नं.१३ कनकुरी रोड ते साठवण तलाव भराव्यावरील लाईट ब-याच दिवसांपासून बंद स्थितीत आहे. वांरंवार विद्युत विभागाकडे रोडवरील लाईटचे मेन्टेनंस करून मिळणेबाबत कळविले आहे. परंतू विद्युत विभागाकडे मटेरियल नसल्याने सदरचे काम झालेले नाही. तसेच सध्या तेथील लाईट हे नारळाच्या झाडामध्ये येतात त्यामुळे त्याखाली व परिसरात अंधारच असतो. साठवण तलावावर रात्रीचे वेळी मोटारी चालू बंद करणेसाठी तसेच संरक्षण विभागाचे कर्मचारी यांना संरक्षणाच्या दृष्टीने राऊंड घ्यावे लागत असल्यानें भराव्यावर फिरावे लागते. भराव्यावर असलेल्या अंधारामुळे तेथे रात्रीचे वेळी कर्मचा-यांना सर्प दंशाची भिती आहे. त्याचबरोबर रात्रीचे वेळी तेथे चोरीचे प्रकार होण्याची शक्यता आहे. त्यासाठी साधारण: १५ फुट उंचीचे पोल तयार करून त्यावर कमी वीजखर्च होणारे CFL चे स्ट्रीट लाईट बसवून व्यवस्था करता येईल.

याकरीता पाणी पुरवठा विभागाकडे अलंग (गुजरात) देणगी स्वरुपात मिळालेले पाईप रोडलाईट करीता वापरता येतील. उर्वरीत मटेरियल खरेदी करावे लागेल. सदर स्ट्रीट लाईटची व्यवस्था ९००० फुट अंतरावर करावी लागणार आहे. याकरीता ९४ फुटावर एक पोल याप्रमाणे ९००० फुट अंतरावर एकुण ९५ पोल टाकावे लागतील.

उपरोक्त कामी एकूण ०७ मटेरीयल धारक यांना कोटेशन पत्र पाठविले असुन त्यातील एकूण ०४ कोटेशन प्राप्त झालेले आहे. त्यांचा तपशिल खालील प्रमाणे-

अ.नं	तपशिल
०१	नितिन इंडस्ट्रीयल ट्रेडर्स, अहमदनगर
०२	मल्टीटेक कार्पोरेशन, अहमदनगर
०३	अदित्य इलेक्ट्रीकल्स् अहमदनगर
०४	इंटरनॅशल इलेक्ट्रीकल्स् अहमदनगर

उपरोक्त स्ट्रीट लाईट मटेरीयलचे प्राप्त झालेले कोटेशन आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन, त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला तो खालीलप्रमाणे

अ.नं.	तपशील	नितिन इंडस्ट्रीयल ट्रेडर्स, अहमदनगर	मल्टीटेक कार्पोरेशन, अहमदनगर	अदित्य इलेक्ट्रीकल्स् अहमदनगर	इंटरनॅशल इलेक्ट्रीकल्स् अहमदनगर
01	C.F.L स्ट्रीट लाईट फिटींग ट्यूबसह - Outdor fittings,M.S.deep draw street light Big Body up to 36W. For CFL Tube 1x36 W C F L, कंपनी- प्रेस लाईट (Press Lite) मागणी 95 नग	515.00	525.00	438.75	475.00
	एकूण किंमत रुपये	**48,925.00**	**49,875.00**	**41,681.25**	**45,125.00**
02	2.5Sq.mm 4 core फेक्झीबल कॉपर केबल, पॉलकॅब कंपनी मागणी 3000 मीटर	57.00	65.00	59.80	54.00
	एकूण किंमत रुपये	**1,71,000.00**	**1,95,000.00**	**1,79,400.00**	**1,62,000.00**
03	1.0 Sq.mm pvc वायर पॉलीकॅब कंपनी, मागणी -08 बंडल	475.00	475.00	442.00	410.00
	एकूण किंमत रुपये	**3,800.00**	**3,800.00**	**3,536.00**	**3,280.00**
04	पी.व्ही.सी.बॉबीन 1' मागणी -4000 नग	1.25	1.50	1.04	1.00
	एकूण किंमत रुपये	**5,000.00**	**6,000.00**	**4,160.00**	**4,000.00**
05	पोर्सलिन कनेक्टर मागणी -95 नग	55.00	50.00	7.87	40.00
	एकूण किंमत रुपये	**5,225.00**	**4750.00**	**747.65**	**3,800.00**
06	जी.आय.तार 14 नंबर मागणी -60 किलो	78.00	75.00	62.40	67.00
	एकूण किंमत रुपये	**4,680.00**	**4,500.00**	**3,744.00**	**4,020.00**
07	जी.आय.तार 18 नंबर मागणी - 15 किलो	86.00	85.00	62.40	79.00
	एकूण किंमत रुपये	**1,290.00**	**1,275.00**	**936.00**	**1,185.00**
08	जी.आय.पाईप 1.1/2'बी क्लास,झेनीथ/प्रकाश सुर्या	87.00	85.00	78.00	78.00

	कंपनी मागणी -400 फुट				
	एकूण किंमत रुपये	**34,800.00**	**34,000.00**	**31,200.00**	**31,200.00**
09	ELCB 32 Amp- 4 Pole बॉक्ससह मागणी - 04 नग	1,550.00	1,600.00	1,912.50	1,495.00
	एकूण किंमत रुपये	**6,200.00**	**6,400.00**	**7,650.00**	**5,980.00**
	एकूण एकत्रित किंमत रुपये	**2,80,920.00**	**3,05,600.00**	**2,73,054.90**	**2,60,590.00**

यावर सविस्तर चर्चा होऊन,मे. इंटरनॅशल इलेक्ट्रीकल्स् अहमदनगर यांचे एकत्रित निम्नतम दर स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें.

(कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग प्रमुख)

विषय नं.१४ फिल्टरप्लॅन्ट उभारणीकामी आलेल्या निविदासादरकर्त्यांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणेबाबत.

निर्णय नं.१४ संस्थानचे भविष्यातील वाढत्या पाण्याची गरज लक्षात घेता साठवण तलाव ते ओहर हेड टँक व ओहर हेड टँक ते जुने प्रसादालय परिसर तसेच धर्मशाळा (२०० रुम) व प्रसादालय ते नविन भक्तनिवास (५००रुम) तसेच नविन प्रकल्पासाठी वितरीका टाकणे, नविन जल शुध्दीकरण केंद्राची निर्मिती करणे व ओहर हेड टँक उभारणे इ.काम करणे गरजेचे आहे. याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कोपरगांव यांनी सर्व्हे केलेला आहे. सदर अंदाजपत्रकास मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६-०३-२००८ चे सभेतील निर्णय क्रं.२५२ नुसार एकुण ७,४८,६५,५४०/- मात्रचे खर्चास व सदर प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात आली.

तथापी याबाबत संस्थानमार्फत कंन्सलटंटची नियुक्ती करुन सदरहू काम करणेबाबत यथावकाश पुढील निर्णय घेणेत यावा असे ठरले आहे. त्यानुसार दि. २७-०९-२००८ रोजीचे टिपणीन्वये सोबतचे १२ कंन्सलटंट यांना इकडील जा.क्रं./एसएसएस/वशी/पा.पु./१४३३८/२००८, दि. ३०-०९-२००८ अन्वये पत्र पाठवून त्यांचेकडून सविस्तर प्रस्ताव बोलविण्यात आलेले होते व प्रस्ताव सादर करणेसाठी कन्सलटंट यांना दि.१६-१०-२००८ रोजी पर्यंत मुदत देण्यात आलेली होती. परंतू उपरोक्त कालावधीत प्रस्ताव सादर न झ ाल्यामुळे दि. १६-१०-२००८ रोजीचे टिपणीन्वये १२ कंन्सलटंट यांना इकडील जा.क्रं./ एसएसएस/ वशी/पा.पु./१५४४१/२००८, दि.१७-१०-२००८ अन्वये पुन्हा पत्र पाठवून सदरचे प्रस्ताव सादर करणेसाठी दि. २३-१०-२००८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती.

त्यानुसार विहीत मुदतीत खालील प्रमाणे प्रस्ताव बंद पाकीटामध्ये प्राप्त झालेले होते.

अ.नं.	तपशिल
०१.	किर्लोस्कर कन्सल्टंटन्स् लिमिटिड पुणे
०२.	युनिटी कन्सल्टंटन्स् प्रा.लि.पुणे
०३.	सिंडिकेट सर्व्हीसेस, नाशिक
०४.	में. पी.पी. गोगड, नाशिक
०५.	डॉर्सच् कंन्सल्ट (इंडिया) प्रा.लि.मुंबई.

वरीलप्रमाणे प्राप्त झालेले प्रस्ताव दि. १५-११-२००८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत उघडण्यात आलेले आहेत. अर्जदार कन्सल्टंटस् पैकी किर्लोस्कर कन्सल्टंटस् लि. पुणे व युनिटी कन्सल्टंटस् प्रा.लि. पुणे यांना मोठया नागरी स्वरुपाच्या पाणी पुरवठा योजना कामांचा पुरेसा अनुभव दिसून येतो. त्यामुळे सदरहु दोनही कन्सल्टंटस् यांचेशी आजचे सभेत चर्चा केली असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

अ.नं.	तपशिल	निविदेतील दर रुपये	चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये
०१.	किर्लोस्कर कन्सल्टंटन्स् लिमिटिड पुणे	5% + Service Tax extra a applicable. (12.36%)	3% of project cost inclusive of service tax
०२.	युनिटी कन्सल्टंटन्स् प्रा.लि.पुणे	Rs.43,43,000 inclusive of all taxes. 5.80%	5.18% inclusive service tax
०३.	सिंडिकेट सर्व्हीसेस, नाशिक	Rs.22,53,000.00+ Service Tax exta as applicable S.Tax 12.24%(22,53,000.00+2,75,767.00=25,28,767.00) (3.378%)	अपात्र
०४.	में. पी.पी. गोगड, नाशिक	2.15% + Service Tax extra as applicable.	अपात्र
०५.	डॉर्सच् कंन्सल्ट (इंडिया) प्रा.लि.मुंबई.	Rs 8,00,000.00 for Desigh Review of desigh and drawing Rs 3,00,000.00 for Tendering payable on selection of contractor. 2.50% of total project cost for project supervision, payable on monthly basis	अपात्र

		8,00,000.00+3,00,000.00=11,0 0,000.00 (2.50% of Project + 17,50,000.007 crore) 28,50,000.00 4.07%+survey & investigation charge	

यावर सविस्तर चर्चा होऊन,मे. किर्लोस्कर कन्सल्टंटन्स् लिमिटिड पुणे यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें.

(कार्यवाही-बांधकाम प्रमुख/पाणी पुरवठा विभाग प्रमुख)

विषय नं.१५ मौजे नांदुर्खी बु।। यैथील संस्थानला विनामूल्य मिळणाऱ्या जमीनीस तारकंपाऊंड करणेकामी प्राप्त होणाऱ्या निविदा उघडणेबाबत.

निर्णय नं.१५ (अ)मौजे नांदुर्खी बु ाा ता. राहाता येथील ग्रामपंचायत व ग्रामस्थ, संस्थानला विकास कामांसाठी मौजे नांदुर्खी बुद्रूक येथील जमीन विनामुल्य देण्यास तयार आहेत. त्यानुसार मा. व्यवस्थापन समितीच्या दि. ११ ऑगस्ट २००७ रोजीच्या सभेत सदरची जमिन संस्थानला देणगी दाखल घेणेस व त्याजागेवर तार कंपाऊंड करणेस मान्यता मिळाली आहे.

मौजे नांदुर्खी बु येथील गट नं. ३३१ व ४४६ या लागून असणाऱ्या दोन गटांपैकी ७/१२ प्रमाणे एकूण १७ हेक्टर ८७ आर जमिन आहे. इकडील विभागाचे कंत्राटी सर्व्हेअर यांचे मोजणी नुसार एकूण १६ हेक्टर २२ आर जागा भरली आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ.नं.	गट नंबर	७/१२ प्रमाणे क्षेत्र हेक्टर-आर-चौमी	प्रत्यक्ष वहिवाटीप्रमाणे व मोजणीनुसार भरणारे क्षेत्र हेक्टर-आर-चौमी	कमी असणारे क्षेत्र हेक्टर-आर-क्षेत्र
०१	३३१	१३-७६-०० ००-६०-०० पोख १४-३६-००	१३-२८-००	०१-०८-००
०२	४४६	०२-७२-०० ००-७९-०० पोख ०३-५१-००	०२-९४-००	००-५७-००
	एकूण	१७-८७-००	१६-२२-००	०१-६५-००

०१. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता, गट नंबर ३३१ चे क्षेत्र १३ हेक्टर २८ आर ०० चौमी अधिक गट नंबर ४४६ क्षेत्र ०२ हेक्टर ९४ आर ०० चौमी अधिक रस्त्याखालील क्षेत्र ०० हेक्टर ६८ आर ०० चौमी असे एकूण क्षेत्र १६ हेक्टर ९० आर ०० चौमी भरत आहेत.

०२. गट नंबर ३३१ व गट नंबर ४४६ मधील जागेस तारेचे कंपाऊंड करणेकामी अंदाजे एकूण १८३९ मीटर एवढे अंतर येत आहे.

ब) मा. व्यवस्थापन समितीचे दि. १८/१०/२००८ रोजीचे सभेत निर्णय क्र. ७४८ अन्वये सदरच्या जागेत नियोजीत रुग्णालयाचे काम करणे प्रस्तावीत आहे. तरी सदरजमिनीवर तीन फुट उंचीचे बांधकाम व त्यावर चेनलिंक केसिंग या स्वरुपाचे कंपाउंडचे बांधकाम करणेस मान्यता मिळाली आहे. मौजे नांदुर्खी येथील सदरचे जमिनीचा ताबा घेणेबाबत कार्यवाही चालू आहे. तिनफुट उंचीचे बांधकाम व चेनलींक केसींगचे कंपाउंड करणेसाठी अंदाजे रक्कम रुपये ४५४८,५००.०० मात्रचा खर्च अपेक्षीत आहे.

सदरच्या जमिनीची सरकारी मोजणी होणे बाकी असल्याने सद्या सदरचे जमिनीवर वहीवाटीनुसार कोटेरी तारेचे कुंपन करता येईल. यासाठी रक्कम रुपये ६,६२,९५०.०० मात्रचा खर्च अपेक्षीत आहे.

तरी सदर जमिनीवर तारकुंपन करणेबाबत मा.अध्यक्ष श्री ससाणे सो., व मा. विश्वस्त श्री राधाकृष्ण विखे पाटील, यांनी अशी सूचना दिली आहे. कि, जमीन संस्थानचे नावे होणेची कार्यवाही चालू आहे, तरी दरम्यानचे काळात सदरचे जमिनीला तार कुंपण करावे. याकरीता वर्तमान पत्रात जाहिरात देवून निविदा मागविणेबाबत निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा विक्रीची दिनांक २४/१२/२००८ ते ३१/१२/२००८ असे ठेवण्यात आले असून निविदा सादर करण्याची मूदत दिनांक ०२/०१/२००९ अशी ठेवण्यात आली होती.

विहीत मूदतीत खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या आहेत.

अ.नं.	निविदासादरकर्त्याचे नांव
०१.	श्रेणिक प्रफूल बोरा,कोपरगांव

०२.	मे.के.आर.भुतडा,कोपरगांव
०३.	मिर्लींद एस पाचोरकर,काकासाहेब नगर,निफाड जि.अहमदनगर
०४.	चेअरमन,अमर मजूर बांधकाम सह.सो.पांगरी

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

अ.नं.	निविदासादरकर्त्याचे नांव	निविदेतील दर	चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर
०१.	श्रेणिक प्रफूल बोरा,कोपरगांव	६.५ टक्के कमी	निविदेत देऊ केलेल्या दरात काम करण्याची तयारी नसल्याचे सांगितले
०२.	मे.के.आर.भुतडा,कोपरगांव	३४ टक्के अधिक	अनुपस्थित
०३.	मिर्लींद एस पाचोरकर,काकासाहेब नगर,निफाड जि.अहमदनगर	१ टक्के कमी	अनुपस्थित
०४.	चेअरमन,अमर मजूर बांधकाम सह.सो.पांगरी	२० टक्के अधिक	१५ टक्के अधिक

वरीलपैकी निम्नतम निविदा सादरकर्ते श्री श्रेणिक प्रफूल्ल बोरा, कोपरगांव यांनी सभेपूढे त्यांनी निविदेत देऊ केलेले ६.५% कमी हे दर त्यांनी नजरचुकीने नमूद केले असून सदरहू दरात त्यांना काम करणे शक्य नाही असे सांगितले. सदर कामाचे स्पेसिफिकेशन्बाबत त्यांनी पूर्ण माहिती करुन न घेतल्याने त्यांचे कॅलक्यूलेशनमध्ये तफावत झालेली असून सदरहू काम ते निविदादरात करण्यास तयार असल्याचे सांगितले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री श्रेणिक प्रफूल्ल बोरा यांची निविदा रद्द करुन श्री मिर्लींद एस पाचोरकर यांची व्दितीय निम्नतम दराची निविदा स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

विषय नं.१६ श्रीसाईबाबा रुग्णालयाचे डेंटल विभागासाठी डेंटल चेअर खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडून मिळणेबाबत.

निर्णय नं.१६ श्रीसाईनाथ रुग्णालयातील डेंटल विभागातील सध्या असलेली डेंटल चेअर नादुरुस्त असल्यामुळे श्री साईनाथ रुग्णालयातील डेंटल विभागाने त्यांचे डि. पी. क्र. ५८७९ दि. १०/०७/२००८ अन्वये डेंटल चेअरची मागणी केलेली होती. त्यानुसार दि. २०/०९/२००८ रोजीचे मा. उपसमिती सभेत उपरोक्तप्रमाणे २ नग डेंटल चेअर विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या रु. ४,४०,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे. सदरचे मंजुरीन्वये इकडील पत्र क्र. १४८०१ दि. ०७/१०/२००८ अन्वये एकुण ५ पुरवठा धारकांकडून दि. २५/१०/२००८ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन एकच कोटेशन प्राप्त झालेले होते. ते खालीलप्रमाणे -

०१) M/s. Suz-Dent (India) Pvt. Ltd., Ahmedabad (प्रशासन शाखेकडून टपालामार्फत उघडून मिळाले आहे)

सदरचे खरेदीकामी एकच कोटेशन प्राप्त झाल्यामुळे पुन्हा इकडील पत्र क्र. १६४६१ दि. ११/११/२००८ अन्वये पुरवठा धारकांना स्मरणपत्र पाठवून कोटेशन पाठविण्याबाबत तगादा करण्यात आला होता, त्यास अनुसरुन दोन कोटेशन प्राप्त झालेले आहेत, ते खालीलप्रमाणे -

०१) M/s. Vasant Distributors, Nashik (बंद पाकीट)

०२) M/s. Confident Dental Equipment, Mumbai (बंद पाकीट)

वरीलपैकी M/s. Suz-Dent (India) Pvt. Ltd., Ahmedabad यांचे कोटेशन प्रशासन शाखेकडून टपालामार्फत उघडून मिळाले आहे, तर उर्वरीत खालीलप्रमाणे दोन बंद कोटेशन्स आजचे सभेत उघडण्यात आले.

०१) M/s. Vasant Distributors, Nashik (बंद पाकीट)

०२) M/s. Confident Dental Equipment, Mumbai

उपरोक्त कोटेशन्सचा तुलनात्मक तक्ता तयार करुन याकामी वापरणाऱ्या डॉक्टरांचा सल्ला घेऊन त्यांचे शिफारशीनुसार सदरहू पुरवठाधारकांना चर्चा/ वाटाघाटीसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेत बोलवून निर्णय घेण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

विषय नं.१७ आयकर कायदा १९६१ अंतर्गत कलम ३५एसी च्या सल्लागाराचे मानधनाबाबत

निर्णय नं.१७ आयकर कायदा १९६१ कलम ३५ A/C अंतर्गत मिळणाऱ्या देणगी पकल्पाची मुदत दि.३१.०३.२००८ रोजी संपत असल्याने सदर प्रकल्पाचा कालावधी पुढील तीन वर्षासाठी वाढविणे आवश्यक होते. हा कालवधी वाढविण्यासाठी अभय शास्त्री ॲण्ड असोशिएटस्, पुणे यांनी केंद्र सरकारकडे मुदतवाढीचा प्रस्ताव सादर करुन त्यास केंद्र सरकारची अधिसुचना क्र. S.O. १४७३ (E) दि. १७ जुन, २००८ प्रमाणे पुढील तीन वर्षासाठी सन २००८-२००९ पासून पुढे मुदतवाढ घेण्यात आली आहे.

प्रकल्प मुदतवाढ घेणे या संबंधीत दिल्ली येथील वेळोवेळी कामकाज पाहणे, प्रत्येक वर्षाअखेरचे हिशोब पत्रके विहित नमुन्यात केंद्र सरकारला सादर करणे इ. कामकाजाबाबतचे अभय शास्त्री ॲण्ड असोशिएट, पुणे यांनी त्यांच्या दि.२२.१०.२००८ च्या बिलाप्रमाणे रु.२,५०,०००/- एवढया रकमेची मागणी केली होती.

मा.व्यवस्थापन समितीतील निर्णय क्र. ८४१ दि.१५.११.२००८ प्रमाणे सदर प्रकल्पाच्या नुतनीकरणासाठी व संबंधित कामकाज पाहण्यासाठी अभय शास्त्री ॲण्ड असोसीएट, पुणे यांचेशी मा.कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचेशी चर्चा करुन मानधन कमी करणेबाबत विनंती करावी, असे ठरले होते. त्याुनसार दि.२८.११.२००८ रोजी मा.कार्यकारी अधिकारी व श्री.अभय शास्त्री यांच्यात झालेल्या चर्चेनुसार याबाबतचे मानधन रु.२,००,०००/- मान्य करण्यात यावे असे ठरले, त्याप्रमाणे श्री.अभय शास्त्री यांनी दि.२८.११.२००८ रोजीच्या पत्रानुसार मानधन अभय शास्त्री ॲण्ड असोसीएट, पुणे या नावाने दण्याचे करावे, अशी विनंती केली आहे.

उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे अभय शास्त्री ॲण्ड असोसीएट, पुणे यांना सदर कामकाजाबाबत रु.२,००,०००/- मानधन देण्यात यावे, त्यांनी सदर प्रकल्पासंबंधी पुढीलप्रमाणे काम पहावे.

०१. आयकर कायदा १९६१ कलम ३५ A/C च्या अंर्तगत संस्थानला मिळणाऱ्या देणगीचा विशिष्ठ नमुन्यामध्ये सर्व वार्षिक विवरणपत्रके केंद्र सरकारला वेळेत सादर करावीत.

०२. प्रकल्पा अंतर्गत जमा झालेल्या देणगीमधून पात्र असलेल्या खर्चाची बले तपाणी करुन अदा करणेसाठी पाठवावीत व आवश्यक अभिलेखे जतन करण्यासाठी मार्गदर्शन करावे.

०३. प्रकल्पा संबंधीत इतर सल्ले व अनुषंगित कामकाजाची संपुर्ण जबाबदारी अभय शास्त्री ॲण्ड असोसीएट, पुणे यांचेवर सोपविण्यात यावी.

०४. प्रकल्पा संदर्भातील जमा-खर्चाचे स्वतंत्र वार्षिक हिशोबपत्रके तयार करुन ती प्रमाणित करुन केंद्र सरकार व संस्थानला सादर करण्यात यावीत.

उपरोक्त विवेचनाप्रमाणे 'अभय शास्त्री ॲण्ड असोसीएट, पुणे' यांना ३५AC अंतर्गत देणगी प्रकल्पाची मुदतवाढ व इतर संबंधीत कामकाजासाठी त्यांनी मागणी केलेल्या मानधन रुपये २,००,०००/- आदा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

विषय नं.१८ शिर्डी येथील नवीन जिल्हा परिषद शाळा इमारतीमधील अपूरी राहीलेली कामे पूर्ण करणे बाबत.

निर्णय नं.१८ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेतर्फे शिर्डी येथिल सर्व्हे क्र. ०६ (आरक्षण क्र. ०८) मधिल क्षेत्रावर जि.प. प्राथमिक शाळा, शिर्डी , ता. राहाता या शाळेसाठी नविन इमारतीचे बांधकाम करण्यात आले आहे. या नविन इमारतीमध्ये दि. २८/०८/२००६ पासून शाळेचे कामकाज चालू आहे. सदरहू नविन शाळा इमारत जि.प. अहमदनगर यांचेकडे हस्तांतरीत करणेकामी आवश्यक कागदपत्रांच्या प्रती दि. २९/०९/२००८ चे पत्राव्दारे जि.प. कार्यालयाकडे पाठविण्यात आल्या आहेत. तसेच जि.प. यांचे मागणीनुसार दि. ०६/११/२००८ चे पत्राव्दारे संगणक संच पुरविणे, कम्पाऊंड भिंत बांधकामृ ॲकॉस्टीकल ट्रीटमेंटची कामे पूर्ण करणेबाबतचे हमीपत्र देणेत आले आहे.

अ) उपरोक्त नवीन शाळा इमारतीसाठी २०,०००.०० लिटर क्षमतेच्या भूमिगत पाण्याच्या टाकीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. सदर भूमिगत टाकीवर इलेक्ट्रीक पाणपुडी मोटार व पंप बसविणे, ओव्हरहेड टाक्यांपर्यंत पाईपलाईन करणे ही कामे करावयाची आहेत. त्यासाठी आवश्यक मटेरीअल व खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.नं	तपशिल	कंपनी	साईज	अंदाजे दर रुपये	मागणी/ नग	अंदाजे एकूण रुपये
01	पाणबुडी मोटार	लुबी/ टेक्स्मो	3 एच.पी.	10,000/-	02	20,000/-
02	D.O.L. स्टार्टर	L&T	6-10 A.रिले	1500/-	02	3,000/-
03	I.C.T.P. मेनस्वीच	स्टेनले	32 A	1500/-	02	3,000/-
04	किटकॅट फ्युज	स्टेनले	63 A	150/-	03	450/-
05	जी.आय.पाईप	टाटा/झेनिथ	50mm 40mm 25mm	115/- फूट 83/- फूट 55/- फूट	750 फूट 690 फूट 30 फूट	86,250/- 57,270/- 1,650/-
06	नॉन रिटर्न व्हॉल-आयएसआय-हेवी	लिडर	50mm	3000/-	01	3,000/-
07	गेट व्हॉल- आयएसआय-हेवी	लिडर	50mm	3310/-	02	6,620/-
08	वॉटर फ्लो मीटर		50mm	5000/-	01	5000/-
					एकूण अंदाजे रुपये	1,86,240/-

ब) जि.प. शाळेच्या जागेभोवती कम्पाऊंड भिंत बांधकाम करणे व भूमिगत टाकीचे बांधकाम दि. ०६/०९/२००८ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ६३६ (३५) अन्वये ठेकेदार मे.

एन.एस. बनकर पाटील ॲण्ड कं., श्रीरामपूर यांचेकडून करुन घेण्यात येत आहे. जि.प. यांचे मागणीनुसार सदर ठिकाणी २०'x१८' मोजमापाचे स्टेज बांधकाम करुन द्यावयाचे होते. त्यासाठी अंदाजे रुपये ६५,९९५.०० मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. दि. ०७/०७/२००८ रोजीचे झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील नि.क्र. ६२० अन्वये स्टेजचे कामासाठी येणारे योग्य त्या खर्चास मंजुरी देण्यात आली आहे. सदर स्टेजचे बांधकाम लवकर पूर्ण होण्याचे दृष्टीने सदर ठिकाणी कंपाउंड भिंत व भूमीगत टाकीचे बांधकाम करीत असलेले ठेकेदार मे.एन.एस.बनकर पा. ॲण्ड कं. यांचेकडून त्यांचे मंजूर निविदा दराने करुन घेण्यात आले आहे. सदरहू कामाचे बिल ठेकेदार यांनी अद्याप सादर केलेले नाही.

महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग , शासन निर्णय क्र. सा.सं वि २००६/६०८/(८८)/का.सोळा, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दि. १५ मे २००८ अन्वये नविन शाळा इमारत जिल्हा परिषद अ.नगर यांना हस्तांरीत करण्यास अपुरी राहीलेली कामे जि.प. अ.नगर व कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी पूर्ण करण्याचे अटीवर मान्यता देण्यात आली आहे. तरी सदरहू शासन निर्णयास अनुसरुन वरील 'अ' मध्ये नमूद केलेल्या पाणी पुरवठ्यासाठी आवश्यक असलेल्या मटेरीअल खरेदीस व त्यासाठी अपेक्षीत रुपये १,८६,२४०.०० मात्रचे खर्चास तसेच वरील 'ब' मध्ये नमूद केलेप्रमाणे स्टेजचे बांधकाम ठेकेदार मे. एन.एस. बनकर पा. ॲण्ड कं. श्रीरामपूर यांचेकडून त्यांचे मंजूर निविदा दराने करुन घेण्यात आलेचे कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

विषय नं.१९ शिर्डी शहरातील नवीन पिंपळवाडी रस्ता संस्थानमार्फत विकसित करणे बाबत.

निर्णय नं.१९ मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी त्यांचे दि.०९/११/२००८चे पत्रान्वये विनंती केली आहे की, शिर्डी येथे येणाऱ्या भाविकांना नगरपंचायत देत असलेल्या नागरी सुविधा त्या मानाने अपुऱ्या आहेत. त्यामुळे येथे येणाऱ्या यात्रेकरुंना गैरसोईंना तोंड द्यावे लागते. वरील परिस्थिती पहाता शिर्डी शहरातील मुलभूत सुविधामध्ये योग्य रितीने वाढ करणे आवश्यक आहे.

नागरी भागामध्ये अशा प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी शिर्डी नगरपंचायतीची आहे. तथापी शिर्डी नगरपंचायतीची आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्याने साईभक्तांकरीता आवश्यक त्या सोई उपलब्ध करुन देणे शिर्डी नगरपंचायतीस आर्थिक दृष्टया शक्य झालेले नाही.

शिर्डी हद्दीत नविन पिंपळवाडी रस्ता असून सदर रस्त्याची लांबी ६३० मी. इतकी आहे. सदर रस्त्याची विकास योजनेत १५.०० मी. रुंदी असून सदर रुंदीस नगरपंचायत मार्फत अतिक्रमणे काढून रुंदीकरण करण्यात आलेले आहे. सदरचा रस्ता सन २००५ मध्ये डांबरीकरण करण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत सदर रस्ता अंत्यत खराब झालेला असून वाहतुकीस अडचणीचा झालेला आहे.

शिर्डी नगरपंचायत हद्दीतील जुना पिंपळवाडी रस्ता श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांचे मार्फत करण्यात आलेला आहे. पंरतू सदर श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांनी भाविकांचे दर्शन रांगासाठी वाहतुकीस बंद केलेला आहे. त्यामुळे पिंपळवाडी कडे जाणारी त्या भागातील सर्व हॉटेल्सकडे तसेच आठवडे बाजार, कालिकानगर, बिरेगांव रोड, भाजी मंडई, विरभद्र मंदिर याकडे जाणारी वाहतुक नविन पिंपळवाडी रस्त्याने जाते. त्यावर चारी गळती, पावसाच्या पाण्यामुळे व वाहतुकीमुळे खड्डे पडल्याने सदर रस्त्याची दुरवस्था झालेली आहे. सदरच्या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण केल्यास रस्ता भविष्यात लवकर खराब होणार नाही. तरी सदरच्या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण व देखभाल दुरुस्तीकाम श्री साईबाबा संस्थान मार्फत करणे अथवा त्यासाठी आवश्यक लागणारी खर्चाची रक्कम शिर्डी नगरपंचायत कडे वर्ग करण्यात यावी.

शिर्डी नगरपंचायत हद्दीतील जुना पिंपळवाडी रस्त्याचे संस्थानमार्फत सन २००५ मध्ये कॉंक्रीटीकरण करणेत आलेले असून सदरचा रस्त्यापैकी नगर-मनमाड रस्त्यापासून तलाठी कार्यालयापर्यंत ३०० मीटर लांबीपर्यंत रस्त्याचा अर्धा भाग भाविकांचे दर्शन रांगेकरीता वापरणेत येत आहे. करीता नवीन पिंपळवाडी रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणेस हरकत नाही. रस्त्याचे दोन्ही बाजुनी नगरपंचायत मार्फत उपलब्ध रुंदीप्रमाणे फुटपाथ व त्याखालील ड्रेनेज लाईन व सर्व्हीस डक्ट करणेत आलेले आहे. त्यामुळे सध्याचा डांबरीकरण असलेला १२ मी. रुंदीचा कॉंक्रीटीकरणमध्ये रस्ता करता येईल. याबाबत एम.एस.आर.डी.सी. चे सल्लागार मे. unison, पुणे यांचेकडून सदर रस्त्याचे कॉंक्रटीकरणाचे एस्टीमेट घेणेत आले असून त्यांनी याकामी रुपये ३६३.०० लाखाचे अदांजपत्रक सादर केले आहे. यामध्ये प्रामुख्याने खालील कामांचा समावेश आहे.

०१. सध्याचे रस्त्याचे डांबरीकरण काढणे
०२. Granuiar sub base (G.S.B.
०३. Wet mix macadam (०.१५m thk.)
०४. Dry lean concrete (D.L.C -०१५m thk)
०५. Pavement Quality Cement Concrete of M ३५ Grade. (०.३० m thk.)
०६. फुटपाथचे कडेने कर्बस्टोन बसविणे.

०७. इरिगेशनची चारी करीता १२०० एमएम व्यासाचे पाईप टाकणे
०८. फुटपाथवर ६० एम एम जाडीचे M -३५ ग्रेडचे काँक्रीट पेव्हींग ब्लॉक बसविणे
०९. Thermoplastic Road Material ने रस्त्यावर मार्कींग करणे.
१०. चेंबर बांधणे

सदरचे कामासाठी संस्थानमार्फत खर्च करावयाचा असल्यास अथवा निधी उपलब्ध करुन दयावयाचा असल्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था ट्रस्ट, शिर्डी अधिनियम २००४ मधिल तरतुदीनुसार याकामी शासनाची मान्यता घ्यावी लागेल.

तरी याकामी येणारे अंदाजे रुपये ३६३ लाख मात्रचे खर्चास व याकामी शासनाचे मान्यतेकरीता प्रस्ताव पाठविणेस तसेच सदरचे काम संस्थानमार्फत करणेस किंवा सदरचा निधी शिर्डी नगरपंचायतीकडे वर्ग करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी शहरातील नवीन पिंपळवाडी रस्ता संस्थानमार्फत विकसित करणेस शासनाची मान्यता घेण्यात यावी, याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २६३ लाख खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी एम.एस.आर.डी.सी चे सल्लागार UNISON PROJECT MANAGEMENT PVT.LTD,PUNE यांची नेमणूक करण्यात यावी.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

विषय नं.२० श्रीचावडी महोत्सवानिमित्त करण्यात आलेल्या कामाबाबत.

निर्णय नं.२० श्रीसाईबाबांचे चावडी मंदिराची शताब्दी वर्षाची सुरवात दि. १०/१२/२००८ पासून सुरु होत आहे. त्यादृष्टीने मा.अध्यक्ष साो, व मा. कार्यकारी अधिकारी सोा यांचे राउंडमध्ये तसेच समक्ष चर्चेत चावडी मंदीरात खालीलप्रमाणे कामे करणेचे ठरले आहे.

०१) संपुर्ण लाकडी कामाला मेलॅमाईन पॉलीश करणे.
०२) पडवीच्या ओट्याच्या पुढील बाजूस स्टोन क्लॅडींग करणे, ओट्याचे वरील बाजूस पुढील बाजुनी व्हाईट मार्बल पट्टी बसविणे
०३) वास्तुंच्या बाहेरील व आतील बाजुने भिंतीला पॉलीमर कोटींग करणे
०४) वास्तुंच्या पडवीच्या छतावरील सध्याचे सिमेंट पत्र्यावर मंगलोर टाईल्स (कौले) बसविणे
०५) चावडींचे शेजारील पश्चिम बाजूस असलेली पाणपोई काढणे
०६) कास्ट आयर्न कंम्पांउड वॉलला रंगकाम करणे.
उपरोक्तप्रमाणे कामे करणेकरीता खालीलप्रमाणे कार्यवाही/ खर्च येणार आहे.

अ.नं.	तपशिल	कार्यवाही / खर्च
०१	संपुर्ण लाकडी कामाला मेलॅमाईन पॉलीश करणे (लाकडी खण, खांब, ग्रील दरवाजे, कपाटे इ.)	याकरीता अंदाजे रुपये १,३५,७२०.०० मात्र खर्च अपेक्षीत आहे. मेलॅमाईन पॉलीश करणेचे काम ठेकेदार सुदर्शन फ्लेझीबल प्रा.लि., नाशिक व ओम प्रकाश पेंटर, शिर्डी यांचे मार्फत देणगीदाखल करीत आहोत.
०२	पडवीच्या ओट्याला पुढील बाजुने स्टोन क्लॅडींग करणे, ओट्याचे वरिल बाजूस पुढील बाजुनी व्हाईट मार्बल पट्टी व पायरीला कोटा बसविणे	०१. स्टोन क्लॅडींग करीता इकडील विभागाकडे उलपब्ध घडीव दगड वापरुन स्टोन कॅडींगचे काम पूर्ण करता येईल ०२. व्हाईट मार्बल व कोटा टप्पे मटेरीअल खरेदी करणेस मजुरी ठेकेदारांकडून बसविणेकामी एकूण १५,०००.०० मात्र खर्च अपेक्षीत आहे. व्हाईट मकराना मार्बल व कोटा टप्पे बसविणे करीता आवश्यक ८७.९५ चौ.फुट मार्बल सप्लायर श्री. बाबा रामदेव ट्रेडींग कंपनी, संगमनेर यांचेकडून व्हाईट मकराना मार्बल थेट खरेदी करणेत आला आहे.
०३	वास्तुच्या आतील व बाहेरील भिंतीना पॉलीमर कोटींग करणे	याकामी मटेरीअल खरेदीकरीता रुपये ६५००.०० मात्र खर्च अपेक्षीत आहे. याकामी आवश्यक असलेले पॉलीमर पॉलीयल्क (WP) २० लि. सप्लायर चपक ट्रेडींग कंपनी, मुंबई यांचेकडून थेट खरेदी करणेत येवून विभागामार्फत काम पूर्ण करणेत येत आहे.
०४	पडवीचे छतावरील सध्याचे सिमेंट पत्र्यावर मंगलोर टाईल्स बसविणे	याकामी रुपये ४५०००.०० मात्र खर्च अपेक्षीत आहे. सांगवान लाकूड व कौले देणगीदाखल स्विकारण्यात आले असून विभागामार्फत काम पूर्ण करण्यात येत आहे.
०५	पाणपोई काढणे व त्याठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे	याकरीता मजुरी ठेकेदारांकडून पाणपोई काढणेकामी व त्याजागेवर पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी रुपये १००००.०० मात्र खर्च अपेक्षीत आहे.
०६	चावडी शेजारील कास्ट आर्यन ग्रील कंपाउंड रंगकाम करणे	याकामी रुपये २५००.०० मात्र खर्च अपेक्षीत आहे. सदरचे काम विभागामार्फत पूर्ण करण्यात येत आहे.

तरी याकामी येणारे अंदाजे रुपये २,१५,०००.०० मात्रचे खर्चास व उपरोक्तप्रमाणे अ.नं. १ ते ६ प्रमाणे झालेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

विषय नं.२१ श्री साई मंदिराचे उत्तरेकडील बाजूस असणाऱ्या दगडी पायऱ्या दुरुस्त करणे बाबत.

निर्णय नं.२१ श्रीसाई समाधी मंदिराचे उत्तर बाजूस, पूर्वीचे मंदिर विभागाचे कार्यालयात, सध्याचे गांवकरी / अति महत्वाच्या व्यक्तींच्या प्रवेशद्वारा समोर ये - जा करणेसाठी पूर्व पश्चिम अशा दोन्ही बाजूने प्रवेश असलेल्या

कठड्यासह दगडी पायऱ्या आहेत. सदरच्या कठड्यासह दगडी पायऱ्या मुख्य मंदिराचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर बाजूचे खोल्यांमध्ये स्वतंत्ररित्या प्रवेश करणेसाठी बांधणेत आलेल्या आहेत. असे दिसून येते.

सध्या सदरहू दगडी पायऱ्या दोन ठिकाणी असलेल्या प्रवेशद्वारातून गांवकरी व अति महत्वाच्या व्यक्तींची ये - जा केली जाते. श्री क्षेत्र शिर्डी येथे वेळोवेळी अति महत्वाच्या व्यक्ती श्री साईंचे दर्शनासाठी येत असतात त्यांना मंदिराचे मागील दरवाजाने, थोडक्यात श्रीं चे मुर्तीचे पाठिमागून प्रवेश करावा लागतो. महत्वाच्या व्यक्तींचा अशा प्रकारचा मंदिर प्रवेश करणे अप्रस्तूत व अप्रशसनिय वाटतो. त्यामुळे उपरोक्त परिच्छेदात नमुद केल्याप्रमाणे साई मंदिराच्या उत्तर बाजूकडील दगडी पायऱ्या काढून त्याऐवजी थेट सरळ पद्धतीने प्रवेश करता येईल अशा घडीव दगडी पायऱ्यांचे पुर्न:बांधणी करने योग्य राहील. तसेच या पायऱ्या सरळ उत्तर बाजूकडे संरक्षण मंदिराचे कार्यालयाचे समांतर केल्यास त्या सुसंगत दिसतील व त्या शेजारील जागेत समांतर असे उपलब्ध स्टील रेलिंग करता येईल, असे मत आहे.

याकामी घडीव दगडामध्ये पायऱ्या तयार करणेकरीता अंदाजपत्रकानूसार अंदाजे रु. १,२८,९६०/- मात्र खर्च अपेक्षित आहेत. व एस. एस. रेलिंग करणेकामी अंदाजे रु. ३,५०,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. साईभक्त श्री. सी. एस. मलीकपेटकर, साई कन्सल्टंट, अहमदनगर यांनी दि. ११.१२.२००८ रोजीचे पत्रान्वये दगडी बांधकामातील पायऱ्या देणगी दाखल करणेबाबत विनंती केलेली आहे.

तरी दगडी बांधकामातील नियोजीत पायऱ्यांचे बांधकाम साईभक्त श्री. सी. एस. मलीकपेटकर, साई कन्सल्टंट, अहमदनगर यांचेकडून देणगी दाखल करुन घेणेस व एस. एस. रेलिंगचे काम इकडील विभागामार्फत कोटेशन/दरपत्रक मागवून करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. सदरचे काम लवकर पूर्ण करणेबाबत संबंधितांना सूचना द्याव्यात, असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख/विद्युत विभागप्रमुख)

विषय नं.२२ साईप्रसाद नं.०२ पार्कींग परिसरात मंडप उभारणीकामी आलेल्या खर्चाबाबत.

निर्णय नं.२२ दिपावली सुट्टी निमीत्त होणारे भक्तांची गर्दी लक्षात घेऊन दि. २५.१०.२००८ ते दि. २.११.२००८ अखेर शामियाना मंडप व्यवस्था करणेत आलेली होती. साईभक्तांची गर्दी कायम असलेने त्यापैकी प्रसादालय पार्किंग परिसरातील मंडप दिवसा स्वयंसेवी भोजन व्यवस्थेसाठी व रात्री साईभक्तांचे निवासव्यवस्थेसाठी वापण्यात येत होता. भक्तांची गर्दी मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने भक्तांचे साईभक्तांचे सोयीकरीता स्वयंसेवी भोजन व्यवस्था करणेकरीता शामियाना मंडप दि. १७.११.२००८ अखेर पर्यंत ठेवणेत आलेला होता. दि. १६.११.२००८ चे पत्रान्वये अधिक्षक, प्रसादालय विभाग यांनी साईभक्तांची गर्दी मोठ्या प्रमाण होत असून गर्दीमध्ये साईभक्तांना वाढीव सेवा - सुविधा पुरविणे गरजेचे असलेणे स्वयंसेवी भोजन व्यवस्था वाढविणेचे आवश्यक आहे. करीता प्रसादालय पार्किंग परिसरात, व्हि. आय. पी. निवासस्थाना समोर दि. १८.११.२००८ ते दि. १९.११.२००८ पर्यंत ०२ दिवसाकरीता कापडी मंडप टाकुण मिळणेबाबत कळविले होते. याकरीता प्रसादालय पार्किंग परिसरात खालील प्रमाणे कापडी मंडप व्यवस्था करण्यात आली होती.

०१. प्रसादालय पार्किंग परिसरात : १२३' x ७७'.६" = ९५३२.५०
: १५२'.६" x ६१' = ९३०२.५०
०२. व्हि. आय. पी. सुट समोर : १५२x३०'.६" = ४६३६.००
एकुण = २३४७७.१० चौ. फुट

उपरोक्त प्रमाणे कापडी मंडप व्यवस्था करणेकामी खालील मंडप ठेकेदार यांचेकडून कोटेशन मागविणेत आले होते. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ. नं.	मंडप ठेकेदराचे नांव	मंडपाचे एकुण क्षेत्रफळ	दर	रक्कम	शेरा
०१	बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर	२३,४७७.०० चौ. फुट	रु. २.०० प्रति दिवस प्रति चौ. फुट	९३,८८४.००	निम्नतम
०२	साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूर		रु. २.५० प्रति दिवस प्रति चौ. फुट	१,१७,३८५.००	व्दितीय निम्नतम
०३	कल्याणी मंडप, नांदुर ता. राहाता		रु. ३.०० प्रति दिवस प्रति चौ. फुट	१,४०,८६२.००	

बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर यांचे दर रु. २.०० प्रति दिवस प्रति चौ. फुट निम्नतम स्वरुपाचे असल्याने सदरचे काम त्यांचेकडून करुन घेण्यात आले असून याकामी प्रत्यक्ष झालेले मोजमापानूसार व बिलाप्रमाणे रु. ९३,८८४.०० मात्र इतका खर्च आलेला आहे.

तरी प्रसादालय परिसरात दि. १८.११.२००८ ते दि. १९.११.२००८ अखेर ०२ दिवस कापडी मंडप उभारणी करीता आलेले रु. ९३,८८४.०० मात्रचे खर्चास आजचे सभेत कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

विषय नं.२३ शिर्डी येथे विमानतळ उभारणेकामी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादीत, मुंबई यांना अर्थसहाय्य करणेबाबत.

निर्णय नं.२३ (अ) महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांनी दिनांक २२ डिसेंबर, २००६ रोजीचे पत्रान्वये श्री क्षेत्र शिर्डी येथे महाराष्ट्र शासनाने सर्व सोयींनीयुक्त असे विमानतळ विकसित करण्याचे ठरविले असल्याबाबत कळविलेले होते. त्यांनी आपले पत्रात असे नमूद केले होते की, आपल्या संस्थेची महाराष्ट्र शासनाने विमानतळ विकासासाठी नेमणूक केली आहे. महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधीकरणामार्फत परिसराचे सविस्तर सर्व्हेक्षण करण्यात आलेले आहे. या सर्व्हेक्षणानुसार एकूण ५३० हेक्टर जमिनीची आवश्यकता आहे तसेच सल्लागार यांनी तयार केलेल्या प्राथमिक अंदाजपत्रकानुसार सदरचे विमानतळ विकसित करणेकामी जमिनीचे किंमतीसह जवळपास रु. ८५ कोटी खर्च अपेक्षीत आहे तसेच याकामासाठी निधीची उपलब्धता आवश्यक आहे. संस्थान हे विमानतळ विकसीत करणेसाठी सहभाग घेऊन या प्रकल्पासाठी रुपये ३० ते ३५ कोटी मात्र निधीची मदत करावी, तसेच संस्थानने निधी उपलब्ध करुन दिल्यास प्रकल्प उभारणेस मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली होती.

(ब) उपरोक्त पत्राप्रमाणे महाराष्ट्र विमानतळ विकासासाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १७ फेब्रुवारी, २००७ रोजीचे सभेत विचारार्थ सादर करण्यात आला होता. सदरील सभेत या प्रस्तावावर साधकबाधक चर्चा होऊन निर्णय क्रमांक १३० अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे :

यावर सविस्तर चर्चा होऊन, MADC ज्या ठिकाणी विमानतळाची जागा निश्चित करेल त्या ठिकाणी विमानतळ प्रकल्प उभारणीसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत विहित पध्दतीने शासनाची मान्यता घेऊन योग्य ती आर्थिक मदत करण्यात येईल असे कळविण्यात यावे, असे ठरले.

सदरहू निर्णयानुसार, मा.उपाध्यक्ष तथा कार्यकारी संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मुंबई यांना इकडील दिनांक ०९ एप्रिल, २००७ रोजीचे पत्रानुसार कळविण्यांत आलेले आहे.

(क) आता, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांनी त्यांचेकडील दिनांक ०५ डिसेंबर, २००८ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे. त्याचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे :

इकडील कार्यालयाचे दिनांक २२ डिसेंबर, २००६ च्या पत्रात शिर्डी येथील विमानतळ विकास करण्याचा खर्च सुमारे ८५ कोटी रुपये इतका असेल असा अंदाज वर्तविलेला होता. तद्नंतर विमानतळ विकासाशी संबंधीत तज्ञ व विमानतळाचा वापर करणाऱ्या प्रवासी हवाई सेवा तसेच प्रवासी यांच्याशी वेळोवेळी केलेल्या चर्चेनुसार शिर्डी येथील विमानतळ हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे करावयाचे ठरले. त्यानुसार निर्माण कराव्या लागणाऱ्या सेवासुविधाचा विचार करता तसेच या विमानतळावर पोहचण्याकरीता शिर्डी संस्थान ते विमानतळ हा सुमारे १५ कि.मी.चा रस्ता जलदगतीने मार्गात रुपांतरीत करावा लागणार आहे. या सर्व बाबींचा विचार करुन शिर्डी येथील विमानतळ विकसित करण्याचा सुधारीत खर्च सुमारे २६५ कोटी इतका अपेक्षित आहे.

सदरहू विमानतळ आंतरराष्ट्रीय दर्जाप्रमाणे विकसित करण्याकरीता येणारा वाढीव खर्च लक्षात घेता शिर्डी संस्थानकडून महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीला सुमारे ५० कोटी रुपयांच्या अर्थसहाय्याची अपेक्षा आहे. तसेच शिर्डी येथील विमानतळाचा विकास करण्याकरीता मा.मुख्यमंत्र्याच्या अध्यक्षतेखाली एक वेगळी विश्वस्तव्यवस्था संस्था निर्माण करावयाचा निर्णय कंपनीने घेतला आहे.

सदरहू पत्राव्दारे मा.उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकिय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांनी अशी विनंती केली आहे की, शिर्डी येथील आंतरराष्ट्रीय विमानतळ विकसित करुन सन २०१० च्या अखेरीपर्यन्त प्रवासी वाहतुकीस खुले करण्याचे उद्दीष्ट लक्षात घेता हे अर्थ सहाय्य लवकरात लवकर महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीला उपलब्ध करुन देण्यात यावे.

(ड) तसेच, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांनी त्यांचेकडील दिनांक १८ डिसेंबर, २००८ रोजीच्या पत्रानुसार असे कळविले आहे की,

".. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी यांचे अध्यक्षतेखाली सदरहू कंपनीच्या दिनांक १३ जून, २००८ रोजीच्या मा. संचालक मंडळाच्या २२ व्या सभेत असे ठरले आहे की, शिर्डी येथील विमानतळ विकसित करणेसाठी शिर्डी साईबाबा विमानतळ विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ही संस्था स्थापन करण्यात येत आहे. या संस्थेवर नेमणूक करण्यात येणाऱ्या ०९ विश्वस्तांपैकी मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी हे एक पदसिध्द विश्वस्त असतील. त्यानुसार विद्यमान कार्यकारी अधिकारी यांची या संस्थेवर विश्वस्त म्हणून नेमणूक करण्यात येत आहे. "

(ई) उपरोक्त **परिच्छेद क** व **ड** मध्ये विवेचन केल्यानुसार, खालील बाबींस मा.व्यवस्थापन समितीची तत्वत: मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

०१. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना शिर्डी येथील विमानतळ विकसित करणेसाठी रक्कम रुपये ५० कोटी मात्रपर्यन्त शासनाच्या मान्यतेने अर्थसहाय्य करणे.

०२. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांचेमार्फत स्थापन करण्यात आलेल्या शिर्डी साईबाबा विमानतळ विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या संस्थेवर पदसिध्द विश्वस्त म्हणून कार्यकारी अधिकारी यांच्या नेमणूकीस मान्यता देणेबाबत.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास तत्वत: मान्यता देण्यात आली. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना शिर्डी येथील विमानतळ विकसित करणेसाठी रक्कम रुपये ५० कोटी मात्र इतका निधी उपलब्ध करुन देण्यासाठी काय अटी असतील तसेच कोणत्या पध्दतीने निधी उपलब्ध करुन द्यावा याबाबत मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेशी चर्चा करुन अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

विषय नं.२४ श्रीसाई प्रसादालय येथील गिरणीचे भिंतीच्या वरती पार्टीशन करणे आणि चपाती भट्ट्यांसाठी फायर ब्रिक्स खरेदी करणेबाबत.

निर्णय नं.२४ अ)नविन श्री साई प्रसादालय येथील गिरणीचे भिंतीच्या वरील भागात पार्टीशन करणे :-

दि १६.११.२००८ रोजी मा. कार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी व संबधीत खातेप्रमुख यांचे समवेत श्री साई प्रसादालय इमारतीची पहाणी केली असता अधिक्षक, प्रसादालय यांनी सदर ठिकाणी असलेल्या गिरणीचे पश्चिम आणि उत्तर बाजूस पार्टीशन अथवा बांधकाम करुन बंदिस्त करुन द्यावे जेणेकरुन गिरणीतून उडणारे पिठ इतरत्र पसरणार नाही, अशी मागणी केली आहे. सदरचे काम ॲल्युमिनीअम पार्टीशन करुन बंद करता येईल.

विषयांकीत काम तातडीचे असल्यामुळे संस्थानचे श्री साईबाबा धर्मशाळा इमारतीमधील ॲल्यु. पार्टीशनचे काम करणारे ठेकेदार यशश्री ॲल्यु. ॲण्ड ग्लास सेंटर, कोपरगांव यांचा कार्यादेश क्र. १८४४६/२००८ दि. १६/१२/२००८ अन्वये मंजूर असलेल्या दरात काम करुन घेता येईल. याकामी अंदाजे रुपये ६२,५००.०० मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. तरी सदरचे काम यशश्री ॲल्युमिनीअम ॲण्ड ग्लास सेंटर, कोपरगांव यांचेकडून यापुर्वी मंजुर असलेल्या दरात करुन घेणेस तसेच याकामी अंदाजे रक्कम रुपये ६२,५००.०० मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

ब) चपाती भट्ट्यांसाठी फायर ब्रिक्स खरेदी करणे:-

नवीन श्री साई प्रसादालयाचे चपाती किचनमध्ये फायर ब्रिक्सचे बांधकाम करुन मिळणेबाबत अधिक्षक प्रसादालय, विभाग यांनी उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये इकडील विभागास कळविले आहे. त्यानुसार इकडील विभागामार्फत समक्ष पहाणी करुन एस्टिमेट तयार केले असून याकामी अंदाजे रुपये ९८,०००.०० मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. सदरचा खर्च प्रसादालय विभागाचे बजेटमधून करता येईल. याकामी आवश्यक मटेरीअलचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.नं.	**मटेरीअलचा तपशिल**	**परिमाण**	**एकक**
०१.	फायर ब्रिक्स	५,०००	नग
०२.	रिफ्रेक्टरी सिमेंट	१३	गोणी
०३.	वाळू	०१	ब्रास

तरी नविन श्रीसाई प्रसादालयाचे चपती किचन मध्ये फायर ब्रिक्सचे बांधकाम करणेसाठी अशा प्रकारचे विट उत्पादक यांचेकडून कोटेशन्स मागवून मटेरीअल खरेदी करणेस तसेच याकामी अंदाजे रक्कम रुपये ९८,०००.०० मात्रचे अपेक्षित खर्चास आणि सदरचे काम खात्यामार्फत करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

विषय नं.२५ श्रीसाई प्रसादालयासमोरील खाजगी पार्कींगसाठी साईभक्तांचे सोयीसाठी नाल्यामध्ये पाईप टाकणे तसेच शिर्डीतील विविध पार्कींगकरिता साईभक्तांचे माहितीसाठी दिशादर्शक फलक लावणेबाबत.

निर्णय नं.२५ अ) श्रीसाई प्रसादालयासमोरील खाजगी पार्कींगसाठी साईभक्तांचे सोयीसाठी नाल्यामध्ये पाईप टाकणे

मा. व्यवस्थापन समितीचे दि. १६.०९.२००८ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्र. ७४७ अन्वये नविन श्री साई प्रसादालय इमारतीकडे जाणे - येण्यासाठी भक्तांना पर्यायी व जवळचा रस्ता उपलब्ध व्हावा म्हणून शिर्डी सर्व्हे नं. १६४ पैकी मधिल जमिनीतून दक्षिणोत्तर ०९ मीटरचा रस्ता देण्यास जमिन मालक श्री. किशोर भाऊसाहेब गोंदकर तयार आहेत. याबाबत मा. विश्वस्त श्रीमती उर्मिला प्रदीप जाधव यांनी संबंधित जमिनमालकाशी चर्चा केलेली आहे. संबंधित जमिनमालक विनामुल्य रस्ता देण्यास तयार असतील तर त्यांचे जमीनीतून रस्ता विकसित करणेकामी कायदेशीर बाबी तपासून कार्यवाही करण्यात यवी असे ठरले आहे. वर नमूद केलेप्रमाणे नाल्यावर आर.सी.सी. पाईप्स टाकणेसाठी १००० एम एम ९०० एम एम व्यासाचे NP२ Class RCC पाईप्स खरेदी करणे आवश्यक आहे. यासाठी १००० एम एम व्यासाचे ०२ पाईप व ०२ कॉलर तसेच ९०० एम एम व्यासाचे १४ पाईप व ०८ कॉलर खरेदी करावे लागतील.

उपरोक्त शिर्डी सर्व्हे क्र. १६४ मधिल नियोजीत दक्षिणोत्तर रस्त्याचे दक्षिणेकडील बाजूस नाला आहे. संस्थानचे प्रसादालय इमारतीत राष्ट्रीय पेरु परिषदेचा कार्यक्रम करण्यात आल्याने प्रसादालय समोरील श्री किशोर भाऊसाहेब गोंदकर यांचे शेतात कार्यक्रमासाठी येणाऱ्या वहानांसाठी पार्किंगची व्यवस्था करण्यात आली होती. यासाठी सदरचे नाल्यावरुन जाणे- येण्यासाठी आर.सी.सी. पाईप्स टाकून व्यवस्था करण्यात यावी अशी सूचना मा. अध्यक्ष सोा. व मा. विश्वस्त आमदार श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली होती. सदरचे नाल्यावर R.C.C. पाईप टाकणेसाठी स्थानिक R.C.C. पाईपचे पुरवठाधारकांकडून इकडील जा.क्र. १६७७५ दि. १४/११/२००८ रोजीचे कोटेशन मागणी पत्रानुसार कोटेशन मागविण्यात आले. त्यानुसार खालील तिन पुरवठा धारकांनी सिलबंद कोटेशन सादर केले होते.

सदरहू काम तातडीचे असल्याने मा. प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष दि. १९/११/२००८ रोजी सदरहू सिलबंद कोटेशन उघडणेत आले. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

अ.नं.	तपशिल	परिमाण	पुरवठाधारकाचे नांव					
			सातभाई सिमेंट पाईप, कोपरगांव		श्री. ज्ञानेश्वर सिमेंट पाईप, नेवासा		शिवशक्ती सिमेंट पाईप, कोपरगांव	
			दर	रक्कम	दर	रक्कम	दर	रक्कम
01	RCC Pipe 900 mm dia	14 Nos	3,350.00	46,900.00	3,500.00	49,000.00	3,302.00	**46,228.00**
02	RCC कॉलर 900 mm dia	08 Nos	400.00	3,200.00	350.00	2,800.00	338.00	**2,704.00**
03	R.C.C. Pipe 1000 mm dia	04 Nos	4,400.00	17,600.00	4000.00	**16,000.00**	4,500.00	18,000.00
04	RCC कॉलर 1000 mm dia	02 Nos	500.00	1000.00	400.00	**800.00**	500.00	1000.00

उपरोक्त तपशिलानुसार शिवशक्ती सिमेंट पाईप यांचे ९०० mm dia चे पाईप व कॉलरचे दर निम्नतम आहेत. त्यांचेकडून १४ नग ९०० mm dia पाईप व ०८ नग ९००mm dia कॉलर खरेदी करणेसाठी रुपये ४८,९३२.०० मात्र खर्च आला आहे. तसेच. श्री ज्ञानेश्वर सिमेंट पाईप यांचे १००० mm dia पाईपचे व कॉलरचे दर निम्नतम आहेत. त्यांचेकडून ०४ नग १००० mm dia pipe व ०२ नग कॉलर खरेदी करणेसाठी रक्कम रुपये १६,८००.०० मात्र खर्च आला आहे.

सदरचे नाल्यावर रस्ता बनवणे अत्यंत तातडीचे असल्याने श्री ज्ञानेश्वर सिमेंट पाईप व शिवशक्ती सिमेंट पाईप यांचेकडून सदरचे मटेरीअल खरेदी करणेत आले आहे. तसेच साईच्छा सप्लायर्स यांचेकडून त्यांचे मागील मंजूर दरात मुरुम खरेदी करण्यात आला आहे. यासाठी रक्कम रुपये १८,५२०.०० मात्र खर्च आला आहे. तसेच सदरचे पाईप टाकणेसाठी व मुरुम पसरविणेसाठी श्री विलास तुरकणे यांच्या जे.सी.बी.ने सदरचे काम करुन घेण्यात आले आहे. यासाठी रुपये ५,१७५/- मात्र खर्च आला आहे.

तरी वरीलप्रमाणे १४ नग ९०० mm व्यासाचे पाईप व ०८ नग कॉलर शिवशक्ती सिमेंट पाईप, कोपरगांव यांचेकडून खरेदी करणेस तसेच १००० mm व्यासाचे ०४ पाईप व ०२ कॉलर श्री ज्ञानेश्वर सिमेंट पाईप, नेवासा यांचेकडून खरेदी करणेस आणि याकामी साईच्छा सप्लायर्स यांचेकडून मुरुम खरेदी करणेस तसेच श्री विलास तुरकणे यांचेकडून जे.सी.बी.ने सदरचे पाईप टाकणे व मुरुम टाकून रस्ता करणेचे कामास कार्योत्तर मान्यता असावी तसेच यासाठी आलेल्या रक्कम रुपये ८९,४२७.०० मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

ब) शिर्डीतील विविध पार्कींग करीता साईभक्तांचे माहितीसाठी दिशादर्शक फलक लावणे -

शिर्डीत नाताळ सनाचे सुट्टीचे दिवसात तसेच डिसेंबर महिला अखेरला व नविन वर्षाचे सुरुवातीस साईभक्तांची फार मोठ्या प्रमाणात गर्दी होते. मंदिर परिसरासमोरील प्रायव्हेट पार्किंग बंद झाल्यामुळे भक्तांची वाहन लावणेची गैरसोय होऊ नये याकरीता तसेच भक्तांना वाहन पार्किंग माहिती व्हावी म्हणून पार्कींगकडे व ज्या ठिकाणी पार्किंग करावयची नाही अशा ठिकाणी नो पार्कींग मजकुराचे बोर्ड तसेच संस्थानतर्फे भक्तांसाठी केलेल्या विविध सोयीसुविधांची माहिती सुलभपणे भक्तांना व्हावी याकरीता विविध ठिकाणी लावणेकरीता संबंधीत सोयीसुविधांचे माहितीदर्शक बोर्ड तातडीने पेंटर हेमंत आर्ट, शिर्डी यांचेकडून तयार करुन लावणेत आले आहेत. याकामी रुपये ४५,०००.०० मात्र आला असून सदरहू खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

विषय नं.२६ नगरपंचायत हद्दीतील संस्थानमार्फत साईभक्तांसाठी स्वच्छतागृहाची व्यवस्था करणेबाबत.

निर्णय नं.२६ शिर्डी येथे येणाऱ्या साईभक्तांची गर्दी दिवसेंदिवस वाढत आहे. तसेच सलग येणाऱ्या सार्वजनीक सुट्टयाच्या दरम्यान शिर्डीत साईभक्तांची मोठ्या प्रमाणात गर्दी होते. अशावेळेस मंदिर परिसराच्या आसपास तसेच

लगतचे शिर्डी नगरपंचायत शिर्डीचे क्षेत्रात शौचालय व स्वच्छतागृहांची (मुतारी) सुविधा नसल्यामुळे येणाऱ्या साईभक्तांची विशेषत: महिला वर्गास मोठ्याप्रमाणात अडचणी येतात.

याबाबत मा. कार्यकारी अधिकारी श्री साईबाबा संस्थान, वरिष्ठ मुख्य अभियंता, तसेच मुख्याधिकारी, शिर्डी नगरपचांयत, शिर्डी यांचे दि.११.१२.२००८ रोजीचे मंदिर परिसर व लगतचे नगरपंचायत क्षेत्राची प्रत्यक्ष पाहणी करण्यात येउन मंदिर परिसराचे लगत व गर्दीच्या ठिकाणी शिर्डी नगर पंचायत हद्दीत जागा निश्चित करण्यात येऊन पुरुषाकरीता व स्त्रियांकरीता खालीलप्रमाणे मुतारी बांधणेचे ठरले.

०१) साईउद्यान इमारतीचे पूर्व बाजूस व जुने पिंपळवाडी रस्त्यालगत-पुरुष व स्त्रियांकरीता प्रत्येकी ०४

०२) संस्थानचे व्यायामशाळेसमोरील मोकळी जागा -पुरुष व स्त्रियांकरीता प्रत्येकी ०५

०३) कनकुरी रोडला नगरपंचायत ऑफीसचे उत्तर बाजूस डी.पी. समोर -स्त्रियांकरीता- ०४

शिर्डी येथे श्री साईबाबांचे दर्शनासाठी नाताळ व इतर सुट्टयांमुळे मोठ्याप्रमाणवर गर्दी होणार असल्याने तातडीने उपरोक्तपैकी अ.नं. १ व २ चे ठिकाणी पुरुषांकरीता ०९ स्त्रियांकरीता ०९ याप्रमाणे विट बांधकाम व बायसन पॅनेलमध्ये स्वच्छतागृहाचे (मुतारीचे) काम पूर्ण करण्यात आले आहे. सदर कामासाठी रू.१,४०,००० मात्र खर्च झालेला असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

विषय नं.२७ संस्थानचे विश्वस्त निधीतून अहमदनगर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणास बोटी व इतर साहित्य उपलब्ध करुन देणेबाबत.

निर्णय नं.२७ मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी त्यांचेकडील दि. २८/०६/२००७ रोजीचे पत्रान्वये आपत्ती व्यवस्थापनांर्तगत मदत व पून:र्वसन पूर्वतयारीसाठी संस्थानने FRP Boats व Safety Items खरेदी करुन दयावेत अशी विनंती केली होती. त्यास दि. २९/०६/२००७ रोजीचे सभेत मा.विश्वस्त समिती सभेत मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सदरचे मटेरीअल खरेदी करणेकरीता वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविणेत आल्या होत्या. त्यानुसार खालील पाच ठेकेदारांनी सिलबंद निविदा सादर केल्या होत्या.

Sr.No	Suppliers Name
01	M/s. Marine Engineering works,Andheri (W), Mumbai
02	M/s. Gee Pee Reinforced Products pvt. Ltd., Gurgaon, Hariyana
03	M/s. Standard Friction Components Ltd., Mumbai
04	M/s. Vignesh Marine Technical Services Pvt, Ltd; Chennai
05	Sunny Water Sports Products Pvt. Ltd, Chinchwad, Pune

मा.व्यवस्थापन समितीचे दि. २८/०७/२००७ रोजीचे सभेत सदरचे विषयावर चर्चा होऊन, आपत्ती व्यवस्थापन बोटी व इतर साहित्य खरेदी करणेसाठी आवश्यक तांत्रीक अधिकारी संस्थानकडे नाही. त्यामुळे उपरोक्त सिलबंद निविदा आजचे सभेपुढे न उघडता ते मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्यात यावीत. याकामी मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी निविदासादरकर्त्यांशी तज्ञांसह वाटाघाटी करुन अंतिम निर्णय घ्यावा. त्यानुसार संबंधितांना पुरवठा आदेश देण्यात यावा व बिलाची रक्कम संस्थानमार्फत अदा करण्यात यावी असे सदरहू सभेतील निर्णय क्र. ५२५ अन्वये ठरले होते.

त्यानुसार इकडील विभागामार्फत दि. १०/०८/२००७ रोजीचे पत्रान्वये सदरच्या प्राप्त निविदा उघडून संबंधीतांशी चर्चा व वाटाघाटी करणेसाठी व निवड केलेले साहित्य व पुरवठाधारक याबाबतची माहिती मा. जिल्हाधिकारी यांचे शिफारशीसह इकडील कार्यालयास कळविणेबाबत मा. जिल्हाधिकारी अहमदनगर यांना पत्र देणेत आले. याबाबत यशदा, पुणे यांचेकडील तज्ञ श्री कर्नल मराठे यांनी संपूर्ण अभ्यास करुन सदर निविदांचे स्पेशिफिकेशनमध्ये तफावत असलेकारणाने सर्व निविदा रद्द करुन मा. जिल्हाधिकारी अ.नगर यांचेकडून प्राप्त झालेल्या यादी व स्पेशिफिकेशनप्रमाणे फेर निविदा मागविण्यात याव्यात असे कळविले. त्यानुसार वर्तमान पत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात देऊन फेर निविदा मागविण्यात आल्या व निविदा सादर करणेसाठी ठेकेदार यांना दि. ०१/०८/२००८ पर्यंतची मूदत देण्यात आली त्यास अनुसरुन खालील ०४ सिलबंद निविदा प्राप्त झाल्या होत्या.

Sr.No	Suppliers Name
०१	M/s. Integral safety Engineers, Thane
०२	Standard Friction Components Ltd., Mumbai
०३	Gee pee Reinforced products, pvt., Ltd., Haryana
०४	Sharp sales, Thane

उपरोक्तपैकी अ.नं. ०१ , ०२ व ०४ चे ठेकेदारांनी विहीत मूदतीत सिलबंद निविदा सादर केली होती व अ.क्र. ०३ चे ठेकेदार यांची निविदा उशीरा प्राप्त झाली होती. सदर प्राप्त निविदा मा. निवासी उप जिल्हाधिकारी, तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अ.नगर यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी इकडील दि. ०५/०९/२००८ रोजीचे पत्रान्वये पाठविण्यात आल्या. सदर प्राप्त निविदा मा. निवासी उप जिल्हाधिकारी अ.नगर यांचे दालनात दि. २२/०९/२००८ रोजी उघडण्यात आल्या व कर्नल श्री.

मराठे, संचालक, आपत्ती व्यवस्थापन केंद्र, यशदा, पुणे यांना निविदाधारकांनी निविदेसोबत सादर केलेल्या तांत्रीक मुदयांचा अभ्यास करुन त्यांचा अहवाल सादर करणेबाबत विनंती करण्यात आली. त्यानुसार कर्नल मराठे यांनी दि. २४/१०/२००८ रोजी त्यांचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालय अ.नगर यांचेकडील जि. नि.क्र./ आ.व्य/१२१/२००८, दि. ०१/१२/२००८ रोजीचे पत्राने खालील प्रमाणे अभिप्राय कळविला आहे.

क्रमांक ०१ :- रेस्क्यु एफआरपी बोट ओबीएमसह :-दराबाबतचा तुलनात्मक तक्ता पाहता मे. शार्प सेल्स, ठाणे यांनी सर्वात कमी रुपये ४,७६,७९०/- दर नमूद केले आहे. परंतू कर्नल मराठे यांनी त्यांच्या अहवालामध्ये नमूद केलेप्रमाणे मे. स्टॅण्डर्ड फ्रिक्शन, मुंबई यांनी सदर साहित्याबाबत पुरविलेले स्पेसिफिकेशननुसार सदरचे साहित्य हे चांगल्या दर्जाचे असून सदरच्या एजन्सीने नमूद केलेले दर रुपये ४,७८,१००/- यामध्ये सदर साहित्यासोबत फ्लॅट बोर्ड पुरविणेस तयार असलेस सदर साहित्याची मागणी मे. स्टॅण्डर्ड फ्रिक्शन कांपोनन्ट्स, मुंबई यांचेकडेस नोंदविण्यास हरकत नाही.

क्रमांक ०२ :- इनफ्लेटेबल रेस्क्यु बोट ओबीएमसह :-दराबाबतचा तुलनात्मक तक्ता पाहतां मे. इंटीग्रल स्फेटी इंजिनियर्स, ठाणे यांनी सर्वात कमी रुपये ३,८५,०००.०० दर नमूद केले आहे. परंतू कर्नल मराठे यांनी त्यांच्या अहवालामध्ये नमूद केलेप्रमाणे मे. स्टॅण्डर्ड फ्रिक्शन कांपोनन्टय, मुंबई यांनी सदर साहित्याबाबत पुरविलेले स्पेसिफिकेशननुसार मक्युरी पोर्टेबल ओबीएम हे साहित्य हे चांगल्या दर्जाचे असून सदरच्या एजन्सीने नमूद केलेले दर रुपये ३,९२,६००.०० यामध्ये सदर साहित्यासोबत रिपेअर किट पुरविणेस तयार असलेस सदर साहित्याची मागणी मे. स्टॅण्डर्ड फ्रिक्शन, मुंबई यांचेकडेस नोंदविण्यास हरकत नाही.

कर्नल मराठे, संचालक, आपत्ती व्यवस्थापन केंद्र, यशदा, पुणे यांचे अभिप्रायानुसार क्रमांक ३ ते १९ यामध्ये नमूद केलेले साहित्य हे तुलनात्मक तक्त्यामध्ये सर्वात कमी दर ज्या एजन्सीने नमूद केले आहे. त्यांचेकडून खरेदी करणेत यावे. याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. तथापी क्रमांक १२, रिफ्लेक्टीव जॅकेट मध्ये नमूद केलेले साहित्य मे. स्टॅण्डर्ड फ्रिक्शन कांपोनन्टस, मुंबई यांचेकडून खरेदी करणेत यावे कारण त्यांचे मटेरीअल चांगल्या दर्जाचे आहे, असे नमूद केले आहे.

अ.नं		कर्नल मराठे, यशदा, पुणे यांचे अभिप्रायानुसार खरेदी करावयाच्या एजन्सीचे नांव	एका नगाची खरेदीची किंमत रुपये
०१			
०२			
०३	वॉटरप्रुफ टॉर्च (रिचार्जेबल)	मे.इंटीग्रल सेफ्टी इंजिनियर्स, ठाणे	४,१००.००
०४	लाईफ जॅकेट फोम टाईप	मे.इंटीग्रल सेफ्टी इंजिनियर्स, ठाणे	१,३५०.००
०५	लाईफ बोया	मे.इंटीग्रल सेफ्टी इंजिनियर्स, ठाणे	२,१५०.००
०६	एसएआर लाईट	मे. स्टॅण्डर्ड फ्रिक्शन कांपोनन्ट्स, मुंबई	९,६५०.००
०७	सेफ्टी हेल्मेट	मे.इंटीग्रल सेफ्टी इंजिनियर्स, ठाणे	१६०.००
०८	पोर्टेबल जनरेटर सेट	मे.इंटीग्रल सेफ्टी इंजिनियर्स, ठाणे	१,३५,०००.००
०९	रीलीफ टेन्ट	मे.इंटीग्रल सेफ्टी इंजिनियर्स, ठाणे	९,८००.००
१०	गम बुटस	मे.इंटीग्रल सेफ्टी इंजिनियर्स	६८५.००
११	फायर इक्टसींगवीशर	मे.इंटीग्रल सेफ्टी इंजिनियर्स	२,१५०.००
१२	रिफ्लेक्टीव जॅकेट	मे. स्टॅण्डर्ड फ्रिक्शन कांपोनन्ट्स, मुंबई	४७०.००
१३	स्टेचर फोल्डेबल	मे.इंटीग्रल सेफ्टी इंजिनियर्स, ठाणे	८,१००.००
१४	नायलॉन रोप १६ mm dia	मे. स्टॅण्डर्ड फ्रिक्शन कांपोनन्ट्स, मुंबई	७,४४०.००
१५	वायर रोप ६ मीटर	मे.इंटीग्रल सेफ्टी इंजिनियर्स, ठाणे	१,५५०.००
१६	मनिला रोप ४०० मीटर	मे.इंटीग्रल सेफ्टी इंजिनियर्स, ठाणे	११,०००.००
१७	हेड पुलीज (सींगल)	मे.इंटीग्रल सेफ्टी इंजिनियर्स, ठाणे	१२,८००.००
१८	हेड पुलीज (डबल)	मे.इंटीग्रल सेफ्टी इंजिनियर्स, ठाणे	२८,०००.००
१९	गॅस कटर		३,५००.००

उपरोक्त प्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत प्राप्त झालेल्या अहवालानुसार सदरचे संपूर्ण मटेरीअल खरेदी करणेसाठी एकूण रु. ६०,९७,५००/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. तथापी महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र. सा. सं. वि- २००७/२८४/(४५)- का. सोळा, मंत्रालय, मुंबई- ४०००३२ दि. ०२.०८.२००७ अन्वये रु. ४९,४२,८००/- मात्र इतक्या रकमेची साधनसामुग्री खरेदी करुन उपलब्ध करुन देण्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे. त्यामुळे अपेक्षित खर्च हा शासन मान्यतेच्या मर्यादेबाहेर होऊ नये याकरीता आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांनी मागणी केलेल्या मटेरियलपैकी Resuce fibre boat- ०६ नग ऐवजी ०४ नग, Head Pulleys (Single)- १० नग ऐवजी ०५ नग आणि Head Pulleys (Double)-१० नग ऐवजी ०५ नग अशा प्रकारे कमी केल्यास एकुण रु. ४९,३७,३००/- मात्र इतका खर्च येईल. याकामी पुरवठाधारक मे. इंटीग्रल सेफ्टी इंजिनिअर्स,

ठाणे व मे. स्टॅण्डर्ड फ्रिक्शन कांपोनन्टस्, मुंबई यांना खालील तपशिलाप्रमाणे साहीत्य खरेदीसाठी पुरवठा आदेश देता येईल.

A) Integral Safety Engineers,Thane:-

S.No	Description of Item	Qty.	Unit	Rate	Amount
1	WATER PROOF TORCH (Rechargeable)	20	Nos	4,100.00	82,000.00
2	LIFE JACKET FOAM TYPE	300	Nos	1,350.00	405,000.00
3	LIFE BUOYS	40	Nos	2,150.00	86,000.00
4	SAFETY HELMET	100	Nos	160.00	16,000.00
5	PORTABLE GENERATOR (3500 Watts)	2	Nos	135,000.00	270,000.00
6	RELIEF TENT	20	Nos	9,800.00	196,000.00
7	GUMBOOTS	50	Nos	685.00	34,250.00
8	FIRE EXTINGUISHER	15	Nos	2,150.00	32,250.00
9	STRETCHER FOLDABLE	20	Nos	8,100.00	162,000.00
10	WIRE ROPE 6 MT	10	Nos	1,550.00	15,500.00
11	HEAD PULLEYS (Single)	5	Nos	12,800.00	64,000.00
12	HEAD PULLEYS (Double)	5	Nos	28,000.00	140,000.00
13	GAS CUTTER	10	Nos	3,500.00	35,000.00
			Total Amount Rs:		**1,538,000.00**

B) Standard Friction Components LTD., Mumbai :-

S.No	Description of Item	Qty.	Unit	Rate Rs.	Amount Rs.
1	RESCUE FIBRE BOAT WITH OBM AND WITH FLAT BOARD.	4	Nos	478,100.00	1,912,400.00
2	INFLATABLE RESCUE BOAT WITH OBM AND WITH REPAIR KIT.	3	Nos	392,600.00	1,177,800.00
3	SEARCH RESCUE LIGHT (DIVING TORCH)	10	Nos	9,650.00	96,500.00
4	REFLECTIVE JACKET	60	Nos	470.00	28,200.00
5	NYLON ROPES 400 MT	10	Nos	7,440.00	74,400.00
6	MANILA ROPE 400 MT	10	Nos	11,000.00	110,000.00
				Total Amount :	**3,399,300.00**

तरी वरीलप्रमाणे पुरवठादार यांचेकडून उपरोक्त दर्शविलेल्या तपशिलानुसार साहित्य खरेदीस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

विषय नं.२८ सिकंदराबाद येथील राधास्वामी ट्रस्टने दिलेल्या इमारतीत माहिती केंद्राचे उद्घाटन करणेकामी दुसऱ्या माळ्यावरील भिंती, फ्लोरींग काढणे, रंगकाम करणेबाबत.

निर्णय नं.२८ एस राधास्वामी फाउंडेशन, सिकंदराबाद यांचेकडून वाय.एम.सी.ए. काम्प्लेक्स, एस.पी.रोड, सिकंदराबाद येथील दोन बांधीव जागा (फ्लॅटस) २०० चौ.फुट जागा तळमजल्यावर व ३००० चौ.फुट जागा दुसऱ्या मजल्यावर दि. २४ जानेवारी २००७ रोजी भाडेपट्ट्याने मिळाली आहे. साईभक्तांना मार्गदर्शनासाठी तळमजल्यावर माहिती केंद्र सुरु करण्यात आले आहे. तसेच दुसऱ्या मजल्यावरील ३००० चौ.फुट जागेत साईभक्तांसाठी गेस्ट हाऊस उभारणेस मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०७/०७/२००८ रोजीचे सभेत निर्णय क्र. ६२६ अन्वये मान्यता मिळाली आहे.

दुसऱ्या मजल्यावर असणाऱ्या फ्लॅटच्या जागेत गेस्ट हाऊस उभारणेसाठी त्यांचे पूर्णपणे नूतीकरण करणे गरजेचे आहे. यासाठी त्याठिकाणी पूर्वीचे असणारे बांधकाम, फरशी जुनी इलेक्ट्रीकल वायरींग इ. काढणे गरजेचे आहे. यासाठी हैद्राबाद येथील स्थानीक ठेकेदारांकडून कोटेशन मागविता येतील.

तरी सिकदराबाद येथील फ्लॅटमध्ये जुने विट बांधकाम, फरशी इ. काढणे याकामी येणारे रक्कम रुपये ९०,०००.०० मात्रचे खर्चास तसेच याकामी कोटेशन्स मागविणेकरीता मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

विषय नं.२९ नवीन लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स नेमणूकीबाबत निर्णय घेणे.

निर्णय क्र.२९ संस्थानला लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्समार्फत कंत्राटी पध्दतीने अकुशल कामगार १९९४ पासून, कुशल कामगार सन-१९९९ पासून तसेच सुरक्षा कर्मचारी सन-१९९१ पासून व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी सन-२००६ पासून पुरविणेत येत आहे. सध्या लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचेमार्फत संस्थानचे संबंधीत विभागांना आवश्यकतेनुसार व गरजेनुसार दैनंदिन कामासाठी १२६० कंत्राटी कामगार पुरविणेत येतात. कॉन्ट्रॅक्टर्समार्फत कामास घेण्यात येणाऱ्या कंत्राटी अकुशल, कुशल कामगार व सिव्हीलीयन सुरक्षा गार्ड

यांना किमान वेतन कायदयानुसार, शॉप ॲन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.३ प्रमाणे किमान वेतन दर देण्यात येत आहे. तसेच सुरक्षा अधिकारी, सुरक्षा पर्यवेक्षक, सशस्त्र सुरक्षा रक्षक व माजी सैनिक सुरक्षा गार्ड यांना चर्चा/वाटाघाटीत ठरलेप्रमाणे वेतनदर देण्यात येत आहे.

मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.,पुणे व मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्यूरिटी (इंडिया) लि.,नाशिक यांची लेबर कॉन्ट्रॅक्टर म्हणून तसेच मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि.,मुंबई यांची सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर म्हणून दि.०१-११-२००७ पासून नेमणूक करणेत आलेली आहे. संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटल सुरक्षेकामी मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस प्रा.लि.पुणे यांची सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी दि.१७-०८-२००७ पासून सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर म्हणून व मे ईगल आय एन्टरप्राईज, वापी (गुजरात) यांची साई मंदिर परिसर व महाद्वार सुरक्षेकामी सेवानिवृत्त/माजी सैनिकांमधून कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी दि.११-८-२००७ पासून सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर म्हणून नेमणूक करणेत आलेली आहे. सदर लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे ठेकेदारीची/कराराची वाढीव मुदत दि.३१-१२-२००८ अखेर संपत आहे.

सध्या मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.,पुणे यांचेमार्फत मंदिर परिसरातील प्रशासन शाखा,विद्युत, पाणीपुरवठा,मंदिर,लेखाशाखा,प्रसादालय,भांडार, चौकशी,खरेदी, जनसंपर्क, बगीचा, कॅन्टीन, ध्वनीक्षेपण, अंतर्गत लेखा परिक्षण, अभिलेख कक्ष, आय.टी.,प्रकाशने इत्यादि विभागांना प्रतिदिनी ३०८ अकुशल, कुशल कंत्राटी कामगार व मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्यूरिटी (इंडिया) लि.,नाशिक यांचेमार्फत संस्थानचे मंदिर परिसराबाहेरील इतर म्हणजेच बांधकाम, श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईबाबा हॉस्पीटल, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, आरोग्य, कन्याशाळा व कनिष्ठ महाविद्यालय, इंग्लीश मिडीयम स्कुल, आय.टी.आय., वाहन, धर्मशाळा इत्यादि.विभागांना प्रतिदिनी ५०६ असे एकूण ८१४ अकुशल, कुशल कंत्राटी कामगार पुरविणेत येतात. तसेच मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई यांचेमार्फत संस्थानचे मंदिर परिसरातील व साईबाबा भक्तनिवासस्थान तसेच इतर परिसरातील व्यवस्थेकामी प्रतिदिनी ३२९ सुरक्षा कर्मचारी व मे ईगल आय एन्टरप्राईज, वापी (गुजरात) यांचेमार्फत मंदिर परिसर महाद्वार सुरक्षेकामी प्रतिदिनी ४५ माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी, मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस प्रा.लि.पुणे यांचेमार्फत श्री साईबाबा हॉस्पीटल येथील सुरक्षेकामी प्रतिदिनी ७२ सुरक्षा कर्मचारी असे एकूण-४४६ कंत्राटी सुरक्षा कर्मचारी पुरविणेत येत आहे.

संस्थानला अकुशल, कुशल कामगार व अनुभवी सुरक्षा कर्मचारी, माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुढील एक वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने पुरविणेसाठी नविन ठेकेदारांची /कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेसाठी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीस देवून, मान्यता प्राप्त ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविणेत आल्या होत्या सिलबंद निविदा विक्रीची मुदत दि.१९-०९-२००८ पासून ते दि.३०-०९-२००८ पर्यंत अशी होती. तसेच सिलबंद निविदा स्विकारणेची अंतीम मुदत दि.०१-१०-२००८ रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत अशी होती.

त्यास अनुसरुन मान्यता प्राप्त कंत्राटदारांकडून/ठेकेदारांकडून संस्थानचे शिरडी कार्यालयास ३८ व मुंबई कार्यालयास ०७ अशा एकूण ४५ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहे. सदरच्या ४५ सिलबंद निविदा मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८-१०-२००८ रोजीचे सभेमध्ये उघडणेत येऊन, त्याबाबत तुलनात्मक तक्ता तयार करुन, तो मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५-११-२००८ रोजीचे सभेपुढे विचारार्थ सादर करणेत आला. तसेच सदर दिवसी उपस्थित ४२ कंत्राटदारांशी /ठेकेदारांशी त्यांचे निविदेतील दरासंदर्भात चर्चा/वाटाघाटीचे वेळी त्यांनी निविदेत देऊ केलेल्या दरात आणखी सुट देणार किंवा कसे? याबाबत माहिती (अंतिम सुधारीत दरपत्रक) लेखी स्वरुपात बंद पाकिटात दि.२०-११-२००८ अखेर संस्थानकडे सादर करावी. असे त्यांना सांगण्यात आले. तसेच ज्या ठेकेदारांची वार्षीक उलाढाल रुपये एक कोटी पेक्षा जास्त आहे. अशा ठेकेदारांचाच विचार करणेत यावा असे ठरले.

त्याप्रमाणे चर्चा/वाटाघाटीचे वेळी संबंधीत उपस्थित ४२ कंत्राटदरापैकी/ठेकेदारांपैकी ४० कंत्राटदार/ठेकेदरांनी देऊ केलेले अंतिम सुधारीत दर (बंद पाकिटे) प्राप्त झालेले असून ते उघडणेत येऊन, त्याबाबत तुलनात्मक तक्ता तयार करणेत आलेला आहे. तसेच वार्षीक उलाढाल रुपये एक कोटी पेक्षा जास्त असलेल्या ठेकेदारांचा स्वतंत्र तुलनात्मक तक्ता तयार करणेत आलेला आहे. तो खालीलप्रमाणे-

(अ) संस्थानला सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणे-

अ. नं.	निविदाधारकाचे नांव व पत्ता	प्रतिदिनी वेतनदर (रुपये)					सर्व्हिस चार्जेस (टक्केवारी)	सर्व्हिस टॅक्स (टक्केवारी) (१२.३६%)	प्रॉव्हीडंड फंड (टक्केवारी) (१३.६१%)
		संरक्षण अधिकारी (माजी सैनिक) रुपये	सुरक्षा सुपरवायझर (माजी सैनिक) रुपये	सशस्त्र सुरक्षा रक्षक (माजी सैनिक) रुपये	सुरक्षा गार्ड (माजी सैनिक) रुपये	सुरक्षा गार्ड (पुरुष/स्त्री) सिव्हीलियन (कि.वे.दर रु.१३१.९७)			
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)
१	बरोडा सिक्युरिटी	३६०.००	२६७.००	२२१.३५	२००.१०	११२.६९	---	१२.३६%	१३.६१%

	एजन्सी, प्रा.लि. बडोदरा माळी मोहल्ला, गुजरात,								
२	**मे सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि.,**विलेपार्ले (प), मुंबई-४०० ०५६.	३६०.००	२६७.००	२२१.३५	२००.१०	१३१.९७	०.०२%	१२.३६%	१३.६१%
३	**श्री.भाऊसाहेब भागवत साठे,** मु.पो.बेल पिंपळगांव, ता.नेवासा, जि.अहमदनगर.	१३०.५०	१३०.२५	१३४.७०	१२९.१०	१२५.१५	०.०५%	१२.३६%	---
४	**मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस** एम.जी.रोड, कॅम्प, पुणे-४११ ००१. **(अपात्र)**	२१५.५०	१७५.००	१९३.७५	१५०.७५	१४५.००	०.०५%	१२.३६%	१३.६१%
५	**प्रखर सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस,** अरोरा टॉवर जवळ, पुणे.	२५७.५५	२५०.४७	---	---	२४३.३६	०.०५%	१२.३६%	१३.६१%
६	**ज्वाला सिक्युरिटी फोर्स,**कामटी रोड, नागपूर-१७	३०४.००	२००.००	१९६.००	१८९.००	१८९.००	०.४७%	---	---
७	**मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया)** नाशिक-पुणेरोड, नाशिक- ४२२ १०१.	१३९.६६	१३५.८२	१८४.५५	१३१.९७	१३१.९७	०.७५%	१२.३६%	१३.६१%
८	**संतोष केअरवेल सर्व्हिसेस प्रा. लि.** नाशिकरोड, नाशिक-४२२ १०१	१३९.६६	१३५.८२	१८४.५५	१३१.९७	१३१.९७	०.७५%	१२.३६%	१३.६१%
९	**फ्लॅश सिक्युरिटी ॲन्ड इंटेलिजन्स सर्व्हिसेस,** कांदिवली (पुर्व), मुंबई-४०० १०१.	११९.७९	११२.७९	११९.७९	१०८.७९	१०४.७९	०.७९%	१२.३६%	१३.६१%
१०	**सेन्ट्रल इन्व्हेस्टीगेशन ॲन्ड सिक्युरिटी सर्व्हिसेस लि.** अंधेरी (पश्चिम), मुंबई-४०० ०५३.	३३५.००	२७०.००	२२१.००	१७८.००	१५५.००	१.००%	१२.३६%	---
११	**श्री शिवसाई सर्व्हिसेस,**मु.पो.शिरडी, ता.राहाता, जि.अहमदनगर	३६०.००	२६७.९०	२२१.३५	२००.१०	१३१.९७	१.०० %	१२.२४%	१३.६१%
१२	**मे.टॉप्स सिक्युरिटी लिमिटेड,** गोरेगांव (पुर्व), मुंबई-४००० ६५.	२६६.००	२५९.००	४१६.००	२४३.००	१९१.००	१.००%	१२.३६%	१२.००%
१३	**ब्लॅक कॅट इंटेलिजन्स प्रायव्हेट लिमिटेड,** न्यु. बी.जे. मार्केट, जळगांव-४२५ ००१.	२१०.००	२०१.००	२९५.००	१८२.००	१८०.६०	२.००%	१२.३६%	१३.६१%
१४	**ईगल हंटर सोल्युशन्स लिमिटेड,** अंधेरी (वेस्ट), मुंबई.४००० ५३	५००.००	२३०.००	२८८.६०	२००.००	११९.९५	२.२५%	१२.३६%	१३.६१%
१५	**एस्कॉर्ट सर्व्हिसेस,** पुणे-सातारा रोड, पुणे-४११ ०४३.	१३९.६६	१३५.८२	१३९.६६	१३१.९७	१३१.९७	२.५%	१२.३६%	१३.६१%
१६	**आदित्य मल्टी सर्व्हिसेस,**शिवाजी नगर, पुणे-४११ ००५.	२२५.००	२१०.००	२१०.००	१९०.००	१५०.००	२.५%	१२.३६%	१३.६१%

१७	**मे.मेट्रो लेबर कॉन्ट्रॅक्टर ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस,** पाथर्डी रोड नाशिक-४२२ ००९.	१५१.१९	१५१.१९	१५१.१९	१५१.१९	१४७.३५	२.७५%	१२.३६%	१३.६१%
१८	**युनाईटेड सर्व्हिसेस,** धनकवडी, पुणे-४११ ०४३.	१३९.६६	१३५.८२	१३९.६६	१३१.९७	१३१.९७	३.००%	१२.३६%	१३.६१%
१९	**ड्रेगॉन सर्व्हिसेस,** अंधेरी (पश्चिम), मुंबई-४०० ०५३.	२४३.००	१६५.००	२२०.००	१५०.००	१४०.००	३.००%	१२.३६%	४१.००% सर्व आर्थिक जबाबदाऱ्या समाविष्ट आहे.
२०	**गार्डीयन फॅसिलिटीज मॅनेजमेंट (नागपूर)प्रा.लि.,** पुणे-सातारा रोड, पुणे-४११०४३.	४७३.००	४५८.००	४५१.००	४२८.००	२९४.००	३.००%	१२.३६%	१२.००%
२१	**मे.यश सिक्युरिटी ॲन्ड लेबर सर्व्हिसेस,** वाळुज, औरंगाबाद-४३१ १३६.	३०७.६९	१९२.३०	२३०.७६	१५३.८४	१३१.९६	३.४%	१२.२४%	१३.६१%
२२	**औरंगाबाद मल्टी सर्व्हिसेस,** जालना रोड, औरंगाबाद.	२३०.७५	१३९.६५	२६९.००	१३५.८०	१३१.९५	४.५%	१२.३६%	१३.६१%
२३	**साई सिक्युरिटी सर्व्हिसेस,**सिन्नर, जि.नाशिक-४२२ १०३	३६०.००	२६७.९०	२२१.३५	२००.१०	१३१.९७	५.००%	१२.३६%	१३.६१%
२४	**युनिक डेल्टा फोर्स सिक्युरिटी प्रा.लि.,** कासारवाडी, पुणे	३८०.००	२८५.००	२५५.००	२१८.००	१५६.००	५.००%	१२.३६%	१३.६१%
२५	**प्रताप डिटेक्टीव्ह ॲन्ड सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि.,**त्रीलंगा, भोपाळ-४६२ ०३९ (मध्यप्रदेश).**(अपात्र)**	---	---	---	---	---	---	---	---
२६	**ईगल सिक्युरिटी ॲन्ड परसोनेल सर्व्हिसेस,** अंधेरी (वेस्ट) ,मुंबई-४०० ०५८.**(अपात्र)**	८७३.७६	३३५.९३	३१४.००	२५५.७०	१३२.००	५.००%	१२.३६%	१३.६१%
२७	**धैर्य सिक्युरिटी ॲन्ड लेबर सर्व्हिसेस,** मु.पो.नारायणगांव, ता.जुन्नर, जि.पुणे.४१०५०४	३६१.००	२६७.००	२२१.४६	२०१.४७	१३५.८१	७.००%	१२.३६%	१३.६१%
२८	**मेजर इंडस्ट्रियल सिक्युरिटी असोशियशन,** ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर	३६०.००	२६७.९०	२२१.३५	२००.१०	---	७.५%	१२.३६%	१३.६१%
२९	**साई सिक्युरिटी सर्व्हिसेस,** सिन्नर, जि.नाशिक-४२२ १०३	३६०.००	२६७.९०	२२१.३५	२००.१०	१३१.९७	८.००%	१२.३६%	१३.६१%
३०	**पायोनिअर सिक्युरिटी सर्व्हीसेस** नवी सांगवी, पुणे-४११ ०२७.	३६०.००	२६७.६८	२२१.४६	२०१.००	१३१.९७	८.००%	१२.३६%	१३.६१%
३१	**मे.ईगल आय एन्टरप्राईज,**दमन- वापी रोड, दमन(यु.टी.) गुजरात	३६०.००	२६७.९०	२२१.३५	२००.१०	---	१०.००%	१२.३६%	१३.६१%
३२	**तोगे एन्टरप्राईजेस,** वाळूज, म.आय.डी.सी., औरंगाबाद.	---	---	---	--	१५५.००	१०.००%	१२.३६%	१३.६१%

३३	**बीसेफ,** चंदननगर, नगररोड, पुणे-४११ ०१४.	३९०.००	३६५.००	३६५.००	३१५.००	३००.००	१२.५%	१२.३६%	१३.६१%
३४	**मे.महात्मा फुले मल्टी सर्व्हिसेस,** परभणी.४३१ ४०२ **(अपात्र)**	३४९.८८	२४९.८८	३४९.८८	१८८.८८	१४९.८८	३.८८%	---	---
३५	**कुशांग सिक्युरिटी ॲन्ड प्रोटेक्शन सर्व्हिसेस,** वडाळा (पुर्व), मुंबई-४०० ०३७.**(अपात्र)**	---	---	---	---	---	---	---	---
३६	**यश इंडस्ट्रीयल सर्व्हिसेस** सिवने, पुणे-४११ ०२३ **अनुपस्थित)**	२४५.००	२३८.००	----	२३८.००	२२८.००	१०.००%	१२.३६%	२५.६१%
३७	**नॅशनल एक्स सर्व्हिसमन सिक्युरिटी गार्ड,** गुलमोहोर रोड, अहमदनगर. **(अनुपस्थित)**	----	----	----	----	----	----	----	----
३८	**मे.श्रीकृपा सर्व्हिसेस,** आकुर्डी, पुणे-४११ ०३५. **(अनुपस्थित)**	----	----	----	----	----	----	----	----

(ब) संस्थानला कुशल, अकुशल कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणे-

अ. नं.	निविदाधारकाचे नांव व पत्ता	प्रतिदिनी वेतनदर (रुपये)		सर्व्हिस चार्जेस (टक्केवारी)	सर्व्हिस टॅक्स (टक्केवारी) (१२.३६%)	प्रॉव्हीडंड फंड (टक्केवारी) (१३.६१%)
		कुशल कामगार (कि.वे.दर रु. १३९.६६) रुपये	अकुशल कामगार (कि.वे.दर रु. १३१.९७) रुपये			
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
१.	**मे. तिरुमला सर्व्हिसेस,** हडपसर, पुणे-४११ ०२८.	---	२१३.५३	---	---	---
२.	**ट्रेन्ड मॅनेजमेंट कन्सल्टंन्सी ॲन्ड सर्व्हिसेस,** हडपसर, पुणे-४११ ०२८.	---	२१२.०२	---	---	---
३.	**मे.बी.व्ही.जी.इंडिया लिमिटेड,** चिंचवड, पुणे-४११ ०१९.	१३९.६६	१३१.९७	०.०१%	१२.३६%	१३.६१%
४.	**सुपर फॅसिलीटी मॅनेजमेंट एक्सपर्ट्स,** विलेपार्ले (पश्चिम), मुंबई-४०० ०५६.	---	१३१.९७	०.०२%	१२.३६%	१३.६१%
५.	**मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस प्रा.लि.,** एम.जी.रोड, पुणे-४११ ००१.**अपात्र**	१४६.६५	१३८.५८	०.०५%	१२.३६%	१३.६१%
६.	**श्री.महेंद्र मोहनीराज गंधे,** सावेडी रोड, अहमदनगर.	१३९.६६	१३१.९७	०.५०%	१२.३६%	१३.६१%
७.	**मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया) लि.,** २ नेहरु नगर समोर, नाशिक-पुणेरोड नाशिक- ४२२ १०१.	१३९.६६	१३१.९७	०.७५%	१२.३६%	१३.६१%
८.	**संतोष केअरवेल सर्व्हिसेस प्रा.लि.** नाशिकरोड, नाशिक-४२२ १०१	१३९.६६	१३१.९७	०.७५%	१२.३६%	१३.६१%
९.	**ब्लॅक कॅट इंटेलिजन्स प्रायव्हेट लिमिटेड,** जळगांव-४२५ ००१.	१८६.००	१७५.५०	२.००%	१२.३६%	१३.६१%

अ. नं.	निविदाधारकाचे नांव व पत्ता	प्रतिदिनी वेतनदर (रुपये)		सर्व्हिस चार्जेस (टक्केवारी)	सर्व्हिस टॅक्स (टक्केवारी) (१२.३६%)	प्रॉव्हीडंड फंड (टक्केवारी) (१३.६१%)
		कुशल कामगार (कि.वे.दर रु. १३९.६६) रुपये	अकुशल कामगार (कि.वे.दर रु. १३१.९७) रुपये			
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
१०.	**एस्कॉर्ट सर्व्हिसेस,** पुणे-सातारा रोड, पुणे-४११ ०४३.	१३९.६६	१३१.९७	२.५%	१२.३६%	१३.६१%
११.	**मे.रिलायंन्स एन्टरप्रायजेस,** ईस्ट स्ट्रीट, कॅम्प, पुणे-४११ ००१.	१३७.००	१३२.००	२.५०%	१२.३७%	१३.७१%
१२.	**आदित्य मल्टी सर्व्हिसेस,** शिवाजी नगर, पुणे-४११ ००५.	१७०.००	१५०.००	२.५%	१२.३६%	१३.६१%
१३.	**मे.मेट्रो लेबर कॉन्ट्रॅक्टर ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस,** पाथर्डी रोड, नाशिक-४२२ ००९.	१५१.१९	१४२.२१	२.७५%	१२.३६%	१३.६१%
१४.	**गार्डीयन फॅसिलिटीज मॅनेजमेंट (नागपूर) प्रा.लि.,** धनकवडी, पुणे-सातारा रोड, पुणे-४११०४३.	२४९.००	२१०.००	३.००%	१२.३६%	१२.००%
१५.	**युनाईटेड सर्व्हिसेस,** धनकवडी, पुणे-४११ ०४३.	१३९.६६	१३१.९७	३.००%	१२.३६%	१३.६१%
१६.	**मे.यश सिक्युरिटी ॲन्ड लेबर सर्व्हिसेस,** वाळुज,औरंगाबाद-४३१ १३६.	१३९.६५	१३१.९६	३.४%	१२.२४%	१३.६१%
१७.	**औरंगाबाद मल्टी सर्व्हिसेस,** जालना रोड,औरंगाबाद.	१३९.६५	१३१.९५	४.५%	१२.३६%	१३.६१%
१८.	**मे.आर.आर.काजळे, लेबर कॉन्ट्रॅक्टर,** सातपुर-अंबड लिंक रोड, नाशिक.	१३५.८२	१३२.३१	५.००%	१२.३६%	१३.६१%
१९.	**ईगल सिक्युरिटी ॲन्ड परसोनेल सर्व्हिसेस,** अंधेरी (वेस्ट),मुंबई-४०० ०५८.	१४८.००	१३२.००	५.००%	१२.३६%	१३.६१%
२०.	**युनिक डेल्टा फोर्स सिक्युरिटी,** कासारवाडी, पुणे- ४११ ०३४	२८५.००	१५६.००	५.००%	१२.३६%	१३.६१%
२१.	**धैर्य सिक्युरिटी ॲन्ड लेबर सर्व्हिसेस,** ता.जुन्नर,जि.पुणे.४१०५०४	२०१.४७	१३५.८१	७.००%	१२.३६%	१३.६१%
२२.	**पायोनिअर सिक्युरिटी सर्व्हीसेस** नवी सांगवी,पुणे-४११ ०२७.	२०१.४७	१३१.९७	८.००%	१२.३६%	१३.६१%
२३.	**तोगे एन्टरप्राईजेस,** वाळूज, एम.आय.डी.सी., औरंगाबाद.	१३५.००	१२०.००	१०.००%	१२.३६%	१३.६१%
२४.	**बीसेफ,** चंदननगर, नगररोड, पुणे-४११ ०१४.	३००.००	२८०.००	१२.५%	१२.३६%	१३.६१%
२५.	**यश इंडस्ट्रीयल सर्व्हिसेस** सिवने, पुणे-४११ ०२३. **(अनुपस्थित)**	----	१९८.००	१०.००%	१२.३६%	२५.६१%
२६.	**मे.महात्मा फुले मल्टी सर्व्हिसेस,** बसमत रोड, परभणी.४३१ ४०२**(अपात्र)**	१४९.८८	१३१.८८	३.८८%	----	----
२७.	**प्रताप डिटेक्टीव्ह ॲन्ड सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि.,** भोपाळ-४६२०३९ (म.प्र.)	----	----	----	----	----

अ. नं.	निविदाधारकाचे नांव व पत्ता	प्रतिदिनी वेतनदर (रुपये)		सर्व्हिस चार्जेस (टक्केवारी)	सर्व्हिस टॅक्स (टक्केवारी) (१२.३६%)	प्रॉव्हीडंड फंड (टक्केवारी) (१३.६१%)
		कुशल कामगार (कि.वे.दर रु. १३९.६६) रुपये	अकुशल कामगार (कि.वे.दर रु. १३१.९७) रुपये			
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
	(अपात्र)					
२८.	**कुशांग सिक्युरिटी ॲन्ड प्रोटेक्शन सर्व्हिसेस,** वडाळा (पुर्व), मुंबई-४०० ०३७.**(अपात्र)**	----	----	----	----	----
२९.	**नॅशनल एक्स सर्व्हिसमन** अहमदनगर.**(अनुपस्थित)**	----	----	----	----	----
३०.	**मे.श्रीकृपा सर्व्हिसेस,** आकुर्डी, पुणे-४११ ०३५. **(अनुपस्थित)**	----	----	----	----	----

सबब, संस्थानला अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी पुढील एक वर्ष कालावधीसाठी नविन लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स नेमणूकी संदर्भात निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, खालील निविदासादरकर्त्यांना उपसमितीचे सभेत समक्ष/वाटाघाटीसाठी बोलावून अंतिम निर्णय घ्यावा,तसेच यापुढे कॉन्ट्रॅक्टचा कालावधी १ वर्षा ऐवजी ३ वर्षे करणेत यावा, असे ठरले.

अ.नं.	निविदासादरकर्त्याचे नांव
०१.	मे.टॉप्स सिक्युरिटी लिमिटेड, गोरेगांव (पुर्व), मुंबई-४००० ६५.
०२.	मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया) नाशिक-पुणेरोड, नाशिक- ४२२ १०१.
०३.	सेन्ट्रल इन्व्हेस्टीगेशन ॲन्ड सिक्युरिटी सर्व्हिसेस लि. अंधेरी (पश्चिम), मुंबई-४०० ०५३.
०४.	युनिक डेल्टा फोर्स सिक्युरिटी प्रा.लि.,कासारवाडी, पुणे- ४११ ०३४
०५.	बीसेफ,चंदननगर, नगररोड,पुणे-४११ ०१४.
०६.	ईगल हंटर सोल्युशन्स लिमिटेड, अंधेरी (वेस्ट), मुंबई.४००० ५३
०७.	औरंगाबाद मल्टी सर्व्हिसेस, जालना रोड, औरंगाबाद.
०८	मे.ईगल आय एन्टरप्राईज,दमन- वापी रोड,दमन(यु.टी.) गुजरात
०९	मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस एम.जी.रोड, कॅम्प, पुणे-४११ ००१
१०	ईगल सिक्युरिटी ॲन्ड परसोनेल सर्व्हिसेस,अंधेरी (वेस्ट) ,मुंबई-४०० ०५८
११	फ्लॅश सिक्युरिटी ॲन्ड इंटेलिजन्स सर्व्हिसेस, कांदिवली (पुर्व), मुंबई-४०० १०१.
१२	मे सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि.,विलेपार्ले (पश्चिम),मुंबई-४०० ०५६.
१३	गार्डीयन फॅसिलिटीज मॅनेजमेंट (नागपूर)प्रा.लि.,पुणे-सातारा रोड,पुणे-४११०४३.
१४	संतोष केअरवेल सर्व्हिसेस प्रा. लि. नाशिकरोड, नाशिक-४२२ १०१
१५	एस्कॉर्ट सर्व्हिसेस, पुणे-सातारा रोड,पुणे-४११ ०४३.
१६	ड्रेगॉन सर्व्हिसेस, अंधेरी (पश्चिम), मुंबई-४०० ०५३.
१७	युनाईटेड सर्व्हिसेस, धनकवडी, पुणे-४११ ०४३.
१८	ब्लॅक कॅट इंटेलिजन्स प्रायव्हेट लिमिटेड,न्यु. बी.जे. मार्केट,जळगांव-४२५ ००१.
१९	पायोनिअर सिक्युरिटी सर्व्हीसेस नवी सांगवी, पुणे-४११ ०२७.
२०	तोगे एन्टरप्राईजेस, वाळूज, एम.आय.डी.सी.,औरंगाबाद.

(कार्यवाही-कामगार अधिकारी)

विषय नं.३० अकुशल, कुशल व सुरक्षा कंत्राटी कामगार पुरविणारे लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे ठेकेदारीस/ करारास मुदतवाढ देणे बाबत

निर्णय क्र.३० मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.,पुणे व मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्यूरिटी (इंडिया) लि.,नाशिक यांची लेबर कॉन्ट्रॅक्टर म्हणून तसेच मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि.,मुंबई यांची सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर म्हणून दि.०१-११-२००७ पासून नेमणूक करणेत आलेली आहे. संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटल सुरक्षेकामी मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस प्रा.लि.पुणे यांची सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी दि.१७-०८-२००७ पासून सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर म्हणून व मे ईगल आय एन्टरप्राईज, वापी (गुजरात) यांची साई मंदिर परिसर व महाद्वार सुरक्षेकामी सेवानिवृत्त/माजी सैनिकांमधून कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी दि.११-८-२००७ पासून सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर म्हणून नेमणूक करणेत

आलेली आहे. सदर लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे ठेकेदारीची/कराराची वाढीव मुदत दि.३१-१२-२००८ अखेर संपत आहे.

संस्थानला अकुशल, कुशल कामगार व अनुभवी सुरक्षा कर्मचारी, माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुढील एक वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने पुरविणेसाठी नविन ठेकेदारांची /कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेसाठी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीस देवून, मान्यता प्राप्त ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविणेत आल्या होत्या. सिलबंद निविदा विक्रीची मुदत दि.१९-०९-२००८ पासून ते दि.३०-०९-२००८ पर्यंत अशी होती. तसेच सिलबंद निविदा स्विकारणेची अंतीम मुदत दि.०१-१०-२००८ रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत अशी होती.

त्याप्रमाणे संस्थानकडे मान्यताप्राप्त ठेकेदारांकडून एकूण ४५ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत सदर ४५ सिलबंद निविदा मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८-१०-२००८ रोजीचे सभेमध्ये उघडणेत येऊन, त्याबाबत तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला होता. सदर तक्ता मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५-११-२००८ रोजीचे सभेमध्ये निर्णयार्थ सादर करुन, संबंधीत ठेकेदारांना चर्चा/वाटाघाटीसाठी उपस्थित राहणेबाबत कळविणेत आले होते. चर्चा/वाटाघाटीचे वेळी उपस्थित ४२ कंत्राटारांपैकी ४० कंत्राटदार/ठेकेदारांनी देवू केलेले अंतिम सुधारीत दरपत्रक (बंद पाकीटे) उघडणेत येवून त्याबाबतचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत येवून, तो मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अंतिम निर्णयासाठी सादर करणेत आलेला आहे.

नविन ठेकेदारांचे नेमणूकीबाबत अंतिम निर्णय झालेनंतर निविदा मंजूर होणाऱ्या ठेकेदारांना वर्क ऑर्डर्स देणे, करारनामा करुन घेणे, ठेकेदारांकडून नियमानुसार लेबर लायसेन्स, नोंदणी प्रमाणपत्र व इतर अनुशंगीक कागदपत्रांची पुर्तता करुन घेणे इत्यादी कार्यवाहीस सुमारे एक महिन्याचा कालावधी लागणार आहे.

म्हणून कामाची गैरसोय होऊ नये याकरीता सध्याच्या मे.बी.व्ही.जी.इंडिया लि., पुणे व मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्यूरिटी (इंडिया) लि.,नाशिक लेबर कॉन्ट्रॅक्टर यांचेमार्फत पुरविणेत येणाऱ्या कंत्राटी अकुशल, कुशल कामगारांच्या ठेकेदारीस/करारास तसेच मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई, मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस प्रा.लि.,पुणे व मे ईगल आय एन्टरप्राईज, वापी (गुजरात) सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांचेमार्फत पुरविणेत येणाऱ्या कंत्राटी सुरक्षा कर्मचारी, माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी यांच्या ठेकेदारीस/करारास सध्याचे कंत्राटासंबंधातील वर्क ऑर्डर व करारातील अटी,शर्ती व दरपत्रक यास अधिन राहून दि.०१-०१-२००९ पासून ते दि.३१-०१-२००९ पर्यंत एक महिना मुदतवाढ देणेस कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,सध्याचे लेबर व सिक्यूरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे ठेकेदारीस/करारास सध्याचे कंत्राटासंबंधातील वर्कऑर्डर व करारातील अटी शर्ती व दरपत्रक यास अधिन राहून दिनांक १.१.२००९ पासून २८.२.२००९ पर्यंत दोन महिने मुदतवाढ देणेत यावी,असें ठरलें.

(कार्यवाही-कामगार अधिकारी)

विषय नं.३१ संस्थानचे वाहन विभागात लेबर कॉन्ट्रॅक्टर मार्फत नवीन वाहनचालक (कंत्राटी कुशल कामगार)घेणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.३१ मे.बी.व्ही.जी.इंडिया लि., पुणे व मे. बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया) लि., नाशिक, लेबर कॉन्ट्रॅक्टर यांचेमार्फत संस्थानचे संबंधीत विभागांना आवश्यकतेनुसार व गरजेनुसार वेळोवेळी कंत्राटी अकुशल, कुशल कामगार पुरविणेत येत आहे. मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया), लि., नाशिक, यांचेमार्फत संस्थानचे वाहन विभागास सध्या कंत्राटी पध्दतीने वाहन चालक-३० (कुशल), फिटर-०६ (कुशल) व मदतनीस-०५ (अकुशल) असे एकूण-४१ कंत्राटी कर्मचारी पुरविणेत येत आहे. तसेच वाहन विभागात कायम वाहन चालक १६, मानधनावरील वाहन चालक १७ असे एकूण-३३ कायम कर्मचारी कार्यरत आहेत. संस्थानकडे सध्या विविध प्रकारची एकूण ४६ वाहने असून, कामाच्या गरजेनुसार सदर वाहनांचा वापर करणेत येत आहे. वाहन विभागातील वाहनांची संख्या विचारात घेता, त्याकामी ७५ वाहन चालक व त्यांच्या आठवडा सुट्टी, रजा सोडविणेकामी २१ अशा एकूण ९६ वाहन चालकांची आवश्यकता आहे. पैकी वाहन विभागाकडे सध्या ६३ वाहन चालक उपलब्ध असून, त्यांना सध्या ३३ अतिरिक्त वाहन चालकांची आवश्यकता असून तेवढे वाहन चालक कमी पडत आहे.

सबब, मे. बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया) नाशिक, लेबर कॉन्ट्रॅक्टर यांचेमार्फत वाहन विभागास उपरोक्त वाहन चालकां व्यतिरिक्त आणखी ३३ नविन कंत्राटी वाहन चालक (कुशल कंत्राटी कामगार) घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, कमीत कमी १० वर्ष वाहनचालक म्हणून काम केलेल्या नविन कंत्राटी कर्मचाऱ्यांची वाहन चालविण्याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक घेऊन मुलाखतीव्दारे निवड करण्यात यावी, तसेच सर्व वाहन चालकांची M.T., पुणे यांचेकडून ड्रायव्हींग तपासणी करुन घेणेत यावी, असे ठरले.

(कार्यवाही-कामगार अधिकारी)

विषय न ३२ **श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये रुग्णांच्या बिलामध्ये देण्यात येणाऱ्या सवलतींची नियमावली बनविणे बाबत.**

निर्णय क्र.३२ श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये आसपासच्या परिसरातीलच नव्हेतर राज्यभरातून व परराज्यांमधूनही रुग्ण दाखल होण्याचे प्रमाण खूप मोठया प्रमाणात वाढलेले असून, जीवनदायी योजनेमुळे त्यात अधिकच भर पडली आहे, त्याच प्रमाणात सवलत मागण्यांचे प्रमाणही वाढतच चालले आहे, सवलत देणेविषयी आवश्यक ती कागदपत्रे व खालील मुद्यांवर सविस्तर चर्चा होऊन नियमावली तयार करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

(१) मा.उच्च न्यायालयाची योजना : दि बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट, १९५० [कलम ४१ एए - (बी), (१) (सी), (४) (सी)] रिट पिटीशन नं.३१३२/२००४, दि.१७.८.२००६ चे आदेशान्वये लागू केलेल्या गरीब, गरजू व आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांतील रुग्णांसाठीची योजना.

(अ) हॉस्पिटलच्या एकूण खाटांच्या १०% खाटा गरीब रुग्णांसाठी राखीव ठेऊन बिल आकारणी करु नये. (शासन निर्णय दि.६.१२.२००५, नुसार गरीब व्यक्ती म्हणजे ज्यांचे वार्षिक उत्पन्न रु.२५,०००/- च्या आत आहे).

(ब) हॉस्पिटलच्या एकूण खाटांच्या १०% खाटा दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी राखीव ठेऊन सवलतीच्या दरामध्ये बिल (किमान ५०%) आकारणी करण्यात यावी.

(शासन निर्णय दि.६.१२.२००५, नुसार दुर्बल घटकांतील व्यक्ती म्हणजे ज्यांचे वार्षिक उत्पन्न रु.५०,०००/- च्या आत आहे).

(टिप : संदर्भ व सविस्तर माहितीसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रिट पिटीशन नं.३१३२/ २००४ मध्ये दि.१७.०८.२००६ चे आदेशान्वये लागू केलेल्या गरीब, गरजू व आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांतील रुग्णांसाठीची योजना, व त्यास मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.११.२००६ चे सभेतील विषय क्र.३९, निर्णय क्र.९१२ अन्वये सदर योजनेच्या अंमलबजावणीस मान्यता प्राप्त आहे).

(२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.१९.८.२००६ चे सभेतील विषय क्र.२६, निर्णय क्र.४०१ अन्वये श्री साईनाथ रुग्णालयामध्ये दारिद्रय रेषेखालील कार्डधारकांनी बिलांमध्ये सवलतीची मागणी केल्यास पुर्ण रकमेपर्यंत माफी देणेत येते, इतर पेशंटला त्यांचेशी आर्थिक क्षमतेबाबत चर्चा करुन सवलत देण्यात येते, याबाबत रु.१०००/- पर्यंत सवलत देणेचे अधिकार वैद्यकीय अधिक्षिका, रु.१०००/- ते रु.५०००/- पर्यंत प्रशासकीय अधिकारी, रुग्णालये, व रु.५०००/- च्या पुढील सवलतींचे अधिकार मा.कार्यकारी अधिकारी यांना दिलेले आहेत.

उपरोक्त नियम श्री साईनाथ रुग्णालयातील नाममात्र दर आकारणी विचारात घेऊन करण्यात आलेला आहे, परंतु तोच नियम श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये लागू आहे, वास्तविकत: श्री स- ाईबाबा हॉस्पिटलमध्ये सुपर स्पेशालिटी वैद्यकीय सेवा सुविधा उदा. सि.टी. स्कॅन, एम.आर.आय., आय.सी.यु, हृदय शस्त्रक्रिया इ. पुरविण्यात येत असल्याने सहाजिकच दर आकारणी (रु.५,०००/- ते रु.१,५०,०००/- पर्यंत किंवा त्याहुन जास्त) त्या प्रमाणात जास्त असते.

यास्तव सवलतींचे अधिकार पुढीलप्रमाणे वाढविण्यात यावेत किंवा कसे? वैद्यकीय अधिक्षिका यांना रु.५,०००/- पर्यंत, उप-वैद्यकीय संचालक यांना, रु.१५,०००/- पर्यंत, वैद्यकीय संचालक यांना रु.२५,०००/- पर्यंत, प्रशासकीय अधिकारी यांना रु.५०,०००/- पर्यंत, मा.कार्यकारी अधिकारी यांना रु.१,००,०००/- पर्यंत, व त्यापुढील रकमेच्या सवलतींचे अधिकार मा. व्यवस्थापन उप-समिती यांना देण्यात यावेत किंवा कसे याबाबत निर्णय होणे गरजेचे आहे.

(३) मा. व्यवस्थापन समितीचे दि.१५.५.२००६ चे सभेतील विषय क्र.०२, निर्णय क्र.३०८, अन्वये, प्रत्येक ब्रँच मध्ये २०% चॅरीटी देणेबाबत मान्यता प्राप्त आहे.

सध्या मा. अध्यक्ष, उपाध्यक्ष, किंवा मा. विश्वस्त यांचे शिफारस पत्रानुसार रुग्णांस सरासरी २०% इतकी सवलत देण्यात येते. परंतु काही प्रसंगी पदाधिकाऱ्यांकडून नुसते शिफारस पत्र देण्यात येते किंवा टेलीफोन वरुन सुचना देण्यात येतात, परंतु कोणतीही कागदपत्रे नसतांना प्रसंगानुरुप बिलांमध्ये कमी अधिक प्रमाणात किंवा पुर्ण सवलत द्यावी लागत आहे, याबाबत नियम होणे गरजेचे आहे.

४) रात्री-अपरात्री अनेक रुग्ण गंभीर वा अति-गंभीर अवस्थेत उदा. हृदय विकाराचा झटका, विषबाधा/ विषप्राशन, गळफास, गॅसगळती, भाजणे, पाण्यात बुडणे, भिंत किंवा झाड पडणे, वीज पडणे, भूकंप-वादळ, वन्यप्राणी हल्ला, श्वानदंश, सर्पदंश इ. वा बरेचदा रस्त्यावरील वाहन अपघातात आसपासच्या परिसरातील जखमी झालेले रुग्ण एकाच वेळी मोठया संख्येने दाखल होतात, अशावेळी त्यांना डिपॉझिट भरणेची सक्ती करणे मानवतेच्या व कायद्याच्यादृष्टीने योग्य नसल्याने त्यांचेवर विविध प्रकारच्या महागडया तपासण्या उदा. सी.टी.स्कॅन, एम्.आर.आय. वगैरेंसह उपचार, प्रसंगी तातडीच्या शस्त्रक्रियाही कराव्या लागतात, अशा रुग्णांच्या नातेवाईकांकडून मागाहून रक्कम भरण्याचे लेखी हमीपत्र घेतले तरीही विविध क्षेत्रातील मान्यवरांचे फोन व शिफारसपत्राद्वारे मोफत उपचार करण्याच्या सुचना व विनंती केली जाते, मात्र अशा रुग्णांकडून डिपॉझिट भरुन घेणे अथवा बील वसुली करणे अवघड होऊन बसते, याबाबत नियम होणे गरजेचे आहे.

श्री साईभक्त :- देशाच्या कानाकोप-यातून तसेच परदेशातूनही मोठया प्रमाणात साईभक्त साई दर्शनासाठी येत असतात, क्वचित प्रसंगी त्यांना संस्थानचे भक्त निवास, भोजनगृह, दर्शनरांग, मंदिर परिसर, प्रवासा दरम्यान अपघात होत असतात किंवा हार्ट अॅटॅक, अॅपेंन्डीक्स, अर्धांगवायु, ब्रेन हॅमरेज इ. अकस्मात उद्‌भवलेल्या आजारामुळे भक्ताची प्रकृती गंभीर बनते, कधीकधी प्रवासा दरम्यान वाटमारी होते, चोरटयांकडून बेदम मारहाण होते, शिर्डीच्या आसपास ४०/५० कि.मी. परीसरातील अशा घटनांमध्ये सापडलले साईभक्तांना श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात येते, काही भक्त बिलापोटी काही प्रमाणात अनामत रक्कम भरतात, तर काही भक्त अनामत रक्कम भरु शकत नाही.

अशा रुग्णांचे डिपॉझिट भरुन घेणे, तपासण्या, उपचार इ. बाबतचे सर्व अधिकार वैद्यकीय अधिक्षिका, उप-वैद्यकीय संचालक /वैद्यकीय संचालक यांना देण्यात यावेत किंवा कसे? किंवा अशा रुग्णांस औषधे इंजेक्शन्स् स्वत: बाहेरुन घेण्यास सांगून फक्त हॉस्पिटल चार्जेस माफ करण्यात यावेत किंवा कसे?

(५) मृत्यू पावलेल्या बहुतेक रुग्णांच्या बिलांमध्ये मोठया प्रमाणावर सवलत देणे भाग पडते, बील न भरल्याच्या कारणास्तव अदयापपर्यंत कोणतेही शव अडवून ठेवण्यात आलेले नाही, याबाबत नियम होणे गरजेचे आहे.

अशा उपचारा दरम्यान मृत्यु पावलेल्या मयत रुग्णांबाबतचे सर्व अधिकार वैद्यकीय अधिक्षिका, उप-वैद्यकीय संचालक, वैद्यकीय संचालक व प्रशासकीय अधिकारी यांना देण्यात यावेत किंवा कसे?

(६) आजी-माजी आमदार, खासदार, मंत्री, शासन अधिकृत पत्रकार, स्थानिक प्रतिष्ठीत नागरिक तसेच विश्वस्त मंडळाचे आजी-माजी पदाधिकारी, इतर मान्यवर व्यक्ती, स्वातंत्र्य सैनिक, जेष्ठ नागरीक, विविध आश्रमांतील साधू/तपस्वी, आश्रमशाळेतील विद्यार्थी, अपंग, शासकीय अधिकारी इ. वा त्यांचे कुटूंबीयांवर करण्यात आलेल्या वैद्यकीय तपासण्या/उपचारांचे बिलांची मागणी करणे संबंधितांचे पद, समाजातील दर्जा, शिष्टाचार (प्रोटोकॉल) यामुळे प्रशासनास अडचणीचे ठरते. याबाबत नियम होणे गरजेचे आहे.

अशा रुग्णांस बिलात संपुर्ण माफी देण्यात यावी किंवा कसे? याबाबत नियम होणे गरजेचे आहे.

(७) आकस्मित तातडीच्या प्रसंगी, कार्यालयीन वेळेनंतर, सुट्टीच्या दिवशी किंवा उप-वैद्यकीय संचालक, वैद्यकीय संचालक, प्रशासकीय अधिकारी यापैकी कुणीही हजर नसल्यास, अशा तातडीच्या व गंभीर प्रसंगी वैद्यकीय प्रशासक, डयुटी मॅनेजर किंवा जनसंपर्क अधिकारी यांनी वरीष्ठांशी टेलीफोन/मोबाइल वर संपर्क साधुन रुग्ण विना डिपॉझिट दाखल करुन घेणे, बिलात सवलत देणे, सर्प दंशावरील इंजेक्शन्स् मोफत देणे, मृतदेह नातेवाईक किंवा पोलीस केस (एमएलसी) दाखल असल्यास त्या बाबतची कार्यवाही सबंधित डॉक्टर व वॉर्ड प्रमुख यांनी पुर्ण करुन मृतदेह पोलीसांच्या ताब्यात देणे, इ. निर्णय घेण्यास परवानगी देण्यात यावी किंवा कसे?

(८) जीवनदायी योजना : जीवनदायी योजनेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार, मंजुर रक्कमेपेक्षा जादा खर्च संबंधित हॉस्पिटलने सोसावा असा नियम आहे.

यास्तव जीवनदायी योजनेच्या रुग्णांकडून फरकाची रक्कम भरुन घेणे नियम बाहय आहे, परंतु कुणी स्वखुशीने फरकाच्या रक्कमेपोटी काही किंवा पुर्ण रक्कम भरणार असल्यास तशी भरुन घेता येऊ शकेल व उर्वरीत रक्कमेच्या सवलतीस मंजुरी असावी.

तथापि, रूग्णांच्या व नातेवाईकांच्या मागणीनुसार किंवा आवश्यकतेनुसार इप्पोर्टेड उपकरणे उदा. स्टेन्ट, बलून, पेसमेकर, व्हॉल, डिव्हाईस इ. वापरण्यात आल्यास, त्यासाठी येणाऱ्या वाढीव खर्चाची रक्कम रुग्णाकडून भरून घेता येवू शकेल, कारण जीवनदायी योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार शासनाकडून कमीत कमी खर्चाच्या उपकरणांसाठीच अनुदान मंजुर करण्यात येते.

(९) श्री साईबाबा संस्थानकडून राज्यभरातील तसेच परराज्यातील मिळून जवळपास १०० रुग्णालयांतील रुग्णांस दरमहा जवळजवळ १ कोटी रुपये इतके वैदयकीय अनुदान पाठविले जाते, वास्तविकत: महाराष्ट्र शासनाच्या जीवनदायी योजने अंतर्गत हृदय, मेंदू, किडनी व कॅन्सर हया आजारांनवरील उपचार व शस्त्राक्रियासाठी प्रत्येक रुग्णास रु.१,५०,०००/- पर्यंत आर्थिक सहाय्य मिळते.

सध्या श्री साईबाबा हॉस्पिटमधील रुग्णांच्या बिलांमध्ये दरमहा साधारण रु.२० ते २५ लाख सवलत दिली जाते, त्या विषयी फार मोठा गहजब, गाजावाजा व चर्चा होत असते, परंतु बाहेरील जवळपास १०० हॉस्पिटल्स्ना दरमहा १ कोटी रुपये अनुदान पाठविले जातें, त्यापैकी जीवनदायी योजने अंतर्गत मान्यता असलेल्या राज्य भरातील सुमारे ४० रुग्णालयांस वैदयकीय अनुदान पाठविणे बंद केल्यास त्या प्रमाणात साईनाथ व साईबाबा हॉस्पिटलमध्ये देण्यात येणारी सवलत भरुन निघेल किंवा तो निधी दोन्ही रुग्णालयांच्या आधुनिकीकरणासाठी वापरता येऊ शकेल.

(जीवनदायी मान्यता प्राप्त रुग्णालयांची माहिती आरोग्य संचालनालय, सार्वजनिक आरोग्य विभाग, आरोग्य भवन, सेन्ट जॉर्ज हॉस्पिटल कम्पाऊन्ड, ५/६ वा मजला, मुंबई, येथे मिळू शकेल).

यास्तव राज्यभरातील ज्या रुग्णालयांना शासनाच्या जीवनदायी योजनेअंतर्गत हृदय, मेंदू, किडनी, कॅन्सर या पैकी ज्या आजारांस शासन मान्यता असेल त्या आजारांसाठी संबंधित रुग्णालयांस वैदयकीय

अनुदान पाठविणे बंद करण्यात यावे किंवा कसे? याबाबत सविस्तर चर्चा होऊन योग्य तो नियम होणे गरजेचे आहे.

उपरोक्त नियमावली आर्थिक बाबींशी संबधित असल्याने त्यावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणे अत्यंत आवश्यक आहे, तसेच सदर नियमावली दि.१.१.२००९ पासुन ग्राहय धरण्यास मान्यता असावी.

यावर सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

(०१) शिर्डी -अहमदनगर, शिर्डी-मनमाड, शिर्डी-शिंगणापूर, शिर्डी -सिन्नर या रस्त्यावर साईभक्तांना अपघात झाल्यास त्यांना संस्थानचे दोन्ही रुग्णालयात मोफत औषोधोपचार करण्यात यावेत.

(०२) आमदार व खासदार यांनी रुग्णांस मोफत औषधोपचार करण्यास शिफारस केल्यास त्यावर नियमानुसार कार्यवाही करावी.

(०३) दोन्ही रुग्णालयात औषधोपचार चालू असतांना रुग्णाचा मृत्यू झाल्यास त्या रुग्णाचे नातेवाईकांकडून पूर्ण बीलाचे पैसे वसूल करण्याबाबत प्रयत्न करावेत, सक्ती करु नये.

(०४) आमदार व खासदार तसेच माजी आमदार, खासदार यांचेवर संस्थानचे रुग्णालयात औषधोपचार करणेबाबत शासनाकडून मान्यता घेण्यात यावी.

(०५) रुग्णांचे बिलात सवलत देण्याबाबत पूर्वीप्रमाणेच मा.अध्यक्ष व मा.कार्यकारी अधिकारी यांना अधिकार ठेवण्यात यावेत.

(०६) उर्वरितबाबत प्रचलित पध्दत व नियमानुसार कार्यवाही करावी. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

विषय नं.३३ वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ मध्ये सुचविलेले बदलास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.३३ दि.०७.०७.२००८ चे मा.व्यवस्थापन समिती सभेमध्ये श्री साईबाबा संस्थानचे कायम कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीत असलेल्या नातेवाईकांना संस्थानचे दोन्ही रुग्णालयात / बाहेरील रुग्णालयात औषधोपचार घेतल्यानंतर होणाऱ्या खर्चाची प्रतीपुर्ती करणेसाठी रु.५०००/- चे मर्यादेपेक्षा जास्तीची रक्कम अदा करणेकामी सध्या असलेली वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ ही शासनाच्या मान्यतेसाठी पाठवणेबाबत निर्णय झालेला आहे. त्यानुसार सन १९९९ ची वैद्यकीय देखभाल नियमावलीमध्ये काही नविन बदल सुचविण्यात आलेले आहे. सदर बदल सुचवितांना महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय क्रमांक एमएजी २००५/९/ प्र.क्र.१/आरोग्य ३ दि.१९/०३/२००५ चा देखील आधार घेण्यात आला असून त्यामध्ये सुचविलेले विविध खाजगी, निमशासकिय, शासकीय इ. सुचविलेले विविध रुग्णालये, विविध आजार वास्तव्यावरील खर्च इत्यादीचा विचार करण्यात आलेला आहे. सदर नियमावलीची अंमलबजावणी करतांना खालील बाबींचा विचार करण्यात यावा असे मा. विश्वस्त डॉ. ए. भा. गोंदकर यांनी सुचविलेले असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

१) सदर नियमावलीचा फायदा नियमावलीत कुटुंबाचे व्याख्येत नमूद केलेल्या कर्मचारी व त्यांचे अवलंबीतांना सदर कर्मचाऱ्यास संस्थान सेवेत कायम करणेत आलेले आहेत त्यांनाच देण्यात यावा.

२) कायम कर्मचारी किंवा कंत्राटी पध्दतीने किंवा निश्चित वेतनावर नियुक्त करणेत आलेले आहेत, असे कर्मचारी व त्यांचे अवलंबित यांचेवरती विशिष्ट आजारावरील (उदा. Angioplasty, By-pass, TKR, THR, Chemotherapy, Kidney Transplant, इत्यादी) वैद्यकिय सवलतीचा फायदा संस्थानचे रुग्णालयात तसेच नियमावलीतील निश्चित केलेल्या रुग्णालयामध्ये कर्मचाऱ्यास किंवा त्यांचे अवलंबितास देण्यात यावा, परंतु सदर कर्मचारी कमीतकमी ५ वर्षे सेवा सोडून जाणार नाही, याचे हमीपत्र घेतल्यानंतरच त्यांच्यावर खर्च करण्यात यावा आणि जर तो ५ वर्षाच्या आत सेवा सोडून जाणार असल्यास त्यांचेकडून सदर आजावरील केलेल्या उपचाराची रक्कम वसुल करण्यात यावी.

३) संस्थान सेवेत कायम असलेल्या कर्मचारी व त्यांचे अवलंबीताचे वय जर ६५ वर्षाच्या पुढे असेल तर सदर अवलंबीतास या नियमावलीचा फायदा होणार नाही. मात्र तरुण रुग्णाचे बाबतीत हि अट लागू राहणार नाही.

४) संस्थानचे दोन्ही रुग्णालयात जे उपचार उपलब्ध नाही किंवा सबंधीत उपचारासाठी जर तज्ञ डॉक्टर उपलब्ध नसतील तरच कर्मचारी अथवा त्यांचे अवलंबीत यांना पुढील तज्ञ उपचारासाठी नियमावलीत नमूद केलेल्या रुग्णालयात वैद्यकिय संचालक / उपवैद्यकिय संचालक / वैद्यकिय अधिक्षिका यांच्या पूर्व परवानगीने पाठविण्यात यावे.

५) संस्थान कर्मचारी किंवा त्यांचे अवलंबीत यावर खर्च करण्यात येणाऱ्या रक्कमेचा व त्या कर्मचाऱ्याची राहिलेली सेवा याचा देखील विचार करुन नंतरच त्यांना देण्यात येणाऱ्या आगाऊ रक्कम / उपचारावरील खर्चाचा प्राधान्याने विचार करणेत यावा. किती आगाऊ रक्कम दयावयाची याबाबत वैद्यकिय संचालक यांचे शिफारशीनुसार आगाऊ रक्कम देणेबाबत कार्यकारी अधिकारी हे अंतिम निर्णय घेतील.

६) संस्थान कर्मचारी किंवा त्याचे अवलंबीत जर बाहेरील रुग्णालयात पुढील तज्ञ उपचारासाठी पाठवायाचे असलेस सोबतच्या नियमावलीत शासनाने व संस्थानने यापूर्वी निश्चित केलेल्या रुग्णालयातच पाठविण्यात यावे.

७) अपातकालीन प्रसंगी एखाद्या कर्मचाऱ्यांस किंवा त्यांचे अवलंबीत बाहेर गावी असल्यास एखादा उपचार खाजगी रुग्णालयात किंवा निश्चित केलेल्या रुग्णालयात घेण्याची गरज भासली व ती सुविधा संस्थानचे श्री साईबाबा किंवा श्री साईनाथ रुग्णालयात उपलब्ध आहे तर संस्थान रुग्णालयात त्यासाठी जितका खर्च आला असता तितकीच रक्कम परताव्यासाठी मंजूर करण्यात यावी.

८) संस्थानचे दोन्ही रुग्णालयात कर्मचारी किंवा त्यांचे अवलंबीतांसाठी मोफत उपचार देण्यात यावे व त्यासाठी बाहेरुन आणलेल्या औषधांचा संपूर्ण परतावा करण्यात यावा.

९) संस्थान कर्मचारी अथवा त्यांचे अवलंबीत यांना उपचारासाठी रुग्णालयात वास्तव्यासाठी येणारा खर्च सोबतच्या नियमावलीत नमूद केलेल्या शासनाच्या नियमाप्रमाणेच अदा करणेत यावा.

१०) संस्थान कर्मचरी अथवा त्याचे अवलंबीतांसाठी ज्या सुविधा संस्थानच्या दोन्ही रुग्णालयात उपलब्ध होणार नाही व संबंधीत उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी पुढील तज्ञ उपचारासाठी बाहेरील रुग्णालयात पाठविण्यात आले तर त्या कर्मचाऱ्याच्या त्या आर्थिक (एप्रिल ते मार्च) वर्षात जो एकूण पगार असेल त्याच्या ५०% इतकीच रक्कमेपेक्षा वैद्यकिय बीलाचा परतावा करणेत यावा किंवा आगाऊ देण्यात यावी. त्यावरील खर्चाची रक्कम सदर कर्मचाऱ्यास स्वतः सोसावी.

११) संस्थानचे सर्व कायम कर्मचारी ज्यांचे वय वर्ष ५५ किंवा त्यापेक्षा अधिक असेल तर त्याची दर सहा महिन्यांनी वैद्यकिय तपासणी करुन तो सेवा करणेस कार्यक्षम आहे किंवा नाही याबाबत अहवाल प्राप्त करुन जर तो कर्मचारी कार्यक्षम नसेल तर सदर कर्मचाऱ्यास सेवानिवृत्त करुन त्याला पुढील सेवेच्या कालावधीपर्यंत (सेवा निवृत्ती पर्यंत) होणारे वेतन अदा करुन त्यांची सेवेतून निवृत्त करणेत यावे परंतु या बाबतीत अंतिम निर्णय हा मा. व्यवस्थापन समिती सभेचा राहिल.

१२) महिला कर्मचाऱ्यांचे बाबतीत जर ती अविवाहीत असेल तर तिचे आई वडील यांना अवलंबीत दाखवता येईल तर विवाहीत स्त्री कर्मचाऱ्यांच्या बाबतीत तिला सासु, सासरे अवलंबीत दाखविणे बंधनकारक राहील. ज्या स्त्री कमर्चाऱ्यास जर भाऊ नसेल तर सदर स्त्री कर्मचाऱ्यास आई वडील अवलंबीत दाखविता येतील.

१३) रु. २५,०००/- पर्यंतची बीले हि मा.कार्यकारी अधिकारी यांचे मंजूरीने तर त्यावरील खर्चाची बीले हि मा. व्यवस्थापन समिती सभा ज्या सदस्यांना (विश्वस्त) अधिकार देईल त्या सदस्यांना प्रथम दाखवून अंतिम मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे वेळोवेळी सादर करण्यात यावी.

१४) श्री साईबाबा हॉस्पिटलच्या सर्व विभागांची ओ.पी.डी. क्षमतेपेक्षा जास्त प्रमाणात होत असून त्यामध्ये ५० टक्के पेक्षा जास्त ओ.पी.डी. रुग्ण हे संस्थान कर्मचारी किंवा त्यांचे अवलंबित असतात. यास्तव किरकोळ आजारांसाठी उदा. सर्दी पडसे, खोकला, ताप, डोकेदुखी इ.साठी यापुर्वीच्या नियमाप्रमाणे कर्मचाऱ्यांनी श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये उपचार घ्यावेत, जर तेथील डॉक्टरांनी श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये पुढील उपचारासाठी संदर्भित (Refer) केल्यास श्री साईबाबा हॉस्पिटलचे कॅज्युल्टी विभागात प्रथम दाखवावे व साईबाबा हॉस्पिटलमधील कॅज्युल्टी मेडीकल ऑफीसर सदर रुग्णास संबंधित Consultant यांचेकडे पुढील उपचारासाठी शिफारस करतील, संबधीत Consultant यांनी काही महागडया तपासण्या करण्याची शिफारस केली असेल तरच त्या करण्यात येतील अन्यथा करण्यात येणार नाही. (उदा. C.T.Sacn/MRI/2D Echo/Color Doppler/Investigation of Blood & Urine इत्यादी)

१५) बहुतेक सर्वच कर्मचारी किंवा त्यांचे अवलंबित हे स्पेशल रुम व डिलक्स् रुमची मागणी करतात यास्तव खालील प्रमाणे नियम करण्यात यावा.

अ.नं.	श्रेणी	वार्ड
१	वर्ग - I	डिलक्स् रुम
२	वर्ग - II	स्पेशल रुम
३	वर्ग - III	ट्विन शेअरींग
४	वर्ग - IV	जनरल किंवा सेमी प्रायव्हेट वार्ड

जर एखादा कर्मचारी त्यांच्या श्रेणी व्यतिरिक्त स्पेशल किंवा डिलक्स् रुमचे चार्जेसचा रोख भरणा करण्यास राजी असल्यास अशा कर्मचाऱ्यास वा त्याचे अवलंबित कुटूंबिय रुग्णास स्पेशल किंवा डिलक्स् रुम देण्यात यावे.

१६) प्रत्येक संस्थान कर्मचाऱ्यास वैद्यकीय सेवा मिळणेकामी त्यांचे अवलंबित कुटूंबियांसह ग्रुप फोटो असलेले ओळखपत्र सक्तीचे करावे, कारण त्यामुळे नुसते नाव सांगून कोणासही गैर फायदा घेता येणार नाही. एकदा फोटो ओळखपत्र चालू केल्यानंतर कोणत्याही सबबीखाली उदा. ओळखपत्र सापडत नाही. हरवले आहे, विसरले आहे, नंतर देतो इ. सबबीखाली मोफत केस पेपर व पुढील वैद्यकीय सेवा देण्यात येऊ नयेत, परंतू प्रसंगानुरुप व रुग्णाच्या आजाराच्या गंभीरतेनुसार अशा सेवा देणे भाग पडल्यास त्याने त्याचे ग्रुप फोटोचे असलेले ओळखपत्र जर सादर करु शकत नाही तर त्याचे रितसर बिल हे संबंधीत कर्मचाऱ्याकडून भरुन घेण्यात यावे व संबंधीत कर्मचाऱ्याने आवश्यक कागदपत्राची पुर्तता करण्यात आल्यास वैद्यकीय खर्चाचा परतावा देता येऊ शकेल.(अशा प्रकारचे कुटूंब ओळख महाराष्ट्र शासनाचे

राज्य कामगार योजना (ई.एस.आय.एस.) लागू असलेल्या राज्यभरातील सर्व आस्थापनांमधील कामगारांना लागू करण्यात आलेले आहे.)

१७) संस्थान कर्मचारी किंवा त्यांचे अवलंबित कुटूंबीय रुग्णालयात ॲडमिट नसतांनाही, त्यांना मुंबई, पुणे येथील वरिष्ठ रुग्णालयात तपासण्या / उपचारार्थ घेऊन जाणेसाठी मोफत ॲम्बुलन्सची मागणी करतात. तरी रुग्ण ॲडमिट नसतांना ॲम्बुलन्स् देणे झाल्यास संबंधीत कर्मचाऱ्याकडून भाडे वसूल करण्यात यावे, परंतू रुग्णाची परिस्थीती गंभीर असेल त्यासाठी रुग्णवाहीकेची आवश्यकता ही वैद्यकीय अधिक्षिका, उपवैद्यकीय संचालक / वैद्यकीय संचालक हे खात्री केल्यानंतरच रुग्णवाहीका देणेबाबतचा निर्णय घेतील. संस्थानची रुग्णवाहीका जर उपलब्ध नसेल तर ती जबाबदारी संस्थानची किंवा संबंधीत अधिकाऱ्याची राहणार नाही.

१८) तसेच संस्थानचे सेवानिवृत्त कर्मचारी व त्यांचे वरील अवलंबीत पती/पत्नी यांचेवर (शासनाच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या धर्तीवर) वयोमानापरत्वे वारंवार औषधोपचार व वैद्यकीय उपचाराची आवश्यकता असते, अशा कर्मचाऱ्यांनी संस्थानच्या सेवेत आयुष्यातील बराच मोठा कालावधी व्यतीत केलेला असतो, त्यांना मोफत वैद्यकीय सेवा सुविधा पुरविण्यात याव्या.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या श्री साईबाबा संस्थानचे कायम कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीत असलेले कुटूंबीयांना उपचारासाठी पूर्वीची प्रचलित पध्दती चालू ठेवावी, दरम्यान संस्थान कर्मचाऱ्यांना मेडिकल/मेडिक्लेम इन्शुरन्स लागू करणेबाबत माहिती घेऊन प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करावा, असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/मुख्यलेखाधिकारी)

विषय नं.३४ श्री साईबाबा रुग्णालयात न्युरो ओ.टी.साठी मशिनरी/उपकरणे फर्निचर तसेच कार्डीयाक इन्स्ट्रूमेंट व श्री साईनाथ रुग्णालयासाठी सर्जिकन इन्स्ट्रूमेंट खरेदीची नोंद घेणेबाबत

निर्णय क्र.३४ सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

विषय नं.३५ श्री लक्ष्मण सदाशिव चव्हाण, यांचे कॅन्सर उपचाराचे वैद्यकीय बिलाबाबत.

निर्णय क्र.३५ श्री.लक्ष्मण सदाशिव चव्हाण (अधिक्षक- न.भ.नि) यांना मानेवर गाठी दिसून आल्याने त्यांनी श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल सर्जन डॉ.रामनाईक यांना प्रथम दाखविले होते. डॉ. राम नाईक यांनी त्यांना टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई येथे पुढील उपचार घेणेसाठी पाठविलेले आहे.

श्री.चव्हाण यांनी दि.२२.०९.२००८ रोजी टाटा मेमोरियल हॉस्पिटल,मुंबई येथे जाऊन विविध तपासण्या केल्या असता त्यांना कॅन्सर या आजाराचे निदान झाले असून त्यांना केमोथेरपी करण्यास सांगितले आहे. केमोथेरपी सुविधा आपल्याकडे उपलब्ध नाही. सदर केमोथेरपी टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई येथे करण्यासाठी त्यांना दि.१५.१०.२००८ रोजी बोलविले होते.

श्री.चव्हाण हे दि.२४.१०.२००८ रोजी टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई येथे केमोथेरपीचे उपचार घेण्यासाठी गेले होते. तेथे त्यांना एकुण ६ केमोथेरपी सायकलसाठी एकुण रु.४,००,०००/- इतक्या खर्चाचे इस्टीमेट दिलेले आहे. त्याच दिवशी (दि.२४.१०.२००८) त्यांनी केमोथेरपीची एक सायकल देखील घेतलेली आहे. सदर सायकलसाठी त्यांना एकुण रु.५२,६२०/- इतका खर्च आला आहे. त्यापैकी संस्थानने विविध तपासण्या करणेकामी दिलेले रु.२०,०००/- (डी.डी.क्रमांक ८२०१६८ दि.२०.१०.२००८) टाटा मेमोरियल हॉस्पिटलमध्ये त्यांनी जमा केलेले असून उर्वरित रक्कम रु.३२,६२०/- त्यांनी स्वत: तसेच मुंबई येथून उसनवारी घेऊन खर्च केलेले आहे. श्री.चव्हाण यांनी उपरोक्त खर्चापोटी रु.५२,६२०/- ची बीले संस्थानकडे जमा केलेली आहे. श्री.चव्हाण यांना रु.२०,०००/- आगाऊ दिलेली रक्कम जमा नांवे होऊन उर्वरित रक्कम रु.३२६२०/- त्यांना रोख अदा करावी लागणार आहे.

संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ निर्णय क्र. १४ नुसार कॅन्सरच्या आजारावर रु.७५०००/- पर्यंतची आगाऊ रक्कम देण्याची तरतुद आहे. परंतू मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०७.०७.२००८ चे सभेत सध्या कार्यान्वीत असलेली सन १९९९ ची वैद्यकीय देखभाल नियमावलीस शासनाची मान्यता घेण्यात यावी असा निर्णय झालेला आहे. सदर नियमावलीस अद्याप शासनाची मान्यता प्राप्त झालेली नाही. त्यामुळे त्यांना नियमावलीनुसार आगाऊ तसेच जादा वैद्यकीय बीलांचे परताव्याचे प्रलंबीत आहे. त्यामुळे त्यांना आगाऊ रक्कम देता येत नाही.

तेंव्हा सदरचा विषय विशेष बाब म्हणून त्यांनी खर्च केलेली एकुण रक्कम रु.५२,६२०/- मधून आगाऊ रक्कम रु.२०,०००/- वजावट करुन राहिलेली रक्कम त्यांना देता येईल, असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, पूर्वीच प्रचलित नियमानुसार श्री चव्हाण यांना रक्कम आदा करावी असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

विषय नं.३६ डायलेसीस विभागासाठी मॉनिटर खरेदीबाबत.

निर्णय क्र.३६ श्रीसाईबाबा रुग्णालयातील डायलेसीस विभागाने दि.१८.११.२००८ अन्वये ०१ नग ३ Para Monitor ची मागणी केलेली आहे.

सदरचा मॉनिटर हा क्रिटीकल अवस्थेत असलेल्या रुग्णांचे मॉनिटरींग करण्यासाठी आवश्यक आहे. डायलेसीस विभागाने मॉनिटर हा Philips / L & T कंपनीचा घेणेबाबत शिफारस केलेली आहे.

सदरच्या ३ पॅरा मॉनिटर्समध्ये इ.सी.जी., एस.पी.ओ.टू. आणि एन.आय.बी.पी. हे तीन पॅरामीटर त्यांना आवश्यक आहे. सध्या न्युरो आय.सी.सी.यू. विभागासाठी २० मॉनिटर विहीत पध्दतीने खरेदी करण्याची प्रक्रिया अंतिम टप्यात असुन त्यामध्ये L&T कंपनीचे २० मॉनिटर प्रती नग रु.२,७६,५०७/- इतक्या दराने चर्चा / वाटाघाटीनंतर निश्चित झालेले आहे. सदरचे मॉनिटर मध्ये ५ पॅरा मिटर असून त्यातील डायलेसीस विभागास आवश्यक असलेले तीन पॅरा मिटरची किंमत निश्चित करुन सदरचा मॉनिटर खरेदी करता येईल व त्यासाठी अंदाजे रु.२,००,०००/- पर्यंत खर्च येईल.

तेंव्हा वरील प्रमाणे डायलेसीस विभागासाठी ०१ नग L & T कंपनीचा ०३ Para Monitor खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,००,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. याबाबत वैद्यकिय संचालक यांनी L & T कंपनीकडून ०३ Para Monitor साठी दर बोलावून त्यांतील तांत्रीक बाबीचा अभ्यास करुन एक नग खरेदी करण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

विषय नं.३७ श्रीसाईबाबा रुग्णालयातील सी.आर.यु.-१ विभागासाठी Dual Chember Temporary Pacemaker खरेदी करणेबाबत.

निर्णय क्र.३७ श्रीसाईबाबा रुग्णालयातील सी.आर.यु.- १ या विभागाने त्यांचे डि.पी.क्र. ४०६० दि. ०५/१२/२००८ अन्वये Dual Chember Temporary Pacemaker- १ नगाची मागणी केलेली आहे. यापुर्वी श्री साईबाबा रुग्णालयाकरीता ४नग पेसमेकर खरेदी करण्यात आलेले आहेत, त्यापैकी कॅथलॅब व सि.व्ही.टी.एस. विभागासाठी प्रत्येकी एक व आय.सी.सी.यु. विभागासाठी दोन पेसमेकर देण्यात आलेले आहेत. सी.आर.यु.- १ या विभागास पुर्वी आपण पेसमेकर दिलेले नाही, सदर वॉर्डमध्ये ॲन्जीप्लास्टी, ॲन्जीओग्राफी, बायपास झालेले रुग्ण लगेच दाखल होत असतात व तेथे शस्त्रक्रिया झाल्यानंतरचे उपचार करण्यात येतात, त्यामुळे तेथे पेसमेकर असणे आवश्यक आहे.

अत्यवस्थ रुग्णाच्या ह्दयाचे ठोके नियंत्रित करुन ते स्थिर ठेवण्यासाठी उपरोक्त पेसमेकरचा वापर होतो. सदरचे पेसमेकर खरेदीकामी अंदाजे रु. १,९९,६८०/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी वरीलप्रमाणे Dual Chember Temporary Pacemaker विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. १,९९,६८०/-चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

विषय नं.३८ श्रीसाईबाबा रुग्णालयातील कार्डीयाक ऑपरेशन थिएटरमध्ये Hepa Filer चे खर्चास मंजूर मिळणेबाबत.

निर्णय क्र.३८ श्री साईबाबा रुग्णालयाचे कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागाने दि. ०२/१०/२००८ चे डि.पी. अन्वये ऑपरेशन थिएटरमध्ये Hepa Filter बसवून मिळणेबाबत कळविले होते, कारण पॅथोलॉजी विभागाने दि. ०१/१०/२००८ रोजी दिलेल्या Report मध्ये Air exposure plate चा Report positive कळविला आहे.

मे.एअर बॉर्न क्लिन्लीनेस, मुंबई यांचेकडुन सन २००६ या वर्षात सेट्रंल एअर कंडीशनीग सिस्टीम बसविण्यात आलेली आहे. सदरचे एअर कंडीशनींग सिस्टीममध्ये ऑपरेशन थिएटरमध्ये Infection होऊ नये म्हणुन ५ मायक्रॉनचे फिल्टर बसविण्यात आलेले आहे. परंतु ऑपरेशन थिएटरमध्ये शस्त्रक्रिया करणारे सर्जन व इतर अनुशांगीक कर्मचारी यांचेमुळे होणारे Infection टाळणेसाठी ०.३ मायक्रॉनचे फिल्टर Hepa Filter असणे गरजेचे आहे. सदर Hepa Filter ची ९९.९७% पर्यत हवा फिल्टर करण्याची क्षमता असते जेणेकरुन शस्त्रक्रिया गृहामध्ये Infection होत नाही व पर्यायाने शस्त्रक्रिया झ ालेल्या रुग्णांना देखील याचे Infection होणार नाही.

सदरचे ०.३ मायक्रोनचे Hepa Filter बसविणे तातडीचे असल्यामुळे चार अधिकृत विक्रेत्यांकडून फॅक्स / ई-मेल व्दारे कोटेशन मागविण्यात आहे, ते खालीलप्रमाणे -

१. मे. एअरटेक इंजिनीअर्स, औरंगाबाद
२. मे. अंजठा इलेक्ट्रीकल ॲन्ड रेफ्रिजरेशन कं., औरंगाबाद
३. मे. इलेक्ट्रोकुल इंजिनीअर्स, औरंगाबाद
४. मे. एअर बॉर्न क्लीन्लीनेस इंजिनीअर्स, मुंबई

वरीलप्रमाणे प्राप्त कोटेशनचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो सोबत सादर केला आहे, सोबतच्या तुलनात्मक दरांचे तक्त्यात मे. एअरटेक इंजिनीअर्स, औरंगाबाद यांचे दर हे निम्नत्तम येतात, तेंव्हा उपरोक्त Hepa Filter चे काम त्यांचेकडून करुन घेता येईल. त्यांचे दरानुसार सदरचे खरेदीकामी रु. ६७,२०७.५० इतका खर्च येणार आहे.

तरी मे. एअरटेक इंजिनीअर्स, औरंगाबाद यांचेकडून Hepa Filter कामाकरीता येणाऱ्या रु. ६७,२०७.५० चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

विषय नं.३९ श्रीसाईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरिता Reagent Module व PT Cuvettes खरेदीबाबत.

निर्णय क्र.३९ श्रीसाईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरीता Transasia कंपनीचे Blood Gas Analyser मशिन खरेदी करण्यात आलेले आहे. प्रयोगशाळा विभागाने डि.पी.क्र. ३९९८ दि. २६/११/२००८ अन्वये उपरोक्त मशिनसाठी लागणारे Reagent Module - ८ pack व PT Cuvettes -८०० nos. ची तातडीने मागणी केलेली आहे. सदर मशिनसोबत प्राप्त मटेरीयल संपत आल्यामुळे मशिन चालु ठेवण्यासाठी उपरोक्त मटेरीयल आवश्यक आहेत.

सदरचे मशिन हे मे. ट्रान्साशिया बायोमेडीकल लि., मुंबई या कंपनीचे असून सदर मशिनकरीता त्याच कंपनीचे Reagent Module व PT Cuvettes लागतात, इतर कंपनीचे चालत नाहीत. सदर किटची सन २००९-१० या वार्षिक औषधे खरेदीमध्ये मागणी करण्यात आलेली आहे, परंतु उपरोक्त खरेदीमधील मटेरीयल उपलब्ध होण्यास अजुन ३-४ महिन्याचा कालावधी लागणार आहे, त्यामुळे तीन अधिकृत विक्रेत्यांकडून फॅक्सव्दारे कोटेशन मागविण्यात आले आहेत. त्यांचे तुलनात्मक दरांचा तक्ता खालीलप्रमाणे -

Sr. No.	Name of Kits	Packing	Requir-ement	Transasia, Mumbai	Shri Nijanandi, Jalgaon	Sidhi Medical, Aurangabad	Total Amt. in Rs.
1	Easy Stat Module	800 ml	3 pack	22,218.00	24259.00	23567.00	66,654.00
2	PT Cuvettes	3000 Tubes	1 Pack	19996.47	21126.00	20530.00	19,996.47
						Total in Rs.	86,650.47

उपरोक्त तुलनात्मक दरांचे तक्त्यात मे. ट्रान्साशिया बायोमेडीकल, मुंबई यांचे दर निम्नत्तम येतात, त्यांचे दरानुसार सदर उपरोक्त खरेदीकामी एकुण रु. ८६,६५०.४७ इतका खर्च येणार आहे.

तरी वरीलप्रमाणे लागणारे किट मे. ट्रान्साशिया बायोमेडीकल लि., मुंबई यांचेकडून खरेदीस व याकामी येणाऱ्या रु. ८६,६५०.४७ चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

विषय नं.४० श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधील संगणकीय प्रणाली बाबत.

निर्णय क्र.४० श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधील संगणकीय प्रणाली करिता दि. १३.०३.२००५ रोजीच्या सभेमध्ये विषय नं.९ निर्णय क्रमांक १०१ अन्वये मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार हॉस्पिटल मॅनेजमेंट सॉफ्टवेअर खरेदी करणेकामी रक्कम रुपये ७,५०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये सात लाख पन्नास हजार मात्र) मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदर कंपनीचे सॉफ्टवेअर खरेदी करण्यात आलेले असून आतापर्यंत कंपीनस आज पर्यंत टप्प्या-टप्प्यामध्ये ४,५०,०००/- (३०%+१५%+१५%) इतकी रक्कम अदा करणेत आली आहे. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये दि.०५.०९.२००७ रोजी संगणकीय प्रणाली (Hospital Managememt Soft ware System) कार्यान्वीत करणेत आली. श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सध्या बिलींग, रिसेप्शन, स्टोअर, पॅथोलॉजी Modules यशस्वी रित्या कार्यान्वीत आहे. तसेच वित्त विभाग, नर्सिंग, ब्लडबँक इत्यादी मॉडूल्स कार्यान्वीत करणे बाकी आहे.

सध्या सदर Modeles मध्ये आवश्यक असलेले बदल सदर कंपनीस देण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे जिवनदायी योजनेकरीता ॲडव्हान्स कन्सेशन असे नविन Models कार्यान्वीत करणेकामी कंपनीस कळविलेले आहे. दि.१६.०८.२००८ रोजी सदर कंपनीचे मॅनेजींग डायरेक्टर, इंजिनीअर्स यांनी मा.वैद्यकीय संचालक यांचेशी संगणक प्रणाली कामी समक्ष चर्चा केली असता सदर नविन Models कार्यान्वीत करणे कामी येणारा खर्च दि. १९.०९.२००८ रोजीच्या E-mail व्दारे कळविलेले आहे. सदर कंपनीने ६५,०००/- जुने Models मधील आवश्यक बदल व १,८०,०००/- जिवनदायी नविन Models कार्यान्वीत करणेकामी रक्कम यांची एकत्रीत रक्कम रुपये २,४५,०००/- मागणी केलेली आहे.

तरी उपरोक्त Models खरेदी करणेबाबतचा व येणाऱ्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

विषय नं.४१ श्रीसाईनाथ रुग्णालयात HMS प्रणाली कार्यान्वीत करणेकामी डॉट मेट्रीक प्रिन्टर्स खरेदीबाबत.

निर्णय क्र.४१ श्रीसाईनाथ रुग्णालयात HMS (Hospital Management Software System) Online करावयाचे आहे. सदर सिस्टीम केस पेपर बिलांग, स्टोअर व इतर विभागात कार्यान्वीत करावयाची आहे. त्यासाठी Printers ची कमतरता भासणार आहे.

सदर प्रणाली करिता ८० Columns चे १० प्रिंटर्स व Columns चे ३ प्रिंटर्स घेणे गरजेचे आहे. सदर खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रुपये १,५०,०००/- (अक्षरी रुपये एक लाख पन्नास हजार मात्र) इतका खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

विषय नं.४२ श्रीसाईभक्तांच्या गर्दीमूळे खरेदी करण्यात आलेल्या जादा गावरान तुप व खणाची पत्रावळी खरेदीस मान्यता मिळणे बाबत.

निर्णय क्र.४२ **अ)** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१०.०१.२००८ मधील निर्णय क्र.४४ नुसार प्रसादालयामध्ये प्रसादलाडू तयार करणेकामी आवश्यक असणारे ५८०० क्विंटल गावरान तूप (ॲगमार्क/लुज) दि.०१.०४.२००८ ते दि.३०.०९.२००८ व दि.०१.१०.२००८ ते दि.३१.०३.२००९ अशा दोन टप्प्यात खरेदी करणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार माहे एप्रिल २००८ ते सप्टेंबर २००८ या कालावधीकरीता आवश्यक असणारे २९०० क्विंटल गावरान तूप खरेदीकामी निविदा मागविणेत आलेल्या होत्या. त्यावर मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१६.०३.२००८ मध्ये निर्णय होऊन मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिकरोड यांना २९०० क्विंटल (ॲगमार्क) गावरान तूप पुरविणेसाठी रु.१३०/-+४% व्हॅट प्रती किलो या न्युनतम दराने वार्षिक पुरवठा आदेश देणेत आलेला होता. मे.जयहिंद किराणा, नाशिकरोड यांनी पुरवठा कालावधीत ३४९८.६९ क्विंटल गावरान तूपाचा पुरवठा केलेला असल्याने त्यांना दिलेल्या आदेशाव्यतिरीक्त ५९८.६९ क्विंटल गावरान तूपाचा जादा पुरवठा झालेला आहे. निविदेतील तसेच पुरवठा आदेशातील शर्ती/अटीनुसार मागणी केलेल्या परिमाणापेक्षा २५% जादा माल मान्य दरानेच पुरविणे पुरवठादारावर बंधनकारक असल्याने जादा गावरान तूपाचा मान्य दरानेच पुरवठा झालेला आहे.

ब) सन २००८-०९ सालामधील दुसऱ्या सहामाहीसाठी (दि.०१.१०.२००८ ते ३१.०३.२००९) प्रसादलाडूकरीता आवश्यक असणारे २९०० क्विंटल गावरान तूप खरेदीकामी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२४.१०.२००८ मध्ये निर्णय होऊन मे.बाफणा एन्टरप्राईजेस, नाशिक यांना जा.क्र.१५९०७ दि.२७.१०.२००८ रोजी रु.१३१.५० प्रती किलो सर्वसमावेशक या दराने पुरवठा आदेश देणेत आलेला आहे. माहे आक्टोंबर महिन्यातील दिवाळीचा उत्सव दि.२७ ते ३० असा आल्याने श्री साईभक्तांच्या अपेक्षित गर्दीचा विचार करुन मे.बाफणा बाजार यांना त्वरीत गावरान तूपाचा पुरवठा करणेस सांगणेत आलेले होते. मात्र दिवाळीच्या ४ दिवस सर्व कामगारांना सुटया असल्याने व त्यानंतर फॅक्टरीमध्ये तूपाचे उत्पादन सुरु होऊन पुरवठा होणार असल्याने मे.बाफणा बाजार यांनी तातडीने शिल्लक साठयामधील दि.०२.११.२००८ रोजी सकाळी ९४९.८०० किलो गावरान तूपाचा पुरवठा केलेला आहे. तथापि तूपाची गाडी फॅक्टरीमधून येणेस १ ते २ दिवसाचा कालावधी लागण्याची शक्यता लक्षात घेता, साईभक्तांना प्रसादलाडू वाटपास अडचण येऊ नये म्हणून यापूर्वीचे पुरवठादार मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक यांचेकडे उपलब्ध असलेल्या गावरान तूपाचा पुरवठा करणेस सांगणेत आले होते. मात्र त्यांनी न्युनतम दराने गावरान तूप पुरवठा करण्याची तयारी न दर्शविता त्यांनी दि.२४.१०.२००८ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेत समक्ष चर्चेत देऊ केलेल्या रु.१३९/-प्रती किलो + ४% व्हॅट या दराने पुरवठा करणेची तयारी दर्शविली. श्री साईभक्तांची गर्दी फारच वाढल्याने, सर्व साईभक्तांना प्रसादलाडू मिळावेत म्हणून मा.कार्यकारी अधिकारी यांचे सुचनेवरुन त्यांना एक गाडी (६००डबे) पुरवठा करणेस सांगणेत आले. त्यानुसार त्यांनी दि.०३.११.२००८ रोजी सकाळी ६०० डबे (९००० किलो) पुरवठा केलेला आहे. मात्र त्यापूर्वी दि.०२.११.२००८ रोजी संध्याकाळी मे.बाफणा बाजार, नाशिक यांचेकडील ८२५० किलो गावरान तूपाचा पुरवठा झालेला आहे.

क) संस्थानमार्फत मागील वर्षापासून जोडून येणाऱ्या सुटया व उत्सव आदी कालावधीमध्ये साईभक्तांचे सोयीसाठी भक्तनिवासस्थान, साईनगर परिसर व साईप्रसाद नं.२ च्या बाजुला मंडप उभारणेत येत असून सदरील मंडपात साईभक्तांना स्वयंसेवी भोजन व्यवस्था करणेत येत आहे. त्यासाठी खणाच्या पत्रावळीचा वापर केला जात असल्याने प्रसादभोजनासाठी होणाऱ्या गर्दीवर नियंत्रण केले जात आहे. मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०६.०९.२००८ मधील निर्णय क्र.६७५ नुसार सन २००८-०९ मध्ये उत्सवाचे व गर्दीचे कालावधीत प्रसादालयाकडून पत्रावळीची मागणी झाल्यास गरजेनुसार कोटेशन घेऊन खणाची पत्रावळी खरेदी करणेस मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार वेळोवेळी पत्रावळी पुरवठाधारकांशी संपर्क साधून, दरपत्रके मागविणेत येऊन ३,६१,५०० नग खणाच्या पत्रावळी रु.०.८० पैसे प्रती नग दराने खरेदी करणेत आलेल्या असून त्यासाठी रु.२,८९,२००/- खर्च आलेला आहे.

तरी (१) मे.जयहिंद किराणा, नाशिकरोड यांचेकडून पुरवठा कालावधीत आदेशाव्यतिरीक्त वार्षिक मंजूर दराने खरेदी करणेत आलेल्या ५९८.६९ क्विंटल गावरान तूपाचे खरेदीस व त्यासाठी आलेल्या खर्चास मान्यता असावी. (२) दिपावली उत्सवाचे कालावधीत मे.जयहिंद किराणा, नाशिकरोड यांचेकडून तातडीची गरज म्हणून घेण्यात आलेल्या रु.१३९/-+४% व्हॅट प्रती किलो या दराने ९० क्विंटल गावरान तूपाचे खरेदीस व त्यासाठी झालेल्या रक्कम रु.१३,०१,०४०/- चे खर्चास मान्यता असावी. तसेच

(३) मे.धरम एंटरप्राईजेस, नाशिक यांचेकडून वेळोवेळी प्रत्यक्ष खरेदी करणेत आलेल्या रु.०.८० प्रती नग या दराने ३,६१,५०० नग खणाच्या पत्रावळीसाठी झालेल्या रक्कम रु.२,८९,२००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

विषय नं.४३ सन २००८-२००९ मध्ये प्रसादालयासाठी खरेदी करण्यात आलेल्या जादा किराणा मालाचे खरेदीस मान्यता मिळणे बाबत.

निर्णय क्र.४३ सन २००८-०९ मध्ये (दि.०१.०४.२००८ ते दि.३१.०३.२००९ अखेर) प्रसादालय व कॅन्टीन विभागाचे दैनंदिन वापरासाठी आवश्यक किराणा माल खरेदीकामी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१०.०१.२००८ निर्णय क्र.४४ नुसार मान्यता मिळालेली असून कृषि उत्पन्न बाजार समितीचे मोंढयावरुन मा.विश्वस्तांचे उपस्थितीत गहू, हरबरा खरेदी करणेत आलेला आहे. उर्वरीत किराणा मालाची खरेदी ही मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१६.०३.२००८ मधील निर्णयानुसार निविदा पद्धतीने झालेली असून प्रसादालयाचे आवश्यकतेनुसार संबंधित पुरवठाधारकांकडून माल खरेदी करणेत येत आहे. श्री साईभक्तांची दिवसेंदिवस गर्दी वाढत असल्याने नाष्टा पाकिटे, प्रसादलाडूची जादा विक्री होत आहे.

सन २००८-०९ चे पुरवठा कालावधी वर्ष एप्रिल ते मार्च असे असून श्री साईभक्तांच्या वाढत्या गर्दीमुळे काही मालाचा पुरवठा पुर्ण झालेला आहे तर काही मालाचा पुरवठा पुर्ण होत आहे. सोबत डिसेंबर २००८ ते मार्च २००९ या ४ महिन्यांसाठी लागणाऱ्या मालाचा अंदाजे तपशील परिशिष्ट **अ** मध्ये नमुद केलेला आहे. त्यानुसार डिसेंबर २००८ ते मार्च २००९ साठी रु.२,६१,०५,८६८/- खर्च अपेक्षित आहे. सन २००८-०९ साठीचे प्रसादालय माल खरेदी निविदेतील शर्ती/अटीनुसार २५% जादा माल मान्य दरानेच पुरविणे पुरवठादारावर बंधनकारक आहे. तथापि काही माल हा २५% पेक्षा जादा घ्यावा लागणार आहे. वार्षिक मंजूर दराने २५% मालाची एकुण किंमत रु.२,२१,९०,०३८/- होईल. २५% पेक्षा जास्त माल खरेदी करावा लागल्यास त्याची एकुण किंमत रु.३९,१५,८३०/- होईल. मार्केटमध्ये मालाची दिवसेंदिवस होणारी दरवाढ पाहता, २५% पेक्षा जादा असलेली मागणी पुरवठाधारकाने नाकारल्यास, आवश्यकतेप्रमाणे माल बाजार भावाने खरेदी करावा लागेल वाढीव मागणीबाबत प्रसादालय प्रमुखांशी चर्चा केलेली असून गेल्या ८ महिन्यांचे वापराचे परिमाणावरुन वाढीव मागणी तयार करणेत आलेली आहे. यामध्ये प्रत्यक्ष बदल होऊ शकतो. सदरची खरेदी ही आवश्यकतेनुसारच करणेत येईल.

तरी उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे एकुण पुरवठयाचे २५% किराणा माल मान्य दराने खरेदी करणेस, तसेच त्यापेक्षा जास्त माल खरेदी करावयाचे झाल्यास व पुरवठादाराने मुळ मंजूर दराने माल देऊ केल्यास त्यांचेकडून अन्यथा बाजार भावाने खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.२,६१,०५,८६८/- पुर्णांकित रक्कम रु.२.७५ कोटी पर्यंतचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

याचवेळेस प्रसादालय विभागामार्फत माल तपासणीकामी योग्य ती स्वतंत्र व्यवस्था करण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग/अधिक्षक,आस्थापना विभाग)

विषय नं.४४ सोलर स्टीम कुर्कींग यंत्रणा उभारणी कामास मुदतवाढ देणेबाबत.

निर्णय क्र.४४ मा.व्यवस्थापन समिती दि.२४/०५/२००८ चे सभेतील निर्णय क्र.४१८ नुसार नविन श्री साई प्रसादालयाकरीता सोलर स्टीम कुर्कींग यंत्रणा खरेदी व उभारणीचे काम मे.गढीया सोलर एनर्जी सिस्टीम प्रा.लि.वलसाड यांना देण्यात आलेले असून त्याकामी प्र.शा.जा.नं.एसएसएस-वशि/प्रसाद/११०५२/०८ दि.२८/०७/२००८ ने कार्यादेश देण्यात आलेला आहे. सोलर स्टीम कुर्कींग यंत्रणा उभारणीकामी निवीदेमध्ये कार्यादेशापासुन ५ महिण्याचे आत काम पुर्ण करावे असे नमूद केलेले आहे. त्यानुसार कार्यादेशाचे दि.२८/०७/२००८ तारखेपासून ५ महिण्यात दि.२७/१२/२००८ पर्यंत यंत्रणा उभारणीचे काम होणे आवश्यक आहे.

मात्र गढीया सोलर एनर्जी सिस्टीम प्रा.लि. वलसाड यांनी दि.२८/११/२००८ चे पत्रान्वये सोलर स्टीम कुर्कींग यंत्रणा उभारणीचे कामास दि.३१/०३/२००९ अखेर मुदतवाढ मागितलेली आहे. मुदतवाढ मागणीचे पत्रामध्ये ॲडव्हान्सची रक्कम उशीराने मिळाल्याने सोलर स्टीम कुर्कींग यंत्रणा उभारणीचे कामास उशीर होईल असे नमूद केलेले आहे.

सोलर स्टीम कुर्कींग यंत्रणा उभारणीकामी दिनांक २८/०७/०८ कार्यादेश दिल्यानंतर निविदेतील अटी/शर्ती क्रं. 46 A नुसार ॲडव्हान्स ३०% रक्कम देणेपूर्वी बँक गॅरंटी घेणेत येईल असे नमूद केलेले आहे. त्यानूसार गढीया सोलर एनर्जी सिस्टीम प्रा.लि. यांनी दिनांक १०/०९/०८ रोजी बँक गॅरंटी देण्यात आलेली आहे. निविदेतील अटी/शर्तीनूसार बँक गॅरंटीची पुर्तता झाल्यानंतर दिनांक १४/१०/०८ रोजी करारनामा केलेला आहे. करारनामा झाल्यानंतर दिनांक १४/१०/०८ रोजी पुरवठादार यांचे मागणीनूसार रुपये ३९,९०,०००/- ॲडव्हान्सची रक्कम देण्यात आलेली आहे.

गढीया सोलर एनर्जी सिस्टीम प्रा.लि., वलसाड यांनी पत्रामध्ये नमूद केलेनूसार ॲडव्हान्सची रक्कम मिळालेपासून ०५ महिन्यात म्हणजेच १४/०३/०९ पर्यंत सोलर स्टीम कुर्कींग यंत्रणा उभारणीचा

कालावधी पुर्ण होईल मात्र गढीया सोलर एनर्जी सिस्टीम प्रा.लि.यांनी सोलर स्टीम कुर्कींग यंत्रणा उभारणीचे कामास दिनांक ३१/०३/०९ मुदतवाढ मागितलेली आहे.

तरी गढीया सोलर एनर्जी सिस्टीम प्रा.लि.यांचे विनंती अर्जानुसार सोलर स्टीम कुर्कींग यंत्रणा उभारणीकामी दि.३१/०३/२००९ अखेर मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

विषय नं.४५ श्रीसाई प्रसादालयातील मशिनरी /इक्वीपमेंट अलाईड सिस्टीम दैनंदिन चालविणेकामी आऊट सोर्सिंग पध्दतीने देणे व वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणे बाबत.

निर्णय क्र.४५ श्रीसाई प्रसादालयाचे काम पुर्ण झालेले असून प्रसादभोजन बनविणेकामी लागणा-या मशिनरी, उपकरणे, इक्वीपमेंट, फर्निचर, अलाईड सिस्टीम्सची पुरवठादारांनी उभारणी केलेली आहे. प्रसादालयाकडे पुरेसा टेक्निकल स्टॉफ नसल्यामुळे सदर मशिनरी / इक्वीपमेंट, उपकरणे, अलाईड सिस्टीम्स दैनंदिन चालविणे / देखभाल, दुरुस्तीचे कामी काही सिस्टीम्सची वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट व काही सिस्टीम्स आउट सोर्सींग पध्दतीने देणे आवश्यक आहे.

श्रीसाई प्रसादालयामध्ये कार्यरत असणारे एकूण मशिनरी,उपकरणे, इक्वीपमेंटस् अलाईड सिस्टीम्स चालविणे / दुरुस्ती / देखभालबाबत सध्याची व भविष्यात अवलंबावी लागणारी पध्दत याबाबत तपशीलवार माहीतीचा तक्ता आजचे सभेत सादर केला होता.

उपरोक्त मशिनरी, उपकरणे, इक्वीपमेंट, अलाईड सिस्टीम्स दैनंदिन चालविणे, दुरुस्ती/देखभाल, वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट व आउट सोर्सींग पध्दतीचा अवलंब करणेकामी खालीलप्रमाणे कार्यवाही करणे गरजेचे आहे.

अ) अं. नं. ०१ गटामधील यंत्रणा दैनंदिन चालविणे व देखभाल करणेचे मे.गढीया सोलर एनर्जी सिस्टीम्स प्रा.लि., वलसाड हे निविदेतील अटी/शर्ती प्रमाणे ०५ वर्षे विनामुल्य करणार आहेत. त्यांचे कामगारांना भोजन/ निवास व्यवस्था विनामुल्य करणेची आहे.

ब) अं.नं. ०२ गटामधील यंत्रणा दैनंदिन चालविणेचे काम प्रसादालयातील तांत्रिक कर्मचारी करतील. व दुरुस्ती / देखभालचे काम विद्युत विभागाकडील A/C मेन्टनंन्सचे तांत्रिक कर्मचारी करतील. निविदेतील अटी/शर्तीप्रमाणे AMC चे काम ०१ वर्ष विनामुल्य करणार आहेत.

क) अ.नं.०३ गटामधील यंत्रणा दैनंदिन चालविणेचे काम प्रसादालयातील तांत्रिक कर्मचारी करतील. व दुरुस्ती / देखभालचे काम विद्युत विभागाकडील A/C मेन्टनंन्सचे तांत्रिक कर्मचारी करतील. तसेच वार्षिक AMC चे काम विद्युत विभागाकडून त्यांनी A/C कामासाठी नियुक्त केलेल्या सर्व्हीस कंपनी मार्फत करुन घेता येईल. त्याकामी कार्यवाही विद्युत विभागामार्फत करता येईल.

ड) अं.नं. ४ व ५ गटामधील यंत्रणा दैनंदिन चालविणेचे काम प्रसादालयातील तांत्रिक कर्मचारी करतील.

२) वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट थर्मक्स कंपनीचे अधिकृत फ्रँचीस मॅक्सीथर्म वर्क्स, यांना देण्यात येत आहे. यापुढेही देता येईल.

इ) अं.नं. ०६ ,०७, व ८ गटामधील यंत्रणा दैनंदिन चालविणेचे काम प्रसादालयातील वर्ग ०४ चे कर्मचारी करतात व करतील.

२) दुरुस्ती / देखभालचे काम प्रसादालयातील तांत्रिक कर्मचारी करतात व करतील.

३) अं.नं. ०८ मधील (इम्पोर्टेड) मशिनरीसाठी पुरवठादार यांना AMC करीता नियुक्ती करता येईल.

ई) अं.नं. ०९ गटामधील यंत्रणा दैनंदिन चालविणे , दुरुस्ती/देखभालसाठी आउट सोर्सींग पध्दतीने ०१ वर्षासाठी AMC देता येईल.

फ) अं.नं. १० गटामधील यंत्रणा दैनंदिन चालविणे , दुरुस्ती/देखभालसाठी आउट सोर्सींग पध्दतीने ०१ वर्षासाठी AMC देता येईल.

न) अ.नं. ११ गटामधील यंत्रणा दैनंदिन लिफ्ट ऑपरेटींगचे कामे लिफ्ट ऑपरेटर करतील. पुरवठादार कंपनीकडून ०१ वर्ष AMC विनामुल्य आहे.

१) अ.नं.३, ४, ५, ८, ११ या गटातील मशिनरीसाठी दुरुस्ती / देखभालकामी त्या त्या कंपनी / पुरवठादार / अधिकृत फ्रँचीसकडून वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट (AMC) व अ.नं. ९, १० या गटातील मशिनरी दैनंदिन चालविणेसाठी आउट सोर्सिंग पध्दतीचा अवलंब करता येईल. वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट व आउट सोर्सिंग पध्दतीचा अवलंब करणेसाठी पुरवठादार कंपनी / एजन्सी / अधिकृत फ्रँचीसकडून दरपत्रक मागविणेसाठी मान्यता असावी.

२) जुन्या प्रसादालयामध्ये कमी प्रमाणात मशिनरी आहेत सदर मशिनरीचे दैनंदिन दुरुस्ती/देखभालकामी ०१ इंजिनिअर ०२ फीटर आय.टी.आय व ०१ वायरमन असे ०४ तांत्रिक कर्मचारी आहेत. नविन श्री साई प्रसादालयामधील मशिनरीची संख्या दुप्पट झालेली आहे. व या ठिकाणी मोठ्या प्रमाणत गर्दीही वाढणार आहे. त्यामुळे सध्याचे तांत्रिक कर्मचारी अपुरे पडतील.

सर्व मशिनरीची दुरुस्ती / देखभालचे कामे वेळेवर होणेसाठी प्रसादालयात सध्या असलेल्या तांत्रिक कर्मचा-यांव्यतीरीक्त खालीलप्रमाणे जादा तांत्रिक कर्मचारी असावेत असे मत आहे.

इंजिनिअर- ०१ दि.०६/०९/२००८ सभेतील निर्णय क्र.७४७ ने २ पदास मान्यता
फीटर - ०२ नविन श्री साई प्रसादालय आकृतीबंधात समावेश केलेला आहे.
लिफ्ट ऑपरेटर -०५ नविन श्री साई प्रसादालय आकृतीबंधात समावेश केलेला आहे.
बॉयलर अॅटेंडंट -०३ नविन श्री साई प्रसादालय आकृतीबंधात समावेश केलेला आहे.

तरी श्री साई प्रसादालयातील परिशिष्ट ब मधील अ.नं.१ ते ८ व ११ या गटात नमुद केलेल्या मशिनरी दर्‌रोज व्यवस्थीतरित्या कार्यरत रहाणेसाठी सदर मशिनरीची दैनंदिन देखभाल / दुरुस्तीचे कामासाठी वरीलप्रमाणे तांत्रिक पदाचे कर्मचारी घेणेस तसेच श्री साई प्रसादालयातील मशिनरी / इक्वीपमेंट, अलाईड सिस्टीम्स् व्यवस्थीतरित्या चालू रहाणेसाठी वरीलप्रमाणे १ व २ नुसार कार्यवाहीस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,कामाची निकड विचारात घेता तूर्त कंत्राटी पद्धतीने योग्य व पात्रताधारक कर्मचारी घेण्यात यावे,असें ठरलें. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

विषय नं.४६ नवीन व्दारावती भक्तनिवास इमारतीमध्ये अंतर्गत दुरध्वनी सुविधा उपलब्ध करुन देणे बाबत.

निर्णय क्र.४६ (अ)श्रीसाईभक्तांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने संस्थानने विविध उपक्रम हाती घेतले आहेत. या उपक्रमांतर्गत जास्तीत जास्त साईभक्तांची निवासाची व्यवस्था संस्थानमार्फत होणेसाठी नविन व्दारावती भक्तनिवास इमारतीचे बांधकाम चालू असून, ते अंतिम टप्यात आहे. या इमारतीमध्ये संपर्कासाठी दूरध्वनी सेवा उपलब्ध करुन देणेसाठी श्री साईबाबा हॉस्पिटल मध्ये बसविण्यात आलेल्या दूरध्वनी एक्सचेंजमधून दूरध्वनी सेवा देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे दूरध्वनी साहित्यांची आवश्यकता आहे.

अ.नं.	तपशील	नग	अंदाजे दर	अंदाजे एकूण रक्कम
०१	५० पेअर जेलीफिल्ड आर्माड टेलीफोन केबल	३०० मीटर	२२५/- प्रती मीटर (कर अतिरिक्त)	६७,५००/- (कर अतिरिक्त)
०२	५० पेअर डी.पी.बॉक्स	१ नग	२०००/- प्रती नग (कर अतिरिक्त)	२०००/- (कर अतिरिक्त)
		एकूण		६९,५००/- (कर अतिरिक्त)

उपरोक्त तपशीलाप्रमाणे साहित्य विविध पुरवठादारांकडून सिलबंद दरपत्रके मागवून न्यूनतम दरपत्रकधारकाकडून सदर साहित्य खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रक्कम रुपये ६९,५००/- (कर अतिरिक्त) चे खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १०.०१.०८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ०८ (१९) नुसार मान्यता देण्यात आलेली आहे. सदर निर्णयास अनुसरुन, दूरध्वनी साहित्य पुरवठादारांकडून सदर केबल व इतर साहित्यांचे सिलबंद दरपत्रक मागविण्यात आली होती. सदर दरपत्रकांपैकी मे. एस. आर. ट्रेडर्स, नाशिक यांचे दरपत्रक न्यूनतम दराचे असल्याने. जा. नं. एसएसएसटी/आयटी/४४७६/२००८ दिनांक २६ मार्च, २००८ नुसार त्यांना सदर दूरध्वनी साहित्य पुरविणेचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

(ब) तथापि, व्दारावती इमारतीचे वरच्या मजल्याचे कामकाज चालू असून, ते अंतीम टप्यात आहे. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १०.०१.२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ०८(१९) नुसार फक्त पूर्वी बांधकाम झालेल्या खोल्यापैकी आवश्यक त्या ठिकाणी दूरध्वनी देणेसाठी ५० पेअर जेलिफिल्ड आर्माड केबल व डिपी बॉक्स खरेदी करणेस मान्यता घेण्यात आलेली होती. परंतु, सदर इमारतीचे वाढीव मजल्यावरील व्हीआयपी खोल्यांमध्येही दूरध्वनी सेवा उपलब्ध करुन द्यावी लागणार असल्याने दूरध्वनींची संख्या वाढलेली आहे. सदर ठिकाणी साधारणत: ९४ अंतर्गत दूरध्वनी उपलब्ध करुन द्यावे लागणार असलेबाबत धर्मशाळा विभागाने कळविलेले आहे. सदर कार्यवाहीसाठी सदर ५० पेअरची दूरध्वनी केबल व इतर साहित्य अपूरे पडणार असल्याने, मे. एस. आर. ट्रेडर्स यांचेकडून दूरध्वनी केबल व इतर साहित्य खरेदीची कार्यवाही थांबविण्यात आलेली आहे. संपूर्ण व्दारावती इमारतीमध्ये आवश्यक ठिकाणी दूरध्वनी सेवा उपलब्ध करुन देणेसाठी खालील तपशीलाप्रमाणे दूरध्वनी साहित्य खरेदी करावे लागणार आहे.

अ.नं.	**तपशील**	**नग**	**अंदाजे दर**	**अंदाजे एकूण रक्कम**
०१.	१०० पेअर जेलीफिल्ड आर्माड टेलीफोन केबल	११०० मीटर	४५०/- प्रती मीटर	४,९५,०००/-
०२.	१०० पेअर एमडीएफ बॉक्स क्रोन टाईप	०४ नग	३,८००/- प्रती नग	१५,२००/-
०३.	५० पेअर एमडीएफ बॉक्स क्रोन टाईप	०४ नग	२,०००/- प्रती नग	८,०००/-
०४.	टेलिफोन इन्स्ट्रुमेंट- पॅनासोनिक KX-	२०० नग	४६०/- प्रती नग	९२,०००/-

	TS५००MX अ) नवीन प्रसादालय इमारत-५० ब) व्दारावती इमारत-१०० क) श्रीसाईबाबा भक्तनिवासस्थान-५०			
		एकूण		६ ,१०,२००/- (कर अतिरिक्त)

उपरोक्त साहित्य खरेदीसाठी अंदाजे रुपये ६ ,१०,२००/- (कर अतिरिक्त) पर्यंतचा खर्च अपेक्षित असून, सदर साहित्य विविध पुरवठादारांकडून पुन्हा दरपत्रके मागवून न्यूनतम दरपत्रकधारकाकडून खरेदी करता येईल. सिलबंद दरपत्रके मागविणेसाठी नामांकित वर्तमान पत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करावी लागणार आहे.

(क) व्दारावती इमारतीमध्ये श्री साईबाबा हॉस्पिटल मध्ये बसविण्यात आलेल्या दूरध्वनी एक्सचेंजमधून दूरध्वनी सेवा देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तथापि, सदर एक्सचेंजमध्ये सध्या ७ Analog Cards असून याव्दारे १६८ दूरध्वनी देण्याची सुविधा उपलब्ध आहे. दोन्ही रुग्णालये, धर्मशाळा, अधिकारी / कर्मचारी निवासस्थाने आदि. ठिकणी आतापर्यंत १६८ दूरध्वनी जोडण्यात आलेले आहेत. व्दावरावती इमारतीमध्ये साधारणत: १०० अंतर्गत दूरध्वनी व भविष्यात हॉस्पिटल, धर्मशाळा येथे आणखी अंतर्गत दूरध्वनी देण्याची मागणी येत आहे. परंतु तेथील एक्सचेंजमध्ये नवीन दूरध्वनींसाठी जागा शिल्लक नसल्याने, नवीन ७ Analog Cards जोडून अंतर्गत दूरध्वनींची सुविधा उपलब्ध करुन द्यावी लागणार आहे. सदर Analog Cards हे सिमेन्स कंपनीकडूनच खरेदी करावे लागणार आहेत. कारण या संदेशवहन यंत्रणेसाठी इतर कंपन्यांचे Analog Cards बसविता येत नाहीत. त्यामुळे या यंत्रणेस सिमेन्स कंपनीचेच Cards वापरावे लागणार आहेत. सिमेन्स एन्टरप्राईजेस कम्युनिकेशन प्रा. लि., मुंबई यांचेकडून सदर Analog Cards चे दरपत्रक मागितले असता, त्यांनी प्रती कार्डची किंमत रुपये ९७,०००/-(कर अतिरिक्त) असे सात कार्डस्साठी एकूण रुपये ६,७९,०००/- (कर अतिरिक्त) इतका खर्च कळविला आहे.

उपरोक्त विवेचनानुसार, **परिच्छेद ब** मध्ये नमुद केलेप्रमाणे दूरध्वनी साहित्य विविध पुरवठादारांकडून दरपत्रके मागवून न्यूनतम दरपत्रकधारकाकडून खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रुपये ६,१०,२००/-(कर अतिरिक्त) पर्यंतचे खर्चास मान्यता मिळणेस तसेच सदर सिलबंद दरपत्रके मागविणेकामी नामांकित वर्तमान पत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यास व त्यासाठी येणारे प्रत्यक्ष खर्चास मान्यता मिळणेस तसेच **परिच्छेद क** मध्ये नमुद केलेप्रमाणे Siemens Hipath ४३०० IP या अत्याधुनिक अंतर्गत दूरध्वनी यंत्रणेची क्षमता वाढविणेसाठी सात Analog Cards सिमेन्स एन्टरप्राईजेस कम्युनिकेशन प्रा. लि., मुंबई यांचेकडून खरेदी करणेस व त्यासाठी येणारे एकत्रित एकूण खर्च रुपये ६,७९,०००/- (कर अतिरिक्त) मात्रचे खर्चास तत्वत: मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-आय.टी.विभागप्रमुख)

विषय नं.४७ नवीन व्दारावती भक्तनिवास इमारतीमध्ये संगणकीय सुविधा उपलब्ध करुन देणेकामी संगणकीय जाळयांची उभारणी करणेबाबत.

निर्णय क्र.४७ श्रीसाईभक्तांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने संस्थानने विविध उपक्रम हाती घेतले आहेत. या उपक्रमांतर्गत जास्तीत जास्त साईभक्तांची निवासाची व्यवस्था संस्थानमार्फत होणेसाठी नविन व्दारावती भक्तनिवास इमारतीचे बांधकाम चालू असून, ते अंतिम टप्यात आहे. या इमारतीमध्ये कार्यालयीन कामकाजासाठी संगणकीय सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी संगणकीय जाळ्याची उभारणी करावी लागणार असून, त्यासाठी खालीलप्रमाणे साहित्य खरेदी करावे लागणार आहे.

SR. NO.	DESCRIPTION	APP. QTY.	ESTIMATE RATE PER UNIT	AMOUNT
A.	Make-			
01.	12 core outdoor fiber MM	1800 MTRS	45.00	81000.00
02.	24 Port LIU unloaded	2 Nos.	2800.00	5600.00
03.	SC Coupler Plate	8 Nos.	120.00	960.00
04.	SC Coupler SM	48 Nos.	155.00	7440.00
05.	SC Pigtails SM 10 Feet	24 Nos.	295.00	7080.00
06.	SC to LC Fiber Patch cord SM 2 mtr.	4 Nos.	1400.00	5600.00
07.	Cat 6 Cable	2 Nos.	5650.00	13000.00
08.	Cat 6 Jack Pannel	1 Nos.	5400.00	5400.00
09.	Cat 6 I/O single	10 Nos.	225.00	2250.00
10.	Cat 6 I MTR Patch Cord	10 Nos.	145.00	1450.00
11.	Cat 6 2 MTR Patch Cord	10 Nos.	150.00	1500.00

12.	24 port Layer 2 Switch With Appropriate Fiber Modules Make- D-Link, Allied Telesyn, Cisco	1 Nos.	72000.00	72000.00
13.	2 Fiber Modules for present allied telesyn Layer 2 & Layer 3 Switch respectively	2 Nos.	32000.00	64000.00
13.	Back Box	10 Nos.	25.00	250.00
14.	40 mm HDPE Pipe	1800 Mtrs.	58.00	104400.00
15.	40 mm Coupling	36 Nos.	150.00	5400.00
16.	25 mm Cassing Capping PVC Pipe	50 Mtrs.	40.00	2000.00
17.	15 U wall mount rack HCL with accessories	1 Nos.	5900.00	5900.00
			Sub Total (A)	**3,85,230.00 + Taxes**
B.	**Labour**			
०१.	Laying of cable, HDpe pipe & splicing of fiber with dressing.	१	Job	१,५७,०००.०० + Taxes
			Total (B)	
	GRAND TOTAL (A+B)			**५,४२,२३०.००**

उपरोक्त तपशीलाप्रमाणे साहित्य खरेदी करणेसाठी अंदाजे रक्कम रुपये ५,४२,२३०/- + टॅक्स पर्यंतचा खर्च अपेक्षित असून, संगणकीय जाळे उभारणीची कार्यवाही विविध पुरवठादारांकडून सिलबंद निविदा मागवून न्यूनतम् निविदाधारकाकडून करुन घेण्यात येईल. सदर खर्च पाच लाखाचे पूढे असल्याने विविध पुरवठादारांकडून सिलबंद निविदा मागविणेसाठी वर्तमान पत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करावी लागणार आहे.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे, नवीन व्दारावती भक्तनिवास इमारतीमध्ये संगणकीय जाळे उभारणीची कार्यवाही विविध पुरवठादारांकडून सिलबंद निविदा मागवून न्यूनतम निविदाधारकाकडून करुन घेणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रक्कम रुपये ५,४२,२३०/- + टॅक्स पर्यंतच्या खर्चास तसेच निविदा मागविणेसाठी वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेसाठी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली व दूरध्वनी साहित्यांपैकी दूरध्वनी संच खरेदीची कार्यवाही तातडीने दरपत्रके मागवून न्यूनतम दरपत्रकधारकाकडून खरेदी करण्यात यावे,असें ठरलें. (कार्यवाही-आय.टी.विभागप्रमुख)

विषय नं.४८ तिकीट प्रिंटींग मशिन (Handheld Machine) खरेदीबाबत.

निर्णय क्र.४८ दि.१७/०४/२००५ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं.१५९ अन्वये, दि.०६.०८.२००५ पासून शिरडी- नगरसुल रेल्वेस्टेशन- शिरडी या मार्गावर प्रायव्हेट व्हेईकल सर्व्हिस या परवाण्याचे पालन करून ना नफा- ना तोटा या तत्वावर दोन बसेस सुरू केलेल्या आहेत. त्यास साईभक्तांचा चांगला प्रतिसाद आहे.

सदर बसेस करीता वेळोवेळी सेवाआकार पावती पुस्तके छापुन घेण्यात येतात. बस मधिल तिकीट विक्री सध्या हाताने फाडून केली जाते. त्यावर दिनांक, वेळ, बस क्रमांक हाताने टाकावा लागतो. बस प्रवासी अंदाजापेक्षा अधिक असल्यास तिकीट बुकिंग चालु असते वेळेस तिकीटवर दिनांक व वेळ टाकणेस जादा कालावधी लागतो तसेच बसमध्ये गर्दी असल्यामुळे अडचणी येतात.

सर्व कार्यपध्दतीत सुरळीतपणा येणे करीता तिकीट विक्री साठी बसमध्ये सहजासहजी वापरता येणारे तीन प्रिंटींग मशिन (Handheld Machine) खरेदी करणे आवश्यक आहे. याकामी रू.७०,०००/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.

तरी नगरसुल बसेस करीता तीन प्रिंटींग मशिन (Handheld Machine) खरेदी करणेस तसेच या कामी येणारे रू.७०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

विषय नं.४९ श्रीसाई प्रसादालयाच्या वायुवीजनच्या कामासाठी मुदतवाढ मिळणेबाबत तसेच कराव्या लागलेल्या व आवश्यक कामाकरीता खर्चास मान्यता मिळणे बाबत.

निर्णय क्र.४९ मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०३-०८-२००८ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.६३६(२) नुसार मे. केल्व्हीन एअरकंडीशनिंग ॲण्ड वेन्टीलेशन सिस्टीम्स प्रा.लि.,मुंबई यांना श्री साई प्रसादालयाच्या किचनकरीता वायुवीजनच्या कामासाठी रु. २,०५,००,०००.०० इतक्या रकमेचा कार्यादेश देण्यात आला आहे. तसेच मे. डिझाईन ईंजिनिअर्स, मुंबई यांची श्री साई प्रसादालय इमारतीतील किचनमध्ये वायुवीजनची व्यवस्था करणेच्या प्रकल्पासाठी सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

मे.केल्व्हीन एअरकंडीशनिंग ॲण्ड वेन्टीलेशन सिस्टीम्स प्रा.लि., मुंबई यांनी श्री साई प्रसादालयातील किचनच्या वायुवीजनचे काम पूर्ण करीत आणले आहे. वायुविजनचे कामाकरीता

मे.केल्व्हिन एअर कंडीशनर अॅण्ड व्हेन्टीलेशन, मुंबई यांना ४ महिन्यांची मुदत देण्यात आली होती. ही मुदत दिनांक ०२ डिसेंबर, २००८ रोजी संपली आहे.

दिनांक २४-११-२००८ रोजी मे.केल्व्हिन एअर कंडीशनर अॅण्ड व्हेन्टीलेशन, मुंबई हे शिर्डी येथे कामाच्या प्रत्यक्ष पाहणीकरीता आले असता त्यांनी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांची समक्ष भेट घेऊन, हिंदी महासागरात सोमालियाच्या चाच्यांकडून भारतीय जहाजावर हल्ले चालू झाल्याने या यंत्रणेतील एक्झॉस्ट फॅन्स घेऊन येणारे जहाज परत फिरल्याने एक्झॉस्ट फॅन्स मिळण्यात थोडा ऊशिर होणार असल्याचे व लवकरात-लवकर फॅनस् भारतात आणण्याची पर्यायी व्यवस्था ते करीत असल्याबद्दल सांगितले.

यानंतर दिनांक ०९-१२-२००८ रोजी श्री साई प्रसादालयाच्या किचनकरीता वायुवीजनच्या कामाच्या प्रगतीसंबंधी व आढाव्यासंबंधी शिरडी येथे मा.कार्यकारी अधिकारीसाहेब याचे कक्षात मिटिंग झाली त्यावेळी मे.केल्व्हिन एअर कंडीशनर अॅण्ड व्हेन्टीलेशन, मुंबईचे श्री. शेट्टी यानी कामाच्या प्रगतीसंबंधी नमूद केले की, त्यांनी प्रयत्न करुन फॅन्स भारतात आणण्याची पर्यायी व्यवस्था केलेली आहे. व हे फॅन्स या महिन्याच्या मध्यावर भारतात पोहचतील. हे फॅन्स भारतात ज्या दिवशी पोहचतील त्यानंतर ते तातडीने शिरडीत आणून इरेक्शन पूर्ण करणार आहेत. हे इरेक्शन दि.२०-१२-२००८ रोजी पूर्ण होणार असून दि.२१-१२-२००८ रोजी ट्रायल घेणेस सुरुवात करणार आहेत.दि.२५-१२-२००८ रोजी ही वायुवीजनची यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होईल.

यावेळी चालू असलेल्या कामाची चर्चा होताना काही अपरिहार्य कारणामुळे कराव्या लागणा-या इतर कामाचीही चर्चा झाली. तसेच यासंबंधी संस्थान कन्सल्टंट मे.डिझाईन इंजिनिअर्स, मुंबई यांनी लेखी पत्र दिले असून त्याचा तपशील पुढीलप्रमाणे :-

०१) वायुवीजन यंत्रणेसाठी इनलेट व आऊटलेट साठी स्लॅबमध्ये पूर्वी जे कटआऊट ठेवण्यात आले होते. ते या यंत्रणेकरीता पुरेसे नव्हते. आणखी नविन कटआऊट काढण्याची गरज होती. म्हणून संस्थान बिल्डिंग आर्कीटेक्ट, मे.शक्ती परमार अँड असोशिएटस्, मुंबई यांचे व बिल्डिंगचे स्ट्रक्चरल इंजिनिअर श्री.प्रणय वर्मा यांचे मार्गदर्शनानुसार लॅबमध्ये आणखी कटआऊट घेण्यात आले. हे कटआऊटचे काम त्यांनीच सुचविलेल्या एजन्सीकडून मे.केल्व्हिन एअर कंडीशनर अॅण्ड व्हेन्टीलेशन, मुंबई यांनी करवून घेतले. यासाठी रु. ३,४०,५००.०० इतका खर्च आला आहे.

०२) स्लॅब कट झाल्यानंतर स्लॅबला भक्कमपणासाठी खालील बाजूने लोखंडी सपोर्ट देणे आराखडयात दर्शविलेले असल्याने तसेच मशिनरीसाठी असलेल्या पॅनेलमध्ये संस्थानच्या आवश्यकतेनुसार काही बदल करणे गरजेचे असल्याने त्यानुसार बदल करण्यात येऊन स्लॅबला कटआऊट घेतलेल्या ठिकाणी आतून सपोर्ट मे.केल्व्हिन एअर कंडीशनर अॅण्ड व्हेन्टीलेशन, मुंबई यांचेमार्फत लावण्यात आले. यासाठी रु. २,०४,५००.०० इतका खर्च आला आहे.

०३) किचनमधील जळालेले तेलाचे बाष्प आणि इतर घाण एक्झॉस्टच्या डक्टमध्ये जाऊ नये व एक्झॉस्ट सिस्टिमचे आयुष्य वाढावे म्हणून किचनच्या प्रत्येक भट्टीच्यावर असलेल्या एक्झॉस्ट इनलेटमध्ये जी.आय.ऐवजी अॅल्युमिनिअमचे डबल डिफ्लेक्शन सिस्टीमचे ग्रील बसवावे लागले आहे. यासाठी ६,०९,७९०.०० इतका खर्च अपेक्षित आहे.

०४). किचनमध्ये स्वयंपाकाची प्रक्रीया चालू असताना उष्णतामान वाढणार होते. तसेच हवेतील आर्द्रताही कमी होणार होती शिवाय किचनच्या पश्चिम बाजूस भिंत असल्याने तेथून हवा येण्याचा मार्ग बंद झालेला आहे. व त्यामुळे तेथे काम करणाऱ्या कर्मचा-यांना श्वास घेण्यास त्रास होऊन सफोकेशन झाले असते म्हणून या किचनमध्ये बाहेरुन गार हवेचा झोत ठिकठिकाणी सोडणे गरजेचे होते, जेणेकरुन आतील तापमान कमी होऊन हवेतील आर्द्रता वाढू शकेल. स्लॅबवर लावलेल्या AHU युनिटमध्ये स्प्रिंकलर्सव्दारे पाण्याचे तुषार तयार करुन ते आत AHU युनिटमध्ये हवेत मिसळून प्रेशरद्वारे ही हवा डक्टव्दारे किचनमध्ये ठिकठिकाणी खेळविली आहे. या हवेच्या तापमानात स्लॅबपासून किचनमध्ये येईपर्यंत वाढ होऊ नये व थंडपणा टिकून राहावा म्हणून या यंत्रणेच्या डक्टला इन्सुलेशन करणे आवश्यक आहे. यासाठी रु. १२,००,८००.०० इतका खर्च अपेक्षित आहे.

०५) या यंत्रणेच्या विविध मशिनरींकरीता वीजपुरवठा करणेकामी व मशिनरीचे नियंत्रण करण्यासाठी पॅनेल्स कंपनीने पुरविले असून या पॅनेलपासून मशिनरीपर्यंत सप्लाय व कन्ट्रोलींगकरीता विविध साईजच्या कॉपर केबल टाकून मशिनरींना वीजपुरवठा करावे लागणार आहे. याकरीता मे.केल्व्हिन एअर कंडीशनर अॅण्ड व्हेन्टीलेशन, मुंबई यांनी केबल्स पुरविल्या आहेत. याकामी रु.७,६०,४४०.०० इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी वायुविजनचे कामाकरीता मे.केल्व्हिन एअर कंडीशनर अॅण्ड व्हेन्टीलेशन, मुंबई यांना ३१ डिसेंबर २००८ पर्यंत मुदतवाढ देणेस व कराव्या लागणाऱ्या आवश्यक कामाकरीता येणाऱ्या अपेक्षित रु. २५,७१,०३०.०० इतक्या खर्चास तसेच कराव्या लागलेल्या स्लॅब कटींगचे व रेक्टिफिकेशन, सपोर्टिंग

वर्कचे रु.५,४४,५००.०० इतक्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

विषय नं.५० मे.श्रीनिवास फाईन आर्ट, मुंबई यांची श्री साईबाबा दैनंदिनी २००९ विक्री करणे बाबत.

निर्णय क्र.५० श्री राजेश अपाजे, श्रीनिवास फाईन आर्टस् प्रा.लि., मुंबई यांनी त्यांचे कडील दि.१८.११.२००८ चे प्रस्तावान्वये सन २००९ ची श्री साईबाबा दैनंदिनी प्रती नग रु.३९५/-प्रमाणे संस्थानने घ्याव्यात व संस्थानचे बुकस्टॉलवर भक्तांसाठी विक्रीस ठेवाव्यात त्या मोबदल्यात संस्थानला ३५% डिस्काऊंट देणार आहेत. संस्थानला ३५% डिस्काऊंटने प्रती दैनंदिनी मागे १३८.२५ पैसे मिळतील व डिस्काऊंट वजा जाता प्रती दैनंदिनी मागे रु.२५६.७५ पैसे प्रमाणे रक्कम अदा करावी लागेल. दैनंदिनींची विक्री झाल्यानंतर त्यांचे कंपनीला रक्कम अदा करावी असे संदर्भिय पत्रात नमुद केले आहे. तसेच याबाबत दि.१५.११.२००८ रोजी शिर्डी येथील कार्यालयात चर्चा करण्यात आली असल्याचे नमुद केले असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो अमान्य करण्यात आला.

(कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

विषय नं.५१ श्रीमती किशोरी शहाणे, ओम दी मंत्र प्रॉडक्शन, मुंबई यांचे श्रीसाईबाबांचे कॅलेंडर विक्री करणे बाबत.

निर्णय क्र.२९ ओम दी मंत्र प्रॉडक्शन्स् , मुंबई यांनी दि.११.१२.२००८ चे पत्रात खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

१) श्री साईबाबांचे कॅलेंडर संस्थानमार्फत विक्री करणेबाबत कळविले असून, कॅलेंडर संस्थानने आमचे कंपनीकडून घ्यावेत व संस्थानचे बुकस्टॉलवर भक्तांसाठी विक्रीस ठेवावेत त्या मोबदल्यात संस्थानला प्रत्येक कॅलेंडरचे विक्रीवर १०% रक्कम देण्यात येईल.

२) आमचे कॅलेंडर मध्ये १ कॅलेंडर हे तारखेचे व १ कॅलेंडर हे बिगर तारखेचे अशा प्रकारात असून बिगर तारखेचे कॅलेंडरचा उपयोग भक्तांना वर्षानुवर्षे पुजेसाठी उपयोग होईल.

३) त्यांचे कॅलेंडरचा प्रस्ताव मान्य करणार असाल, तर पुढील मिटींगमध्ये कॅलेंडरबाबत कॅलेंडरची साईज, पेपर, किंमत इत्यादी बाबत चर्चा समक्ष करण्यास तयार आहेत. असे पत्रात नमूद केलेले आहे.

सदर मोठ्या कॅलेंडरच्या फोटोच्या खालील बाजूस Maalik Ek, A DEEPAK BALRAAJ VIIZ FILM, JACKIE SHROFF AS SHIRDI SAIBABA व लहान कॅलेंडरच्या फोटोवर Maalik Ek, A DEEPAK BALRAAJ VIIZ FILM असे छापलेले आहे.

संस्थानमार्फत खालील प्रमाणे अधिकृत संस्थान प्रकाशनांची विक्री केली जाते.

अ.नं.	तपशिल	संख्या
०१	श्री साई दैनंदिनी	०१
०२	श्री साईबाबा दिनदर्शिका	०३
०३	पुस्तके	७०
०४	फोटो	२०
०५	सी.डी.	०७
०६	व्ही.सी.डी.	०२
०७	डी.व्ही.डी.	०१
	एकूण	१०४

उपरोक्तप्रमाणे संस्थान अधिकृत १०४ प्रकाशनांची व मे.साईग्रेस फाऊन्डेशन, मुंबई यांचेकडील श्री साईबाबा दिनदर्शिका (८ पानी) ०१ व मे.परफेक्ट प्रिंट प्रॉडक्ट प्रा.लि., मुंबई यांचेकडील श्री साईबाबा ३ डी टेबल कॅलेंडर १ असे एकूण १०६ प्रकारात प्रकाशने साईभक्तांसाठी विक्रीस उपलब्ध करुन दिलेली आहेत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४.०५.२००८ चे सभेतील निर्णय क्र.४१५ नुसार "इतर कुठल्याही अन्य खाजगी प्रकाशनांचे हक्क स्वीकारण्यात येऊ नयेत," असे ठरलेले असल्याने सदरहू प्रस्ताव अमान्य करण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

विषय नं.५२ निवासी वैद्यकीय अधिकारी नेमणूकीस कार्योत्तर मान्यता देणेबाबत.

निर्णय क्र.५२ संस्थानचे हॉस्पीटलकरीता ०१) इन्टेन्सीव्हीस्ट-०६ पदे, रेडीओलॉजीस्ट-०२ पदे, जनरल सर्जन-०१ पद, सी.एम.ओ/ आर.एम.ओ -१० पदे भरणेकामी वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करण्यात येऊन दि.११-१२ डिसेंबर २००८ रोजी पात्र उमेद्वारांना थेट मुलाखतीसाठी बोलाविण्यात आले होते.

त्यानुसार हजर राहीलेल्या पात्र उमेद्वारांच्या मा. विश्वस्त डॉ.ई.बी.गोंदकर साो. वैद्यकिय संचालक डॉ.बोबडे, प्रशासकिय अधिकारी श्री. पी.टी.जोशी यांनी मुलाखती घेऊन त्यांना खाली दर्शविल्याप्रमाणे नेमणूक पत्रे देण्यात आलेले आहेत.

अ.नं.	**वैद्यकीय अधिकारी नांव**	**शैक्षणिक पात्रता**	**नेमणूक आदेश नंबर व हॉस्पीटलचे नांव**	**दिलेले पदनांम व एकत्रीत मानधन /वेतन**
०१.	डॉ. अभिजित क्रिष्णा बोराळकर, औरंगाबाद	एम.बी.बी.एस.	जा.नं.एसएसएस/वशी-०१/१८६१२/२००८ दि.१६-१९/१२/२००८ श्री साईबाबा हॉस्पीटल,	आर.एम.ओ , एकत्रित वेतन रु. १७०००/-
०२.	डॉ. विशाल व्ही. शिंदे	एम.बी.बी.एस.	जा.नं.एसएसएस/वशी-०१/१८७०७/२००८	आर.एम.ओ.

	नाशिक रोड नाशिक		दि.२२/१२/२००८ श्री साईबाबा हॉस्पीटल,	एकत्रित वेतन प्रतिमहा रु.१७,०००/-
०३.	डॉ. शेख नाजीश झियाउद्दीन मुंबई	एम.बी.बी.एस.	जा.नं.एसएसएस/वशी-०१/१८७०८ /२००८ दि. २२/१२/२००८ श्री साईबाबा हॉस्पीटल,	आर.एम.ओ. एकत्रित वेतन प्रतिमहा रु.१७,०००/-
०४.	डॉ. अतुल तान्हाजी वालझाडे, नाशिक	एम.बी.बी.एस.	जा.नं.एसएसएस/वशी-०१/१८८५५/२००८ दि. २६/१२/२००८ श्री साईबाबा हॉस्पीटल,	आर.एम.ओ. एकत्रित वेतन प्रतिमहा रु.१७,०००/-
०५.	डॉ. धरमेंदर तेवारी ठाणे	एम.बी.बी.एस.	जा.नं.एसएसएस/वशी-०१/१८८५६/२००८ दि. २६/१२/२००८ श्री साईबाबा हॉस्पीटल,	आर.एम.ओ. एकत्रित वेतन प्रतिमहा रु.१७,०००/-
०६.	डॉ. राहुल एन.मिरवणकर, श्रीरामपूर	एम.बी.बी.एस.	जा.नं.एसएसएस/वशी-०१/१८८५७/२००८ दि. २६/१२/२००८ श्री साईबाबा हॉस्पीटल,	आर.एम.ओ. एकत्रित वेतन प्रतिमहा रु.१७,०००/-
०७.	डॉ. वैशाली के डिग्रजकर पुणे	एम.बी.बी.एस.	जा.नं.एसएसएस/वशी-०१/१८८५८/२००८ दि. २६/१२/२००८ श्री साईबाबा हॉस्पीटल,	आर.एम.ओ. एकत्रित वेतन प्रतिमहा रु.१७,०००/-

उपरोक्त ०१ ते ०७ वरील उमेद्वारांच्या आर.एम.ओ या पदावर करण्यात आलेल्या नेमणूकीस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

विषय नं.५३ श्रीसाईबाबा हॉस्पिटलकडील वैद्यकीय अधिकारी, तंत्रज्ञ, कर्मचारी यांना सेवेत मुदतवाढ/कायम करणेबाबत.

निर्णय क्र.५३ श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था,शिरडी मार्फत श्री साईबाबा हॉस्पीटल सन-२००५ सुरु झाले. त्यानंतर श्री साईबाबा हॉस्पीटल करीता आवश्यक असलेला वैद्यकिय अधिकारी / पॅरामेडीकल कर्मचारी आकृतीबंध मा.सचिव विधी व न्याय विभाग महाराष्ट्र राज्य यांचेकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला होता. सदर आकृतीबंधास शासन निर्णय क्र.सासंवि २००५/३१७/(१०३)-का सोळा मंत्रालय, मुंबई दि.१३ जून २००७ अन्वये महाराष्ट्र शासनाची मान्यता मिळालेली आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटल कडे वैद्यकिय अधिकारी/ पॅरामेडीकल कर्मचारी यांच्या एकत्रित मानधन/एकत्रित वेतनावर एक वर्ष कालावधी साठी नेमणूका करण्यात आलेल्या असून वेळोवेळी त्यांच्या मुदतवाढी करण्यात आल्या असून सदरच्या करण्यात आलेल्या मुदतवाढी खाली त्यांचे नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे संपुष्ठात येत आहेत.

अ.नं.	**वैद्यकिय अधिकारी / पॅरामेडीकल कर्मचा-यांचे नांव व पदनाम.**	**नेमणूक दिनांक**	**वाढीव वालावधी संपुष्ठात आलेची तारीख**	**एकूण झालेली सेवा**
०१.	डॉ. संजय के पटवर्धन वैद्यकिय प्रशासक	०१/१२/२००५	३०/११/२००८	०३ वर्षे
०२.	डॉ. दादासाहेब लु.कांबळे, असो.कन्सलटंट (त्वचारोग)	१४/१०/२००५	१३/१०/२००८	०३ वर्षे
०३.	डॉ. कुलदिप र.वाघ, असो. कन्सलटंट(स्त्रीरोग व प्रसूती)	०६/१०/२००५	०५/१०/२००८	०३ वर्षे
०४.	डॉ.विजय शु. नरोडे अतिदक्षता तज्ञ	१८/०२/२००५	१७/०८/२००८	०३ वर्षे ०६ महिने
०५.	डॉ. प्रशांत पं. पवार कनिष्ठ भूलतज्ञ	०१/१०/२००७	३०/०९/२००८	०१ वर्ष
०६.	डॉ. सचिन दि. खोचीकर क्लिनी.असि.(भूलतज्ञ)	११/१०/२००६	१०/१०/२००८	०२ वर्षे
०७.	डॉ. नंदा राजपाल क्लिनी.असि (भूलतज्ञ)	२२/०९/२००६	२१/०९/२००८	०२ वर्षे
०८.	डॉ. किरण रा.गोरे असो.कन्सलटंट(सर्जरी)	१८/०९/२००६	१७/०९/२००८	०२ वर्षे
०९.	डॉ.रितेशकुमार शर्मा असो.कन्सलटंट(स्त्रीरोग)	०१/०९/२००६	३१/०८/२००८	०२ वर्षे
१०.	डॉ. संतोष ब. सुरवसे क्लिनी.असिस्टट(भूलतज्ञ)	०९/०६/२००६	०८/०६/२००८	०२ वर्षे
११.	श्री. रणजित हि.आहेर एम.आर.आय टेक्निशियन	२२/१०/२००७	२१/१०/२००८	०१ वर्ष

उपरोक्त वैद्यकिय अधिकारी /पॅरामेडीकल कर्मचारी यांना वेळोवेळी मुदतवाढी देण्यात आलेल्या असून आता वैद्यकिय संचालक, श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी "उपरोक्त अ.नं. ०१ ते ११ वरील वैद्यकिय अधिकारी / कर्मचारी यांचे एक वर्षाचे कालावधीमध्ये काम समाधानकारक असून त्यांची वर्तणूकही चांगली

आहे. तसेच ते योग्य रितीने हुकूमाप्रमाणे कामे करतात त्यांचे बाबतीत काहीही प्रकरणे चालू नाही किंवा प्रस्तावितही नाहीत त्यामुळे त्यांना पुढील ०१ वर्ष मुदतवाढ देणेस हरकत नाही " असे अभिप्राय दिले आहेत.

त्यानुसार उपरोक्त अ.नं. ०१ ते ११ वरील वैद्यकिय अधिकारी/ पॅरामेडीकल कर्मचारी यांचीसेवा ०१ वर्षापेक्षा जास्त झालेली असल्याने वैद्यकिय संचालक यांचे अभिप्राय विचारात घेऊन उपरोक्त संबंधीताचे नांवासमोर (कॉलम नं.०४)दर्शविलेल्या तारखेपासून त्यांना वेतनश्रेणी देऊन त्यांची सेवा पुढे चालू ठेवणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

विषय नं.५४ मानद वैद्यकीय अधिकारी म्हणून सेवा देणे बाबत.

निर्णय क्र.५४ सदरहू विषयाबाबत आस्थापना उपसमितीचे सभेत निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

विषय नं.५५ सलग १२ वर्षे सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेनुसार वरिष्ठ वेतनश्रेणी देणेबाबत.

निर्णय क्र.५५ सदरहू विषयाबाबत आस्थापना उपसमितीचे सभेत निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

विषय नं.५६ अनुकंपा तत्वावर नेमणूक दिलेल्या कर्मचाऱ्यांना संस्थान सेवेत कायम करुन वेतनश्रेणी देणे बाबत.

निर्णय क्र.५६ सदरहू विषयाबाबत आस्थापना उपसमितीचे सभेत निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

विषय नं.५७ मयत कर्मचाऱ्यांचे वारसांना शासन नियमानुसार अनुकंपा तत्वावर नेमणूकी देणेबाबत.

निर्णय क्र.५७ सदरहू विषयाबाबत आस्थापना उपसमितीचे सभेत निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

विषय नं.५८ कु.मयुरी बाळासाहेब मेहेत्रे यांना आपले संस्थानचे हॉस्पिटलमध्ये होमिओपॅथी डॉक्टर म्हणून इंटर्नशिप ट्रेनिंग करीता संमती पत्र देणे बाबत.

निर्णय क्र.५८ सदरहू विषयाबाबत आस्थापना उपसमितीचे सभेत निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

विषय नं.५९ अपंगांना शासन निर्णयाप्रमाणे सेवेत भरती/पदोन्नती देणेबाबत.

निर्णय क्र.५९ सदरहू विषयाबाबत आस्थापना उपसमितीचे सभेत निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

यानंतर मा.अध्यक्ष यांचे परवानगी आयत्या वेळेचे विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.

आयत्या वेळेचा

विषय नं.०१ श्रीसाईबाबा कन्या विद्यामंदिरातील माहिती तंत्रज्ञान प्रयोगशाळेसाठी संगणक व इतर संगणकीय साहित्य खरेदी करणेबाबत

निर्णय क्र.६० (अ) श्रीसाईबाबा कन्या विद्यामंदिरामध्ये इयत्ता ५ वी ते १० वी या वर्गांमध्ये साधारणत: ६५० विद्यार्थी शिक्षण घेत असून, त्यांचे अभ्यासक्रमात कार्यानुभव या विषयांतर्गत माहिती तंत्रज्ञान या विषयाचे अध्यापन केले जाते. सदर विषयाचे प्रात्यक्षिकसाठी संगणककांची आवश्यकता असल्याने, मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६ सप्टेंबर, २००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६९७ नुसार २५ संगणके व त्याअनुषंगीक इतर साहित्य खरेदी करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन, खरेदी विभागामार्फत वर्तमान पत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करुन दिनांक ०३ ऑक्टोबर, २००८ ते दिनांक १३ ऑक्टोबर, २००८ या कालावधीमध्ये निविदा विक्रीची मुदत ठेवून संस्थानकडे पाठविणेची अंतीम मुदत १५ ऑक्टोबर, २००८ ठेवण्यात आली होती. सदर मुदतीत फक्त तीनच निविदाधारकांनी आपल्या निविदा सादर केल्या होत्या. सदर संगणकांचे configuration (तांत्रिक विश्लेषण) जून्या स्वरुपाचे असल्याने, सदरील संगणके बाजारात मिळत नाही. जर मिळाल्यास त्याचे स्पेअरपार्टस् उपलब्ध होत नाही.

सबब या सर्व गोष्टींचा विचार करता, सदर निविदा ग्राह्य होत नाही. यामुळे कोणत्याही पुरवठाधारकाची संगणके खरेदीसाठी फेर निविदा न मागविता नामांकित बहुराष्ट्रीय उत्पादित कंपन्यांकडून (HP, DELL, LENOVO) थेट दरपत्रके मागवून अद्ययावत तंत्रज्ञानावर आधारित संगणके खरेदी करता येतील, असे नम्र मत आहे.

त्याअनुषंगाने खरेदी करावयाच्या अद्ययावत संगणक संचाचा तपशील पुढीलप्रमाणे-

DESCRIPTION	Make	Qty.
Desktop Computer Set- Intel core2Deo 2.0 or higher 2GB RAM, 160 GB Hardisk, 16” or 17” TFT Monitor, Keyboard, Mouse, 4 USB Port & 1 Parellal Port, Windows VISTA Business edition / Windows XP,	HP, DELL, LENOVO	25 Nos.

3 Years Comprensive onsite sparepart warranty (3-3-3)		

श्रीसाईबाबा कन्या विद्यामंदिर विभागाने संगणक संचासाठी साधारणपणे ९,३८,०००/- पर्यंतच्या खर्चास मा. व्यवस्थापन समितीने मान्यता घेतलेली आहे. तथापि, आता उपरोक्त तपशीलाप्रमाणे संगणके खरेदीची कार्यवाही विविध पुरवठादारांकडून दरपत्रके मागवून न करता थेट कंपनीकडूनच करण्यात येणार असल्याने, दुरुस्ती देखभालीसाठी साहित्य मिळण्यास अडचण येणार नाही. तसेच सदर संगणके खरेदी करतांना साधारणत: ३-५ वर्षाची हमी (Warranty) घेता येईल. जेणेकरुन संगणके दुरुस्ती-देखभालीची कामे हमी (Warranty) कालावधीत उत्पादित कंपनीकडूनच करुन घेता येईल. सदर संगणके खरेदीसाठी पाच लाखाच्या पुढे खर्च येणार आहे. लेखाशाखा विभागाच्या परिपत्रकाव्दारे खरेदी करतांना जर अंदाजे किंमत पाच लाखाच्या पुढे गेल्यास वर्तमान पत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करुन खरेदी करण्यात यावे, असे नमूद केलेले आहे. परंतु, सदरील संगणक संच थेट उत्पादित बहुराष्ट्रीय कंपन्यांकडून खरेदी करण्यात येणार असल्याने, सदर कामी जाहिरात देण्याची आवश्यकता नाही. यामुळे जाहिरातीसाठी येणारा अनावश्यक खर्च टाळता येईल, असे नम्र मत आहे.

(ब) संगणकीय साहित्य खरेदीबाबत- श्री साईबाबा कन्याशाळेमार्फत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावात संगणकीय साहित्यांचा उल्लेख आहे. सदर तपशीलात बहुतांशी कंपन्यांचा उल्लेख नाही. काही साहित्यांमध्ये तांत्रिक विश्लेषण नसल्याने प्राप्त झालेल्या निविदांबाबत व्दिधावस्था होत आहे. सदर निविदाधारकांनी त्यांच्या सोईने तांत्रिक विश्लेषण करुन निविदा सादर केल्या असल्याने सदर निविदांवर निर्णय घेणे चूकीचे ठरेल व सदर साहित्यांचा काहीही उपयोग होणार नाही.

कन्याशाळेकडील संगणकीय लॅब सुव्यवस्थीत होणेसाठी खालील तपशीलाप्रमाणे संगणकीय साहित्य खरेदी करता येईल.

Sr. No.	Description	Qty.
01.	5 KVA Online UPS 25 Min. Battery Backup, Spike Guard, Make-APC / TATA Libert, 3 Years Warranty for UPS & One Year Warranty for Battery.	01
02.	Epson LQ-2180 dotmatrix Printer	01
03.	HP-2605 Colour Laserjet Printer or equt.	01
04.	Pen Drive 2 GB, Make- Kingston	02
05.	24 port Switch Make- D-Link, HP, Cisco	01

उपरोक्त साहित्य खरेदी करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६ सप्टेंबर, २००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६९७ नुसार अंदाजे रुपये १,१९,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता घेण्यात आलेली आहे. सदर संगणकीय साहित्य संस्थान वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करुन, विविध पुरवठादारांकडून फेर निविदा मागवून न्यूनतम निविदाधारकाकडून करता येईल, असे नम्र मत आहे.

उपरोक्त **परिच्छेद 'अ'** मध्ये नमुद केलेप्रमाणे, कन्याशाळेसाठी नवीन अद्ययावत २५ संगणके नामांकित बहुराष्ट्रीय उत्पादित कंपन्यांकडून थेट दरपत्रके मागवून खरेदी करणेस व त्यासाठी येणारे प्रत्यक्ष खर्चास मान्यता मिळणेस तसेच **परिच्छेद 'ब'** मध्ये नमुद केलेप्रमाणे, इतर संगणकीय साहित्य विविध पुरवठादारांकडून फेर निविदा मागवून (संस्थान वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करुन) न्यूनतम निविदाधारकाकडून खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-आय.टी.विभागप्रमुख)

आयत्या वेळेचा विषय नं.०२. निर्णय क्र.६१

जेष्ठ नागरिकांना प्रसादालय जा-ये करणेसाठी एक मिनीबस खरेदीचा निर्णय निरस्त करणेबाबत.

दि.२६.०५.२००७ च्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.४४६ नुसार, लेलॅन्ड कंपनीच्या अधिकृत डिलर यांचे कडून आलेले कोटेशन उघडण्यात येऊन चर्चा वाटाघाटी करुन ०२ चेसीज ॲटोमोटीव्ह मॅन्युफॅक्चरर्स प्रा.लि.,औरंगाबाद यांच्या कडून खरेदी करण्यात येऊन, एक चेसीज वर बॉडीबांधणीचे काम इनकोच बॉडीबिल्डर, मुंबई व दुसऱ्या चेसीजवर आरको इंजिनिअर्स, पुणे यांचे कडून नवीन दोन ३६ प्रवासी आसन क्षमतेच्या बसेस तयार करुन घेण्यात याव्यात असे ठरले.

सदर निर्णयानुसार, ३६ प्रवासी आसन क्षमतेच्या दोन बसेस तयार करुन घेण्यात आलेल्या आहेत. तसेच दि.१७.०२.२००७ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.११५ ब-१७ नुसार, प्रसादालय करीता मंजुर असलेल्या बसेस पैकी शिल्लक टाटा कंपनीच्या ५४ प्रवासी आसन क्षमतेच्या ०२ बसेस खरेदी करणे कामी पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

तसेच दि. २६.०५.२००७ च्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत जेष्ठ नागरिकांना प्रसादालय जा-ये करण्यासाठी एक मिनीबस खरेदी करावी असे ठरले होते.

जेष्ठ नागरिकांना प्रसादालय जा-ये करण्यासाठी नवीन मिनी बस खरेदी न करता वरील निर्णयानुसार, खरेदी करण्यात आलेल्या लेलॅन्ड कंपनीच्या नवीन दोन ३६ प्रवासी आसन क्षमतेच्या बसेस पैकी एक बसचा वापर करता येईल.

तरी जेष्ठ नागरिकांना प्रसादालय जा-ये करण्यासाठी एक मिनीबस खरेदीचा निर्णय निरस्त करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

आयत्या वेळेचा

विषय नं.०३. व्दारावती इमारतीकरीता मे.टाटा बी.पी.सोलर इंडिया प्रा.लि. यांची सिस्टिम बसवू देण्यास मे.गोलानी बिल्डर्स, मुंबई यांना परवानगी देणेबाबत.

निर्णय क्र.६२ बांधकाम विभागाचे दिनांक २४-१२-२००८ चे पत्रात, संस्थानमार्फत व्दारावती इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर असून ठेकेदार मे.गोलानी बिल्डर्स, मुंबई यांनी त्यांचे दिनांक ०८-१२-२००८ चे बील क्र.४ सादर केले असून या बीलाच्या रक्कमेच्या ७५% ॲडव्हान्स देण्यात यावी म्हणून आर्किटेक्ट मे.काबरे चौधरी, नाशिक यांनी दिनांक २०-१२-२००८ चे पत्रानुसार कळविल्याचे, नमूद केले आहे.

या बीलात सोलर वॉटर हिटींग सिस्टिमबाबत रु. १०,००,०००.०० + २७.७२% (रु.२,७७,२००.००) = रु. १२,७२,२००.०० इतकी रक्कम नमूद असून या रक्कमेच्या ७५% रक्कम ॲडव्हान्स दयावी म्हणून आर्किटेक्ट, मे.काबरे चौधरी, नाशिक यांनी कळविले आहे.

मे.गोलानी बिल्डर्स, मुंबई यांनी ही सोलर सिस्टिम मे.टाटा बी.पी.सोलर लि. या कंपनीची आणली असून या कंपनीचे नाव काळया यादीत टाकण्याबाबत सन-२००३ साली तत्कालीन मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेत निर्णय क्र.३०३ अन्वये निर्णय संमत झालेला आहे.

व्दारावती इमारतीचे काम प्रगतीपथावर असून मे.टाटा बी.पी.सोलर कंपनीचे मटेरीअल साईटवर येऊन पडलेले आहे. मे.गोलानी बिल्डर्स, मुंबई यांनी मे.टाटा बी.पी.सोलर इंडिया प्रा.लि. यांची सिस्टिम बसवू देण्यास परवानगी मागितली असून मे.गोलानी बिल्डर्स, मुंबई यांना व्दारावती इमारतीकरीता मे.टाटा बी.पी.सोलर इंडिया प्रा.लि. यांची सिस्टिम बसवू देण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

आयत्या वेळेचा

विषय नं.०४. गुंतवणूकीबाबत

निर्णय क्र.६३ माहे जानेवारी २००९ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे.

अ.नं.	**तपशील**	**मुदतपूर्तीचा दिनांक**	**रक्कम**
०१	सेंट्रल बॅक ऑफ इंडीया, शिर्डी	०१/०१/२००९	१,२३,१६,७५५.००
०२	सेंट्रल बँक ऑफ इंडीया, लोणी	०१/०१/२००९	६१,५८,३७७.००
०३	सेंट्रल बँक ऑफ इंडीया, श्रीरामपूर	०१/०१/२००९	२ ,४६,३३,५१०.००
०४	सेंट्रल बँक ऑफ इंडीया, कोपरगांव	०१/०१/२००९	१,२३,१६,७५५.००
०५	सेंट्रल बँक ऑफ इंडीया, खंडाळा	०१/०१/२००९	६१,५८,३७७.००
०६	आंध्रा बँक, शिर्डी	०३/०१/२००९	१,२३,१४,३९०.००
०७	युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी	०४/०१/२००९	२,१८,८३,०५५.००
०८	सिंडीकेट बँक, शिर्डी	१२/०१/२००९	१,८४,७१,५८९.७२
०९	बँक ऑफ बरोडा, कोपरगांव	१२/०१/२००९	२,१८,८३,०५५.००
१०	बँक ऑफ बरोडा, नासिक	१२/०१/२००९	२,१८,८३,०५५.००
११	बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी	१४/०१/२००९	२,१८,८३,०५५.००
१२	दैनंदिन खर्च वजा जाता माहे जानेवारी २००८ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी रक्कम -		५,००,००,०००.००
		एकूण रुपये	**२२,९९,०१,९७३.७२**

वरील तपशीलानुसार साधारणत: रक्कम **रु. २३.००** कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत.

उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या बँकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल :-

अ.नं.	बँकेचे नांव
०१	युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी
०२	सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
०३	आंध्र बँक, शिर्डी
०४	स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी-कोपरगांव
०५	बँक ऑफ बरोडा, कोपरगांव
०६	बँक ऑफ बरोडा, नासिक
०७	बॅक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
०८	विजया बँक, शिर्डी

तरी उपलब्ध रक्कम रु.२३ कोटीची गुंतवणूक करणेसाठी वरीलप्रमाणे सेवा देणा-या राष्ट्रीयकृत बँकेकडून व्याजदर मागविण्यास व त्यातून उच्चतम व्याज देणा-या बँकेकडे गुंतवणूक करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सर्व राष्ट्रीयकृत बँकाचे १ वर्षासाठीचे व्याजदर खुप कमी झाल्यामुळे, सेंट्रल बँकेच्या ५५५ दिवसांच्या योजनेत जास्त व्याजदर असल्याने,संस्थानचा आर्थिक फायदा होत आहे. म्हणून सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शिर्डी यांच्या ५५५ दिवसांसाठी १०.२५ % इतक्या उच्चतम व्याजदर योजनेमध्ये,पहिल्या टप्प्यात वरीलपैकी अ,क्र, १ ते ७ पर्यंतची गुंतवणूकीसाठी उपलब्ध होणारी रक्कम ही सेंट्रल बँक ऑफ इंडिया,शिर्डी यांचेकडे गुंतविण्यात यावी व त्यानंतरच्या मुदतपुर्तीच्या गुंतवणूकीसाठी बँकांकडे पुन्हा व्याजदर मागविण्यात येऊन जास्तीत जास्त व्याजदर देणाऱ्या बँकांकडे सदरची गुंतवणूक करण्यात यावी,असें ठरलें. (कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

आयत्या वेळेचा विषय नं.०५. **एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि.नाशिक, पाणी नमुने तपासणी कामी नेमणूक करणे बाबत.**

निर्णय क्र.६४ पाणी पुरवठा विभागाकडिल कनकुरी साठवण तलाव येथून शुध्द केलेले पाणी पिण्यासाठी व इतर वापरासाठी संस्थान परीसरामध्ये विविध ठिकाणी वितरित केले जाते. सदरचे पाणी शुध्द होवून ते पिण्यायोग्य आहे किंवा नाही याबाबत पाण्याच्या नमुन्यांची लॅबमध्ये तपासणी होणे आवश्यक असल्याने त्याची पाणी पुरवठा विभागाकडिल लॅबमध्ये अणुजीव व रासायनिक पध्दतीने तपासणी केली जाते. तसेच अहमदनगर येथील जिल्हा आरोग्य केंद्रात पाणी नमुने अणुजीव तपासणी करीता दर महिन्याला पाठविले जातात. याशिवाय एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि.नाशिक यांची याकामी पाणी नमुने तपासणीसाठी (रासायनिक व अणुजीव) नेमणूक करण्यात आलेली होती व त्यांचेकडून पाणी नमुने तपासणीचा दरमहा अहवाल मागविला जात आहे. व त्यांनी केलेल्या सुचना अमलात आणून पाणी शुध्दीकरणासाठी उपाय योजीले जातात.

एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि. नाशिक गेली ०६ वर्षे दरमहा पिण्याचे पाण्याचे नमुने तपासणीकरुन देण्याचे काम करीत आहे. त्यांची वार्षिक पाणी नमुने तपासणीची मुदत दि. ३१/१२/२००८ रोजी संपत आहे.

एनव्हायरो केअर लॅब नाशिक यांचे गेली ०६ वर्षाचे काम अगदी समाधानकारक असुन वेळोवेळी ते पाणी शुध्दीकरणाच्या कामाबाबत मार्गदर्शन करतात. पाणी नमूने तपासणी कामी त्यांचे पुन्हा नेमणूक करणे आवश्यक आहे. याकामी त्यांना प्रति शॉम्पल त्यांचे मागणीनुसार रुपये ७००/- मात्र दरमहा ०४ शॉम्पल + रुपये १५०/- मात्र व्हीजीट चार्ज + १२.३६ % सर्व्हीस टॅक्स द्यावा लागणार आहे.

तरी दिनांक- ०१/०१/२००९ ते दिनांक- ३१/१२/२००९ अखेर एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि.नाशिक यांची पाणी तपासणी कामी नेमणूक करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

आयत्या वेळेचा विषय नं.०६. **दिनांक ०१.१०.२००८ ते दिनांक ३०.०९.२०१० या कालावधीसाठी विभागीय रेल्वे प्रवासी सल्लागार समितीवर सदस्य म्हणून नेमणूकीकरीता संस्थानमार्फत एका व्यक्तीच्या नावाची शिफारस करणेबाबत.**

निर्णय क्र.६५ डी.एम.आर. ऑफिस कर्मशियल ब्रॅन्च, भुसावळ, यांचेकडून दि.१७/१२/२००८ रोजी पाठविलेले पत्र दि.३१/१२/२००८ रोजी या कार्यालयास मिळाले आहे. तसेच सदरचे पत्रासोबत एक नॉमिनेशन फॉर्म जोडलेला आहे.

मध्यवर्ती रेल्वे, भुसावळ, विभागाकरीता दि.०१/१०/२००८ ते ३०/०९/२०१० या कालावधी साठी विभागीय रेल्वे प्रवासी सल्लागार समितीचे पुनर्गठन करावयाचे असल्याने सदर समिती मध्ये श्री साईबाबा संस्थान विश्वस्त, शिरडीचा एक प्रतिनिधी नेमणूक करावयाची आहे असे कळविले असून सोबत नॉमिनेशन फॉर्म जोडला असून तो भरुन, तसेच ०२ स्टॅम्प साईज फोटोग्राफ सेन्ट्रल रेल्वे, भुसावळ विभागाकडे पाठविणेबाबत कळविले आहे.

<u>सदर पदावर नेमणूक करणेकामी त्यांनी खालील प्रमाणे निकष ठरविले आहेत</u>.

०१) सदर व्यक्ती राज्यशासन /केंद्र शासनाचे व्यवस्थापनामध्ये नोकरीस नसावा.

०२) सदर व्यक्ती रेल्वेकडे कॅटरींग कॉन्ट्रक्टर, आऊट एजन्सी कॉन्ट्रक्टर, रल्वे ट्रॅव्हलर सर्व्हिस एजन्ट,हॅन्डलींग कॉन्ट्रॅक्टर, इंजिनियरींग कामाचा कॉन्ट्रक्टर नसावा.

०३) सदर व्यक्तीने दुस-या विभागीय रेल्वे प्रवासी समिती वर नेमणूक स्वीकारु नये.

०४) वरील माहिती चुकीची आढळल्यास त्यांना सदरच्या समितीवरुन काढून टाकण्यात येईल. अशा स्वरुपाचे प्रतिज्ञापत्र द्यावे लागेल.

यावर सविस्तर चर्चा होऊन, विभागीय रेल्वे प्रवासी सल्लागार समितीवर सदस्य म्हणून मा.विश्वस्त श्री अशोक भिमाशंकर खांबेकर यांची नेमणूक करणेकामी शिफारस करण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

आयत्या वेळेचा विषय नं.०७ **प.पु.श्री श्री रविशंकर यांचे " महासत्संग " कार्यक्रम व इतर कार्यक्रमांसाठी स्टेज, डेकोरेशन व इतर अनुषंगिक व्यवस्था करणे कामाचे दरपत्रक उघडणेबाबत ....**

निर्णय क्र.६६ मा. व्यवस्थापन समितीचे दि. १६ सप्टेंबर,२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७३८ अन्वये श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री श्री रविशंकर, आर्ट ऑफ लिव्हींगचे प्रणेते यांच्या शिबीराचे आयोजन करणेस तत्वत: मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार मंगळवार दि. १३ जानेवारी, २००९ रोजी सायंकाळी ४:०० ते ७:०० यावेळेत श्री श्री रविशंकरजी यांचे सत्संग, प्रवचन व भजन कार्यक्रम आयोजीत करणेत आला आहे. सदरच्या कार्यक्रमास हजारो भाविकांची गर्दी होणार आहे. यासाठी भव्य असे स्टेज, डेकोरेशन व इतर अनुषंगिक व्यवस्था करावी लागणार आहे.

आर्ट ऑफ लिव्हींगचे प्रतिधींशी समक्ष चर्चा करुन सदरच्या कार्यक्रमासाठी आवश्यक स्टेज व इतर सर्व अनुषंगिक बाबीं बद्दल माहिती घेण्यात आली असून त्यानुसार उपरोक्त कार्यक्रमासाठी सर्वसाधारणपणे खालील प्रमाणे स्टेज, डेकोरेशन इ. व्यवस्था करणे आवश्यक आहे.

अ.नं.	कामाचा तपशिल
०१	<u>स्टेज व प्रवेशव्दार डेकोरेशन :</u> **A) स्टेज :** ४५'(लां)x८०'(रु)x५'(उंची) या मोजमापाचे प्लायवुड टॉप स्टेज, स्टेजवर १५'x१८'x१'-६"(उंची) या मोजमापाचा प्लॅटफार्म, संपुर्ण स्टेजवर रेड सिंथेटिक वुलन कारपेट, प.पु.श्री गुरुजी यांचे आसन, ग्रीनरुम ३०'x२०' कारपेटसह, स्टेजला ०३ जीने प्रत्येकी ५' रुंदीचे रेलिंगसह, स्टेजसमोरील भागात रेड सिंथेटीक वुलन मॅटींग- ५००० चौ.फु., स्कॅफोल्डींग स्ट्रक्चर- ग्राऊंडवरील लाईटींगसाठी- २० नग, स्पेस फ्रेम ट्रस- स्टेजवरील लाईटींगसाठी, व्हीडीओग्राफरसाठी प्लॅटफॉर्म ८'x८'x३'(उंची) मापाचे पायऱ्यांसह- २ नग
	B) स्टेज डेकोरेशन : संपूर्ण स्टेज व बॅकग्राऊंड आकर्षक स्वरुपात सेटींग / डेकोरेशन, फुलांचे बुके डेकोरेशन, हिरव्या कुंडया, आकाश कंदील इ . सह
	C) स्टेज बिछायत :- व्ही.आय.पी. साठी १५ सोफे, भजनीमंडळीसाठी सफेद गाद्या नग ३० इ. सह
	D) प्रवेशव्दार :- मुख्य गेट नग २ : २५'x१५'x३'x३'- बॉक्स गेट, फुलांचे तोरणासह, फ्रेमिंग गेट नग ३ : १५'x२५'x२'-६" रुंद
	E) बांबु बेरेकेटींग :- लेआउट प्रमाणे संपूर्ण ग्राउंडमध्ये ४' उंच बांबु बेरकेटींग अंदाजे २२०० रनिंग फुट- दर प्रत्येकी एका रनिंग फुटास.
	F) हिरव्या रोपांच्या कुंड्या २०० नग- दर प्रत्येकी एका कुंडीस
	G) ग्राऊंडचे कडेने कनात / सुशोभित कापडाचे पार्टीशन- ८' उंचीचे
०२	**<u>प्रेक्षक बिछायत</u> :** ग्राउंडमध्ये प्लॅस्टीक मॅटींग अंदाजे २२५'x४०० च्या ग्राउंडवर, बॅरेकेटिंगच्या पॅसेजससह एकूण - ९०,०००.०० चौ.फु., प्लॅस्टिक खुर्च्या २००० नग, गाद्या- ५०० नग, लोड- १००० नग
०३	**<u>इलेक्ट्रिक लाईटींग</u> :** **A) स्टेज लाईटींग** : स्कॅनर लाईट- १५ नग, पार लाईट- ४० नग
	B) ग्राउंड लाईट : व्हाईट फोकसचे टॉवर्स- ४ नग प्रत्येक टॉवरवर २० व्हाईट फोकस एकूण ८० नग (४०० व्हॅटचे)
	C) इतर जनरल लाईटस् : पार्किंग परिसर, मुख्य हायवे ते ग्राउंड इ. हेलोजन फोकस एकूण २०० नग (१००० व्हॅट)
	D) जनरेटर्स : १२५ KVA चे जनरेटर्स डिझेल, ऑईल व ऑपरेटरसह- ४ नग
०४	**<u>इलेक्ट्रॉनिक्स:</u>** **A) स्पिकर / साउंड सिस्टिम :-** EAW 4 way line array system 16 nos. Full range 3 way active enclosure 8 nos. High power sub woofer 16 nos. AMP Digital Controller with equalizer Microphones Stage monitoring system Side fill monitors Delay stack sound system COXL speakers- 24 nos. Cordless mike with receiver and battery- 4 Nos. Stand mike- 6 Nos.
	B) LCD Display Ultra bright LCD projector (5000 Lumens) with cabling, Video / RGB splitter, Scaler for VGA to PAL Confort- 6 Nos 14x14 MS framing with black masking and 9x12 Screen- 6 Nos
	C) Video Shooting: DV Camera with cameramen Monitor / Switcher / Mixer / Cabling / Online editing and Mixing, DVD/ VCD- 3 Nos.

तपशिलाप्रमाणे इकडील जा.क्र. १७/२००९, दि. ०१/०१/२००९ रोजीचे पत्राने खालील पाच ठेकेदरांकडून कोटेशन मागविण्यात आले आहेत.

१. साउंड ॲण्ड लाईट प्रोफेशनल्स, मुंबई
२. शागिर्द डेकोरेटर्स, भायंदर (प), मुंबई
३. धर्मेश डेकोरेटर्स, घाटकोपर (प), मुंबई
४. विस्तार इंटेरीयर्स ॲण्ड डेकोरेटर्स, नाशिक
५. बालाजी एन्टर टेनमेंट, पुणे

तरी वरीलपैकी प्राप्त होणारी सिलबंद दरपत्रके आजचे सभेपुढे उघडून त्यावर निर्णय होणेकामी प्रस्ताव आजचे सभपुढे सादर करणेत आला होता. सदरहू प्रस्तावावर साधक-बाधक चर्चा होऊन खालील प्रमाणे निर्णय घेणेत आला :

(अ) चावडी शताब्दी महोत्सवी वर्षानिमित्त आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रणेते व व्यक्ति विकास केंद्र, बंगलोर या संस्थेचे संस्थापक प.पू. श्री श्री रविशंकर यांचा महासत्संग कार्यक्रम तथा शिबीर आयोजित करणेस मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक १६ सप्टेंबर, २००८ रोजीच्या सभेत निर्णय क्रमांक ७३८ अन्वये तत्वत: मान्यता मिळालेली होती. तसेच मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक १५ नोव्हेंबर, २००८ रोजीच्या सभेतील निर्णय क्रमांक ८८२ अन्वये ही चावडी शताब्दी महोत्सवी वर्षानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळालेली आहे. सदर निर्णयांना अनुसरुन मंगळवार, दिनांक १३ जानेवारी, २००९ रोजी महासत्संग कार्यक्रम तसेच बुधवार, दिनांक १४ जानेवारी, २००९ रोजी चावडी पूजन व शोभायात्रेचे आयोजन तसेच व्दारावती या नवीन निवासस्थान इमारतीचा उद्घाटन समारंभ आयोजित करण्यात आलेला आहे.

त्या अनुषंगाने आजचे सभेत महासत्संग कार्यक्रमासाठी उभारण्यात यावयाच्या स्टेज व इतर तत्सम अनुंषगिक कामांसाठी मागविण्यांत आलेल्या सिलंबद निविदा उघडणेत येऊन, निविदाधारकांशी चर्चा-तथा वाटाघाटी करण्यात आल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे :

अ.नं.	**तपशील**	**विस्तार डेकोरेटर्स, नाशिक**	**शागिर्द डेकोरेटर्स, मुंबई**	**ताठे मंडप डेकोरेटर्स, पुणे**	**साऊंड ॲण्ड लाईट, मुंबई**	**आलिया डेकोरेटर्स**
०१.	प. पू. श्री श्री रविशंकर यांचे महासत्संग कार्यक्र-मासाठी दिनांक ०१ जानेवारी, २००९ च्या निविदा पत्रात नमुद केल्याप्रमाणे व्यवस्था करणे.	१७,०६,९८५/-	२१,५३,३७९/-	१८,३६,०१९/-	२,२४,७२०/- (फक्त स्पिकर व साऊंड सिस्टिम साठी)	७५,०००/- (फक्त एलसीडी डिस्प्ले साठी)
	वाटाघाटीनंतरचे दर	**११,११,०००/-**	२०,००,०००/-	अनुपस्थित	अनुपस्थित	अनुपस्थित

उपरोक्त तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे, विस्तार इंटेरिअर्स ॲण्ड डेकोरेटर्स, नाशिक (जया पवार, विस्तार डेकोरेटर्स, नाशिक) यांचे दर न्यूनतम असल्याने, प.पू. श्री श्री रविशंकर यांचे दिनांक १३ जानेवारी, २००९ रोजीच्या महासत्संग कार्यक्रमासाठी उभारावयाचे स्टेज व निविदेत वर्णन केलेल्या इतर तत्सम अनुंषगिक कामासाठी त्यांचे दर स्वीकारणेत आले. जया पवार, विस्तार डेकोरेटर्स, नाशिक यांना सदरहू कामी एकत्रित रक्कम रुपये ११,११,०००/- मात्र आदा करण्यात यावी. आवश्यकता भासल्यास त्यांना याकामी ५० टक्के आगाऊ रक्कम आदा करणेत यावी, तसेच आयत्या वेळी काही जादा कामे करण्याची आवश्यकता पडल्यास अशी कामे त्यांचेकडून मंजूर निविदा दरात करुन घेण्यात यावी, असे ठरले.

(ब) तसेच प.पू. श्री श्री रविशंकर यांचे दोन दिवसांचे कार्यक्रमासाठी खाली नमूद केलेल्या बाबींसाठी मान्यता देण्यात आली :

०१. पूज्य गुरुजींना मुंबई येथून शिर्डी येथे येणेसाठी तसेच शिर्डी व अहमदनगर येथून पुणे येथे जाणेसाठी हवाई प्रवासाची (खाजगी हेलिकॉप्टर) सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी.

०२. पूज्य गुरुर्जींना व त्यांचे समवेत येणाऱ्या त्यांच्या पूज्य भगिनी व इतर महत्वाचे सहकाऱ्यांसाठी शिर्डी येथील हॉटेल सन ॲण्ड सॅण्ड मध्ये निवासव्यवस्था करणेकामी ०२ सुटस् व आवश्यकतेनुसार खोल्या आरक्षित करण्यात याव्यात. तसेच पूज्य गुरुजींच्या कार्यक्रमाच्या समन्वयासाठी येणाऱ्या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसाठी संस्थानच्या इतर निवासस्थानांमध्ये निवासाची, भोजनाची व्यवस्था विनामुल्य करण्यात यावी.

०३. महासत्संग व इतर कार्यक्रमाचे प्रसिध्दीसाठी आवश्यकतेनुसार पोष्टर्स, बॅनर्स, बोर्डस्, हॅण्डबिल्स, निमंत्रण पत्रिका आदि छपाई करुन घेऊन, ते विविध ठिकाणी वितरीत करणेत याव्यात तसेच आवश्यकतेनुसार केबल टि.व्ही. नेटवर्कव्दारे जाहिरात प्रसारण, वृत्तपत्रात कार्यक्रमाची जाहिरात, प्रेसनोट आदि प्रसिध्द करण्यात यावी. तसेच पूज्य गुरुजींच्या, प्रमुख पाहुण्यांच्या व त्यांचे सहका-यांचे सत्कारासाठी आवश्यकतेनुसार शॉल्स, साईमूर्ती आदि साहित्य खरेदी करणेत यावे.

०४. समाधी मंदिर, चावडी, व्दारावती इमारत व इतर ठिकाणी आवश्यकतेनुसार फुलांची, विदयुत सजावट करण्यात यावी. पूज्य गुरुजींच्या हस्ते चावडी पूजन व शोभायात्रेचे आयोजन करण्यात यावे. व्दारावती इमारतीचे उद्घाटन कार्यक्रमासाठी स्टेज, मंडप, कोनशिला, माहितीपत्रक छपाई, निमंत्रण पत्रिका छपाई व इतर तत्सम अनुषंगिक व्यवस्था करण्यात यावी.

०५. महासत्संग व इतर कार्यक्रमासाठी येणा-या भाविकांना आवश्यकतेनुसार मुलभूत सोयी-सुविधा पुरविण्यात याव्यात.

उपरोक्तप्रमाणे प. पू. श्री श्री रविशंकर यांचे महासत्संग व इतर आयोजित कार्यक्रमासाठी करावयाच्या विविध अनुषंगिक व तत्सम कामांसाठी येणा-या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख/संबधित विभाग)

आयत्या वेळेचा विषय नं.०८. श्री साईसत्चरित्र हिंदी जादा छपाई कामाचे बिल अदा करणेबाबत.

निर्णय क्र.६७ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी प्रकाशित ०१) श्री साईसत् चरित्र- हिन्ही २,००,००० नग निम्नतम दर रु.२५.३५ पैसे २) श्री साईसत्चरित्र तामिळ ३०,००० नग निम्नतम दर रु.३२.९० पैसे प्रमाणे मे. चेरि ऑफसेट, सोलापूर जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/३४१२/२००८ दि.०४.०३.२००८ अन्वये छपाई कामाचा पुरवठा आदेश देण्यात आला आहे.

मे. चेरि ऑफसेट, सोलापूर यांनी दि.२०.११.२००८ रोजी दुरध्वनीद्वारा श्री साई सत्चरित्र, हिन्दीची अंदाजे १७०० ते १९०० प्रतींची मशिन ऑपरेटरचे नजरचुकीने जादा छपाई झाल्याचे सांगितले आहे. त्यानुसार त्यांना त्यांचेकडून सदर चरित्रांची अन्य मार्गाने विक्री होऊ नये म्हणून जादा जेवढ्या प्रती तयार होतील त्या प्रती जमा करणेविषयी सांगण्यात आले होते. त्यानुसार उपरोक्त सदर्भीय आदेशातील अट क्र. १० मध्ये पुस्तके छपाई ही सदर आदेशात दिलेल्या संख्येपेक्षा जादा छपाई करता येणार नाही. तथापी संस्थानला आवश्यकता भासल्यास व मागणी केल्यास छपाई करावयाच्या पुस्तकात वाढ केलेस त्याच दरात , त्याच अटी व शर्तीने त्याच नमुन्याबरहुकूम जादा पुस्तकांची छपाई विनाअट करुन द्यावी लागेल असे नमुद करण्यात आले आहे. दुरध्वनीवरील चर्चेप्रमाणे त्यांनी दि.११.१२.२००८ चे पत्रासोबत बिल नं. २३९ दि.११.१२.२००८ अन्वये सदर बिलातील १९६० प्रतींची जादा छपाई होऊन बिलावरील भांडार विभाग प्रमुख यांचे अभिप्रायानुसार चरित्रे भांडार विभागात जमा आहेत. बिलातील १९६० प्रतीमध्ये १८८८ प्रती आदेशाव्यतिरिक्त जमा आहे. त्याची १८८८ प्रती मंजूर दर रु.२५.३५ पैसे प्रमाणे रक्कम ४७,८६०.८० पैसे पूर्णाकिंत रु.४७,८६१/- अदा करणे आहे.

श्रीसाईसतचरित्र हिंदी या ग्रंथाची साईभक्तांकडून मोठ्याप्रमाणात मागणी असल्याने चरित्रे स्वीकारण्यात आली आहे. श्री साई सतचरित्र हिंदी १८८८ जादा प्रतींची विक्री होऊन रक्कम वसुल होणार आहे.

तरी मे. चेरि ऑफसेट, सोलापूर यांचेकडून श्री साई सतचरित्र, हिन्दीचे जादा १८८८ प्रती, निम्नतम दर रु. रु.२५.३५ पैसे प्रमाणे एकूण रक्कम रु.४७,८६१/- मात्रचे खर्चास कार्यात्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक प्रकाशने)

आयत्या वेळेचा विषय नं.०९ श्री साई दैनंदिनी २००९ चे जादा छपाई खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.६८ मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०९.२००८ चे सभेतील निर्णयानुसार साईभक्तांना सालाबादाप्रमाणे श्री साई दैनंदिनी २००९ उपलब्ध करुन देण्यात आली आहे. श्री साई दैनंदिनी २००९ चे दि. १९.११.२००८ पासून विक्री करण्यात येत आहे.

अ) मे.दि.प्रिमिअर को-ऑपरेटिव्ह प्रिंटर्स लि. चे महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे यांना जा.नं.एसएसएस/ वशी/प्रकाशने/ १३३६५/२००८दि.१२.०९.२००८ अन्वये श्री साई दैनंदिनी २००९- ५०,००० नग मंजूर दर रु.५३/- प्रमाणे छपाई कामाचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. दि. ३०.१२.२००८ अखेर पुरवठा तपशिल खालील प्रमाणे.

श्री साई दैनंदिनी छपाई संख्या	जमा प्रती	येणे प्रती
५०,००० नग	४०८१४	९१८६

ब) मे.निट प्रिंटर्स अहमदनगर यांना जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/१३३६९/२००८दि.१२.०९.२००८ अन्वये श्री साई दैनंदिनी २००९- ५०,००० नग मंजूर दर रु.५३/- प्रमाणे छपाई कामाचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. दिनांक २७.१२.२००८ अखेर पुरवठा तपशिल खालील प्रमाणे.

श्री साई दैनंदिनी छपाई संख्या	जमा प्रती	येणे प्रती
५०,००० नग	४८७६०	१२४०

वरील दोन्ही प्रेसधारकाकडून आजपावेतो एकूण ८९५७४ नग दैनंदिनी जमा झाल्या असून त्यातील ५,००० नग मुंबई कार्यालयास विक्रीस देण्यात आलेल्या आहेत उर्वरित ८४,५७४ नग दैनंदिनी विक्री तपशिल खालील प्रमाणे.

श्री साई दैनंदिनी आवक	प्रत्यक्ष विक्री प्रती	शिल्लक प्रती
शिर्डी कार्यालय ८४९३० नग	६२९४१	२१६३३

वरील तक्यात दर्शविल्याप्रमाणे दैनंदिनी २००९ चे ६२९४१ नगांची दि.१९.११.२००८ पासून ४६ दिवसात विक्री करण्यात आली आहे. दररोज सरासरी १,३६८ नगांची विक्री होत असल्याचे दिसून येत आहे. म्हणजे उर्वरित २१६३३ अधिक येणे १०४२६ नग अशा एकूण ३२०५९ नगांची विक्री होणेबाकी आहे. शिल्लक ३२०५९ नगांची विक्री अंदाजे १० ते १२ दिवस म्हणजे माहे १० जानेवारी २००९ पर्यंत पुरेल एवढा स्टॉक शिल्लक आहे.

श्री साई दैनंदिनी २००९ विक्रीचा खप विचारात घेता जादा २५,००० नगांची छपाई करुन घ्यावी असे वाटते. श्री साई दैनंदिनी २००९ चे २५,००० नग मंजूर दर रु. ५३/- प्रमाणे एकूण रु. १३,२५,०००/- खर्च अपेक्षित आहे.

श्री साई दैनंदिनी जादा छपाई करणेबाबत मा. श्री. सुरेश गोरक्षनाथा वाबळे, विश्वस्त यांचेशी मा. श्री. आर.एस. साबळे, प्रशासकीय अधिकारी यांनी दुरध्वनीवरुन चर्चा केली असता, त्यांनी श्री साई दैनंदिनी २५,००० नगांची छपाई करुन घ्यावी व त्यातील मे. महाराष्ट्र सह.मुद्रणालय, पुणे यांचेकडून १५,००० नग व मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर यांचेकडून १०,००० नग याप्रमाणे छपाई करुन घेणेबाबत निर्देश दिले आहेत.

तरी उपरोक्तप्रमाणे मे. महाराष्ट्र सह.मुद्रणालय, पुणे याना १५,००० नग व मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर यांचेकडून १०,००० नगांची मंजूर दराने छपाई करुन घेणेसाठी एकूण रक्कम रु.१३,२५,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे

मे.महाराष्ट्र सह. मुद्रणालय,पुणे यांना १०,००० नग मंजूर दर ५३/- प्रमाणे व मे. निट प्रिंटर्स, अहमदनगर यांना १०,००० नग मंजूर दर ५३/- प्रमाणे छपाई कामाचा आदेश देण्यात आलेला आहे.

उपरोक्त प्रमाणे आदेशीत श्रीसाई दैनंदिनी छपाई करुन घेणेकामी रक्कम रु.१०,६०,०००/- मात्रचे खर्च अपेक्षित असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

याचवेळेस भक्तांची मागणी विचारात घेता रुपये १०/- प्रति नग या दराची श्रीसाईबाबा दिनदर्शिका-२००९ मे.साई सिक्युरिटी प्रिंटर्स,बंगलोर यांचेकडून जादा २५ हजार नग छपाई करुन घेण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

आयत्या वेळेचा विषय नं.१० निर्णय क्र.६९

व्दारावती इमारतीतील रुमसाठी फर्निचर खरेदी बाबत

श्री साईबाबा संस्थानचे नविन तयार करण्यात आलेल्या व्दारावती इमारतीत खालील प्रमाणे खोल्या आहेत.

अ.न.	मजला	एकुण खोल्या	शेरा
०१.	तळमजला(पार्किंग)	१०	वाहन चालकाचे निवासासाठी ६ खोल्या ,जनरल संडास व बांथरुम,तसेच इलेक्ट्रीक मेन्टनन्ससाठी ३ खोल्या.प्लबिंगसाठी १ खोल्या.
०२.	स्टिल्ट मजला	७८	साईभक्तांचे निवासासाठी ७६ खोल्या (संडास व बांथरुम सह)व २ लिनन(स्टोअर)रुम
०३.	पहिला मजला व दुसरा मजला ८२+८२=१६४	१६४	भक्तांचे निवासासाठी १६० रुम (संडास व बांथरुम सह)व ४ लिनन(स्टोअर)रुम
०४.	तिसरा मजला (४ था मजला)	८२	अती महत्वाच्या व्यक्तीचे निवासासाठी ८० खोल्या(संडास व बांथरुम सह)व २ लिनन(स्टोअर)रुम
		एकुण ३३४ खोल्या	

उपरोक्त ३३४ खोल्यामध्ये (निवास ३१६ +१८ इतर) भक्तांचे दैनंदिन वापरासाठी खालील प्रमाणे वस्तू-साहित्य ठेवावे /लावावे लागणार आहे.यात बांधकामाविभागाकडून खालील कामे प्रगतीपथावर आहे.

१) ९४८ कॉट गोदरेज यांनी पुरविले आहेत.रुममध्ये मांडणी करणे बाकी आहे.
२) ९४८ गाद्या शेंचूरी कंपनी ऑर्डर दिलेली आहे.दिनांक ८ ते १० जानेवारी २००९पर्यंत येणार आहे.
३) टॉवेल रॉड बाथरुमसाठी ,मे.गोलानी ब्रदर्स, यांना ऑर्डर दिली आहे. जानेवारी २००९ मध्ये दिनांक ८ ते १० जानेवारी पर्यंत येणार आहे.
४) बेसींन आरसा बाथरुमसाठी मे.गोलानी ब्रदर्स, यांना ऑर्डर दिली आहे. जानेवारी २००९ मध्ये दिनांक ८ ते १० जानेवारी पर्यंत येणार आहे.
५) सोपडिश बाथरुमसाठी ,मे.गोलानी ब्रदर्स, यांना ऑर्डर दिली आहे. जानेवारी २००९ मध्ये दिनांक ८ ते १० जानेवारी पर्यंत येणार आहे.
६) लगेज बॅग चे काम जाट कॉन्ट्रक्टर ,यांना दिले असून काम चालू आहे.
७) उशा कोटेशन मागविलेले आहेत.दिनांक ३.०१.२००९ चे सभेत निर्णय घेण्यात येणार आहे.

उपरोक्त शिवाय निवासस्थानासाठी खालील वस्तू बाबींची आवश्यकता असून यादीतील **अ** मधील वस्तू खरेदीची कामे बांधकाम विभागकडून केली जाणार असून **ब** मधील वस्तूची खरेदी निवासस्थान विभागाकडून करण्यात येणार असून त्यासाठी साधारण खर्च खालील प्रमाणे येणार आहे.

अ) फर्निचर व इतर बाबींसाठी अंदाजे अपेक्षित खर्च [**खरेदी विषयक कामे बांधकाम विभाग**]

अ.न	वस्तू	नग	दर रु.प्रति नग	रक्कम
१.	बाथरुम हूक /हॅगर (६ हूकचे)साधे	७००	७५	५२५००
२.	बेसिनवरील टॉवेल रॉड (एस.एस.रॉड,१६ एमएम व्यासाचा)	३५०	१००	३५०००
३.	रुममधील कपडयांसाठी रॉड (७फुट लांब)(एस.एस.पावडर कोटेड)	३५०	३५०	१२२५००
४.	कर्टन रॉड(खिडकी)पॉवडर कोटेड)	४००० रनिंग फूट	१७.५० प्रति रनिंग फूट	७००००
५	रुममधील आरसा(२ फूट x ३ फूट साईज) ॲल्यूमिनिअम फ्रेम	३५०	५५०	१९२५००
६	टेबल व खुर्ची गोदरेज मेक-अधिक्षक	१	६५००	६५००
७	टेबल व खुर्ची गोदरेज मेक-उपअधिक्षक	१	६०००	६०००
८	साईट टेबल्स व खुर्ची (३ फूट x २ फूट) गोदरेज मेक मदतनीस (मजल्यावर)	१६	३५००	५६०००
९	टेबल्स व खुर्ची सिफ्ट सुपरवायझर, गोदरेज मेक	१	६०००	६०००
१०	टेबल्स खुर्ची कार्या.लिपीक १+२ गोदरेज मेक भक्त नोंदणी	३	५५००	१६५००
११	फक्त खुर्ची गोदरेज मेक - कांऊटर लिपीक	६	२५००	१५०००
			एकुण रुपये	५,७८,५००

ब)

अ.न.	वस्तू	नग	दर (रु.प्रती नग)	रक्कम
०१.	प्रत्येक रुममध्ये दोन खुर्च्या	७००	५००	३,५०,०००
०२	पिण्याचे पाण्यासाठी स्टिलचें बंद जग	४००	५०	२०,०००
०३	पिण्याचे पाण्यासाठी स्टिलचें ग्लास	४००	१०	४,०००
०४	आंघोळीसाठी बाथरुममध्ये प्लॅस्टिक बादली १० ते १५ लिटरची	४००	२५०	१,००,०००
०५	बाथरुममध्ये आंघोळीसाठी प्लॅस्टिकचा मग	५००	१०	५,०००
०६	संडासमध्ये प्लॅस्टिकची बादली १ ते २ लिटरची	४००	१५	६,०००
०७	आंघोळीसाठी लहान स्टुल प्लॅस्टिकचा	४००	७०	२,८०००
०८	कूलूप गोदरेज/नवताल कंपनीचे,लिंक (स्टील) तीन चावी असलेले	४००	१३०	५,२०००
०९	चादरी/ओसवाल ब्लँकेट	३०००	२००	६,००,०००
१०	बेडशीट	३०००	१५०	४,५०,०००
११	पायपुसणे	४००	७०	२,८०००
१२	व्ही.आय.पी.रुमसाठी टॉवेल	२००	१००	२०,०००
१३	व्ही.आय.पी.रुमसाठी नॅपकिंन	२००	१०	२,०००
१४	खोळी गाद्यासाठी	१०००	१२०	१,२०,०००
१५	डस्ट बिन	४००	१००	४०,०००
१६	खिडकीसाठी पडदा कापड नमुन्याप्रमाणे	३५० नग	४५०	१,५७,५००
१७	रॅक ८ स्टोअर प्रती ८ प्रमाणे =६४ +३६ मुख्यस्टोअर =१०० नमुन्याप्रमाणे	१००	१०००	१,००,०००
१८	वेटींग खुर्ची ५० x ४	२००	३५०	७००००

			एकुण रुपये	२१५२५००

अ व ब एकुण रुपये ५,७८,५०० + २१५२५०० =२७,३१,०००

अ) वस्तू खरेदी विषयक कार्यालयीन कामे बांधकाम विभागाकडून प्रचलीत पध्दतीनुसार करण्यात येतील .

ब) वस्तू खरेदीची कार्यालयीन कामे निवासस्थान व खरेदीविभागाकडून प्रचलीत पध्दतीने करता येतील.

किंवा उपरोक्त वस्तूची तातडीची गरज असल्याने व किरकोळ वस्तू (पिण्याचे पाण्याचे स्टील ग्लास ,प्लॅस्टिक मग प्लॅस्टिक १ ते २ लिटरची बादली ,व्ही.आय.पी. नॅपकीन इ.) मा.व्यवस्थापन समीतीचे मार्गदर्शनानुसार मुंबई -नाशिक येथील मार्केट मधून खरेदी करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती इमारतीसाठी आवश्यक असणारी वरीलप्रमाणे साहित्य खरेदीकामी मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर, मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे व मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर यांचे समितीने मुंबई, नाशिक येथून समक्ष पहाणी करुन मालाचा नमूना पसंत करुन प्रचलित पध्दतीने खरेदी करणेबाबत अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासकीय अधिकारी,निवासस्थाने)

आयत्या वेळेचा विषय नं.११

व्दारावती इमारतीमधील खोलीचे सेवा आकाराबाबत

निर्णय क्र.७०

अ)व्दारावती इमारत साईभक्तांचे निवासव्यवस्थेसाठी तयार करण्यात आलेली असुन सदर इमारतीत एकुण चार माळे आहेत.तळ मजल्यावर १० खोल्या ,स्टिल्ट मजल्यावर ७८ खोल्या ,पहिला मजला ८२ खोल्या ,दुसरा मजला ८२ खोल्या,तिसरा मजला V.I.P.[A.C.]८२ अशा एकुण ३३४ खोल्या पैकी ३१६ खोल्या साईभक्तांचे वापरासाठी असुन त्यामध्ये तीन कॉटची व्यवस्था केलेली आहे.तसेच त्यात प्रत्येक रुममध्ये भक्तांचे मागणीनुसार जादा दोन गादया पुरविल्या जातील. म्हणजे सदर रुममध्ये ५ भक्तांची सोय होऊ शकते.

या इमारतीमधील खोल्यांचे सेवा आकार ठरविणे आहे.सध्या संस्थानकडे उपलब्ध असलेल्या विविध निवासस्थानांच्या सेवा आकारांचा थोडक्यात तपशिल खालील प्रमाणे :-

अ.न.	तपशिल	खोली हॉलची संख्या	व्यक्तीची मर्यादा	सेवा आकार २४ तासांसाठी	डिपॉझीट
०१.	साईप्रसाद नं.१	६०	१०	५०-००	१००-००
०२	साईप्रसाद नं.१ व्ही आय.पी.	२१	५	१००-००	२००-००
०३	साईप्रसाद नं.२ साधे रुम	५४	४	२००-००	२००-००
०४	साईप्रसाद नं.२ व्ही.आय.पी.	१८	६	३००-००	३००-००
०५	साईप्रसाद नं.२ मोठे रुम	०६	८	४००-००	४००-००
०६	शांतिनिकेतन लहान रुम	११	५	१५०-००	२००-००
०७	शांतिनिकेतन मोठे रुम	०४	६	२००-००	२००-००
०८	साईउदयान लहान रुम	१६	१०	२५-००	१००-००
०९	साईउदयान मोठे रुम	२०	२०	२५०-००	२५०-००
१०	साईनिवास अतिथीगृह	२४	२	७००-००	५००-००
११	साईछाया	०१	५०	६००-००	१०००-००

साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम)

अ.न.	तपशिल	खोली व्हॉलची संख्या	व्यक्ती मर्यादा	सेवा आकार २४ तासांसाठी	डिपॉझीट
०१	३ कॉटच्या रुम	२०३	४	१००-००	२००
०२	४ कॉटच्या रुम	१८९	४	१००-००	२००
०३	११ कॉटच्या रुम	२१	१२	३००-००	४००
०४	१२ कॉटच्या रुम	०२	१२	३००-००	६००
०५	३ कॉटच्या A.C..रुम	१३	३	४५०-००	६००
०६	६ कॉटच्या A.C..रुम	०३	६	९००-००	१०००
०७	७ कॉटच्या A.C..रुम	०१	६	५००-००	६००
०८	३ कॉटच्या Non A.C..रुम	०३	४	३००-००	४००
०९	तळमजला साध्या खोल्या	४७	१०	१००-००	२००
१०	जनरल हॉल	०२	५०	५००-००	६००

धर्मशाळा

अ.न.	तपशिल	खोली हॉलची	व्यक्ती	सेवा आकार	डिपॉझीट

		संख्या	मर्यादा		
०१	पहिला मजला	१६	२५	प्रत्येक व्यक्तीस सेवा आकार २१-००	२००-००
०२	दुसरा मजला	२८	१५	प्रत्येक व्यक्तीस सेवा आकार २१-००	२००-००

ब)व्दारावती इमारतील खोल्यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

अ.न.	तपशिल	खोली हॉलची संख्या	व्यक्तीची मर्यादा	सेवा आकार प्रस्तावीत	डिपॉझीट प्रस्तावित
०१.	तळमजला	१०	०५	२५०-००	४००-००
०२	स्टिल्ट मजला	७८	०५	२५०-००	४००-००
०३	पहिला मजला	८२	०५	२५०-००	४००-००
०४	दुसरा मजला	८२	०५	२५०-००	४००-००
०५	तिसरा मजला V.I.P.(A.c)	८२	०५	५००-००	८००-००

दिनांक १८.१०.२००८ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय " संस्थान निवासस्थानांचा सेवा आकार दिनांक ०१ जानेवारी ,२००९ पासून वाढविण्यात यावा.ज्या निवासस्थानाचा सेवा आकार रुपये १००-०० आहे त्यांचा सेवा आकार २००-०० व ज्या निवासस्थानाचा सेवा आकार २००-०० आहे त्याचा रुपये ३००-०० करण्यात यावा.असा झालेला आहे ".

(अ) व्दारावती इमारतीमध्ये एका Non A/C खोलीसाठी सर्वसाधारणपणे रुपये ३१०/- प्रति दिन खर्च व (ब) A/C खोलीसाठी प्रतिदिन रुपये ५६२/- खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्त अ व ब साठी साठी सेवाआकार रक्कम किती आकारावी

तसेच याशिवाय ३ पेक्षा जास्त व्यक्ती एका खोली मध्ये राहणेस तयार असतील तर ,जादा प्रत्येक व्यक्तीस (साधी खोली /वातानुकूलीत खोली) किती रक्कम आकारावी यावर चर्चा होऊन निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती इमारतीतील एका खोलीलसाठी प्रति २४ तासासाठी नॉन A/C रुपये ५००/- व A/C खोलीसाठी रुपये १०००/- व प्रत्येकी जादा व्यक्तीसाठी रुपये ५०/- आकारणी करण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-प्रशासकीय अधिकारी,निवासस्थाने)

आयत्या वेळेचा विषय नं.१२ निर्णय क्र.७१

विषय:- सन २००९-२०१० सालाकरीता प्रसादालय व कॅन्टीन माल खरेदी बाबत...

सन २००९-२०१० सालामध्ये प्रसादालय व कॅन्टीन विभागाचे दैनंदिन वापराकरीता खरेदी करावयाचे गहू, हरबरा इ.धान्य तसेच तांदूळ, तूप, तेल, साखर, चहा, दूध विविध प्रकारचा किराणा माल, बिस्कीटे इत्यादी मालाचा तपशीलवार तक्ता सोबत सादर केलेला आहे. सन २००९-२०१०ची अंदाजे मागणी दाखवितांना गेल्या ३ वर्षाच्या प्रसादालय व कॅन्टीन विभागाकडील प्रत्यक्ष वापराची आकडेवारी दिलेली असून त्यात भक्तनिवासस्थान येथे केलेली जेवणाची व्यवस्था, श्री साईबाबा रुग्णालय विभागात रुग्णांना देण्यात येणारे जेवण व गर्दीचे कालावधीमध्ये इतर ठिकाणी आवश्यकतेनुसार स्वयंसेवी प्रसादभोजन कक्ष चालू करण्यात आले असल्याने २५% वाढ गृहीत धरलेली आहे. तसेच श्री साईभक्तांना प्रसादरुपाने अल्पदरात नाष्टा व प्रसादलाडू देण्यात येतो, त्याची दिवसेंदिवस होणारी वाढ विचारात घेऊन त्यासाठी आवश्यक असणारा किराणा माल वाढविलेला आहे. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे-

अ) मोंढयावरुन जाहिर लिलाव पध्दतीने खरेदी...

गहू -	११५०० क्विंटल	मेथी-	२.०० क्विंटल
हरभरा-	१००० क्विंटल	सफेद तीळ-	२.०० क्विंटल
खिसमिस-	२५० क्विंटल	मोहरी-	३०.०० क्विंटल

दरवर्षी गहू, हरभरा, मेथी व सफेद तिळ इ.ची खरेदी कृषी उत्पन्न बाजार समितीचे कोपरगाव, राहाता, कोल्हार इ.ठिकाणच्या मोंढयावरून मा.स्थानिक विश्वस्तांचे उपस्थितीमध्ये जाहिर लिलाव पध्दतीने करणेत येतो. सन २००९-१० करीता कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कोपरगांव, कोल्हार व राहाता इत्यादी ठिकाणच्या मोंढयावरून जाहीर लिलावाने खरेदी करुन खरेदी केलेला माल मध्यवर्ती भांडारातील दोन्ही गोडाऊनमध्ये साठवून जागा अपुरी पडल्यास राज्य वखार महामंडळाचे कोपरगांव येथील गोदामामध्ये ठेवावा लागेल. सदरील खरेदी मार्च २००९ पासून मा.विश्वस्तांचे उपस्थितीत सुरू करणेस मान्यता असावी. बाजारात मोहरी व मेथीची आवक कमी असल्याने मोंढयावरुन तसेच निविदेत समावेश करुन खरेदी करता येईल.

मागील वर्षाप्रमाणे सन २००९-१० मध्येही प्रसादालयासाठी आवश्यक खिसमिस कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पिंपळगांव बसवंत, तासगांव, सांगली पंढरपूर येथील मोंढयावरून जाहीर लिलावाने खरेदी करणेस तसेच मे.प्रवरा फळे, भाजीपाला खरेदी विक्री व प्रक्रिया शेतकरी सहकारी संस्था मर्यादित,

प्रवरानगर यांचेकडील नमुने पाहून मा.विश्वस्तांचे उपस्थितीत खरेदी करणेस व अहमदनगर येथील गुगळे कोल्ड स्टोअरेज यांचे शितगृहात साठविणेस मान्यता देण्यात आली.

प्रसादालयाचे दैनंदिन वापराकरीता आवश्यक भाजीपाला कृषी उत्पन्न बाजार समिती कोपरगांव, शिरडी, सावळीविहीर, राहाता इ. ठिकाणचे मॉंढयावर जाहीर लिलावाने खरेदी करणेत येत आहे. उत्सव, महोत्सव आदी गर्दीच्या काळात साईभक्तांची गर्दी वाढल्यास नाशिक येथून भाजीपाला खरेदी करणेत येतो. सन २००९-१० मध्येही कृषी उत्पन्न समितीचे कोपरगांव, शिरडी सावळीविहीर, राहाता इत्यादी ठिकाणचे मोंढयावरून जाहिर लिलाव पध्दतीने तसेच आवश्यकतेनुसार नाशिक व इतर ठिकाणाहून भाजीपाला खरेदी करणेस मान्यता देण्यात आली.

ब) कोटेशन मागवून खरेदी..साखर १३००० क्विंटल (एम ३०/एस ३० ग्रेड)

सन २००९-१० मध्ये कॅन्टीन तसेच प्रसादलाडू बनविणेसाठी आवश्यक साखर खरेदीसाठी मागील प्रचलित पद्धतीप्रमाणे अ.नगर जिल्हयातील कोपरगांव, राहाता व श्रीरामपूर तालूक्यातील ५० कि.मी.च्या परिसरातील कारखान्याकडून कारखाना तसेच संस्थान वाहनाने वाहतूक अशा दराचे टेंडर मागवून व वाहतुक खर्चाबाबत शहानिशा करून खरेदीस अथवा एकच कोटेशन प्राप्त झाल्यास त्यांचे मान्य दराने खरेदीस मान्यता देण्यात आली.

क) जाहिर निविदा मागवून खरेदी..

०१. किराणा माल, कडधान्ये व मसाल्याचे पदार्थ

प्रसादालयाचे दैनंदिन वापरासाठी लागणारा किराणा माल, कडधान्ये व मसाले पदार्थ इत्यादी खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देउन को-या निविदांची विक्री करून ठराविक मुदतीत निविदा व मालाचे नमुने मागवून, मा.विश्वस्त समितीचे सभेमध्ये नमुने निवडून, तसेच संबंधितांना समक्ष चर्चेसाठी बोलावून त्यांनी दिलेल्या सुट दरांचा विचार करुन तसेच नमुने पाहून अंतिम निर्णय घेतला जातो. त्याप्रमाणेच सन २००९-१० साठीचे खरेदीकामी कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

०२. तांदुळ- ६००० क्विंटल

सन २००८-०९ मध्ये प्रसादालयासाठी आवश्यक असणाऱ्या तांदूळाची निविदेत मागणी केलेली होती. प्रसादालयासाठी आवश्यक असणारा तांदुळ एकाचवेळी खरेदी केला जात असल्याने व त्याचा सिजन हा जानेवारी पासून सुरु होत असल्याने जानेवारी/फेब्रुवारी मध्ये स्वतंत्र वर्तमानपत्रात जाहिरात देऊन, कोटेशन मागवून मा.विश्वस्तांच्या उपस्थितीत आंध्रप्रदेश किंवा इतर उत्पादक प्रदेशामधून अथवा जानेवारी/फेब्रुवारी मध्ये शक्य न झाल्यास निविदेमध्ये समाविष्ट करुन तांदुळ खरेदी करणेस मान्यता देण्यात आली..

०३. गावरान तूप- ७३०० क्विंटल

प्रसादालयामध्ये प्रसाद लाडू तयार करणेकामी आवश्यक असणारे गावरान तूप सन २००८-०९ मध्ये मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार दोन टप्प्यात, निविदा मागवून खरेदी करणेत येत आहे. सन २००९-१० साठीही दि.०१.०४.२००९ ते ३०.०९.२००९ व दि.०१.१०.२००९ ते ३१.०३.२०१० अशा २ सहामाहीसाठी वेगवेगळया निविदा मागवाव्यात. तसेच लूज ३५ किग्रॅ. कॅन व १५ किग्रॅ. डब्यातील ॲगमार्क तूपासाठी निविदा मागणी करून खरेदी करावी असे नम्र मत आहे.

०४. चहा- ७५ क्विटंल व कॉफी-१० क्विटंल

कॅन्टीन विभागासाठी सन २००८-०९ मध्ये ब्रुक बॉण्ड सुपर डस्ट, टाटा सीटीसी डस्ट व सपट सीटीसी डस्ट तसेच कॉफीसाठी ब्रुक बॉण्ड कॅफे गोल्डची निविदा मागणी करून खरेदीस मान्यता मान्यता देण्यात आली..

०५. बिस्कीटे - पार्ले, ब्रिटानीया व सनफिस्ट

कॅन्टीनमध्ये दैनंदिन विक्रीकामी आवश्यक असणारे पार्ले प्रॉडक्टसचे ८२/२१० ग्रॅम, क्रॅकजॅक व मोनॅको तसेच ब्रिटानीया प्रॉडक्टसचे ८८/२२५ ग्रॅम, फिफ्टी-फिफ्टी, स्नॅक्स व सनफिस्ट प्रॉडक्टस बिस्कीटे कंपनीच्या विक्रेत्यांकडून खरेदी करणेस तसेच श्री साईभक्तांचे मागणीनुसार वरील कंपन्यांचे ब्रॅण्ड पैकी काही नवीन खरेदी करावयाची झाल्यास त्यास मान्यता मान्यता देण्यात आली.

०६. पॅकेज्ड् ड्रीकींग वॉटर -०१ लिटर व ५०० एमएल पॅकींग

शासनाच्या नियमानुसार आयएसआय स्टॅण्डर्ड मान्यता प्राप्त पॅकेज्ड् ड्रीकींग वॉटर उत्पादनाच्या निविदा मागणी करून १ लिटर व ५०० एमएल पॅकींगमध्ये ड्रीकींग वॉटर खरेदीस मान्यता मान्यता देण्यात आली.

०७. गाय दूध - दररोज अंदाजे १७०० लिटर

कॅन्टीन विभागाचे दैनंदिन वापरासाठीचे गाय दूध ३.५ ते ३.८ फॅट व ८.५ एसएनएफ गूणवत्तेचे दूध खरेदी कामी निविदा मागणी करून खरेदीस मान्यता मान्यता देण्यात आली..

०८. प्लेन व खणाची पत्रावळी

प्रसादालय विभागामार्फत गर्दीचे कालावधीत ठिकठिकाणी मंडप टाकणेत येऊन साईभक्तांचे जेवणाची स्वंयसेवी भोजन व्यवस्था करणेत येते, त्यासाठी खणाची पत्रावळीचा वापर केला जातो. तसेच काही

वेळेस पाण्याची टंचाई निर्माण झाल्यास खणाच्या पत्रावळीचा वापर केला जात असल्याने खणाच्या पत्रावळीचा निविदेत समावेश केलेला आहे.

०९. लिक्वीड सोप व क्लिनींग पावडर-

संस्थानचे पाणीपुरवठा विभागाकडे लिक्वीड सोप तयार केले जात असून आवश्यकतेनुसार प्रसादालयास पुरवठा होत असल्याने त्याचा निविदेत समावेश केलेला नाही. तथापि आवश्यकता भासल्यास कोटेशन मागवून खरेदी करता येईल. क्लिनींग पावडर व भांडे धुण्याच्या मशिनसाठी आवश्यक असणारे डिश वॉशिंग मशीन लिक्वीड सोपचा वापर कमी असल्याने ते कोटेशन मागवून खरेदी करता येईल.

सन २००९-२०१० करीता आवश्यक असणाऱ्या किराणा मालासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

अ)	मॉढयावरुन लिलाव पद्धत तीने करावयाची खरेदी	रु. २,४०,९६,९००/-
ब)	कारखांन्याकडून कोटेशन मागवून करावयाची खरेदी	रु. २,३४,००,०००/-
क)	निविदा मागवून करावयाची खरेदी	रु. २१,६७,०९,५५१/-
	एकुण अंदाजे किंमत	**रु.२६,४२,०६,४५१/-**

सन २००८-०९ मध्ये निविदा मागणी करतांना आर्थिक उलाढालीबाबत निकष देण्यात आलेला असल्याने योग्य क्षमतेच्या पुरवठादाराकडून निविदा सादर केल्या गेल्या होत्या. सन २००९-१० मध्येही खालीलप्रमाणे वार्षिक उलाढालीबाबत निकष देवून त्या निकषानुसार निविदांची मागणी करण्यात यावी असे ठरले.

अ.नं.	तपशिल	संस्थानला करावयाची अंदाजे खरेदीची रक्कम	पुरवठाधारकाची अपेक्षित वार्षिक उलाढाल
०१.	किराणामाल-दाळी, कडधान्ये व इतर	रु.६,२२,२२,९३१/-	रु.५०,००,०००/-
०२.	तांदुळ	रु.९५,८८,०००/-	रु.५०,००,०००/-
०३.	खादयतेल (सुर्यफूल/मका)	रु.२,२५,३४,२००/-	रु.५०,००,०००/-
०४.	गावरान तूप (सहामाही खरेदी)	रु.९,५९,९५,०००/-	रु.१,००,००,०००/-
०५.	चहा व कॉफी	रु.९,३३,५००/-	रु.१०,००,०००/-
०६.	गाय दुध	रु.१,०१,५०,०००/-	रु.१,००,००,०००/-
०७.	बिस्कीटे	रु.२८,५०,०००/-	रु.२०,००,०००/-
०८.	पॉलिकप	रु.२०,३६,३२०/-	रु.२०,००,०००/-
०९.	प्लॅस्टीक पिशवी	रु.८३,२७,८५०/-	रु.३०,००,०००/-
१०.	मिनरल वॉटर	रु.२०,७१,७५०/-	रु.१०,००,०००/-

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

आयत्या वेळेचा

विषय नं.१३ मा.विश्वस्तांचे सुचनेबाबत

निर्णय क्र.७२ मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-

०१) भारतीय आर्युविमा महामंडळ यांचेमार्फत संस्थान परिसराचे कडेने पिंपळवाडी रोडवर लाईट व्यवस्था केलेली आहे त्या लाईटसाठी संस्थानमार्फत वीजपूरवठा करण्यात यावा.
(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

०२) साईभक्तांना मार्गदर्शन करण्यासाठी सिकंदराबाद येथे संस्थानमार्फत माहितीकेंद्र उभारण्यात आलेले आहे. या माहितीकेंद्राचे उद्घाटन दिनांक २५ जानेवारी २००९ रोजी करण्यात यावयाचे असल्याने त्यापूर्वी तेथील सर्व कामे पूर्ण करण्यात यावीत. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

०३) श्री साईनाथ रुग्णालयातील रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून श्री साईबाबा हॉस्पिटलकडील डॉ.क्षितीज जाधव,अनॅस्थेसिस्ट यांची आर.एम.ओ. श्री साईबाबा हॉस्पिटल यांची श्री साईनाथ रुग्णालयाकडे बदली करण्यात यावी. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

०४) संस्थानमध्ये ज्या कर्मचाऱ्यांना विशेषवेतन/भत्ता (Allowance) देण्यात येतात अशा कर्मचाऱ्यांची सविस्तर माहिती व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात यावी.
(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

०५) संस्थानचे बांधकाम व पाणीपुरवठा विभागासाठी प्रत्येकी एक अभियंत्यांची शासनाकडून प्रतिनियुक्तीवर मागणी करण्यात यावी. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

०६) श्रीसाईनाथ हॉस्पिटलकडे नेमणूक केलेल्या सर्व वैद्यकीय अधिकारी, इतर तंत्रज्ञ व स्टाफला वेतनश्रेणी देणेत यावी. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

वरील निर्णय क्र ०१ ते ७२ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

(किशोर रा.मोरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

(जयंत मुरलीधर ससाणे)
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)